म.ग्रं.सं., संग्रह शाखा, ठाणे.
विषय : निबंध
सं.क्र. : १५६९

REFBK-0013762

# आधुनिक मराठी काव्याचे अंतःप्रवाह

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३७८२८ वि: निबंध
क्रमांक १५६१ नोंद दि. १७.१२.६५

लेखक

**वामन भार्गव पाठक**, एम्. ए; पीएच्.डी

मराठीचे प्राध्यापक, नवरोसजी वाडिया कॉलेज, पुणे १

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १३७६१

REFBK-0013762

किंमत १० रुपये

प्रकाशक
ग. ल. ठोकळ, बी. ए, बी. टी.
ठोकळ प्रकाशन
ठोकळ भवन, लक्ष्मी रस्ता, पुणे २

* *

पहिली आवृत्ती, १९६४

* *

एकमेव विक्रेते
श्री लेखन वाचन भांडार
ठोकळ भवन, लक्ष्मी रस्ता, पुणे २

* *

मुद्रक
य. गो. जोशी, बी. ए. (ऑ. )
आनंद मुद्रणालय
१५२३ सदाशिव, पुणें २

अनुक्रम ३७८२४ वि: निबंध
क्रमांक १५६१ नों दि: १७।२।६५

# निवेदन

माझे ‘ टीका आणि टीकाकार ’ हे पुस्तक १९४८ मध्ये प्रसिद्ध झाले. त्याच सुमारास प्रस्तुत पुस्तकाच्या अंतःस्वरूपाची रूपरेषा मी मनात आखली होती. गेली अनेक वर्षे आधुनिक मराठी कवितेचे अध्ययन आणि अध्यापन करणे, हा माझा एक आवडीचा विषय झाला होता. वरील विषयाला धरून काही लेखही मी वेळोवेळी लिहिले होते. मी ज्या संस्थेत अध्यापनाचे कार्य करीत आहे, त्या संस्थेने ‘ नवरोसजी वाडिया कॉलेजा ’च्या रौप्य–महोत्सवप्रसंगी, जो ग्रंथ प्रसिद्ध केला, त्या ग्रंथात आधुनिक कवितेतील ‘ जीवनविषयक तत्त्वज्ञान ’ या माझ्या निबंधाचा काही भाग प्रसिद्ध करून, एक प्रकारे माझ्या या विषयाच्या लेखन–कार्याला उत्तेजन दिले; एवढेच नव्हे तर, माझे हे पुस्तक लिहून झाल्यावर ते प्रकाशित व्हावे, म्हणून सक्रिय सहानुभूती दाखविली, याबद्दल वरील संस्थेचा मी अतिशय ऋणी आहे, असा येथे कृतज्ञतापूर्वक उल्लेख करीत आहे.

या पुस्तकाचे लेखनकार्य चालू असता माझे परममित्र श्री. ग. ह. पाटील यांनी वेळोवेळी मला प्रोत्साहन दिले. तसेच माझे अनेक वर्षांचे स्नेही, प्रथितयश लेखक व कवि श्री. ग. ल. ठोकळ यांनीही माझ्या पुस्तकासंबंधी विशेष आपुलकी दाखविली. एवढेच नव्हे तर, या पुस्तकाच्या प्रकाशनाची सर्वच जबाबदारी स्वतःच स्वीकारली, याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार मानण्यात मला अतिशय आनंद होत आहे.

या पुस्तकाचे मुद्रणकार्य आनंद मुद्रणालयात झाले. याबाबतीत वरील मुद्रणालयाचे संचालक श्री. दादासाहेब जोशी यांनी जे प्रेमळ सहकार्य दिले, याबद्दल त्यांचे, व त्याचप्रमाणे त्यांच्या सहकाऱ्यांचे मी मनःपूर्वक आभार मानतो.

पुस्तकातील लेखनपद्धती, सरकारनियुक्त मराठीसाहित्यमहामंडळाने ठरविलेल्या शुद्धलेखनाच्या नियमानुसार केली आहे. याबाबत श्री. य. ए. धायगुडे यांनी जी मला मदत केली, त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

गेली दहा बारा वर्षे या पुस्तकातील विषयांचे वाचन व मनन करीत असता, अनेक कविमित्रांचा मला प्रत्यक्षाप्रत्यक्ष सहवास लाभला. त्यामुळेच या पुस्तकाची उभारणी मला करता आली; त्या सर्व कविमित्रांचे कृतज्ञतापूर्वक स्मरण करून, मी हे निवेदन संपवितो.

पुणे २
२०।९।१९६४

**वामन भार्गव पाठक**

# प्रवाहाच्या काठावर

## व्यक्तित्व आणि व्यक्तिमत्त्व

कवीचे व्यक्तिमत्त्व काव्यात प्रगट होते. व्यक्तिमत्त्व म्हणजे केवळ व्यक्तित्त्व नव्हे. सहजजात प्रवृत्तींचा काम, क्रोध, लोभ इ. विकारांचा लाभ प्रत्येकाला जन्मजातच होतो: त्यांच्या तीव्रतेचे प्रमाण व्यक्तिपरत्त्वे भिन्न होते. मानवाचा व्यवहार जसाजसा वाढत जातो तसातसा त्याचा अनेकांशी संबंध येत जातो. भिन्न भिन्न परिस्थितीत त्याच्या वागणुकीचे विशिष्ट धर्म प्रगट होत जातात. वस्तुतः मानवाच्या मूलभूत प्रवृत्ति ह्या, कांही अंशी, स्वतःच्या प्रेरणेने, व कांही अंशी, परिस्थितीला प्रत्युत्तर द्यावे, या हेतूने जागृत होतात. व्यक्ती, आणि सभोवतालची परिस्थिती, यांच्या संपर्कातच ( हा संपर्क कलहाचा असेल, किंवा प्रेमाचा असेल, ) व्यक्तित्वाचा विकास होत राहतो. व्यक्तिमत्त्वाचा संबंध व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाशी–त्या त्या व्यक्तीने सभोवतालच्या परिस्थितीवर मिळविलेल्या विजयाशी–पोहोचतो. अशाप्रकारे व्यक्ति-मत्त्वामध्ये व्यक्तीच्या भावना, कल्पना आणि विवेक, ( बऱ्यावाईटांत निवड करण्याची बुद्धी, ) यांबरोबरच विशिष्ट विषयाकडे पाहण्याचा तिचा दृष्टिकोन यांचा अंतर्भाव झालेला असतो.

विशिष्ट प्रसंगाने वा विषयाने कवीचे मन वेधून घेतले, किंवा आपण होऊन त्याने त्या प्रसंगाकडे लक्ष दिले, म्हणजे एक तर तो त्या परिस्थितीपुढे नमते तरी घेतो, समरस तरी होतो, किंवा परिस्थितीवर वरचढपणा तरी गाजवतो. बहुतेक यक्तींच्या हातून पहिल्या दोन प्रतिक्रिया घडून येतात, परंतु अशा काही विशिष्ट व्यक्ती असतात की, त्या परिस्थितीवर आपल्या व्यक्तिगत विशिष्ट गुणांचा ठसा उमटवितात व परिस्थितीच्या प्रवाहात वाहून जाण्याऐवजी परिस्थितीवर वर्चस्व गाजवून आपले वेगळेपण सिद्ध करतात. व्यक्तीने दाखविलेल्या या वैशिष्ट्यपूर्ण वेगळे-पणाचा भाग व्यक्तिमत्त्वामध्ये समाविष्ट होतो.

## बाह्यविषयाकडे पाहण्याचा कवीचा दृष्टिकोन

कवीच्या भावना विशिष्ट विषयसौंदर्यामुळे उचंबळून आल्या, वा आपण होऊन जागृत झाल्या, तरी त्या कोणत्या कारणांमुळे उचंबळून आल्या किंवा दुसऱ्या शब्दात लिहावयाचे म्हणजे, त्यांतून त्यांचा कोणता विशिष्ट दृष्टिकोन प्रगट झाला, याला फार महत्त्व आहे. काव्यातील भावनांचे श्रेष्ठत्व भावनेला वरकरणी प्राप्त झालेल्या केवळ विषयात नसते, तर ती भावना ज्या विशिष्ट दृष्टिकोनाने अंकित झालेली असते त्या दृष्टिकोनाला असते. काव्यात, वरवरच्या विषयाला नव्हे तर त्या

त्या विषयाशी संलग्न झालेल्या कवीच्या भावनात्मक दृष्टिकोनाला महत्त्व आहे म्हणूनच काव्याला कारणीभूत झालेला विषय कोणताही असला, तरी त्या त्या विषयांत कवीचे व्यक्तिमत्त्व—त्याचा भावनांकित विशिष्ट दृष्टिकोन—याला विशेष महत्त्व प्राप्त होते.

## कवीची संयमनशील मनोवृत्ति

कवीची भावना ही सहजस्फूर्त असते, की ती मननशील असते, याचा विचार केल्यास असे दिसून येते की, कवीच्या मनात निर्माण झालेला प्राथमिक प्रक्षोभ हा भावनेच्या पहिल्या प्रहरात मनोव्यापारातील दिसून येणारा केवळ खळखळाटच होय. मनाच्या या अवस्थेत भावना अंधपणाने वावरत असते, तिच्यात मननशीलतेचा (बऱ्यावाईटाची निवड करणाऱ्या धर्माचा,) सर्वस्वी नाही, तरी पुष्कळसा अभावच असतो. अशावेळी जी संवदना निर्माण होते, ती मात्र उत्कट असते, आणि तिची उत्कटता कमी होऊ न देता भावनेचा समतोलपणा राखण्यात मनोवृत्ती जेवढी विजयी होईल त्या मानाने तिच्यात एकीकडे विषयाशी एकरूप होण्याची तन्मयता, तर दुसरीकडे विषयापासून आवश्यक तेवढी दूर राहण्याची संयमनशीलता, असे दुहेरी गुण दिसून येतील. कवीच्या अशा विशिष्ट मनोवृत्तीलाच सुंदर मनोवृत्ति (Aesthetic Attitude) म्हणणे इष्ट होईल.

## एकाच विषयाकडे पाहण्याचे कवींचे विविध दृष्टिकोन

काव्याला बाह्यात्कारी कारणीभूत झालेला विषय कोणताही असला, तरी त्या विषयाच्या निमित्ताने प्रगट झालेल्या विशिष्ट मनोवृत्तीवर—कवीच्या विषयाकडे पाहण्याच्या कलात्मक दृष्टिकोनावरच—काव्याचे महत्त्व अवलंबून असते, असे वर म्हटलेच आहे.

एकाच बाह्य विषयाकडे पाहण्याच्या कवींच्या दृष्टिकोनांत भेद निर्माण होतात. एक सूर्यास्ताचे दृश्य घेतले तर विशिष्ट परिस्थितीत केशवसुतांसारखा कवी स्वातंत्र्याचा सूर्य पश्चिमेला गेला म्हणून हळहळतो, तर तांबे यांना जीवनान्त जवळ आलेला पाहून ढळलेल्या दिनाची उपमा सुचते. एकाच विषयातून कवींच्या विविध व्यक्तिमत्त्वांचा आपणास प्रत्यय घेता येतो. एवढ्याकरिता एकाच विषयात उतरलेल्या विशिष्ट व्यक्तींच्या दृष्टिकोनांचा एकत्रित विचार करावा या हेतूने, अनेक टीकाकार बाह्यविषयांच्या अनुरोधाने काव्यात उतरलेल्या कवींच्या व्यक्तित्वांचा अभ्यास करतात. याच पद्धतीचा अवलंब करून मी विविध विषयानुरोधाने निरनिराळ्या प्रकरणांतून त्या त्या कवींच्या व्यक्तिमत्त्वाच्या सौंदर्याचा विचार करण्याचे धोरण ठेविले.

## भावनांचे मूल्यमापन

कवीलाही सामान्य व्यक्तीप्रमाणेच सुखदुःखांचा अनुभव येतो. सामान्य व्यक्ती त्यांचा परिस्फोट सहजस्फूर्तरीतीने करीत असते. उलट कवीच्या भावनाविष्कारात त्याचा समुचित तटस्थपणा दिसून येतो. मात्र एकाची भूमिका केवळ स्वार्थकेंद्रित राहते, तर दुसरा आपल्या आत्मपरतेला कौशल्याने संयमित व उदात्त करतो. एवढ्याच बाबतीत दोघांमध्ये फरक दिसून येतो, कवीकवींमध्ये भेद असतातच, कवीची भावना काव्यात प्रगट होते हे खरे; पण भावनेला खोली उंची उत्कटता, विस्तृतता, व्यापकता येऊ शकते, म्हणूनच निरनिराळ्या कवींच्या काव्यांत प्रगट झालेल्या भावनांची किंमत एकसारखी नसते. शिवाय काव्यातील भावना अनुभव-स्पृष्ट असते, आणि अनुभवाची संपन्नता याचा अर्थ केवळ ज्ञानग्रहणाची संपन्नता एवढाच नाही. व्यक्तीला ज्या गुणांमुळे संपन्नता व मोठेपणा प्राप्त होतो, त्या गुणांचाही अंतर्भाव अशा अनुभवात होतो. कवीचे व्यक्तित्व हा अनुभवसंपन्नतेचा एक भागच आहे; अर्थात व्यक्तित्व जेवढे सुसंपन्न करावे तेवढे थोडेच; असामान्य व्यक्तित्वाला व्यक्तिमत्त्व म्हटले तरी असामान्य व्यक्तीच्या भावनाविष्कारात सामान्य व्यक्तीला आपल्याशा वाटतील अशाच भावना प्रगट होतात. कविकवींमध्ये जे फरक पडत जातात, तेही अशा अनुभवसंपन्नतेमुळेच. आपल्याला प्रतीत होणारा सौंदर्यात्मक अनुभव अत्यंत उत्कटतेने व यथार्थतेने व्यक्त केला की, कवीचे कार्य संपले, हे म्हणणे काही अंशी बरोबर आहे. आशय आणि शाब्दिक आकार यांच्यात केवळ अभेदता राखणे हे काव्याच्या यशाचे अर्धे गमक मानले, तरी आशयाचे-म्हणजेच कवीच्या व्यक्तिमत्त्वाशी निकट साहचर्य ठेवणाऱ्या अनुभवाचे-मोल काय आहे हे पाहणे, हेही काव्याच्या यशाचे उरलेले अर्धे गमक महत्त्वाचे ठरते, यात शंका नाही. अशा प्रकारे कवीचे व्यक्तित्व, काव्यातील भावनात्मक आशय, आणि बाह्य आकार, असे तिहेरी स्वरूप काव्याचे परीक्षण करताना ध्यानात घेणे इष्ट असते.

## महाकाव्याचा अभाव

केशवसुतप्रभृति कवींनी आधुनिक कवितेला नवीन वळण लावले हे खरे, परंतु त्यांच्या पूर्वी होऊन गेलेल्या अव्वल इंग्रजी अंमलातील अनेक कवींनी मराठी कवितेच्या क्रांतिकारकत्वाची अप्रत्यक्षपणे ग्वाही दिली होती. महादेवशास्त्री कोल्हटकर म. मो. कुंटे, वि. मो. महाजनि, चिंतामणीपेठकर–प्रभृति कवींनी इंग्रजी काव्याच्या धर्तीवर मराठीत नव्या पद्धतीची काव्यरचना करण्याचे प्रयोग अगोदरच सुरू केले होते. परंतु तत्कालीन कवितेवर परावलंबत्व आणि अनुकरणशीलता यांचाच पगडा अधिक बसला होता. या उणीवा नाहीशा करून मराठी कवितेत आत्मविश्वास आणि

स्वत्व प्रज्ज्वलित करण्याचे मोठेच श्रेय, केशवसुत आणि त्यांचे समकालीन कवी यांनी घेतले यांत शंका नाही.

गेल्या शतकात काव्येतर वाङ्मयप्रकारही भरभराटीस आले. कादंबरीकारांत हरिभाऊ आपटे यानी आंतरराष्ट्रीय कीर्ति मिळविली. दिवंगत नाटककारांपैकी कोल्हटकर, खाडीलकर, गडकरीप्रभृती लेखकांनी नाट्यवाङ्मयाला भारतीय वाङ्मयांत पहिल्या प्रतीची प्रतिष्ठा मिळवून दिली. त्यामानाने काव्य हा वाङ्मयप्रकार मान्यता पावला तरी या काळात श्रेष्ठ प्रतीचे महाकाव्य निर्माण झाले नाही, आणि आधुनिक मराठी कवितेला इतर भारतीय भाषांत रूपांतरित होण्याचा विशेषसा मान मिळाला नाही. या बाबतीत असे एक समाधान करून घेता येते की, पद्य हे जसे पूर्वी भावनाविष्काराचे एकच एक साधन होते, तसे ते आता राहिले नाही. आपल्या मनमोकळ्या अपूर्व भावना गद्यात्मक वाङ्मयप्रकारांत प्रगट करणेच कित्येकांना जसे सोयीचे तसेच ते स्वाभाविक वाटले. काव्यांतही अलीकडे वृत्तांपेक्षा जाती, आणि जातींपेक्षा मुक्तछंद यांचा अवलंब करण्याची प्रवृत्ती अधिकाधिक बळावत गेली. आता तर नवकवी मुक्तछंदाचा इतका सढळपणे उपयोग करतात की शिवरामपंत परांजपे यांच्या निबंधांतील गद्यकाव्यांत जसा एक सुप्त स्वरूपाचा ताल असतो, तेवढाच ताल आता मुक्तछंदात राहिलेला आढळतो.

गेल्या शतकात पद्यबद्ध रचना करणारा महाकवी निर्माण का झाला नाही, हा वाद येथे अप्रस्तुत आहे. महाकवीच्या मनोवृत्तीत जो व्यापकपणा, उत्साह, विशिष्ट ध्येये मानवापुढे ठेवण्याची दुर्दम महत्वाकांक्षा, सदभिरुचिसंपन्नतेचे व तपश्चर्येचे बळ, रसिकता, अखिल मानवाच्या कल्याणाविषयी तळमळ, कालाची व विषयाची अनुकूलता, आणि या सर्वांबरोबर जिचा उल्लेख करणे आवश्यक आहे ती असामान्य प्रतिभा, यांचा साठा भरपूर असतो. त्याच्या अभावी महाकवि झाला नाही असेही म्हटले जाते. मात्र येथे एवढेच म्हणणे आवश्यक आहे की, महाकवीच्या ठिकाणी दिसून येणाऱ्या प्रतिभेचे बल आजच्या यंत्रयुगात दिसून आले नाही वा, येणारच नाही, असा सिद्धान्त मांडणे चुकीचे होईल. वर म्हटल्याप्रमाणे कवीच्या भावनाविष्काराला इतर अनेक वाङ्मयप्रकार सोयीचे ठरल्यामुळे, केवळ पद्यातील महाकवीला आज विशेष वाव राहिला नाही, असे दिसून येते.

## केशवसुत आणि त्यांचे समकालीन कवी

रे. टिळक यांची जन्मशताब्दि दोन वर्षांपूर्वी (१९६२ मध्ये) साजरी झाली, आणि केशवसुतांची जन्मशताब्दि १९६६ मध्ये साजरी होईल. दोघेही कवी जवळ जवळ समकालीनच; परंतु रे. टिळक यांची काव्यक्षेत्रातली कामगिरी १९१९ पर्यंत चालू राहिली. केशवसुत १९०५ मध्येच निधन पावले. आधुनिक

कवितेला क्रांतिकारक वळण लावण्याचे श्रेय केशवसुत-समकालीन काही कवींना लाभले तरी, सर्वसाधारणपणे केशवसुतांना हे श्रेय दिले जाते.' केशवसुतांनी साध्या विषयात मोठा आशय पाहिला. व्यक्तिनिष्ठा राखून स्फुट भावगीतात्मक काव्यरचनेचा पाया घातला. बाह्य अलंकारांपेक्षा अर्थसौंदर्याला महत्त्व दिले. व्यक्तिस्वातंत्र्य, सामाजिक समता, विश्वबंधुत्व इत्यादी तत्कालीन ज्वलंत विषयांचा भावनात्मकतेने पुरस्कार केला. या सर्व कारणांमुळे केशवसुतांना आधुनिक कवितेचे प्रवर्तक म्हणण्याची रीत आहे.' इ. स. १८८५ ते इ. स. १९२० या काळात होऊन गेलेल्या कवींनी—रे. टिळक गडकरी, बालकवि, रेंदाळकर—इत्यादिकांनी केशवसुतांविषयी आदरभाव दाखविला, एवढेच नव्हे तर, त्यांचाच संप्रदाय आपण पुढे चालवीत आहोत असे म्हटले. वस्तुतः रे. टिळक, गडकरी, बालकवि, बी इत्यादी कवींच्या काव्यांचें स्वरूप अनेक बाबतीत केशवसुतांहून निराळे आणि स्वतंत्र आहे. जीवनविषयक सृष्टिविषयक अगर प्रेमविषयक कवितांतून त्या त्या कवींची व्यक्तिगत भिन्न भिन्न वैशिष्ट्ये दिसून येतात. त्यांचा ऊहापोह निरनिराळ्या प्रकरणांतून केला आहे.

## विशिष्ट टीकापद्धतीचा अवलंब

विविध विषयांच्या निमित्ताने काव्यांत प्रगट झालेल्या कवीच्या व्यक्तिमत्त्वाचे रसग्रहण करणे, या टीकापद्धतीचा मी अवलंब केला आहे, असे आरंभी म्हटलेच आहे. या टीकापद्धतीशिवाय आधुनिक काव्याच्या अभ्यासाच्या अन्य टीकापद्धती आहेत. इंग्रजी काव्यवाङ्मयात ज्या प्रवृत्ती आणि जी ध्येये कालानुसार दिसून आली त्यांचेही प्रत्यक्षाप्रत्यक्ष परिणाम अर्वाचीन मराठी काव्यवाङ्मयावर झाले आहेत.

एकोणीसाव्या शतकाच्या उत्तरार्धात वर्डस्वर्थ, टेनिसन, बायरन, शेले, कीट्सप्रभृती कवींचा रोमँटिक संप्रदाय, विसाव्या शतकाच्या दुसऱ्या तिसऱ्या दशकांतील वॉल्टर डी ला मेर, डेव्हिसप्रभृती कवींचा वास्तववादी संप्रदाय, आणि दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात मानवतेचा पुरस्कार करणारा इलियट ऑडेनप्रभृती कवींचा क्रान्तिकारक अतिवास्तववादी संप्रदाय, यांचे परिणाम मराठी कवितेवर झालेच. अभिजातवाद, स्वच्छंदवाद, वास्तववाद व ध्येयवाद, इत्यादि संप्रदायांची कमी अधिक लक्षणे मराठी कवींच्या काव्यांतही दिसून येतात. त्यांचा निर्देश त्या त्या कवींच्या विषयाकडे पाहण्याच्या दृष्टिकोनांच्या विवेचनात आला आहे. उदाहरणार्थ रोमँटिक संप्रदायाचा परिणाम केशवसुतप्रभृती कवींनी लिहिलेल्या भावगीतावर--विशेषतः प्रेमगीतांवर--कसा झाला, माधव ज्यूलियनांच्या काव्यांतील वास्तववादाचे स्वरूप कसे आहे, मर्ढेकरप्रभृती नवकवींच्या काव्यांत यंत्रयुगाने मानवाच्या जीवनावर केलेल्या परिणामाची चित्रे कशी वास्तवपूर्ण झाली आहेत, इत्यादी प्रश्नांचा विचार करणे अपरिहार्यच होते. विविध संप्रदाय वा वाद यांचा संबंध कलेच्या आविष्कारपद्धतीशी जितकी पोहोचतो, तितकाच तो कलेच्या अंतरंगाशी—

निगडित असतो. कलेकडे पाहण्याचा कवींचा दृष्टिकोन स्वच्छंदी, वास्तववादी, ध्येयदर्शी वा आदर्शवादी आहे किंवा काय, हे त्यांच्या स्वभावप्रवृत्तींवर अवलंबून असते. फार काय पण एकेकाळी स्वच्छंदप्रवृत्ती धारण करणारा कवी, कालांतराने अभिजातवादी, वा ध्येयवादी होऊ शकेल. विशिष्ट संप्रदायांच्या चौकटीतून कवीकडे पाहणे हे धोक्याचे ठरते. तसेच एखादा कवी आशावादी आहे, की निराशावादी आहे, तो रोमँटिक संप्रदायात मोडतो, की अतिवास्तववादी संप्रदायात मोडतो, असे उल्लेख केवळ स्थूलमानाने खरे असतात. एकाच कवीच्या विविध-प्रवृत्ती कालानुसार बदलत जातात आणि एका क्षणी त्याने प्रगट केलेला दृष्टिकोन सर्वत्र तो तसाच दिसून येईल, हे सांगणेही कठीण असते. एवढ्याकरिता मी या पूर्वी म्हटले आहे की कवीची प्रत्येक कविता हे एक स्वतंत्रच सृजनशील कार्य आहे, आणि त्याचा विचार स्वतंत्ररीतीने करणेच इष्ट ठरते.

'आशयाच्या बाबतीत नवकवींनी स्वीकारलेला जीवनविषयक पुरोगामी क्रान्तिकारक दृष्टिकोन आधुनिक काव्याच्या प्रगतीचा एक भाग वाटतो. नवकवितेच्या बाह्यतंत्रात नवे प्रयोग होत आहेत. त्यामुळे नवकवितेचे स्वरूप बाह्यात्कारी परंपरेहून निराळे वाटले तरी (कवितेच्या बाह्यांगात कालानुसार असा वेळोवेळी फरक पडणे हे इष्टच असते,) तिचा आंतरप्रवाह मराठी कवितेच्या भावी प्रगतीची ग्वाही देणारा आहे यात शंका नाही.'

## नवकवींचा विशिष्ट दृष्टिकोन

'काही नवकवींच्या काव्यातील अर्थाच्या छटा अनाकलनीय वा गूढ वाटतात. याचे कारण, त्यांनी काव्यात योजिलेल्या मिश्र रूपकांच्या शाब्दिक प्रतिमा रसिकांच्या अंतर्बाह्य इंद्रियांना एकाच क्षणी आवाहन करणाऱ्या असतात.' 'शिवाय त्या ज्या आशयाशी संलग्न झालेल्या असतात, तो आशय अनेकदा (रसिकांच्या दृष्टीने) ' अननुभूत भावनेचा सूचक ' असतो. अशा शब्दप्रतिमांशी रसिकांचा जो जो अधिकाधिक परिचय होत जातो, तो तो त्यांतील अनाकलनीय भाग नाहीसा होतो. काही वर्षांपूर्वी नवकवींची जी कविता रसिकांना दुर्बोध वाटत होती, तीच आता सुबोध वाटत आहे. फार काय पण त्याच त्या शाब्दिक प्रतिमांनाही आता ठराविकपणा प्राप्त होत आहे. म्हणूनच असे म्हणावेसे वाटते की, काव्याच्या बाह्यांगाच्या प्रयोगांपेक्षा काव्यात प्रगट झालेल्या आशयात व्यक्तिगत अनुभवसंपन्नतेमुळे जी अपूर्वता नवकवी आपल्या काव्यात प्रगट करतील, (नव्हे ती जशी सहजतया प्रगट होईल,) त्यावरच नवकाव्याचे भवितव्य अवलंबून राहील.'

## विषयांच्या वर्गीकरणाचे स्थूल स्वरूप

या पुस्तकात आलेल्या निरनिराळ्या प्रकरणांची उभारणी करताना मी कोणती

भूमिका स्वीकारली होती, याचेही विवेचन केल्यास ते अस्थानी होणार नाही. पहिल्याने एका गोष्टीचा उलगडा करणे आवश्यक वाटते. काव्याचे सौंदर्य कवीच्या व्यक्तिमत्त्वाचा अविष्कारच होय : हा आविष्कार एकजिनसीच असतो; तो आत्मनिष्ठ असतो. त्याचे रसग्रहण करताना तो कोणत्या बाह्यविषयाच्या अनुषंगाने प्रकट झाला आहे याला विशेष महत्त्व नसते. असे असूनही केवळ व्यक्तिमत्त्वाच्या प्रगटीकरणाला कारणीभूत झालेल्या बाह्यविषयाला एवढे महत्त्व का ? असा प्रश्न येथे निर्माण होईल. याचे उत्तर असे की, मी पुढील प्रकरणांची उभारणी, विवेचनाच्या सोयी-करिता, बाह्यविषयांच्या अनुरोधाने केली असली तरी वस्तुतः महत्त्व दिले आहे ते त्या त्या विषयात प्रत्यक्षपणे प्रगट झालेल्या व्यक्तिमत्त्वालाच. प्रत्येक कलाकृति,—प्रत्येक काव्य—हे एक स्वतंत्र सौंदर्यच आहे. ते एक सृजनशील कार्य आहे. ही गोष्ट दृष्टिआड होऊ दिली नाही, किंबहुना माझ्या विवेचनाचे–रसग्रहणाचे–माध्यम बाह्य-विषय हा नसून प्रत्येक स्वतंत्र कलाकृति—कविता—हेच आहे. कवितेत अवतीर्ण झालेल्या व्यक्तिमत्त्वाच्या सौंदर्याचा–भावनेच्या विशेषत्वाचा ( Special Feelings ) आणि दृष्टिकोनाच्या वैशिष्ट्यांचा ( Attitudes) अशा दुहेरी घटकांचा ( हे दोन्ही घटक एकरूपच असतात ) माझ्या दृष्टिकोनातून मी विचार केला आहे. विषयानुरोधाने विवेचन करण्यात मला दुसरीही एक गोष्ट साधता आली. विविध कवींच्या व्यक्ति-मत्त्वांचें सौंदर्य पृथक्पणे विचारात घेतले तरी एकाच बाह्यविषयात प्रगट झालेले कवींचे विविध दृष्टिकोन लक्षात घेतले म्हणजे त्यांच्यांतील वैचित्र्य लक्षात येते, आणि कोणता दृष्टिकोन त्यातल्यात्यात अधिक व्यापक, उन्नत, निःस्वार्थरहित अतएव सुंदर आहे, याची कल्पना करता येते.

मात्र बाह्यविषयांचे हे वर्गीकरण केवळ स्थूल स्वरूपाचेच आहे. उदा.० गूढ गुंजनात्मक कवितांचा, विलापिकांचा, व रुबायांचा विचार, कवींच्या ‘ जीवनविषयक दृष्टिकोना’तच करावा लागला. कवींच्या निसर्गविषयक कवितांच्या विवेचनातच जानपदगीतांवरील चर्चेचा अंतर्भाव करणे उचित वाटले. ज्यांना केवळ कथासूत्रा-खेरीज संस्कृतातील महाकाव्यांचा आधार नाही, अशा प्रदीर्घ काव्यांचा निर्देश, ‘ भाषांतरे व अनुवाद ’, या प्रकरणात केला. या शिवाय केशवसुत, तांबे, मर्ढेकर, अनिलप्रभृती काही कवींच्या जीवनविषयक दृष्टिकोनाबरोबरच त्याची समाजविषयक विचारसरणी लक्षात घेणे, आवश्यक वाटले.

## दोषदिग्दर्शनापेक्षा रसग्रहणाला दिलेले महत्त्व

काव्यावरील टीकेत आत्यंतिक भाविकता नसावी हे जसे खरे, त्याचप्रमाणे तीत केवळ दोषैकदृष्टीही नसावी. ‘ कुणालाही दोषांचे आकलन जितके चटकन् होते, तितके गुणांचे होऊ शकत नाही. कारण गुणग्रहणात बऱ्यावाईटांची निवड करण्याची शक्ती अंतर्भूत असते. निर्भेळ सौंदर्यदृष्टि, हे एकप्रकारे समतोल बुद्धीचे

फळ होय.' म्हणूनच विध्वंसक टीकेपेक्षा विधायक—रसग्रहणात्मक—टीकेचे महत्त्व अधिक मानले जाते. किंबहुना 'कलावंताच्या व्यक्तिमत्त्वाचे सहानुभूतीने केलेले रसग्रहण, म्हणजे टीका,' अशीही व्याख्या प्रचलित आहे. प्रस्तुत पुस्तकातील लेख-माला लिहिताना शक्यतो मी वरील रसग्रहणात्मक टीकापद्धतीचाच अवलंब केला आहे, व दोषदिग्दर्शनापेक्षा गुणग्रहणाला अधिक वाव दिला आहे. अशा गुणग्रहणात क्वचित एखाद्या कवितेची वाजवीपेक्षा अधिक महती दिग्दर्शित केली गेली असेल, हे येथे प्रांजलपणाने नमूद करणे आवश्यक वाटते. मात्र कवीची भूमिका लक्षात न घेता, त्याच्या काव्याचा एकांगी दृष्टिकोनातून विचार न व्हावा, याची मी यथामती दक्षता घेतली आहे.

'कविता' हेच माझ्या विवेचनाचे माध्यम असल्यामुळे, आवश्यक तेथे मला त्या त्या कवितेतील मध्यवर्ती कल्पना उघड करणे महत्त्वाचे वाटले. अनेक कवितांतील समान मध्यवर्ती कल्पनांना कोठेकोठे मी एकाच संदर्भात एकत्रित उल्ले-खिले आहे. शिवाय असे की, ज्या कविता कालांतरामुळे दुर्मिळ झाल्या आहेत, त्या कवितांचे रसग्रहण थोडे अधिक विस्ताराने केले आहे. शक्यतो एकाच विषया-वरील निरनिराळ्या कवितांचे रसग्रहण करताना कालानुक्रम लक्षात घेतला आहे. पण कोठेकोठे तुलनेच्या ओघात वरील नियम न पाळणे अपरिहार्यही झाले असावे. कवींचे व कवितांचे नामनिर्देश करताना ते काटेकोरपणाने मूळ ग्रंथातून तपासून घेण्याचे धोरण बाळगले होते. तथापि त्यात, व इतरत्र कोठे अपूर्णता राहिली असेल, ती सरती करून घ्यावी, अशी रसिक वाचकांना विनंती करून, मी हे प्रास्ताविक विवेचन येथेच संपवितो.

पुणे २
ता. २०-३-६४

**वामन भार्गव पाठक**

मराठी ग्रंथ सं... ठाणे. स्थळप्रत
वि: ..................
क्रमांक .................... नों. दि. ..................

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| प्रकरण १ ले | आधुनिक कवितेतील काव्यविचार | १ |
| प्रकरण २ रे | जीवनविषयक तत्त्वज्ञान | २१ |
| प्रकरण ३ रे | आधुनिक कवींचे निसर्गविषयक दृष्टिकोन | ८२ |
| प्रकरण ४ थे | राष्ट्रीय आणि सामाजिक विचारसरणी | १२५ |
| प्रकरण ५ वे | आधुनिक कवींची प्रेमगीते | १५७ |
| प्रकरण ६ वे | बालगीते | १८७ |
| प्रकरण ७ वे | विनोद–उपहास–विडंबन | २०२ |
| प्रकरण ८ वे | भाषांतरे आणि अनुवाद | २२३ |


* * *

## प्रकरण १ ले

# आधुनिक कवितेतील काव्यविचार

### कवींचे काव्यविषयक विचार

अनेक विषयांप्रमाणेच ' काव्य ' हाही अनेक कवींच्या स्फूर्तीचा विषय झाला आहे. काव्यलक्षणे, काव्यप्रयोजने, कविप्रतिभा आणि तिचे कार्य, काव्य-निर्मितीचे व काव्यानंदाचे स्वरूप इत्यादी विषयांसंबंधीच्या कवींच्या काव्योद्गारांवरून काव्यकलेकडे पाहण्याचे त्या त्या कवींचे वैयक्तिक दृष्टिकोन प्रगट होतात यात शंका नाही. मात्र कवींच्या अशा काव्योद्गारांतून सत्याचे केवळ स्थूल स्वरूपच प्रगट होते. प्राचीन व अर्वाचीन काळांतील बहुतेक प्रमुख कवींनी काव्यतत्त्वासंबंधी असे भावनोत्कट विचार प्रगट केलेले दिसून येतात. विशेषेकरून एखादा क्रान्तिकारक कवी जेव्हा काव्यक्षेत्रातील काही अनावश्यक व अनिष्ट रूढ पद्धतींवर प्रहार करितो तेव्हा आपल्या नव्या प्रयोगांचे समर्थन करण्यास त्यालाच पुढे यावे लागते. उदा० प्राचीन संतकवींनी श्रोतृवर्गाला व रसिकांना उद्देशून जे विचार प्रगट केले त्यांतून त्यांची काव्याकडे पाहण्याची नवी दृष्टी प्रगट झाली. परतत्त्वाला स्पर्श करणारा आशय हा काव्याचा आत्मा होय. भक्तिरस हा इतर रसांहून श्रेष्ठ होय. आध्यात्मिक विषयावरील प्रासादिक काव्य, हेच उच्च दर्जाचे काव्य होय, इत्यादी विचारांचा त्यांनी काव्याच्या द्वारे पुरस्कार केला. तसेच संस्कृतातील परमार्थविषयक ज्ञान मराठीत आणणे ही गोष्ट संतकविकालीन संस्कृताभिमानी पंडितांना कमीपणाची वाटे. संतकवींनी या प्रवृत्तीविरुद्ध बंड पुकारले. पंडित–कवींच्या वृत्तबद्ध शब्दालंकारयुक्त काव्य-रचनेपेक्षा आपली साधी, प्रासादिक, ओवी आणि अभंग यांनी युक्त अशी काव्यरचना संतकवींनी अधिक लोकप्रिय केली. असे करताना संतकवींना आपली भूमिका रसिकांना समजावून द्यावी लागली. काव्याचे सौंदर्य केवळ बाह्य आलंकारिक रचनेत नसून ते अंतःकरणापासून प्रगट होणाऱ्या निर्मळ भावनेत असते, ही दृष्टी-आड झालेली गोष्ट त्यांना पुन्हा सोप्या पण स्पष्ट शब्दांत सांगावी लागली.

## केशवसुतांनी काव्यसंकेताविरुद्ध प्रगट केलेले सडेतोड विचार

'इंग्रजी अमलाच्या सुरुवातीस काव्यासंबंधीचे असेच काही ठराविक संकेत रूढ होते. काव्याचे विषय गंभीर असावेत, त्यांचा आविष्कार पांडित्यपूर्ण शब्दांत व्हावा, काव्य बोधपूर्ण असावे, आणि कवीने तटस्थपणा ठेवून विषयांचे वर्णन करावे; जणू काही कवीच्या वैयक्तिक जीवनाशी किंवा सामाजिक जीवनाशी कवितेचा संबंध पोहोचतच नाही !' केशवसुत आणि त्यांचे समकालीन कवी यांनी वरील संकेतां-विरुद्ध आपले जे सडेतोड विचार काव्यातून प्रकट केले, त्यांतून त्यांची काव्याकडे पाहण्याची स्वतंत्र दृष्टी प्रगट झाली यात शंका नाही. काव्याची निर्मिती कशी होते आणि काव्याचे प्रयोजन काय यासंबंधीची केशवसुतांची मते त्या काळी कित्येकांना नवीन वाटली. ' कविता कशी असावी आणि कशी नसावी, हे ठरविण्याचा अधि-कार कवीचा आहे, इतरांचा नाही. कविता प्रगट होते, ती हवी तेव्हा गुणगुणता यावी याकरिता ! तुम्हाला कवितेचा आनंद लुटावयाचा असेल तर तुम्ही दूर उभे राहून कवीची गुणगुण ऐकत राहा. काव्य व्यक्तिनिष्ठ व सहजस्फूर्त असते. पुष्पात गंध किंवा इंद्रचापात रंग, ज्या दिव्य शक्तीमुळे खुलतो तीच काव्याला कारणीभूत होते.' काव्य हे आत्मरंजनाकरिताच असते, आणि काव्य-निर्मितीच्या वेळी कवीने आपल्या भावनेचे स्वातंत्र्य अबाधित ठेवावे, असाच अर्थ केशवसुतांच्या वरील विचारसरणीवरून निघतो. केशवसुतांच्या मते कवीला ( कलावन्ताला ) आपल्या उत्कट भावना शब्दांत प्रगट करण्याचे जे सामर्थ्य लाभले आहे त्याचा हेतू मात्र इतरांना जे सौंदर्य एरव्ही दिसत नाही, ते दाखवून द्यावे असा आहे. कवीच्या दूर-दृष्टीला धोंड्यामधूनही काही सौंदर्य प्रतीत होते. ते सौंदर्य सामान्यजनांना दाखवावे असा कवीचा हेतू असतो. कारण की

' काचेमधूनी दिसते जनाला, धोंड्यामधूनी दिसते कवीला. '

या जगात जो अंधार भरून राहिला आहे तो आपल्या स्फूर्तिप्रद विचारांनी नाहीसा करावा हाच काव्याचा खरा हेतू होय. ही कल्पना केशवसुतांच्या ' दिव्य ठिणगी ' या कवितेत आली आहे. कवीच्या कल्पकतेमुळेच या वसुंधरेला तारुण्य प्राप्त होते, असा कवीचा विश्वास खालील ओळींत दिसून येतो.

' होते शोधक नेत्र कर्णहि तिचे ते तीक्ष्ण भारी तसे
होते भाल विशाल देवगुरुने पूजा करावी असे ' ।

## कवी नरजातीचे खरे नेत्रकर्णच

'कवी हा समाजातील सुखदुःखांशी समरस होतो. सभोवतालच्या परिस्थितीतील मुक्या पडसादांना तो बोलके करतो. त्याच्या हातात जी पद्यपंक्तीची तरफ असते ती तो जनताशीर्षावर टेकवून समाजातील अन्यायाला उलथून टाकतो. गतेतिहासातील

शूरांच्या कथा ऊर्जस्वल शब्दांत सांगून तो सामान्य जनतेला स्फूर्ती देतो. धूमकेतूप्रमाणे तो आगामी क्रान्तिकालाची सूचना देतो. '

' तो गंभीर वदे रवा तर मुक्या पृथ्वीस या वाटते !
की माते श्रुति लक्षसंख्य फुटल्या आणीक ती ऐकते. '

कवीच्या भावनात्मक सामर्थ्याचे सामाजिक जीवनावर होणाऱ्या परिणामाचे हे वर्णन लक्षात घेतले म्हणजे केशवसुतांनी कवीच्या कार्यांच्या निमित्ताने विविध क्षेत्रांत आपल्या व्यक्तिमत्त्वाने काळाला कलाटणी देणाऱ्या प्रतिभाशाली कलावंतांच्या कार्यांचे हे वर्णन केले आहे, असे वाटते.

## प्रतिभा

' प्रतिभा ही एक अत्यद्‌भुत शक्ती आहे, आणि इन्द्राश्वही तिच्यापुढे थिथरतो. ती ज्याला वश असते त्याच्या ठिकाणी देवत्व आणि दैत्याचे बळ, ही दिसून घेतात. ( देव या शब्दाने सात्त्विक भाव सूचित होतो. ) मात्र अंतःकरणात निर्माण होणाऱ्या तेजस्वी विचारांच्या प्रभेवर देव आपली शस्त्रे उजळून घेतात आणि दानवांचे दुष्ट भाव पतंगाप्रमाणे तिच्यात नाश पावतात. तिच्यामुळे देहाचा विसर पडून मन ब्रह्मांडाशी एकरूप होते, आणि कवीच्या मुखातून भविष्यसूचक वाणी बाहेर पडते. चांगुलपणाचा प्रसार आणि दुष्टपणाचा संहार करणे, हेच तिचे श्रेष्ठ ध्येय असते. कलावंताशिवाय जगातले जगणे कवडीमोलाचे होईल. धोंड्यावर टाकीचे घाव घालून त्यातून त्याला देवपणा आणण्याची दिव्यदृष्टी कवीला असते.' अशा गौरवपर शब्दांत केशवसुतांनी प्रतिभेचे वर्णन केले आहे. ती आपल्याला वश होत नाही म्हणून एकदा तर त्यांनी तिच्यावर फिर्यादही केली आहे. प्रतिभेचे स्वरूप जितके मोहक तितकेच ते कवीच्या मनाला फसविणारे असते, हे तत्त्व लक्षात घेऊनच केशवसुतांनी वरील कविता लिहिली आहे. तीत मनोविकृती दिसते असे नाही. मात्र वर्डस्वर्थ, शेले इत्यादिकांनी काव्यशक्तीसंबंधी, काढलेल्या उद्गारांशी बरेचसे साम्य त्यांच्या वरील उद्गारांतून दिसून येते यात शंका नाही.

## प्रतिभेचा हेतु ज्ञानसौंदर्याची प्राप्ति

'ज्ञानसौंदर्यानेच काव्यसौंदर्याला अमरत्व प्राप्त होते. सत्याचा, ज्ञानाचा व सौंदर्याचा संगम श्रेष्ठ काव्यात होतो,' हे तत्त्व केशवसुतांना अभिप्रेतच होते असे वाटते. ' झपूर्झा ' या गूढगुंजनपर काव्यात त्यांनी म्हटले आहे की, ' कविप्रतिभा ही गूढस्वरूपात्मक ज्ञानाच्या ( चिद्‌घनचपलेच्या ) कुंपणावरून मोठ्या धैर्याने उड्डाण करते. जेथे प्रकृतिपुरुषांच्या रम्यक्रीडा चालल्या आहेत त्या क्रीडांचा स्वरसंगम समजावून घेण्याची तिला मोठी उत्कंठा असते. हे ज्ञान अगम्य असेल, गूढ असेल पण प्रतिभेचा हेतू ज्ञानप्राप्ती हाच आहे आणि एवढ्याकरिताच त्या ज्ञानाची सुंदरता

प्राप्त करून घेण्याकरिता ती निःसंग बनते, जगामधून उठते, पिसाट बोल बोलते आणि 'झपूर्झा गडे झपूर्झा' असे गूढ शब्द तोंडावाटे बाहेर काढते. अंतिम सत्याचा व ज्ञानाचा शोध लावणे हेच कलाकृतीचे परमोच्च ध्येय ठरते, हा विचार केशवसुतांच्या काव्यातून प्रगट झाला आहे.

कवीच्या प्रतिभेला भासमान होणारे हे ज्ञानसौंदर्य आरंभी गूढ स्वरूपाचेच असते. 'उज्ज्वलता' आणि 'अंधुकता' यांचा संदिग्ध खेळ कवीच्या मनोवृत्तीत कलानिर्मितीच्या वेळीं चालू असतो म्हणूनच की काय केशवसुत म्हणतात–

'कविच्या हृदयी उज्ज्वलता । आणिक मिळती अंधुकता
तीच स्थिति ही भासतसे । सृष्टी कवयित्रीच दिसे ॥'

## कवीचा द्रष्टेपणा

काव्याच्या व्याख्येपासून तो काव्याच्या होणाऱ्या सामाजिक परिणामापर्यंत 'कवि आणि काव्य' यांच्या सामर्थ्याचे केशवसुतांप्रमाणेच बी कवींनी गौरवपर शब्दांत ( काव्यमय ) वर्णन केले आहे. 'ऐश्वर्यात्मक सामर्थ्याची निर्माणक्षमता ज्या सौंदर्यात आढळते ते काव्य', 'सौंदर्यच काव्य', 'काव्य–भगवंताचे देणे', 'काव्य अभ्यासाला असाध्य', 'अंतरंगातील उन्मेषांच्या दिव्य लेखांचे शब्दचित्र दुबळे मन कसे काढील', 'काव्यानंद बुद्धिग्राह्य नाही' इत्यादी बी कवींचे विचार लक्षात घेतले म्हणजे काव्यशक्ती ही एक अलौकिक नैसर्गिक दिव्य शक्ती आहे असे त्यांना वाटत होते यात शंका नाही.

'ज्या आकाशाच्या घराला प्रकाशाची द्वारे आहेत, आणि ग्रहमालांच्या अडसरी आहेत, जेथे पाचूच्या वेली लावण्याच्या जलात न्हाल्या आहेत, सृष्टीच्या सुरात सूर मिसळून जी ब्रह्मांडाच्या घडामोडी करते अशा उडुगणांच्या यानात बसलेल्या विश्वाच्या राणीने—प्रतिभेने—आपल्या मनोमय वाणीने अनुभविलेल्या दिव्यभोगांचे वर्णन राठ वैखरी कशी करील ?' असा त्यांचा प्रश्न आहे. प्रतिभेच्या दिव्य अलौकिक शक्तीवर केशवसुतांप्रमाणेच बी कवींचा विश्वास होता. **कवी हा द्रष्टा असतो** आणि जीवनप्रवासात मानवाला तो मार्गदर्शन करतो हा विचार 'फुलांची ओंजळ' या कवितेत प्रगट झाला आहे. उदा० पूर्णापासून ढळलेले जग पूर्णाकडे निघाले आहे. त्याची वाट बिकट आहे, लांबण मोठी आहे; त्याच्या ध्येयमार्गात चढउतार फार आहेत. सृष्टिचक्राचा तोल जाऊन ते भलतीकडे कलण्याचा संभव आहे. कोठे हे जग उंचवट्याकडे जाताच त्याला आपण पूर्ण आहोत असा भास होतो, तर कोठे पाणथळावरचा खोटा तेजोभास पाहून ते चिखलात रुतून बसते. एवढ्याकरिता मार्गाची रुक्षता व परिश्रमांची प्रचंडता मानवाला न भासावी म्हणून कवी त्याला काव्यरसामृत निर्माण करून सहाय्य करतो. कवी हा समयोचित संदेश देतो आणि

'भूताधारे समजुनि चालू काळ नीट निर्मितो !
सोज्ज्वल भविष्यकालाला, कवि धन्य नव्हे काय तो ?'

असा प्रश्न बी कवी विचारतात.

## काव्य– सामाजिक क्रांतीचे साधन

कवी हा काव्याच्या द्वारे सामाजिक क्रांती घडवून आणतो असेच केशवसुतांप्रमाणे बी कवींनाही वाटत होते. चिवट रूढीच्या कचाट्यात सापडलेल्या धुरीणांना वर काढून अंतःकरणाच्या कातळाच्या खाली उसळी घेणाऱ्या पण दडपल्या गेलेल्या जीवनाला वर वाट करून देऊन अखिल समाजाला ताजेतवाने करण्याचे कार्य कवीच्या प्रतिभेची जादू करते. हा विचार बी कवींच्या 'जादू' या कवितेत प्रगट झाला आहे. आजवर झालेल्या जगाच्या प्रगतीला बंडखोर वृत्तीच्या कवींनीच हातभार लाविला, असा दृष्टिकोन त्यांनी 'डंका' या कवितेत प्रगट केला आहे.

'काव्य अगोदर झाले नंतर जग झाले सुंदर
रामायण आधी मग झाला राम जानकीवर'

अशा शब्दांत त्यांनी समाजाभिमुख कवीचा गौरव केला आहे.

## काव्योद्गार—ईश्वरी निःश्वसिते

लतिकेच्या ठायी पुष्पपरिपूर्ती कशी होते हे जसे समजत नाही, तसेच कवीला स्फूर्ती कशी होते हे कळत नाही, असे म्हणून कवीच्या भावनोद्गारांना रे. टिळकांनी ईश्वरी निःश्वसितांची थोरवी दिली आहे.

सहजस्फूर्त कलेतच सौंदर्याची लीला दिसून येते हा भाव त्यांनी खालील शब्दांत प्रकट केला आहे.

'रंग नभाचे कसे तरी– कसे तरी ही मजा खरी
किती आपुली—फुले लटकली
चिंता नच ही वेलीला – सुंदरतेची ही लीला'

काव्योद्यानाचे त्यांनी आलंकारिक शब्दांत वर्णन केले आहे. (त्यात अनुराग तरु आहे. हास्याच्या, अश्रूंच्या व हास्याश्रूंच्या तीन वल्लरी आहेत. तेथे विनोद नामक कासार आहे अमरांना न मिळणारी सुखे येथे रसिकांना मिळतात. इ. इ.) निर्मत्सर व सहृदय रसिकांसंबंधी रे. टिळकांना आदर वाटत असे.

'रसज्ञ हो काय तुम्हाविना मी-
करू जगी घेउनि काव्य नामी'

असे त्यांनीच म्हटले आहे. तथापि कवीचे मन किती हळुवार असते आणि रसिकाच्या हातून आपले काव्य दुखविले जाऊ नये म्हणून रसिकांपुढे आपुले हृदय त्यांनी उघड करिताना म्हटले आहे.—

'पहा उघडिले हृदयाला, यात सुखे घाला भाला
कोमल कौशल्ये नटला,
कर तुमचा जरि किति असला
तरी तयाने – माझी कवने – जरा स्पर्शणे—
सहन न होणे मुळी मला – जीव वरा त्याहुनि गेला.'

कवीने आत्मानंदातच निमग्न व्हावे, सामाजिक सुखदुःखांशी त्याचा संबंध येत नाही असे टिळकांचे मत नव्हते. 'वनवासी फुला'तील कवी जगापासून दूर राहू पाहणाऱ्या फुलालाही आपल्या मधुर उपदेशाने जगात आणतो. काव्याचे ध्येय केवळ मनोरंजन करणे एवढेच नाही तर त्याने उद्बोधन करावे हे मत टिळकांना अभिप्रेत होते.

## बालकवींचे काव्यविषयक गूढ विचार

केशवसुतांच्या परंपरेतील बालकवींनी कवीच्या कार्यासंबंधी गूढोद्गार काढले आहेत. 'कवीचा विचार', 'कवीचे अंतरंग', 'शारदेस', 'कवीची इच्छा', 'कवि', 'काव्याची कल्पना', 'माझे गाणे' इ. कवितांमधून त्यांच्या विचारांचा विशिष्ट सूर प्रगट झाला आहे. कवीपुढे दांभिक, नीच सैतान उभे राहू शकत नाहीत. कवी हा वेडा व भिकारी असला तरी तो जगताचा मोठा धनी आहे. हा कवी प्रतिभेच्या सौधावरून मरुद्गणावर चढतो, अनंतात उडून तो मंजुळ गाणी गातो, अक्षयतेमध्ये फुललेल्या ह्या ब्रह्मांडाच्या सदाफुलीची फुले त्याला दिसतात, जगातील फुलावर दाटलेले गंध तो अनुभवतो. (कवीची वृत्ती फुलपाखरासारखी असते. फुलपाखरू मरत नाही त्याचप्रमाणे कवी अमर असतो.) (ही केशवसुतांची कल्पना बालकवींनाही मान्य असावी.) सारांश, काव्याची निर्मिती, काव्याचे स्वरूप, काव्याचे ध्येय यांसंबंधी केशवसुतांपासून चालत आलेल्या काही सांकेतिक कल्पनांचा घनदाट परिणाम बालकवींच्या मनावर झाला होता. 'कविबाळे' ही ह्या विषयावरील त्यांची एक वैशिष्ट्यपूर्ण कविता आहे. देवाची लाडकी कविबाळे स्वर्गात अक्षय आनंदात निमग्न होती, परंतु एकाएकी पृथ्वीवरला विषारी वारा त्यांना स्पर्श करून गेला, त्याबरोबर वीणेच्या तारा तुटल्या, स्वप्नसृष्टी जळाली आणि आकाशातून तारे कोसळावेत त्याप्रमाणे ते 'तारे' खाली गडगडले. क्षणार्धातच जडतेने त्यांना वेष्टून टाकले. काळाच्या भोवऱ्यात ते गिरकी घेऊ लागले. अंधारात ठेचाळून ते विव्हळ झाले. या जगातील जीवित त्यांना कसे रुचावे? स्वर्गातील पूर्वकहाणीची आठवण होऊन त्यांनी एकच टाहो फोडला. बालकवी म्हणतात.—

'परि त्याच दीर्घ किंकाळ्या — ठरतात जगाची गाणी
निःश्वास आत जे कढती — ती स्फूर्ति लोक हा मानी
संतप्त अश्रुमालेला — गणितात कल्पनाश्रेणी

गौरविते विश्व कवींना — जग सर्व डोलवी माना...
परि मुग्ध मधुर आत्म्यांना — त्या काय बोचते चित्ती ? '

—' निष्पाप निरागस बालवृत्ती म्हणजेच काव्यात्मवृत्ती. ही केवळ स्वर्गातच पाहावयास मिळते. जगातील कठोर व्यावहारिक क्षुद्र कल्पनांचा तिला स्पर्श होताच ती विनाश पावते ' हा जो शेले-वर्डस्वर्थप्रभृती आंग्ल कवींच्या काव्यात आढळणारा सांकेतिक विचार आहे त्याचा अप्रत्यक्ष परिणाम वरील कवितेवर झाला आहे. जगाला विसरून स्वच्छंदपणे आत्मानंदात निमग्न होणाऱ्या स्वप्नाळू काव्यवृत्तीचा ध्यास बालकवींना लागला होता आणि त्याच स्वच्छंदी वृत्तीचा गौरव त्यांनी वरील कवितांतून केला आहे. या बाबतीत केशवसुतांच्या काव्याकडे पाहण्याच्या दृष्टीहून त्यांची दृष्टी थोडी निराळी आहे. काव्य हे आत्मरंजनाकरिता असते ही गोष्ट दोघांनाही मान्य आहे. मात्र कला ही सामाजिक क्रांती घडवून आणण्याचे प्रभावी साधन आहे या गोष्टीवर जितका केशवसुतांनी भर दिला आहे, तितका बालकवींनी दिलेला नाही. वास्तवता आणि ध्येयवाद यांचा संगम केशवसुतांच्या काव्यविषयक विचारांत झाला होता. बालकवींच्या काव्यविचारांत कल्पनारंजकतेचा भाग अधिक आहे.

## काव्याचे ध्येय

'काव्यात केवळ शब्दार्थांची करामत नसते, विश्वाची अवघड कोडी तीत उलगडलेली दिसतात, ती सामान्य जनतेला परमात्म्याची ओळख करून देण्याचे कार्य करते, इत्यादी उदात्त विचार गडकऱ्यांनी केशवसुतांना व बालकवींना उद्देशून लिहिलेल्या कवितांतून प्रकट केले आहेत.

## फूल ना फुलाची पाकळी

काव्यनिर्मितीच्या क्षणी कवींची भूमिका अत्यंत पवित्र असते. तिला क्षुद्र स्वार्थाचा संपर्क झालेला नसतो. गडकऱ्यांनी म्हटल्याप्रमाणे एखादा कलावंत युगाचा दुर्जन असला, तरी अशा वेळी तो क्षणाचा सज्जन ठरतो. वाल्मिकीच्या पूर्वचरित्रापेक्षा त्याचे रामायण रसिकांच्या अधिक लक्षात राहते, कालिदासाचे शाकुंतल वाचताना रसिकांना कालिदासाच्या पूर्वचरित्राची आठवण नसते, इत्यादी उदाहरणे देऊन ' फूल ना फुलाची पाकळी ' या कवितेत गडकऱ्यांनी काव्याचा आस्वाद घेताना रसिकांनी कवीच्या खाजगी जीवनाकडे पाहू नये असे सूचित केले आहे.

## काव्याच्या अंतर्बाह्य स्वरूपात झालेला बदल

काव्याला कारणीभूत होणारे विषय व त्यांचे आविष्करण या बाबतीत केशवसुत-संप्रदायातील कवींनी जुने संकेत पाळले नाहीत. काव्याच्या अंतर्बाह्य स्वरूपात यामुळे मोठाच बदल घडून आला. बाह्यतः जुन्या अक्षरवृत्तांची जागा नव्या जाति-

वृत्तांनी घेतली. यमकांची बंधने ढिली झाली. बोजड शब्दालंकारापासून कवितेची सुटका झाली. हा बदल केवळ वरवरचाच होय. कवितेकडे पाहण्याच्या कवीच्या दृष्टिकोनातच जो बदल घडून आला तोच खरा काव्याच्या अंतरंगातला बदल होय. दररोजच्या जीवनातील विविध विषय घेऊन त्यात नवीन आशय शोधण्यातच कवींना आनंद वाटू लागला. कवींचे व्यक्तिमत्त्व त्यांच्या काव्यात प्रकट होऊ लागले. भावगीते, सुनीते, इत्यादी नवीन काव्यप्रकार मराठीत रूढ करण्याचे श्रेय केशवसुत-प्रभृती कवींना लाभले आणि वरील काव्यप्रकारातून त्यांचे व्यक्तिमत्त्वही प्रकट झाले.

## केशवसुतांच्या संप्रदायाचे अंधानुकरण

केशवसुत आणि त्यांचे समकालीन कवी यांनी काव्य या विषयावर ज्या कविता रचल्या त्यांतून त्यांनी वरील प्रकारच्या क्रांतिकारक कल्पना प्रकट केल्या, पण या क्रांतिकारक कल्पनांचा कित्येक कवींनी विपर्यासही केला. कवी निरंकुश असतो हे वचन शब्दशः काही कवींनी खरे करून दाखविले. काव्यात घरगुती विषय आणण्याच्या बाबतीत कित्येकांनी औचित्य राखिले नाही. कित्येकांनी स्वतःकडे प्रेपिताची भूमिका घेऊन समाजाला जो संदेश देण्याचा आव आणिला तो त्यांच्या ठिकाणी थोर व्यक्तिमत्त्वाचा अभाव असल्याने हास्यास्पद ठरला. ‘ काही इंग्रजी कविता वाचून ’ या कवितेत गोविंदाग्रजांनी जो तत्कालीन काही कवींच्या ‘ दरिद्री गर्वा ’चा उपहास केला आहे तो काही निरंकुश कवींचे अवास्तव उद्गार ध्यानात घेऊनच केला असेल यात शंका नाही.

व्यक्तिगत भावनांचा प्रामाणिकपणे आविष्कार करणे, ज्या रूढीमुळे मानवाची प्रगती स्थगित होते, तिचा निषेध करणे, आणि समतेवर आणि बंधुभावावर उभारलेल्या मानवतेचा पुरस्कार करणे, ही सर्वसाधारण वैशिष्ट्ये ज्यांच्या काव्यातून दिसून आली त्यांना केशवसुतांच्या संप्रदायात अंतर्भूत करण्याची पद्धती रसिकांनी स्वीकारली. कवितेच्या अंतरंगात नवा आशय येणे ही गोष्ट सोपी नाही. सूक्ष्मावलोकन, मानवी स्वभावाचा सखोल अभ्यास, प्रदीर्घ व्यासंग इत्यादी अनेक आंतरिक गुणांमुळे ज्याचा जीवनानुभव संपन्न झाला असेल त्यालाच असा आशय आपल्या कवितेत आणता येईल. या बाबतीत असे दिसते की, केशवसुतांच्या कवितेच्या बाह्य पद्धतीचे अनुकरण करणे कित्येकांना साध्य झाले, पण तिच्या अंतरंगाचे अनुकरण करताना कित्येकांची फसगत झाली. केशवसुतांच्या तुतारीच्या संप्रदायात अनेकांनी प्रवेश केला, पण ज्यांनी तो संप्रदाय यशस्वीपणे चालू ठेवला असे कवी हाताच्या बोटांवर मोजण्याइतकेच निघाले.

## काव्यातील यांत्रिक वृत्तीचा गडकऱ्यांनी केलेला उपहास

संपादकाकडून मागणी येताच कवितेसाठी धडपड करणाऱ्या कवीच्या मनःस्थितीचे विनोदप्रचुर वर्णन गडकऱ्यांनी एका कवितेत केले आहे. त्याचप्रमाणे

'ये ये ये कविते' या कवितेतही काव्याला कारणीभूत होणारी स्फूर्ती ही बाहेरून आणावयाची नसते, ती कवीच्या अंतःकरणातच असते. ज्या कवीला या सत्याची जाणीव नसते त्याच्या हातून कसे विसंगत वर्तन होते याचे उपहासात्मक वर्णन वरील कवितेत आले आहे. साध्या विषयात मोठा आशय शोधू पाहणाऱ्या परंतु वरील उच्च तत्त्व ज्यास झेपत नाही, अशा सामान्य कवींवर मार्मिक टीका करण्याची गडकऱ्यांची रीत वरील काव्यातून दिसून येते.

## आधुनिक कवि आणि त्यांचे आक्षेपक

आधुनिक काव्याच्या आक्षेपकांना अनुलक्षून केशवसुत, विनायक, बी इत्यादिकांनी आपल्या काव्यातून खेदोद्गार काढिले आहेत. आजच्या शास्त्रीय युगात काव्याचा ऱ्हास होणार असल्याने कवींची आवश्यकता नाही हे विधान केशवसुतांना अशास्त्रीय वाटले.

'गाण्याने श्रम वाटतात हलके हेही नसे थोडके'

असे काव्याचे किमान समर्थन त्यांनी केले आहे.

विनायकाने 'असते गुणभोक्ते जर नगरी
तर का रसिका गुणी हिंडते भ्रमिष्टापरी वनी–'

असे म्हणून अरसिकांवर उपहासात्मक टीकाच केली आहे.

'जेथे मात्सर्याचा वारा भरला आहे, अहंपणाचा पसारा आहे, जिथे रसिकत्वाला थारा नाही अशा जनतेत राहण्यापेक्षा निर्जन रानात राहणे बरे'–असे उद्गार वैतागलेल्या कवीच्या मुखात ('सुवास' या कवितेत) विनायकाने घातले आहेत.

बी कवींच्या काळातही काव्यावरचा विद्वानांचा रोष कमी झाला नव्हता. म्हणूनच त्यांनी

'महाराष्ट्रकविपरंपरा । खंड न पडला तिला जरा
उणीव रसिकांचीच परी । आज भासते खरोखरी'

असे म्हटले. कवीनेच कवींची बाजू घ्यावी ही गोष्ट अनुचित होय असे वाटल्यावरून 'आधुनिक कवीची कुरकुर' या कवितेत आनंदराव टेकाडे यांनी रसिकांची बाजू घेतली. त्यावर 'अनुकार' या कवितेत बी कवींनी "आपण काव्यप्रांतातील अन्यायाचा निषेध करीत आहोत आणि असे असता, आपणावरच टीका होते हा 'अंधार-नगरचा उलटा न्याय होय' असे म्हटले." वस्तुतः बी कवींची नम्रवृत्तीच त्यांच्या कविवंदनात प्रगट झाली आहे.

'शारदादूतिके'त अनंततनयांनी आधुनिक कवींची वृत्ती कुत्सित असते अशी टीका खालील शब्दांत केली.

'सांप्रत कविजन शीघ्रकोपि हा कुत्सितबुद्धि तसाच ।
अरसिक, निंदक सगुणद्रोहक महामत्सरी साच.'

तिला पुढे अनेक कवींनी विरोध केला.

### चंद्रशेखरांची काव्यतपस्या

चंद्रशेखरांनी आपले जीवन काव्यशारदेला वाहिले होते, तिच्या कृपाप्रसादासाठी आपण किती तपश्चर्या केली आणि ऐहिक सुखावर पाणी सोडले याविषयीचे भावनोत्कट उद्‌गार त्यांनी लिहिलेल्या 'कवितारति', 'शारदे' इत्यादी कवितांतून पाहावयास मिळतात. १९०७ मध्ये झालेल्या जळगाव येथील कविसंमेलनाला त्यांनी जो कविसंदेश पाठविला त्यात म्हटले आहे—

'काबाडकष्ट दिनभर, करोनिया रुक्ष अन्न सेवावे।
रात्रीतहि जागुनि निज, कवितांनी देशबंधु सेवावे।'

हे ब्रीदवाक्य त्यांनी आपल्या नजरेसमोर नेहमीच ठेवले होते. स्वतःच्या जीवनातील दुःख आणि दारिद्र्य यांचा ओझरताही संपर्क त्यांच्या काव्यशारदेला त्यांनी होऊ दिला नाही. प्रतिकूल परिस्थितीतही आपल्या ठिकाणी दिसून येणाऱ्या काव्यशक्तीला जर परिश्रमाची जोड दिली तर कशी अक्षर कलाकृती निर्माण होते हे चंद्रशेखरांनी स्वतःच्या उदाहरणाने दाखवून दिले. प्रतिभा ही एक ईश्वरदत्त देणगी आहे या कल्पनेवर चंद्रशेखरांचाही विश्वास होता, पण ज्ञानसूर्याने स्फूर्तिकलिका कोमेजत नाही, उलट ती टवटवीत होते, असा त्यांचा विश्वास असावा. प्रदीर्घ व्यासंगाने त्यांनी आपल्या काव्यकलेला सुश्लिष्ट केले. कवी हा जन्मावा लागतो. याविषयी त्यांनी 'कुंजकूजन' यात म्हटले आहे—

'काय म्हणुनी शिकवील मला हो तो,
आणि शिकवूनी काय कवी होतो?
कदा नोहे, रससिद्ध कवी जो की।
स्वयंभू तो अवतरत असे लोकी।'

### काव्य मधुवट

स्वतःच्या गुणांसंबंधी मुग्धता ठेवणे व रसिकांना मोठा मान देणे ही तांबे यांची वृत्ती 'कुस्करू नका ही सुमने' या कवितेत प्रगट झाली आहे.

'ही वन्य फुले
मधुशून्य मानितिल धन्य तुम्हां करि सजणे।
अंगुली कठिण लागली, तरी संपली।
हळुच या शिवणे'

हे चरण लक्षात घेतले म्हणजे कवी व रसिक याचे संबंध कसे असावेत याचा उलगडा होतो. आत्मविश्वास व विनम्रभाव यांचा सुंदर मेळ तांबे यांच्या मनोवृत्तीत झाला आहे. कवीच्या ठिकाणी तो असावा असा ध्वनी त्यांच्या अनेक कवितांतून प्रगट होतो. भक्तिपुरःसर रसिकांस फुले अर्पण करण्याची ही परंपरा

जुनीच आहे. तांबे त्याच परंपरेतील आहेत. रसिकांनी कवितेची मागणी केल्यानंतर त्याला उलट सुरस कवितेचे दान करताना तांबे विनम्रभावाने म्हणतात—

'मधु मागशि माझ्या सख्या परी । मधुघटचि रिकामे पडति घरी '

पण एके काळी कमळाच्या द्रोणातून आपण रसिकांना मधुपान करविले होते, तरुण-तरुणींची कुजबुज आणि वृक्ष झऱ्यांचे गूढ गुंजन त्यांच्या कानी घातले होते, याची जाणीव त्यांना आहे, पण पुन्हा ते म्हणतात

'मधु पिळण्या परि रे बळ न करी '

यावरून कविता ही सहजस्फूर्त निर्माण होते. ती बळेने निर्माण होत नाही, हा तांबे यांचा भाव येथे प्रगट झाला आहे.

महामुनी वाल्मिकींचा गौरव करताना तांबे अप्रत्यक्षपणे कवीचे कार्य कोणते याविषयी निवेदन करतात —

'हात दिला तू किति बुडत्यांना ।
धीर दिला किति तू व्यथितांना ।
उरी लाविले, किति पतितांना ।
जय भवनाविक पतितोद्धारक ।'

त्यांच्या मते कवी हा मृत्युंजय असतो, हेच खरे! 'कलेच्या हृद्गता 'त तर त्यांनी भगवंतालाच कलावंत असे म्हटले आहे व त्याला

'प्रफुल्ल हृदया, अमृतसागरा, माझ्या कविराया ।
मंत्रोदकि परिमार्जुनि उघडी कर्णा नयना या '

अशा शब्दांत आळविले आहे.

## काव्य आणि सत्याभास

'कलाकृती निव्वळ सत्य नसून सत्याभास असतो आणि कवितेची सुरुवात जरी आत्मरंजनाने झाली तरी तिचे सार्थक रसिकरंजनानेच होते, हा दृढ विश्वास माधवराव पटवर्धन यांच्या ठिकाणी बिंबला होता!' भावनासंक्रमण झाले की, कवितेचे कार्य संपते हे अर्धसत्य होय. कलावंत हा एक समाजाचा जबाबदार घटक आहे. आपल्या भावनेचे परिणाम इतरांवर काय होतील इकडे त्याला लक्ष द्यावे लागतेच. वास्तवतेच्या नादाने ध्येय जसे डावलू नये हे खरे तसेच आपले ध्येय वास्तवापासून फार दूर ठेवूही नये, हा विचार त्यांनी खालील चरणांत उघड केला आहे.'

'मी माझ्यास्तव गायने जरी गुंफिली
भेटता रसिक तुज ऐसा, स्नेहाळ तुला वाहिली ' ( रसिकांस )
' उद्दिष्ट असो ती कुणी पार्थिव अंगना
रंजवी अधिक तिजहूनी, मम हृदयी ही व्यञ्जना ' ( कलारहस्य ).

कवितेतील भावनेवरून कवीच्या चारित्र्याचा शोध लावण्याचा रसिकाचा अट्टाहास माधवरावांना अप्रस्तुत वाटतो. कारण

‘ हृत्पटलावरील भरतकाम टाकुनी
उचण्याला मागिल टाके ठाकेल रसिक का कुणी ? ’

‘ प्रेम होईना तुझ्याने ’ ही कविता एका स्त्रीला उद्देशून लिहिली असावी हा रसिकांचा तर्क कसा निराधार ठरला हे माधवरावांनीच पुढे उघड केले होते. कलेच्या चिकित्सेच्या वेळी नीति-अनीतीच्या सांकेतिक कल्पना बाजूस ठेवाव्यात, कलावंताची माणुसकी ही रूढ विचारावर उभी नसते ती सहजतः विशाल असते. काव्यनिर्मितीच्या वेळी कलावंत निर्मळ व पवित्र असतो हे माधवरावांचे म्हणणे कोणास अमान्य होईल ? ( गडकऱ्यांचा अशाच प्रकारच्या विचारसरणीचा उल्लेख मागे केला आहेच.)

माधवरावांनी रसिकांस उद्देशून एक कविता ( वृद्ध कवी ) लिहिली आहे. एका प्रतिभाशाली वृद्ध कवीने नव्या युगातील कवींना उत्तेजनपर असा आशादायक संदेश वरील कवितेत दिला आहे. सृष्टिक्रमानुसार झाडांची पिकली पाने एकीकडे गळताना दिसून येतात तर त्याच वेळी दुसरीकडे नवी पाने फुटताना दिसतात. वृद्ध कवीने नवोदित कवींना उषेचे भाट आणि नवोदित तारे म्हटले आहे. यावरून वृद्ध कवीविषयीचा आदरभाव अधिकच वाढतो. काव्यक्षेत्रातील हा उच्चनीच भाव नाहीसा व्हावा व तेथेही समानता प्रस्थापित व्हावी हा आशावाद माधवरावांनी खालील शब्दांत प्रगट केला आहे.

‘ का उठता खाली बसा तरुण मंडळी
उपचार ठेविता का हा समताच योग्य या स्थळी.
शारदा दिव्य माउली थोर आपुली
अन् बाळे आपण सारी सोनुली तिची सानुली ? ’

माधवरावांनी काव्यात्मवृत्तीचा गौरव ठिकठिकाणी केला आहे. आपण काव्य का लिहितो याचा उलगडा त्यांच्या ‘तुटलेल्या दुव्यातील’ नायक करतो. ‘मी यशासाठी, कीर्तीसाठी काव्ये लिहिली नाहीत. माझी विदुषी कला उपदेश करण्यासाठीही निर्माण झाली नाही. प्रीतीकरिताच कविता निर्माण होते आणि तिचे सार्थकही प्रियतमेनेच—रसिकतेनेच करावयाचे असते. ’

### ‘ वेलीच्या नव अंकुरा करु नको येथे प्रवेशास बा ’

‘ व्यवहाराच्या रुक्ष वातावरणात तू प्रवेश करू नकोस, कारण येथे जीवनाचा कलह दिसून येतो. येथे पारतंत्र्यात तुझे तेजोवर्धन घडणार नाही. येथील अरसिकांच्या उच्छ्वासांनी तुझी कोमल तनू करपून जाईल, तेव्हा जेथे मयूरांच्या केकांनी पर्वत दुमदुमतो अशा ठिकाणी एकचित्त बनून त्या केका तू ऐकत राहा ’ असा इषारा काव्यात्मवृत्तीच्या वेलीच्या नव्या अंकुरास यशवंतांनी दिला आहे. यावरून काव्याचे

क्षेत्र निराळे व व्यवहाराचे क्षेत्र निराळे असे त्यांना प्रारंभी वाटत असावे, असे दिसते. नाजुक कलेला जीवनकलह असह्य होईल असे आरंभी त्यांना वाटत होते, पण दुर्धर परिस्थितीशी कलावंत झगडत असताच त्याची कला निर्माण होते हे सत्य पुढे त्यांना पटलेले दिसते. डोक्यावर देवाचे देव्हारे घेऊन मिरविणारा उपासक आणि प्रतिभादेवीची पूजा करणारा कवी ह्यांमधील साम्य त्यांनी 'उपासक' या कवितेत सूचित केले आहे. उपासक लोकांची करमणूक करितो, पण त्याच्या पाटीवरील आसुडाचे फटकारे लोकांना दिसत नाहीत. कवी लोकरंजन करितो पण सभोवतालच्या परिस्थितीशी होणारे त्याचे आंतरसंघर्ष रसिकांना दिसत नाहीत. कविता ही कवीच्या आत्मबलिदानाचे एक चिन्हच असते, हा ठसा ' उपासक ' ही कविता वाचली म्हणजे मनावर उमटतो. दुसऱ्या एका ( मातेस ) कवितेत जनतेची अभिरुची कशी चंचल असते आणि एके काळी कवीला डोक्यावर घेणारे रसिक दुसऱ्या वेळी त्याला कसे पदतली तुडवितात याचे मार्मिक चित्रण आले आहे. रसिकाच्या उपेक्षाबुद्धीने कवीच्या मनाची होणारी स्थिती हा यशवंतांच्या अनेक कवितांचाही विषय झाला आहे. ' इषारा ' या कवितेत तर मत्सरी रसिकाला उद्देशून

' करु नको फुंफाट पन्नगा करू नको फुंफाट '

असे त्यांनी बजाविले आहे.

कवीने स्वतःकडे गरुडाची भूमिका घेऊन सहस्र द्विजिव्ह त्याच्यापुढे काय होत ? असे विचारले आहे. याच संदर्भात यशवंतांच्या ' खलास ', ' ग्रामसिंहास ' या कविता लक्षात घेणे इष्ट होईल. उलटपक्षी सुज्ञ रसिकाविषयीचा यशवंतांचा आदरयुक्त प्रेमभावही ' पाणपोई ' व 'पुष्पसमर्पण' या कवितांतून प्रगट झाला आहे. आपण आद्यकवीच्या स्फूर्तीच्या सिंधूगंगेमधील पाण्याच्या कावडी भरून आणून त्या रसिकांना पोहोचविण्याचे काम करणारे आहोत. ' माझे कुंभ मृत्तिकेचे आहेत हीच माझी नवाई. रसिकांचे मन संतुष्ट होऊन त्यांनी मला दुवा दिला म्हणजे तीच माझी कमाई ठरेल ' असा विनम्रभाव कवीने ' पाणपोई ' या कवितेत प्रगट केला आहे. पुष्पसमर्पणातही ' माझ्या काव्यपुष्पाला कुणी रंग, डौल व गंध नाही म्हणून अवगणना करतात. अशाने भाविकतेचा चुरा होत आहे; तेव्हा माझे हे काव्यपुष्प परमेश्वरा तुम्हीच स्वीकारा म्हणजे ते विमल होईल ' अशी सदिच्छा त्यांनी प्रगट केली आहे. खऱ्या कवीच्या थोर कार्याविषयीची कवीची दृष्टी खालील चरणांत प्रगट झाली आहे.

' आत्मतेला जीव मुकती–ध्वान्तपङ्की खोल रुतती
परि उद्धाराया तया शलाका पुरे कवीची एक तान ' ( कवीस )

## काव्य—एक दिव्य कारागिरी

रविकिरण मंडळातील माधव ज्यूलियन, गिरीश, यशवंत इत्यादी कवींनी काव्यरचनेकडे विशेष लक्ष पुरविले. विविध जातींचा अवलंब करून गेयानुकूल अशी

विविध विषयांवरची भावगीते रचून त्यांनी ती लोकप्रिय केली; कवितेच्या बाह्यांगाकडे त्यांनी लक्ष पुरविले. काव्यात आशयाला जेवढे महत्त्व असते तेवढेच ते अभिव्यक्तीलाही प्राप्त होते असा एक विचार त्यांनी आपल्या मनात बाळगला. कवीने आपल्या मनातील भावनाविचारांना हवी तशी वाट करून द्यावी आणि रसिकांनी त्याबद्दल मुग्धता बाळगावी ही जी एक सांकेतिक प्रथा होती तिला रविकिरण मंडळाने इष्ट वळण दिले. गिरीशांनी 'सुनीता'ला ताजमहालाची उपमा दिली आहे आणि म्हटले आहे—

'तूते ताज म्हणून एक उपमा वाटे सुनीता भली ।
आहे सर्व जयात दिव्य परि ज्या कारागिरी लाभली ॥'

## आधुनिक कवींचे परस्परांसंबंधीचे प्रशंसोद्गार

केशवसुतपरंपरेतील कवींनी निर्मत्सर वृत्तीने एकमेकांचा केलेला आदर-गौरव ही काव्यक्षेत्रातील एक उल्लेखनीय गोष्ट आहे. गडकऱ्यांनी केशवसुतांच्या कविता वाचल्यानंतर आपण त्यांच्या पाठीमागे काही लिहिणे हे लाजिरवाणे आहे, असे म्हटले. शेलेने जडवादी इंग्लिश जनतेला काही आध्यामिक गूढ संदेश देण्याचे जे कार्य केले ते अपुरेच राहिले म्हणून ते केशवसुतांनी अवतार घेऊन पूर्ण केले. केशवसुत जे एके ठायी होते ते ( मृत्यूनंतर ) सर्वांठायी भरले, आणि आपल्या चैतन्ययुक्त विचारांनी त्यांनी अमरत्व प्राप्त करून घेतले असा हा केशवसुतांविषयीचा आपला आदरभाव गडकऱ्यांनी प्रकट केला आहे. गडकऱ्यांनी बालकवींसंबंधी

'नव्या सृष्टिचा नव्या यशाचा तूच शिलेदार ।
नव कवितेच्या जरिपटक्याचा तुलाच अधिकार ॥ ''

असे आदरयुक्त उद्गार काढले आहेत. बी कवींचे वेडगाणे वाचून रे. टिळक यांना जो आनंद झाला त्याचे प्रतिध्वनी 'मधमाशी' या कवितेत उमटले आहेत. टिळकांनी केशवसुतांनाही उद्देशून

'आम्ही येथे तो तेथे !
आलिंगुन अन्योन्याते
गायन वादन । भाषण नर्तन ।
सदैव आता करू चला ।
केशवसुत शिकवुन गेला । झपूर्झा गडे झपूर्झा ।'

असे म्हटले आहे. रेंदाळकरांनी

'गंगौघापरि भव्य केशवसुता सावेश वाणी तुझी'

असे गौरवयुक्त उद्गार काढले आहेत.

नागेश कवींनी

‘ दिव्य तुतारी कवि केशवसुत ।
फुंकित आहे नंदनवनगत ’

असे म्हटले.

बी कवींना आपल्या समकालीन कवींविषयी आदर वाटत असे. काव्यक्षितिजावरील नवोदित ताऱ्यांचा ते गौरव करीत. ‘ चांदणीत ’ बालकवींचा उल्लेख आहे, तर नागेश कवींवर त्यांनी स्वतंत्र कविताच रचिली आहे. लेंभ्यांचे काव्यसौंदर्य चंद्रशेखरांना इतके अपूर्व व अनुपम वाटले की, त्यांनी त्यांची खालील शब्दांत प्रशंसा केली.

‘ हंसाचे गतिचित्र दाविति किती नामी पदन्यास हे ।
भाषेची सरणी रमज्ञ कविला साधे न अन्यास हे ’

चंद्रशेखरांच्या कवितेचा गौरव करिताना माधव ज्यूलियन यांनी पुढील उद्गार काढले.

‘ साधी वाङ्मोहिनी सहज जो असा रसाळ कवि–
स्वस्थळी राही अज्ञात
चंद्रशेखरा तव कवितारति परी मला झुकवी
फुलाला जसा उषावात ’

माधव कवींनी विनायकाला उद्देशून

‘ परंपरा जी शाहीरांची — अखंड पुढती चालायाची—
प्रेरक निज तव गीते साची —
स्फूर्तिदायका । कवि विनायका — ’

असे गुणगान केले.

माधवराव पटवर्धन ( माधव ज्यूलियन ) यांच्या कवितेतील भावनात्मकतेचे वर्णन करिताना मर्ढेकरांनी म्हटले आहे.

‘ जुंपलेले बैल गाडी ओढती ओढाळही
जू चुकेना माखते ही मान रक्ते प्रत्यही ’
‘ टपटपा पण रक्त गळले विश्वचाकोऱ्यांवरी
थेंब त्याचे वाळलेले धीर देती अंतरी ’

## काव्यशारदेवरील कविता

कवी हा वाग्देवीचा पुत्र आहे असे केशवसुतांनी म्हटले. काव्याला स्फूर्ती देणाऱ्या शारदेला नम्रभावाने वंदन करण्याचीही प्रथा पुढे अनेक कवींनी चालू ठेविली गडकऱ्यांनी मात्र हा संकेत पाळला नाही. कवी हा काव्यदेवीच्या प्रायामधला घुंगुरवाळा आहे, असे म्हणून त्यांनी हृदयशारदेला आळविण्याकरिता शब्दशारदेला

पाचारण केले आहे. ( 'हृदयभावना मूर्तिमती तर कविता तव छाया' असे उद्गार कवीने काढले आहेत. ) गोविंद शाहिरांनी आत्मवेलीच्या स्फूर्ति-फुलावर बुद्धिवसंताच्या विकसनाला सरस्वती म्हटले आहे. परमात्म्याच्या चित्सौंदर्याचे पूजन करण्यातच तिला आनंद होतो, ही कल्पना परतत्त्वाचा स्पर्श करणे हे काव्याचे ध्येय होय, या संतकवींच्या कल्पनेशी जुळणारी आहे. त्याचप्रमाणे

'ती वीरा कविता मधुतर मधुरा परमेश्वरासम सुंदरा ।'

या कवीच्या उद्गारावरून शांतरसाप्रमाणेच वीररसालाही त्यांनी कसे प्राधान्य दिले होते, हे समजते. यशवन्त व गिरीश यांची काव्यशारदेची स्तवने सरस आहेत. पुढे बहुतेक कवींनी आपापला काव्यसंग्रह प्रसिद्ध करिताना आरंभी शारदेला वंदन करण्याचा संकेत पाळलेला दिसतो. ही प्रथा नवकवींपर्यंत चालू राहिली.

## विविध कवींचे काव्याकडे पाहण्याचे दृष्टिकोन

'शारदेने आपल्या कानात जो मंत्र सांगितला तो इतरांना सांगणे आणि तिच्यापुढे नम्र होणे ही केशवसुत, गडकरी इत्यादी कवींपासून चालत आलेली प्रथा यशवंत, गिरीश इत्यादी कवींनी चालूच ठेवली.' परंतु इ. स. १९३५ नंतर प्रसिद्धीस आलेल्या कवींनी काव्याची वैशिष्ट्ये काव्याच्या द्वारे सूचकतेने प्रगट केली. बोरकरांनी 'सुर्मेवाला' या कवीवरच्या रूपकात जगाची दृष्टी चोख करण्याचे कार्य कवी निःस्वार्थबुद्धीने करतो असे सूचित केले आहे. काव्यनिर्मितीच्या वेळी कवीची मनःस्थिती कशा प्रकारची असते याचे सूक्ष्म वर्णन त्यांनी 'मनाच्या माऊ'मध्ये केले आहे. मनाच्या माऊचे डोळे वाढणाऱ्या काळोखात उजळतात, तिच्या त्यागाचा आणि भोगाचा खेळ सहजासहजी कळत नाही असे उद्गार त्यांनी वरील कवितेत काढले आहेत.

कुसुमाग्रजांनी कवितांना समिधांची उपमा दिली आहे, आणि त्या रसिकांच्या अंतःकरणात भावनांचा अग्नी फुलवोत अशी मनीषा प्रकट केली आहे. विंदा करंदीकरांना कविता म्हणजे तिसरी स्वेदगंगाच वाटते. वा. रा. कान्त यांनी कवितेला क्रांतिदेवी कल्पिले आहे. ( अग्निपंख नभि फडफडु दे ), अंतःकरणातील भावना काव्यरूपाने प्रगट होणे म्हणजे उंबराला फूल येणेच होय, अशी कृ. ब. निकुंब यांची कल्पना आहे. शरच्चंद्र मुक्तिबोध यांना काव्यातून मानवाच्या विकासाचा अबाधित स्रोत वहात जावा असे वाटते. कविता ही मायाविनीच आहे असे एकास वाटते, तर दुसऱ्यास ती हृदयीची कामरूपिणी मोहिनी वाटते. सारांश, काव्याचा हेतू आणि त्याचे प्रयोजन यांमध्ये देशकालपरिस्थितीप्रमाणे आणि कवीच्या व्यक्तिगत स्वभावाप्रमाणे कसा बदल होऊ शकतो याची प्रतीती येते. काव्याची निर्मिती आत्मरंजनाने झाली तरी तिने वस्तुनिष्ठ दृष्टी बाळगून कालोचित कार्य करावे हा विचार अलीकडील कवींच्या मनात अधिक प्रभावी होत आहे यात शंका नाही.

पूर्वीची रसव्यवस्था आजच्या कवींना — विविध रस निर्माण करणे, हे कवितेचे प्रयोजन होय, ही व्याख्या 'अनिलांना' (आ. रा. देशपांडे यांना)— अपुरी वाटते. आपण रसराज्यातले पाखंडी आहोत असे त्यांनी म्हटले आहे.

'विटलो आहो पुरतेपणी –
त्याच त्या शृंगार वीर करुणादि नवरसास–
रसरसून उसळवील जो मानवतेच्या प्रक्षोभास असा रस
अखंड स्थायीभाव विभाव अनुभाव संचारी भाव
त्याचे अनुभवीत आहो पाखंडी रसायनशास्त्राचा–साहित्याचा
अहो घेऊन ध्यास हटविण्यास हल्ले शत्रूचे
मानवमात्राच्या स्थापायास अधिराज्य मानवतेचे.'

प्रक्षोभ-रसाची अनिलांची ही कल्पना क्रान्तिकारक आहे यात शंका नाही. (केशवसुतांच्या तुतारीसारख्या कवितेतून प्रक्षोभरस आला आहे ही त्यांची टीका प्रसिद्धच आहे.)

## नवकवींच्या काव्यविषयक कल्पना

'मानसशास्त्राने मानवी भावनेसंबंधी जी सत्ये प्रगट केली त्यांचा परिणाम नवकवींच्या काव्यविषयक कल्पनांवर झालेला दिसतो.' 'कवीने आपल्या अंतर्गत भावनेशी, कल्पनेशी व विचारांशी संपूर्णपणे प्रामाणिक राहावे किंबहुना कवीला आरंभी प्रतीत झालेल्या भावनात्मक सौंदर्याचा आविष्कार त्याने याथातथ्य करावा. मूळचा आशय जसाच्या तसाच शब्दांत प्रगट करणे व आशय आणि आकार यांच्यात अभेद राखणे यातच काव्याची सफलता आहे असा विचार पुढे आला.' परंतु कवीला आरंभी प्रतीत होणारे सौंदर्य संदिग्ध असते पण पुढे तेच मननाने युक्त होत जाऊन भावनोत्कटतेला बाधही न आणता शब्दामध्ये प्रगट होऊ शकते हे सत्यही लक्षात घेणे इष्ट आहे.

नवकवींचा दृष्टिकोन असा की, 'कवींच्या अंतर्गत भावनाच एवढ्या प्रभावी असतात की, त्यांना व्यक्त करावयाचे म्हणजे कवींना एका मोठ्या दिव्यातून जावे लागते! मूळचे जे सौंदर्य नवकवीला असंदिग्ध स्वरूपात भासमान होते ते बहुरूपी, बहुरंगी, बहुढंगी असल्यामुळे त्यास साजेशा शब्दांचा तशाच तऱ्हेचा साज नवकवी देत राहतो. अमूर्त भावनांना शब्दांच्या मूर्त प्रतिमांचा आकार देणे अवघड असले तरी ते प्रयत्नसाध्य असते, पण नवकवींना शब्दाच्या माध्यमाची–नव्हे तर आशयाच्या सूक्ष्मतेची–अर्गलाच अधिक फसवणारी वाटते.'

'कवीने आपणास प्रतीत होणाऱ्या मूळच्या आशयसौंदर्याशी कितीही प्रामाणिक राहण्याचे ठरविले तरी त्या आशयसौंदर्यास मूळस्वरूपात शब्दांकित करणे

साधेल काय ? असा प्रश्न येथे निर्माण होतो. अर्थात ध्येय केव्हाही लांछनास्पद नसते. केशवसुतांच्या शब्दांत लिहावयाचे तर 'असे हे मूळचे' क्षणात नाहीसे होणारे दिव्य भास आपणाला शब्दांकित करता येत नाहीत हेच खरे !

'आत्माराम सखेद होउनि वदे तो आपणाशी असे ।
काही सुन्दर देखिले खचित मी यामाजि शंका नसे ।।
हा ! हा ! हे जर सर्व भास धरता येतील माते तर ।
पृथ्वीचा सुरलोक की बनवुनी टाकीन मी सत्वर ! ।। '

कवीस एखाद्या विषयसौंदर्याशी पूर्णपणे तन्मय होणे आणि ते सौंदर्य शब्दांत मूर्त करणे हे दिव्य करावे लागते. अशा वेळी मूळ सौंदर्याच्या अपूर्व स्वरूपामुळे त्याचा आविष्कार यथार्थ झाला नाही आणि नेणिवेच्या अवस्थेत उत्कटतेने भासमान झालेल्या भावसौंदर्याला जाणिवेचे लांछन लागले तर नवकवीला चुकल्यासारखे वाटणे हे साहजिक आहे. परंतु यापूर्वी म्हटल्याप्रमाणे नवकवींच्या काव्याला केवळ वरील कारणामुळेच दुर्बोधता प्राप्त होते असे नाही. ज्या शाब्दिक प्रतिमांच्या आधारे नवकवी आपला आशय प्रकट करतात त्या शब्दप्रतिमा कित्येकदा दुर्बोध होतात. रसिकाची तक्रार अशा प्रतिमांसंबंधी असते. उदाहरणार्थ 'अर्थ' या कवितेत आ. रा. देशपांडे ( अनिल ) लिहितात

'कुणाच्या कवितेत असलेल्या शब्दव्यूहात
अर्थ शोधीत बसत नाही
वाहावल्या त्याच्या अर्थप्रवाहात वाहत जातो
बुडी घेऊन पाहतो ठाव कुठे लागतो
चाचपडतात बुद्धीचे हात
तळचा गाळ उपसतात
त्यांना काही मिळत नाही...
काही जरी सापडले नाही तरी
सार्थक होते. '

नवकवीच्या काव्यातील अनाकलनीय अर्थावरील ही एक बाजू झाली.

नवकाव्याचे जनक बा. सी. मर्ढेकर यांच्या काव्यविषयक विचारांची दुसरी बाजू लक्षात घेऊन हे प्रकरण आटोपते घेणे उचित होईल.

कवीच्या अंतरंगात भावना उचंबळून आल्या, त्याला विशिष्ट सत्यसौंदर्याचा साक्षात्कार झाला, त्याला ते मूळचे शुद्ध सत्य शब्दांत आणावे असे मनापासून वाटले, परंतु ज्याला ते साधले नाही, त्याच्या या मनःस्थितीचे वर्णन करताना मर्ढेकर लिहितात-

'शब्द टराटर फाडुनि टाकी
सांगायाचे म्हण जे ओठी

तसेच राहिल माझ्या अगदी
पूर्ण नागडे पूर्ण नागडे '

'भावनागर्भ आत्मनिष्ठा' राखणे हे कवीचे ध्येय होय, असा अर्थ त्यांच्या वरील कवितेतून प्रगट होतो आणि तो योग्यच आहे। (भावनेच्या प्रक्षोभावस्थेत प्रगट झालेले निर्भेळ सत्य जसेच्या तसेच शब्दांत प्रगट होईल का अशी शंका निर्माण होते. याबाबत आरंभी टीका केलीच आहे.)

'ज्ञानेश्वर, तुकाराम, रामदास हे शब्दांचे नायक आणि अर्थांचे धुरंधर होते. आपण शब्दांचे किंकर आहोत अशी श्रेष्ठ कवीला शोभणारी नम्र वृत्ती मर्ढेकर यांनी प्रगट केली आहे. काव्यात शब्दावडंबरापेक्षा शुद्ध सहजजात भावनेला महत्त्व असते. असे भावपूर्ण काव्य आपल्या अंतःकरणातून प्रगट व्हावे अशी विनंती ते शब्दराजांना करतात आणि लिहितात—

'परि फाटे हे अंतर। आणि जन्मा येई अंबर
तोडा नाळ–अवडंबर। नारायणा.
अहो शब्दराजे ऐका। लाज सेवकाची राखा.'

जिच्यामुळे काव्यनिर्मिती होते अशा दिव्यशक्तीला उद्देशून त्यांनी म्हटले आहे—

'भरून येइल हृदय जेधवा
शरीर पिळुनी निघेल घाम
अन् शब्दांच्या तोंडामध्ये
बसेल तूझा गच्च लगाम.'

अशाच वेळी आपल्या हातून

'काळ्यावरती जरा पांढरे व्हावे'

अशी इच्छा त्यांनी प्रकट केली आहे.

तसेच आपल्या मनात अनेक कल्पना उद्भवतात, परंतु केवळ शब्दांच्या जंजाळात त्यांचे खरे स्वरूप लक्षात येत नाही.

'तुझे नख माझ्या गळयाला लागू दे'

म्हणजे माझ्या 'व्यंजनाला सामर्थ्याचा स्वर लाभेल.' हे मर्ढेकरांचे विचार लक्षात घेतले म्हणजे 'कविता करणे, म्हणजे आत्मबलिदान करणेच होय' हे सत्य लक्षात येते.'

'भावनागर्भ, कल्पनागर्भ आणि विचारगर्भ आत्मनिष्ठा हीच वाङ्मयीन महात्मतेची प्रमुख लक्षणे होत, हाच मर्ढेकरांचा दृष्टिकोन त्यांच्या काव्यविषयक कवितांतूनही प्रगट झाला आहे.'

इतर सर्व क्षेत्रांतल्याप्रमाणे काव्यक्षेत्रातही वेळोवेळी काही अनिष्ट संकेत निर्माण होतात. क्रान्तिकारक कवी जेव्हा काव्यक्षेत्रात नवे प्रयोग करतो तेव्हा त्या प्रयोगांचे समर्थनही त्याला करावे लागते, असे या प्रकरणाच्या आरंभी म्हटलेच आहे. कवीनेच आपल्या काव्याचे महत्त्व इतरांना सांगावे यात कित्येकांना कवीचे अहंभाव प्रगट झाल्यासारखा वाटतो. वस्तुतः यात अनुचित काही नाही. या प्रकरणात केशवसुतांपासून मर्ढेकरांपर्यंत ज्या ज्या कवींनी काव्यविषयक काही विशिष्ट विचार प्रगट केले त्यांची साकल्याने चर्चा केली आहे. आधुनिक कवींची काव्य-विषयक भूमिका लक्षात घेऊनच त्यांच्या अनेक विषयांवरील कवितांतून प्रगट झालेल्या दृष्टिकोनांचे गुणग्रहण करणे इष्ट होईल यात शंका नाही.

☆ ☆ ☆

अनु. ३७८२४ दि. ...
अंक ...१५६१ ... नों. दि. १७।२।६५

# प्रकरण २ रे

## जीवनविषयक तत्त्वज्ञान

### आधुनिक कवींच्या जीवनावर भौतिक परिस्थितीचा झालेला परिणाम

आधुनिक कवींच्या जीवनविषयक विचारसरणीवर जितका सभोवतालच्या परिस्थितीचा तितकाच त्यांच्या वैयक्तिक अनुभवांचा परिणाम झालेला दिसतो. कवींच्या मनावर झालेले हे अंतर्बाह्य परिणाम लक्षात घेऊनच, त्यांनी काव्यात प्रगट केलेल्या जीवनविषयक तत्त्वज्ञानाचा विचार करणे इष्ट ठरेल. सकृद्दर्शनी असे वाटते की, ज्या कालखंडात आधुनिक कवी प्रसिद्धीस आले तो कालखंड वैशिष्ट्यपूर्ण होता. दीडशे वर्षांच्या इंग्रजी अमलामध्ये सर्वच भारतीयांच्या जीवनावर एक विशिष्ट परिणाम झाला होता. विज्ञानप्रधान संस्कृतीची छाप सामाजिक, राजकीय आणि वाङ्मयीन व्यवहारावर मोठ्या प्रमाणात पडत होती. पौरस्त्य संस्कृती आध्यात्मिक दृष्ट्या पाश्चात्त्यांना मार्गदर्शन करू शकेल असा विश्वास बाळगणारे काही पुढारी व कवी याच कालखंडात पुढे आले, पण एकंदरीत पाहता जुन्या धार्मिक रूढींचा निषेध करणे, सामाजिक समतेचा व व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार करणे, पाश्चात्त्य विद्येचा आणि शास्त्रीय शोधांचा गौरव करणे, ह्या गोष्टी त्या काळाचे वैशिष्ट्य दाखविणाऱ्या होत.

प्राचीन मराठीतील संतकवींनी आपल्या काव्यातून आध्यात्मिक विषयावर अधिक भर दिला होता, परंतु आधुनिक कवींनी ऐहिक जीवनातील बहुविध विषय घेऊन त्यांच्याकडे पाहण्याचे विविध वैयक्तिक दृष्टिकोन आपल्या काव्यातून प्रगट केले. पौरस्त्य व पाश्चात्त्य संस्कृतींच्या संघर्षाचा इष्टानिष्ट परिणाम या काळात होऊन गेलेल्या कवींच्या जीवनविषयक विचारसरणीवर झाल्याशिवाय राहिला नाही.

केशवसुतपूर्वकालीन कवींपैकी भा. दा. पाळंदे, कीर्तिकर, कानिटकर, महाजनी, कुरुंदवाडकर, इत्यादिकांनी पूर्वपरंपरेला धरून भक्तिरसप्रधान कविता निर्माण केली. स्वतःच्या ठिकाणी दिसून येणाऱ्या दुर्गुणांचा उल्लेख करून ईश्वराच्या कृपेची आणि

त्याच्या दर्शनाची तीव्र इच्छा प्रगट करावी हा प्रमुख हेतू भक्तिपर कविता लिहिणाऱ्या तत्कालीन कवींच्या मनात प्रामुख्याने दिसून येतो.

## गो. वा. कानिटकर यांची संमोहलहरी

मोरोपंतांच्या केकावलीच्या धर्तीवर गोविंद वासुदेव कानिटकर यांनी संमोहलहरी हे पृथ्वीवृत्तातले १२१ श्लोकांचे काव्य लिहून प्रसिद्ध केले. तात्त्विक विषयावरचे हे चिंतनशील खंडकाव्य प्रातिनिधिक स्वरूपाचे असल्यामुळे त्याचा विस्ताराने परामर्श घेणे आवश्यक आहे. “ हे काव्य म्हणजे सृष्टी, ईश्वर धर्म, परलोक, नीतिकर्तव्य इत्यादी विषयांच्या संबंधाने लहानपणापासून आजपर्यंत माझ्या मनात नेहमी घोळत राहणारे विचार व ज्या कल्पना त्यांचा आदर्श होय. ” असे प्रस्तावनेत कवीने म्हटले आहे. सृष्टीला विवेक नाही. मूळचाच जो निर्गुण शुद्ध ईश्वर तो स्नानाने कधी शुद्ध होईल काय ? वळी तो कान पिळी हा मानवी धर्म यशस्वी का होतो ? इत्यादी अनेक संशय कवीने या काव्यात प्रकट केले आहेत. मानवात चाललेला जीवनकलह, आणि दीन दुबळ्यांचा होणारा छळ, यामुळे कवीचे मन दुःखी झाले आहे.

मानवाला ‘ उदरपूर्तीच्याविण न हेतु काही दिसे ’ असे का ? हा प्रश्न कवीने ईश्वराला--

‘ असा सतत घालि जो विमल सृष्टिच्या गोंधळा
अगा भयद गोंधळ्या नुमजती तुझ्या त्या कळा ’

---अशा गोंधळ्याला विचारला आहे.

भगवंताने अर्जुनाला युद्धप्रवृत्त केले. ‘ तू कुणाला मारीत नाहीस, मारणारा निराळाच असतो, तू आपले कर्तव्यकर्म कर ’ हा भगवद्गीतेतील गूढ उपदेश आपणाला कळत नाही असे कवीने म्हटले आहे. श्रीकृष्णाने अर्जुनाला सांगितले की—

‘ न पुण्य बघता खरे, समज तेचि तू पापही
खरी नसति अर्जुना लटकि खास ती दोनिही ’

श्रीकृष्णाच्या या भाषणावर कवीने अभिप्राय दिला आहे की

‘ गभीर अति तो कळे मज न गूढ गीताशय । ’

तात्त्विक ग्रंथांचे वाचन करूनही आपल्या मनाला शांती मिळाली नाही असा निर्वाळा कवीने दिला आहे.

‘ कळो भुवन गूढ हे म्हणुनि पाहिली दर्शने ।
तशी विविध पुस्तके बहुत वाचिली भक्तिने ।।
परंतु हृदयास या लव न शांतता लाभली ।
पदीं रुदन मी करी तव रचून पद्यावली ।। ’

सर्व माणसे जरी एकाच ईश्वराची लेकरे आहेत तर त्यांच्यात बंधुभाव का नसावा असे आश्चर्य कवीने प्रगट केले आहे.

‘ अनाथ निजबांधवा न बघता मनी ये दया।
न वा व्यथितरक्षणी करिति ते स्वसंपद् व्यया ॥ ’

दुर्जनांचा जयजयकार आणि सज्जनांचा छळ या जगात होतो. हे असे का व्हावे हे कोडे कवीस उलगडत नाही.

‘ खरा सुपथ कोणता मज कळे न हे निश्चये।
कुमार्गरत त्यांचिया सुखधनादि वास्यास ये ॥ ’

सगुण स्वरूपाच्या देवमूर्तींच्या पूजनातही भक्ताचा भोळेपणा कसा प्रगट होतो ते कवीने दाखविले आहे

या काव्याच्या अखेरीस कवीने आपल्या हातून कळत न कळत पातके घडतात असे आत्मनिवेदन केले आहे आणि आपल्या मनाला शांती मिळावी म्हणून ईश्वरास विनविले आहे.

‘ महौषधि कृपाच ती तव मिळो करी प्रार्थना।
मनोगदविनाशना ! पुरवि सत्वरी कामना। ’

आपले हे काव्य सश्रद्ध भाविकांस मान्य होईलच असे नाही असे कवीस वाटते. कवीचा हेतू आपल्या गोंधळलेल्या मनातील अनेक संशय, साध्या विनयप्रचुर व प्रतिष्ठित शब्दांनी पद्यरूपाने प्रदर्शित करण्याचा होता; आणि तो हेतू लक्षात घेऊनच हे काव्य वाचणे इष्ट ठरेल. कोमल व आर्त भावना या काव्यात कोठे कोठे आढळल्या तरी एकंदरीत हे काव्य विचारप्रवर्तकच आहे असे म्हणावे लागते. काव्याच्या अखेरीस हर्बर्ट स्पेन्सर, मिल, टेनिसन इत्यादी आंग्ल लेखककवींच्या निबंधांतील व काव्यांतील तात्त्विक विचारसरणीचे उतारे कवीने उद्धृत केले आहेत. यावरून कवीच्या मनावर त्या त्या ग्रंथकारांच्या तात्त्विक विचारांचा कसा परिणाम झाला होता हे कळून येते. विज्ञानयुगातील शास्त्रीय दृष्टिकोनाचा, बुद्धिवादी मनावर होणाऱ्या परिणामांचा प्रामाणिक आविष्कार या काव्यात झाला आहे यात संशय नाही.

## इतर भक्तिरसप्रधान कविता

भास्कर दामोदर पाळंदे यांची ईश्वरविषयक निष्ठा त्यांच्या ‘ रत्नमाले ’तील अनेक पदांतून प्रगट झाली आहे. मोरोपंतांच्या केकावलीच्या धर्तीवर त्यांनी केलेली देवाची आळवणी कवीच्या सरळ भाविक वृत्तीचीच साक्ष देणारी आहे.

‘ प्रभो प्रणतवत्सला बहुत पातकी दीन मी,
निराश्रित अजाणता तुज सदैव चित्ती नमी। ’

अशा प्रकारे स्वतःला पापी समजून देवाला आळवण्याची परंपरागत रीत कवीने अवलंबिली आहे. याशिवाय ‘ अनलस मी तुज नित्य भजावे ’, ‘ प्रभुराया थोर तुझी चतुराई ’, ‘ प्रभु मज छंद तुझाचि असावा ’, ‘ झडकरी हा भवताप

शमावा' वगैरे पदे प्राचीन कवींच्या पदांची आठवण करून देणारी आहेत. याशिवाय त्यांची 'गीतासुधा' ही गीतेवरील साकी जातीतील टीका प्रसिद्ध आहे.

पाळंदे यांची पद्यरचना सुबोध, गेयमधुर असली तरी चमत्कृतिजनक नाही. जुन्या भक्तिपर कविता लिहिणाऱ्या कवींच्या वळणावर त्यांची कविता गेली आहे. तीत त्यांचा आस्तिक्यभाव प्रकट झाला आहे. परंतु कानिटकर यांच्या चिकित्सक वृत्तीचा अभावच त्यांच्या ठिकाणी दिसून येतो.

कान्होबा रणछोडदास कीर्तिकर यांच्या 'भक्तिसुधे'तही कवीचा प्रांजल नम्रभाव प्रकट झाला आहे. कवीच्या भाषेत कशी सुबोधता आहे हे खालील पंक्तींवरून दिसून येईल —

'विश्वाचे कारण तू हे प्रभु ! मी तुज कदा नुपेक्षावे
पीडित बंधुजनाते साह्य यथाशक्ति करुनि रक्षावे'
'विदित सुखे जी भवनी असती ती म्या यथेच्छ सेवावी
परि वृत्ति प्रभुभजनी नित्य सुखास्तव सदैव ठेवावी'

याच संदर्भात नारायण धोंडदेव खांडेकर यांची 'ईशस्तवन', 'मानसोपदेश' इत्यादी कविता आणि इतर कवींची भक्तिपर काव्ये लक्षात घेणे इष्ट होईल.

विठोबा अण्णा दप्तरदार यांची भक्तिपर पदे, मध्वमुनीश्वर व अमृतराय यांच्या पदांची आठवण करून देणारी आहेत. 'उत्तम जन्मा येउन रामा गेलो मी वाया', 'श्रीरंगा दे मजला सत्संगा', 'आनंदाचा कंद हरि हा भक्त सखा गोविंद' इत्यादी पदांतून त्यांची भाविक वृत्ती चांगली प्रगट झाली आहे.

## इंग्लंडमधील धार्मिक प्रवृत्तीच्या कवींचा तत्कालीन कवींवर झालेला परिणाम

सामाजिक समतेचा, व्यक्तिस्वातंत्र्याचा आणि मानवतेचा पुरस्कार करणे हा ध्येयवाद इंग्लंडमध्ये एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील उदारमतवादी कवींच्या ठिकाणी प्रकर्षाने दिसून आला.

वर्डस्वर्थ, टेनिसन इत्यादी धार्मिक प्रवृत्तीच्या कवींचा आपल्याकडील तत्कालीन कवींनी चांगला अभ्यास केला होता. त्याचा परिणाम असा झाला की, तत्कालीन मराठी कवितेचे वळण धार्मिक व नैतिक स्वरूपाचे झाले. कवितेत बोधवाद आला. व्यक्तिनिष्ठेचा–आंतरिक जिव्हाळ्याचा– अभाव जरी तीत दिसून आला, तरी वस्तुनिष्ठ दृष्टिकोनाने धार्मिक शिक्षणाचे बरेच काम तिने केले. ह्या काळातील जीवनविषयक कविता ईश्वरविषयक श्रद्धेने व्यापिलेली आहे हे खरे. तथापि मानवाला लाभलेले ऐहिक जीवन हीही ईश्वरी देणगीच आहे आणि ते जीवन सत्कारणी कसे लागेल याचा विचार आपल्या काव्यातून काही कवींनी बुद्धिपुरस्सर केलेला दिसतो. परिस्थितीशी झगडून तिच्यावर विजय मिळविणे हे मानवाचे आद्य कर्तव्य होय, ही

श्रद्धा काही कवींच्या ठिकाणी बळावत होती. इंग्रजी काव्याच्या आधारे जीविताची जी स्तोत्रे त्यांनी गायिली त्यांतून

‘ नका गड्यांनो म्हणू तुम्ही ही वाचुनि नाही, फल काही ।
उद्योगाला विमुख असे नर जिवंत मेला तो पाही ॥
उत्साहाने कर्म करू । यश देणारा प्रभु स्मरू ।
आपण अपुले कर्म करावे चिंता सारी प्रभु वाही ॥ ’ ( महाजनी )

अशा तऱ्हेचा आशावादी सूर त्यांच्या कवितेतून निर्माण झाला. हरिभाऊ आपटे यांचेही ‘ Psalm of Life ’ या कवितेचे भाषांतर ‘ जीवनस्तोत्र ’ म्हणून प्रसिद्ध आहे.

वस्तुतः राष्ट्र पारतंत्र्यातच खितपत पडले होते, पण म्हणूनच की काय प्रतिकूल परिस्थितीशी झगडण्याचे विशिष्ट मनोधैर्य काही कवींच्या ठिकाणी निर्माण झाले. इंग्रजी राज्य केव्हातरी नष्ट होईल असे त्यांना वाटे, परंतु वाइटाकडेही चांगल्या दृष्टीने पाहण्याच्या त्यांच्या प्रवृत्तीने भारताचा इंग्रजांशी आलेला संबंध ही एक ईश्वरी योजना असावी हा संकेत मोठ्या आनंदाने स्वीकारला. इंग्रजी राज्यकर्त्यांच्या गुणगौरवपर कविता याच काळात निर्माण झाल्या. पुढे रुडिअर्ड किप्लिंगसारख्या साम्राज्यवादी आंग्ल कवीने जेव्हा

“ West is West and East is East
And never the twin shall combine ”

असे दर्पोद्गार काढले, त्या वेळी सुमंतांनीही त्याला उत्तर दिले.

‘ दानवी दानवी देवी देवी राही ।
सर पूर्वेची ये पाश्चिमे न केव्हाही ’

परंतु हा आत्मविश्वास आरंभीच्या कवींच्या ठिकाणी निर्माण झाला नव्हता हे खरे.

## केशवसुत आणि त्यांच्या समकालीन कवींची जीवनविषयक विचारसरणी

पारंपरिक सांकेतिक विचारांच्या चाकोरीतून स्वतःची सुटका करून घेऊन ज्यांनी वैयक्तिक अनुभवांच्या आधारे जीवनाकडे पाहण्याचे स्वतंत्र दृष्टिकोन प्रगट केले अशा कवींमध्ये केशवसुत आणि त्यांच्या समकालीन कवी यांचा अंतर्भाव होतो. स्थूलमानाने हा कालखंड इ. १८८५ ते १९२० पर्यंतचा मानावा लागतो. त्या सर्व कवींच्या जीवनविषयक दृष्टिकोनाचा साकल्याने विचार करण्यापूर्वी केशवसुतांची जीवनविषयक विचारसरणी लक्षात घेणे आवश्यक आहे.

केशवसुतांच्या मनोवृत्तीमध्ये निर्माण झालेले आशानिराशेचे खेळ त्यांच्या जीवनविषयक कवितेत दिसतात. जीवनात त्यांनी जे सुखदुःखांचे चढउतार अनुभविले

त्यांचे पडसाद अनेक कवितांत उमटले आहेत. जीवित हे खरे आहे, ते झगडण्याकरिता आहे, हे त्यांनी ओळखले होते. ही गोष्ट

'नाही स्वप्न न भास वा बुडबुडा...जीवित्व साचे असे....'

या त्यांच्या वचनावरून स्पष्ट होते. त्यांच्या मनातील संशय व श्रद्धा, निराशा व आशा यांच्या परस्परविरोधी संग्रामाचे एक चित्रच त्यांच्या काव्यात उतरले आहे. साकल्याने विचार केला तर त्यांचे जीवनविषयक तत्त्वज्ञान व्यक्तीला आशावाद बाळगावयास लावणारे व तिच्या मनातील भीरुता नाहीशी करून तिला धीर देणारे असेच आहे. दुर्जनांनी चालविलेल्या सज्जनांच्या छळाचा किंवा जीवितातून मार्ग काढीत असताना निर्माण होणाऱ्या अडचणींचा त्यांनी उल्लेख केला आहे. पण याचा अर्थ जीवितात काही अर्थ नाही असे त्यांना सांगावयाचे नसून जीवितातील या संकटातूनच पुढे जाणे हाच खरा पुरुषार्थ होय, ही जाणीव वाचकांना करून द्यावी हाच त्यांचा उद्देश आहे. केशवसुतांच्या कवितेत असलेल्या आशाजनक व निराशाजनक गीतांचा संख्येच्या दृष्टीने विचार करून विशिष्ट निर्णय ठरविणे अनुचित होईल. त्यांची जीवनविषयक समग्र कविता वाचल्यानंतर त्याचा आपल्या मनावर काय ठसा उमटतो हेच पाहणे अधिक श्रेयस्कर होईल.

केशवसुतांची मनोवृत्ती चिंतनशील होती व अंतःकरण संवेदनाक्षम होते. त्यांच्या मनाच्या निरनिराळ्या अवस्था त्यांच्या काव्यात दिसून येतात. कधी कधी ते प्रयत्नवादी दिसतात, कधी संशयवादाने त्यांना पछाडलेले दिसते, कधी त्यांना अन्यायाची चीड येते, कधी वेदान्तानुसार सुखदुःखाकडे समाधानाने पाहण्याची वृत्ती त्यांच्या ठिकाणी निर्माण होते; परंतु एकंदर विचार केला तर जीविताच्या अंधकारातून प्रकाशाकडे पाहण्याचा त्यांचा आशावाद कधीही लुप्त झालेला दिसत नाही. मानवी प्रवृत्तीला जेवढे अडथळे निर्माण होतील त्या प्रमाणात ती पुढे जाण्याचा अधिकच प्रयत्न करते. केशवसुतांची मनोवृत्ती विकासोन्मुख होती, व कधी कधी परिस्थितीच्या पुढे ती अगतिक झाल्यासारखी दिसली, तरी तिने झुंजारवृत्ती सोडली नाही; व आज ना उद्या आपला उद्धार होणारच या आशेपासून ती दूर झाली नाही. एके ठिकाणी त्यांनी असे म्हटले आहे की—

'झिजविति नित्य जिणे तयांना आहे का मरणे?' (म्हातारी)

'जे झिजतात ते मरतात का?' असा सवाल करून स्वतःपुरते तरी ते त्याचे उत्तर देतात की, 'जी मानवी प्रवृत्ती झगडते ती अमर होते.' याच संदर्भात 'फुल पाखरू मरण पाहिले आहे का कोणी!' असा प्रश्न त्यांनी केला आहे. तो शास्त्रीय दृष्ट्या चुकीचा असला तरी काव्यदृष्ट्या सार्थच वाटतो व आपणही ह्याच संदर्भात त्यांच्या या प्रश्नाचा विचार करणे उचित होईल. 'जातस्यहि ध्रुवो मृत्युः' हे तत्त्व केशवसुतांना अभिप्रेतच होते, पण आपल्या मोहक व्यक्तिमत्त्वाने जो इतरांना आनंद

देतो त्याचे जिणे अमरच नसते काय ? असा प्रश्न त्यांनी विचारला आहे. " 'काट्या-वाचुनि गुलाब नाही ' हे तत्त्व लक्षात घेऊन दुःखाला तू पाठीशी घाल. तुझा जन्म झगडण्याकरिता आहे. मंचकावर पहुडण्यासाठी नाही. हे जग ईश्वराचा एक ग्रंथ आहे. त्याची पाने आपण समंजसपणे वाचावी व जीवितातील दुःखाचा पेला डोळे मिटून पीत असता त्यातील अनुभवाचीच गोडी चाखावी. " त्यांच्या ठिकाणी निर्माण झालेला अशा प्रकारचा आशावाद म्हणजे त्यांच्या मनोवृत्तीने प्रतिकूल परिस्थितीवर मिळविलेला विजयच होय. 'झपूर्झा', 'हरपले श्रेय', 'सतारीचे बोल', 'कोणीकडून कोणीकडे', 'तत्त्वतः बघता नामावेगळा', 'वातचक्र', 'म्हातारी', 'दिवसरात्र' या कवितांतून त्यांच्या मनात निर्माण झालेले आशानिराशेचे खेळ दिसून येतात, असे म्हटल्याने समाधान वाटत नाही, तर उलट संकटसमयी आपल्या मनाला धीर देऊन पुढे जाण्याची हिंमत त्यांनी कशी धरिली हेच सत्य त्यातून आढळते. करुणरम्य अशा शोकांतिकेतील नायकाचा शेवट कसा झाला आहे हे पाहण्यापेक्षा नायकाचे प्रत्यक्ष कर्तृत्व कसे प्रकट झाले हे पाहणे महत्त्वाचे ठरते; आणि या दृष्टीने पाहता कदाचित केशवसुतांचे लौकिक जीवन यशस्वी झाले नसले तरी त्यांच्या काव्यातील जीवन त्यामुळे निराशावादी ठरत नाही. जीवित हे एक प्रकारचे शोकसंकुल नाटक आहे असे त्यांनी म्हटले असले तरी त्यामुळे त्यांची मनोवृत्ती परिस्थितीपुढे हात टेकणारी, पलायनवादी, दुबळी किंवा स्वप्नाळू होती हे म्हणणे कितपत शास्त्रशुद्ध ठरेल ?

## तम अल्प द्युति बहु

'जीवितात तम अल्प पण द्युति बहु ' असेच केशवसुतांना वाटत असावे.

'धीर धरी रे धीरापोटी असती मोठी फळे गोमटी '

हे त्यांचे स्वानुभवाचे उद्गार आहेत. निसर्गातील चंद्र, सूर्य, तारे हे ज्या ठिकाणी नाचत आहेत आणि नभोद्यानातील पुष्पे तोडीत विहार करीत आहेत अशा परमोच्च आनंदाच्या ठिकाणी जर तुम्हाला जावयाचे असेल तर निर्भयपणा धरा, निःसंगपणा धरा, जग काय म्हणेल हे ध्यानात आणू नका आणि नाचत गुंगत आपल्या उच्च ध्येया-भोवती फेऱ्या मारीत आत्मानंद लुटा असा इषारा केशवसुत देतात. ह्या संदेशाच्या पाठीमागे वेदान्तातील तत्त्वज्ञान केवळ पोकळ शब्दांत आणण्याचा आव दिसत नाही; तर उलट जीवितातील खोल अनुभवामुळे जीवनाकडे पाहण्याचा एक तात्त्विक दृष्टिकोन त्याच्या पाठीमागे आहे असे वाटते. ध्येयनिष्ठ व्यक्तीला अप्राप्य ध्येयाची नेहमीच ओढ लागून राहिलेली असते. अशा वेळी त्याच्या मनाची स्थिती कशा प्रकारची होते याचेच वर्णन 'झपूर्झा ' या कवितेत आले आहे. असा पुरुष हर्षशोकाने, सुखदुःखाने अस्वस्थ होत नाही, तो काहीसा परिस्थितिनिरपेक्ष राहतो, त्याची आंतरदृष्टी आपल्या उदात्त ध्येयाशी एकरूप झालेली असते. वास्तविक पाहता जे लोक सामान्य कारणांनी भावनावश होतात व सुखदुःखात गढून जातात, त्यांना अशा

महात्म्याच्या मनःस्थितीचे हसू येईल, परंतु अशा टीकेची हे महात्मे पर्वा करीत नाहीत, त्यांची दृष्टी अलौकिक असते. कलावंताला जी एक भेदक दृष्टी प्राप्त होते तिचाच ते अनुभव घेतात.[४]

'मूर्ति दिव्य अशी अहा उतरली घोंड्यामधूनी भली
माझी दृष्टि असे अलौकिक मला जाणीव ही जाहली.'

सामान्य लोकांना कवींची विचारसरणी पटली नाही तरी त्याच लोकविलक्षण विचारसरणीत मानवतेच्या यशाचे रहस्य साठलेले असते यात शंका नाही. जे दिसते त्याच्या पलीकडे क्षितिजाच्या--ज्ञाताच्या--पलीकडे त्यांच्या बुद्धीची विद्युल्लता मोठ्या धैर्याने प्रवेश करिते. तेथे ती अननभूत ध्येयाशी गूढगुंजन करीत नाचते व चकाकते. त्या बुद्धीला ज्या अपूर्व ध्येयाची थोडी अस्पष्ट कल्पना होते त्या कल्पनेची ओळख 'झपूर्झा' या शब्दाने केशवसुतांनी आपणास करून दिली आहे. अद्यापि ज्या जमिनीची मशागत झाली नाही, जेथे अद्यापि कोणी नांगरही फिरवले नाहीत असे केवढे तरी ज्ञानक्षेत्र ओसाड पडले आहे ! त्याचे स्वामित्व फारच थोड्या प्रतिभाशाली कलावंतांच्या वाट्याला आले आहे. अशा उपरिनिर्दिष्ट ठिकाणी वाढणाऱ्या ज्ञानरूपी सुंदर वेलीच्या पुष्पमाला जर तुम्हांस प्राप्त करून घ्यावयाच्या असतील तर 'झपूर्झा' या मंत्राशी समरस व्हा असे ते म्हणतात. प्रकृती व पुरुष, आत्मा व शरीर यांच्या खेळातील स्वारस्य ओळखणे हेच ज्ञान होय. हे ज्ञानसौंदर्य तुम्हास प्राप्त करून घ्यावयाचे असेल तर 'झपूर्झा' हे गीत गा असा निर्वाळा केशवसुत देतात. वरील विचारसरणीतील गूढवाद वस्तुतः आकलनीयच आहे.

## चतकोरीने मला न सुख

केशवसुतांची चित्तवृत्ती ध्येयनिष्ठ होती आणि थोड्या मर्यादित गोष्टींनी त्यांच्या मनाला समाधान होत नसे.

'चतकोरीने मला न सुख
खादाड असे माझी भूक...'
'तेच पतित की जे आखडिती
प्रदेश साकल्याचा ...'

इत्यादी विचारसरणीवरून असे दिसते की, त्यांनी केवळ स्वतःच्याच जीवनाचा विचार केला नव्हता तर आपल्याबरोबरच आपल्या समाजाचा फार काय पण अखिल मानवजातीचा उद्धार कसा होईल, आणि शांतिसुखाचे व समाधानाचे नवे युग कसे निर्माण होईल याचा विचार अहर्निश केला.

## अद्वैत तत्त्वज्ञान

केशवसुतांनी वेदान्तोक्त अद्वैत तत्त्वज्ञानावरील विश्वास अनेक ठिकाणी प्रगट केला आहे. देहांतर्गत जीवात्मा व विश्वांतर्गत परमात्मा यांतील अभेदाची ओळख करून घेणे म्हणजेच ज्ञान होय याची जाणीव त्यांना झाली होती. ऐहिक वास्तव्याला सासर कल्पून पारमार्थिक वस्तीला माहेर मानणे हे एक चिरपरिचित रूपक आहे. ‘ हरपले श्रेय ’ या कवितेतही केशवसुतांनी ‘ उदात्त बुद्धीला संसारात राम नाही, अलौकिक असे जे काही तिला पाहिजे असते ते तिच्या हक्काचे असूनदेखील त्याच्या प्राप्तीकरिता तिला झुरत पडावे लागत नाही काय ? ’ असे म्हणून पुढील उद्‌गार काढले आहेत.

“ लटूपटीच्या घरदारी
लटकिच जाहले संसारी :–
तेव्हाचे सुख ते आता
खऱ्या घरीहि न ये हाता !
चुकचुकल्यापरि
वाटे अंतरि
होउनि बावरि
निज श्रेय मी पाहतसे
न परि हरपले ते गवसे ! ’

स्थितप्रज्ञालाच ऐहिकापलीकडील पारलौकिक शाश्वत सुख लाभू शकते. हे सुख प्राप्त करून घेणे हा मानवाचा जन्मसिद्ध हक्कच आहे, पण हा विकारी देह लटक्या संसारातच बुद्धीला कोंडून ठेवतो. त्यामुळे खरे श्रेय त्याला लाभत नाही. ही केशवसुतांची विचारसरणी वेदान्ताला अनुसरूनच आहे. केशवसुतांनी वेदांतातील पारिभाषिक शब्दांचा हा केवळ दुरुपयोग केला अशी टीका कोणी करतात, परंतु केशवसुतांच्या मनावर पौरस्त्य तत्त्वज्ञानाचा झालेला तो संस्कार होय असे वाटते.

## घडीभर पडलेले ऊन

आपण कोठून आले व कोठे जाणार ? या विचारात मानवी मन गुंतून जाते. मागचे पुढचे पाहण्यातच आपले आयुष्य निघून जाते व खरोखर जे घडीभर ऊन पडलेले असते – आयुष्य लाभलेले असते – त्याचा आपण विचारही करीत नाही. हा मुद्दा केशवसुतांनी ‘ कोणीकडून कोणीकडे ’ या कवितेत आणिला आहे. वर्तमान काळातील प्राप्त जीवनाचे सौंदर्य आपण उपभोगावे; हा वास्तविक विचार कवीने येथे प्रगट केला आहे.

## केशवसुतांचा सुधारणावाद

केशवसुत सुधारणावादी आगरकरांचे शिष्य होते. जेथे जेथे विषमता असेल मग ती राजकीय, सामाजिक वा कोटल्याही क्षेत्रातील असो ती नाहीशी करणे, हे सुधारकाचे ध्येय असून ते प्राप्त होईपर्यंत सुधारक हा नेहमीच अल्पसंतुष्ट असतो. केशवसुतही मानवाने मानवावर चालविलेल्या अन्यायाचा निषेधच करितात. त्यांच्या सहानुभूतीचे क्षेत्र विशाल होते. प्रतिभाशाली कलावंताला जी एक भूतमात्राच्या उन्नतीची तळमळ लागून राहते, तशीच त्यांच्याही मनाला लागून राहिली होती. म्हणूनच आपल्या समाजातील विषमतेचा तीव्र निषेध त्यांनी तुतारी, स्फूर्ति, नवा शिपाई इत्यादी भावगीतांतून केला. त्यांची मनोवृत्ती कशी बंडखोर होती याचा प्रत्यय

‘ ब्राह्मण नाही हिंदुहि नाही न मी एक पंथाचा
तेच पतित की जे आखडिती प्रदेश साकल्याचा ’
‘ देव दानवा नरे निर्मिले हे मत लोका कळवू द्या ’
‘बंडाचा तो झेंडा उभवुनि धामधूम जिकडे तिकडे ।
उडवुनि देउनि जुल्माचे या करू पहा तुकडे तुकडे ’
‘ नियमन मनुजासाठी मानव नसे नियमनासाठी जाणा ’

इत्यादी उद्गारांतून आपणांस येतो.

केशवसुत वास्तवाला सोडून कल्पनेने निर्माण केलेल्या एखाद्या अविश्वसनीय स्वप्नसृष्टीत ( तत्त्वज्ञानात ) निमग्न होत असत; आणि त्यांच्या उद्गारात बेफाम दर्पोक्ती प्रगट होते अशा तऱ्हेचा एक टीकाप्रवाह प्रचलित आहे. प्रतिभावंत विक्षिप्त असतो अशी मनाची समजूत करून घेऊन, केशवसुतांना संभाळून घेण्याची प्रवृत्ती वरील टीकेपेक्षा जरी सौम्य स्वरूपाची असली, तरी केशवसुतांच्या बौद्धिक सामर्थ्यासंबंधी निर्माण झालेला गैरसमज ती दूर करू शकत नाही. केशवसुतांच्या विचारोच्चारानुसार आचार होता काय ? धडाडीचा सुधारणावाद जो त्यांनी काव्यात आणिला त्याला धरूनच त्यांची वागणूक होती काय ? असे प्रश्न कोणी निर्माण करितात. कलावंताने निर्माण केलेली कलाकृती आणि त्याचे आचरण यांचे संबंध शोधून काढणे हा टीकेतील एक विवाद्य प्रश्न आहे. आचाराने उच्चाराला तेज चढते हे सत्य होय; पण सामान्य व्यक्तीला वास्तवाला धरून असामान्य विचार प्रगट करिता येणारच नाहीत असे मात्र नव्हे. सामान्य व्यक्तींचेही दोन प्रकार संभवतात. पहिल्या प्रकारच्या व्यक्ती सदैव अल्पसंतुष्ट राहतात; तर दुसऱ्या प्रकारच्या व्यक्तींना आपल्या अपूर्णतेची सतत जाणीव असते; व ह्यातून आपली सुटका कशी होईल व आपण मनात योजून ठेविलेल्या ध्येयात्मक विचारानुसार आपले जीवन कसे आदर्शभूत होईल असे त्यांना वाटते. केशवसुतांचा सामान्यात प्रवेश करावयाचाच असेल तर तो दुसऱ्या प्रकारच्या व्यक्तींमध्येच करावा लागेल. कित्येक कार्यकर्त्यांच्या

बाबतीत त्यांची कृतीच त्यांच्या ध्येयापेक्षा सतत मोठी होत जाते. केशवसुतांच्या बाबतीत त्यांच्या हातून होणारी कृती ही त्यांच्या हातून निसटून जाणाऱ्या 'हरपल्या श्रेयाचा' एकसारखा पाठपुरावा करीत राहिली. पुष्पाला आपल्या ध्येयाचे प्रतीक समजून केशवसुतांनी म्हटले आहे कीं—

'मच्चित्ताच्या क्षितिजावरती—
नृत्याला जी स्वप्ने करिती.
निदान, त्यांच्यामध्ये मजला भासो तव मूर्ति !'

## पौरस्त्य व पाश्चात्य संस्कृतींचा संगम

केशवसुतांच्या मनावर एकीकडून पौरस्त्य संस्कृतीतील तत्त्वज्ञानाचा व दुसरीकडून सामाजिक परिस्थितीने निर्माण केलेल्या प्रक्षोभाचा असा दुहेरी परिणाम होऊन त्यांची जीवनाकडे पाहण्याची दृष्टी कशी आशावादी बनली याचा आतापर्यंत आपण विचार केला. ते जर केवळ आत्मानात्मविचारातच गढून गेले असते तर प्राचीन कवींच्या परंपरेत त्यांची कविता मोडली असती. याच्या उलट जर ते तटस्थपणे सामाजिक समस्येचा व राजकीय प्रश्नांचा ऊहापोह करीत राहिले असते तर त्यांची कविता केवळ प्रचारकी थाटाची बनली असती. त्यांची सामाजिक विषयांवरील कविता त्यांच्या जीवनविषयक क्रांतिकारक दृष्टिकोनाने उजळून निघाली आहे तर उलट त्यांच्या तात्त्विक विषयावरील कवितेला सामाजिक परिस्थितीचे कोंदण लाभले आहे. केशवसुतांच्या 'तुतारी'त तात्त्विक विचारांची ओळख होते, तर त्यांनी लिहिलेल्या 'झपूर्झा' या कवितेतून वास्तवपरिस्थितीशी झगडणाऱ्या महात्म्याच्या दुर्दम्य मनोवृत्तीची चित्रे पाहावयास मिळतात. 'झपूर्झा' या कवितेत केवळ कवीच्या तन्मयतेचे वर्णन आहे. तिच्यात कोटलेही तात्त्विक संशोधन नाही अशी कोणी टीका करितात, परंतु कवीने कवितेच्या आरंभी जी टीप दिली आहे, तीत म्हटले आहे 'आपल्यात जे काही नाही असे वाटते त्यातून महात्मे जगाच्या कल्याणाच्या चिजः बाहेर काढतात.' यावरून महात्मे (महाकवी) ज्या जीवनविषयक मूल्याकरिता आत्मार्पण करतात त्यांच्याच मनःस्थितीचे वर्णन कवीस अभिप्रेत आहे यात शंका नाही. केशवसुत जसे तत्त्वज्ञ आहेत तसेच ते सुधारकही आहेत. केशवसुतांनी तत्त्वज्ञाच्या व सुधारकाच्या दोन्हीही भूमिका एकाच वेळी स्वीकारल्या होत्या.

## तत्त्वज्ञ कवि टिळक

टिळक आणि बी यांना केशवसुतांच्या प्रभावळीत बसवितात हे कोणास मान्य होवो वा न होवो, एक गोष्ट स्पष्ट आहे ती ही की, टिळक आणि बी दोघेही तत्त्वज्ञ कवी आहेत. टिळकांच्या धर्मांतराने ज्याप्रमाणे त्यांच्या राष्ट्रीय काव्याला काही कमीपणा येत नाही त्याचप्रमाणे टिळकांची तात्त्विक विचारसरणी धर्मांतराने परावलंबी

चनलेली प्रचारकी थाटाची दिसत नाही. खरा कलावंत सांकेतिक धर्माच्या मर्यादा पाळीत नसतो. मानवी भावनेशी– मानवाच्या सुखदु:खांशी समरस होणारी कलावंताची प्रतिभा मानवताधर्माचा पुरस्कार करीत असते. रे. टिळक हे तत्त्वज्ञ कवी म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांचे जीवनविषयक तत्त्वज्ञान 'वनवासी फुला'त चांगले प्रकट झाले आहे.

एक जातिवंत कवी निर्जन अशा रानात गेला, तेथे त्याला एक उमललेले फूल दिसले. निर्व्याज फुलाने प्रेमळ कवीचे मनमोकळेपणाने स्वागत केले. कवीचे हात त्याच्या जवळ गेले पण ते दचकून मागे सरकले. फुलाने त्याला दुरूनच माझ्याशी बोला असे म्हटले. ते पुढे म्हणाले 'माझे जीवित ईश्वरार्पित आहे.' कवीस त्याच्या त्या विरक्तीचे आश्चर्य वाटले. 'यौवनातील आनंद दुसऱ्यासाठी आहे. तो देण्याकरिता माझ्याबरोबर जगात चल' असे कवी फुलाला म्हणाला. फूल त्याला उत्तर देते 'उद्यानात माझा नाश होईल, मुंग्यांचे मला तोंडही पाहणे नको, जगातील प्रेम स्वार्थी असते.' त्याचे हे उत्तर ऐकून कवी त्याची समजूत घालून म्हणाला, "जगापासून दूर राहणे म्हणजे भ्याडपणा आहे, ती स्वार्थाची परमावधी आहे, जग कृतघ्न असले तरी त्यामुळे प्रीतिकरांची प्रीती संपत नाही. सोने, ऊस, चंदन, झाड, हिरा इत्यादी वस्तू स्वत:चे जीवन दुसऱ्याकरिता अर्पण करून जगाला जीवन देतात. तसेच उषा, वारा, भास्कर, सृष्टी, यांच्यातही परोपकाराचीच वृत्ती दिसून येते. 'जनसेवा हीच खरी ईश्वरसेवा" असे सांगून कवी पुढे म्हणतो "एखादी विरहिणी प्रियकरास आणि एखादा भक्त साधूस तुझ्याद्वारे आळवील, किंवा वीरांचा सन्मान करण्यास तुझा उपयोग होईल. दु:खितांचे मनोविनोदनही तू करू शकशील. पण्डितांचा श्रमपरिहार तुझ्यामुळे होतो. असे तुझे अनेक उपयोग होतील." यावर फुलाने उत्तर दिले, "माझ्यामुळेच भ्रमरांत भांडण होते, साप मला वेष्टून उद्यानाची शोभा नष्ट करितात, माझे एक एक दल तोडून कर्मठ ब्राह्मण देवाची पूजा करितो, कोणी मला प्रेतावरही फेकतात, फार काय तुझ्या हातात मी आलो असतो तरी थोड्या वेळाने तू मला निर्माल्य करून फेकूनच दिले असतेस. तुमचा संसारच कपटाचा म्हणून मी ईश्वराची सेवा करितो. तुम्ही सुखाच्या शोधात असता पण ते तुम्हांला सोडून गेलेले असते."

"दैव जसे ठेवील तसेच राहण्यात आनंद आहे" असे कवीचे त्यावर उद्गार आहेत. "दु:खावाचून सुख नाही हेच खरे. जनात किंवा रानात कुठेही राहा, उपाधी या आहेतच. संकटांचा सागर पोहून जाणे हाच खरा पुरुषार्थ आहे. 'अनुराग दु:खकर्दमातच वाढतो, व जनभूमीवर जगतो'" या प्रत्युत्तराने सुमनाचे मन साशंक बनते. त्याचा फायदा घेऊन कवी आपले बोलणे पुढे चालू ठेवतो.

'काम निराळा, प्रेम निराळे...'

'प्रेम नाम जगदीश फुला रे काय आणखी सांगू?

हे कवीचे बोलणे फुलाला ‘ दिव्यस्वरूपा ’चे दर्शनच वाटते. त्यातील सत्य त्यास अवगत होत नाही. ते हलकेच म्हणते ‘ मी अरसिक, मला आपले येथूनच तुझी दिव्य गाणी ऐकत राहू दे. ’

कवीने शेवटी प्रेमाने त्याचा निरोप घेतला. विरक्त फुलाचे चित्त कविमय झाले. कारण प्रेमरस पुष्पलतेच्या शरीरात भिनला. पुन्हा कवी जवळून गेला त्या वेळी फुलाला तो रागावल्यासारखा वाटला, तथापि फुलाने मागेपुढे न पाहता त्याच्या अंतःकरणात प्रवेश केला. ते अजून त्या रसिकाच्या अंतःकरणात फुललेले आहे. रे. टिळक शेवटी लिहितात ‘ ते दोघेही इहपरलोकी सुखाने नांदतील. ’ अशा प्रकारे विरक्त फुलाला टिळकांनी निःस्वार्थी कर्मयोगाचाच उपदेश केला आहे, असे वाटते. ‘ वनवासी फुला ’मध्ये माझ्या मनोविकसनाची हकीकत आली आहे, हे रे. टिळकांचे उद्गार यथार्थ वाटतात.

## पृथ्वीवरील जीवन इष्ट

टिळकांनी आपल्या तात्त्विक गीतांतून निःस्वार्थबुद्धीने आचरण करण्याची आणि विश्वप्रेमाची शिकवण दिली आहे. श्रमसौंदर्याचा त्यांनी ठिकठिकाणी गौरवच केला आहे. स्वर्गातील सौंदर्यापेक्षा या जगातील सौंदर्य इष्ट होय, हाच विचार टिळक पुढील शब्दांत स्पष्ट सांगतात.

“ म्हणे ‘ जाऊ चला स्वर्गी ’, ‘ नको देवी ’ म्हणालो मी
‘ तिथे नाही नवे काही धरीना जे इथे भूमि ’ ”

टिळकांचा प्रयत्नवादावरील–श्रमसौंदर्यावरील–विश्वास कधी ढळला नाही. चराचराला व्यापून उरलेल्या जीवनकलहातही आपली काव्यात्मवृत्ती त्यांनी अबाधित ठेवली. जीवनाच्या प्रचंड कोलाहलात त्यांचे मन गायनोत्सुक राहते. कुऱ्हाडीच्या पात्याला ते रानकेतकीपर्णाची उपमा देतात, त्यावरून अविश्रांत परिश्रमावरील त्यांचा विश्वास प्रगट होतो. ‘ प्रेम हेच जीवनाचे सारसर्वस्व होय ’ ही त्यांची निष्ठा अनेक काव्यांतून प्रगट झाली आहे. कोणत्याही आपत्तीचे स्वागत करून वाईटातून चांगले निर्माण करण्याचा त्यांचा कल ‘ आंधळा झालो तर ’ या काव्यात प्रतिबिंबित झाला आहे. उच्चनीच भेदभाव ते बाळगीत नाहीत. निर्भेळ हास्याची किंमत ते अनमोल मानतात. कालाचे जे मन्द पण अविरत गायन सुरू आहे त्यात मानवानेही आपल्या मंद पण अविरत प्रयत्नाचा सूर मिळवावा व कालाच्या बरोबर विश्वाच्या प्रगतीला हातभार लावावा असा ध्वनी ‘ थोडे थोडे हळू हळू ’ या कवितेतून निघतो. कालतरूवर नव्या वर्षाची जी कलिका उमललेली दिसते तिची माधुरी ती कोमेजली नाही तोपर्यंतच घेण्याबद्दल ते इषारा देतात. कालाहून मनुष्यता उच्च आहे. ‘ सृष्टीचे दिव्यपण म्हणजेच मनुजपण ’ असेही ते म्हणतात.

## ‘अभंगाञ्जली’ आणि ‘ख्रिस्तायन’ यांतील जीवनसंदेश

रे. टिळक यांचे भक्तियुक्त अंतःकरण त्यांनी लिहिलेल्या अभंगाञ्जलीत प्रगट झाले आहे. या अभंगांजलीचे तेरा विभाग आहेत, ते असे :—

‘पश्चात्ताप आणि शरणागति’, ‘ख्रिस्ताचे दर्शन’, ‘प्रार्थना’, ‘योग आणि योगस्पृहा’, ‘श्रद्धा आणि आत्मानुभव’, ‘वैराग्य’, ‘वियोग व उत्कंठा’, ‘निषेध’, ‘उपदेश’, ‘विशेष’, ‘प्रेम आणि सेवा’, ‘आयुष्याची क्षणभंगुरता’, ‘आजार आणि मृत्यु.’

रे. टिळकांचा ख्रिस्तावरील एकनिष्ठ भाव विविध अभंगांतून व ख्रिस्तायनातून प्रगट झाला आहे.

‘मजला व्हायाचे सांगतो मी ख्रिस्त ।
नाहीतर अस्त पावायाचे’– (अभंगाञ्जली.)
‘जयजय गुरो येशू ख्रिस्ता,
प्रेम म्हणजे काय समस्ता ।
त्वाच दाविली दीनपतिता,
तू उद्धरिता जगताचा—(ख्रिस्तायन.)

आपण अमंगल पापी आहोत म्हणूनच आपल्या जीविताचा नाश होत आहे. कामक्रोधादी विकार आपणांस छळीत आहेत. तसेच

‘थोडके होताना मनाच्या विरुद्ध, जिवा होशी क्रुद्ध याचे काय ?’

असा प्रश्न आपल्या मनाला त्यांनी केला आहे.

‘तुझ्या माझ्यामध्ये जेणे अंतराय–निवारी अपाय ते ते बापा’

अशी ते देवास विनवणी करतात.

‘तुझी पाहणे लेकरे । नको झाली जनावरे’

असे त्यांना वाटते.

‘होतो तैसा नाही–व्हावे तैसा नाही
असली ही स्थिति माझी बापा ।
समाधान आणि तळमळ दोन्ही ।
रथास जुंपोनि निघालो मी ।’

असे आपल्या मनस्थितीचे कवी वर्णन करतात. फार काय पण

‘तुझ्या पडोनिया गळा । कंठ करोनि मोकळा ।
रडावेसे मला वाटे । ऊर वारंवार दाटे ।’

असे कळवळ्याचे उद्गार ते काढतात.

‘आपल्या सुंदर हृदयाच्या देवळात देवबाप विराजे’

असा पुढे त्यांना प्रत्यय येतो.

'जरी देव चित्ती नाही तरी नाही तो कोठेही', 'उपाधीची अवघड बेडी पायांत पडल्यामुळे पुढे जाण्यास आपणास अडथळा होतो' असे या भक्तास वाटते. तर्क आणि ज्ञान यांनी प्राण कासावीस होतात, देव श्रद्धेनेच प्राप्त होतो, अशी त्यांची निष्ठा आहे. हिंदुस्थान हे ठिकाण अशा श्रद्धावंत संतांचेच माहेरघर आहे—

'इथेच जहाले मुनी योगीश्वर,—
अहो आजवर प्रभा ज्यांची—'

असे आदराचे उद्गार रे. टिळक यांनी प्रसंगानुसार काढले आहेत. 'ख्रिस्तायना'च्या आरंभी त्यांनी म्हटले आहे—

'अंती हेच गुरुस्थान । धर्मभूमि हिंदुस्थान ।
हेच जगता ख्रिस्तीपण । सार्थ करून दावील ॥'

प्रेम आणि देव एकच होत हा विश्वास कवीच्या ठिकाणी स्थिर झाला आहे.

'जे जे देखे भूत—ते ते जाणिजे भगवंत'

हीच संतांची श्रद्धा रे. टिळकांच्या ..

'पाहा देवाची विभूती । पाहा त्याला सर्वांभूती ।'

या चरणात प्रगट झाली आहे.

अखेरीस भक्ताला देव हजारो संकटांतून निभावून नेतो आणि त्याची मोठी कार्ये साधितो असा आपला अनुभव कवीने प्रगट केला आहे.

या अभंगांजलीच्या अखेरीस रे. टिळक म्हणतात—

'जे जे मनी आले मुखे उच्चारिले—
हातांनी जे केले आज बापा
ते ते अर्पितो मी तुजलागि देवा—
स्वीकार करावा ह्याचा प्रेमे'

ख्रिस्तायन आणि अभंगांजली यांचे वाचन केले म्हणजे रे. टिळक हे संतकवी होते, याची खात्री पटते. संसारात सदाचरणाने वागून ईश्वरावर व सर्व प्राणिमात्रावर सारखेच प्रेम करीत आपले जीवन सार्थकी लावावे, हाच जीवनविषयक संदेश त्यांच्या वरील काव्यातून प्रगट झाला आहे.

## महात्म्यांची ध्येयनिष्ठा – तिचा गौरव

महाराष्ट्रात ब्रह्मविद्येचा सुकाळ करण्याची व जगाला आनंदाचे आवरण घालण्याची प्रतिज्ञा करणाऱ्या ज्ञानेश्वराला बंडवाल्यांतील पहिला बडा बंडखोर म्हणून बी कवींनी संबोधिले आहे. आर्यांची परंपरा ! संस्कृती ! शिष्टरूढी ! धर्म ! इ. शब्दांच्या पाठीमागील चैतन्य जेव्हा लुप्त होऊन खऱ्या अर्थाची जेव्हा शिलावस्था निर्माण होते तेव्हा धर्माचा खरा अर्थ सांगण्याकरिता असले बंडखोर जगाच्या पाठीवर निर्माण होतात, असा बी कवींचा विश्वास आहे. शांतिमय उत्क्रांती

आणि प्रेमाचा पाया यांवर समतेची इमारत रचण्याच्या कल्पनेवर ज्यांनी भर दिला आहे, अशा बंडवाल्यांचे आम्ही वारसदार आहोत– साथीदार आहोत– असा बी कवींनी अभिमान बाळगिला आहे. कोरडया विधींच्या आधारे जेव्हा ढोंगी लोक सामान्य जनतेला चरकात पिळतात, खोट्याला खऱ्याचे मूल्य येते, कुटिलता सर्वत्र पसरते, आचारविचारांत ढोंग निर्माण होते आणि स्वार्थाच्या बंधनात सडके विचार निर्माण होतात; तेव्हा कर्तव्याची आणि श्रेयाची ओळख सर्वांना करून देण्याकरिता असे नवविचाराचे सुधारक निर्माण होतात. ध्येयनिष्ठ सुधारकाच्या अंगाला वार लागला तरी त्याचे यश उजळून निघते, त्याला सहाणेवर घासला तरी त्याच्या विचारांच्या अग्नीचे स्फुलिंग बाहेर पडतात, जरी जाळला तरी त्याच्या अंगचा सुगंध अणुरेणू पुलकित करितो, अशा ध्येयनिष्ठ महात्म्यांचे स्फूर्तिप्रद विचार मानवाला तारक होतील, असे बी कवी आग्रहाने सांगतात. हृदयाच्या कातळाच्या आतील बाजूस जे नवविचारांचे जीवन उसळत आहे, परंतु ज्याला कर्मठ सनातनी आंधळे लोक अडथळा करीत आहेत त्यांना न जुमानता तहानेलेल्या जनतेला तृप्त करण्याची जादू आपणास पाहिजे आहे अशी महत्त्वाकांक्षा कवी बाळगतात. चिवट रूढीच्या कचाटीत मी मी म्हणविणारे धुरीण जे कुचंबत पडले आहेत त्यांना सोडवण्याकरिता रूढीला चिरडून टाकणे हे त्यांचे जीवितध्येय असते. तत्त्वज्ञ कवी जीवनविषयक जे विचार प्रगट करितो ते जितके आत्मतृप्तीसाठी असतात तितकेच ते समाजाच्या कल्याणासाठी उपयोगी पडतात. किंबहुना खऱ्या कलावंताला, समाजोद्धारातच आत्मोद्धार घडून येतो याची जाणीव असते.

> ‘ ते स्वातंत्र्य खरे न फक्त अपुली जे तोडिती बंधने
> ते आहेत गुलाम दूर करिती जे रंजले गांजले ’

या पद्यपंक्तीवरूनही आध्यात्मिक पार्श्वभूमीवरून सद्यःस्थितीतील समाज-जीवनाकडे पाहण्याची बी कवींची वास्तवदृष्टी दिसून येते.

## वेदान्तातील विचारसरणी

बी कवींनी वेदान्ताचा सखोल अभ्यास केला होता. त्यांनी उपनिषदांतील माया आणि ब्रह्म, पुरुष आणि प्रकृती इत्यादी तत्त्वांचा नव्या पद्धतीने उपयोग करून अनेक रूपकात्मक कविता लिहिल्या. त्यांचा ‘ पिंगा ’ अद्वैत रंगात रंगतो. ही ‘ प्रकृती ’ची नाचण मुळातच मोठी, तिचा पसारा अफाट. अहंकार, मन, मनाच्या प्रवृत्ती, शरीर ही सर्व पिंगा खेळतात.

> ‘ वृत्ति चोरट्या अकलंकी माय तशा झाल्या लेकी ’

अशा प्रकारे मायेच्या खेळाचे मोठे चमत्कृतिपूर्ण वर्णन करणे हा बी कवींचा एक आवडता विषय आहे. प्रकृतीला आत्मतत्त्वाचे दर्शन होताच ( अबोलक्या मुग्ध बापाला बोलके करण्याकरिता—– त्या ब्रह्माला आपलेसे करण्याकरिता—– प्रकृती

कोण सलगी करिते ! एखाद्या मूकस्तंभ वेदाभ्यासजड पुरुषाच्या गळ्यात एखादी चंचल भ्रूलीला करणारी सौदामिनी पडावी म्हणजे त्यांच्यामध्ये जे वातावरण निर्माण होईल तेच 'चाफा' या कवितेत दिसून येते. ( प्रकरण ५ पाहा. ) )ती म्हणते—

'दुर्बलपण पहिले गेले शूद्रपणातुन मी सुटले
जीर्ण बंध सारे तुटले मी माझी मज सापडले'

किंवा

'स्वार्थजनित सद्गुणभास जडले होते अंगास
ते गुण झाले मम धर्म प्रेमास्तव आता प्रेम'

## विकसनशील मानवी प्रवृत्ति

मानवी प्रवृत्तीच्या विकसनशील अंगावर बी कवींनी भर दिला आहे. सभोवतालच्या परिस्थितीवर व निसर्गावर ती विजय मिळविते असे त्यांना वाटते. मानवी जीवनाच्या विकासाला निसर्ग मदत करणारा आहे अशा विचाराचा नंदादीप त्यांच्या सर्व कवितांतून तेवत राहतो. 'फुलांची ओंजळ' या कवितेत त्यांनी

'पूर्णापासुनि ढळलेले जग जाते पूर्णाकडे'

असे म्हटले आहे. पूर्वी आपण परिपूर्ण होतो, पूर्वी येथे रामराज्य होते व यापुढे आपणास परिपूर्णतेकडे जावयाचे आहे–रामराज्य आणावयाचे आहे ही कल्पना पूर्वपरंपरेला अनुसरूनच आहे.

वर्तमानकाळात आपण जागे राहिले पाहिजे आणि अंतिम सत्याकडे जाणारी ही जी मोठी लांब जीवनाची बिकट वाट आहे, जिच्यात अनेक चढउतार आहेत ती आक्रमिताना मोठी सावधगिरी बाळगली पाहिजे—असा इशारा ते देतात. कधी कधी पूर्णतेचा खोटाच भास मानवास होतो तर कधी कधी प्रयत्नाच्या कमतरतेमुळे, बुद्धीच्या अविचारामुळे, आपला तोल सुटण्याचा संभव असतो. जेव्हा जीवनमार्गात असे अडथळे निर्माण होतात तेव्हा मार्गातील धोक्याची सूचना देण्याचे कार्य आजवर महात्मे करीत आले आहेत व पुढेही करतील, याची बी कवींना खात्री वाटते. अपूर्णतेकडून जग पूर्णतेकडे निघाले आहे की पूर्णापासून ढळलेले जग पुन्हा पूर्णाकडे जात आहे या प्रश्नाबाबत त्यांच्याशी अनेकांचा मतभेद होऊ शकेल. तरी पण बी कवींच्या तात्त्विक विचारांतील ताजेपणा कोठेही लोपत नाही.

## पूर्णोत्थापनकाल तोच पतनप्रारंभ

'पूर्णोत्थापन काल तोच पतनप्रारंभीहि होतसे.'

असे बी कवी म्हणतात. हा उत्क्रान्तीचा निष्ठुर कायदा लक्षात घेऊन निसर्गाने आपणाला प्राप्त करून दिलेले परिपूर्ण सौंदर्य अक्षय कसे राहील याचा आपण विचार करावा. निसर्ग 'वाढा आणि जगा' असे म्हणत आहे. आपणही आपले जीवन सार्थकी

लावावे. मानसशास्त्रदृष्ट्या मानवी प्रवृत्ती ही विकासोन्मुख आहे. प्रयोगाने ती शहाणी होणारी आहे. ओबडधोबड अशा अवस्थेमधून ती पुढे आली आहे, आणि तिच्या कल्याणाचा दिवस हा मागे होऊन गेलेला नसून तो पुढेच येणारा आहे, ही गोष्ट ध्यानात घ्यावी.

## बी कवींचा आशावाद

जीवनाकडे बी कवींनी आशादायक दृष्टीने पाहिले आहे. प्रेम आणि शांती या साधनांच्या द्वारे जीवनविकास घडवून आणावा ही त्यांची तळमळ आजच्या काळातही उद्बोधक ठरेल. दुर्धर परिस्थितीमधून कोठेही असले तरी जे जीवित क्षणभर का होईना चमकून पुढे येते, त्याचा गौरव कवींनी केला आहे. काटेरी वेलीच्या अग्रावर विकसलेले धवळे कुसुम (जीवन) कवीचे चित्त वेधून घेते. कृष्णनिशेने गगनश्रीला ग्रासित केले असता तशाही अवस्थेत आकाशात चमकणारी तारा (जीवन) कवीला नयनमनोहर वाटते. आकाशातील तारा, पृथ्वीवरील फूल ही एकाकी जीवन कंठतात, तरी पण त्यांना भयाण सृष्टी सुसह्य होते. पृथ्वीवरच्या काट्यांनी व्यापलेल्या फुलाला व आकाशातल्या ढगांनी वेढलेल्या तारेला नजरेसमोर ठेवून नैराश्याने व्यापलेल्या मनाला बी कवी धैर्याचा संदेश देतात. सामान्य लोकांनाही त्यांची ही कविता क्षणभर आशावादी बनवील यात शंका नाही.

## विध्वंसनातील विधायकता

केशवसुत क्रांतिवादी व बी कवी उत्क्रांतिवादी होते असा फरक काही टीकाकार करतात. सामाजिक व वैयक्तिक जीवनविकास घडवून आणण्यासाठी केशवसुतांनी बंडाची भाषा 'स्फूर्ति' या कवितेत काढली आहे—

> 'बंडाचा तो झेंडा उभवुनि धामधूम जिकडे तिकडे
> उडवुनि देऊनि जुल्माचे या करू पहा तुकडे तुकडे'

हे खरे, परंतु याचा अर्थ विध्वंसनाशिवाय विधायकता प्राप्त करून घेता येणार नाही असे केशवसुतांचे म्हणणे असावे असे वाटत नाही. कलावंत हा मूर्तिभंजक असतो की मूर्तिपूजक असतो ह्या प्रश्नाला केशवसुतांनी जे उत्तर दिले आहे ते असे :—

> 'मूर्ति फोडूनिया देऊ जोडूनिया
> परि विकूनिया टाकू न त्या'

मूर्ती फोडून त्या पुन्हा जोडण्याची भाषा ते वापरतात; विध्वंसनाने विधायकता नष्ट करावी असे ते म्हणत नाहीत. मूर्ती फोडावयाची ती तिच्यातील अर्थ —सत्तत्त्व— शोधण्याकरिता, केवळ नाशासाठी नाही. किंबहुना विरोधाकरिता विरोध, नाशाकरिता

नाश, हा त्यांचा प्रकृतिधर्मच नाही. पांढऱ्या किरणांच्या पृथक्करणामुळे सप्तरंगी इंद्रधनुष्य निर्माण होते व शस्त्रक्रियेमुळे मूळचा रोगी निरोगी होतो, तसेच आजच्या समाजव्यवस्थेतील मूर्तिभंजन हे मूर्तिनाशाकरिता नसून मूर्तिसौंदर्याकरिता आहे हा विचार केशवसुतांना अभिप्रेत असावा. केशवसुतांच्या ईश्वरविषयक बंडखोरवृत्तीसंबंधी एक गैरसमज निर्माण झालेला दिसतो. जो कवी 'देव दानवा नरे निर्मिले' असे म्हणतो, तो कवी ईश्वराला अनुसरून

'तुझे नाम मुखी ध्यान तुझे डोळा
वृत्ति या चंचळा स्थिरावल्या'

असे म्हणेल काय? ही विसंगती नाही काय? अशी शंका काहींना येते. ईश्वराची निर्मिती मानवानेच केली आहे यात शंका नाही, पण ईश्वराच्या आधारावर जेव्हा लोक दुबळ्यांना फसवितात, त्यांची दिशाभूल करितात त्या वेळी मानवाला 'भिऊ नका, ईश्वर ही मानवी कल्पना आहे' असे सांगणे म्हणजे ईश्वरी शक्तीचा अनादर करणे असे नाही. निर्गुण निराकार अशा परमेश्वराची प्रतीती भेदात अभेद पाहण्याने येते ह्या तात्त्विक विचाराची ओळख केशवसुतांना होती. ईश्वराच्या सगुण आणि निर्गुण स्वरूपांचा प्रसंगपरत्वे केशवसुत उपयोग करून घेतात तेव्हा त्यांना आस्तिक म्हणावे की नास्तिक म्हणावे हा प्रश्न निरर्थक वाटतो.

बी कवी जीवन-विकासाला मदत करणाऱ्या उत्क्रान्तीवर आणि निसर्गमैत्रीवर भर देतात हे खरे, पण 'कष्टद विकट प्रसंगामध्ये बाका काळ उद्‌भवला' तर आपल्या साधनात इष्ट तो बदल घडवून आणण्याची भाषाही ते बोलतात.

'आहे हा व्यवहाररूप अखिल व्यापार जो जो दिसे
हे आहे जर मान्य, कायम ठसे त्याचे घडावे कसे!
निर्मावे जग अन्यथा, त्यजुनिया वस्तुस्थितीला सदा
राष्ट्रात्मा अति पंगु पोकळ बने; तेणे नसे फायदा' (आशादेवी)

बी कवींच्या सात्त्विक मनोवृत्तीलाही युद्धप्रिय रक्तरंजित पाश्चात्त्य संस्कृतीने कसे त्रस्त केले हे त्यांनी विचारलेल्या खालील प्रश्नांवरून दिसून येते.

'येथे सात्त्विक संपदा न मिळती का रक्तपाताविणे?
आहे मानवजाति आक्रमित का उत्क्रान्ति पंथाप्रती?'

सारांश, केशवसुत व बी या दोन्ही कवींनी साध्याच्या शुचितेवर भर दिला होता.

'तेच पतित की जे आंखडिती प्रदेश साकल्याचा'

हे दोघांचे ब्रीदवाक्य होते.

पण परिस्थित्यनुसार साध्यावर दृष्टी ठेवून साधनामध्ये क्रान्तिकारक बदल करणे, त्यांना अनुचित वाटत नव्हते. दोघेही नव्या युगातील नव्या दमाचे शूर शिपाई शोभतात.

## जीवन फसवे पाणी

' जीवनाकडे तटस्थ दृष्टीने पाहून त्यातील विसंगती शोधून काढण्याची गडकऱ्यांची तात्त्विक वृत्ती आरंभीच्या त्यांच्या काव्यांतून प्रगट झाली आहे. जीवित हा एक आशानिराशेचा खेळ आहे असे त्यांस वाटते.

' पहिला क्षण तो की ज्यावरती स्वप्रकाश आशा धाडी
दुज्या क्षणावरि तीव्र निराशा छाया प्रेममया पाडी '

ईश्वरकल्पसौंदर्याचा परिचय या लोकी नेत्रप्रत्यक्षापुरताच आहे असे नेहमी प्रत्ययास येते असा त्यांचा अनुभव आहे. जीवन म्हणजे एक फसवे पाणी आहे, त्याच्यावर पोहताना दम कोंडून मरणच यावयाचे, याशिवाय जीवितास दुसरा अर्थ नाही असे खेदोद्गार त्यांनी ' जीवितास ' या कवितेत काढले आहेत. कोठलीही एखादी अलौकिक गोष्ट करावयास निघावे तो पहिल्या प्रथम मनाला चुकल्यासारखे वाटते. मनात एखादा चांगला संकल्प निर्माण होतो न होतो तोच त्याला मारक असा विरोधी विचार निर्माण होतो, मनात निर्माण झालेल्या सत्कार्याच्या प्रवृत्तीला नकळत मागे खेचणारी ही, जी एक विकल्पाची ' पाल ' आहे ' ती प्रभो तू मारून टाक ' असे ते म्हणतात. बाह्य जगातल्याप्रमाणे मनातही दिवस-रात्र, आशा-निराशा, कुविचार-सुविचार यांचा खेळ त्यांना संत्रस्त करितो व ते म्हणतात

' नको दिवसरात्र ती न सरती कधी जी पहा,
सरेल कधि तो सरो हृदयिचा लपंडाव हा ! '

आपल्या मनाला शांत करू शकेल असे एखादे तत्त्वज्ञान शोधण्याचा त्यांनी चालविलेला प्रयत्न त्यांच्या कवितेत स्पष्ट दिसतो. पांडुरंगाला उद्देशून त्यांनी जे 'अनामिकाचे अभंग' लिहिले आहेत त्यांतून एकाच वेळी त्यांच्या श्रद्धाशील व चिकित्सक वृत्तीचे दर्शन होऊ शकते. आपण युगाचे दुर्जन व क्षणाचे सज्जन आहोत असा प्रामाणिक कबुलीजबाब ते देतात. आपले पाप फार आहे. म्हणून देव आपल्याकडे येईल असे त्यांना वाटते. जीवनाचे कोडे समजावून घेण्याचा आटोकाट प्रयत्न त्यांनी चालविला आहे, पण ते कोडे आपणांस सुटले नाही असे ते म्हणतात. कवीचे उद्गार काही मर्यादित अर्थानेच लक्षात घ्यावयाचे असतात हे खरे, तरी पण

' यावज्जीवहि काय मी न कळले आताप्रती नीटसे ।
मित्रांतेहि कळे न गूढ न कळे माझे मलाही तसे ॥ '

हे गडकऱ्यांचे उद्गार आपणांस काहीसे यथार्थच वाटतात.

गडकऱ्यांचा जीवितकाल व त्यांनी केलेले कर्तृत्व लक्षात घेता ते कर्मयोगी होते असेच कोणीही म्हणेल. तथापि जीवनात मानवी इच्छेला विरोध करणारी परिस्थितीच कधीकधी बलवत्तर ठरते, व मानव हा नियतीच्या हातातील खेळणे बनतो. या कल्पनेचा दाट पगडा त्यांच्या मनावर बसला असावा. म्हणूनच ते म्हणतात की,

‘ घडू नये ते घडून गेले, पुन्हा घडविणे कुणीतरी
ते कसेतरी की कधीतरी. ’

मानवी प्रयत्न विरुद्ध दैवाची लीला यांच्या झगड्यात घडून येणाऱ्या मानवी इच्छेच्या तारांबळीचे वर्णन करणे हा त्यांचा आवडता विषय आहे.

‘ ही दुबळी मानव कुडी व्यर्थ बापडी,
तियेची उडी, वेत केलेले कोणाला साधले ’

हा ‘ विनायका ’ने दिग्दर्शित केलेला अनुभव त्यांनाही आला असावा. जीवनात दैवाचे स्थान विशेष असावे हा विचार त्यांनी अनेक ठिकाणी प्रगट केला आहे. एखाद्या वृक्षाची पानेफुले बहरास येतात तर एखाद्या वृक्षावर अचानक विजेचा लोळच पडतो. एखाद्या पर्वतातून निर्मळ नद्या वाहतात तर एखादा पर्वत ज्वाला-नदीला जन्म देतो. हा सर्व दुर्दैवाचा खेळ आहे. जगात कोणी कोणाचे नाही. ईश्वरानेच आपला दयेचा अश्रू हताश हृदयावर टाकावा अशी सदिच्छा ते प्रगट करितात.

‘ पाही कोण अशा हताश हृदया जो तो असे आपला
देवा तू तरि टाक अश्रु वरुनी त्यासाठी तो तापला ’

गडकऱ्यांनी लिहिलेल्या जीवनविषयक कवितांतून कोठे कोठे करुणरसाचा अत्युत्कर्ष झाला आहे.

## गडकऱ्यांची ‘ मुरली ’

भागवतात राधाकृष्णाच्या प्रेमलीला या जिवाशिवांच्याच लीला होत असा ध्वनी उमटलेला आहे. राधाकृष्णाच्या रासक्रीडांमधून पारमार्थिक अर्थ शोधण्याची पूर्वकवींची पद्धती सर्वश्रुतच आहे.' ‘ रुक्मिणी–स्वयंवरा ’त तर एकनाथाने जिवा-शिवांच्या मीलनाचा सोहळाच चित्रित केला आहे. श्रीकृष्णाची परम अंतरंगलीला निजस्वरूपा गोपिका जी आल्हादिनी शक्ती, तीच राधिका होय. राधेने कृष्णाला आळविणे म्हणजे प्रीतिभक्तीने मुक्तीला कवटाळणे होय. ‘ मुरली ’ या गीतात गड-कऱ्यांनी भक्त हा जीवात्मा कल्पून त्याची स्थापना प्रीतिभक्तीच्या सीमारेषेवर केली आहे. मनुष्याच्या आयुष्यात असा ‘ एक काळ एकदा तरी येतोच की ज्या वेळी ईश्वराचे अस्तित्व भावपूर्ण हृदयाला पटते आणि तेव्हा मात्र बुद्धिप्रधान मस्तकाचे समाधान करण्यासाठी तळमळणारा जीवात्मा ईश्वरी साक्षात्काराच्या प्रत्युत्तराची याचना करीत असतो. ‘ मुरली ’ या गीतात अशा ईश्वरी उत्तराला मुरलीचा ध्वनी कल्पून त्यासाठी झुरणाऱ्या राधेच्या पाच चढत्या स्थिती ( अवस्था ) दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. ’ समीपता, सरूपता, सलोकता, सायुज्यता या ज्या साधकाने प्राप्त करून घ्यावयाच्या पायऱ्या आहेत त्यांची आठवण ही कविता वाचताना होते. राधेने प्रीतीच्या व भक्तीच्या जोरावर कन्हैयाला आत्मसात कसे केले व तसे करीत

असता तिच्या मनाची स्थिती कशी झाली होती याचे वर्णन 'मुरली' या कवितेत गडकऱ्यांनी केले आहे. या कवितेमध्ये प्राचीन पौराणिक-राधाकृष्णांच्या जीवनातील रहस्यावर त्यांनी जो आध्यात्मिकदृष्ट्या प्रकाश टाकला आहे तो अपूर्व आहे. ईश्वराचे अस्तित्व आत्मानुभवाने घ्यावयाचे असते, ते तर्काने ओळखावयाचे नसते. ईश्वरी साक्षात्कार हा मुळी बुद्धीचा प्रश्न नसून आत्मानुभवाचा आहे अशी श्रद्धा असेल तरच 'मुरलीचा' अर्थ लक्षात येईल. तीत निर्गुण ब्रह्माला–श्रीकृष्णाला–राधेने–सगुणाने आळविले आहे. तीतील भक्तिरसाचा उलगडा या संदर्भात केल्यास अनुचित होणार नाही.

## बुद्धिवाद आणि परमार्थ

खरोखर 'बुद्धिवाद व परमार्थ' हा स्वतंत्र विषय आहे. त्याची प्रस्तुत ठिकाणी चर्चा करणे अयोग्य होईल. ईश्वराचे अस्तित्व भक्ताने गृहित धरल्यावर ईश्वर-प्राप्तीची भक्ताला किती उत्कट ओढ लागते याचे चित्र गडकऱ्यांनी भक्ताच्या अंतः-करणाशी अत्यंत समरस होऊन 'मुरली'त काढले आहे. गडकऱ्यांच्या भावपूर्ण अंतः-करणाची येथे ओळख होते. राधाकृष्णांच्या प्रेमाधारे भक्तिरसाचा पूर्वीचा ओघ आधुनिक मराठीत आणण्याचे वैशिष्ट्यपूर्ण कार्य गडकऱ्यांनी केले. त्यांच्या या 'मुरली'चे अनुकरण करण्याची एक विशिष्ट परंपरा निर्माण झाली, आणि अनेक कवींनी या रूपकाच्या द्वारे प्रेमभावनेची इतकी शाब्दिक चित्रे रंगविली की पुढे पुढे तर कोणाही कवीची मुरलीवर कविता प्रसिद्ध झाली की तो टीकेचा विषय झाला. प्रेमाला अशा प्रकारे आध्यात्मिक विचारांची पार्श्वभूमी देऊन प्राचीन कवींच्या प्रमाणेच आधुनिक कवींनी राधाकृष्णांच्या प्रेमाची बहुविध गीते गाइलेली दिसतात. मुरलीचे नाव पुढे करून स्वतःच्याच शृंगारिक भावना राधाकृष्णांच्या प्रेमविलासाच्या वर्णनात मोकळ्या करण्यात अनेक कवींनी भूषण मानिले. 'मुरली' वरील गीते यामुळे टराविक साच्याची निपजू लागली, आणि त्यामुळे साहजिकच त्यावर प्रतिकूल टीका निर्माण झाली. त्यातल्या त्यात 'मुरली'वरील गोविंद शाहीर आणि टेकाडे यांची काही गीते सरस आणि रमणीय वाटतात.

भक्तीचा आणि प्रेमाचा निकट संबंध वरील गीतांतून आढळून येतो. मराठी कवींच्या मनावरील परंपरागत श्रद्धा त्यात आढळते. याच भक्तीचे पर्यवसान पुढे तात्त्विक चिंतनात होऊ लागले आहे.

## फुटकी तपेली

गडकऱ्यांच्या काही तात्त्विक कवितांतून भक्तिरस आढळतो, पण काही तात्त्विक गीतांतून केशवसुत आणि बी कवींप्रमाणेच त्यांनी अद्वैत तत्त्वज्ञानाचा अवलंब केला आहे. 'फुटक्या तपेली'तील वेदान्ताची भाषा अनाकलनीय नाही. आरंभीच 'आत्म-

ज्ञान मायेतून गळू लागले की, आत्मा अगतिक होतो' असे गडकऱ्यांनी म्हटले आहे. याचा अर्थ अगदी स्पष्ट आहे. मायेमुळे आत्म्याची ओळख होत नाही, आणि मायेच्या उपाधीत सापडल्यामुळे आत्मा गोंधळून जातो हे खरे नाही काय? परमात्मा आणि परब्रह्म यांचा अविच्छिन्न संबंध आहे. आत्मा हा परब्रह्मस्वरूपच होय. पण उपाधिपरत्वे त्याच्या ठिकाणी भिन्न भिन्न अवस्था निर्माण होतात. जीवात्म्यालाही देहाची उपाधी नेहमीच संत्रस्त करीत असते, ह्या गोष्टी वेदान्तातील विचारांना धरूनच आहेत. मायेने भरलेल्या तपेलीतील द्वैतभावाचे पाणी पिऊन आत्मा कधी शांत होईल का? जीवात्म्याला ब्रह्मांडाला व्यापून उरलेल्या अक्षय तत्त्वांचे पाणी पिण्याची आतुरता आहे. हे अक्षयतत्त्व कोणते? ज्या विचाराने मीपणा---आपपर-भाव---नाहीसा होतो तोच विचार अनंत अक्षय आणि जीवात्म्याला परमानंद देणारा असतो. ह्याच विचारामुळे विविधतेतील एकविधतेचा, भेदातील अभेदतेचा, मर्यादेतील अमर्यादेचा, नानात्वातील एकत्वाचा अनुभव जीवात्म्याला येतो. जीवात्म्याला परमात्म्याची ओळख पटेपर्यंत पुन्हा पुन्हा जन्माला यावे लागते हा विचार लक्षात घेऊन ही कविता वाचल्यास ती दुर्बोध वाटणार नाही असे वाटते.

## प्रेमब्रह्म

"'प्रेमाचा प्रलयकाळ' या कवितेच्या आरंभी 'बुद्ध, तुकाराम, ख्रिस्त, नानक' यांच्या मनाचे गाणे असेच असावे," असे कवीने म्हटले आहे. आत्मौपम्य-दृष्टीने सर्व प्राणिमात्राकडे पाहण्याची प्रेमाची दृष्टी हीच मानवाला अखेरीस तारक होईल मानवतेच्या या प्रेमाच्या प्रलयाचे वर्णन करताना

'जन्म इथे मरणा जाई। जन्म इथुनि मरणा नाही।
सर्वांवर फिरता पाणी। कोणास्तव रडणे कोणी।
हृदयसागराच्या लहरी। पोहत आत्मा तयावरी।
प्रेमजलाचा भडिमार। करि जीवा गारीगार॥'

असे कवीने उद्गार काढले आहेत. अनंताला वळसा घालून ब्रह्माच्या कळसावर जाणे, स्वतःच्या हृदयात बुडणे आणि 'अंशात' 'पूर्ण' 'हरपणे' यातील अर्थचमत्कृति वेदान्ताच्या अभ्यासकाला अपरिचित नाही. अशा प्रकारे स्वानंदाच्या–ब्रह्मपणाच्या–पूर्णपणाच्या पैलथडी आपल्या गाण्याची उडी जाईल असे कवीने म्हटले आहे. या कवितेतील तात्त्विक परिभाषा 'फुटक्या तपेली'तील परिभाषेसारखीच आहे. अशा प्रकारच्या गूढगुंजनात्मक कवितेतील अर्थासंबंधी पुढे विचार केला आहेच.

## गडकऱ्यांची ईश्वरविषयक श्रद्धा

गडकऱ्यांच्या जीवनविषयक तत्त्वज्ञानाचे काही विशिष्ट प्रकार संभवतात. संत-

कर्वीप्रमाणे परमेश्वराच्या प्राप्तीकरिता आतुर असणे हा त्यातील एक प्रकार होय. या प्रकारात त्यांनी लिहिलेले अभंग आणि भक्त व परमेश्वर यांच्यातील हृदयसंवाद ज्या कवितेत आला आहे अशी 'मुरली' ही कविता – ही कवने येतात. जीवनातील प्रत्यक्ष निराशेचा त्यांना आलेला कटू अनुभव व जीवनातील सुखदुःखांचा त्यांनी ज्या कवितांत विचार मांडलेला आहे, अशा कवितांचा दुसरा वर्ग संभवतो. जीवनाच्या बऱ्यावाईट अनुभवांतून मार्ग काढीत असता जे अनेक प्रश्न त्यांच्या पुढे उभे राहिले, त्यांत ईश्वरविषयक प्रश्न महत्त्वाचा होता. आशा, प्रेम, नववैभव, कीर्ती, यश इत्यादी मूल्ये जेव्हा चित्ताला वश करण्याला असमर्थ ठरतात तेव्हा वरील सर्व मूल्यांचा संगम ज्याच्या ठिकाणी झाला आहे अशा परमेश्वराच्या ठिकाणी पूर्णविराम घेण्याची सदिच्छा ते प्रगट करितात. सृष्टीतील सर्व वस्तूंच्या पुनर्विकसनाचा विशिष्ट काळ ठरलेला आहे. परंतु जीवन्मृतांना उमलवयास काळ कोणता ? असा प्रश्न 'पुनर्विकसन' कवितेत त्यांनी दयाघनाला विचारला आहे. तसेच दैवाच्या निर्दयतेचे वर्णन करिताना ते म्हणतात

> 'असावे लागते भाग्य हसायाते न काय ते
> रडायातेहि जीवाचे या लोकी भाग्य लागते.'

श्रीहरीच्या विरहाने सुंदर गोपींना रडण्याचा अधिकार प्राप्त होतो व ती गोष्ट शोभूनही दिसते. पण श्रीहरीसाठी कुब्जा रडते ही गोष्ट हास्यास्पद ठरेल. ही कुब्जेने वर्णिलेली दैवाची लीला गडकऱ्यांच्या कवितेचा विषय झाली आहे.

## दुःखितांचे सांत्वन करणे– ईश्वरतेचे कार्य

विषण्ण व निराश हृदयाला 'अवेळी ओरडणाऱ्या कोकिळे'चा शब्द कितीतरी धीर देतो. दुःखितांचे सांत्वन करणे हेच ईश्वरतेचे काम आहे असेच त्यांना वाटते.

> 'परंतु जेथे उदासीनता
> व्याकुल करिते विषण्ण चित्ता,
> तेथे त्याला द्याया समता
> गाणे गावे, हेच अलौकिक ईश्वरतेचे काम.'

## गडकऱ्यांच्या काव्यातील उदासीनता

गडकरी ध्येयवादी होते आणि ध्येयामागे लागून त्यांनी दुःखाचा अनुभव घेतला यात काही आश्चर्य नाही. त्यांच्या काव्यात्मचित्तवृत्तीला एक प्रकारची उदासीनता व हुरहूर यांनी व्यापिले होते. याचा प्रत्यय त्यांच्या जीवनविषयक कविता वाचल्या म्हणजे येतो. आपल्या मनातील ही उदासीनता सृष्टीतील अशाच उदासीन स्थली जाऊन त्यांनी कमी केल्याची उदाहरणे त्यांच्या कवितांत दिसतात. स्मशान हे आपणास 'शांतिस्थान' वाटते असे ते 'स्मशानातील गाण्या'त म्हणतात, व तेथील

भूतांच्या बेसूर गाण्यांत ते आपलाही सूर मिसळून देतात. त्यांनी दिवसा ढवळ्या जगात चाललेल्या ढोंगाचा कठोर उपहास केला आहे. देवाचे नाव घेताच स्मशानातील अदृश्य भुते निदान दूर होतात, पण देवाच्या खोट्या शपथा घेऊन जगातील चालती-बोलती भुते एकमेकांचे गळे कापतात, तेव्हा जेथे असा सजीवतेचा क्रूर चाळा चालू आहे त्यापासून दूर जाण्याची त्यांना इच्छा होते, यात काही नवल नाही.

‘ब्रह्मपदाहुनि आत्मा ढळतो
मरुनि जगाच्या स्मशानि येतो,
मग मानव—छेः भूतचि होतो,
चितेत जळुनी, दिव्य भोगुनी, सुटतो आत्माराम !’

स्मशानातील चितेवर हा देह जाळल्यानंतरच आत्माराम पूर्वपदावर जातो ही कल्पना जुनीच आहे. परंतु तिचा विशिष्ट संदर्भात उपयोग करून गडकऱ्यांनी मानवी ढोंगावर प्रकाश पाडला आहे. टिळकांचे ‘वनवासी फूल’ मानवाच्या कापट्याचा सागर पाहावयास नको म्हणून वनात जाऊन दडले, मानवाच्या आचारात व विचारात सारे ढोंग भरले आहे असे त्याला वाटले. ‘वनवासी फुला’तील कवीने, जगात चांगल्या तशा वाईट गोष्टीही आहेत असे त्याला समजावून दिले. परंतु ‘स्मशानातील गाणे’ ऐकणाऱ्या या कवीचे कोण सांत्वन करणार ? वर म्हटलेच आहे की, गडकऱ्यांनी जीवनातील दुःखामुळे ईश्वरी दयेचा धिक्कार केला नाही. या उदासीनतेच्या काळोखा-तूनच ईश्वरी कृपेचा किरण दिसेल हा आशावाद त्यांनी सोडला नाही, कारण ते म्हणतात —

‘काळोखातुन जग जे दिसते
परब्रह्म ते त्यावर बसते
काळे गाणे ऐकुनि हसते
निजत्यासाठी साक्ष तयाची सुरासुरावर मागू !”

यातील ‘निजत्यासाठी’ हा शब्द महत्त्वाचा आहे. आजची उदासीनता ही नेहमीचीच आहे असे मानणाऱ्यांना, ईश्वर झोपला आहे अशी ज्यांची कल्पना आहे त्यांना, झोपलेल्यांना, पीडितांना ते सांगतात ‘ईश्वर जागा आहे, भिऊ नका–’ आणि एकदा, ‘छाया ही क्षणभंगुर असून प्रकाश हा चिरंतन आहे, जीवन हे तमामध्ये निमग्न होणारे नसून प्रकाशात मिसळणारे आहे, मृत्यू हा जीवनाचा शेवट नाही’ हा ठसा मनावर उमटला म्हणजे जगातील सर्व चिमणे राघू परात्परांचे रोकडे गीत गातील आणि मग त्यांच्या तोंडून जे गीत बाहेर पडेल ते असे —

‘शांत शांत मग जिकडे तिकडे
ब्रह्मजलाचे सडे चहुकडे
जे ते होइल तेव्हा उघडे
परात्पराचे गीत रोकडे गातिल चिमण्या राघू ॥’

## गडकऱ्यांची एकांतप्रियता

मन उदासीन झाले म्हणजे त्याला एकांतस्थली जाण्याची इच्छा होते, ह्यात काही वावगे नाही. सृष्टीत नदीकाठ, डोंगरदऱ्या, दाट अरण्ये अशी अनेक एकांताची ठिकाणे आहेत. अशा स्थली न जाता कवी 'स्मशाना'तच का जातो ? असा प्रश्न विचारणे बरोबर नाही. कवीने विशिष्ट स्थळाची निवड करावी असा आग्रह रसिकांनी धरू नये हे बरे. संध्याकाळी सूर्यास्ताचा देखावा पाहून आपल्या मनाची उदासीनता कोणी घालवली तर त्यात कवीच्या मनाचे आरोग्य दिसून येते आणि मध्यरात्री स्मशानात बसून त्यांनी आपल्या मनातील उदासीनता घालवली तर त्यातून कवीच्या मनाची विकृती दिसून येते असा निष्कर्ष काढणे बरोबर नाही. आपापल्या प्रकृतिधर्माप्रमाणे जो तो शांतिस्थान निवडीत असतो. स्मशानाची निवड करणाऱ्याचा प्रकृतिधर्म विकृत असत नाही. उलट असे म्हणता येईल की, मनाच्या उदासीनतेला स्मशानातील उदासीन वातावरण हेच अधिक सुसंवादी ठरेल ! केशवसुतांनी म्हटले आहे की

'कारण असता विषण्ण वृत्ती । बाह्य भैरवी धरिते प्रीति'

विषण्ण मन बाह्य भयानकतेलाच साथ देते. वस्तुस्थिती अशी दिसते की, मनातील विशिष्ट भावनेला बाहेरचे कोणतेही वातावरण जुळू शकते. मूळ भावनेला बाहेरचे वातावरण कधी विसंवादी तर कधी सुसंवादी ठरते. त्यामुळे अशी भावना उत्कट होण्याला त्यांचा अडथळा होऊ शकत नाही. मूळ वस्तूला छायेची किंवा प्रकाशाची कोणतीही पार्श्वभूमी लाभली तरी तिच्या उठावाला बाध येत नाही म्हणून हे पार्श्वभूमीचे संकेत निर्णायक होऊ शकत नाहीत.

दुसरे असे की, कवी जेव्हा आपल्या विषण्ण भावना प्रगट करितो तेव्हा तो प्रत्यक्ष निसर्गाच्या सान्निध्यात बसलेलाच असतो असे नाही. क्वचित तो निसर्गाच्या विशिष्ट स्थलाच्या सान्निध्यात असेलही, परंतु त्याने तेथे असावे की नसावे हा मुद्दा गौण आहे. भरदुपारी बारा वाजता गडकरी आपल्या वहीत 'मध्यरात्री (अवेळी) ओरडणाऱ्या कोकिळे'स उद्देशून गीत रचित होते, हे सत्य ध्यानी घेतले तर प्रत्यक्ष-स्थलाचा व काव्यनिर्मितीचा संबंध कसा भिन्न आहे हे ध्यानात येते. गडकऱ्यांनी अनेक ठिकाणी भावनाविष्काराला भयानक वातावरणाची जोड दिली म्हणून अनेकांनी त्यांच्या मनोविकृतीवर भर दिलेला दिसतो, पण ते खरे नाही. वर म्हटलेच आहे की, स्मशानातील गाण्यामधून त्यांनी जीवनाविषयीचा खोल विचार केला आहे, व मानवाच्या ढोंगाचा उपहासही केला आहे. पण एकंदर मानवी जीवनाविषयीच्या कडवटपणाने त्यांचे मन व्यापिलेले होते असे म्हणता येणार नाही. जीवन हे तिरस्करणीय, अमंगल, बीभत्स किंवा उपेक्षणीय आहे हा संस्कार वाचकांच्या मनावर ठसविण्याकरिता त्यांनी आपल्या उदासीनतेचा आणि उदासीन वातावरणाचा उपयोग केलेला नाही असे स्पष्ट दिसते.

फुलांचे ताटवे सभोवताली ठेवूनही जीवनाविषयीचा कडवटपणा कोण्या कवीच्या मनात येईल तर उलट स्मशानात बसलेल्या कवीलाही जीवनाविषयीचे उदात्त विचार सुचतील. ग्रे कवीची एलेजी ( शोकगीत ) हे वरील विधानाचे उत्कृष्ट प्रत्यंतर आहे.

## जीवन—एक माळरान

गडकऱ्यांचे समकालीन रेंदाळकर यांच्या नैराश्यमय जीवनाचा त्यांच्या काव्यावर परिणाम होऊन त्यांच्या मुखातून

'अजुन चालतोच वाट माळ हा सरेना
विश्रांतिस्थळ केव्हा यायचे कळेना'

असे करुणोद्गार बाहेर पडले. रेंदाळकरांची ही उदासवृत्ती त्यांच्या अनेक कवितांमधून प्रगट झाली आहे. 'यमुनागीत' या खंडकाव्यातील आत्मनिवेदनपर श्लोकात त्यांनी म्हटले आहे—

'मी जो दारुण दुःखताप साहिला त्याला न जोडी कुठे
दुर्दैवेहि तयात त्यास दिधली नाना विषाची पुटे
झाले दुर्बल त्यामुळे मन......
गेला न क्षण एकही मम कधी उष्णाश्रुवृष्टीविणे
नैराश्यानलि पोळलो टकलिले क्लेशात सारे जिणे'

या जगात अनीतिप्राबल्य, असूया, निंदा ही आहेत आणि त्यामुळे

'कशाला या लोकी हरहर विभो जन्म दिधला'

असे कवीस वाटते. ( कवि आणि जन्म ) 'पतंगा'तील

'ही दुःख प्रचुरा प्रमोदरहिता आहे पतंगा रसा'

'कोकिला'स यातील

नीघ एथुनि हा प्रांत न स्मिताचा—
विषादाचा शोकाश्रुवर्षणाचा !

'मृत्यू'स यातील

'चिंताविव्हल तीव्र दुःखगरलव्यामूढ होऊन मी
मृत्यो शांतिनिकेतना करि तुझें सोत्कंठ मार्गेक्षण'

इत्यादी चरणांतून कवीच्या दुःखपूर्ण मनःस्थितीची पूर्ण कल्पना येते. खडतर जीवनाची ही हृदयद्रावक चित्रे रसिकांची मने व्यथित करितात, आणि जीवन हे एक शोकसंकुल नाटक आहे याचा ठसा मनावर उमटतो. गडकऱ्यांच्या नैराश्यवादाला जशी व्यापक तात्त्विक विचारांची रुपेरी कड लाभली आहे तशी ती रेंदाळकरांच्या निराशाजनक वैयक्तिक विचारसरणीस लाभली नाही याची तीव्र जाणीव होते.

## रहाळकर–सुमंत–यांची उदासीनवृत्ती

रेंदाळकरांप्रमाणेच जीवनात येणाऱ्या कटू अनुभवासंबंधीचे उद्गार या काळातील अनेक कवींनी काढिले आहेत.

नरहर शंकर रहाळकर यांनी 'माझे जीवित थंड शून्य भेसूर' आहे असे म्हणून

'आयुष्यात नरास दुःख सुखही लागे सदा भोगणे
ध्यानी आणुनि तत्त्व ते दिन जसे येतील ते सोसणे'

असा उपदेश केला आहे. सुमंतांच्या 'शोकतरंगिणी'तून त्यांना झालेल्या कन्येच्या चिरविरहाचे दुःखद वर्णन आले आहेच. परंतु इतर त्यांच्या भावगीतांतूनही त्यांना जीवनात जे कटू अनुभव आले त्यांचे पडसाद उमटले आहेत. उदाहरणार्थ––

'जग हे दिवसा मशाल लावी
मी तमिहि न डगमगलो
जग हे कुसुमे हुंगुन टाकी
मी तद्रसात शिरलो...'
–त्यामुळे– मी जगात वेडा ठरलो,
मी या जगात वाजुख झालो.'

असा सुमंतांचा जीवनानुभव आहे.

'त्रस्त मनास' या कवितेत त्यांनी म्हटले आहे.

'तव वसंत सत्वरि सरतो.
तव मोहर गरले भरतो
तव जन्म कष्टमय ठरतो
...वनि शुष्कपणा ये सुमना
अशि असे विधीची घटना'

'दीप' 'प्रकाश पाडीना तिमिरा झाडीना
काही केल्या दीप वरी हा डोके काढीना'

'वर आणि खाली'...
'वर पतन मुक्तता खाली आहे
चिरसुखसंमेलना । जिवलगे'

'शुष्काम्रवृक्ष' इत्यादी कवितांतून ही त्यांची वृत्ती प्रकट झाली आहे.

## दिव्यरसी विरणे जीव!

'दिव्यरसी विरणे जीव, जीवित हे त्याचे नाव'

असे उद्गार बालकवींनी काढले आहेत. बालकवींनाही

'अनंतात गगनी उडुनी लीन बनुनि वातावरणी
होउनिया सौंदर्यधनी गुंजावी मंजुळ गाणी'–

असे वाटत असावे. केशवसुतांप्रमाणेच त्यांनी म्हटले आहे,–

'नाहि खरे जगती मरण काव्यपाखरू बघा खुण'

जेथे अक्षय सौंदर्य आहे तेथे रमणारी व दिव्य तत्त्वावर झेप टाकणारी बालकवींची ही मनोवृत्ती गूढ स्वरूपाची होती यात शंका नाही. बालकवींचा स्वभाव अज्ञाताकडे ओढ घेणारा होता व दृश्य जगापलीकडील अंतिम तत्त्वाची त्यांच्या मनाला ओढ लागून राहिली होती, याचे प्रत्यंतर 'यमाचे दूत', 'शून्य', 'बाळे ती खेळत होती' इत्यादी कवितांवरून स्पष्ट येईल. फार काय पण चैतन्याकडे जाण्यासाठी त्यांचा जीव तळमळत होता.

'जीव ओढतो दूर वर जाण्या चैतन्यासाटी
हाय सुटेना दृढ परि बसली देहाची गाठी'

बालकवींना आपले जीवन अपूर्ण आहे, याची जाणीव होती आणि ज्या सौंदर्यामुळे आपले जीवन परिपूर्ण होईल त्या सौंदर्याचा त्यांना निदिध्यास लागला होता.

'अपूर्ण अपुले ईप्सित झाले पूर्ण दिसे जेथे
मनुजाचे मन सहज पावते आकर्षण तेथे'

असे त्यांनी म्हटले आहे. सभोवतालच्या परिस्थितीपुढे ते अगतिक झाले होते आणि कठोर वास्तवापासून स्वतःची सुटका करून घेण्याकरिता त्यांना एक प्रकारच्या गोड विसराळूपणाची चटक लागली होती, हे म्हणणे बरोबर नाही. बालकवींचे मन विशिष्ट ध्येय निर्माण करून त्याच्या पाठीमागे धावणारे होते. त्यांचा स्वभावच अप्राप्य वस्तूच्या प्राप्तीकरिता धडपडणारा होता आणि त्यांच्या काव्यातील खेदोद्गार हे केवळ वैयक्तिक स्वरूपाच्या तळमळीतून–असमाधानातून–निर्माण झालेले नसून एक प्रकारच्या तात्त्विक चिंतनातून निर्माण झाले आहेत असे दिसून येईल. कलेमध्ये अतृप्त भावनेचे सुस्कारे प्रगट होत नाहीत तर अप्राप्य भावनेची तळमळ प्रगट होते. म्हणूनच बालकवींची मनोवृत्ती विकृत न मानिता ती साहजिक स्वरूपाची होती, असे म्हणणे श्रेयस्कर ठरेल.

निसर्गाच्या सौंदर्यात बालकवींची चित्तवृत्ती जितकी रममाण होत असे तितकीच ती जीवनविषयक विचारसरणीमुळे चिंतनशील बनत असे. 'हृदयाची गुंतागुंत' या कवितेत

'हे धर्म सांगती भिन्न भिन्न पथ पाही।
मम वृत्ति सांगती भिन्न तुझा पथ पाही।'

जगात कुणाला स्वार्थ तर कुणाला परमार्थ पाहिजे असतो, परंतु आपल्याला दोन्हीतही अर्थ दिसत नाही, असे कवी म्हणतात. 'वैराग्य बरे की प्रेम बरे,' याचे निश्चित उत्तर न सापडल्यामुळे त्यांच्या मनाचा झालेला कोंडमारा त्यांनी वरील कवितेत प्रगट केला आहे. त्यांच्या मनात दाट उदासीनता व्यापून राहिली होती याचा प्रत्यय त्यांच्या अनेक कवितांतून मिळतो. यमाचे दूत सभोवताली असलेले पाहून ते जगन्माउलीला आवाहन करितात—

'धाव धाव सदया जगजेठी ।
आशा तुजवाचुनिया परती नुरली काही
जननि गे धाउनी येई !'

ही शून्यता कवीने एका विचाराने दूर केली आहे.

'मी न जगाचा मी न कुणाचा मी नच माझा माझा
परी पसारा सगळा माझा विश्वी मत्प्रेमाचा'

जगाने आपल्यावर प्रेम केले नाही तरी आपण जगावर प्रेम करावे, हाच धडा त्यांना अखेरीस उद्‌बोधक वाटला.

'जावो विश्व जळून जीवित तुझे कालस्थलाबाधित ।
प्रीतीने मज हा धडा शिकविला हो शांति हस्तंगत ॥'

ही मनःशांती अखेरपर्यंत त्यांच्या जीवनात टिकून राहिली का? या प्रश्नाचे उत्तर देणे कठीण आहे. बालकवींचे अस्थिर मन हळू हळू स्थिर होत होते. जीवनाचा अर्थ समजावून घेताना त्यांना जे अनुभव आले ते त्यांनी प्रामाणिकपणे काव्यात प्रगट केले.

'द्वैताला ठावच नाही, प्रेम दिसे ज्या त्या ठायी—
प्रेम बनुन जीवेभावे प्रेमाला शोधित जावे'

'गवताच्या गाण्या'त दिसून येणारे हेच प्रेमाचे 'जीवित–ध्येय' त्यांना समाधान देत होते. रे. टिळकांच्या 'वनवासी फुला'तील

'जीवन आणि प्रेम भिन्न नच एक'

हा विचार बालकवींनाही प्रिय होता यात शंका नाही.

## आधुनिक कवींची शोकगीते ( विलापिका )

आधुनिक कवींनी लिहिलेल्या शोकगीतांतून ( विलापिकांतून ) जीवनाविषयीचे गंभीर विचार प्रगट झाले आहेत. पुत्रमित्रादिकांच्या चिरंतन विरहाला संस्कृत साहित्यकार करुणरसात स्थान देतात. विश्वनाथ पतिपत्नीमधील चिरविरहास करुणविप्रलंभ म्हणतो ( साहित्यदर्पण ३–२०९ ). मराठीतील शोकगीतांवर पौरस्त्य

दा. क्र. 73063

आणि पाश्चात्त्य कवींच्या विलापिकांचा परिणाम झाला आहे. लेंभे यांच्या शोक-गीतावर अजविलापाचा परिणाम झाला आहे. 'गृहिणी सचिव सखी, शिष्या' अशी प्रमुख स्थाने पत्नी पतीच्या जीवनात विभूषित करते. तिच्या अभावी

'तुझ्यामागे कांते सकळ असुखे त्रस्त करिती
सुखाची ती तंत्रे चतुर सचिवाधीन असती'

असे उद्गार लेंभे यांनी काढिले आहेत. गणेश जनार्दन आगाशे यांच्या 'बाष्पांजली'त पुत्रविरहाने पित्याच्या मनाच्या झालेल्या विकल स्थितीचे चित्रण आले आहे. शोकभावनेप्रमाणे कवीचे सात्त्विक विचारही या विलापिकेत प्रगट झाले आहेत. प्रेमाचा उगम ज्या आसक्तीमुळे होतो ती आसक्तीच तोडून टाकावी असे ज्ञानी जन म्हणतात. यावर कवीने म्हटले आहे

'जाता प्रेमास्पद जन जरी अश्रुनी कंठ दाटे
प्रेमाभावाहुनि मजसि हा शोकही श्रेय वाटे
या मर्त्याच्या भुवनि अमुचा जन्म झाला तरीही
सूक्ष्माकारी स्थिर अमरता–बीज आत्म्यात राही.
शोकी त्याची पदिपदि मनी स्पष्ट जाणीव होते
देवापायी दृढ भरवसा तीच चित्तास देते'

असा निष्कर्ष कवीने शेवटी काढला आहे.

त्याच कवींनी (ग. ज. आगाशे) न्या. म. गो. रानडे यांच्यावरील शोक-गीतात न्यायमूर्तींच्या सद्गुणांचे चिंतन करून त्यांना आपली आदराञ्जली वाहिली आहे. विशेषत:

'तुम्ही भरतखंड हे निजकुटुंबसे लेखिले
हिताहित पित्यापरी सतत आमुचे देखि --'

या वचनातून रानडे यांच्या थोर व्यक्तिमत्त्वाचे रसग्रहण केल्यासारखे वाटते.

वरील विलापिकांप्रमाणेच ना. वा. टिळक यांचे 'बापाचे अश्रू', म. ह. मोडक यांनी मित्रकन्येच्या चिरविरहावर लिहिलेले 'सुताविरह' हे शोकगीत, ना. के. बेहरे यांची 'स्मरणी', सुमंतांची 'शोकतरंगिणी' इत्यादी काव्यांतून कवींनी व्यापक भूमिकेवरून मानवी जीवनासंबंधी चिंतनशील मनोवृत्तीतून तात्त्विक विचार प्रगट केले आहेत.

'सुंदर मी होणार' ही गोविंदकवीने मृत्युशय्येवरून लिहिलेली कविता वैशिष्ट्यपूर्ण आहे.

'मृत्यू म्हणजे वसंत माझा मजवरती खुलणार ! हो
सौंदर्याचा ब्रह्मा तो मज सौंदर्ये घडणार ! हो'

अशा प्रकारे मृत्यू म्हणजे केवळ तनुक्रांतीच होय, आत्मा अमरच आहे, या भगवद्गीतेतील विचाराचा ठसा वरील कवितेवर उमटला आहे.

'आपण मरताना हसणार'

आणि 'हासत मरणे हा गोविंदाचा प्रेमपंथ ठरणार'

या उद्गारांवरून मृत्यूचेही हसत स्वागत करण्याची कवीची निर्भय वृत्ती प्रगट होते.

कवीच्या चिंतनशील मनोवृत्तीवर मृत्यूसारख्या आधिदैविक आपत्तींचा परिणाम होऊन जे तात्त्विक भावनोद्गार प्रगट होतात त्यामुळे विलापिका निर्माण होते. विलापिकेत कवी स्वतःचेच विचार व भावना व्यक्त करतो. विलापिकेस केवळ विषय-माहात्म्यामुळे काव्यप्रकारात विशेष प्राधान्य देण्याचा इंग्रजी सांप्रदाय मराठी टीकाकारांनी पाळलाच पाहिजे असे नाही. कारण आपणांकडील तत्त्वज्ञानपर कवितेत तिच्या मोहक वाटणाऱ्या तत्त्वांचा समावेश होतो. ज्यांची चित्तवृत्ती ही बहुतांशी अंतर्मुख स्वरूपाची असते त्यांना मृत्यू व त्यासंबंधीचे विचार हे अस्वस्थ करितात, पण बहिर्मुख मनोवृत्तीच्या कवीस त्यामुळे विशेष धक्का बसणार नाही. विलापिकेत उदात्त भावनांचा परिपोष होतो, आणि त्या भावनेचे पर्यवसान कवीच्या व रसिकांच्या आत्मसमाधानात घडून येते. न्या. रानडे यांच्या मृत्यूवरील आगाशे यांचे शोकगीत, सुमंतांची विरहगीते, मोगरे यांची थोर व्यक्तींच्या निधनावरील काव्ये व टिळकांचे 'बापाचे अश्रू' या काव्यांतील चिंतनशीलता पौरस्त्य तत्त्वज्ञानास अनुसरून असल्यामुळे त्यावर इंग्रजी विलापिकेचा काही परिणाम झाला नाही, आणि असे होणे अपरिहार्यच होय. या ठिकाणी दुसऱ्या एका अपूर्व कवितेचा उल्लेख करणे आवश्यक आहे. निधनापूर्वी साहित्यसम्राट न. चिं. तथा तात्यासाहेब केळकर यांनी आपल्या मनाचे शांतिधैर्य ढळू न देता मृत्यूचे सुस्वागतच केले. अशा कविता जागतिक वाङ्मयात दुर्मिळच.

## रुबाया व द्राक्षकन्या

विलापिकेप्रमाणे दुसऱ्या एका नवीन काव्यप्रकाराचा उल्लेख येथे केला पाहिजे. कै. प्रा. मा. त्र्यं. पटवर्धन यांनी 'उमर खय्यामच्या रुबाया' व 'द्राक्षकन्या' हे ग्रंथ लिहून हा रुबायांचा नवीन काव्यप्रकार मराठीत आणला. बाह्य तंत्राच्या दृष्टीने रुबाईचा काव्यप्रकार मराठी काव्यात विशेष नावीन्य निर्माण करू शकला नाही. ह्या विशिष्ट काव्यप्रकारात जगाच्या उदासीनतेसंबंधीच्या व एकंदर जीविताच्या क्षणभंगुरतेच्या छटा विशेष आढळतात. विलापिकेपेक्षा त्याचे अंतर्गत स्वरूप अर्थात निराळे आहे. सकृद्दर्शनी भोगलोलुप विलासाच्या पार्श्वभूमीवर मानवी जीवनाच्या अशाश्वतेचा उपहासपूर्ण गंभीर विचार त्यात येतो. विलापिका ही

केवळ तात्त्विक चिंतनाने निर्माण होते, आणि तीत वेदरकारपणा नसतो. रुबायांचे वातावरण जितके उन्मादक तितकेच विलापिकेचे प्रशांत असते.

माधव ज्यूलियन, ज. के. उपाध्ये, गो. गो. अधिकारी अ. ज. करंदीकर इत्यादिकांनी 'फेजेरेल्डच्या रुबायांचे' जे अनुवाद केले त्यातून मानवी जीवनाच्या अशाश्वतेचा उपहासगर्भ आविष्कार प्रकट झाला आहे. (अधिक विवेचन प्रकरण ८ पाहा).

## भा. रा. तांबे यांची ईश्वरावरील अचल श्रद्धा

ईश्वराविषयीची अचल निष्ठा तांबे यांनी लिहिलेल्या अनेक भक्तिपर कवनांतून प्रगट झाली आहे.

'प्रभु तुज कवणे परि ध्याऊ',
'निशिदिनि तुज हरि ध्याइन का मी ।'
'चरणि तुझ्या मज देई रे वास हरी । '
'वंदन व्हावे हरि मम जीवित'

इत्यादी भावगीतांतील भक्तिरस कोणाही संतकवींनी गाइलेल्या पदांतील भक्तिरसाची आठवण करून देणारा आहे. उपनिषदांतील आत्मा व परमात्मा ह्यांच्यातील अभेदाचे रहस्यही तांवे यांना चांगलेच ज्ञात असावे. 'नववधू प्रिया मी बावरते' या कवितेतील विचारसरणी लक्षात घेतली असता वरील गोष्टीचा प्रत्यय येतो. देहात वास करणाऱ्या जीवात्म्याला परमात्म्याची नेहमीच ओढ लागून राहते. पण जो देह अति सहवासाने प्रिय झालेला असतो, त्याची आसक्ती जीवाला सोडता सोडवत नाही. एकीकडून परमात्म्याची हाक कानावर येते तरी क्षणभंगुर देहावर प्रेम करण्याचा मोह त्याला होतोच. नववधूला ज्याप्रमाणे सासरी जावे लागते आणि सासर हेच खरे तिचे घर ठरते, त्याचप्रमाणे जीवात्म्याला आज ना उद्या परमात्म्याशी एकरूप व्हावेच लागते, तथापि मुलीला ज्याप्रमाणे माहेरचा ओढा असतो त्याचप्रमाणे ऐहिक जीवनाची गोड आसक्ति मनाला आकृष्ट करते, त्यामुळे परमार्थाकडे जाण्याला त्याचे मन कचरते. जीवाची होणारी ही द्विधा स्थिती तांवे यांनी या गीतात उत्कृष्ट रीतीने चित्रित केली आहे.

जीव हा एक प्रवासीच आहे. या जगात देहरूपाने तो वावरतो, त्याला येथील निवास प्रिय होतो, त्याचे पाय येथे घोटाळतात, पण शेवटी त्याला हे ठिकाण सोडून जाणेच भाग पडते, अशा वेळी पापण्या भिजतात, पोटातून खोल निःश्वास येतात पण शेवटी मन घट्ट करून त्याला विचारावेच लागते—

'ते कोण या ठायि ज्यांची धरू कास !!'

आपण वृद्ध झालो, या जगात आता आपले थोडेच दिवस राहिले, परमे-

श्वराचे घर तर दूर राहिले आहे, तेथे जावयाचे तर मार्गात मोठी चढण आहे, प्रिया आपली तेथे वाट पाहात असेल, तिची म्लान मुद्रा आपल्या डोळ्यांपुढे उभी राहते, ही जीवनाची चढण चढत असता तिच्या आठवणीने प्राण डोळ्यांत येतात, पोटात काहूर उठते. या संकटांतून तारून नेणारा एक ईश्वरच समर्थ आहे. त्याला उद्देशून कवी म्हणतात—

‘ या निर्जनी रानि दे कोण मज साथ
माम् त्राहि जगदीश ! होई न निष्ठूर ! ’

पौरस्त्य तत्त्वज्ञानातील अद्वैत मताचा तांबे यांच्या मनावर फार मोठा परिणाम झाला आहे. ‘ वासांसि जीर्णानि यथा विहाय- नवानि गृह्णाति नरोपराणि ’ या भगवद्‌गीतेतील विचारावर आपल्या विचारांचा नवा पोषाख त्यांनी चढविलेला आहे. ह्या जीवनातील कार्य अपुरे राहिले असता, ते पुरे करण्याकरिता तू मला पुन्हा जन्माला घालतेस असे जगन्माउलीला म्हणताना ते लिहितात—

‘ जुनी जाहली वस्त्रे पाहुनि
बोलाविशि मज पान्हा फुटुनी, ।
उरी लावुनी, नवी लेववुनि,
धाडिशी श्रेष्ठतर कार्यि मला.’

## प्रस्थानगीते

इ. स. १९२१ च्या सुमारास तांबे एका मोठ्या आजारातून वाचले. मृत्यूच्या पाशांतूनच त्यांची सुटका झाली, पण त्यामुळे त्यांचे मन अधिकच भावनाशील बनले. मृत्यूविषयीच्या विचारांनी त्यांची चित्तवृत्ती हेलावत राहिली. या अशा मनःस्थितीत त्यांनी अनेक तात्त्विक स्वरूपाच्या कविता लिहिल्या. प्रस्थान म्हणजे प्रयाण किंवा गमन. मृत्यूच्या भेटीला जावयाची जी मनाची तयारी तांब्यांनी केली, त्यातूनच त्यांची प्रस्थान-गीते निर्माण झाली. ही प्रस्थानगीते म्हणजे तांब्यांच्या जीवनविषयक तत्त्वज्ञानाची प्रात्यक्षिकेच होत. जीवनसौंदर्याचा आस्वाद घेणारे तांबे, मृत्यूच्या भीतीने गलितधैर्य झाले नाहीत. आरंभी त्यांचे मन अस्वस्थ झाले हे खरे. काळाच्या त्या पहिल्या आव्हानशृंगाने त्यांच्या मनाची मोठी धांदल उडवून दिली. तथापि पुढे आपल्या मनाला त्यांनी सावरून धरले ! घाबरू नको, बावरू नको असे त्यांनी स्वतःला बजावले. अशा वेळी जीवनाची गाडी एका मार्गावरून दुसऱ्या मार्गावर जाणार, यात दचकण्याचे काय कारण असा प्रश्न त्यांनी आपल्या मनाला विचारला.

‘ गाडि बदलली यात कशाचे भयसंकट खेद !
का मग मरणा भ्यावे न कळे रटोनिया वेद ! ’

वेदान्तपर पुस्तकांतील तत्त्वज्ञान आपण मिटक्या मारीत वाचतो, त्याचा प्रत्यक्षात प्रत्यय येण्याची वेळ आली म्हणजे मनुष्य गांगरतो, पण तांब्यांच्या ठिकाणी हा भितरा दुटप्पीपणा नव्हता असे दिसते.

जीवनमृत्यूचा हा मार्ग आक्रमावयाचा म्हणजे आपल्या जवळ शिदोरी पाहिजे. लग्नकार्यातच ज्यांची मातब्बरी अशा लाडूकरंज्यांपेक्षा पोहेफुटाणेच प्रवासात अधिक उपयोगाचे. तांब्या व दोरी बरोबर पाहिजेच, पण महत्त्वाची गोष्ट ही की या शिदोरीची टोके हरिनामाच्या गाठीने बांधली पाहिजेत. तांब्यांच्या भक्तिभावाचा येथे चांगलाच उलगडा होतो.

याच संदर्भात ' निरोप घेताना ', ' जन पळभर म्हणतिल हाय हाय ', ' रे अजात अज्ञात सखे जन ', ' उद्याची गति ', ' स्वारी कशी येईल ' कुणास ठाऊक कवणेरूपी ', ' तू कवणे मुलखा जाशी ', ' रतले परपुरुषाशी ', ' कळा लागल्या ज्या जीवा ' इ. कविता वाचल्यास तांब्यांच्या परमार्थ–प्रवण निर्भय वृत्तीची आपणांस साक्ष मिळेल.

जन्मापासून मृत्यूपर्यंतचे आपले जीवन म्हणजे हा एक प्रकारचा यज्ञच आहे. या यज्ञसमाप्तीच्या वेळी ज्यांना आपण कृतकृत्य झालो असे वाटते तेच धन्य होत. वैदिक तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने ते जन्ममृत्यूच्या फेऱ्यातून कायमचेच मुक्त होतात. तांबे आपल्या जीवनयज्ञात पूर्णाहुतीच्या वेळी म्हणतात

' कोणि आणू नका आसवे लोचनी– ;
छे न ही शून्यता – पूर्णता ! सद्‌गती ॥ '

' मरणात खरोखर जग जगते ' या कवितेतील जीवन हा एक प्रकारचा यज्ञच आहे, या कल्पनेवरून आणि ' घन तमी शुक्र बघ राज्य करी ' या कवितेतील जीवनतरूवरील पिकलेले फळ गळून पडले तरी बीज नाहीसे होत नाही, या कल्पने-वरून तांबे यांना देह मृत्यू पावतो, पण आत्मा अमरच असतो हे पौरस्त्य तत्त्वज्ञान अभिप्रेत असावे असे वाटते. तांब्यांच्या विचारांचा पिंड पौरस्त्य संस्कृतीतील संग्राह्य तत्त्वचिंतनाने कसा परिपुष्ट झाला होता, याची प्रतीती त्यांच्या जीवन-विषयक कविता वाचल्या म्हणजे येते.

## त्यांच्या भक्तिपर कवितेतील गूढगुंजन

तांबे ह्यांनी जी भक्तिपर कविता लिहिली तिचे स्वरूप वर उघड केले आहे, तथापि संतकवींच्या काही गूढगुंजनात्मक कवितेप्रमाणेच जिचे बुद्धीला आकलन होऊ शकेल अशी गूढता त्यांच्या भक्तिपर काव्यात काही ठिकाणी दिसून येते. भास्कर-रावांच्या मते ' विश्वांतर्गत रहस्याचे भावनात्मक आकलन झाले की गूढवाद निर्माण होतो. ' जीवनाचे रहस्य उलगडीत असता बुद्धी कधी कधी स्तिमितच होते. मनाच्या

अशा स्तिमितावस्थेचे भावनात्मक शब्दचित्रण काही कवनांतून दिसून येते. 'नववधू प्रिया मी बावरते', 'ते कोण या ठायि' आणि 'घर राहिले दूर' या कवितांतील जितका वाच्यार्थ तितकाच व्यंजितार्थ मनाला आनंद देतो. येथे एक प्रश्न निर्माण होतो तो असा की, ईश्वराचे अस्तित्व हे केवळ कल्पनानिर्मित सत्य आहे काय? जीवनाचे रहस्य समजावून घेताना त्या काल्पनिक सत्याचा आधार घेणे ही गोष्ट बुद्धीचा कमकुवतपणा दाखवीत नाही काय? आणि असे असेल तर अशा संशयात्मक भावनेवर आधारलेल्या गूढवादी कवितेचे जाणत्या मनाला आकर्षण का वाटावे? या प्रश्नांची उत्तरे शोधणे कठीण आहे. पण एक गोष्ट मात्र खरी की, गूढवादी कवी हा जेव्हा अज्ञात अशा तत्त्वाचा आधार घेतो त्या वेळी जीवनाला तात्कालिक सुख देणाऱ्या स्वार्थी कल्पनेपासून त्याच्या मनाची सुटका झालेली असते. त्याची भावना उदात्त (sublime) झालेली असते आणि बुद्धीला तो श्रद्धेची जोड देऊन गृहीत अशा अंतिम सत्यावर—ईश्वरावर—भरवसा ठेवतो. अशा कवीची तत्त्वजिज्ञासा हीच गूढगुंजनाला कारणीभूत होते. असा कवी एकीकडे आपल्या मनाच्या स्तिमित अवस्थेचे आविष्करण करतो, तर दुसरीकडे या जगाला पुरून उरणाऱ्या गूढ अशा तत्त्वाविषयी जिज्ञासा बाळगून मनःप्रवृत्तीच्या एका प्रकारच्या उन्नत अवस्थेमधून आपले भाव प्रगट करीत असतो. रसिकांनी आपल्या मनाची अशी उन्नत अवस्था प्राप्त करून घेतली नाही तर अशा कवींचे गूढगुंजन हे केवळ शून्यसंशोधन ठरण्याचा संभव अधिक असतो. जीवनाचे सार्थक केवळ ऐहिक वस्तूंचा उपभोग घेतल्याने होत नसते. जीवनात काही उदात्त ध्येये मनात बाळगल्यानेच जीवनाचे सार्थक होते, ही दृढ श्रद्धा अशा कवींच्या मनात नेहमी वावरत असते. एका प्रकारे उच्च ध्येयावर विश्वास ठेवण्याची ही रीत मानवामानवामध्ये सौहार्द निर्माण करण्यास कारणीभूत होते. ज्याअर्थी सर्व विश्व हे एकाच दिव्य तत्त्वाचे स्फुरण आहे त्याअर्थी सर्व मानवप्राण्यामध्येही हे एकच तत्त्व दिसून येते. अशी उदात्त विचारसरणी हे कवी प्रगट करितात आणि वरील ज्ञान हे ज्यास होईल तो मोठ्या आनंदाचा उपभोग घेईल असे त्यांना वाटते. बारकाईने विचार केल्यास जीविताकडे पाहण्याचा हा दृष्टिकोन मनाला शांती देणाराच आहे. जीवनाच्या दररोजच्या स्पर्धेची धार वरील व्यापक विचाराने पुष्कळशी कमी होण्याचा संभव असतो. उच्च प्रकारच्या सुखाचा आस्वाद वरील विचारामुळे मनाला घेता येतो. जीवनाकडे पाहण्याची आध्यात्मिक मूल्ये ही कोणास अवास्तव वाटतील हे खरे, पण वरील मूल्यांऐवजी दुसरी अशीच व्यापक विचारांची मूल्ये मानवाने स्वीकारल्याशिवाय त्याला शांतपणाने जीवित कंठणे कठीण होणार नाही काय? म्हणूनच आपल्या कृतीची फळे भोगण्याबाबतीत आपण निवृत्तिवाद स्वीकारावा हा उदात्त वास्तव विचार आपल्या आध्यात्मिक ग्रंथामधून पाहावयास मिळतो. गूढवादी कवी हा अप्रत्यक्षपणे समाजाची नैतिक पातळी उच्च करण्याला मदतच करतो यात शंका नाही.

## माधव ज्यूलियन यांचा ध्येयवादी दृष्टिकोन

माधव ज्यूलियन (माधव त्र्यंबक पटवर्धन) यांचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन जितका वास्तववादी तितकाच ध्येयप्रवण आहे. प्रत्यक्ष जीवनात त्यांना कठोर व खडतर अनुभव आले. तथापि काव्यात्म जीवनातील त्यांचा आशावाद अढळच राहिला. बौद्धिकदृष्ट्या जीवनाचा अर्थ समजावून घेण्याची व भावनात्मकदृष्ट्या तो इतरांना समजावून देण्याची त्यांच्या मनाची वृत्ती त्यांच्या काव्यात प्रगट झाली आहे. एका प्रकारे त्यांच्या जीवनविषयक कवितांची सुरुवात जरी आत्मरंजनाने झाली होती, तरी रसिकरंजनानेच त्यांना सफलता प्राप्त झाली होती, असे वाटते. वैयक्तिक व सामाजिक जीवनातही अन्यायाचा निषेध करणे, स्थिरचरावर सत्ता गाजविणाऱ्या ईश्वरी शक्तीशी बुद्धिवाद करणे आणि मनाच्या उन्नतावस्थेमधून अज्ञात नाथाचे चिंतन करणे इत्यादी विविध प्रकार त्यांच्या जीवनाकडे पाहण्याच्या दृष्टिकोनामध्ये आढळून येतात.

'व्यक्ती' ध्येयामुळे जगते असा माधवरावांचा विश्वास होता, पण दैवाच्या दुर्विलासामुळे हस्तगत होऊ पाहणारे ध्येयही व्यक्तीच्या हातांतून निसटून जाते. अशा वेळच्या मनाच्या अवस्थेचे हृदयस्पर्शी चित्र त्यांनी 'सर्वस्वाचा यज्ञयाग' या कवितेत रेखाटले आहे. 'मेलो तर मेलो पण आपण आपले ध्येय सोडणार नाही', असा त्यांच्या काव्यातील नायकाचा बाणा आहे. ज्योतीशी तन्मय होण्याची इच्छा बाळगणारा हा पतंग, अखेरीस दग्धपक्षच होतो, यात काय नवल! माधवरावांनी ध्येयप्रवण मनोवृत्तीची चित्रे जणू काही आत्मानुभावानेच रंगविली आहेत असे वाटते.

मानवी जीवनाची सूत्रेच ज्याच्या हातांत आहेत त्याचे वास्तवस्वरूप आपणांस निश्चितपणे ठाऊक नसले तरी त्याला आळविण्यात कवीला आनंद होतो. 'अज्ञात नाथास' या कवितेत पतिविरहाने व्याकुळ होणाऱ्या सतीचे चित्र रंगविले आहे. बुद्धीने परमार्थाचा चालविलेला शोध आणि त्यामुळे तिची झालेली करुणाजनक स्थिती याचे वर्णन कवीला वरील रूपकाच्या आधारे सूचित करावयाचे आहे असे वाटते. अखेरीस बुद्धीला आपल्या दुर्बलतेची जाणीव होते, आणि ती आपल्या नाथाला विनवते

'स्वामी धरून हाती वेडीस चालवावे' –

सूफी पंथातही भक्ताला प्रेयसीचे व ईश्वराला प्रियकराचे रूप देऊन त्यांच्यातील विरहाची वर्णने करण्याची कवींची रीत आढळते, याची आठवण वरील गझल करून देते. 'उमर खय्याम' च्या काव्याभ्यासाचा अप्रत्यक्ष परिणाम माधवरावांच्या काही कवितांवर झालेला दिसतो. मानवात काय किंवा गर्दभात काय आत्मतत्त्व हे अभेदानेच राहते. या कल्पनेवरील त्यांची (गूढगुंजनपर) 'आत्मप्रतीति' ही कविता या दृष्टीने लक्षात घेण्याजोगी आहे!

## भावडी भक्ति

आपल्या प्रखर बुद्धिवादामुळे आपली भाबडी भक्ती मावळत चालली आहे असा संशय त्यांनी आरंभीच्या ‘ पोरक्या पोराचा धावा ’ या कवितेत व्यक्त केला आहे. आपण डोळस अंधच आहोत असे त्यांस वाटते. भक्तीशिवाय ज्ञानाला परिपूर्णता नाही असे कवीला वाटत असावे. पण त्यांच्या भोळ्या भावाचे व बौद्धिक संशयाचे निराकरण पुढे ‘ फटकळ अभंगांत ’ झालेले दिसते. कटीवर हात ठेवणाऱ्या पांडुरंगाला त्यांनी ‘ आपल्या भक्तांना समर्थ कर ’ असे बजाविले आहे.

‘ इहलोकी कर भक्तांना समर्थ आज काय अर्थ परलोकी ’

असा सवाल त्यांनी विठ्ठलाला टाकिला आहे.

‘ अफूच्या गुंगीत विस्मृतीचे सुख तयांचे कौतुक मी न करी ’

असे स्पष्ट उद्‌गार त्यांनी काढले आहेत.

आध्यात्मिक जीवनातील त्यांच्या मनाचा झालेला विकास या कवितेत उघड झाला आहे; ‘ मानवतेची सेवा हीच ईश्वरसेवा ’ हे सत्य त्यांना पटले आहे.

‘ जनतेच्या कामी निथळू द्या घर्म हेच धर्मकर्म नीट जाणा ’

या तत्त्वानेच शेवटी त्यांना समाधान मिळाले.

## गूढगुंजनात्मक कवितेचे स्वरूप

केशवसुतांच्या ‘ झपूर्झा ’ आणि ‘हरपले श्रेय’ या कविता, बी कवींच्या ‘पिंगा’, ‘ चाफा ’ इ० कविता, गडकऱ्यांची ‘ फुटकी तपेली ’, बालकवींची ‘ कवीची इच्छा ’, तांबे यांची ‘ नववधू प्रिया मी बावरते ’, माधव ज्यूलियन यांची ‘ अज्ञात नाथास ’, सावरकरांची ‘ जगन्नाथाचा रथोत्सव ’ इ० कवितांमधून गूढगुंजन आले आहे, अशी टीका करण्यात येते. या टीकेत बराचसा अर्थ आहे म्हणून या गूढगुंजनाचे स्वरूप आणि कार्य यांचा अर्थ लक्षात घेणे आवश्यक आहे. उत्कृष्ट काव्याच्या लक्षणात रसध्वनीचा अंतर्भाव होतो आणि रसध्वनी शब्दार्थांच्या सूचकतेवरूनच शोधावयाचा असतो असे संस्कृतातील साहित्यशास्त्रज्ञांचेही मत आहे. तेव्हा काव्यात वाच्यार्थापेक्षा लाक्षणिक अर्थाचे व व्यंजित अर्थाचेच महत्त्व विशेष असते हे कोणीही मान्य करील. कवीला प्रतीत झालेला आत्मानुभव यथार्थपणे शब्दांत अवतीर्ण होणे ही गोष्ट प्राय: अशक्यच. कवीने आंतरिक अनुभवाशी पूर्णपणे प्रामाणिक राहून त्याची ओळख शब्दांच्या आधाराने जशीच्या तशीच करून द्यावयाचे म्हटले तरी या कामी अनेक अडचणी निर्माण होतात. आंतरिक अनुभवांची संदिग्धता, ज्या माध्यमातून तो अनुभव व्यक्त करावयाचा त्या संवेदनात्मक शाब्दिक माध्यमाचे फसवे रूप, प्रत्यक्ष कार्याच्या वेळी मनोवृत्तींवर पडणारे तात्कालिक दडपण इ० अनेक कारणांमुळे कवीला प्रतीत होणारे आत्मानुभवाचे प्राथमिक सौंदर्य जसेच्या तसे

शब्दांत आणता येत नाही. या कारणामुळे कवितेच्या अर्थात गूढता निर्माण होते. विशेषकरून ज्या कवीला नेहमी नव्या नव्या आंतरिक अनुभवातून जाण्याची ओढ लागते तेव्हा वेळोवेळी मनापुढे चमकून जाणाऱ्या दिव्य भासांपैकी थोड्यांनाच तो शब्दांकित करू शकतो. तरल आणि संवेदनाक्षम मनोवृत्तीच्या कवीला तर याचा विशेषच अनुभव येत असावा. (उदा० क्षणात नाहीसे होणारे दिव्य भास–केशवसुत) अशा संवेदनात्मक उत्कट भावनाविष्काराच्या मार्गात होणारा अडथळा गूढवाद निर्माण करतो.

गूढवादाचे दोन प्रकार संभवतात. आंतरिक अनुभवाला यथार्थ स्वरूपाचा न लाभलेला शब्दाविष्कार व त्यामुळे निर्माण होणारा गूढवाद हा नेहमीच साहित्य-चर्चेत येणारा प्रश्न आहे. पण जेव्हा हा आंतरिक अनुभव जीव, जगत व परमेश्वर या प्रश्नांभोवतीच घुटमळत राहतो, आणि त्यामुळे जीवनविषयक प्रश्न सोडविणाऱ्या गंभीर पण भावनाप्रधान मनाच्या कवीची जी एक मानसिक स्तिमित स्थिती निर्माण होते तिचे स्वरूपही गूढच असते. प्रत्यक्षाकडून अप्रत्यक्षाकडे धाव घेणारी त्याची मनोवृत्ती ज्या कल्पनेत वावरत असते, त्या कल्पनेची ओळख करून देण्याचा तो प्रयत्न करतो. पण कधी कधी ती कल्पना त्याला शब्दांत यथार्थतेने आणता येत नाही.

यच्चयावत विश्वाच्या निर्मितीस कारणीभूत होणाऱ्या (आणि यामध्ये मानव-सृष्टी येतेच) एका मोठ्या शक्तीवर अशा गूढवादी कवींचा विश्वास असतो, आणि ही शक्ती सर्व गुणांनी परिपूर्ण, सर्व प्रकारच्या आनंदाने व्यापलेली, प्रेमसुखाने युक्त असलेली आणि तिची ओळख मानवाला झाली असता तेथून परत येण्याची बुद्धी ज्याला सहसा होत नाही परंतु जिची ओळख स्पष्ट शब्दांत करून देता येत नाही अशा प्रकारच्या गृहीत शक्तीला दिव्य म्हणण्याची आणि तीवर अपरंपार विश्वास ठेवण्याची ही वृत्ती गूढवादी कवींत विशेषत्वाने दिसून येते. अगोदर श्रद्धा व मागाहून ज्ञान किंवा ओळख अशा तऱ्हेची त्या मनोवृत्तीची प्रक्रिया चालू असते. मग या अज्ञात शक्तीला, तो ईश्वर म्हणो, श्रेय म्हणो, ज्ञान म्हणो, अगर प्रेम म्हणो. एकदा त्याने त्याच्याशी एकरूप होण्याची इच्छा मनात ठेवली की, मग तो त्या शक्तीला अनुसरून जे भावनात्मकतेचे शाब्दिक गुंजन करीत असतो तो गूढगुंजनाचा दुसरा प्रकार होय, आणि हे दोन्ही प्रकार बुद्धीच्या आकलनाच्या टप्प्यात येतात यात शंका नाही.

गूढवादी कवी हा कोटल्याही सांकेतिक धर्माचा प्रचार करणारा नसतो. सर्व मानवाच्या ठिकाणी जी एक समान चैतन्यशक्ती आहे आणि तिला जी एक विकसनाची तळमळ लागून राहते त्यावर विश्वास ठेवणारा तो असतो, आणि म्हणूनच निरनिराळ्या देशांतील निरनिराळे गूढवादी कवी समान विचारांच्या विशिष्ट सूत्रांनी एकमेकाला बांधले गेले आहेत असे दिसते. तात्त्विक चिंतन हा सर्व काळी

सर्व कवींचा एक आवडता विषय झाला आहे म्हणून श्रेष्ठ काव्यात कवीचे जीवन-विषयक उच्च तत्त्वज्ञान प्रगट होते, यात काही संशय नाही.

## पत्री

'पत्री' या काव्यसंग्रहातून पां. स. साने (सानेगुरुजी) यांची ईश्वर-विषयक श्रद्धा प्रगट झाली आहे. 'पत्रीतील' आरंभीच्या ८५ कवितांतून कवींनी आपणाकडे साधकाची भूमिका घेऊन आपल्या सुखदु:खांची, आशानिराशेची व कल्पनाध्येयाची करुण कहाणी प्रभुचरणी निवेदन केली आहे. उदात्त आणि प्रसन्न विचार व निर्मळ आणि हळुवार भावना ह्यांमुळे बहुतेक प्रार्थनागीते आनंददायक झाली आहेत. वाणी आणि मन ह्यांना पावित्र्य मिळावे व आत्मशुद्धी व्हावी हा हेतू वरील गीतांच्या मुळाशी दिसून येतो. 'वसंतवारा', 'हृदयाचे बोल' व 'देवाजवळ' या कवितांना आत्मनिवेदनात्मक स्तोत्रांचे स्वरूप आले आहे. 'नयनी मुळि नीरच नाही', 'सोन्याचा दिवस', 'देवा झुरतो तव हा दास', 'काही कळेना काही वळेना', 'भाग्याचे अश्रु' इ० भावगीतांतून कवीच्या भक्तिभावाची आर्तता प्रगट झाली आहे. 'सेवा', 'त्याग' आणि 'प्रेम' ह्याच जीवनविषयक मूल्यांची पेरणी त्यांनी आपल्या 'पत्री'त केली आहे.

## गिरीशांची समधातवृत्ती

गिरीशांची समधातवृत्ती त्यांच्या जीवनविषयक कवितांतून प्रगट झाली आहे. त्यांच्याच शब्दांत आणखी सांगावयाचे तर त्यांचा मन:पिंड जात्याच कणखर व आशावादी आहे. 'यशस्वी कोण?' या कवितेत कवी संसाराला समुद्राची उपमा देतात. शंख आणि शिंपल्या लाटांचा मार खाऊन हतबल होतात पण लाटांना तोंड देऊन आपल्या गुणांनी मोती यशस्वी होतात. त्यांना संगीताविषयी प्रेम वाटते, एवढेच नव्हे तर स्थिरचरात गुप्तपणे वास करणाऱ्या ईश्वरी संगीतावर त्यांचे अभिजात प्रेम आहे...

'शब्द शब्द, सूर सूर । विरुनि जिथे शांति मधुर
नांदते अथांग दूर । माधुरी तियेतली मिळो नितांत पाने.'

आपणास लाभलेली सत्प्रवृत्ती ही एक ईश्वरी कृपा आहे, अशी त्यांची श्रद्धा आहे. आपण जगात एकटेच असतो, पण ही गूढ शक्ती आपल्या पाठीमागे असते असे त्यांना वाटते. जीवनाला ते क्षेत्राची उपमा देतात आणि आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर काढणीच्या वेळी त्यातून भरपूर पीक यावे अशी सदिच्छा ते बाळगतात. जीवनात प्राप्त झालेल्या स्थैर्यामुळे,

'गुलाब गुलाब आता भोवताली' (दीपिका)

असे ते समाधानाचे उद्गार काढतात.

'माळावरील वठलेला शिरीषहि पुन्हा पल्लवित होतो।'

या विचाराच्या आधारे त्यांनी निराशेने व्यापिलेल्या जीवनालाही पुढे आशादायक परिस्थिती प्राप्त होईल असा धीर दिला आहे. कवीने आपल्या अंतर्जीवनाचे सार खालील शब्दांत प्रकट केले आहे.

"संसार वनातील काट्यांबरोबर फुलणारी त्यात फुले आहेत. काढणीच्या वेळी हातास लागणारे भरदार पीक आहे. सहकार वृक्षाची अनपेक्षितपणे कडाडलेली फांदी आहे. 'पाठीराखा' 'ध्यान याचना' यांच्या भक्तीतील मधुर भाव व शेवटी अनंतस्वरूपी असणाऱ्या जीवनदात्याचे आभारही आहेत." (कांचनमेघ-प्रस्तावना).

## यशवंतांची काव्यात्मवृत्ती

यशवंतांनी लिहिलेल्या जीवनविषयक कवितांवर जी एक उदासीनतेची दाट छाया पडलेली दिसते, त्याच्या मुळाशी त्यांच्या वैयक्तिक जीवनाचा संबंध असेलच असे मात्र नाही. श्रेष्ठ कलावंतांच्या अंतर्मुख प्रवृत्तीवर बाहेरच्या प्रतिकूल परिस्थितीचा जो एक दुःखद परिणाम होतो त्याचाच तो कलात्मक आविष्कार होय.

'जन्मजात तू व्योमविहारी
जखडुनि पडसी परि गिरिकुहरी'
'मी टिकाव कुठवर धरू'

अशा प्रकारचे एकीकडे दिसून येणारे निराशेचे उद्गार, तर दुसरीकडे

'त्यागांती हृदयास शांति मिळते'

असा मनाला केलेला बोध यांच्या संघर्षात त्यांचे मन हेलकावे खात आहे असे चित्र त्यांच्या आरंभीच्या कवितांतून दिसून येते.

## ध्येयाचा चुराडा

आपण मनाशी बाळगून ठेवलेल्या ध्येयाची प्रत्यक्षात उडालेली धूळधाण आणि त्यामुळे मनाची होणारी चलबिचल त्यांची चित्रे 'करू नको येथे प्रवेशास बा!', 'जगा तुझी रीत सारी सदा उफराटी' इत्यादी भावगीतांतून आढळतात. आपल्या कलेचा कोणी उपमर्द केल्यास त्याबद्दल मनात सात्त्विक संताप निर्माण होऊन—

'करू नको फुंफाट पन्नगा। करू नको फुंफाट'

असे अरसिकास उद्देशून उद्गार बाहेर पडणे, साहजिक आहे. एवढ्यावरून जगाकडे पाहण्याच्या कवीच्या दृष्टीत कडवटपणा आहे असे म्हणणे बरोबर होणार नाही. आरंभीची कवीची ही जगाकडून स्वतःवर होणाऱ्या अन्यायाचा तीव्र प्रतिकार

करण्याची वृत्ती हळूहळू निवळत गेली आहे, यात शंका नाही. कवीला आपल्या गुणाबद्दल पूर्ण आत्मविश्वास वाटतो; म्हणूनच 'यशःश्री पायींची दासी' किंवा 'शरणागति परिस्थितीपुढे म्हणजे राहणे जिवंत मढे' अशी मनाची झुंजारवृत्तीही त्यांच्या काव्यात प्रगट झाली. अलीकडील भावगीतांतून कवीच्या समधातवृत्तीची चित्रे अधिक प्रमाणात दिसून येतात.

आपले जीवन इतरांकरिता आहे व सरितेच्या प्रवाहाप्रमाणे आपले ध्येय निर्हेतुकपणे इतरांना आनंद देण्याकरिताच आहे हा विचार त्यांच्या काही कवितांतील स्थायीभाव झाला आहे. उदा.

'फुलतो आम्ही फुलावे म्हणून
जगती हेतु असे की
यावे या जगती कुणाच्या कामी—
आम्हा फुलांना सुख ना दुःख
ना पाप ना पुण्य
आम्ही फुले फुलण्यात केवळ होतो धन्य'

'वेस उभा मी' या कवितेत—

'जन येती जाती हे जे येथ हमेश
ते कोण समजता ? अहो ईश्वरी अंश'

असे उद्गार त्यांनी काढले आहेत. रस्त्यातून चालणाऱ्या पांथाच्या डोक्यावर छत्री धरून त्याचे ऊनपावसापासून रक्षण करण्याचे भाग्य आपणांस लाभले ही आपली पूर्वपुण्याई असे त्यांना वाटते. निष्कामबुद्धीने जीवनाकडे पाहण्याचा हा दृष्टिकोन त्यांच्या अलीकडील कवितांत प्रतिबिंबित झाला आहे.

गतभावी कालातील आपली स्वरूपे आपणांस कितीही मनोरम वाटली आणि त्याच्या तुलनेने आजचे आपले सामाजिक जीवन कितीही हतबल आणि अपेशी असले तरी त्यातूनच पुढे लखलखीत तळपणारे जीवन निर्माण होणारे आहे.

'आज यातुनी जो होईल ऐसा प्रगट
त्यापुढे तुम्हा लागेल व्हावया विनत'

हे कवीने आपल्या मनाचे केलेले विश्लेषण मनोहर नाही असे कोण म्हणेल ? वर्तमानातील आजच्या जीवनात पराक्रम करून दाखविण्याची ही आशादायक वृत्ती हेच यशवंतांच्या जीवनविषयक विचारांचे वैशिष्ट्य होय यात शंका नाही.

## आशागीत ( – ओढणी-प्रवासी-मानवता ) जीवनविषयक दृष्टिकोन

आशागीतातील जीवनविषयक विचारांची चर्चा मीच करणे योग्य होणार नाही, तथापि वरील कवितांच्या निर्मितीच्या वेळच्या भूमिकेसंबंधी उलगडा करणे आवश्यक वाटते. पहिली एक ठळक गोष्ट लिहावीशी वाटते ती ही की, माझ्या

बहुसंख्य कवितांची निर्मिती सभोवतालच्या परिस्थितीशी आपण जुळते कसे घ्यावे किंवा त्या परिस्थितीला तोंड कसे द्यावे या विचारामुळेच घडून आलेली आहे. आपल्या अस्वस्थ मनाची समजूत घालण्याला बाहेरचा काही आधार नसला म्हणजे आपणच आपल्या मनाची समजूत घालतो आणि स्वतःला आश्वासन देऊन जीवितातून पुढे जाण्याचे धैर्य बाळगतो. 'चढउतार', 'हे दीप लागले चोहिकडे', 'भयचकित हरिण' इत्यादी आरंभीच्या कविता लिहिल्या गेल्या, त्या वेळच्या माझ्या मनःस्थितीचा असाच उलगडा करावासा वाटतो. मुख्यतः वरील हेतू बाळगूनच कवितालेखन करण्याच्या या प्रवृत्तीमुळे बहुतेक कविता जीवनविषयक विचारांनीच व्यापलेल्या आहेत. 'ओढणी'तील कित्येक अभंग अशाच मनःस्थितीमधून लिहिले गेले आणि त्यातील 'देवाची निर्मिति' हा कुणाला कल्पनेचा खेळही वाटेल, तथापि त्याच्या पाठीमागे विशिष्ट व्यक्ती आणि विशिष्ट परिस्थिती यांच्यामधील एक प्रकारचा संघर्षच उभा आहे, असा उल्लेख येथे केल्यास तो अप्रस्तुत होणार नाही, असे वाटते. एकीकडे मनाला मोहून टाकणारे जीवनाचे सौंदर्य, व दुसरीकडे व्यापक अशा उच्च तत्त्वाची मनाला लागणारी ओढ, यांच्या परस्परविरोधी आकर्षणात मनाच्या होणाऱ्या स्तिमित अवस्थांचे भावनात्मक शब्दचित्रण त्यातून प्रगट झालेले दिसते.

आपल्या स्वतःच्या जीवनविषयक समजुती वेळोवेळी बदलत जातात, तथापि ज्या समजुतींमुळे एकेकाळी आपल्याला समाधान वाटत गेले, त्यांचे महत्त्व कमी होत नाही. ऐन तारुण्यात ज्या ध्येयवादाने आपण कार्यप्रवृत्त होतो, तो ध्येयवाद पुढे आपणास विफलही वाटतो आणि त्याच्यात बदल करावासा वाटतो. तथापि एके काळी आपण असमाधानी होतो आणि अजूनही आपण( ध्येयाच्या अप्राप्तीमुळे !) असमाधानी आहोत, या विचारानेही समाधान वाटतेच. 'प्रवासी' या खंडकाव्यात अशाच एका ध्येयवादी व्यक्तीचे मी वर्णन केले आहे. मनुष्याच्या चमत्कारिक स्वभावाला वर्तमानकाळापेक्षा भविष्यकाळच फार रम्य वाटतो ! दररोजची कर्तव्यकर्मे मनःपूर्वक केल्यास आपण सुखी होऊ, ही कल्पना त्याला नसते ! अशा विचारसरणीचा एक प्रवासी वरील कवितेत आपले अनुभव निवेदन करीत आहे. आपण जरी पुष्कळ धडपड केली, तरी आपणास आपले ध्येय गाठता आले नाही, असे त्यास वाटते; आणि आपले जीवन हे अजून अस्थिरच आहे असा त्यास अनुभव येतो; परंतु या अस्थिरतेतच खरे सौंदर्य आहे, याची प्रचीती त्याला पुढे येते. आरंभी चिंतातुर असलेला प्रवासी अखेरीस कसा आशावादी होतो आणि समाधान पावतो हे त्या काव्यात मी दाखविले आहे. ज्या समजुतीमुळे मनुष्याला खोटेच समाधान मिळू शकते, त्या समजुतींचे मला येथे समर्थन करावयाचे नाही. अज्ञानाने प्राप्त होणाऱ्या समाधानापेक्षा अस्थैर्य बरे, ही 'प्रवासी' या काव्यातील विचारसरणी अजूनही मला श्रेयस्करच वाटते. मात्र जीवनातील अमंगल गोष्टीं-

विषयीचा रोष व्यक्त करीत असताही मंगलप्रद गोष्टींसंबंधीचा आदर व्यक्त न करणे म्हणजेही एकांगीपणा होईल यात शंका नाही.

'मानवता' हे खंडकाव्य इ. स. १९३९ मध्ये (दुसरे महायुद्ध सुरू होण्यापूर्वीच) लिहून झाले होते. एकीकडे मानवाच्या हातून घडलेले रक्तपात, विश्वासघात आणि कुटिल डावपेच आणि दुसरीकडे त्याने दाखविलेला अतुल स्वार्थ-त्याग, परोपकारबुद्धी इत्यादी विलोभनीय गुणविशेष, यांचे एकमेकांवर होणारे आघात--प्रत्याघात आजच्या कालातही दिसून येतात. अनेक शास्त्रे मानवाच्या प्रगतीला हातभार लावीत आली आहेत. त्यांच्याविषयीचा आशावादच 'मानवतेत' प्रगट केला आहे. मात्र उच्चनीच हे भेदभाव निर्माण होण्याचे कारण मानवाची कोती विचारसरणीच होय आणि तिच्यामुळेच एरव्ही विकासाकडे निघालेली मानवाची सत्प्रवृत्ती आजकाल अगतिक झाल्यासारखी दिसते. समतेच्या प्राप्तीनेच मानवाला समाधान मिळेल, असे या काव्याच्या अखेरीस सूचित केले आहे.

### अनिलांचा 'मानवतावाद'

मानवी प्रवृत्ती निराशेने कितीही खचली तरी ती आपला विकासाचा मार्ग सोडीत नाही आणि ज्या व्यक्तींना आपण क्षुद्र समजतो त्यांच्या ठिकाणी एक प्रकारची सुप्त शक्ती असते, हा प्रमुख विचार अनिलांच्या जीवनविषयक कवितांतून प्रगट झाला आहे. झोपडयांतून गलिच्छ वस्तीत राहणारी --

'हजारो लाख आहेत माणसे
अशी भुकेली अशी गांजली
त्यांचाच आहे जनसमुदाय--
प्रचंड पर्वत-पृथ्वीच्या अथांग उदरातुनी
उकळत आहे आत तप्तरस !
वरती सुंदर फुललेल्यांनो
ध्यानात ठेवा ! आहे खालती सुप्त ज्वालामुखी !'

दीनदुबळ्यांविषयी वाटणाऱ्या याच जिवंत सहानुभूतीतून त्यांची 'मानवता' निर्माण झाली आहे.

'वळ पाठीवर आमुच्या चाबुक उडो कोठेही
अवघे अभाग्यांचे अश्रु उभे आमच्या डोळ्यांत'

असे ते म्हणतात.

आजच्या जगात अनेकांच्या भावनांचा कोंडमारा होत आहे. बाह्य परिस्थिती निराशाजनक आहे. पहिल्या पावसाची वाट पाहणाऱ्या परंतु आतल्या आत दुःखाचे कढ सहन करणाऱ्या व्याकुळ पृथ्वीसारखी अनेकांची जीवने आतल्या आत

होरपळून निघत आहेत. अशा वेळी पृथ्वीला पावसाच्या आगमनाची ग्वाही देणारा 'पेर्ते व्हा' पक्षी हा योग्य संधीची वाट पाहात असतो आणि आकाशात पहिल्यानेच गंभीर मेघगर्जना झाली की त्याच्या तोंडातून शब्द निघतात.

'भिऊ भिऊ भिऊ नका भऊ भिऊ. उठा रे सत्वर सत्वर नव बीजे पेरा
नव्या आशा धरा... पेर्ते पेर्ते व्हा.'

अनिलांनी 'पेर्ते व्हा' च्या निमित्ताने हा जो धीराचा संदेश भीतिग्रस्त झालेल्या व्याकूळ जगास दिला आहे, यात त्यांची जीवनाकडे पाहण्याची आशादायक दृष्टी प्रगट झाली आहे यात शंका नाही. अनिलांच्या जीवनविषयक तत्त्वज्ञानावर सामाजिक परिस्थितीचा घनदाट परिणाम झाला आहे. केशवसुतांप्रमाणेच अनिलांनीही अनेक कवितांतून समाजसुधारकाची व तत्त्वज्ञान्याची भूमिका एकाच वेळी प्रगट केली आहे. 'बंड', 'धडकी', 'शांततेचे पुनरागमन' या कविता या संदर्भात लक्षात येतात. अनिलांना नेहमीच्या रुळलेल्या वाटेपेक्षा आडवळणाची वाट अधिक मोहक वाटते. जीवनाचे स्वारस्य लुटताना त्याच्या नव्या नव्या अज्ञात बाजू लक्षात घेऊन त्यांचे दर्शन इतरांना घडवून देण्यात अनिलांना आनंद वाटतो, यात शंका नाही. 'भग्नमूर्ति'त मानवाच्या संस्कृति-ऱ्हासाचे, त्यांनी हृदयद्रावक चित्रण केले आहे. व्यापक दृष्टिकोनातून त्यांनी चिनी निर्वासित मुलाची कहाणी सांगितली आहे. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील ढोंगाविरुद्ध बंड पुकारणे आणि मानवतेवरील प्रेमाचा पुरस्कार करणे हे काही विचारांचे नवे मार्ग–वाटा–त्यांनी आपल्या कवितांतून दिग्दर्शित केल्या आहेत.

## 'जळण्यातही सुख आहे'

जीवनाकडे पाहण्याचा बोरकरांचा वरील दृष्टिकोन 'मरणात खरोखर जग जगते' या विचाराशी जुळणारा आहे. जे नरवर इतरांकरिता आत्मबलिदान करितात आणि मानवतेचे सुंदर मंदिर घडवितात त्यांना कवीने 'तेथे कर माझे जुळती' या कवितेत आपली आदरांजली वाहिली आहे. ज्यांचे मीपण पक्व फळापरि गळून गेले आहे, आणि ज्यांचे मन जळापरि निर्मळ झाले आहे, त्यांनाच जीवनाचा खरा अर्थ कळला आहे, असे सात्त्विक विचार त्यांनी प्रगट केले आहेत. पौरस्त्य संस्कृतीसंबंधीचा योग्य अभिमान त्यांच्या जीवनविषयक कवितांतून दिसून येतो.

## वस्तुगत सौंदर्य आणि आत्मगत सौंदर्य

ध्येयांगणात उडण्याची इच्छा बाळगावी, परंतु विपरीत परिस्थितीने—जडतेने आपणांस मागे ओढावे (दगाआडील चांदणी) आणि मग हा देहच नको अशी मनाची विमनस्क स्थिती व्हावी, जीवनाच्या अशा अंधाऱ्या रात्रीत नवख्या

पैलतीराची आणि गूढ शक्तीची ओढ लागावी. अशा प्रकारच्या कटू जीवनानुभवाची चित्रे जशी वा. ना. देशपांडे यांच्या भावगीतांत आढळतात त्याचप्रमाणे— मानवतेच्या उज्ज्वल भविष्याची स्वप्नेही त्यांना दिसतात आणि मग विश्वशांतीचा उगम जेथून होतो अशा विश्वधर्माच्या मंदिरातील 'श्रमलक्ष्मी'चे ते पूजन करतात. देहाकडे—ऐहिक जीवनाकडे—दुर्लक्ष करून कोणी केवळ आत्मज्ञानाची प्रौढी मिरवू लागला तर कवीने त्याला प्रश्न केला आहे 'ही मातीची खोळ उभी आहे तोवरच आत ज्योत आहे. ही खोळ गळून, पडताक्षणीच आतली ज्योत विझेल. या ज्योतीसाठी तरी माती टिकवायला नको का?' कवीने अंतिम सौंदर्य—जे वस्तुगत सौंदर्याच्या पलीकडे नसते—त्याला उद्देशून म्हटले आहे

'छंद तुझा घेई मन
वस्तुगत सौंदर्यात तुझे घडू दे दर्शन'

परमात्म्याचे जे सच्चिदानंदस्वरूप स्थिरचरात भरले आहे— त्याची तर ओढ कवीच्या मनाला लागून राहिली नसावी ना? पण एक गोष्ट महत्त्वाची आहे. वा. ना. देशपांडे यांच्या जीवनाकडे पाहण्याच्या तात्त्विक दृष्टीत—आजच्या मानवाचा सर्वांगीण विकास कसा होईल हीच तळमळ प्रगट झाली आहे. 'संजीवन' या भावगीतमालिकेतील विचारधारा लक्षात घेता असे वाटते की, कवी हे सौंदर्यधनाचे पूजक आहेत. सौंदर्य हा आदिशक्तीचाच आविष्कार होय. तिने आधी निसर्ग आणि मागाहून मानव निर्माण केला. आदिशक्तीने आत्म्याला जाणीव दिली आणि म्हटले—

'तुम्हांमध्येहि असे ठेविले सौंदर्या—
नरास नारी, नारीला नर मोहाया—
तुमच्यातिल या सुंदरतेने अधिकतर
विश्वामधल्या सुंदरतेला ये बहर' (संजीवन)

स्थिरचरातले हे सौंदर्य सुखद आहे की दुःखद या प्रश्नाचे उत्तर कवीने असे दिले आहे.

'अभिलाषा त्यजुनी सौंदर्य पाहता
आनंद त्यातला ये अवघा सेविता'

## आवाहन

बळवंत गणेश खापर्डे यांच्या आध्यात्मिक विषयावरील काव्यात 'द्वैताची फुगडी', 'भोवऱ्याचा खेळ' इत्यादी काव्ये समाविष्ट होतात. वेदान्तातील विचारसरणीचा वनदाट परिणाम त्यांच्या 'काव्यकान्तारा'तील अनेक कवितांवर झाला आहे. रवींद्रनाथांनी गीतांजलीत ईश्वरी गूढशक्तीला जसे पाचारण केले आहे तसेच आवाहन खापर्डे यांनी खालील शब्दांत त्या शक्तीला केले आहे.

'जगति जे भाजले, रुधिरहि टपकले
उदयि तव हरिखले, अधिर झाले...
आज जगतामधे, जाळल्या पोळल्या
सकल हृदया तुझी आस लागे।

(नवीन धर्मावताराची चूर्णिका)

## विरागी यांचे गूढगुंजन

'तमोजाल', 'दुःखातून आनंदात', 'वियोगिनी', 'झिल्लीरव' इत्यादी 'मधुसंभारा'तील अनेक कवितांतून कवीला (विरागी) अज्ञात गूढ तत्त्वाची कशी ओढ लागून राहिली आहे याचा प्रत्यय येतो. दिव्यानुभूतीत कवीने आत्मनिवेदन केले आहे की,

'मम जीवननदही 'सोऽहं-' नादे तूर्ण---
पावला सङ्गमा अमरसागरीं पूर्ण.'

जीवात्मा आणि परमात्मा यांच्यातील अद्वैत तत्त्व कवीस अभिप्रेत आहे.

## 'जाग'

उपनिषदांतील अद्वैत तत्त्वज्ञानाचा परिणाम गं. वि कुलकर्णी यांच्या 'जाग' या काव्यसंग्रहातील 'तुझाच मी', 'ज्योत', 'सोहळा' इत्यादी कवितांवर झाला आहे. जीवनाच्या संघर्षातच जीवनाचा विकास होतो, असा कवीचा आत्मानुभव आहे.

'रंजले गांजले उदास जीव—तडफडणारे भुकेवीण
त्यांच्या नेत्रांतून – तरारणारे खळे पाणी,
तसले पाणी मला कर – देवा मला लहान कर.'

वरील उद्गारांतून कवीची मानवतेवरील प्रेमाची दृष्टीही उघड झाली आहे.

## समता-बंधुता-मानवता

महात्मा गांधींच्या तत्त्वाला अनुसरून अहिंसा आणि प्रेम यांच्या द्वारे मानवाची सेवा करावी हा विशिष्ट दृष्टिकोन अनेक कवींनी आपल्या काव्यातून प्रगट केला. वस्तुतः प्राचीन संतकवींच्या ठिकाणी हे मानवतेचे प्रेम मोठ्या प्रमाणात दिसून येत होते; परंतु त्याच्या पाठीमागे निर्भेळ धार्मिक भावना होती; आणि या अलीकडच्या कवींच्या काव्यात मानवतेच्या कल्पनेप्रमाणे समतेचा पुरस्कार करणारे सामाजिक तत्त्वज्ञान आहे.

मानवतावादी कवींच्या जीवनविषयक दृष्टिकोनाचे पृथक्करण केले तर त्यात तीन चार प्रकार आढळतात. पहिल्या प्रकारात मानव हा येथून तेथून सारखाच आहे, आणि रंगरूप यांच्या भिन्नत्वामुळे त्याच्या मूलभूत हक्काला काही बाध येत नाही.

व्यक्तीच्या विकासाला सर्वांनीच मदत करावयास पाहिजे, हा एक प्रकारचा ध्येयवाद अशा दृष्टिकोनात आढळतो. केशवसुतांच्या 'नव्या शिपाया'त हा ध्येयवाद आहे, आणि त्याचा पुरस्कार अनेकांनी केला आहे. 'रणशिंग', 'दसरा', 'धर्मवीर', 'तुतारी', 'डंका' या सर्व कवितांमध्ये हा विचार प्रभावी रीतीने प्रगट झाला. या विचाराच्या पाठीमागे पाश्चिमात्य देशांतून आलेल्या मानवतावादाची ( Fraternity, Brotherhood ) छाप पडली आहे असे वाटते. अनेकांच्या अनेक सुखांची कल्पना येथे अभिप्रेत आहे. ईश्वराच्या दयेपेक्षा येथे मानवाच्या हक्काचा भाग अधिक आहे. उदारमतवादाचा हा पौरस्त्य दृष्टिकोन जुन्या संत-कवींच्या दृष्टिकोनाशी जमत असला तरी त्यातील सूक्ष्म भेद ध्यानात घेणे आवश्यक आहे.

दुसऱ्या प्रकारात आकुंचित राष्ट्रवादाची जागा व्यापक राष्ट्रवादाने म्हणजेच अखिल मानवतेवरील प्रेमाने घेतली आहे. दोन महायुद्धे लक्षात घेतल्यास आकुंचित राष्ट्रवादाने मानवतेची केवढी दुर्दशा केली याची तीव्र जाणीव संवेदनाक्षम कवींना विशेष झाली. डेव्हिस, इलियट, वॉल्टर डेला मेरा, इत्यादी कवींच्या विचारांचा अप्रत्यक्ष परिणाम आपल्याकडील कवींच्या विचारावर होणे साहजिकच आहे.

आजच्या अर्थव्यवस्थेने मानवाला आलेली पराधीनता, व्यक्तिविकासाला येणारे अडथळे, कर्तृत्वाला वाव देणारी पण आखून राहिलेली समान संधीची मागणी, लोकशाहीचे सामर्थ्य, आनुवंशिक गुणांवर परिस्थितीने गाजविलेले वर्चस्व इ. अर्थशास्त्राने व मानसशास्त्राने पुढे आणलेल्या कल्पनांच्या आधारे हे मानवतावादी कवी जागृत झाले आणि 'सुप्त ज्वालामुखी'स, 'अहिनकुल', 'बणव्यापूर्वी', 'शांति-पूजन', 'पेर्ते व्हा' इत्यादी कवितांमधून त्यांनी आपले नवीन विचार प्रगट केले. यामुळेच की काय 'तुतारी' संप्रदायाप्रमाणेच 'अग्नि'संप्रदाय, 'रुद्र'संप्रदाय इत्यादी संप्रदाय निर्माण झाले अशी यथार्थ टीका रसिकांनी केली. मानवतावादी कवींच्या जीवन-विषयक कवितांतून जो एक अपूर्व विचार आढळतो तो म्हणजे मानव हा अंधारातून निघालेला असला तरी तो अंधारात लुप्तप्राय होणार नसून त्याला प्रकाशाचा लाभ होणार आहे हा आशावाद होय. डॉ. फ्राईड यांनी मानवाच्या स्वार्थी आणि घातकप्रवृत्तींवर विशेष भर दिला असला तरी त्याचा हेतू निरोगी मानवाच्या भावी काळातील प्रगतीवर विश्वास बाळगणारा होता. मॅक्डूगलने तर मानवाचा शेवट हा कल्याणातच होईल, दुर्दशेत होणार नाही, ही गोष्ट जिव्हाळ्याने सांगि-तली आणि निराश जगाला सावरून धरले. हे आशेचे किरण मर्ढेकरप्रभृतींच्या नवकाव्यात चमकताना दिसतात. प्राचीन अध्यात्मवादातील 'सर्वे सन्तु निरामयाः' या कल्पनेला मानसशास्त्राने दिलेली मानवाच्या कल्याणाची जोड नवकवींना उत्तेजन देईल अशीच आहे. म्हणूनच की काय, 'प्लेटोपासून आजतागायत तत्त्वज्ञांनी, शास्त्रज्ञांनी, मानसशास्त्रज्ञांनी आणि मनोविश्लेषणी पंडितांनी वास्तवासंबंधी जे जे काय

सांगितले आहे त्याचा यथार्थतेने तो ( नवकवी ) विचार करतो ' अशी तरफदारी ' हळवे भिंग ' या पुस्तकाच्या प्रस्तावनेत प्रस्तावनाकारांनी केली आहे.

## विविध कवींच्या व्यक्तिमत्त्वाचा त्यांच्या जीवनविषयक विचारसरणीवर झालेला परिणाम

रविकिरण मंडळातील कवींच्या समकालीन कवींपैकी ज्यांनी जीवनासंबंधी काही मार्मिक विचार प्रगट केले, अशा कवींत माधव के. काटदरे, श्री. बा. रानडे, ह. स. गोखले, आ. रा. देशपांडे, वा. ना. देशपांडे, गु. ह. देशपांडे, भ. श्री. पंडित, इत्यादी कवी येतात. इ० स० १९३३ ते १९४५ या स्वातंत्र्यपूर्व-काळातील दुर्धर राजकीय जीवनाचा या कवींवर अप्रत्यक्षपणे परिणाम झालाच. मानवात जी युद्धप्रवृत्ती दिसते ती मानवाच्या आदिभावनांचा—विकारांचा—खेळ होय असे माधव कवी म्हणतात आणि ज्याला या विकाराच्या आपत्तीला कसे टाळावे हे कळते तो श्रेष्ठ मानव होय, तोच ज्ञाता आणि तोच ऋषी ही त्यांची कल्पना आजच्या काळातही उद्‌बोधक वाटेल अशीच आहे. लढाईची ही शस्त्रक्रिया अपरिहार्य असली तरी ती जीवनदान देणारी असते असा कवीचा दृष्टिकोन पुढील ओळींत प्रगट झाला आहे.

> ' भयाची जी गमे माता ' लढाई ' हे जिला नाव ।
> अरे रोगी समाजी ती करी शस्त्रक्रिया देव; '

' सन्त तुकाराम ' ह्या बोटीस जलसमाधी मिळून जी मनुष्यहानी झाली त्याचे हृदयद्रावक चित्र कवीने ' सन्त तुकाराम ' या कवितेत वाचकांपुढे उभे केले आहे. निसर्गाच्या निर्घृणतेचे व मानवाच्या त्याच्यापुढे होणाऱ्या असहाय्यतेचे चित्रण या कवितेत आले आहे

> ' तुकयाचा ज्याने जलातुनि उद्धरिला गाथा
> रुचे न त्या तरणी तारणे पंढरिच्या नाथा '—

देवाघरचा हा पक्षपात कवीला चिंताग्रस्त करीत आहे. माधवांची बहुसंख्य कविता राष्ट्रीय भावनेचे ऊर्जस्वल स्वरूप प्रगट करणारी आहे. तरीपण त्यांच्या अध्यात्मप्रवण अंतःकरणातील वृत्ती अनेक कवितांतून प्रगट झाली आहे. बालकवी आणि रे. टिळक यांच्या निधनप्रसंगी त्यांनी जी शोकगीते लिहिली आहेत त्यांतून त्यांची चिंतनशील वृत्तीच प्रगट होते. ' कोणी खरे माना वा न माना, परंतु महाराष्ट्रात खऱ्याची परीक्षा होत नाही ' असा कटू अनुभव त्यांनी प्रगट केला आहे. रे टिळकांनी मनुष्यत्व हे सृष्टीचे दिव्यत्व आहे असे म्हटले. यावर माधव कवी विचारतात—

'जळू सारे मनुष्यांचे मनुष्ये ही पिती रक्त
मनुष्यांना मनुष्ये वा किती खायास उद्युक्त
म्हणोनी सृष्टिमाजी जे असे कृष्णत्व दिव्यत्व
तयाच्या मी मिलाफाला दिली संज्ञा मनुष्यत्व ।'

माधवांच्या ठिकाणी जीवनाकडे पाहण्याचा हा जो उपहासात्मक दृष्टिकोन प्रगट झाला त्याचा दोष त्यांच्या सभोवतालच्या विकट परिस्थितीला देणे इष्ट होय.

श्री. बा. रानडे यांची चिंतनशील मनोवृत्ती त्यांच्या 'काळाच्या दाढेतून' या प्रदीर्घ गीतात व्यक्त झाली आहे. दऱ्यावनातून आपण पुष्कळ भटकतो, पण आपणांला जे काही सोडून गेले त्याचा आपणाला उलगडा होत नाही, हा भाव कवीने खालील शब्दांत प्रगट केला आहे.

'सकल वस्तु त्या जशा तशा परि काही नाही मज वाटे
परि हुडकाया जाऊ कोठे ? विश्व जाहले मज खुरटे.'

कमलाबाई देशपांडे यांनी जीवितहेतूसंबंधी गंभीर विचार करून असाच प्रश्न टाकला आहे. 'या जीवाला जीवितकोडे जन्मांतरि तरि सुटेल का ?'

अनेक कवींनी जीवितासंबंधीची अशीच गूढ साशंकवृत्ती प्रगट केलेली दिसते. अलीकडील कवींतही ही वृत्ती दिसून येते.

उदा० ईश्वर भेटो वा न भेटो त्याला शोधण्याचा मानसिक छंद मधुकर केचे यांना कसा लागला आहे याचा प्रत्यय त्यांच्या 'पुनवेचा थेंब' या काव्यसंग्रहातील 'भेट', 'हाकेसाठी', 'ठेच', 'हारवता', 'झेप' इत्यादी आत्मनिवेदनपर कवितांतून येतो. संतांच्या बरोबर आपणही 'चुलत आसवे ढाळिली'. त्यामुळे भावदृष्ट्या आपले मन अजूनही रितेच राहिले आहे असे त्यांस वाटते. देवाच्या विशाल स्वरूपाशी—निर्गुण निराकाराशी—आपले नाते जोडण्यापूर्वी त्याच्या सगुण स्वरूपाचा आपणास बोध व्हावा हा आपला सद्भाव कवीने खालील शब्दांत प्रगट केला आहे.

'येथे माझ्यात मी मावे । तेथे होईल भलते
नको रूपरंगहीन । ध्यान चालते–बोलते.'

कवीचा हा विवेकपूर्ण भक्तिभाव अनेक भावगीतांतून प्रगट झाला आहे. अनलंकृत सोपी भाषा अभंगरचनेला पोषक ठरते. 'ध्यानाळू सकाळ', 'सुखाचे शेपूट', 'वेवाली' यासारखी शब्दयोजना तिला बाधक ठरते असे दिसून येते.

## विज्ञान आणि जीवनसौंदर्य

आजच्या यांत्रिक युगात नाजूक प्रेम आणि नवीन सौंदर्य यांचा शोध कोठे घ्यावयाचा ? यंत्रातून निघालेल्या, आगीत होरपळलेल्या जीवांच्या राशीतच

त्याचा शोध करावयाचा ना? असा प्रश्न बा. सी. मर्ढेकर यांनी विचारला आहे. एकीकडे विश्वशांतीच्या चर्चा करावयाच्या व दुसरीकडे आकुंचित देशाभिमानाला बळी पडून एकमेकांचे गळे कापावयाचे!

'ही पृथ्वीची तिरडी जळो देवा भली!'

असा उपहास, जगाची ही आजची ढोंगी नीती लक्षात घेऊन, कवीने केल्यास त्यात काय आश्चर्य!

अडाणी लोकांना वेठीला धरून त्यांना जो पुढे करतो आणि त्यांच्या मृत्यूला कारणीभूत होतो त्यांना आम्ही 'नेता' म्हणतो. सकाळपासून संध्याकाळपर्यंत ऑफिसात राबणाऱ्या कारकुनाच्या तोंडातून निघणारा विडीचा धूर पाहून आजच्या मानवाला अनुलक्षून कवी 'आम्ही जमदग्नी प्रेतरूपी' असे म्हणतो ते खोटे का समजावे?

अर्धपोट किंवा ओंगळ देखावा दाखविणाऱ्या भिकाऱ्याच्या पोराची जोपर्यंत मानवाला लाज वाटत नाही, तोपर्यंत

'देवा ऐशी भूक। कासया दिलीस। झालो कासावीस। मीहि...
अर्धपोट। जोवरि आहेत।
ओंगळ समस्त। आम्ही.......'

असे उद्‌गार कवीने काढल्यास ते उद्‌गार आपण अयथार्थ का मानावेत?

यंत्राने मानवाला हीन केले असे नाही तर मानवानेच मानवाला हीन केले हा दृष्टिकोन अलीकडील कवींत दिसून येतो. शारीरिक कष्ट करणाऱ्या, दणकट दण्ड स्नायूंच्या कोळसेवाल्याला उद्देशून मर्ढेकरांनी त्याला—नव्या मनूतील गिरिधर पुतळा—असे म्हटले आहे.

'शरीरात कोंडून ठेविलेला प्राण बाहेर जाण्याकरिता धडपडत आहे—बावडी पिंजऱ्यात अडकून पडली आहे, तिला मोकळ्या अवकाशात जावयाचे आहे, पण

'मायबापा तूहि खुपशी या, गळा?'

त्यामुळे माझी केविलवाणी स्थिती झाली आहे', या कवीच्या उद्गारांतील खोच लक्षात घेणे आवश्यक आहे. देव भक्ताच्या गळ्याला कसा खुपतो असे कोणी म्हणेल पण,

'देव राखे तया मारील कोण
न मोडे काटा हिंडता वन'

हे देवाने आपले व्रत सोडून दिले, तर भक्ताच्या गळ्याला देव खुपला तर काय आश्चर्य? उलट पक्षी देवाचे नख जर भक्ताच्या गळ्याला लागले तर भक्ताच्या तोंडून निघणाऱ्या व्यंजनाला सामर्थ्याचा स्वर लाभतो. कधी कधी मर्ढेकर ईश्वराला उद्देशून

'साधुसंत जेथे । बैसले तिष्ठत । मना कष्टवीत । अहोरात्र ।।
काय तेथे माझी । लांडी धडपड...अंतरात पक्की । बोळवण ।।'

असे उद्गार काढतात. अशा वेळी ईश्वरतेचा अर्थ बुद्धीशी इमान राखून लक्षात घेण्याची त्यांची तळमळ ध्यानात येते.

मर्ढेकरांची वरील विचारसरणी लक्षात घेतली आणि मानवानेच मानवाच्या चालविलेल्या दुरवस्थेसंबंधीचा त्यांचा तिटकारा ध्यानी घेतला म्हणजे ज्ञानेश्वर-तुकारामादी प्राचीन संतकवींचे व केशवसुत–गडकरी इत्यादी आधुनिक कवींचे

'टापूत चौफेर–नाही माहेर–सासर
केंचे गोत्र वा प्रवर अनामिका—'

हे उद्गार त्यांच्या विनयाच्या पोटी निर्माण झाले आहेत असेच म्हणावे लागेल.

मर्ढेकर हे नवकवींतील नव्या विचारांचें प्रणेते आहेत म्हणून त्यांच्या जीवनविषयक विचारसरणीचा अधिक बारकाईने विचार करणे आवश्यक आहे.

## जीव, जगत् आणि ईश्वर

जीव, जगत् आणि ईश्वर ह्यांचा विचार करणे हा जर तत्त्वज्ञानाचा प्रांत मानला तर या प्रांतात मर्ढेकरांनी काही वैशिष्ट्यपूर्ण विचार प्रगट केले आहेत असे त्यांच्या कवितांच्या आधारे दाखविता येईल. कवी हा काही तर्कशुद्ध-रीतीने सत्यासत्याची चिकित्सा करणारा शास्त्रज्ञ नाही; तसेच त्याचे विचार हा त्याच्या काव्य-निर्मितीचा एक अविभाज्य घटक असतो. हे सत्य अशा वेळी दृष्टिआड करता येत नाही; तरीपण कवीमध्येही काही तत्त्वज्ञ कवी असतात आणि त्यांच्या विचारांची निर्मिती ही त्यांच्या तीव्र जीवनानुभवा-चाच एक भाग असतो. मर्ढेकरांची गणना अशा परिस्थितिसापेक्ष कवींत केल्यास ते औचित्याला सोडून होणार नाही. मर्ढेकरांची मनोवृत्ती केशव-सुतांप्रमाणेच जितकी वैयक्तिक जीवनानुभवाशी तितकीच ती सभोवतालच्या सामा-जिक वा अन्य परिस्थितीशी एकरूप झाली. मर्ढेकरांची बहुसंख्य कविता ज्या काळात निर्माण झाली तो काळ वैशिष्ट्यपूर्णच होता. स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर-काळातील भारतीय जीवनात निर्माण झालेल्या समस्यांच्या संघर्षाचा तो काळ ठरतो. राजकीय क्षेत्रात जीर्ण रूढींचा नायनाट करून व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार करणे, आणि धार्मिक क्षेत्रात देवदानव मानवाने निर्माण केले असा पुकारा करणे, ही स्वातंत्र्यपूर्वकाळातील ध्येयवाक्ये, स्वातंत्र्योत्तरकाळात–सुराज्य–रामराज्य–कसे प्रस्थापित होईल, मानवामानवातील आर्थिक अंतर कसे नाहीसे होईल, आणि अणुयुगात एका पैशात पासरीभर मिळणाऱ्या मानवाचे नष्टचर्य कसे थांबेल ? या घोषणांशी निगडित झालेली दिसतात. या परिस्थितीचा परिणाम मर्ढेकरांच्या कवितेवर प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे झाला आहे. उदाहरणार्थ, विश्वशांतीच्या नावाखाली राष्ट्राराष्ट्रातून

सैनिकांचे बलिदान घडवून आणणारे शांतिदूत ( अज्ञानी जनांस ज्ञान पाजू नये। मरूनी उरावे धडरूपे), ज्यांना कोणी जन्मले काय आणि मेले काय यांचे सोयर-सुतक नाही असे शब्दशूर आणि वाचिवीर पुढारी आणि मानव्याशिवाय विज्ञानाच्या जोरावर हिरोशिमासारखे हत्याकांड घडवून आणणारे सत्ताधारी यांचा तीव्र उपहास मर्ढेकरांनी आपल्या काव्यात ठिकठिकाणी केला आहे.

बुद्धिजीवी मध्यमवर्गाची होणारी आर्थिक ओढाताण, आणि त्यामुळे त्यांची लाचार मनोवृत्ती, ह्यांची हृदयद्रावक चित्रेही त्यांच्या काव्यात दिसून येतात

'सकाळी उठोनी चहा कॉफी घ्यावी
तशीच गाठावी वीज गाडी
दाती तृण घ्यावे हुजूर म्हणून....
आपुली आपण विडी प्यावी —
आम्ही जमदग्नी प्रेतरूपी'

ज्यांना जगावयाची सक्ती आहे आणि मरायची सक्तीच आहे असे जीवन-कलहात पिळून निघालेले, उंदराप्रमाणेच बिळात जगणारे, आणि पोटाकरिता धडपड करीत असता पिपातच उचकी देऊन मरणारे असंख्य, कामकरी आणि कष्टकरी लोक, आणि मरणाच्या लाटरीत ज्यांचा चुकून जगण्याचा नंबर लाभला आहे असे अनेक जीवन्मृत लोक यांची केविलवाणी दृश्ये मर्ढेकरांनी अंतःकरणास पीळ पडेल अशा शब्दांत रेखाटली आहेत.

आजच्या मानवाचा होणारा कोंडमारा अनेक बाजूंनी होत आहे. पूर्वीची श्रद्धास्थाने आज नाहीशी झाली आहेत. देहाच्या वावडीने वर उडावे तर देवाने आपले सूत्र आखडते घेतले आहे. हे विश्वच एका मोठ्या पोकळीच्या पिंजऱ्यात खितपत पडले आहे. देहाच्या वावडीचा रंग गंजून गेला आहे; नसानसांतील ढग पिंजून निघाला आहे. अशा परिस्थितीत बेंबीपासून निघणाऱ्या देठाला फांदी, फुले कशी येणार ? देवाचाही पाश गळ्याला खुपतच आहे अशा वेळी, कुणाच्या तोंडून असे उद्गार निघणार नाहीत !

'जाणतो मी पोकळीच्या पिंजऱ्यालाही गज।
खास कोठे ना कुठे ते—आणि मीही मर्त्यज, ॥
फक्त दोरी सोड तू रे, जाउ दे ही वावडी।
खात गोते, पिंजऱ्याच्या त्या गजाशी तेवढी !' ॥

आजच्या मानवाच्या ऐहिक जीवनाला जसा तडा गेला आहे तसेच त्याचे पारमार्थिक जीवनही खिळखिळे झाले आहे. सामाजिक जीवनाकडे पाहण्याचा मर्ढेकरांचा दृष्टिकोन जसा वास्तविक आहे तसाच जीवनाकडे पाहण्याचा त्यांचा तात्त्विक दृष्टिकोन वास्तवपूर्ण आहे. मर्ढेकरांनी ज्या संदर्भात आपल्या कवितांतून ईश्वराचा–

देवाचा उल्लेख केला आहे तो लक्षात घेणे आवश्यक आहे. मानवी देहाचे हे सुंदर बांधकाम नश्वरतेचेच मखर आणि मिथ्यत्वाचे महाद्वार आहे काय ? हा प्रश्न त्यांनी देवास विचारला आहे. आईबापांची आणि वहीणभावांची नाती ज्या भावनेमुळे निर्माण होतात ती भावना या रक्तामासाच्या देहातच निर्माण होते ना ! मग अशा देहाला आपण नावे का ठेवावी ? कवीने देवापुढे एक सवाल टाकल आहे.

‘ कोरिसी हाडांचा महाल
ठेविशी त्यात । हरीचा लाल नाशवंत ॥
वास्तुशास्त्र का विलोरी
योजिशी येथेच मुरारी—
धाडिसी वस्तीला भाडेकरी । विलोरीच ॥ ’

प्राप्त देहाला केवळ पारंपरिक विचाराच्या आहारी जाऊन आपण नाशवंत मानावे काय ? हा जुनाच प्रश्न कवीने नव्याने उपस्थित केला आहे. या देहामुळेच आपणास परमार्थाची प्राप्ती होऊ शकते म्हणून देहाची उपेक्षा करणे श्रेयस्कर नाही, असे त्यास वाटते. मात्र या देहात वास करणाऱ्या आत्मतत्त्वाला ज्ञानाज्ञानाच्या फणीने आजवर अनेकांनी विंचरले आहे, पण शेवटी ‘ नेति नेति ’ म्हणून मानसिक शक्तीलाही हात टेकावे लागतात. याचे सूचक वर्णन करताना मर्ढेकर लिहितात

‘ कळ लागते या येथेही बाष्पीभूत संज्ञा पाही ।
काळोखातून काळोखी । जाण्याहि ये । ’
‘ कोणीकडून कोणीकडे हे तर नित्यच कानी पडे—
पण समाधान का कधी घडे त्याने । ’ —

अशी शंका केशवसुतांनीही प्रगट केली आणि स्वतःपुरते तिचे निरसन करताना जीवन हे दोन अज्ञातामधले घडीभर पडलेले ऊन आहे असे उद्‌गार काढले. मर्ढेकरांनी आपल्या बुद्धीच्या क्ष-किरणातून जीवनरहस्याचा ठाव घेण्याचा प्रयत्न केला आहे. पण या बाबतीत त्यांच्या वाटेस निराशाच आली आहे.

‘ कितीक दालने । धुंडाळीत आलो । उत्कंठा ही ल्यालो । स्वप्नातली ॥
आशेचीच वात । आशेचेच तूप । जळते स्वरूप । निराशेचे । ’

ईश्वरविषयक आपला हा भक्तिरस हास्यरस तर ठरणार नाही ना ? अशी शंकाही त्यांनी व्यक्त केली आहे.

एकीकडे आपल्या मनाला इंद्रियजन्य सुखांचा आस्वाद घ्यावासा वाटतो तर दुसरीकडे आपले मन सर्व स्थिरचराला व्यापून उरणाऱ्या शिवतत्त्वाशी ( परमश्रेष्ठ तत्त्वाशी ) तन्मय होण्याची इच्छा बाळगते आणि मगच जीवनात खरा

संघर्ष निर्माण होतो. एक ' अंगातला अनंग आणि दुजा निर्गुणाचा ढंग ' यांच्यातल्या त्या झटापटी काल, आज आणि उद्या नेहमीच चालणार असे कवीस वाटते. ' ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या ' असे म्हणावे तर ' का मिथ्या जगी मिथ्या भान अशांतीचे ' ? असा प्रश्न पडतो. आणि मग

' चालणे ही अशीच । मर्त्यांश— अमर्त्यांश खेच ।
जो जिवंत सृष्टीचा पेच । तोच पाया. '

बुद्धिवान माणसे शाश्वताशाश्वताची चर्चा करून काय मिळवितात ?

' वेचिले ज्ञान कण कण । जैसे की वालुकागण;
झालो कोरडे पाषाण । बुद्धिरूपी...
आमची संज्ञा ही दरड । रखरखीत देहापाड ।
वरी अहंतेचा पहाड । लागलासे....'

शिवाय अशांची जीवने रूक्ष बनतात ! त्यापेक्षा जे अज्ञानात जन्मले आणि अज्ञानातच मेले, त्यांनाच ईश्वराने जवळ घेतलेले दिसते !

मागचा पुढचा विचार न करताआपले काम बरे की आपण बरे अशा वृत्तीची माणसे देहसाफल्य पावतात, आणि त्यांचे भले होते. त्यांचे ते अज्ञानाचे देह ( अज्ञानाची छबी ) अश्रूशिवाय गळतात. परंतु बुद्धिवानास वाटते-साक्रेटिसासारखे असमाधानी राहून विषाचा प्याला घेऊन मेलेले बरे. पण वरकरणी सुखात राहणाऱ्या वराहाचे जीवन नको !—फसलेला मासा पाण्यात प्रतिबिंबाची अनंत कोडी पाहतो, आणि प्रतिबिंबातील लवचिक सृष्टी ' घेरुन घेई प्रतिष्ठिताला ' (स्थायी स्वरूपाला.)

सूर्याने अंतरीक्षात ग्रहमालेचे चऱ्हाट फेकून दिले आहे. या चऱ्हाटाला अवकाशात दाट निळा पीळ पडत आहे, जडत्वाच्या सूत्रबद्ध गाठी जमत आहेत आणि जो कोणी सर्वसाक्षी जगजेठी असेल तो आमची बुद्धी वेठीस धरीत आहे पण

' जरी आत्मविश्वास आम्हा । आणि सत्याचाहि पान्हा ।
तरी ढोरांचाच कान्हा । शेवटी तू ! '

माणूस तसा भाव आणि भाव तसा देव या तत्त्वाच्या गजावर आपटूनच शेवटी आपली बुद्धी रक्तबंबाळ ( शांत ) होत नाही का ? अशा प्रकारे मर्ढेकरांनी मानवी जीवनात ज्या आदिशक्तीच्या चिंतनाने गूढ समस्या निर्माण होतात त्यांचे प्रत्ययकारी शब्दांत वास्तव चित्रण केले आहे. मर्ढेकरांच्या तात्त्विक चिंतनाची ही एक बाजू झाली. त्यांच्या विचारांची दुसरी बाजू तितकीच महत्त्वाची आहे.

ईश्वरी तत्त्वाचा–ब्रह्मतत्त्वाचा–साक्षात्कार आपणांस झाल्यास ' शततारांचा पुंज आपण आपल्या तळहातावर खेळवू ' असे उद्गार कवी काढतात. पण ही देवाच्या कृपेची सळई बुळबुळलेल्या खाचांतून जावयास हवी ! एरव्ही देवळात ऊद जाळून आणि मनाच्या मठीत एकांतात बसून विपरीत ज्ञानाचे काजळ जमण्याचाच संभव

अधिक असतो. ईश्वराची दगडी भुवई आपल्या डोळ्यादेखत थोडी चळावी–म्हणून कवीने केवढा आटापिटा केला आहे. 'सपोत संज्ञेमधून अनुभूतीचा वाफा कधी फुलेल ? आणि त्या तेजातून काय पाहावे ? कोणाला शोधावे ?' या ज्वलंत प्रश्नाच्या धगीमुळे 'दळभद्र्याच्या पायाखाली आग लागली आहे.' आणि तरीसुद्धा हा 'दळभद्री' भक्त मुठीत नाक धरून आणि देवाला शिव्या हासडूनही त्याच्याच पायाशी लोळण घेत आहे ! भक्ताला अपयशाची खंत वाटत नाही, पण आपण अल्पसंतुष्ट राहिलो ही रुखरुख मनात राहू नये अशीच त्याची दृष्टी असते. ईश्वराचे नख आपल्या गळ्याला लागावे आणि तशा अवस्थेतून आपल्या मुखातून निघणाऱ्या व्यंजनाला सामर्थ्याच्या स्वराचा लाभ होऊन 'अक्षर' तयार व्हावे अशी आपली इच्छा कवीने एके ठिकाणी प्रदर्शित केली आहे.

['काय, म्या पामरे बोलावी उत्तरे ! परी विश्वंभरे बोलविले ॥' हे तुकारामाचे समाधान आपल्या वाट्यास यावे असे कवीस वाटते. तीच ती बाराखडी खरडणे आणि तीच ती टिनपाट चोपडी उत्तरे देणे कवीला आवडत नाही. (कवीने असे म्हणणे हा त्याचा विनय आहे.)] पण येथे अनेक प्रश्न निर्माण होतात. कुणी कुणाच्या गळ्याला उगाच नख लावीत नाही. त्यातून देव इतका तटस्थ (कृपाळू ?) असतो की, आपण होऊन तो भक्ताच्या गळ्याला कशाला नख लावील ? (देवाने आपल्या हाताने भक्ताच्या गळ्यास नख लावले किंवा फारच साहसी भक्ताला आपल्या पायाने दूर लोटले तर अशा वेळी हाताचे किंवा पायाचे नख भक्ताच्या गळ्याला लागेल हे खरे !) शिवाय असे की भक्ताने ईश्वराला शिवीगाळ केली असेल, (माणसाची फजिती झालेली पाहूनही फत्तरातल्या देवाला आपली फत्ते झाल्यासारखे वाटते; दुःखाच्या कढईत उकळलेल्या जीवनाची वाफ झाल्यावरही कढईच्या कडेला भेसूर धुरकट देवाच्या 'नावा'च्या कैफाचा अंश चिकटलेला दिसतो – अशी देवाची बिंगे – मर्ढेकरांनी निर्भीडपणे बाहेर काढली आहेतच) किंवा भक्ताच्या पापांचे ९९ घडे पूर्ण भरले असतील, तर ईश्वराला राग येऊन तो भक्ताच्या गळयाला नख लावण्यास उद्युक्त होईल यात शंका नाही. तुकारामांनी देवाला 'तू दगडाची खोळ पांघरून बसलास तुला कशाचा पाझर फुटणार ! तू निलाजरा आहेस. घेतल्याशिवाय तू काही देत नाहीस इतका तू चिक्कू आहेस' असे जेव्हा हडसून खडसून म्हटले व त्याचा पाणउतारा केला तेव्हा कुठे देवाचे डोळे उघडले ! मर्ढेकरांनी मानवी जीवनातल्या अनेक विसंगती देवापुढे उघड केल्या. अनेक वेळा त्याला डिवचले तरीसुद्धा देवाची प्रतिष्ठा सुटेना तेव्हा अखेरीस विरोधी भक्तीच्या सुरात देवाला त्यांनी म्हटले

'कधी लागेल गा नख माझिया गळ्याला
सामर्थ्याचा स्वर माझ्या व्यंजनाला.'

मर्ढेकरांना देवाजवळ केवळ कल्पित मोक्ष मागून स्वतःचे कल्याण साधावयाचे

असेल असे वाटत नाही. एरव्ही त्यांनी माझ्या व्यंजनाला सामर्थ्याचा स्वर लाभू दे अशी मागणी केली नसती! माझ्या तोंडातून असे उत्स्फूर्त अक्षर-अमर शब्द बाहेर पडोत की जे ऐकून जगातले अज्ञान नाहीसे होईल आणि मानवाला नवी जाग येईल! गळ्याला नख लागणे म्हणजे मृत्यू येणे आणि देवाची कृपा लाभणे एवढाच वाच्यार्थ वरील पद्यपंक्तीतून घेणे इष्ट होणार नाही. गळ्याला नख लागल्यास आणि ते फार जोराने लागल्यास माणसाला मृत्यू येईल हे जसे खरे तसेच अशा वेळी भक्ताच्या मुखातून जे उत्स्फूर्त स्वरूपाचे उद्गार (हरेराम!) बाहेर पडतील ते किती सामर्थ्यशाली क्रान्तिकारक आभाळाचा सांधा निखळून टाकणारे आणि ब्रह्मांडाची उलथापालथ करणारे असतील बरे? (कवितेची निर्मिती--अशाच भावनागर्भ आत्मनिष्ठेत असते हे विसरून चालणार नाही) सारांश, स्वतःच्या ज्वलंत भावनांच्या द्वारे आजच्या मानवी जीवनाची हृदयद्रावक चित्रे देवापुढे उभी करून देवाला जगदुद्धाराकरिता पुढे येण्यासाठी दंड ठोकून आव्हान देण्याचा धर्म मर्ढेकरांच्या मनोवृत्तीत आहे असे दिसून येते.

**उज्ज्वल भविष्यकाल**

नवकवींची दृष्टी भविष्यकाळातील मानवाच्या प्रगतीवर खिळून राहिली आहे. पण आजच्या मानवाने मानवाची दुर्दशा चालविली आहे. याला केवळ यंत्रज्ञानच कारणीभूत आहे असे नाही. मानवातील माणुसकी नाहीशी होण्यास दुसरीही काही कारणे आहेत. उच्चनीच भाव, अधिकार-प्रतिष्ठा इत्यादी कारणांमुळे आजचा एक देश दुसऱ्या देशापासून आणि एक माणूस दुसऱ्या माणसापासून दूर दूर होत आहे; मानवाने सिंहावलोकन केल्यास त्याला आपल्या खऱ्या स्थितीची जाणीव होईल आणि नकळत त्याच्या मनात बदल घडून येईल. या दृष्टीने आजचा मानव जरी प्रकाशात आहे असे दिसले तरी त्याच्या काखेत काळोखच आहे! माणूस हा पुच्छ नसलेला वानरच होय — आणि — गुहेतील नग्न चित्राला आज तो वस्त्रांकित करीत आहे. ही त्याची प्रगती दिसून येते, पण पूर्वीच्या स्थितीचा विसर त्याला होता कामा नये — हा ध्वनी खालील शब्दांत आरती प्रभू यांनी प्रगट केला आहे.

> ‘ का रे बापा पुच्छ । तोडोन घेतले
> खात न त्यामुळे । कंदमुळे
> कुठे गुहेमाजी असेलही चित्र
> तिला आज वस्त्र देतो घेतो
> विजेहून लख्ख । मानवी ओळख
> काखेत काळोख । गुहेतला । ’

**‘ नवकवींचा आशावाद ’**

ईश्वराच्या घरी सर्व माणसे सारखी आहेत म्हणून एकमेकांनी एकमेकावर

प्रेम करावे या कल्पनेचा फायदा घेऊन अज्ञानी लोकांना अनेक धूर्तांनी फसविले याची जाणीव अलीकडल्या कवींना आहे. अशा अज्ञानी भक्तांच्या अंतःकरणात आता नवी जाणीव निर्माण होऊन ते देवाला जाब विचारतात.

> ' अरे भक्तिचे रक्त तू प्राशिले
> मने त्यामुळे जाहलो दुर्बळ
> तुझ्या सारखे जाहलो आंधळे
> खुळे दैववादी नि कर्मच्युत ' ( श्रीकृष्ण पोवळे )

याच संदर्भात ' दोन देवभक्त ' ( काणेकर ), ' आज कशानेहि येईनाशी झाली झोप ' ( मुक्तिबोध ), ' श्रमदेवीचा साक्षात्कार ' ( करंदीकर ) इत्यादी कविता लक्षात घेणे जरूर आहे. प्राचीन संतकवींनीही देह हा परमार्थाचे साधन आहे असे म्हटले होते व त्याकडे दुर्लक्ष करू नये असेही सुचविले होते. आधुनिक कवींनीही हीच गोष्ट आजच्या सामाजिक परिस्थितीच्या संदर्भात निराळ्या शब्दांत स्पष्ट केली आहे. कुसुमाग्रजांनी ' हे शरीर गणावे कसे क्षुद्रहीन '? असे म्हणून देहाच्या सामर्थ्याचे महत्त्व ' एकदा ऐकले ' या कवितेत उघड केले आहे.

नवकवींच्या जीवनविषयक तत्त्वज्ञानावर सद्यःस्थितीचा घनदाट परिणाम झाला आहे. पूर्वीच्या संतकवींनी मानवामानवामधील समतेचा पुरस्कार केला होता, सर्व प्राणिमात्रांना परस्परांचे मैत्र लाभावे आणि जो जे वांछिल ते त्याला मिळावे अशा तऱ्हेचा ध्येयवाद प्रगट केला होता. प्राचीन कवींची ही समता भूतदयावादावर उभारलेली होती. व्यापक अशा धार्मिक व नैतिक दृष्टिकोनातूनच त्यांनी समतेचा विचार केला होता. आजच्या नवकवींना हा समतावाद अभिप्रेत आहे, पण वरकरणी समतेची भाषा बोलून आतून स्वार्थ साधणाऱ्या ढोंगी लोकांचा नवकवींना तिरस्कार वाटतो. सामाजिक, धार्मिक, राजकीय, वाङ्मयीन अशा विविध क्षेत्रांत पसरलेल्या ढोंगबाजीवर नवकवींनी चौफेर हल्ले चढविले आहेत. सत्याचे, शिवाचे व सौंदर्याचे जे विडंबन प्रत्येक क्षेत्रात चालले आहे, त्यामुळे मानवाचे जीवन लाजिरवाणे झाले आहे. आर्थिक विषमतेमुळे तर समाजामध्ये दोन वर्ग निर्माण झाले आहेत. दिवसभर शारीरिक किंवा मानसिक काबाडकष्ट करून कशीबशी जिवाची गुजराण करणारा एक जीवन्मृतांचा वर्ग दिसून येतो, तर उलट कोणत्याही भल्याबुऱ्या उपायांनी मनमुराद पैसा उकळणाऱ्या आणि त्या पैशावर हवी तशी चैन करणाऱ्या स्वास्थ्यलोलुप अशा निष्क्रीय परंतु सुखाचे जीवन कंठणाऱ्या स्वार्थी लोकांचा दुसरा वर्ग दिसून येतो. समाजामधील पांढरपेशा मध्यमवर्गातील कुचंबणा तर पाहावयासच नको. एकीकडे जुन्या प्रतिष्ठा जतन करण्याची त्याची उत्कंठा तरी दुसरीकडे तीव्र जीवनस्पर्धेमुळे त्यांच्या मोडकळीस आलेल्या संसाराला सावरून धरण्याची त्यांची धडपड, अशा या दुहेरी रस्सीखेचीत ' इतः नास्ति ततः नास्ति ' अशी झालेली त्यांची भ्रान्त

स्थिती कोणाचे अंतःकरण पिळवटून टाकणार नाही ? मध्यमवर्गातूनच उदयास आलेल्या नवकवींना अशा प्रकारच्या जीवनाच्या कोलाहलातून जावे लागल्यामुळे त्यांच्या कलात्मक अनुभूतीला एक प्रकारची कठोर वास्तवता लाभली आहे. कला जरी जीवनाचे हुबेहूब प्रतिबिंब नसावे असे कोणी म्हटले तरी जीवनाला सोडून कला फार दूर राहू शकत नाही. सर्वच कवींना कोठे अशी तीव्र जीवनकलहाची झळ लागली होती ? असा अप्रस्तुत प्रश्न उत्पन्न करण्यात एखाद्या कवीने सहृदयतेने आपल्या दुःखी बांधवांविषयी जी सहानुभूती बाळगलेली असते तिला अन्याय केल्यासारखे होते. युद्धोत्तरकाळात आपल्याला चांगले दिवस लाभतील म्हणून आशेने वाट पाहणाऱ्या सामान्य माणसाची आज झालेली दुर्दशा हाच नवकवींच्या काव्याचा प्रमुख विषय झाला आहे.

## सारांश

केशवसुतांपासून मर्ढेकरांपर्यंत सर्वांनीच आपापल्यापरी वरील प्रकारच्या जीवनामध्ये क्रान्ती घडून यावी म्हणून भावनात्मक शाब्दिक चळवळी केल्या तथापि स्वातंत्र्यपूर्वकाळातील एतद्विषयक कल्पना व स्वातंत्र्योत्तरकाळातील कवींच्या कल्पना यांत भेद दिसून येतो. केशवसुतादी कवींचा रोख विशेषेकरून सामाजिक अन्याय व रूढ कल्पना यांवर अधिक होता. जातिभेदामुळे व धर्माच्या आकुंचित कल्पनांमुळे आपल्या लोकांनी परस्परांचा चालविलेला विनाश त्यांना पाहवत नव्हता. स्वातंत्र्य, समता, बंधुभाव ह्या त्यांच्या कल्पनांवर आधिभौतिक शास्त्रज्ञांच्या कल्पनांचा ( हर्बर्ट स्पेन्सर, मिल्ल ) पगडा बसला होता. औद्योगिक क्रान्तीची लाट त्या वेळी सर्वत्रच पसरलेली होती. उलट स्वातंत्र्योत्तरकाळात नवकवींची दृष्टी अधिकच व्यापक झाली. दोन महायुद्धांच्या गर्तेत सापडलेले मानवी जीवन खिळखिळे झाले होते. मानव हा आता एका विशिष्ट देशाचा राहिला नाही. यंत्रज्ञानाने स्थलकालाचे आणि मानसशास्त्राने मानवामानवामधील भेदाचे अंतर पुष्कळसे कमी करण्यास मदत केली. जागतिक राजकारणाच्या खोल अभ्यासाने नवकवींना दिसून आले की, मानवाला केवळ दयेची अपेक्षा नाही, तो हक्काची भाषा बोलत आहे. मानवाच्या ठिकाणी असलेली ही सुप्त शक्ती प्रगट होईलच आणि आज ना उद्या माणुसकीचे एकच नाते सर्वत्र प्रचलित होईल, असा आशावाद काही नवकवींच्या काव्यात दिसून आला.

जीवनाचे आजचे अमंगल स्वरूप पाहूनही नवकवींनी आपला आशावाद सोडला नाही. त्यांचा मानसशास्त्राचा अभ्यास खोल आहे, आणि मानवी प्रवृत्ती ही जरी आजकाल मानवाच्या स्वार्थी आणि अघोरी खेळामुळे काहीशी स्तंभित झाल्यासारखी दिसते, तरी दुर्धर परिस्थितीतूनही मार्ग काढण्याची तिची शक्ती कमी झाली नाही. अखिल जगताच्या एका कुटुंबावस्थेचे उज्ज्वल ध्येय तिने दृष्टीआड केले नाही, आणि म्हणूनच य. द. भावे ह्यांनी या मानवी प्रवृत्तीच्या प्रवासाचे—आर्द्रतेचे केलेले वर्णन कोणास स्फूर्तिदायक वाटणार नाही ?

‘ प्रवासात तिच्या–कधी केव्हातरी–भास होतो तिला
प्रेमला बालेला–व्योमरंगापरि–शांतरम्य शांत
चैतन्य स्वरूपी–श्यामप्रेममूर्ति–वाजवी वीणा ।
आल्हादते ती–आणि सजविते–अवकाशाला ’
इंद्रधनुष्याच्या रंगीबेरंगी मृदुछटांनी
‘ आणि वर्षते ती–जीवनधारा
कोमल प्रेमला–प्रवासिनी आर्द्रा !! ’

मानवी प्रवृत्ती आपला आशावाद दुर्धर परिस्थितीतही सोडणार नाही. यासंबंधी मर्ढेकर लिहितात.—

‘ भूकंपाचा इकडे धक्का । पलीकडे अन् युद्धनगारे
चहूकडे अन् एकच गिल्ला । जुन्या शवावर नवे निखारे
फत्तरातला देव पहातो । कुठे जाहली माझी फत्ते
माणुस म्हणतो चिरंतनाचे । मनात माझ्या अस्सल कित्ते ’

खुरट्या बुंध्यावर चढून पाला खाण्याची धडपड केल्याशिवाय ही बकरी ( मानवता ! ) राहणार नाही असा नवकवींचा विश्वास आहे.

ईश्वरी तत्त्वाच्या अगाध शक्तीपुढे स्वतःच्या असमर्थतेची जाणीव अनेक कवींनी प्रदर्शित केली आहे. इतरांशी व्यवहार करताना अहंकाराची भावना मनात बाळगणे योग्य नसते हे खरे, पण शास्त्रीय दृष्ट्या विचार केला तर असे वाटते की, आपण स्वतः या विश्वाच्या पसाऱ्यात–या ब्रह्मांडात–अणूप्रमाणे दुर्बल आहोत असा न्यूनभाव बाळगणे कितपत श्रेयस्कर ठरते ? अणुपरमाणूंचे हे विश्व बनले आहे आणि त्याच्याशी माझा निकटचा संबंध आहे. प्रचंड स्वरूपाच्या या यंत्राचा आकार कितीही भव्य असला तरी ज्याप्रमाणे एखाद्या यंत्राशी संबद्ध असलेल्या लहानशा घटकाचे महत्त्व त्या प्रचंड यंत्राइतकेच असते त्याचप्रमाणे माझे अस्तित्वसुद्धा या विश्वाच्या अस्तित्वाइतकेच महत्त्वाचे असते ही कल्पना अनुचित ठरते काय ? अलीकडील तत्त्वज्ञ कवींच्या ठिकाणी हा न्यूनभाव दिसून येत नाही. नम्रभाव निराळा आणि न्यूनभाव निराळा !

अशाप्रकारे आधुनिक कवींची चिंतनशील मनोवृत्ती त्यांनी लिहिलेल्या जीवनविषयक कवितांतून प्रगट झाली आहे. वरील कवितांतून खालील वैशिष्ट्ये दिसून येतात.

( १ ) जीव, जगत् आणि परमेश्वर यांच्या संबंधीचे गंभीर विचार अनेक कवींच्या काव्यातून प्रकट झाले आहेत.

( २ ) या विचारावर त्या त्या कवींच्या वैयक्तिक जीवनाचा व सामाजिक परिस्थितीचा परिणाम झालेला दिसतो. सृष्टीचे कोडे सोडविण्यापेक्षा जीवनाची कोडी सोडविण्यात त्यांना गोडी वाटत आहे.

( ३ ) जीवनाला कुणी माळरानाची, समरांगणाची तर कोणी उद्यानाची उपमा दिलेली दिसते. काही कवी परिस्थितीपुढे हतबल झालेले तर काही झुंजार-वृत्तीने संकटांना आव्हान देणारे आहेत. आशा-निराशेचे, छाया-प्रकाशाचे असे दुहेरी खेळ अनेक कवींच्या काव्यात आढळतात. एकंदरीत विचार केल्यास दैववादापेक्षा प्रयत्नवादावर त्यांपैकी अनेकांचा विश्वास वसलेला दिसतो.

( ४ ) स्वातंत्र्यपूर्वकाळात काही कवींच्या जीवनविषयक दृष्टिकोनात आत्यंतिक आत्मनिष्ठा दिसून येत होती. त्या मानाने स्वातंत्र्योत्तरकाळातील कवींची दृष्टी अधिक वस्तुनिष्ठ बनत चालली आहे. स्वतःच्या दृष्टिकोनातून जगाकडे पाहण्याच्या संकुचित वृत्तीपेक्षा जगाच्या दृष्टिकोनातून स्वतःकडे पाहण्याची व्यापक वृत्ती अधिकाधिक बळावत आहे. विज्ञानयुगाने मानवामानवांतील व स्थलकालांतील पुष्कळच अंतर कमी केले. त्या मानाने त्यांच्यातील आंतरकलहमात्र कमी झाले नाहीत. त्याचाही परिणाम अनेक कवींच्या जीवनविषयक दृष्टिकोनावर होऊन मानवाचा अंतिम शेवट कल्याणात होणार की नाशात होणार या संशयाने त्यांची मनोवृत्ती साशंक झालेली दिसते, पण एकंदरीत विचार केल्यास 'तिने आशावाद सोडलेला नाही व आज ना उद्या आपला उद्धारच होईल अशी रम्य स्वप्ने तिला पडत आहेत.'

☆ ☆ ☆

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलकाल
अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........ नों. दि. ........

# प्रकरण ३ रे

# आधुनिक कवींचे निसर्गविषयक दृष्टिकोन

## निसर्गाकडे विभूतिपूजेच्या दृष्टीने पाहण्याची गूढ रीती

सृष्टिसौंदर्य हा प्राचीन कालापासून आतापर्यंतच्या अनेक कवींच्या स्फूर्तीचा विषय झाला आहे. आदिमानवाला निसर्गातील दृश्ये गूढ व अद्‌भुत वाटली. ही दृश्ये निर्माण करणारा कोणी अज्ञात असा ईश्वर असेल अशी त्याने कल्पना केली. निसर्गातील ही दृश्ये म्हणजे ईश्वराचीच बाह्यरूपे होत या कल्पनेने त्याने त्याची स्तुतिस्तोत्रे गाइली. निसर्गाकडे विभूतिपूजेच्या दृष्टीने पाहण्याची ही अद्‌भुत रीत वैदिक संस्कृत वाङ्मयात आढळते. 'उषा', 'वरुण', 'मरुत' इत्यादिकांची स्तोत्रे ऋग्वेदातील ऋचांतून वाचावयास मिळतात.

सृष्टीच्या भव्य सौंदर्यापुढे नम्र होण्याची ही वृत्ती, जात्याच भावनाशील व कातर स्वभावाच्या कवींच्या ठिकाणी दिसू लागली यात काही नवल नाही. मानव-प्राणी हा केवळ सृष्टीचा दास आहे, निसर्गाने घालून दिलेल्या सृष्टिनियमानुसारच त्याने वागले पाहिजे. निसर्ग हे परमेश्वराचे क्रीडास्थान असून त्यानेच हे विश्व निर्माण केले. या कल्पनांचा पगडा आरंभीच्या श्रद्धेच्या युगात जो मानवाच्या ठिकाणी दिसून आला त्याचेच प्रतिबिंब तत्कालीन काव्यवाङ्मयात दिसून आले. अशा प्रकारचे निसर्गविषयक प्रेम आजच्या दृष्टीने अवास्तव वाटले तरी पूर्वीच्या काळी ते अपरिहार्य होते. आरंभी आरंभी तरी विश्वाच्या दृष्टीने मानवाला केवळ दुय्यम स्थान मिळालेले होते.

## विश्वातील पदार्थांच्या आधारे कवींनी रचिलेली रूपके व अलंकार

अभिजात संस्कृत वाङ्मयातही संस्कृत कवींनी निसर्गविषयक प्रेम अनेक प्रकारांनी प्रगट केले. जात्याच सुंदर असणाऱ्या सृष्टीतील अनेक पदार्थांना त्यांनी अलंकाराच्या उपयोगाकडे वळविले. भव्य पर्वताची आकृती त्यांना मानदंडासारखी

वाटली. समुद्राचे अगाध गांभीर्य त्यांना सज्जनांच्या विशाल व व्यापक अंत:करणाप्रमाणे भासले. सृष्टिसौंदर्याचा अलंकाराच्या दृष्टीने कसा उपयोग करून घेता येईल याचा विचार करून त्यांनी अनेक आलंकारिक संकेत निर्माण केले. एखाद्या वर्ण्य वस्तूच्या आकाराची, तिच्या रंगाची, तिच्या गुणांची ओळख करून देताना सृष्टीतील तशाच प्रकारच्या आकाराची, रंगाची वा गुणांची उदाहरणे त्यांनी तुलनेकरिता पुढे केली. उदाहरणार्थ, वेलीच्या नाजुकपणासारखा स्त्रियांचा नाजुकपणा असतो असे त्यांनी ठरविले. चंद्राच्या गोल आकारासारखा, सुंदर स्त्रियांचा चेहरा वाटोळा असतो असे ते मानू लागले. पोवळ्याच्या पिवळसर तांबूस रंगमिश्रणाशी ललनेच्या अधरबिंबाची त्यांनी तुलना केली. फार काय पण स्त्रियांच्या प्रत्येक अवयवाशी सृष्टीतील अनेकविध तत्सदृश पदार्थ त्यांनी शोधून काढिले. ‘ हरिणाक्षी’, ‘ सिंहकटी ’, ‘ राजीवलोचना ’, ‘ चंद्रानना ’, ‘ मेघश्यामा ’ इत्यादी संकेत रूढ झाले. वास्तविक पाहता प्रकृतिभिन्नतेमुळे निरनिराळ्या कवींच्या सौंदर्यकल्पनेत भिन्नपणा यावयास पाहिजे, परंतु शरीरसौंदर्याचे वर्णन करण्याची रीत ठराविक साच्याची बनली. कालिदासाची ‘ शकुंतला ’, भवभूतीची ‘ मालती ’, बाणाची ‘ कादंबरी ’ यांच्यात सौंदर्याच्या दृष्टीने बाह्यात्कारी भेद राहिला नाही. तीच चाफेकळीसारखी नासिका, तीच गोरोचन अंगकांती, तीच इंद्रधनुष्यासारखी बाकदार अंगाची ठेवण, आणि तेच राजीव लोचन! हीच स्त्रियांच्या बाह्यसौंदर्याचे मोजमाप करण्याची साधने ठरली.

## सृष्टीतील पदार्थांवर सचेतनत्वाचा आरोप

सृष्टिसौंदर्यातून नायक-नायिकांच्या बाह्यस्वरूपाच्या वर्णनाकरिता केवळ आलंकारिक उपमा शोधून कवींची दृष्टी थांबली नाही. त्यांनी दररोजच्या संसारातील अनेक व्यक्तींची परस्पर नाती लक्षात घेऊन तशाच प्रकारची नाती सृष्टीच्या अनेकविध पदार्थांच्या व्यवहारात दिसतात अशी कल्पना केली. भ्रमराला कमलेच्या प्रियकराचे स्थान मिळाले, लता ही तरूची पत्नी झाली आणि वसंतास प्रणयीजनांचे मित्रत्व लाभले. पुष्प हे मदनाचे सुकुमार शस्त्र ठरले. पृथ्वीला मातेची व आकाशाला जनकाची थोरवी प्राप्त झाली. सामान्य व्यवहारातील उपचार कवी सृष्टिसौंदर्यातील वर्णनात वाळगू लागले. काव्यातील निर्जीव पदार्थांच्या लिंग व जाती ठरल्या आणि त्यांचा काव्यातील अंतर्भाव जर समुचित झाला नाही तर औचित्यभंगाचा दोष होऊ लागला. काव्यसंकेतांचे हे घनदाट अरण्य संस्कृत वाङ्मयात पुष्कळ वाढले, आणि प्राचीन संस्कृत कवींचेच अनुकरण मराठीतील अनेक प्राचीन पंडित कवींनी केले व आजही कित्येक आधुनिक कवी वरील संकेतांचा अवलंब करिताना दिसतात.

## निसर्ग-ईश्वराचे श्रेष्ठ स्वरूप

अव्वल इंग्रजी अमदानीत ( १८२५-१८७४ ) होऊन गेलेल्या मराठी कवींनी वरील संकेतांना तर मान दिलाच, याशिवाय मानवाला मार्गदर्शन करणारी निसर्गशक्ती ही एक श्रेष्ठ प्रकारची शक्ती आहे असे त्यांनी मानिले. निसर्गाकडे ते भीतियुक्त आदरभावाने पाहू लागले. काव्यामध्ये नीतिवाद प्रबळ झाला. सृष्टि-सौंदर्यांचे कौतुक करिताना त्यापासून ऐहिक व पारलौकिक फायदे शोधण्याकडे कवींचे लक्ष गुंतले. 'गंगावर्णना' या काव्याच्या आरंभी चिंतामणीपेठकर यांनी सृष्टीकडे पाहण्याचा आपला भीतियुक्त पूज्यभाव प्रगट केला आहे. ते म्हणतात-

'ज्या पूज्यबुद्धि हृदयांतरि निर्मितात
ज्या पाहता भय उचंबळते मनात
ज्या दर्शनेचि नर दृष्टिस रंजवीती
त्या या स्थळी सकल वस्तु दिसून येती.'

वरील उद्गाराबरोबरच निसर्गदर्शनाने 'नास्तिकाते देखील विश्वपति ईश्वर मानण्याते बुद्धी होऊन अवितर्क्य तदीय भक्ति चित्ती ठसून मनात भक्ती उपजेल' हे कवीचे उद्गार ध्यानात घेण्याजोगे आहेत. सृष्टिसान्निध्यात नास्तिकाच्या मनात वरील परिणाम होऊन तो अगाध ईश्वरी शक्तीवर विश्वास ठेवील असे कवीस वाटते. या काव्यात ठिकठिकाणी निर्मळ सृष्टिवर्णने आली आहेत. तथापि कवीची भूमिका केवळ कलावादी सौंदर्य-समीक्षकाचीच आहे असे वाटत नाही; आणि तत्कालीन कवी सृष्टिसौंदर्याचा आस्वाद कलेच्या दृष्टीने घेऊ शकत नव्हते हे खरे.

### 'गंगावर्णना'

सृष्टिसौंदर्याच्या वर्णनाला ज्यात प्राधान्य देण्यात आले आहे असे 'गंगा-वर्णना' हे अर्वाचीन मराठीतील पहिलेच श्रेष्ठ काव्य होय. नगाधिराज हिमालयावर बदरिकाश्रमासन्निध पवित्र केदारनाथाच्या गूढपदी जन्म घेणाऱ्या गंगानदीच्या उगमापासून तो सुंदरवनाच्या खाली महासागराला ती मिळेपर्यंत, तिच्या ठिकाणी दिसून येणाऱ्या सौंदर्यांचे तसेच तिच्या परिसरातील विविध स्थलशोभेचें धावते वर्णन चिंतामणीपेठकर यांनी या काव्यात केले आहे.

आरंभी हिमालयाच्या परिसरात दिसून येणाऱ्या वस्तुसौंदर्याने कवीचे मन प्रेमादरभयाने उचंबळून आले आहे. नास्तिकाला आस्तिक करण्याचे सामर्थ्य या पावन प्रदेशात आहे असे कवीस वाटते हे वर म्हटलेच आहे. गंगा शंकराच्या जटेतून प्रथम बाहेर पडली, तिने सगरपुत्रांना पावन केले, तिच्या उगमाजवळील पर्वतावर गेले असता 'या स्थळि खालती वरि पुढे मागे चहूकडे सारे बर्फ दिसते.' तसेच

'ती वेगे खडकांमधून पुढती वाहू जशी लागती
त्याच्या भीमरवे प्रपूरित दऱ्या साऱ्याहि नादावती'

असा देखावा दृष्टीस पडतो. गंगेच्या जलप्रवाहात 'कोठे तिचे सलिल निश्चल शांत वाहते, कोठे खळाळत झराझर फार हालते, कोठे ते भोवऱ्यापरि गरगर फिरते'. गंगोत्रीजवळ तिच्या सभोवार हिमाच्छादित शिखरे दिसतात.

या स्थलास जे माहात्म्य प्राप्त झाले आहे त्यामुळेच अनेक भक्तजन येथे स्नान करून धन्य होतात, असे कवीने म्हटले आहे.

पर्वतप्रदेशातून गंगा खाली वाहत येते आणि जान्हवी तिला भेटते. परंतु तिचे पहिले नावच अबाधित राहते.

'श्रीगंगे कितितरि देवि या ठिकाणी
त्वत्पूजाविधि बघता घडे शिराणी.'

श्रीनगराजवळ तिला अलकनंदा भेटते. पुढे हरिद्वाराजवळ तिचा प्रवाह गतिमान होतो. उत्तरेकडील साऱ्या भरतखंडास गंगेपासून होणाऱ्या ऐहिक लाभाचे कवीने वर्णन केले आहे ते असे—

'होऊनि सस्यफलपुष्पसमृद्धि माते
तो लागतो टवटवीत दिसावयाते.'

हरिद्वारापुढील गंगेची गती भुजंगप्रयाताप्रमाणे होते. कनोजला राज्य करणाऱ्या जयचंदाने शहाबुद्दिनाची मदत घेऊन पृथ्वीराजाचा घात केला. नंतर त्याचा स्वतःचाही नाश झाला. या रोमांचकारी इतिहासाची साक्ष गंगा देत आहे. येथे म्लेंछ-मतानुयायांनी ज्या महादुष्कृती केल्या

'त्यांच्यातले क्रौर्य बघून सर्व
होती पशू क्रूरहि भग्नगर्व।'

'कानपूर' येथे इंग्रज आणि बंडवाले यांनी एकमेकांवर घेतलेल्या सूडाचे स्मरण कवीचे हृदय विदीर्ण करते. ऐतिहासिक गोष्टींचा गंगेच्या सौंदर्यवर्णनात संबंध आणण्यात कवीच्या कलादृष्टीला बाध येतो असे कुणास वाटेल, पण जी गोष्ट अपरिहार्य होती तीच कवीने केली आहे. अंतर्वेदीचे—गंगायमुनांच्या परिसरातील दृश्यांचे—वर्णन करून कवीची प्रतिभा प्रयागतीर्थाचे वर्णन करण्यात गढली आहे. कलिंदजा आणि जह्नुनंदिनी 'जिथे त्वरे दोन्हीकडुनि येऊनि परस्परांते मिळतात ते स्थल दृष्टीस संतोषविते.'

काशीजवळून वाहणाऱ्या गंगेला उद्देशून कवीने म्हटले आहे—

'श्रीविश्वनाथ करि येथ निवास, वाहे
गंगे तुझा प्रवह जो स्वजटाकटाहे'

'तो काळभैरव सकृत् नमिता जयाला
भक्ता घडे सुकृत पुष्कळ संग्रहाला.'

मगधदेश, पाटलिपुत्र, बंगाल या प्रदेशांना आपल्या सान्निध्याने समृद्ध करणाऱ्या गंगाप्रवाहाचे सूक्ष्म वर्णन 'गंगावर्णना'त आले आहे. अखेरीस सुंदरबनाच्या खाली महासागराशी होणाऱ्या गंगेच्या संगमाचे चित्रण करताना व गंगेला आपली आदरांजली अर्पण करीत असता सद्‌गदित अंतःकरणाने कवीने म्हटले आहे —

'गंगे वैकुंठपादांबुजजनिविमले, छिन्नमायाप्रसंगे
गंगे, पावो तुलाही प्रणति वितरिली मी विशुद्धांतरंगे.'

'गंगावर्णना'च्या या समालोचनावरून कवीची गंगेकडे पाहण्याची प्रेमादराश्चर्याची दृष्टी कशी प्रगट झाली आहे ते दिसते, त्याचप्रमाणे विशिष्ट स्थलांना पूर्वसांस्कृतिक इतिहासाच्या संदर्भात कसे माहात्म्य प्राप्त होते याचाही उलगडा हे काव्य वाचताना होतो आणि रसिकांचे मन आश्चर्यानंदात निमग्न होते.

चिंतामणीपेठकर यांच्या गंगावर्णनाप्रमाणेच गणपत हरिहर पटवर्धन ह्यांनी 'गंगावर्णन-आर्या' हे सुमारे ६०० आर्यांचे वर्णनपर खंडकाव्य लिहिले. 'काव्यात कल्पना क्लिष्ट असू नयेत. साधारण भाषण हे सागवानी लाकडाप्रमाणे होय, आणि काव्य हे जसे त्या लाकडावर खोदून वेलबुट्टीचे काम करणे होय.' अशी आपली भूमिका कवीने काव्यारंभी स्पष्ट केली आहे. काव्याची भाषा संस्कृतप्रचुर आहे. आपल्या पूर्वजांना अभिवादन करून 'कवितेचा प्रकाश नसता मी कविसमाजी वसू इच्छितो' असे कवीने विनयाने म्हटले आहे. गंगेचा उगम ज्या ठिकाणी होतो तेथील– हिमालयावरील – दृश्याचे कवीने यथार्थ चित्रण केले आहे.

सिंह, व्याघ्र, गज यांचा संचार, घूकांचे घूत्कार, दंदशूकांचे फूत्कार आणि त्याबरोबरच सुंदर मयूरांचे केकाध्वनी आणि पिकांचे सुस्वर ह्यामुळे तेथील वातावरण दुमदुमून गेले आहे. या वर्णनात केवळ अतिशयोक्तीच आहे.

गंगोत्रीजवळून पुढे गंगाजल वेगाने खाली पडते त्या वेळी,

'होता पतन जळांचे । धो धो ते वाजते जशी भेरी
ऐकुनि शब्द तयाचा । त्रिविध महापातकासि ये घेरी ।'

गंगेला हिमालय सोडल्यामुळे जे दुःख झाले आणि तिने पुन्हा पुन्हा मागे मुरडून वळून पाहिले त्या वेळी,

'नोहे जल अश्रुचिन्हे जनकवियोगेची काय रडतेस ?'

असा प्रश्न कवीने तिला विचारला आहे.

जह्नुऋषीच्या आश्रमाकडे गंगेचा प्रवाह वळतो. त्यानिमित्ताने कवीने गंगा ही शंतनूची स्त्री कशी झाली ही कथा सांगितली आहे. केदारेश्वर व शंभुदेवकेदार या ठिकाणी गंगेच्या दर्शनाला जाताना यात्रिकाला होणारे कष्टही लक्षात घेऊन

' स्वर्गारोह कराया हेचि स्थल होय भव्य निःश्रेणी ।
ब्रह्मर्षि राजऋषिंच्या गेल्या हिजवरुनि हो बहु श्रेणी ॥ '

असे विनोदमिश्रित वर्णन कवीने केले आहे.

गंगेने हरिद्वार ओलांडल्यानंतर पुढे ती अधिक गंभीर होत जाते आणि याचे कारण ' युक्तचि बाळपणीचे टाकिति चांचल्य कुलवती कांता'.

कवीने स्वर्गलोकातून गंगेच्या हिमालयावर होणाऱ्या अवतरणाची रहस्यकथा उघड केली आहे. दिलीपपुत्र भगीरथ याने आपल्या पूर्वजांना –हजार सगरपुत्रांना– गंगास्पर्शाने मुक्ती लाभावी म्हणून जो प्रयत्न केला त्याचेही वर्णन कवीने प्रसंगोपात्त केले आहे. ' गंगावतरण ' ज्या ठिकाणी होते त्या पवित्र स्थलाला कवीने आपली आदरांजली वाहिली आहे.

गंगेचा ओघ कुरुक्षत्राकडे वळतो. पेशव्यांनी त्या ठिकाणी बांधलेल्या घाटाचे वर्णन कवीने केले आहे. कानपुरला मागे टाकून गंगा पुढे जाते त्या वेळी कवीला १८५७ च्या बंडाची आठवण होते. चिंतामणीपेठकरांनी कानपुरातील बंडवाल्यांनी केलेल्या हाहाकाराचे वर्णन आणि पटवर्धनांनी केलेले वर्णन यात फरक आहे. बंडवाल्याकडे पाहण्याची पटवर्धनांची दृष्टी तत्कालीन संस्थानिकांच्या राजनिष्ठेला धरूनच आहे.

कवीने ब्रह्मावर्तास जे दिवस घालविले त्यांच्या आठवणीही प्रगट केल्या आहेत, पण असे करिताना निरनिराळ्या ऋतूंत गंगेची दिसून येणारी शोभा, त्यांनी चित्रित केली आहे. ' हेमंत ऋतूत रंक व राव गंगास्नाने करितात ते पुण्यप्राप्तीच्या हेतूनेच ! ' हे कवीचे विचार लक्षणीय आहेत.

पाटणा, कलकत्ता या शहरांजवळून पुढे गंगेचा प्रवाह वहात वहात समुद्राला जाऊन मिळतो या वेळच्या वर्णनात

' क्रीडा करिता पतिसी झाली भागीरथी दिसेनासी ।
गेली मत्पापेही दुंदीस्मरणेचि विघ्नसेनेसी '

असा भक्तिभाव प्रकट करून कवीने हे काव्य संपविले आहे.

' गंगावर्णन–आर्येत ' कवीची वर्ण्यविषयाशी अनेक ठिकाणी समरसता झाली आहे. तथापि कवीच्या मनावर संस्कृतातील विदग्ध काव्याचा परिणाम झाल्यामुळे कवीने भावनासौंदर्यापेक्षा अलंकारसौंदर्याकडे अधिक लक्ष दिले आहे. पौराणिक कथांच्या निमित्ताने व ऋतुवर्णनांच्या मोहामुळे कवीचे लक्ष गंगेच्या प्रचलित प्रवाहा-पासून दूर झाले आहे असे वाटते. त्या मानाने चिंतामणीपेठकर यांचे काव्य अधिक सरस व परिणामकारक ठरते. पेठकरांच्या ' गंगावर्णना 'त विद्वत्त्व हे रसिकतेला परिपोषकच ठरले आहे. उलट पटवर्धनांच्या ' गंगावर्णन–आर्ये'चा विद्वत्तेमुळे कोंडमारा

झाला आहे असा भास होतो. ‘ विद्या विनयेन शोभते ’ ही उक्ती मात्र दोघांनाही लागू पडणारी आहे.

## निसर्गाची पार्श्वभूमि

इंग्रजी अमदानीतील कवींच्या मनावर एकीकडून संस्कृत वाङ्मयातील सृष्टि-सौंदर्यविषयक वर्णनांचा व दुसरीकडून इंग्रजी काव्यातील सृष्टिसौंदर्यविषयक काव्यवर्णनांचा परिणाम झाला होता. विशेषेकरून चिंतामणीपेठकर व कुंटे यांच्या काव्यांवरून ही गोष्ट स्पष्ट होते. कुंटे यांनी लिहिलेल्या ‘ राजा शिवाजी ’ या काव्यातही कथानकाच्या ओघात काही सृष्टिवर्णने आली आहेत. महाकाव्यात अशी वर्णने यावयास पाहिजेत, याच कल्पनेमुळे त्यांनी ती आणिली आहेत असा भास होतो. सर्व काव्याला निसर्गाची पार्श्वभूमी आली आहे असे कुंटे यांनी प्रस्तावनेतच म्हटले आहे. या पुस्तकाच्या पाचव्या भागाच्या आरंभी त्यांनी महाराष्ट्रात दिसून येणाऱ्या सर्व लहानमोठ्या झाडांचा एक शब्दकोशच तयार केला आहे, व आपली सृष्टिवर्णनाची हौस एकाच ठिकाणी पुरेपूर भागविली आहे. खैर, चिंच, गोंदनी, भोकर, सावर याचप्रमाणे वनअवळी, जांभळ, धामणी, नांदुर्गी इत्यादी अनेक झाडांचा व वनस्पतींचा कवीने कसोशीने उपयोग करून घेतला आहे. निसर्गवर्णना-शिवाय काव्याला शोभा येत नाही हा संकेत पाळावा एवढाच हेतू त्या वर्णनामागे आहे. नायकाच्या पराक्रमाला संकटाची–रानातील काट्याकुट्यांची–पार्श्वभूमी निर्माण करावी असाही कवीचा उदात्त हेतू वरील वर्णनात दिसतो. सहाव्या भागात वादळाचे वर्णन आले आहे आणि पुढे मोगलांची फौज शिवाजीवर चालून येण्यास सरसावली आहे! या गोष्टी विरोधाने दाखविल्या आहेत. वर्णनाला उठाव देण्याकरताच कुंट्यांनी अशा प्रकारे निसर्गाच्या पार्श्वभूमीचा उपयोग करून घेतला आहे. सृष्टिवर्णनात होमरप्रमाणे प्रदीर्घ उपमा योजण्याची रीत कवीने अंगीकारिली आहे.

## ऋतुवर्णने

केवळ संस्कृत कवींच्या पद्धतीला अनुसरून तटस्थपणे ऋतुसौंदर्याची वर्णने करण्याचे प्रकारही या काळात निर्माण झाले. पांडुरंग गोविंदशास्त्री पारखी यांनी षड्ऋतुवर्णन ( इ. स. १८८२ ) या पुस्तकात वर्षातील सहा ऋतूंची वै निरनिराळ्या सणांची श्लोकबद्ध वर्णने केली आहेत. सृष्टीकडे पाहण्याचा कवीचा दृष्टिकोन बोधवादी आहे यात शंका नाही. आरंभीच त्यांनी म्हटले आहे –‘ प्रभाती सुधांशु निस्तेज दिसे– ’ कारण की, विद्वानापुढे अज्ञ हा तेजहीन दिसणारच. कमलबंधापासून सकाळी भृंग मोकळा होतो ही गोष्ट कवीला

‘ सुटति थोरांच्या जन्मकाळि लोक,
बंदिमध्ये असतात जे अनेक ’

हे तत्त्व सांगण्यास उपयोगी पडली. कवीच्या मनावर संस्कृतमधील काव्यसंपदेचा पूर्ण परिणाम झाला आहे, किंबहुना सुभाषितरत्नभांडारातील पुष्कळशा कल्पना कवीने येथे उतरवून घेतल्या आहेत, असा भास होतो.

'सविता उदये रक्तः रक्तश्चास्तमने तथा ।'

या कल्पनेसारखीच कल्पना संध्याकाळी चंद्र व सूर्य हे एकाच वेळी उदयास्त भोगितात अशा अर्थाच्या ओळीत आढळते.

'तेजोद्वयी सुचविती जणु काय लोका । सर्वां असे उदय आणि तसाच धोका ।'

कवीने ठराविक पद्धतीने लोकप्रिय वृक्षांची आणि फुलांची तीच ती वर्णने केली आहेत. कवीची भूमिका ऋतूंचा व सणांचा इतिहास पद्धतशीरपणे सांगण्याची आहे. शरदऋतू कवीस महत्त्वाचा वाटतो ह्याचे कारण त्या ऋतूत

'अन्नोदक रुचिकर लागुनि पचनि पडते ।'

आणि 'नरपशु पक्षी सर्व प्राणी हुशार ताजी दिसती ।'

मनाचा ताजेपणा किंवा प्रसन्नपणा हा केवळ एखाद्या विशिष्ट ऋतूतच प्राप्त होत नसून तो आपल्या मनोरचनेत असतो ही कल्पना कवीने लक्षात घेतली नाही. कवीने आपल्या वेळच्या नवीन प्रकारच्या कालप्रवाहाकडे काहीसे दुर्लक्ष केले होते.

प्रस्तावनेत कवीने म्हटले आहे, 'कविता रसाळ व वजनदार होण्याकरिता तीत मधून मधून संस्कृत शब्दांची भर जरूर पाहिजे.' या आपल्या मताप्रमाणेच कवीने या काव्यात संस्कृत शब्दांचा भरपूर उपयोग केला आहे. ही कवीची भूमिका लक्षात घेऊनच या काव्याचे वाचन करणे योग्य होईल.

कृष्णशास्त्री राजवाडे यांच्या ऋतुवर्णनात तीनच ऋतूंची वर्णने आहेत. परंतु पारखी यांनी सहा ऋतूंची वर्णने केली आहेत. राजवाडे यांनी ऋतूंची वर्णने कालिदासकृत ऋतुसंहाराला अनुसरून केलेली दिसतात. त्या मानाने पारखीशास्त्री यांनी केलेल्या षड्ऋतूंच्या वर्णनात कवीच्या स्वतंत्र कल्पनाशक्तीची अनेक ठिकाणी ओळख होते. म्हणूनच रावजीशास्त्री गोडबोले यांनी 'हे पुस्तक मनोरंजक व वाचण्यास योग्य आहे' असा अभिप्राय प्रगट केला असावा.

### कालिदासाच्या 'ऋतुसंहारा'चा परिणाम

कालिदासाच्या ऋतुसंहारातील निसर्गसौंदर्याची वर्णने त्या त्या ऋतूतील वातावरणाची यथार्थ कल्पना देणारी आहेत.

निसर्गसौंदर्याच्या पार्श्वभूमीवर प्रियकर व प्रेयसी यांच्या प्रेमभावना चित्रित करणे हाच कालिदासाच्या ऋतुसंहाराचा प्रमुख हेतू आहे. मात्र ही सृष्टिवर्णने वास्तवस्वरूपाची आहेत. उदाहरणार्थ, वसंत ऋतूत पळसाची झाडे फुलतात आणि फुले प्रदीप्त अग्नीसारखी तांबडी दिसतात, हे या ऋतूतील वैशिष्ट्य कालिदासाने

'सद्यो वसंतसमये हि समाचितेयं रक्तांशुका नववधूरिव भाति भूमिः।'
अशा शब्दांत दाखविले आहे.

शरदऋतूत लवणाऱ्या साळींची उपमा विनम्रवनितांना दिली आहे. (आपक्वशालिरुचिरानतगात्रयष्टिः। ३–१). निदाघकालाचे प्रेमीजन सुस्वागत करतात, कारण 'या ऋतूत प्रचण्ड सूर्य, स्पृहणीय चंद्रमा, ज्यात अवगाहन करावे असे वारिसंचय, आणि रम्य संध्याकाळ' यांचा लाभ होतो, असे कवीने म्हटले आहे.

वर्षाऋतूत घनागमन, त्यांचा गडगडाट, मयूरांचे नर्तन, वनात तृणांकुरांना खुडून विहार करणाऱ्या हरिणी, मदान्वित गजयूथांचे ध्वनी, कुसुमांनी डवरलेले कदम्बवृक्ष, चमकणाऱ्या विजा, इत्यादी अनेक गुणांनी रमणीय झालेला कामिनी-चित्तहारी प्रावृट् काल, प्रणयीजनांच्या दृष्टीने 'जलद समय एष प्राणिनां प्राणभूतः' असा वाटल्यास नवल काय ?

नववधूच्या रम्यरूपाप्रमाणे मनोहर भासणाऱ्या शरदऋतूत नद्यांचा प्रवाह मन्द होतो. मन्दानिलाने झाडांची पाने हलतात. ज्योत्स्नेचे दुकूल धारण करणारी वसुधा आनन्ददायी वाटते, भूतलावर शालिनिचयाचे आच्छादन पडते. असा हा शरदऋतू तुम्हांस कामिनीप्रमाणे अत्युत्कट प्रीती देवो असे कालिदासाने म्हटले आहे.

ज्यात शालि परिपक्व झाल्या आहेत, लोध्रवृक्ष फुलले आहेत, पद्मे विकसित झाली आहेत, हिमपतन ज्यात घडून येते, असा हा हेमन्तकाल बहुगुण रमणीय असतो.

शिशिर ऋतूत रात्री प्रदीर्घ होतात, वारे सान्द्रतुषार शीतल होतात, 'प्रचुरगुड-विकारः स्वादुशालीक्षुरम्यः' असा हा ऋतू प्रियजनांच्या विरहाने संताप निर्माण करतो.

कालिदासाने षड्ऋतूंचीही जी वैशिष्ट्ये दाखविली आहेत त्यांचा आधार पारखी-शास्त्री, कृष्णशास्त्री राजवाडे, अनंततनय इत्यादिकांनी आपली ऋतुवर्णनात्मक काव्ये रचताना घेतला आहे. पारखीशास्त्री यांच्या षड्ऋतुवर्णनाचा इतरत्र जो विचार केला आहे त्यावरून वरील गोष्ट स्पष्ट होईल. कृष्णशास्त्री राजवाडे यांनी फक्त वसंत (२११ श्लोक), वर्षा (१७५ श्लोक) व शरद (१२८ श्लोक) या तीनच ऋतूंची वर्णने केली आहेत. त्यांच्याही काव्यरचनेवर कालिदासाच्या ऋतुवर्णनाचा कसा परिणाम झाला आहे हे खालील उदाहरणावरून स्पष्ट होईल.

वर्षाऋतूत सर्वत्र दिसून येणाऱ्या पाऊस– वाऱ्यांचे वर्णन राजवाडे खालील-प्रमाणे करतात—

'सूं सूं अगोदर सुटे घनघोर वारा
मागोनिया सरसरा पडताति धारा

व्योमी विजा लखलखा लवताति भारी
गर्जे बहू कडकडा घन भीतिकारी'

गवताने आच्छादिलेल्या वाटांचे वर्णन मात्र नावीन्यपूर्ण आहे. कवी लिहितात --

'वाटे तृणा उगवता सकळा बुजाल्या। संस्कारशून्य बहु संशयदायि झाल्या।
विद्या जशा परिचयाविण संशयाते। देताति लुप्त बहु होउनिया जनाते!'

शरदऋतूत

'होती समान हिम आणिक उष्ण ज्यात–
वाहे सुगंध बहु मंदहि जो वनात
सेवूनि तो जन वनातिल रम्य वारा
झाले सुखी त्यजुनिया रविताप सारा'

सर्वांना येणाऱ्या अशा अनुभवाचे वर्णन राजवाडे यांनी केले आहे.

मनमोहन नावाच्या राजाने चंद्रावलीसह वसंत ऋतूत वनविहार केला. त्या वेळी त्याच्या प्रेमभावनेला सृष्टीतील पदार्थांनी साथ दिली.

प्रियकराच्या स्वागताचे—

'कंठी धरोनि गजरे शिरि मोतियांचे
येती धरोनि नवचंपक पुष्पमाला?'

असे वर्णन केले आहे.

वरील दोनही कवींनी त्या त्या ऋतूत येणाऱ्या उत्सवांची वर्णने केली आहेत. शृंगाराव्यतिरिक्त इतर रसांना आपल्या काव्यातून राजवाडे यांनी वाव दिला आहे.

कालिदासाच्या ऋतुसंहाराच्या आधारे अनंत विठ्ठल चित्रे ह्यांनीही सहा ऋतूंची वर्णने केली आहेत (काव्यरत्नावली १९११). कवीची भाषा संस्कृतप्रचुर आहे. उदा०

'प्रियसखि रसपूर्ण पातला ग्रीष्मकाल
तपन तपवि सौख्या चंद्रमा हे विशाल'

असे ग्रीष्म ऋतूचे तसेच

'मही मृदुदलोद्गमे रुचिर सस्ययुक्त प्रिये
सुपक्व नवशालिनी विटप लोध्र फुल्ल स्वये'

अशा भाषेत कवी हेमंतऋतूतील सृष्टीचे वर्णन करितात.

राधारमण (कृष्णाजी पांडुरंग लिमये) यांनीही शरदकाल, हेमंतकाळ, शिशिरकाल, वसंतकाल, ग्रीष्मकाल आणि वर्षाकाल अशा शीर्षकांखाली विविधवृत्तांत अनेक श्लोक रचिले आहेत. सृष्टिशोभेच्या वर्णनाबरोबरच त्या त्या ऋतूत येणाऱ्या

सणांचीही वर्णने कवीने 'कालचक्रा'त केली आहेत. दिवाळीतील लक्ष्मीपूजनास उद्देशून कवीने म्हटले आहे की—

'मुहूर्त लक्ष्मी शुभपूजनाचा । पाहून हो भाव असा मनाचा ।
सारूनि साध्याप्रति दूर हाते । का यत्न हा साधनसंग्रहाते ॥'

केशवसुतांच्या दिवाळी या कवितेतील —

'साध्याला विसरून लोक करिती भक्ती कसे साधनी ।
ये हा आशय अर्थहीन कविच्या चित्तात ते पाहुनी ॥'

या चरणांची आठवण राधारमणांची वरील पद्यपंक्ती वाचून होते.

## निसर्गवर्णनात स्वतःचे वैशिष्टय दाखविणारे कवी

निसर्गविषयक वर्णनात संस्कृत कवींचेच ज्यांनी प्रायः अनुकरण केले, परंतु असे करिताना ज्यांनी स्वतःचे असे काही वैशिष्ट्य दाखविले अशा कवींत विठ्ठल भगवंत लेंभे हे येतात. त्यांच्या खंडकाव्यातून अनेक प्रकारची सृष्टिवर्णने आली आहेत. त्यांनी प्रत्यक्ष पाहिलेल्या निसर्गसौंदर्याचे वैभव डोळ्यांपुढे ठेवून त्यात पुनः संस्कृत कवींनी निर्माण केलेल्या काव्यसंकेतांची भर घालून सुरतरंगिणीतील 'भेडा नामक पर्वताचे व नर्मदेचे वर्णन' केले आहे. कवी नीतीचा पुरस्कार करण्याची संधी मिळेल तेथे घेतो. नर्मदानदीच्या तीरावर असंख्य बगळे डोळे लावून बसतात व मीनांस गिळून टाकतात, हे दृश्य बघताच दुर्जन साधूंना कसे छळतात याची त्यांना आठवण होते.

'हर्षे आमिष मत्स्य जेवि गिळता कंठी शिरे हा गळ ।
साधूचा परिवेश दुर्जन धरी तो साधु कैचा खल ।'

तत्कालीन कादंबऱ्यांतील निसर्गवर्णनाप्रमाणेच काव्यप्रांतातही तत्कालीन कवींनी सृष्टिवर्णनाच्या वेळी अधिकात अधिक वृक्षांचा व परिचित असलेल्या फुलांचा समावेश केल्यासारखा दिसतो. सृष्टीतील सर्व भाग लेंभे यांना मनोरम वाटतो. सृष्टीत कोठे अपूर्णतेचा गंधही नाही, अशी त्यांची कल्पना होती. सृष्टीकडे पाहण्याची त्यांची ही पूज्यदृष्टी खालील ओळींत व्यक्त झाली आहे—

'सौंदर्ये भरला प्रदेश अवघा आनंद येथे किती
जो तो भाग दिसे मनोरम अहा गुंगून गेली मती ॥'

फार काय पण नायकाच्या आनंदी मनोवृत्तीच्या वेळी आम्रादिक सारे वृक्ष फुलतात आणि चंडोल व कोकिल आनंदाने गातात, तसेच त्यांच्या संकटाच्या वेळी अनपेक्षितपणे आकाशात ढग जमून येतात, आणि विजा चमकतात. हे ठराविक संकेत कवीने आपल्या काव्यात पाळिले आहेत. क्षणापूर्वी ज्या नदीच्या पात्रात शांतता

असते तेथेच क्षणार्धात नायिकेवर संकट यावे म्हणूनच कवी मोठे वादळ निर्माण करतो. नाविकाने पहिले वल्हे मारले असेल नसेल तोच—

‘ एकाएकी वीज येई भयाण ।
सो सो वाजे हालवी वायु झाडी ।
वेगे मोठे वृक्ष नाना कडाडी ।
एकाएकी दृष्टि जाई दिपोनी ।’

नायिकांच्या मनोवृत्तीला प्रतिकूल किंवा अनुकूल निसर्गवर्णनाची पार्श्वभूमी निर्माण करण्याचे आरंभीचे श्रेय लेंभे यांनी घेतले हे खरे, पण तसे करिताना ठराविक संकेतापलीकडे व ‘ सत्यमेव जयते ’ या तत्त्वाला बाध न येईल अशा रीतीनेच त्यांनी निसर्गाच्या सौंदर्याचा पार्श्वभूमीकरिता उपयोग केला आहे.

## शोकावर्त

काही ठिकाणी जरी त्यांचा हा प्रयत्न कृत्रिम वाटत असला तरी ‘ शोकावर्त ’ या काव्यात मात्र वरील प्रयत्न चांगला यशस्वी झाला आहे.

कवीच्या अंतःकरणात पत्नीच्या चिरंतन वियोगामुळे शून्यता साठली होती. त्यामुळे त्यास सभोवतालच्या निसर्गात उदासीनताच दिसून आली.

‘ अहा परमनिष्प्रभा दिसति धूसरा या दिशा
समग्रसदनांतरी गिरिशिरी वसे दुर्दिन
उदास रविला गमे वदन दाविणे योग्य न ! ’

लेंभ्यांचे शोकावर्त वाचिले म्हणजे अजविलापाची आठवण होते हे खरे, तरी लेंभे यांनी निसर्गाच्या पार्श्वभूमीवर आपल्या अंतःकरणातील शोकपर भावना स्वतंत्रपणे रेखाटल्या आहेत. निसर्गातील पदार्थांवर सजीवतेचा आरोप करून स्वताच्याच सुखदुःखांचे निवेदन करण्याची पद्धती संस्कृत वाङ्मयात कुठे कुठे आढळते, तीच पद्धती लेंभे यांनी या काव्यात ठेविली आहे.

## निसर्गाकडे पाहण्याची बोधवादाची दृष्टी

कालिदासाच्या मेघदूताचे कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनी सुरस रूपांतर केले. मूळच्या काव्यात रामगिरीपासून अलकापुरीपर्यंतचा मेघाचा प्रवास कवीने वर्णिला आहे. चिपळूणकरांनी मूळ काव्याच्या अनुरोधाने मेघाच्या प्रवासातील त्या त्या सुंदर स्थळांचा निर्देश केला आहे. उदा. पावसाळ्याच्या आरंभी मेघाने पहिली वृष्टी केली. नीप फुलले, रानकेळी उगवल्या व जमिनी भिजल्याचा वास सुटला. जांभळे पिकून वनाला नीलकांती आली. नदीच्या काठावरील जाईजुईच्या ताटव्यांना मेघांचे जीवन मिळताच ती प्रफुल्लित झाली ही वर्णने यथोचित वाटतात. ( प्रकरण ८ पाहा )

कृष्णशास्त्री चिपळूणकरांचे आणखी एक वैशिष्ट्य असे की, त्यांनी स्वतंत्रपणे निसर्गातील पशुपक्षी व त्यांचे व्यवहार ध्यानात घेऊन त्यावरून मानवांना उपयुक्त ठरतील अशी काही अन्योक्तींच्या रूपाने बोधवचनेही निर्माण केली आहेत. अन्योक्तीत सृष्टिसौंदर्याच्या वर्णनाला कवीनें केवळ दुय्यम स्थान दिले आहे.

'काट्यांनी भरले शरीर अवघे छाया नसे दाटही
नाही वास फुलांस भूकही न निवे ज्याच्या फळे अल्पही'

या बाभळीच्या वर्णनात बाभळीला पुढे करून आपल्या आचरणाने इतरांना दुखविणाऱ्या व्यक्तीचाच स्वभाव दिग्दर्शित करण्याचा कवीचा हेतू स्पष्ट होतो. कवीच्या मनावर संस्कृतातील काव्यसंकेतांचा मोठा परिणाम झाला होता. सुगंध म्हणजेच कीर्ती, ती ज्याच्याजवळ नसेल ते फूल किंवा तो वृक्ष हीन दर्जाचा होय अशी कवीची कल्पना होती. चिपळूणकरांनी आंबा, चंदन ह्या वृक्षांना उद्देशून ज्या अन्योक्ती लिहिल्या आहेत, त्यावरून सृष्टीच्या सौंदर्याशी समरस होण्याची त्यांची रीत दिसून येते. परंतु ते बोधवादी कवी होते. त्यामुळे निसर्गातील प्रत्येक वस्तूमधून त्यांना तत्त्वसंशोधन करावेसे वाटले, व नीतिनियमांचे धडे त्यांनी अन्योक्तींतून इतरांना दिले. सूर्यावरील अन्योक्तीत मध्याह्नकाळी तो अतिशय तप्त होतो, ह्या त्याच्या स्थितीस अनुसरून त्यांनी खालील निष्कर्ष काढिला आहे.

'अत्युच्ची पदि थोरही बिघडतो हा बोध आहे खरा.'

संस्कृतातील सुभाषितांची आठवण या अन्योक्ती वाचल्या म्हणजे आपणास होते.

लोंढे यांनी निसर्गातील वस्तूंवर कविता लिहून लोकांना बोधाचे धडे दिले. उदाहरणार्थ—'ओढा' या कवितेत त्यांनी निर्झराच्या जीवनाचे चित्र रेखाटून त्याचा आदर्श इतरांपुढे ठेविला आहे. 'नभात सूर्योदय होतो तसेच मनात सुज्ञान उगवो' अशी सदिच्छा ते प्रगट करतात. कालमानाने पुढे होऊन गेलेले पण मनोवृत्तीने या काळात विहार करणारे अनेक कवी निसर्गाच्या आधाराने मानवाला उपदेश करावा हा हेतू मनात धरून कविता रचीत होते. उदाहरणार्थ, 'सुखदुःखाचा अनुभव' या काव्यात विद्याधर वामन भिडे यांनी 'जे नर शुचित्व पाविती' त्यांनाच पक्ष्याने आकाशात प्रसन्न मोकळ्या वातावरणात गायिलेल्या गोड सुरांचा आनंद मिळविता येईल, असे म्हटले आहे. पण पक्ष्यांचा स्वर जर मूळचाच गोड असला तर तो दुष्ट मनुष्याचा कानाला कर्कश लागेल काय ? पण या दृष्टीने तत्कालीन कवितांचे परीक्षण करणे अनुचित ठरेल.

इंग्रजी कवींच्या काव्याची भाषांतरे करिताना मूळ कलाकृतीत उतरलेल्या निसर्गसौंदर्यांचा अनुवाद ज्या कवींनी मराठीत केला अशा कवींत बजाबा रामचंद्र प्रधान यांचा उल्लेख करणे आवश्यक आहे. 'लेडी ऑफ दि लेक' या काव्याधारे त्यांनी मराठीत २३९ श्लोक रचिले (प्रकरण ८ पाहा.) मूळच्या काव्यातच

निसर्गातील सौंदर्याला महत्त्व आहे. प्रधानांनी त्यातील सृष्टिशोभेची वर्णने मराठीत आणिली. काव्यातील नायकाच्या मनोवृत्तीला सृष्टीने जी साथ दिली तिचे वर्णन करावे असा मूळ कवीचा हेतू आहे. मनोवृत्तीला प्राधान्य देऊन निसर्गाचा उपयोग तिला उठाव देण्याकरिता करावा हा इंग्रजी कवीचा हेतू लक्षात घेऊन प्रधानांनी 'दैवसेनी' काव्यात सृष्टिशोभेची वर्णने केली आहेत. पुढे हा प्रकार मराठीत चांगलाच रूढ झाला. विष्णु मोरेश्वर महाजनी यांनी जे इंग्रजीतील स्फुट गीतांचे मराठीत अनुवाद केले त्यातूनही मानवी मनोवृत्तीला पार्श्वभूमी म्हणून निसर्गाचें लाभलेले पाठबळ दृष्टिआड होऊ दिले नाही.

## सृष्टिसौंदर्याकडे पाहण्याची निर्हेतुक वृत्ति

केशवसुतांपूर्वी ज्यांनी निसर्गसौंदर्याकडे केवळ निर्हेतुक दृष्टीने पाहिले आणि सृष्टिशोभेची वर्णने केली त्यांमध्ये दत्त (द. कों. घाटे) यांचा समावेश करणे आवश्यक आहे. 'विश्वामित्रीच्या काठी' या कवितेत त्यांनी बडोदे येथील झुलत्या पुलाजवळील विश्वामित्रीच्या काठचे वर्णन केले आहे. या कवितेत उत्प्रेक्षा विपुल प्रमाणात दिसतात तरी त्यामुळे काव्यातील वातावरणाला कृत्रिमता आलेली नाही.

'वरती खाली दिसते गगन
मध्ये लंबित अपुले भवन.
वातावरणी आधाराविण गोजिरवाणी फेकिला चेंडु हा कोणी ?'

चंद्रगोलाचे हे वर्णन आकर्षक वाटते. सभोवतालच्या वातावरणाशी तन्मय होऊन एका विशिष्ट मनःस्थितीत कवीने हे उद्गार काढिले आहेत. चंद्राचे पाण्यात पडलेले प्रतिबिंब पाहून कवीने खालील कल्पना केली आहे.

'शशिरायाही आत उतरला,
कलहंसापरि पोहु लागला
तटिनीने जणु हृदयी धरला
प्रेमळ कान्त पाहुनि इथे एकान्त'

सायंकाळी सूर्य पश्चिम क्षितिजावर आला आहे. तो दमला भागला आहे. त्याला पाळण्यात घालून सृष्टिमाउलीने अंगाई गीत गायिले आहे. सृष्टीतील पदार्थांवर मानवी भावनांचा आरोप करून त्यांचे चित्रण करण्याची 'दत्तां'नी ठळक रीतीने पाडिलेली ही प्रथा पुढे अनेक कवींनी चालू ठेविली. 'बाई लतिके', 'सख्या वसंत वाता', 'मुग्ध कलिका', इत्यादी कवितांतील नायकाने प्रियेच्या विरहामुळे आपणास भोगाव्या लागणाऱ्या आर्त भावनांचेच दिग्दर्शन केलेले दिसते. या कवितांच्या मथळ्यावरून या कविता निसर्गविषयक आहेत असे वाटते, पण खरोखर निसर्गातील काही प्रसंगाच्या पार्श्वभूमीवर कवीने अशा कवितांतून मानवी भावनांचीच चित्रे प्रामुख्याने रंगविली आहेत असे दिसून येते. त्या मानाने

'कोकिलकूजित' ही नाट्यगीताच्या धर्तीवर रचलेली कविता निराळ्याच प्रकारची वाटते. वसंताच्या आगमनाची जी पहिली ग्वाही कोकिलकूजिताने मिळते त्याचे उत्कृष्ट वर्णन 'कोकिलकूजित' या कवितेत आले आहे. वसंत हा सृष्टीचा राजा आहे. चतुर खगांनी सुहास्यवदनांनी त्याला सामोरे जावे, बालतृणांनी रम्य गालिचे बनात पसरावेत, सरितांनी प्रेमाने नाचावे, तुंगगिरींनी आपले वैभव प्रकट करावे, लतिकांनी विनयाने वाकावे, दिगंगनांनी दहिंवर सिंचुनि स्नाना घालावे इत्यादी सूचना कोकिलाने अनेकांना केलेल्या दिसतात. या कवितेत कवीने कोकिलेला पुढे करून सृष्टिसौंदर्याचे प्रत्ययकारी चित्र रंगविले आहे. 'विश्वामित्रीच्या काठी' आणि 'कोकिलकूजित' या वैशिष्ट्यपूर्ण कवितांतून सृष्टिसौंदर्याच्या सान्निध्यात आपल्या मनाची होणारी काव्यात्मवृत्ती दत्तांनी यथार्थतेने चित्रित केली आहे. कवीने निसर्ग-सौंदर्याकडे ज्या आत्मीयतेने पाहिले तीच आत्मीयता पुढेही अनेक कवी निसर्ग-वर्णनात प्रगट करू लागले. दत्त हे पुढील कवींना अशाप्रकारे मार्गदर्शक झाले.

## 'यशवंतराव–' महाकाव्यातील निसर्गसौंदर्य

महाकाव्यात सूर्येंदू, रजनी, संध्या, प्रदोषध्वांत इत्यादिकांची वर्णने आणावीत हा पूर्वसूरींचा नियम वासुदेवशास्त्री खरे यांनी आपले 'यशवंतराव महाकाव्य' रचताना ध्यानात घेतला होता. मूळचे दुःखपर्यवसायी काव्यही त्यांनी आनंद-पर्यवसायी केले. उत्तरेकडील मोहिमेत असता मल्हाररावांना कमलेपासून झालेला पुत्र यशवंत. तरुण वयात त्याने आपल्या शौर्याने इतरांना चकित केले. मल्हाररावाच्या कानांवर ही वार्ता येताच त्याने त्याच्याशी युद्ध करण्याचे ठरविले. योगायोगाने मल्हाररावांना आपल्या पुत्राची ओळख पटली व पुढील घोर अनर्थ टळला. (सोहराब आणि रुस्तुम यांच्या कथेची येथे स्मृती होते)

'दुःखे पूर्ववयामधील कमला स्वप्नापरी मानते.
नेते काल परोपकारि तिजला होती कवी वानिते'

असा महाकाव्याचा शेवट कवीने केला आहे. या काव्यातही नायकाच्या व त्याच्या मित्राच्या हालचाली डोंगरप्रदेशातून होतात व अनेक संकटसमयी यशवंत हा अरवली पर्वतावरील आश्रमात राहतो. ज्या निसर्गसान्निध्यात तो आपले काही दिवस घालवितो त्या निसर्गसौंदर्याची रेखीव वर्णने शास्त्रीबुवांनी या काव्यात केली आहेत. उदाहरणार्थ सायंकाळच्या शोभेचे हे वर्णन पाहा —

'होता नभी तपत जोवरि सूर्यकांत ।
दिव्य प्रभा धरुन शोभत वस्तुजात ॥
कालक्रमे बघुन अस्तगता तयास ।
शोके जणो विकट सृष्टि दिसे उदास ॥'

रात्रीच्या वेळी

> ' नर खग मृग घेती शांत निद्रा सुखाची
> किरकिर सुरु झाली रात्रि कीटस्वरांची । '

आवशीच्या प्रहराचे वर्णन, शुभ्र चांदण्या रात्रीचे वर्णन, पुण्याभोवतालच्या प्रदेशाचे रेखीव वर्णन ह्यांतून कवींची दृष्टी कशी वास्तव आहे हे दिसून येते.

> इथुन तेथुन शेतमळे किती ।
> उठुनि भूमिस व्यापुन टाकिती ।।
> अजुन कार्तिक मास न संपला ।
> म्हणुन गारच देश दिसे भला ।।
> बसुनिया छपरावरि गोफणी ।
> धरुनि हाकिति पक्षिगणा कुणी ।।

तसेच अरवली पर्वतावरील गिरिदऱ्यांचे, सूर्यास्ताचे व चंद्रोदयाचे वर्णन फार रेखीव झाले आहे.

सारांश, जुन्या परंपरेतील कवींनी निसर्गसौंदर्याची जी स्वतंत्र वास्तव चित्रणे केली आहेत त्यात वासुदेवशास्त्री खरे यांच्या ' यशवंतराव महाकाव्या'तील निसर्ग-सौंदर्यवर्णनाला महत्त्वाचे स्थान आहे यात शंका नाही.

## ' कमला'-या खंडकाव्याच्या आरंभीचे निसर्गवर्णन

पानिपतच्या लढाईच्या काळातील एका कथानकावर उभारलेल्या ' कमला ' या अपूर्ण खंडकाव्याच्या आरंभी निसर्गसौंदयाचे जे वर्णन आले आहे ते असेच वैशिष्ट्यपूर्ण आहे. नुकताच विवाह होऊन जी सासरी आली आहे, जिला कौतुक करणारी सासू लाभली आहे, प्रियकराचा पहिला परिचय जिला अजून व्हावयाचा आहे अशा सौंदर्यवती कमलेच्या मनातील कोमल मुग्ध भावना तिनेच जोपासलेल्या फुलबागेत वाढलेल्या वेलीफुलांच्या परिसरात कशा पुलकित झाल्या त्याचे चित्र सावरकरांनी ' कमला ' या काव्याच्या आरंभी रंगविले आहे.

यौवनात पदार्पण करणाऱ्या मुग्धेप्रमाणेच ती लहानशी फुलबाग नाना नखरे करी- कधी हिरवा शालू धारण करी तर कधी रेशमी जरतारी वस्त्राच्या पदरात माणिकमोती झाकून ठेवी- चांदण्याच्या नौकेत ही फुलबाग विहार करी. वीथिकेच्या कडेच्या कदली, शेवंती, सोनचाफा, केतकी, निशिगंध आणि सूर्यफूल यांना कवींनी संजीवन दिले आहे आणि काव्यातील नायिकेच्या आंतरभावनेशी त्यांचा सुसंवाद घडवून आणला आहे. कमला जेव्हा आपल्या कोमल हातांनी लताफुलांना कुरवाळून त्यांच्याशी मधुर भाषण करी

लतेसी लावुनी गाला लाडाने वदता असे
सुमाशी सुकुमारी ते श्रवणां श्रवु नेतसे
तेव्हा – यावी व्रजासही वाचा मग ही तो लताफुले
असे मंजु वदावी की भासे बुलबुल बोलले.

फार काय तिचे मोकळे केस पाहून व त्यांना मोहून
'फुले काय लतांनी त्या ढाळाव्या फुलत्या कळ्या'

गुलाब, कमले, चाफे, बकुले, बटमोगरे यांना भोवती रचून ती जेव्हा मंगळागौरीच्या पूजेला बसली तेव्हा ती
'कल्पनांच्या मधे जैशी कविताच तशी खुले.'

असे कवीने म्हटले आहे. अशा प्रकारे नायकनायिकांच्या मनातील भाव सूचकतेने रंगविण्याच्या कामी निसर्गसौंदर्याचा आधार घेण्याची रीत सावरकरांच्या उपरिनिर्दिष्ट काव्यात दिसून येते. कालिदासाने केलेल्या कण्वाश्रमातील निसर्गसौंदर्याची आठवण वरील निसर्गसौंदर्याचे वर्णन करून देते, यात शंका नाही.

## चंद्रशेखरांच्या व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार

दत्तांची मैत्री ज्यांना लाभली होती त्या चंद्रशेखरांच्या सृष्टिविषयक कवितांतून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे गुणविशेष प्रगट झालेले दिसतात. त्यांनी आजन्म दारिद्र्यात राहूनही कवितेची सेवा केली. ज्या सद्गुणांमुळे मानवी जीवन शोभून दिसते त्या सद्गुणांचा गौरव त्यांनी आपल्या बहुविध विषयांवरील कवितांतून केला आहे. सृष्टिविषयक कवितांतूनही ही त्यांची मनोवृत्ती प्रगट झाली आहे. तत्कालीन इतर कवींप्रमाणेच चंद्रशेखरांनीही सृष्टीतील सौंदर्याचा उपयोग मानवाला बोध देण्यासाठी केला आहे. कोकिळेचा आवाज त्यांना आल्हाद देतो त्याचे कारण त्यांच्या शब्दांत द्यावयाचे तर

'बघुनि रूप नकोस फसू मते । सकल जे चमके नच हेम ते'

शरच्चंद्राला पाहून त्यांना प्रभूच्या अगाध शक्तीची जाणीव होते. महीने चंद्रिकेच्या मिषाने जणू शुभ्र वस्त्रच परिधान केले आहे, आणि ती जणू काही नष्ट आर्यप्रभाव आठवीत आहे अशी कवीने कल्पना केली आहे. भारतातील रणकेसरींनी पृथ्वीवर जे पराक्रम केले त्यांचे ते वैभव सुधारसाने भरलेल्या तडागात शशांकाच्या रूपाने कवीस दृग्गोचर होते. एवढेच नाही तर परमागती लाभलेल्या सुजनांचे जणू काही शुची सुवृत्तच या शशांकाच्या रूपाने प्रगट होत आहे, हा विचार चंद्रशेखरांच्या शुचिपूर्ण मनोवृत्तीमधूनच प्रगट झाला आहे. मोहविटपाच्या आश्रयाने राहिलेल्या जातिलतेचा मूळचा सुगंध नाहीसा झालेला पाहून कवी विव्हळ होतात. संसारनाटकात विधी विषमता निर्माण करितो हे कटू सत्य चंद्रशेखरांनी अशा वेळी

प्रगट केले आणि संसारातील सुखदुःखांची स्थिती कारंज्यातील पाण्याप्रमाणेच खालीवर होत असते, हा विचार प्रगट करिताना ते लिहितात—

'सततोत्साहे, आनंदे उडते पडते निजछंदे,
पडुनिहि उंच उडायाला याला श्रम न कदा झाला !'

सृष्टिविषयक कवितांत चंद्रशेखरांची ' घनाभिनंदन ' ही एक वैशिष्ट्यपूर्ण कविता होय. दुष्काळाने ज्यांची अन्नान्नदशा झाली आहे अशा लोकांना पर्जन्यकाळाची ग्वाही देणाऱ्या मेघाचे दर्शन किती आनंददायक वाटते ह्याचे चित्र या कवितेत आले आहे.

' घनाच्या ध्यानाने जग निजपणाते विसरले ।
म्हणोनी ते भासे जलधरसम श्याम बनले ॥ '

ही कल्पना भावपूर्ण आहे. शरद्वैभवाचा दीपावलीशी निकटचा संबंध आहे. या काळात ' नभातुनि भूवरि केतु पडती ' आणि ' बाण सरासर अंबरी उडती, ' असे ' अनलखेलन याच काळात चालते ' याचा निर्देश कवीने सूचकतेने केला आहे. ' कुंजकूजन ', ' तारातरंग ', ' वसंतमाधव ' इत्यादी चंद्रशेखरांच्या लोकप्रिय कवितांमधून सृष्टिसौंदर्याशी एकरूप होण्याची चंद्रशेखरांची मनोवृत्ती प्रगट झाली आहे. उदाहरणार्थ, ' तारातरंग ' ही कविता पाहा. ईश्वरनिर्मित निसर्गाच्या अगाध वैभवामुळे मानवाला आपल्या मर्यादेची जाणीव होते. ' मानवाच्या जिण्यापुढे मानवी श्रेष्ठता ही कःपदार्थ होय. ईश्वराच्या वात्सल्याला सीमा नाही, राव व रंक हा भेद त्याच्या ठिकाणी नाही. अशा श्रेष्ठ परमेश्वराची भक्ती करण्यातच मानवी जीवनाचे सार्थक होते ' ही आपली श्रद्धा ' तारातरंगात ' कवीने उत्कटतेने प्रगट केली आहे. ऐहिक वैभव किंवा कीर्ती ही सगळी क्षणभंगुर होत हा विचार प्रगट करिताना चंद्रशेखरांच्या वाणीला अपूर्व उदात्तता प्राप्त झाली आहे.

' असे गंजीफाचे धडधडित वाडे वसविता
दवांच्या बिंदूंचे नवलपरिचे हार करिता
दिगंती धावोनी रजनिकर चेंडू कवळिता
मनाते देहाते घडति परिताप श्रम वृथा ! '

या श्लोकातील चिंतनशीलता किती उत्कट आहे सृष्टिसांनिध्यात चंद्रशेखरांना आपल्या संसारातील कटुतेचा विसर पडे आणि सृष्टीशी!समरस होताना परमेश्वराशी समरस होणाऱ्या भक्ताप्रमाणे ते चिरशांतीचा आनंद लुटीत असत, असे या कविता वाचल्या म्हणजे ध्यानात येते. फार काय पण सृष्टीमध्ये परमेश्वराच्या प्रेमळ शक्तीचा त्यांना साक्षात्कार होतो आणि तिच्याशी समरस होताना मनाची उन्मनावस्था ते उपभोगू शकतात. द्यावापृथ्वी हे जिचे दोन भोपळे आहेत, अशी अद्भुत

वीणा व तिच्यातून उमटणारे परब्रह्मस्वरूपाचे सूर यांची मोहिनी त्यांना पडते. 'वसंतमाधव' या कवितेत सृष्टीतील वसंत हा 'वसंत' नसून 'अनंत' आहे असे ते म्हणतात. हृदयात दडलेल्या त्या अनंताचे दर्शन घ्यावयाचे असल्यास तू आपले डोळे झाकून घे, अन्य चिंतन सोडून दे, असा ते आपल्या मनाला उपदेश करितात, आणि मग त्या अंतर्मुख वृत्तीची ओळख इतरांना करून देण्याकरिता लिहितात—

'येथे नसोनि मुरली रव रम्य चाले ।
येथे न चंदन तरी वपु गार झाले ॥
येथे नसोनि रवि, तेजचि तेज आहे ।
मध्ये मनोनयन हो ! बघवे न साहे ॥'

ज्यांच्या मनातील द्वैत नाहीसे झाले आहे आणि जो आत्मौपम्यभावाने सर्वांशी एकरूप होऊ शकतो त्यालाच एक प्रकारचा उच्च आनंद मिळू शकेल ही वेदांतातील विचारसरणी ज्यांना परिचित असेल त्यांना चंद्रशेखरांच्या सृष्टिविषयक कवितेतील गूढगुंजन अपूर्व किंवा अद्‌भुत वाटणार नाही.

'कुंजकूजन' या कवितेतील आपल्या कानांवर पडणारे विहंगमाचे मधुर आलाप कोठून आणि कसे निर्माण होतात या विचाराच्या तंद्रीत असताना चंद्रशेखरांना अज्ञेय अशा भुवनसुंदर ईश्वराचे दर्शन होते.

याप्रमाणे चंद्रशेखरांचे वेदान्तप्रवण मन त्यांच्या सृष्टिविषयक कवितांतून चांगलेच प्रगट झाले आहे. देशाच्या परवशतेपेक्षाही मनाची परवशता घातक होय असे त्यांना वाटते.

**'गोदागौरव'**

'गोदागौरव' हे चंद्रशेखरांचे वरकरणी सृष्टिविषयाला वाहिलेले पण खरेखुरे आत्मप्रतीतीवर उभारलेले एक चिंतनशील खंडकाव्य आहे. गोदावरीचा उगम ब्रह्मगिरीपासून झाला आहे आणि रघुनंदनाच्या पावलांनी तिचा परिसर पुनीत झाला आहे. आदिकवी वाल्मिकीच्या स्फूर्तीचा ती विषय झाली आहे. अशा ठिकाणी 'जेथे देवतरु फुलले तेथे मी माझ्या कवितेचा पलाश कशाला फुलवू ?' असा विनम्र भाव त्यांनी प्रारंभी प्रगट केला आहे. तथापि 'शिशू मातेपुढे जसे प्रेमाने स्वैरालाप काढितो तसेच मी करणार आहे' असे ते म्हणतात. यानंतर सह्यगिरीचे आलेले वर्णन आणि त्यांनी अनुभविलेले वैभवाचे व पराभवाचे प्रसंग यांचाही उल्लेख कवीने औचित्याने केला आहे. पश्चात्तापाने सह्यगिरी कर्मफलापासून मुक्त होईल, अशी सूचना करताना भगवद्‌गीतेतील निष्काम कर्मयोगाची त्यांना आठवण होते. गोदावरीच्या जलकलरवाला त्यांनी नादब्रह्म म्हटले आहे. तिच्या सुखशीलतेला त्यांनी सत्संगतीची उपमा दिली आहे. हे तीर्थनिगमांचे सार आहे

दा. क्र. ७३६०२

असे ते म्हणतात. या गोदेच्या पवित्र जलात बुडी मारून परमसुखाचा लाभ घ्यावा ही उत्कट इच्छा त्यांनी ह्या काव्यात प्रगट केली आहे. नाशिक पंचवटीच्या परिसरात बालपणी आपण घालविलेल्या रम्य दिवसांची त्यांना आठवण होते, आणि मग कल्पनेने ज्या गोदावरीशी आपण तन्मय झालो तिचा निरोप घेताना ते भावविव्हल अंतःकरणाने, म्हणतात—

'मन रमले, मी जाऊ अथवा येथेचि राहू? सांग बरे!
चालुनि पुढती, बघतो मागे, नयनातुनि हे झरति झरे'

सृष्टिसौंदर्याचा साक्षात परिणाम होऊन कवीचे अंतःकरण उचंबळून आल्यास सौंदर्यवर्णनात किती आकर्षकता येते हे चंद्रशेखरांच्या 'गोदागौरवा'वरून ध्यानात येते. चंद्रशेखरांच्या 'गोदागौरवा'ला विद्वत्तेची जोड मिळूनही त्या काव्यात हृदयंगमत्व येण्यास कवीचे सृष्टिसौंदर्याशी झालेले हितगुजच कारणीभूत होते. देवदारु, तमाल, वड, आम्र इत्यादी ढोबळ वृक्षांचा उल्लेख कवीने 'गंगावर्णना'त केला आहे. ते वर्णन स्थूल स्वरूपाचे वाटते, पण 'गोदागौरवा'त कवीने प्रत्यक्ष पाहिलेल्या वस्तूंपैकी द्राक्षी, शाली, ऊस, भुईमूग, गहू, खुरासनी इत्यादिकांचे उल्लेख न कळतच आणिले आहेत. फार काय पण विशिष्ट वातावरणाची कल्पना यावी म्हणून चंद्रशेखरांनी अगदी खाजगत व्यक्तींचा व गोष्टींचाही उल्लेख केलेला दिसतो. त्यांची 'झाळू', 'वामन', 'शिवराम' तसेच तमसातीर व 'बाघाडीचा निर्झर' कवीच्या वस्तुनिदर्शक सृष्टिसौंदर्याची स्पष्ट कल्पना डोळ्यांपुढे उभी करू शकतात. पुस्तकातील ज्ञानाच्या आधारे सृष्टिसौंदर्याचे केलेले वर्णन आणि प्रत्यक्ष पाहिलेल्या सृष्टीचे स्वरूप आठवून नंतर त्याचे केलेले वर्णन यामध्ये केवढा फरक पडतो हे यावरून लक्षात येते.

## निसर्ग आणि केशवसुतांची मानसिक स्थित्यंतरे

केशवसुतांची मानसिक स्थित्यंतरे त्यांच्या सृष्टिविषयक कवितांत पाहावयास मिळतात. सृष्टीतील सौंदर्यात चित्ताला चिरंतन शांती देण्याचे सामर्थ्य असून, त्याच्या दर्शनाने खिन्न मनात आशादायक काव्यमय कल्पना स्फुरतात, असे त्यांना वाटे. वास्तविक जीवनात त्यांना जे अपयश येत गेले त्याचे गाऱ्हाणे त्यांनी सृष्टीपुढे निःसंकोचपणे सांगितलेले दिसते. दृष्टीचे स्वरूप त्यांना नेहमीच उदात्त, दिव्य, अलौकिक व परिपूर्ण वाटे. तिच्यापासून ते वर्डस्वर्थप्रमाणे बोधाची अपेक्षा करीत असत. सुखदुःखाचे, आशानिराशांचे, भावना-कल्पनांचे आरोप त्यांनी सृष्टीतील निर्जीव वस्तुजातावर केलेले आहेत.

मानवात अपूर्णता दिसून येते आणि सृष्टी स्वयंपूर्ण असते. तिच्या ठिकाणी ईश्वरता वास करते. अशा श्रद्धेने केशवसुतांनी सृष्टीकडे पाहिले आहे. उदा० त्यांनी म्हटले आहे—

‘ असे सुंदरता अढळ जरी कोठे ।
तर करी ती सृष्टीत मात्र वास ॥ ’

तसेच ते लिहितात—

‘ अस्मदीय हृदयी टरले की जग हे दुःखे भरले ।
म्हणुनी सुंदरतेलाही कुसे अम्हा दिसती पाही ॥ ’

आपली चित्तवृत्ती उदास झाल्यास सृष्टीतील भयानक दृश्ये आपणास सुसह्य होतात, कारण

‘ आतिल विषण्ण वृत्ति । बाह्यभैरवी धरिते भीति । ’

म्हणूनच निसर्गसौंदर्याशी एकरूप होण्यात कवीस आपल्या श्रेयाशी एकरूप झाल्यासारखे वाटते.

‘ जेथे ओढे वनराजी । वृत्ति रमे तेथे माझी ।
कारण काही साक्ष तिथे । मग त्या श्रेयाची पटते । ’

स्वतःकडे भक्ताची भूमिका घेऊन निसर्गदेवतेचे केशवसुतांनी मनोभावाने एवढे पूजन केले आहे की, सृष्टीत दिसून येणाऱ्या काही सुंदर प्राण्यांना मरणच नाही असे त्यांना वाटते.

फुलपाखराचे मरण कोणी पाहिले आहे का ? भास्कराच्या तेजाळपणात काळे डाग दिसतात का ? असे प्रश्न ते विचारतात.

सुंदर फुलास स्पर्श करण्यास ते दचकतात. कारण की दिव्यत्वाला स्पर्श करताना त्यांच्या हातांस कंप सुटतो. केशवसुतांच्या मनात वर्डस्वर्थप्रमाणेच निसर्गा-संबंधी काही निश्चित कल्पना वावरत होत्या. सृष्टी ही आरंभी स्वर्गाच्या संनिध होती, परंतु पुढे मानवाच्या ढोंगीपणामुळे ती त्यापासून निराळी झाली व दुःखात पडली. म्हणूनच निष्पाप व शुद्ध मनच सृष्टीतील स्वर्गीय सौंदर्य पाहू शकते असे त्यांना वाटे. केशवसुतांच्या जीवनविषयक कल्पनाही त्यांच्या सृष्टिविषयक गीतातून उघड झाल्या आहेत.

## टिळकांची निसर्गाकडे पाहण्याची खेळकर दृष्टी

सृष्टीकडे पाहण्याची टिळकांची दृष्टी खेळीमेळीची होती. निसर्गाविषयी वाटणाऱ्या त्यांच्या पूज्यबुद्धीत अंध विश्वास नव्हता. डोळस भक्ती व प्रेम हीच अधिक होती. निर्भेळ सृष्टिविषयकच नव्हे तर इतर विषयांवरील कवितांतूनही टिळकांचे निसर्गप्रेम दिसून येते. भावनांना ते फुले मानितात. त्यांना वाटे, ‘ विरह फुलांचा नाहि वरा ! ’ ताईला ते ‘ फूल ’ मानितात.

‘ श्रमसौंदर्य ’ ह्या कवितेतील पुढील ओळी पाहा—

‘ देहतरु हा माझा फुलला ।
घर्मबिंदुनी म्हणशिल ओला ।
म्हण परि सुमनांचा हा मेळा ।
मला दे शोभा—’

तसेच फुले गुंफण्याकरिताच आपला जन्म आहे असे त्यांना प्रतीत होते. सृष्टीतील फुलवेलींशी त्यांनी आपुलकीच्या भावाचे नाते जोडले आहे. सृष्टीतील अनेकविध पदार्थांवर संसारातील प्रेमसंबंधाचा आरोप करिताना ते सृष्टीकडे तत्त्वसंशोधकाच्या दृष्टीने न पाहता प्रेमळ मित्राची दृष्टी स्वीकारतात. सृष्टीशी त्यांचे सलगीचे हितगुज सुरू होते. सृष्टीच्या निकट सांनिध्यात त्यांना खरा आनंद होतो. स्थूलकल्पनेने सृष्टवस्तूवर ते रूपके बसवितात. सूक्ष्म वर्णनाने तिच्यातील सौंदर्य उघड करितात. ‘ वसन्त म्हणजे सृष्टीच्या करमणुकीची घडी ’ ही त्यांची कल्पना सृष्टीकडे पाहण्याची त्यांची भूमिका स्पष्ट करिते.

वर्डस्वर्थ शेले प्रभृती कवी निसर्गातील पदार्थांवर सचेतनत्वाचा आरोप करितात, आणि त्याच्या आधारे आपल्याच मनोवृत्ती प्रगट करितात. केशवसुत, टिळक प्रभृती कवीही हेच धोरण अवलंबितात. केशवसुतांप्रमाणे मनाची रुखरुख घालविण्याकरिता नव्हे तर सृष्टीतील सौंदर्याचा निःस्वार्थपणे उपभोग घेण्याकरिताच टिळक निसर्गाकडे वळतात. त्यांच्या निर्व्याज मनाचे प्रतिबिंब काव्यात पडते, आणि सृष्टिविषयक कवितांतून ते अधिक स्पष्ट होते. खालील विचारसरणीवरून टिळकांचा निसर्गाकडे पाहण्याचा कलात्मक दृष्टिकोन प्रगट होईल.

वसंताला ते मनोभावनादर्शामधले स्मित म्हणतात.

‘ ग्रीष्मामुळे सृष्टिसतीचे रम्य आरसे फुटले ग हरपले ’

असे उद्गार काढतानासुद्धा टिळकांचा समतोलपणा सुटत नाही. सृष्टीतील भयानक दृश्याकडेही तटस्थपणाने पाहणे हे निर्मल मनाचे चिन्ह होय. उदा० ‘पर्वतारोहण’ ही कविता पाहा. निसर्गातील एखाद्या भयभीत देखाव्याचेही सौंदर्यग्रहण ते आत्मीयतेने करितात. प्रत्यक्ष जीवनात अनेक दुर्धर प्रसंग निर्माण होतात, आणि त्यामुळे चित्त उदासीन होते. अशा वेळी बाहेरचे दृश्य सामान्य मनाला आनंद देत नाही. प्रियसखीच्या विरहामुळे एका कवीला आकाशात चमकणारी नक्षत्रे—रत्नमणि केवळ कोळसेच वाटतात. टिळक हे प्रत्यक्ष जीवनातील प्रियेचा होणारा वियोग हा सृष्टिसांनिध्यात सुसह्य मानितात. बाह्यसृष्टीचे अंतःसृष्टीशी गानवादन चालू आहे, असे त्यांस वाटते.

टिळकांची ध्येयदृष्टी त्यांनी लिहिलेल्या सृष्टिविषयक कवितांमधून प्रगट होते. निसर्गातील वनवासी फुलाच्या आधारे त्यांनी जीवनविषयक तत्त्वज्ञान प्रगट केले आहे. निसर्गाकडे पाहण्याचा तात्त्विक दृष्टिकोन टिळकांच्या कवितेत प्रगट झाला आहे.

माधवानुजांच्या निसर्गविषयक कवितांतून त्यांची बोधप्रद दृष्टी प्रगट झाली

आहे. उदा० ‘ दीपविसर्जन ’ या कवितेत नदीच्या पात्रात आर्यस्त्रियांनी सोडलेल्या दीपांची शोभा किती अवर्णनीय दिसते, याचे चित्रण करताना त्यांनी जीवनविषयक तत्त्वच प्रगट केले आहे.

‘ स्थितीचा असे किंकर प्राणिमात्र
स्थिती करी त्या पात्र किंवा अपात्र ’

याच संदर्भात ‘अशोक वृक्षास पाहून’ त्यांनी काढलेले ‘ तू मूक रामायण सत्य जाण ’ हे उद्गार मनोरम वाटतात.

कृष्णाकोयनांचा संगम पाहताच माधवानुजांना सुखाची क्षणभंगुरता आठवते. ‘ फुलांच्या झेल्या’त ते सखीला उपदेश करितात.

‘ सुमनासम या मानस अपुले सखये ठेवित जाई. ’

## बालकवींचे अभिजात निसर्ग-प्रेम

बालकवी हे निसर्गावर एकनिष्ठपणे प्रेम करणारे कवी होते. अनेक कवींप्रमाणेच सृष्टीतील नानाविध पदार्थांवर त्यांनी मानवी भावनेचा आरोप करून तिच्या सुखदुःखाची गाणी गाइली आहेत. आपले अपुरे ईप्सित निसर्गच पुरे करू शकेल असे त्यांना वाटे. निसर्गाची केवळ प्रकाशाची बाजूच त्यांना आवडत होती असे नाही. जितके अरुणावर तितकेच रजनीवर त्यांचे प्रेम जडलेले होते. सृष्टीतील भयानक दृश्येही त्यांच्या प्रेमाच्या कक्षेत येतात. ओसाड पडके खेडे, किंवा आडरानातील एखादा काळ्या पाण्याचा डोह, किंवा एकलकोंडा औदुंबर हे त्यांच्या उत्कट भावनांचे विषय होत. संध्यारजनी, तारका आणि चंद्र यांच्यावर मानवी भावनांचा आरोप करून बालकवींनी त्यांच्यातील प्रेमव्यवहाराचे मोठे हलुवार वर्णन केले आहे. त्यांचे रजनीप्रेम अनेक कवितांतून व्यक्त झाले आहे.

बालकवींचे सृष्टिसौंदर्यावर केवळ निर्हेतुक प्रेम होते. फुलपाखराने सुमनात ‘ स्वर्ग ’ पाहणे, अरुणोदय होणे म्हणजे दिव्याचे भांडार फुटणे, रविकिरणांवर स्वर्ग बसून येणे, काव्यदेवीने निर्झरावरून दिव्यांची अक्षय माला ओवाळून टाकणे, सृष्टिदेवीच्या सगुण बालविहगावर स्वर्गाच्या तान्ह्याचा आरोप करणे, किंवा स्वर्गाच्या तेजोगर्भात कविबाळांचा खेळ पाहणे इ. त्यांनी केलेल्या कल्पनांवरून किंवा—

‘ प्रतिभेच्या सौधावरुनी । मरुद्‌गणावरती चढुनी
अनंतात गगनी उडुनी । लीन बनुनि वातावरणी
होउनिया सौंदर्य-धनी । गुंजावी मंजुळ गाणी । ’

इत्यादी पद्यपंक्तींवरून बालकवींच्या निर्व्याज मनोधर्माचे दर्शन होते. केशवसुत आणि टिळक यांनी पृथ्वी आणि स्वर्ग यांवर बसविलेल्या काव्यकल्पनांची आठवण बालकवींच्या एतद्‌विषयक कल्पनांवरून येते हे खरे, तरीपण वरील कल्पनांच्या

परकेपणाला बालकवींनी जितका शब्दसौंदर्याने तितकाच आपल्या निर्व्याज मनोवृत्तीने आपलेपणा आणिल्यासारखा वाटतो. बालकवींनी निसर्गाच्या स्थूलस्वरूपाचे कोठे कोठे वर्णन केले आहे. तरी पण निसर्गातील विविध देखाव्यांची मूर्तिमंत चित्रे त्यांच्या अनेक कवितांतून आली आहेत. त्यांच्या सृष्टिसौंदर्याच्या खेळात 'अष्टदिशा', 'फुलपाखरू', 'बालविहग', 'बालनिर्झर', 'फुलराणी', 'मधुयामिनी', 'संध्यातारका' हे पुन्हा पुन्हा भाग घेतात. बालकवींच्या चिंतनशील वृत्तीला सृष्टीच्या सहवासात पालवी फुटते आणि ती हसरी व आनंदी होते यात शंका नाही

'सृष्टि मला खुणवीते, स्वर्गसौख्य दाखविते,
शांतीने पालविते'

'मन माझे टाकि गडे नित्य गुंगुनी'

हे त्यांनी स्वतःविषयी काढलेले उद्‌गार यथार्थ वाटतात. सृष्टिसौंदर्याचा केवळ सौंदर्याच्या दृष्टीने विचार करण्याची बालकवींची अल्लड मनोवृत्ती पुढे निसर्गाच्या सांनिध्यात उदास होऊ लागली, आणि तिला शून्यसंशोधनाचा व आत्मानात्म विचारांचा ध्यास लागून राहिला. 'शून्य मनाच्या घुमटात दिव्यरूपिणी सृष्टी भीषण वाटणार म्हणून रम्याकार चमत्कृतिप्रचुर ब्रह्मांडातील सौंदर्याचा तूं साक्षात्कार घे' असे ते कवीला सांगतात, नव्हे स्वतःलाच उद्देशून म्हणतात. विश्वातील सौंदर्याशी तन्मय होण्याची कला बालविहगास साधिलेली असते म्हणून ते त्याचा हेवा करितात.

'सुंदरतेच्या सुमनावरचे दव चुंबुनि घ्यावे
चैतन्याच्या गोड कोवळ्या उन्हात हिंडावे
अंधाराचे पाश मनाचे हे गळुनी जावे
चित्त वाटते तरल तुझ्यापरि खगबाला व्हावे'

आणि असे त्यांना वाटणे साहजिकच होते. कारण की सृष्टी हे त्यांना आपले अपुरे राहिलेले ईप्सित पूर्ण करण्याचे एक ठिकाणच वाटे, असे आरंभी आपण पाहिलेचा आहे. या ईप्सिताशी ते बालकाप्रमाणे हसत व बोलत आणि सृष्टीही त्यांच्यात उत्तराला प्रत्युत्तर देण्यास नेहमी तयार असे. केशवसुतांना सृष्टीतील दिव्यभव्यपण मुग्धता आढळे. उलट बालकवींना एकाच दिव्यभव्यपणात मोकळेपणाचा भास होई आणि एखाद्या लहान मुलाप्रमाणे ते तिच्या मांडीवर बागडत.

'पुष्पामधे प्रगट होय न जे जराही
सृष्टीत एकहि रहस्य असे न काही'

या टिळकांच्या कल्पनेप्रमाणे सृष्टीतील रहस्य शोधून काढण्याची केशवसुतांची तत्त्वजिज्ञासू प्रवृत्ती होती; उलट बालकवींना सृष्टीतील दृश्यात आपलेच स्वरूप साठविलेले दिसे, आणि त्याच्याशी तन्मय होण्यातच– नव्हे स्वतःच स्वतःशी तन्मय होण्यात– त्यांना अक्षय निर्वाण मिळे. 'कवीची इच्छा' या कवितेत बालकवी म्हणतात–

'ब्रह्मांडाची सदाफुली । अक्षय्यतेमधे फुलली ।
फुले तिची बघता नयनी–वेड भरुनि अंतःकरणी ।
फूलपाखरे परोपरी । निर्बंधपणे फुलावरी । जशी स्वये तरलित होती ।
तेवि जगाच्या फुलावरी । गंध दाटतो परोपरी ।
अनुभवुनी हर्षित व्हावे । सुखदुःखे चुंबित गावे । '

केशवसुतांनाही सृष्टीत दडून राहिलेल्या श्रेयाची तळमळ लागून राहिली होती, आणि ज्ञानाचा हेतू वरील श्रेयाचा खरा अर्थ शोधणे हाच आहे असे त्यांना वाटे, परंतु ही त्यांची इच्छा कधी सफल झाली नाही.

निसर्गातील गूढ सौंदर्याला पाचारण करण्याची ही रीत कदाचित बालकवींनी केशवसुतांपासून ( आणि केशवसुतांनी इंग्रजी कवींपासून ) उचलली असेल, पण त्यातून केशवसुतांप्रमाणे हृदयविदारक उदासीनता आढळून न येता एक प्रकारचा मनाचा प्रफुल्लितपणाच दिसून येतो.

'भासाची सर्वहि सुमने, चला चला चुंबित वदने ।
होइल मग सर्वहि गोड । मरण गोड जगणे गोड । '

या तात्त्विक कल्पनेतही निसर्गाच्या सांनिध्यात त्यांच्या मनोवृत्तीत फुलून येणारा निर्भर आनंदच प्रतीत होतो.

निसर्गातील दृश्यात आपण आपल्याच मनाची मोहक किंवा दुबळी रूपे पाहात असतो असे बालकवींना वाटते.

'जल काळे काळे हसे भयानक दिसे,
सहज बघशील तर दिसेल तुजला,
तुझीच दुबळी भूल '

'सृष्टीतील काही दृश्ये वस्तुतःच सुंदर असतात. सूर्यास्त हा सुंदर नसतोच असे कोणी मानिल्यास त्याची समजूत कशी घालावी ? सूर्यास्ताच्या सौंदर्याने माझे मन का वेडे होते हे सांगता येत नाही, पण माझ्या मनात त्याने निर्माण केलेले सौंदर्य वाङ्मयात उतरते ' असे एका रसिकाने म्हटले आहे.

बालकवींची मनोवृत्ती निसर्गमय होते की निसर्गच बालकवींची मनोवृत्ती धारण करतो असे कोडे रसिकास पडते.

निसर्गप्रेमापुढे स्वतःच्या मर्यादित शक्तीला कमी लेखून दिव्य, अज्ञात व स्वर्गीय स्वरूपाची पूजा करण्याचा प्रघात केशवसुतांच्या वेळी बराच रूढ होता. स्वर्गापेक्षा कल्पनेने कवींनी पृथ्वीला कमी महत्त्वाचे स्थान दिले, पण क्रियेला प्रतिक्रिया हा न्याय त्या वेळीच सुरू झाला. केशवसुतांना जग भिकार वाटे पण टिळकांना पृथ्वीपुढे स्वर्गसुद्धा भिकार वाटे.

आनंदीरमण या नावाच्या कवीने एका जपानी कवितेच्या इंग्रजी भाषांतरावरून ' तारे आणि कमळे ' ही कविता लिहिली. स्वर्गातील ताऱ्यांनी पृथ्वीवरील कमळास म्हटले ' तूं दु:खी असल्यास मजकडे ये ' त्यावर कमळाने उत्तर दिले--

' तुम्ही वदत की तिथे स्थिति मिळेल आनंदद
असेलहि खरे परी असति काय अश्रू तिथे '
नभस्थ वदले ' कशास तरि नाव त्यांचे इथे '
' न अश्रु ' जरि तेथ पंकज वदे ' मुळी प्रेम न '

सृष्टी हेच काही अढळ सौंदर्याचे स्थान नसून असे सौंदर्य सृष्टीकडे पाहण्याच्या मनोधर्मात आहे याची जाणीव अलीकडील कवींना विशेष होऊ लागली आहे. निसर्गाचा केवळ पार्श्वभूमीसारखा उपयोग करण्याची रीत म्हणजे निसर्गाला मानवाने दिलेले दुय्यम स्थान होय.

## गडकऱ्यांच्या निसर्गविषयक कवितांचे वैशिष्टय

सृष्टीतील बहुविध दृश्यांचा उपयोग वर्ण्यविषय सजविण्याकरिता गडकऱ्यांनी केला आहे. एखाद्या निसर्गदृश्यातील चमत्कृती पाहताच मानवी स्वभावातील तशीच एखादी चमत्कृती उघड करण्याकडे त्यांची प्रवृत्ती दिसून येते. उदा. ' गुलाबी कोडे ' ही त्यांची कविता पाहा. निसर्गाकडे केवळ तटस्थपणे पाहून त्यातील विसंगतीचा कधी विनोदपूर्ण रीतीने तर कधी गांभीर्याने उपयोग करून काव्यातील वर्ण्यविषयाला त्यांनी उठाव आणिला आहे. केवळ उपमाउत्प्रेक्षांचा ज्या कवितेत त्यांनी वर्षाव केला आहे अशा ' अरुण ', ' चिमुकलीच कविता ' या कविता लक्षात येतात. 'कळ्यांची फुले कशी झाली ?' ही त्यांची एक वैशिष्टयपूर्ण कविता आहे. या कवितेतील प्रसन्न वातावरण मन आनंदित करिते. लहान मुलाने बागेतील कालच्या कळ्यांची आज फुले कशी झाली असा आईला प्रश्न विचारला. ' आकाशातील चांदण्या हिरमुसल्या कळ्या पाहून फार कळवळल्या, आणि त्यांच्या डोळ्यांतील अश्रू दवाच्या रूपाने कळ्यांवर पडले व त्यांची फुले झाली. ' असे आईने सांगितले. ती आईची गोष्ट ऐकताच बाळ हसला आणि बाळाच्या गालांवर आईचे आनंदाश्रू पडताच त्याचीही कळी उमलली. या कवितेवर केशवसुतांच्या ' दवाच्या थेंबां'चा नकळत परिणाम झाला आहे.

निसर्गाकडे गडकरी अतिनिर्भय वृत्तीने पाहतात आणि वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून ते निसर्गाचा उपयोग अलंकाराप्रमाणे करितात.

## रेंदाळकरांची निसर्गाकडे पाहण्याची दृष्टि

गडकऱ्यांचे समकालीन कवी रेंदाळकर यांनीही आपल्या मनातील भावना निसर्गसौंदर्याचा आधार घेऊन प्रगट केल्या आहेत. निसर्गातील उल्हसित वाता-

वरणाच्या पार्श्वभूमीवर पहाटेच्या वेळी आपल्या निद्रिस्त प्रियेला

‘ उघडि नयन रम्य उषा हसत हसत आली ’

अशा गोड शब्दांत कधी जागे करावे, रंगीबेरंगी पंख हलवीत पुढे येणाऱ्या मधमाशीला ‘ गुलाब जाईजुईंनी भरलेल्या फुलबागेकडे मला नेऊ नकोस तर माझ्या हृदयाच्या फुलराणीच्या अधरदलाकडे ने ’ असे कधी सांगावे, किंवा इंद्रधनुष्य पाहून ‘ लोचनांची जरी तृप्ती झाली तरी ‘ हाय ! येणार ते नाही माझ्याकरी ’, असे म्हणून हळहळावे अशा प्रकारे रेंदाळकरांनी सृष्टीतील अनेक दृश्यांचा आपल्या मनातील भावना प्रगट करिताना आधार घेतला आहे.

## निसर्गाच्या अज्ञेय स्वरूपाची ओढ

निसर्गाचे स्वरूप अज्ञेय वाटून त्याची ओढ मनाला लागणे हा मनाचा एक विशिष्ट धर्म आहे. अशा प्रकारची ओढ बालकवींप्रमाणेच अनेक आधुनिक कवींना लागल्यासारखी दिसते. चांदराती खाडीच्या किनाऱ्यावर दोन प्रेमी जीव एकमेकां-जवळ अगदी बिलगून बसले आहेत आणि चराचरावर शुभ्र रुपेरी मोहन पसरले आहे. अशा वेळी

‘ दिव्य कुणी यक्षिणी येउनी सौंदर्यक्षण असा
अक्षयी ठसविल का गोडसा ’

असे भावनोत्कट उद्गार अनंत काणेकर निसर्गातील रम्य वातावरणाला मोहवश झालेल्या नायकाच्या तोंडी घालतात आणि पुढे ‘ चांदरात ’ या कवितेत म्हणतात

‘ बेफाम पसरिते पंख हृदय–पाखरू
उडुनिया पाहते अनंत अंबर भरू !
या इवल्या देही कसे तया आवरू !
चैन पडेना काय करू—ही आग लागली उरी
लागली ओढ कशी अंतरी ’

निसर्गातील अनंत व्यापक स्वरूपाला आपल्या हृदयपाखराने कवळू पाहणे ही कल्पना अद्‌भुतरम्य आहे. याच कवींचा निसर्गाकडे पाहण्याचा हा अदभुतरम्य दृष्टिकोन कालांतराने किती वास्तवपूर्ण झाला हे पुढील त्यांच्याच ‘ वसुधा-माईच्या ’ गीतावरून दिसून येते.

‘ वसुधामाई माझी जननी हृदयि तिच्या बिलगुन
सदा मी जगालाच गाइन !

सृष्टीतील सौंदर्याचा मानवी मनावर परिणाम होणे याला काही शास्त्रीय कारणे शोधून काढिता येणार नाहीत हे खरे, पण त्याबरोबरच असा परिणाम मनावर होणार

नाही असे मानणे सुद्धा निराधार ठरेल. पूर्ण बुद्धिवादी व चिकित्सक असे मन घेतले तरी त्याच्यावर न कळत का होईना देशकालपरिस्थितीचा व निसर्गातील वातावरणाचा थोडा फार परिणाम झाल्याशिवाय राहात नाही. या दृष्टीने निसर्गप्रेमाची भावना स्थायीभाव होण्यास योग्य आहे. हा स्थायीभाव जिज्ञासेच्या पोटी निर्माण होऊ शकेल. मात्र याच जिज्ञासेचा अतिरेक होऊन जेव्हा, निसर्गातील गूढतत्त्व मन गुंतून बसते तेव्हा परमेश्वराच्या प्रार्थनेप्रमाणेच निसर्गाच्या गूढ प्रार्थना सुरू होतात. बालकवींना जो एक प्रकारचा दिव्याभास निसर्गाच्या साहचर्यात घडून येत असे तो म्हणजे त्यांच्या कल्पनेने निर्माण केलेले निसर्गपूजेचे आत्यंतिक टोकच नव्हते काय? तथापि बालकवी व निसर्ग यांच्यात भेद न राहिल्याने त्यात कृत्रिमता दिसून आली नाही.

निसर्गातील एखाद्या दृश्याने आपल्या मनावर परिणाम केला तर त्या दृश्याचे स्वरूप कवीने यथार्थ रीतीने चित्रित करावे हे साहजिकच आहे, तथापि अनेक कवी निसर्गदृश्याने सुचविलेल्या अवांतर कल्पनांमध्येच रंगून गेलेले दिसतात. ‘ अरुणोदय ’, ‘ सध्याकाळ ’, ‘ रजनी ’ इत्यादिकांचे स्वरूप यथार्थ रीतीने चित्रित करण्याऐवजी अनेक कवी वरील दृश्यांनी आपल्या मनातील स्फुरणाऱ्या अवांतर कल्पनांनाच शब्दांकित करताना दिसतात. केशवसुत, गडकरी इत्यादिकांनी निसर्गसौंदर्यावर लिहिलेल्या कविता वाचल्या म्हणजे वरील विधानाची साक्ष पटते. निसर्गसौंदर्याचे साक्षात रेखीव वर्णन करण्याची वास्तविक पद्धती माधवज्यूलियन यांनी पुढे मोठ्या प्रमाणात सुरू केली. निसर्गसौंदर्याचा मनोभावनेशी विसंवाद किंवा सुसंवाद साधून वर्ण्यविषय सजविण्याचे कौशल्यही त्यांनी साधिले. याशिवाय वर लिहिल्याप्रमाणे निसर्गसौंदर्याचे वास्तविक स्वरूप यथार्थ रीतीने चित्रित करण्याचा प्रयत्नही त्यांनी आपल्या स्फुट कवितांतून आणि ‘ विरहतरंगा ’तून मोठ्या प्रमाणात केलेला दिसतो.

## निसर्गसौंदर्याकडे पाहण्याची वास्तवदृष्टी

माधवराव पटवर्धनांनी सृष्टीतील काही दृश्यांचा उपयोग जीवनातील काही समस्यांवर प्रकाश टाकण्यास्तव केला आहे. उन्हाळ्यात सरितेपासून दुरावलेल्या डोहाच्या अंतस्थ विरहभावनेवर आधारलेली ‘ संगमोत्सुक डोह ’ ही एक त्यांची लोकप्रिय कविता आहे. गडकऱ्यांच्या ‘ प्रेम आणि मरण ’ या कवितेत वृक्षाने विजेवर प्रेम करावे ( विजातीय वस्तूंनी एकमेकांवर ) ही गोष्ट माधवरावांना अनुचित वाटली. माधवरावांच्या संगमोत्सुक डोहाची उभारणी रूपकावरच झाली आहे. सरिता व डोह या सजातीय वस्तू असल्याने या रूपकात एवढी कृत्रिमता दिसून येत नाही, हे खरे, पण एकंदरीत रसिकांना अशा प्रकारच्या काव्यातील रूपकांचा अर्थ लक्षात घेताना आहार्य ज्ञानावस्थेची मनोभूमिका स्वीकारावी लागते. सृष्टीतील पदार्थांवर चेतनारोप करण्याकडेही माधवरावांचे लक्ष आहे. माधवरावांनी माळरानाचे

केलेले वर्णन वास्तवस्वरूपाचे आहे. मुरमाडातील खुरट चेपली गवते, नागफणी निवडुंग, दगडावरील निर्भय सरडा, या शब्दांनी एकाकी ओसाड माळरानाच्या दृश्यात कवीने वास्तवता आणली आहे. माळावर भरभरणाऱ्या वेड्या वाऱ्याचे कारण त्या ठिकाणी एखादे भग्नशून्य देऊळ तर नसेल ना? भग्न हृदयातून— देवळातून—तर दुःखोद्गार वाऱ्याच्या रूपानें बाहेर येत नसतील ना? हा प्रश्न कवीने कवितेच्या अखेरीस केला आहे. 'सृष्टीचे ध्यान' या कवितेत कवीने शेंगावलेल्या गुलमोहोराचे, पोपटी माळाचे, कमरेच्या वर येणाऱ्या ऊस— जोंधळ्याचे शांतिसुखद अशा सृष्टि-तपोवनाचे वर्णन करून अखेरीस असा निष्कर्ष काढला आहे.

'दृश्ये अंधुकती या समयी
विरे विविधता हळु हळु विलयी!
दिसे पसरली आफाट कढई
दुसरी तीवर उपडी,
मध्ये जीवन गूढ महान्'

निसर्गातील दृश्यांचा वर्ण्यविषयाशी सुसंवाद किंवा विसंवाद राखावा या हेतूने माधवरावांनी त्यांचा उपयोग केला आहे. विशेषतः या दृष्टीने 'विरहतरंग' हे काव्य लक्षणीय ठरते.

निसर्गसांनिध्यात नायिकेबरोबर घालविलेल्या काही रम्य दिवसांची नायकाला आठवण होते. गलिच्छ नगराबाहेरील ती अरुंद वाट, ती रस्त्याच्या दोन्ही बाजूंची डहाळ्यांची कुंपणे, तो गुरांच्या गळ्यांतील घंटानाद, तो कोकिळेचा कुहू आवाज कातळावर बसून खाली पाण्यात पाय टाकून संध्याकाळच्या सूर्यास्ताचे न्याहाळलेले सौंदर्य, मृग नक्षत्र लागताच कोवळ्या बाळ गवतावर हिंडणारे आरक्त मृदू इंद्रगोप ( सृष्टीच्या भालावरील शोभणारा जणू काही कुंकुमतिलकच! ) वर्षाकाळी आकाशातील मेघांची झुंज, विजेचा लखलखाट, जमिनीवर कोसळणाऱ्या पावसाच्या सरी, पाऊस संपताच सृष्टीचे दिसून येणारे मोहक रूप, काळ्या शुष्क बाभळीला फुटणारी पोपटी पालवी, पिवळ्या फुलांत तिचे लोपून जाणारे काटे, फुलपाखरांचे सुमनांशी होणारे हितगूज, अनपेक्षितपणे कोसळणाऱ्या पावसामुळे होणारी नायक—नायिकांची तारांबळ, थंड हवेतील सौगंध, पिकलेल्या जोंधळ्यावरील ती वायूची सळसळ, ती मोत्याची कणसे, ते सौख्याचे नवरात्र, यांच्या आठवणींनी नायकाच्या मनाची झालेली अस्वस्थता कवी खालील शब्दांत प्रगट करतात—

'अद्यापीहि सरूपता विविधता सृष्टीस्वरूपातली
नेत्रांना दिसते तशीच वसते चित्तात रेखाटली;
कोठे तू पण इन्दु, अद्भुत गमे सृष्टी तुझ्या संगती,
सौंदर्यात तुझ्या निरामय अता दृश्ये न ही रंगती.'

सृष्टीतील नेहमी आल्हाददायक वाटणाऱ्या व सर्वत्र दिसून येणाऱ्या मोहक स्थूल दृश्याच्या वर्णनाप्रमाणेच माधवरावांनी काही विशिष्ट स्थली दिसून येणाऱ्या विशिष्ट सूक्ष्म दृश्यांची वर्णने करून त्याच्या आधारावर नायक-नायिकांच्या जीवनातील काही विशिष्ट प्रसंग चित्रित केलेले दिसतात.

प्रियकर आपल्या प्रियेला दसऱ्याचे सोने देण्याकरिता तिच्या घरी गेला असता त्याने दाराशीच जो सुवासाचा आस्वाद घेतला त्यावरून तो गंध देवतरूच्या फुलाचाच असला पाहिजे अशी त्याची समजूत झाली, पण लवकरच प्रियेच्या या विनोदी वचनाने त्याचा भ्रमनिरास झाला.

‘ ज्ञानेशा फसलात, ’ तू हरकिले, ‘ ध्या घोस नाजूक हा ’
‘ पुष्पे ही कसची भिकार चुकता ही रातराणी पहा ! ’

आकाशात अग्रहायन लोपल्यावर अस्ताचली दिसून येणारा व्याध, दक्षिणापथ राखणारा तारा, पिंजलेल्या कापसाप्रमाणे इतस्ततः पसरलेल्या नक्षत्रांच्या राशींमधून विहार करणारा चंद्र व त्याचे गूढ असे मोनालिसाच्या स्मिताप्रमाणे भासणारे स्मित ह्यांच्या पार्श्वभूमीवर कवीने काढलेले

‘ जे आले ढग आपुल्यामधि सखे, माझाच होता गुन्हा,
गेले ते विरहानिले, विमल हे आकाश झाले पुन्हा.
आकाशात अशा निरभ्र तुजला चित्ती स्मृती रागिणी
प्रीतीच्या नयनी छबी निरखिता संमूढ मी भामिनी ’

हे उद्‌गार वरील कारणामुळे किती प्रत्ययकारी वाटतात.

प्रियेबरोबर प्रियकराने ज्या निसर्गदृश्यांचे सौख्य लुटले तीच दृश्ये त्यांच्यामध्ये वियोग घडून येताच पुढे त्यांना दुःखद वाटू लागली. बीजेची चंद्रकोर पाहताच प्रियेच्या भालप्रदेशावरील तिच्या अभावाची त्याला जाणीव झाली. प्रियेला विद्युत कल्पावे असा मोह त्याला झाला होता पण छे ! तो म्हणतो—

‘ विद्युत् वस्तुस दे दुरी ढकलुनी आकर्षुन स्पर्शुन—
माझ्याने चपला तुला न म्हणवे, ती मोहना दारुण ! ’

ग्रीष्म, वर्षा आणि शरद या ऋतूमध्ये दिसून येणाऱ्या महाराष्ट्रातील सृष्टिसौंदर्याचे एकीकडे चित्रण करीत असताच दुसरीकडे प्रियेच्या सुखद सहवासात घालविलेल्या दिवसांची नायकाला आठवण होते आणि आपल्या दोघांमध्ये विग्रह झाला तर आपण एकाच वेळी ध्रुवाला पाहू असा आपला गुप्त संकेतही तो रसिकांना विश्वासात घेऊन सांगतो. सारांश, विरहतरंगातील नायक-नायिकांच्या विविध भावछटांशी निसर्गातील अनेक दृश्ये कसा सहभाव दाखवून त्यांना रम्यता आणतात हे उघड होते. निसर्गाच्या पार्श्वभूमीचा समयोचित वास्तव उपयोग केल्यास मानवी भावनांच्या चित्रणाला कसा उठाव मिळतो हे विरहतरंगावरून स्पष्ट दिसून येते.

### माधवांचे 'हिरवे तळकोकण—'

माधवांच्या निसर्गविषयक कवितेत 'हिरवे तळकोकण' ही वैशिष्ट्यपूर्ण कविता आहे. सह्याद्रीच्या तळाशी पसरलेल्या हिरव्या तळकोकणाचे वर्णन करताना कवीने— त्यातील पाझरणाऱ्या झऱ्यांचे, नद्यांचे, रेखीव व वास्तव वर्णन केले आहे. 'कुडा', 'गोमेद', 'तेरडा', 'सोनावळ', 'गोकर्णीची फुले', 'रागाने वनात भिरकावून देणारा कवडा', 'आंबा, पांगारा, शेवरी, फणस, रानजाई, नेवाळीची फुले, औदुंबर खुरचाफा काजू' इत्यादिकांच्या समयोचित उल्लेखाने व त्या त्या वस्तूंशी संबंधित असलेल्या लोककथांच्या निर्देशाने कवीने जे एक कोकणात दिसून येणारे जिवंत वातावरण निर्माण केले आहे त्यामुळे हे गीत मनोहर झाले आहे. कोकणदेवी तळकोकणची राखणदारी कशी करते याविषयीचे कवीचे अखेरचे वर्णन फार बहारदार झाले आहे.

'धुन्द सिंधुला मारवेलिची मर्यादा घालुन ।
उभी सैकती कोकण देवी राखित तळकोकण ।
निकट माजली निवडुंगांची वेटे कण्टकमय ।
आश्रय ज्यांचा करुनि नांदती कोचिन्दे निर्भय ।
मागे त्यांच्या डुले नारळी पोफळिचे आगर ।
पुढे विराजे निळावन्तिचे निळेच जलमन्दिर
राष्ट्रदेविचे निसर्गनिर्मित ऐसे नन्दनवन ।
सह्याद्रीच्या तळी शोभते हिरवे तळकोकण । '

### 'गोमन्तदेवी'

दामोदर अच्युत कारे हे गोमन्तकातले रहिवासी असल्यामुळे तिकडची वनश्री त्यांना विशेष परिचित आहे, परंतु 'प्रादेशिक दुरभिमानाचा गन्ध देखील त्यांच्या कवितेत दिसून येत नाही.'

'नारळीतरु छत्र करी देवि तुजवरी
दुग्धधार धरित दूधसागरहि शिरी
सिन्धुलहरि चुम्बिति तव चरण वरिवरी
वैभव तव अनुपमेय अतुल सम्पदा । '

अशा शब्दांत ते गोमन्तदेवीचे अनुभूतिपूर्वक वर्णन करितात.

निसर्गसौंदर्याच्या दृष्टीने 'पावसाळ्यातील हृदय', 'शिखरावरून' इत्यादी कविता उल्लेखनीय होत. 'तुज शोधु कुठे मी' या कवितेत निसर्गदेवता व 'स्फूर्तिदेवता' यांचे ऐक्य कवीस अभिप्रेत असावे.

'बिजेची कोर', 'भाताचे रोप' यांतील सृष्टिशोभेची वर्णनेही स्थूल स्वरूपाचीच आहेत.

## बोरकरांचे निसर्गप्रेम

पुनवेच्या रात्रीस चालणाऱ्या देवांच्या उत्सवाच्या वेळी स्वर्भूचा संगम घडून दिव्यत्व उदयाला आल्याचा भास होणे, कुहूकुहूचे मंजुळध्वनी कानांवर येताच अर्ध-स्फुट गूढमंजुळ गाणे मनात जागे होणे, निसर्गदेवतेच्या वर्णनात ध्रुवाला तिचा सौभाग्य मणी, शुक्रदीपकाला तिच्या कंठातील कौस्तुभ, अंधारकुंतलातील तारका ह्या फुलमालिका अशा कल्पना रचणे, विहगाला सख्खा भाऊ मानून स्वतःच्या गायनाने विश्वाला ब्रह्मानंद देण्याची इच्छा बाळगणे, जगताला विटलेल्या जिवाने स्मशानातील भयाण एकांताचा लोभ धरणे, सृष्टिमातेने पूर्णचंद्रावरून मीठ मोहऱ्या ओवाळून त्याच्या हसऱ्या नेत्रात अंजन घालून त्याला गालबोट लावणे इत्यादी कल्पनातून पूर्वकवींच्या ( गडकरी–बालकवी–प्रभृतींच्या ) संकेतांचाच बोरकरांनी उपयोग केला आहे. निसर्गाशी हितगूज करण्याच्या कवीच्या पारंपरिक वृत्तीला पुढे निराळेच वळण मिळाले. इ. स. १९३० च्या नंतर कलावंताच्या तटस्थ आस्थेने गोव्यातील निसर्गाकडे पाहण्याची दृष्टी त्यांना लाभली ! ‘ सांजवेल ’ या कवितेतील नैसर्गिक दृश्ये कवीच्या भावनेमध्येच मुरून गेली आहेत असे वाटते. ‘ सूर्य मावळला आहे, पक्षी दमून भागून, घरट्याकडे परतले आहेत, नभीचे रंग विटून ‘ गाभा ’ गढूळला आहे, तप्त सावळ्या भूमीचा कोंडलेला श्वास मोकळा होत आहे, कोलाहलाने वायूच्या स्कंधावर मान टाकली आहे, सांध्यजल चुळबूळ करीत आहे, ( त्याचे भाव खळाळत आहेत. ) नौकेतल्या दीपांना सावधानता येत आहे, आणि जळाचे काळीज खिन्न होत आहे पण त्यातच तेजोरेषा थरारत आहेत, आणि दीपांना आश्चर्य वाटत आहे ’ अशा वेळी गूढ घंटारव कानावर येत आहेत व कवीची वृत्ती मंत्रमुग्ध होत आहे. हे दृश्य कवीच्या भावनेप्रमाणेच जिवंत व गतिमान वाटते यात शंका नाही. ‘ एका सायंचित्रा’-तील कवीचे प्रेमभाव

‘ कवन जाहले पुरे तरीही सळसळती झावळे
खळबळते मनि काय कळेना ऊन मात्र मावळे ’

या उद्गारांत निसर्गसौंदर्याशी एकरूप झालेले दिसतात. याच संदर्भात ‘ सांध्य-सुंदरी ’ ‘ माझी आगबोट ’ ‘ हे नभ नक्षत्री भरलेले ’ ‘ श्रावणदर्शन ’ इत्यादी कवितांची स्मृती होणे साहजिकच आहे. ‘ माडाचे भावगीता’ त आगळेच सौंदर्य आढळते. मानवावर माडाने आजन्म प्रेम केले व ज्याच्या शिरावर कोटितीर्थ आहे त्याच माडाच्या गळ्यास सुरी लावण्यास मानव चुकत नाही. पण असे असूनही मानवावरचे माडाचे अढळ प्रेम कमी झालेले दिसत नाही. तो म्हणत आहे

‘ दुर्गतीतही परी तुला करीन साथ मी
भावबद्ध मी तुझा तुझाच मित्र नेहमी. ’

केवळ प्रादेशिक वातावरण लाभले आहे म्हणूनच नव्हे तर कवीच्या मूक गूढ गोड भावव्यथा त्यात लुप्त झाल्या आहेत म्हणूनच 'माझ्या गोव्याच्या भूमी'त हे निसर्ग-गीत सुरम्य वाटते!

## निसर्गसौंदर्याचे वातावरण आणि ग्रामीणगीते

खेड्यातील वातावरणात वाढलेल्या व्यक्तींच्या सुखदु:खांची, त्यांच्या भावना-विचारांची वास्तव शब्दचित्रे त्यांच्याच स्वाभाविक भाषेत ज्या गीतातून प्रगट होतात त्यांना स्थूलमानाने ग्रामीणगीते (जानपदगीते) म्हणणे इष्ट होईल. चंद्रशेखरांच्या 'काय हो चमत्कार' व 'उघड गुपित' या खण्डकाव्यातून आणि गिरीशांच्या 'आंबराई'तून खेड्यातील माणसांच्या स्वभावांची जी चित्रे आली आहेत, त्यांतून त्यांनी प्रगट केलेल्या भावना ते ज्या वातावरणात वाढले त्यांना धरूनच चित्रित झाल्या आहेत आणि त्यामुळे ती वर्णने वास्तव वाटतात. यशवंत, ना. घ. देशपांडे, आनंद (बर्वे), दा. अ. कारे, बा. भ. बोरकर, ग. ल. ठोकळ, ग. ह. पाटील, के. नारखेडे इत्यादिकांनी लिहिलेल्या ग्रामीण गीतांतून विशिष्ट प्रादेशिक वातावरण आणि त्या त्या वातावरणात वाढलेल्या व्यक्तींचे स्वभावविशेष असे दुहेरी गुण प्रगट झाले आहेत. 'रानजाई' 'तिथे' (ग. ह. पाटील), 'गरिबीचा पाहुणचार', 'लक्ष्मी' (ग. ल. ठोकळ), 'कारभारणीस' (आनंद), 'शीळ' (ना. घ. देशपांडे), 'कळणार कधी' (के. नारखेडे), 'मळ्यात जाताना' (सोपानदेव चौधरी) इत्यादी गीतांतील भावना विशिष्ट वातावरणाच्या संदर्भात परिणामकारक झाल्या आहेत. 'न्याहरीचे गाणे', 'वाकळ', (यशवंत), 'गुराख्याचे गाणे' (भा. रा. तांबे), 'भलरी' (गिरीश), 'आला खुशीत समिंदर' (अनंत काणेकर) इत्यादी गीतांतील विविध विषयानुसार ग्रामीणगीतांचे 'गोपगीते', 'किसानगीते', 'दर्यागीते' इत्यादी प्रकार निर्माण होतात.

नागरी यांत्रिक जीवनाचा उबग आलेल्या कवींनी खेड्यातील जीवनाकडे स्वप्नाळूवृत्तीने पाहून त्यातील रम्यतेची गाणी गाणे हा प्रकार 'खेड्यातील घराकडे', 'खेड्यातील आनंद' (आशागीत) 'मंजुळा—' (काव्यविहारी) अशा प्रकारच्या कवितांतून आढळतो. दूरचे डोंगर सुंदर दिसतात हा न्याय अशा गीतांना लागू पडतो. याच्या उलट खेड्यातील जीवनाशी समरस होऊन तेथील गुलाबाप्रमाणे काट्या-सराट्यांचे यथोचित चित्रण करणाऱ्या ग्रामीणगीतात अधिक वास्तवता असते. जीवनातील विविध अनुभव प्रगट करिताना ज्या शब्दप्रतिमा अगर उपमा कवी योजतात, त्यातून ग्रामीण वातावरणाची कल्पना येते आणि अनुभवांची तीव्रता व जिवंतपणा यांचा लाभ वाचकांस होतो. 'बहिणाबाईंच्या गाण्या'तील—

'धरित्रीच्या कुशीमधी बीयबियानं निजली.
वऱ्हे पसरली माटी जशी शाल पांघरली.' (देव अजब गारोडी)

हे वर्णन जितके यथार्थ तितकेच ते आईला आपल्या अपत्याविषयी

वाटणाऱ्या मायेचे स्वरूप उघड करणारे आहे, म्हणूनच अशी ग्रामीण गीते आनंददायक वाटतात. संसाराचे वरचे रूप खडतर वाटले तर त्यातही अधिक गोडी असते. हा भाव व्यक्त करताना बहिणाबाई लिहितात :—

‘अरे, संसार संसार म्हनू नको रे भीलावा
त्याले गोड भीमफूल – मधी गोडंब्याचा ठेवा ॥

(संसार)

**‘काय हो चमत्कार’**

चंद्रशेखरांनी लिहिलेल्या ‘काय हो चमत्कार’ या खंडकाव्याला ग्रामीण वातावरण लाभले आहे. शेतामध्ये राबणारा कष्टाळू धनाजी पाटील, त्याची बायको राजाऊ या दोघांना केवळ जीव की प्राण अशी त्यांची रूपवती व लावण्यवती मुलगी जिऊ, धनाजीच्या शेतात राबणारा आणि जिऊच्या प्रेमाने घायाळ होणारा शिवबा... वडील मंडळींच्या अपरोक्ष त्या दोघांच्या होणाऱ्या प्रेमलीला, धनाजीने त्यात घातलेला मोडता, त्यानंतर जिऊचे मामाचे घरी वास्तव्य, जिऊच्या ध्यासाने शिवबाने शेवटी सोडलेला प्राण–भुताच्या रूपाने शिवबाने झुंजाराच्या घरी केलेले गमन, भिरक्यातून ‘जिऊ–शिवा’चा प्रवास, ती कडाक्याची थंडी, जिऊच्या अंगातील चोळीने शिवबाने बांधलेली कपाळपट्टी; धनाजीच्या दाराशी आलेले भिरके–शिवबाचे परत पंचतत्त्वात विलीन होणे–जिऊला पुढे कळून आलेले शिवबाच्या निधनाचे वृत्त, आणि त्याने निधनानंतर आपल्या प्रेमाकरिता घेतलेले रूप, या सर्वांचा जिऊच्या मनावर झालेला परिणाम, तिचा मृत्यू आणि अखेरीस धनाजी व राजाऊ यांचा शोक इत्यादी प्रसंगांची चित्रणे चंद्रशेखर यांनी इतक्या आत्मीयतेने केलेली आहेत की, या काव्यावर Suffolk Miracle या इंग्रजी काव्याचा अप्रत्यक्ष परिणाम झाला आहे हे मराठी वाचकांच्या लक्षातही येत नाही. एकदा शिवबाने धनाजीस शेतात ‘रामराम’ केला होता, परंतु धनाजीने त्याकडे पाहिले नव्हते, हे शल्य शिवबाच्या मनात डाचत होते. त्यातच तो आजारी पडला. बेशुद्धावस्थेतच तो बरळू लागला.

“कोन तुमी? राजाऊ! पन इकता राग ह्यो कशापाई?
नग कारबार तुमचा! जिऊ म्हनुन का हितं दिसत नाही?
म्या रामराम केला, पाटिल नव्ह का खळयात ह्ये आल–!
कोन जिऊ! जात्वो मी घरास. पन ह्ये असं कसं जालं.”

केवळ शिवबाच्या या कुणबाऊ भाषेमुळेच हे जानपद खण्डकाव्य आकर्षक झाले आहे असेच केवळ नाही, तर यातील व्यक्तिदर्शन ग्रामीण वातावरणात वाढलेल्या स्त्रीपुरुषांचे मनोगत यथार्थपणे चित्रित करणारे आहे म्हणूनच हे ग्रामीण खण्डकाव्य यशस्वी झाले आहे. शिवबाने भिरके झुंझाराच्या घराजवळ आणले तेव्हाचे त्याचे उद्गार असे—

'ह्ये बैल भडकल्येती, वोढा व्येती घराकडे जाया
पाटिल मला म्हंगालं व्ये भिरकं जा जिऊस आनाया'

झुंजार बाहेर येऊन पाहतात तो

'बैल कशाचे! बारे! निघोनि गेलेहि भिरते भिरके
झुंजाराचे काळिज मांजरपाटापरी उभे चिरके!'

'कडक थंडीमुळे आपले डोके फार दुखत आहे म्हणून आपल्या कपाळाला बांधावयास काहीतरी दे' असे शिवबाने म्हणताच

'च्वोळी वाचुन संगे नाई काईच आनले राया'

हे जिऊने त्याला दिलेले उत्तर आणि

'चालल वे या वक्ती च्वोळीबी बांदतो कपाळाला
माझी कपाळपट्टी दिसेल व्हय रातची सकाळाला?'

आणि 'काय हो चमत्कार!' पाटील अंत्यभूमीत गेले आणि कवटीला करकचून आवळलेली चोळी त्यांना दिसली! कवीने उद्गार काढले आहेत

'प्रेमा तव राज्यामधि अघटित म्हणुनी न एकही बाकी—
हृदयत्राण जिऊचे करिति शिरस्त्राण तेंच शिवबा कीं!'

शिवबाला दहन करण्याऐवजी पुरण्यात आले या विपरीत घटनेकडे कवीने दुर्लक्षच केले आहे. रसिकाने तसेच करणे इष्ट. ही अद्‌भुतता एकंदर कथानकाचा शेवट परिणामकारक करण्याकरिताच आली आहे, म्हणून ती अनुचित वाटत नाही असेच कोणीही म्हणेल.

सृष्टिसौंदर्याच्या स्थूल वर्णनात रंगून जाण्याचा धर्मही अनेक कवींच्या ठिकाणी आढळतो. यशवंतांची चाफळाजवळील 'मांडवी' गिरीशांचा रहिमतपूरच्या बाजूचा 'कमंडलूचा ओढा' आणि 'हिरवा माळ', माधवजूलियनांचा 'दिनान्त', कारे यांची 'दुपार,' ठोकळ यांचे 'मायघर' या कवितांतून कवींच्या मनावर निसर्गाचे लहानपणीच जे संस्कार झाले त्यांचेच ठसे त्यांनी लिहिलेल्या काव्यात दिसून येतात.

गिरीशांनी 'आम्बराई'त निसर्गसौंदर्याची यथार्थ वर्णने केली आहेत. शरद ऋतूच्या सुरुवातीच्या सृष्टिशोभेचे वर्णन, कृष्णा नदीचे वळण, व त्याच्या पाठीमागच्या बाजूस शोभणारे तीन निळसर डोंगर यांच्या वर्णनाच्या पार्श्वभूमीवर मुरार व सगुणा यांच्या मनांतील आंदोलने कवीने बहारदार रीतीने रेखाटली आहेत. पण 'वेळू' आणि 'अम्भेरी' या दोन गावांच्या शिवेवरून वाहत जाणाऱ्या ओढ्याच्या प्रवाहाने या खण्डकाव्यातील व्यक्तींच्या जीवनप्रवाहाला जे एक गूढ वळण दिले आहे त्याचेही आकर्षण मनाला मोठे वाटते! सृष्टिसौंदर्याच्या सान्निध्यात बहुतेक कवींना जीवन-विषयक तत्त्वज्ञान प्रगट करण्याची स्फूर्ती होते. हे येथेही दिसून येते.

गिरीश यांच्या 'सुंदर हिरवे माळ' या कवितेतही वर्षारंभी सपाट प्रदेशावरील धूसर दिसणाऱ्या माळाचे वर्णन आले आहे. माळावर पाऊस पडला, राने, पाखरे, गुरेवासरे संतुष्ट झाली पण 'शेतकऱ्याच्या पोटामधील जाळ कधी निवेल ?' असा कवीने प्रश्न केला आहे.

सृष्टिवर्णनाच्या आधारे मानवी जीवनातील रहस्य उलगडून दाखविणे यात रसहानी होते काय ? असा प्रश्न निर्माण होतो. सृष्टिसौंदर्याशी एकरूप झाल्यावर कवीला सुचणारे तत्त्वज्ञान हे ज्या मानाने स्वाभाविक स्वरुपाचे असेल त्यामानाने ते कमीअधिक रसहानिकारक होईल असे वाटते. कवीने सृष्टिवर्णनाधारे काढलेले जीवन विषयक निष्कर्ष हे काही अबाधित स्वरुपाचे नसतात, त्यावरून कवीच्या व्यक्तिमत्त्वाचा बोध होतो एवढेच काय ते त्यांचे महत्त्व.

## प्रादेशिक वातावरण

काही कवींच्या बाबतीत असे दिसून येते की ज्या निसर्गात ते बालपणापासून वाढतात त्याचेच त्यांच्या काव्यात प्रत्यक्षपणे जिवंत शब्दचित्र उमटते. कवींच्या एकंदर काव्याला प्रादेशिक पार्श्वभूमीचा लाभ होतो. दामोदर अच्युत कारे व गणेश हरी पाटील यांच्या काव्यांना त्यांच्या जन्मभूमीचा गुण लागलेला दिसतो. कारे यांना गोमांतक जितके प्रिय तितकेच पाटलांना शिवप्रभूंचे जन्मस्थान हे स्फूर्तिदायक वाटते. एकेकाळी सह्याद्रीच्या कडेकपारीतून शिवरायाच्या घोडदौडीचे पडसाद उमटत होते आणि अबलख वारूवर स्वार होऊन व डोक्याला भरजरी मंदील बांधून आपलेच वाडवडील येथे थाटामाटाने मिरवत होते या गोष्टीची तीव्र जाणीव पाटलांना आहे, म्हणून भग्न दुर्गावर वाढलेली रानजाई त्यांना मराठमोळ्यात वाढलेली एक सुकुमार बाला वाटते. रानजाईला निसर्गकन्या कल्पिल्याने तिच्यावर कण्वाश्रमातील शकुन्तलेचा आरोप केल्याने किंवा "शेलाच कोणी वनदेवता की ! हिच्या मिषाने विसरून गेली"। असे म्हटल्याने त्यांचे पूर्ण समाधान होत नाही. शिवरायाच्या स्वातंत्र्यदेवीच्या माधुरीचा आस्वाद रानजाईच्या प्रत्यक्ष दर्शनाने होतो असे ते मानतात आणि म्हणतात, 'धालो असा पाहुनि रानजाई। अजून डोळ्यापुढुनी न जाई !!'

पोपईच्या बागेत विहिरीजवळ असलेली कुडाच्या झोपडीवजा पडाळीची आपली राहती जागा, वट, नान्दुरखी आणि पिंपळ यांच्या शीतळ व सान्द्र छायेत आपण घालविलेला काळ, कोणाला नकळत शिन्द्यांच्या सुंदर आम्बेराईकडे पायवाटेने आपण केलेल्या सहली, किंवा जेथे तरवड-बाळे आपले खुळखुळे वाजवीत सोनावळीच्या फुलांबरोबर डोलत आहेत आणि जिथे करडांसह शेरड्या बागडत आहेत असे एकान्त स्थल, ह्या सर्वांच्या आठवणीत कवी रंगून जातात; मग काव्यात त्यांचे रमणीय पुनर्दर्शन झाल्यास नवल काय !

## निसर्गसंदेश की कविसंदेश ?

इ. स. १९३५ नंतर प्रसिद्धीस आलेल्या अनेक कवींची निसर्गाकडे पाहण्याची दृष्टी वास्तवस्वरुपाची झाली आहे. निसर्ग काय किंवा मानव काय ही अज्ञात अशा दिव्य शक्तींची स्फुरणेच होत. निसर्ग आणि मानव ह्यांच्यात एक प्रकारचा सहानुभाव आहे, निसर्गाच्या हातात हात घालूनच मानव आपली प्रगती करू पाहात आहे. या कल्पना अलीकडील कवींच्या मनात वावरताना दिसतात. उदा०

‘ निसर्गात जे जे आहे ते मानवातही
निसर्गाची जी अंतिम सीमा
मनुष्यकार्यांचा आरंभ तेथे
तेथून विकास मानवतेचा ’ ( अनिल )

मानवाची कला, शास्त्रे व तत्त्वज्ञान हीं सर्व निसर्गाहूनही मनुजात अधिक एकवटलेली आहेत. मानवधर्म निसर्गशक्तीशी मनुजवृत्तीला सहकार्य करावयास सांगतो. निसर्गाची देवाप्रमाणे पूजा करणे, त्याच्यापुढे भयभीत होणे, ते एक विश्वसनीय आदराचे स्थान कल्पून त्याच्यापुढे आपले मन मोकळे करणें, त्याच्यात चैतन्य कल्पून त्यावर मानवी सुखदुःखाचा आरोप करणे, त्यातील दृश्यांचा आपल्या मनोवृत्तीशी सुसंवाद किंवा विसंवाद राखणे, त्यात दिसून येणाऱ्या अनेक दृश्यांचे तटस्थपणे चित्रण करणे, इ. अनेक निसर्गाकडे पाहण्याचे दृष्टिकोन आधुनिक कवींनी प्रगट केले; पण बारकाईने विचार केल्यास ‘मानव हा निसर्गापेक्षा श्रेष्ठ आहे’ ह्याच कल्पनेचा प्रादुर्भाव अलीकडे जास्त झालेला दिसतो. निसर्गाच्या सान्निध्यात अलीकडील कवी आपले व्यक्तिमत्त्व प्रगट करतात. एकीकडे निसर्गसौंदर्याशी तन्मय होतानाही दुसरीकडे आपले वैयक्तिक स्वातंत्र्य कलात्मक रीतीने अलग ठेवतात. निसर्ग-नियमांच्या आधारे त्यांनी एखादा मानवी जीवनाला उपकारक होणारा ध्वनी (संदेश) प्रगट केला तर तो ‘निसर्गसंदेश’ न ठरता ‘कविसंदेश’च ठरतो. उदा० व्याकुळ पृथ्वीने प्रखर उन्हात होरपळत असता एकही दुःखाचा हुंदका दिला नाही, पण आपल्या जीवाचें पाणी ती ‘ तरुलतांच्या खोल मुळां’ना देत होती, म्हणूनच वसंतऋतूंत फळा-फुलांना बहर आला व बुलबुल कोकिल गाऊ लागले; अशा परिस्थितीतही ‘ पेर्ते व्हा ’ पक्षी मात्र शांतच राहिला. तो गाण्याची योग्य संधी पाहात होता. वादळी वारे वाहत होते, पिकली पाने जमिनीवर पडत होती, मृगजळाचे भास जीवांना भुलवीत होते, ‘ पेर्तेव्हा’च्या कंठातून शब्द फुटत नव्हता, तो वर्षारंभी येणाऱ्या गर्द ढगांची वाट पाहात होता आणि जेव्हा विजा कडाडू लागल्या व पावसाच्या सरींवर सरी पडू लागल्या तेव्हा हा ‘ पेर्तेव्हा ’ पक्षी भराऱ्या घेत आकाशात उडाला व सांगू लागला ‘ भीऊ नका, सत्वर उठा, नवी बीजे पेरा, नव्या आशा धरा ’, नांगरलेल्या नव्या भूमीवर विरट्या घालीत ‘पेर्ते व्हा’चा हा जो संदेश पक्षी देत आहे, तो संदेश खरोखर ‘कविसंदेश’च आहे. ‘ आजच्या जगाच्या कोंदट वातावरणात जो अनेकांना आतल्या

आत मनस्ताप भोगावा लागतो त्याचाही आता लवकरच शेवट होणार आहे, नवविचारांच्या ढगांतून आशेचे किरण बाहेर पडतील आणि पृथ्वी ही जशी सस्यश्यामल होईल त्या प्रमाणे जगतातही आनंदाचे व शांतीचे साम्राज्य पसरेल ' असा एक सूचक अर्थ वरील कवितेतून निघतो.

आकाश ढगांनी भरले आहे, अनिलगण इतस्ततः पसरले आहेत, संध्याकाळी क्षितिजावर शोभणाऱ्या सूर्याच्या पिवळ्या किरणांनी माड न्हाऊन निघाले आहेत, घनात तृप्तीचे धन पाहून मन शांत होत आहे, ही ' हरिकरुणा ' पाहून विहंगवृंद डोलत आहे, धरा हरित होत आहे, सर्वजण पावसाची वाट बघत आहेत तोच—

' टप् टप् ' टप् पडति थेंब
मनिवनिचे विझति डोंब
वत्सल ये वास भूमि—आशीर्वच बोले—
—जलद भरुनि आले '

येथेही कवी बा. भ. बोरकर निसर्गातील एका दृश्याशीच समरस झाले आहेत, पण ' जलदा'च्या रूपाने त्यांना ' हरिकरुणे'चा भास होत आहे. ' जगात लवकरच सुखशांती दिसून येईल ' या भूमातेच्या आशीर्वचनात कवीचेही आशीर्वचन मिसळलेले आहे.

इंदिरा संत 'पावसाळ्यातील डबक्या'चे वर्णन करतात— ' एका गर्वोद्धताची मोटार चिखलाची कारंजी उडवीत त्या डबक्यावरून पुढे जाते, ते डबके हा ताप सहन करते, रविकिरणांच्या स्पर्शाने, शीतल वायूच्या लहरीने, किंवा गोजिरवाण्या बालबालिकांच्या खेळाने ते आनंदित झाले नाही, पण कडक उन्हाच्या वेळी लूतभरू श्वानाने जेव्हा आपली तहान त्या डबक्याच्या पाण्याने भागविली तेव्हा ते डबके कृतार्थ झाले ' येथे सृष्टीतील एका विशिष्ट दृश्याच्या चित्रणात कवयित्रीची प्राणिमात्रावरील व्यापक सहानुभूति प्रगट झाली आहे.

## जुने संकेत

पूर्वीच्या कवींचे निसर्गाकडे पाहण्याचे ठराविक संकेत असत. ' वसंता'ने सर्व ऋतूंच्या राजाची जी एकदा जागा पटकाविली होती ती तो काही केल्या सोडीत नव्हता. काही कवी भोळेपणाने त्याच्याच स्तुतीचा सूर आपल्या काव्यातून काढीत असत. वास्तविक पाहता प्रत्येक ऋतु आपापल्यापरीने वसुंधरेला सौंदर्याचा साज चढवीत असतो, पण वर्षाकाळातील दिवसांना दुर्दिन म्हणण्याचाच संप्रदाय चालू झाला. हा जुना संकेत निकुंबांनी ' वर्षा ' या कवितेत पुढील शब्दांत झुगारून दिला आहे.

'वसंत, वसंत म्हणून तेव्हा
कलाविलासाचा केला वडिवार
जीवनकलेची प्रतीति मात्र
तुझ्या रूपातून लाभते आज !'

निसर्गाच्या सान्निध्यात चित्तावरील संस्कृतीचे दडपण उडून जाणे आणि मन उदात्त तत्त्वाशी निगडित होणे अशी अनेकांची मनस्थिती झाली आहे. कुसुमाग्रजांची 'निळापक्षी' ही कविता वाचली म्हणजे एखादे उदात्त तत्त्व मनाला स्पर्श करताच मन कसे बेभान होते पण ते 'मखमाली मार्दव' झट्दिशी लोपून जाताच मनाची स्थिती कशी केविलवाणी होते याची प्रतीती येते.

## समतेचा पुरस्कार

निसर्गातील दिसून येणारा जीवनकलहही मानवाला खडतर परिस्थितीशी टक्कर देऊन पुढे जाण्याला सुचवितो. जग हे काही विशिष्ट लोकांसाठीच आहे, सामान्य लोकांकरिता नाही हे सत्य प्रगट करण्याकरिता रा. अ. काळेले यांनी म्हटले आहे की, हे कुंडीमधल्या फुलझाडांनो तुम्हांला आपल्या थोर नशिबाचा गर्व वाटतो काय ! पण तुमचा तोरा व्यर्थ आहे तुम्ही भाग्याच्या बळावर मोठे झालात, माळ्याच्या कृपेवर तुमचे ऐदी जीवन अवलंबून आहे, तुमची ही झाकी दिखाऊ आहे, तुम्ही जीवन्मृत आहात, पण ही माळावरील इतस्ततः उगविलेली झुडपे पाहा, त्यांना वादळवारा झोडपत आहे आणि पावसाचा निर्दय मारा ती सहन करीत आहेत, हिवाळा त्यांना दंश करील व उन्हाळा त्यांना भाजून काढील पण—

'झुंजत झगडत कशीं आहेत नेटाने जीव धरून,
न कळो कोणाला कशासाठी आहे यांचे जीवन
पण खचित त्यांनाच, त्यांनाच कळले जीवन !'

सामाजिक क्षेत्राप्रमाणेच निसर्गातल्या काही उपेक्षित व बहिष्कृत अशा वस्तुमात्राकडे आपली दृष्टी वळवून समतेचा पुरस्कार करावा हा नवदृष्टिकोन अनेक कवींनी प्रगट केला आहे. उंचावरून सपाटीकडे खाली वाहत जाणारे पाणी मार्गातल्या दगड धोंड्याशीं धक्काबुक्की करीतच पुढे जाते, पण त्यामुळेच त्याच्या आवतीभोवती बागा बहरतात व शेते डवरतात. त्या पाण्याचे ओघ बनून त्याच्या सरिता होतात त्याचे स्वरूप विराट होते, सूर्य किरणांचा प्रखर ताप सहन करीत हेच पाणी ढगाच्या रूपाने आकाशात जाते व खाली पुन्हा जमिनीवर कोसळते. निसर्गात दुर्बलांचा उद्धारच झालेला दिसतो. मग आजच्या पददलित मानवाचाच उद्धार का होणार नाही ! अशा अर्थाच्या रा. अ. काळेले यांच्या 'उद्धारा'सारख्या कविता पूर्वीचे काही अवशिष्ट रूढ संकेत नाहीसे करीत आहेत. याच संदर्भात 'शिशिरातील पौर्णिमा'

(शरच्चंद्र मुक्तिबोध), 'रूळ' (मंगेश भगवंत पदकी) 'सुप्त ज्वालामुखी' (भ. श्री. पंडित) 'हिमलाटा' (कुसुमाग्रज) इत्यादी कविता लक्षात येतात.

ह्या कविता केवळ निसर्गसौंदर्यविषयक नाहीत. त्यातून सामाजिक उद्‌बोधनाचा प्रत्यय वाचकांस कसा येतो हे पुढील प्रकरणात स्पष्ट केले आहे.

निसर्गसौंदर्याच्या आधारे आपल्या मनाला आश्वासन देण्याची रीत नव्या काव्यातही दिसून येते. सर्वसृष्टी जरी करपलेली दिसली तरी पिवळ्या पानांच्या मनातही महान 'वसंत-स्वप्न' फुलते; असे बा. रा. कान्त यांस वाटते आणि अजूनही खेडुतांच्या अकृत्रिम जीवनात विंदा करंदीकरांना 'ईश्वराचा पहिला भास' होतो. अर्थातच निसर्गाकडे पाहण्याची ही पद्धती पारंपारिक स्वरूपाची वाटते.

## निसर्गाकडे पहाण्याची निर्भय वृत्ति

मर्ढेकरांनी निसर्गाकडे निर्भयवृत्तीने पाहिले आहे. आजच्या धावपळीच्य समाजव्यवस्थेत मानवाला नैसर्गिक-जीवन कंठणे सुद्धा कठीण होऊन बसले आहे ह्याची जाणीव त्यांना आहे. निसर्गातील वातावरणाचा आजच्या मानवावर जणू काही परिणाम होत नाही. माघ महिन्यातील मुम्बापुरीच्या प्रभातसौंदर्याचे त्यांनी वर्णन केले आहे. मुम्बापुरी न्हालेल्या गर्भवतीप्रमाणे सोज्वळ, मोहक दिसत आहे. सचेतन जीव आणि अचेतन वस्तू सर्वच गोड हिंवाळ्यात गुरफटून गेली आहेत. काळोख विरू लागल्यामुळे घरे हळू–हळू प्रकाशित होत आहेत. गवळी मानेवरुन हंड्यांच्या कावड्या नेत आहेत व डांबरी रस्त्यावर शांतताच आहे, पण ह्या सृष्टीच्या निवांत उदरात जी अजस्र धांदल दडून राहिली आहे ती लौकरच जागी होऊन भास्कराला अर्घ्य देईल, व यांत्रिक जीवन सुरू होईल. निसर्गसौंदर्यात गुरफटलेल्या ह्या मुंबईला जीवनकलहामुळे सभोवतालच्या निसर्गातील हुरूप आपलासा करून घेणेही कठीण झाले आहे.

मर्ढेकरांनी निसर्गातील दृश्यांचा उपमालंकाराकरिता केलेला उपयोग सांकेतिक स्वरूपाचा नाही. उदा० ते म्हणतात, 'भुकेलेला आशेचा श्वान इच्छेच्या गल्लीत रेंगाळावा त्याप्रमाणे सूर्यगोल पेंगत असलेल्या आभाळात रेंगाळत होता. अरुणोदयाबरोबर गिरणोदय होतो व काळ्या बंबाळ अंधारी, एंजिन धपापते. पहाटे भोंगा आरवतो व गलिच्छ वस्तीत लालजर्द संध्याकाळ भुंकत राहते ! विस्कटलेल्या कौलारातून सकाळ आत येते व खिडकीच्या फटफटीतून निरभ्र दुपार निघून जाते.'

'दिव्यानी पंक्चरलेल्या रात्रीतील काळोख कोणीतरी पंपतो व रबरीरात्र फदकन् बसते. कष्ट करणाऱ्या मोलकरणीची फाटकी वस्त्रे सांध्यढगासम तांबूस काळी होती.' या सर्व शाब्दिक प्रतिमांतून कवींनी निसर्गाला जणू काही वेठीस धरले आहे असे वाटते.

**' जिप्सी '**

मंगेश पाडगावकरांच्या निसर्गविषयक कविता बालकवींच्या निसर्गविषयक कवितांची आठवण करून देणाऱ्या आहेत ' निःशब्द संथ अंधुक, मंत्रमुग्ध, नैसर्गिक वातावरणाशी ' कवीची भाववृत्ती एकरूप होते. चंदेरी धुक्यात चांदण्यांशी हितगूज करणे त्यांस आवडते. पानांच्या जाळीतील मौनावर त्यांना गीत गावेसे वाटते. माध्यान्हीच्या वेळी पानांच्या झुबक्यात दडून बसलेला पक्षी, निवांत आकाश, शांत किनारा, उदास संध्याकाळ, शिशिरामधली उत्तर रात्र इत्यादी दृश्यांचा त्यांस अनावर मोह वाटतो. अशा वेळी त्यांची ' भाववृत्ती निसर्गमय बनते की निसर्गच त्यांची भाववृत्ती धारण करतो ' असा संभ्रम रसिकांस पडतो हे खरे.

निंबोळीच्या झाडामागे कल्पनेने निर्माण केलेला चंद्र–त्या धुंद टाळ्या–ते धुंद हसे–यांचा विसर तर कवीला पडणार नाही ना अशी शंका येते. कारण ते म्हणतात—

' तेव्हा पाहीयला चंद्र
त्याच्या नित्य नव्या कळा
आता सत्य एक उरे
रुपयाचे आणे सोळा. '

परंतु ही शंका अस्थानी आहे. जीवनविषयक चिंतनातूनच त्यांची निसर्गविषयक कविता –नव्हे त्यांची भाववृत्ती– निर्माण झाली आहे, आणि मनातल्या ' जिप्सी 'ला जी दूर अनंतामधून कुणी साद घालीत आहे, तिचा शोध ते निसर्गसौंदर्याशी तन्मय होऊन घेतील असेच रसिकांस वाटेल.

**' अक्षरवेल '**

' अक्षरवेल ' कर्ते सदानंद रेगे यांच्याही निसर्गविषयक कविता वैशिष्ट्यपूर्ण आहेत. ऊनपावसाचे पक्षी, ओंजळीमधून आणणारा श्रावण, क्षितिजाच्या थरथर तारेवर बसून ढगांचे पंख पालविणारा, आणि विजेची पिसे बादल चोचीने गोंजारणारा पाऊस पक्षी, वडाखाली लगोरी खेळणारे पिवळे पिवळे धुंद कवडसे, भेसुराच्या एकतारीवर काळोखाचा ओला अभंग गाणारा रातकिडा, मातीवरती मान टाकून जाणारी चाकोरीची आणि उन्हाची पिवळी धम्मक मंथर नागीण, परीट घडीचे नभ, आकाशी झिलई, सोनेरी गारवा, थेंबांची पाखरे अशा बोलक्या शब्दप्रतिमा योजून निसर्गदृश्यांशी एकरूप होण्याची कवीची भावसंवेदनात्मक वृत्ती बालकवींच्या मनोवृत्तीची आठवण करून देणारी आहे. तथापि बालकवींच्या भावनेत सरलता व श्रद्धा यांचे मिश्रण झालेले दिसते. बालकवींचे निष्पाप भावच निसर्गातील वस्तूंची रूपे घेतात. रेगे यांच्या भाववृत्तीतून निर्माण होणाऱ्या शाब्दिक प्रतिमांतून जितकी सहजता

तितकीच वक्रता दिसून येते. आणि रूपकांच्या आवरणाखाली त्यांची भाववृत्ती कोठे कोठे जड झाल्यासारखी वाटते.

बालकवींच्या निसर्गविषयक कवितातून कवी निसर्गाला उद्देशून बोलत आहे, असे कुठे कुठे वाटते, उलट अलीकडील पाडगांवकर, रेगे यांच्या निसर्गकवितांतून कवी तोच निसर्ग आणि निसर्ग तोच कवी अशी दोहोत अभिन्नता दिसून येते. 'अक्षर-वेला'त रेगे जेव्हा

'पाउसपक्षी कृष्ण-सावळा-शाळिग्रामसा
क्षितिजाच्या थरथर तारेवर बसुन
पालवित पंख ढगांचे गोंजारित अन्
पिसे विजेची-वादळचोचीने'

असे म्हणतात तेव्हा ते आपला भावनात्मक अनुभव त्या पावसाच्या स्वरूपाशी इतका एकरूप करतात की कवी आणि निसर्ग यात अभिन्नताच राहते. अशा-प्रकारे अलीकडील निसर्गविषयक कविता वाचीत असता आपण कवीच्या भाव-सौंदर्याचाच आस्वाद घेत राहतो. सदानंद रेगे यांच्या 'सोनफुलोरा' 'निळया, टेकडया' 'हळद उन्हाची' 'शेवगा' 'श्रावण' इत्यादी कवितांतून प्रतिमा-सृष्टी आणि भावसृष्टी यांच्यांतील एकरूपता आल्हादकारक झाली आहे. निसर्गविषयक कवितेची ही प्रगती लक्षात घेतली म्हणजे निसर्गाकडे भयचकित नजरेने पाहण्याच्या आणि त्याच्या पासून बोधपर संदेश शोधण्याच्या पूर्वीच्या कवींच्या दृष्टीकोनांहून आजच्या कवींचे दृष्टिकोन किती निराळे आहेत हे ध्यानात येईल.

## सारांश

सृष्टिविषयक कविता वाचल्या म्हणजे खालील प्रश्न निर्माण होतात. (१) सृष्टी सुंदर आहे काय ? (२) सृष्टिप्रेमाच्या भावनेला आधार काय ? (३) वरील भावना अविवेकी आहे कां ? यांसंबंधी असे म्हणता येईल की आजच्या शास्त्रीय युगात निसर्गाची गूढे पुष्कळच उकलली आहेत. त्यामुळे समंजस कवी उघड्या डोळयांनी व आत्मविश्वासाने निसर्गदृश्यांकडे पाहू शकेल हे खरे. निसर्गाला मानवापेक्षा श्रेष्ठ किंवा कनिष्ठ लेखावे याला काही आधार नाही. निसर्गात गूढता भरली आहे या कल्पनेने त्यातील स्वरूपाकडे पाहणे हे आजच्या युगात कुणास असमंजसमणाचे वाटेल, परंतु निसर्गातील काही दृश्ये ही निरोगी मनाला नेहमीच आश्चर्यचकित करतील असे वाटते. म्हणूनच विकृत मनोवृत्तीच्या आहारी न जाता व्यापक दृष्टीने सृष्टिसौंदर्याचा निर्लोभ आस्वाद घेणे, शक्य आहे. कवीला वाटणाऱ्या सृष्टिसौंदर्याच्या लोभासंबंधी प्रा. माटे लिहितात, "हा लोभ त्याला

असावा हे अत्यंत साहजिक आहे, कारण माणसाचे मन सृष्टीच्या इतर वस्तूंबरोबरच जन्मलेले आहे. वस्तुजाताशी माणसाचे नाते सहोदरत्वाचे आहे.'' केशवसुतांप्रमाणे पुष्पाला पाहाताच स्वतःच्या अपूर्णतेची जाणीव होऊन कवीने हात मागे घेण्याऐवजी किंवा भयचकित होऊन त्याच्यावर ईश्वरतेचा आरोप करण्याऐवजी बालकवींप्रमाणे त्याचे हसतमुखाने स्वागत करणे इष्ट ठरेल. निरोगी वृत्तीचा कवी "वनचरे आम्हा जाहले सोयरे" असे म्हणून सजीव त्याप्रमाणेच निर्जीव सृष्टीवरही एकनिष्ठ प्रेम करू शकेल. मानवावर प्रेम न करता सृष्टीकडे एकांतिक दृष्टीने पाहणे व तिच्यापासून आश्वासनाची इच्छा धरणे व तिला केवळ मन मोकळे करण्याचे ठिकाण मानणे ही एकांगीपणाची दृष्टी होय; सृष्टीशी मानवाबरोबर खेळीमेळीने हितगुज करणे हे खऱ्या व्यापक बुध्दीचे लक्षण आहे. "निसर्गाकरिता मानव नसून मानवाकरिताच निसर्ग आहे" हाच सृष्टीकडे पाहाण्याचा पुरोगामी दृष्टीकोन अलीकडील कवींत प्रामुख्याने दिसून येतो.

☆ ☆ ☆

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ........................ वि: ........................
क्रमांक ........................ नों. दि: ........................

# प्रकरण ४ थे

# राष्ट्रीय आणि सामाजिक विचारसरणी

## राष्ट्रीय कवितेवर येणारा संकुचितत्वाचा आरोप

देशपरत्वे मानवात भिन्नता दिसून आली तरी सर्व मानवांची सुखदु:खे समानच आहेत, या विश्वबंधुत्वाच्या कल्पनेची ज्यांच्या मनावर विशेष छाप बसली आहे अशा काही व्यक्तींना विशिष्ट राष्ट्राच्या अभिमानाने प्रेरित झालेल्या कवींच्या भावनेत संकुचितपणा दिसून येईल हे खरे, पण त्यामुळे वाङ्मयातील राष्ट्रीय कवितेचे स्थान बाधित होत नाही. राष्ट्रीय कवितेला देशकालपरिस्थितीचे बंधन असते, आणि ती एका मर्यादित दृष्टिकोनातून निर्माण होते, यात संशय नाही; पण जोपर्यंत मानवी मनाला परिचयाने जवळ आलेल्या विशिष्ट स्थलांविषयी व व्यक्तींविषयी अनावर प्रेमादरभाव वाटतो, तोपर्यंत भावनोत्कट मनोवृत्तीतून विशिष्ट देशात उदयास आलेल्या थोर पुरुषांच्या गुणोत्कर्षावर भर देणारी राष्ट्रीय गीते निर्माण होणारच. लौकिक अभिरुचीचे प्रतिबिंब राष्ट्रीय कवनांतून प्रकट होते. भौतिक परिस्थितीचे मूल्यमापन करण्यास राष्ट्रीय काव्याचे साधन उपयोगी पडते. प्राचीन मराठी वाङ्मयासंबंधी विचार केल्यास असे दिसून येते की, महानुभावीय कवींनी आणि यादव कालीन संतकवींनी निर्माण केलेले वाङ्मय हे विशेषत: धार्मिक प्रेरणेमुळे आणि आध्यामिक चिंतनामुळे निर्माण झाले होते. तथापि ते केवळ परिस्थिति-निरपेक्ष होते असे नाही. भगवद्‌गीताप्रणीत ज्या भागवतधर्माचा परिणाम संतकवीवर झाला होता त्यांनी प्रवृत्तिवादाची—निष्काम कर्मयोगाची—शिकवण सामान्य जनांना दिली आणि राष्ट्राचे नैतिक बळ वृद्धिंगत केले. कर्तव्यपालनाच्या बाबतीत प्रवृत्तिवादावर—आशावादावर— आणि केवळ स्वार्थपर फलाशेच्या बाबतीत विरक्तवृत्तीवर— तटस्थपणावर—संतकवींनी भर दिला. तुकाराम रामदास आणि शिवाजी हे तीन थोर राष्ट्रपुरुष एकाच कालखंडात उदयास आले, यावरून तत्कालीन महाराष्ट्राच्या राष्ट्रीय

जीवनाच्या सर्वांगीण विकासाची कल्पना करता येते. व्यापक दृष्टीने संतकवी राष्ट्रीय कवी होते असे म्हणावे लागते.

## आरंभीची राष्ट्रीय कविता

इंग्रजी राज्याच्या सुरुवातीस राष्ट्रीय कवितेचे स्वरूप पुष्कळसे परावलंबीच होते. इंग्लंडमधील कवींनी देशाभिमानाने प्रेरित होऊन जी कवने लिहिली त्यांचीच भाषांतरे वा रूपांतरे त्या वेळच्या कवींनी केली. उदा. महादेव शास्त्री कोल्हटकर यांनी स्कॉट कवीच्या स्वदेशप्रेमावरील कवितेचे 'स्वदेशप्रीति' हे भाषांतर केले. या कवितेत—

'नष्टात्मा कोणि असा असेल का हो कुठे जगामाजी—

वदला न कधी जो की ही आहे जन्मभूमिका माझी'—असे जन्मभूमीबद्दलच्या अभिमानाचे उद्गार आलेले आहेत. याच संदर्भात कवी चंद्रशेखर यांनी जन्मभूमीला उद्देशून लिहिलेली 'स्वदेशप्रीति' ही भाषांतरित कविता लक्षणीय वाटते.

अशा अपवादात्मक काही भाषांतरित कविता सोडल्या तर बहुतेक भाषांतरित कवितांतून कवींचे लक्ष भावनेपेक्षा भाषेकडेच अधिक होते. व्हिक्टोरिया राणीच्या जाहीरनाम्याबरोबर प्रजाजनांना जो राजनिष्ठेचा उसना उमाळा आला त्यासरशी अनेक गीते निर्माण झाली. जे कवी राजाची किंवा राणीची कृपा संपादन करण्याकरिता व स्वतःची कीर्ती वाढविण्याकरिता स्तुतिस्तोत्रे गातात त्यांच्या काव्यात कळकळीच्या भावनेपेक्षा उसना जिव्हाळाच अधिक असणार हे उघडच होय. ज्या राष्ट्राला परकीय अंमलाची झळ क्वचितच लागली असेल तेथील राष्ट्रीय कवींच्या जगाकडे पहाण्याच्या दृष्टिकोनांत जेवढा अहंभाव असणार तेवढाच परचक्राने पीडित झालेल्या आमच्याकडील भाषांतरे करणाऱ्या कवींच्या दृष्टिकोनांत न्यूनत्वाची भावना शिरणार! इंग्रजी अंमलात होऊन गेलेल्या आरंभीच्या मराठी कवींवर या न्यूनगंडाचा परिणाम झाला होता. इंग्लंडमधील राजाराणींच्या राज्यारोहणप्रसंगी केलेल्या स्वागत गीतांतून—

'प्रियतम पुत्रा इंग्लंदाच्या। तूही येशील ना कर्तव्याचा
पाठ द्यावया वीरा! आर्यजना'

असे उद्गार काही राजनिष्ठ कवींच्या मुखांतून निघत असत. तसेच राजाराणींच्या दुःखद निधनावरही शोकगीते रचिली जात. चिपळूणकरांच्या निबंधमालेतील देशाभिमानाच्या भावनेने तत्कालीन वाङ्मयाला नवीन वळण मिळाले. इंग्रजी वाङ्मयाच्या अभ्यासाबरोबर स्वदेशाचा खरा इतिहास लिहिण्याकडे जनतेचे लक्ष वळले.

राष्ट्र परकीयांच्या सत्तेखाली जाणे यासारखी दुसरी कुठलीही मोठी हानी नाही. एका पारतंत्र्यामुळे देशांतील लोकांची शरीरे व मने गुलामगिरीत खिचपत

पडतात आणि त्यांचा विकास थांबतो. इंग्रजी राजवटीच्या सुरुवातीला काही उदारमतवादी सत्ताधारी भारताला मिळाले त्यामुळें त्यांच्या काही लोकहितपर गोष्टींचे जनतेने स्वागत केले. याच भावनेतून काही कवींनी तत्कालीन उगवत्या व मावळत्या शासनकर्त्यांच्या गुणवर्णनपर कविता लिहिण्याचे धोरण ठरविले. या अशा उपक्रमात मोगरे यांनी पुढाकार घेतला. फार काय पण पुढे रे. टिळकांनी ' हिंद व ब्रिटानिया यांचे भगिनीचे नाते अक्षय टिको ' असे विचारही प्रकट केले. ब्रिटिश राज्य हे एक भारताला मिळालेले ' वरदान'च होय असा समज त्या काळी रूढ होत होता त्या काळातील कवींच्या मनावर परकीय राज्यकर्त्यांसंबंधी आदराचे उद्गार निघावेत यात नवल नाही. आपल्या सडेतोड व निर्भय वृत्तीने नूतन राज्यकर्त्यांना न दुखविता गतवैभवाचे दुःखद सूर ज्यांनी आपल्या काव्यात प्रगट केले असेही अनेक कवी निबंधमालेच्या काळात व नंतरच्या पहिल्या दशकात होऊन गेले. अशा प्रतिकूल परिस्थितीत ज्यांना आपल्या राष्ट्रीय वीरांची स्मृती होऊन त्यांच्यावर कविता रचण्याची स्फूर्ती झाली अशा आरंभीच्या कवींत महादेव मोरेश्वर कुंटे व गणेश सहाशिव लेले या कवींचा उल्लेख करणे आवश्यक होय. राष्ट्रातील वीरपुरुषांवर वीररसात्मक काव्ये रचणे हे राष्ट्रीय कवितेचे एक प्रमुख अंग मानल्यास छत्रपती श्री शिवाजीमहाराज यांच्यावर ज्यांनी आरंभी खंडकाव्ये लिहिली त्यांच्या कृतीचा गौरव करणे आवश्यक होय. याद्दष्टीने ' राजा शिवाजी ' या प्रातिनिधिक खंडकाव्याचे वैशिष्ट्य ध्यानात घेणे समुचित होईल.

## कुंटेकृत ' राजा शिवाजी '

' राजा शिवाजी ' या ऐतिहासिक काव्याची सुरुवात पन्हाळगडाला शत्रूने वेढा दिला असता पराक्रमाची शर्थ करून मराठ्यांनी त्या प्रसंगाला जे तोंड दिले आणि आपल्या राजाला आणि स्वराज्याला मोठ्या संकटातून वाचविले त्या समरप्रसंगाने होते. शिवाजीच्या जीवनातील–नव्हे मराठ्यांच्या इतिहासातील–जो आणीबाणीचा काळ होता त्या काळातील समरप्रसंग निवडण्यात कुंटे, यांनी मोठेच औचित्य दाखविले आहे यात शंका नाही.

' राजा शिवाजी ' या महाकाव्याचे सहा भागच प्रसिद्ध झाले. पहिल्या भागात शिवाजी व त्याचे अनुयायी यांनी शत्रूशी सामना देण्याचा जो निर्धार केला त्याचे वर्णन आले आहे.

" कधी ना कधी मृत्यु येणार, साहू
रणी मृत्यु आता पुढे स्वर्ग पाहू "

अशी प्रतिज्ञा करून मराठी सैन्य मुसलमानांशी लढण्याकरिता सज्ज झाले. शत्रूला राहूचे सूर्याला लागलेले हे ग्रहण नाहीसे व्हावे म्हणून सर्वांनी प्रार्थना केली.

'दशा रावणाची पहा कोण झाली !
कसा मारिला राघवे दुष्ट वाली । स्मरा या कथा...'

असा समयोचित दाखला देऊन शिवाजीने सर्व मराठी सैन्याला युद्ध-प्रवृत्त केले. आपल्या पत्नीशी-सोयराबाईशी- शिवाजीचे झालेले भाषण, शत्रूला पराजित केल्यानंतर मराठ्याच्या घराला तोरणे बांधण्याचे त्यांचे निर्धाराचे उद्गार- 'स्त्रियांची नाजुकाई जो पर्यंत क्रूर वैरी पुढे आला नाही, तोपर्यंतच शोभते.' हा विचार, 'नमे हा मराठा—नव्हे हा शिपाई—' असा विश्वास इत्यादी विषय दुसऱ्या भागात आले आहेत. बहिर्जी नाइकाने शत्रूच्या गोटातून आणलेली बातमी आणि नेताजी पालकर, पिलाजी आणि त्यांच्या हाताखालील शूरमराठी सैनिक यांनी खान आणि फाजिला यांची रणमैदानात उडवलेली दाणादाण हा तिसऱ्या विभागाचा प्रतिपाद्य विषय आहे. यातील लढाईच्या वर्णनात सामान्य सैनिकांनी सुद्धा केवढा पराक्रम गाजविला याचे चित्रण करताना 'राणोजी', 'तुकोजी', 'भिकाजी' (नावे अर्थात काल्पनिक) गणोजी, यमाजी यांनी आपले प्राणार्पण करताना म्लेंच्छांना कसे हरविले याचे वर्णन आले आहे.

'टिकेना कुणीहि लढाया धजेना
रणी एवढी गांगरे म्लेंच्छसेना
लढे पाय त्याचा-लढे हात त्याचा
सुटे लाख धोंडा-रडे म्लेंच्छ साचा ॥'

अशा साध्या रांगड्या मराठी शब्दांत शाहिराने मर्द मराठ्यांचा पराक्रम वर्णिला आहे. पन्हाळ्यावर लढा चालू ठेवून शिवाजीराजांनी मधल्या आडरानातून सोयराबाईसह रांगण्याला सुरक्षित जावे आणि त्यांना बहिर्जी नाइकाने वाट दाखवावी असे ठरले. इकडे शत्रूला जागच्या जागी खिंडीत रोखून धरावे.

"टळे युद्ध जेव्हा टळू त्यास द्यावे । भिडे शत्रु जेव्हा पुढे रे सरावे"

असा विचार ठरला त्या वेळी शत्रूच्या सैन्याला थोपवून धरण्यास मागे कोण राहणार-हा प्रश्न अवघड होऊन बसला. कारण जो तो आपल्याच वाट्याला हे काम यावे म्हणून पुढे सरसावला

'लढू दास आम्ही-स्वतः स्वस्थ राहा—
पहा देह आम्ही-तुम्ही जीव आहा
म्हणू लागले. 'आज हे दान देगा' ही प्रीती पाहून
'चित्ती शिवाजी द्रवला खरा की,'

शेवटी बाजी प्रभू देशपांडे यांच्या नेतृत्त्वाखाली बाकीच्या सैन्यानी लढून शत्रूला सामना देण्याचे ठरविले. त्या वेळीं प्रत्येक मराठी वीराला जो रणावेश चढला

त्याचे अत्यंत बहारदार वर्णन, चवथ्या भागाच्या अखेरीस आले आहे. वानगीदाखल हा एक श्लोक पाहा

‘ कुस्तीं धरी शूर मजेत कोणी
ते पेच भारी पकडींत आणी
झुंजी जसा बैल म्हणून शिंग
तेथे दिसे केवळ तोच रंग. ’

ज्या निबिड अरण्यातून आणि काट्याकुट्यातून शिवाजीने मार्ग आक्रमिला त्या स्थळाचे विस्तृत वर्णन पाचव्या भागाच्या आरंभी आले, त्यात वास्तवता आहे.

इकडे बाजी प्रभू देशपांडे यांनी गाजविलेल्या शौर्याच्या वर्णनात कवीची प्रतिभा गुंग झाली.

‘ अंगावरी वार सजे सुवीर पोटात त्याच्या बसली कटार
डोळे जरी लाल मनात शांती तोंडावरी सोज्वळ काय कांती
तरवार हाती रणशूर आहे डाव्या कुशीलाच पडून राहे
धारिष्ट्य चातुर्य रणात मोठे सारे सभोती जमले मराठे

त्या वेळीं त्या शूर वीराने उद्गार काढले

‘ आनंद वाटे मज हो मराया
युद्धी विरांना यश हे मिळाले
रे दुःख माझे सगळे निवाले ’

कारण ‘ सुखी शूर योद्धा महाराज आहे
पहा तोफ झाली ’ पुढे स्तब्ध राहे. ’

असे म्हणून त्याने प्राण सोडला.

शिवाजीच्या तोंडून शब्द बाहेर निघाले.

‘ हे युद्ध केलेत रणात मोठे
आश्चर्य हे काय ! तुम्ही मराठे
ते देशपांडे पडले रणात
तो वाघ गेला. पिळलो मनात ’

शेवटी राजांनी मराठ्यांना संदेश दिला

‘ अहा देशपांडे करा शौर्य आता
रणी शूर या. हो रणी शत्रु येता ’

येथेच पाचवा भाग संपतो.

. . सहाव्या विभागात जो मराठा मराठ्यांचाच शत्रू झाला होता त्या घोरपड्यांचा पाडाव करून व त्याच्या मुलास राज्यावर बसवून शिवाजीराजाने सावंतांना कसे वश करून घेतले हा कथा भाग आला आहे. जिजाबाई, शहाजी, शिवाजी,

सोयराबाई या सर्वांच्या गाठीभेटी होऊन त्यांच्यात चाललेल्या भावी स्वराज्याच्या हितगुजातच महाकाव्याच्या या विभागाचा शेवट होतो.

हे काव्य अनेक दृष्टींनी वैशिष्ट्यपूर्ण आहे. ज्या काळात शिवाजीचे नाव घेणे हा गुन्हा ठरत होता त्या काळात कुंटे यांनी निर्भीडपणे आपल्या राष्ट्रपुरुषाचा गुण-गौरव केला. भोसल्यांच्या घराण्याच्या बखरीच्या आधारे आपले काव्य रचले. आणि तत्कालीन इंग्रजी इतिहासकारांचीच तळी उचलणाऱ्या स्वबांधवांस चांगला धडा शिकवला.

आपले हे काव्य ऐतिहासिक महाकाव्याच्या ( Epic ) धर्तीवर लिहिले आहे, असे प्रस्तावनेत कुंटे यांनी म्हटले आहे. तत्कालीन जुन्या पठडीतील संस्कृत पंचमहाकाव्यांचा अभ्यास करणाऱ्या रसिकांना आपल्या काव्यातील व्यावहारिक अनलंकृत रोख ठोक सोपी बोली भाषा कितपत रुचेल याबद्दल त्यांना संशय होताच. तसेच ज्यांना इंग्रजी वाङ्मयाचा विशेष परिचय आहे असे रसिक आपल्या काव्याची योग्य संभावना करतील अशी त्यांची खात्री नव्हती. बाकीच्या सामान्य जनतेकरिता त्यांच्याच सोप्याभाषेत आपण हे काव्य रचीत आहोत अशी कुंटे यांची भूमिका होती. राष्ट्रीय ध्येयवादाचे आकर्षण निर्माण करण्याचे कार्य, राष्ट्रीय काव्य करते, हा कुंटे यांचा दृष्टिकोन होता. त्यांनी शिवाजीराजासारख्या आद्य राष्ट्रपुरुषाच्या जीवना-तील विशिष्ट समरप्रसंग आधाराला घेऊन राष्ट्रीय भावना जनतेत जागृत करण्याचा प्रयत्न या काव्याच्याद्वारे केला. तो पूर्णपणे यशस्वी झाला नाही तरी, ऐतिहासिक दृष्ट्या त्याचे महत्त्व कमी होत नाही.

या महाकाव्यातील वर्णिलेला संघर्ष केवळ दोन जातींमधला नसून दोन दृष्टिकोनांमधला आहे असा निर्वाळाही कवीने आरंभी दिला आहे.

## गणेशशास्त्री लेले यांचे ' राजा शिवाजी ' हे महाकाव्य

कुंटे यांचे ' राजा शिवाजी ' हे काव्य अपुरे आहे. याच विषयावरचे दुसरे महाकाव्य म्हणजे ' श्रीमंत छत्रपति शिवाजीमहाराज, मराठी राज्याचे आद्य-संस्थापक त्यांचे पद्यात्मक काव्य. ' हे गणेशशास्त्री लेले त्र्यंबककर यांनी १८७३ मध्ये लिहिले. ' दक्षिणा प्राईझ कमिटी'ने त्यास मान्यता दिली.

प्रथम सर्गात शिवाजीचा आजा मालोजी याचे वृत्त व त्यास झालेले भवानीवरप्रदान, द्वितीय सर्गात शिवाजीचा बाप शहाजी याच्या लग्नाचा थाट, शिवाजीचा जन्म, व त्याचे बालचरित्र, तृतीय सर्गात शिवाजीचा स्वतंत्र राज्य-संपादनाची इच्छा झाल्यावरून दादोजी कोंडदेव याने त्यास दिलेले नीतिशिक्षण, चौथ्या सर्गात शिवाजीची वृत्ती ऐकून विजापूरचे बादशहाने दादाजीस प्रथम बंदिस्त ठेवून मग सोडून दिले ते वृत्त, पंचम सर्गात बादशहास शिवाजीने जिंकले तो प्रकार,

सहाव्या सर्गात शिवाजीचा दिग्विजय आणि सप्तमसर्गात शिवाजीचा राज्याभिषेक समारंभ व श्रीरामदास स्वामी यांनी केलेला उपदेश, असे प्रमुख विषय आले आहेत.

कुंटे यांची रचनापद्धती इंग्रजी महाकाव्याचा धर्तीवर आहे. उलट लेले यांच्या रचनापद्धतीवर संस्कृतातील महाकाव्याचा–विशेषतः रघुवंशाचा–परिणाम झाला आहे. नायक थोर वंशोद्भव आहे. तो दुसरा 'पूर्णेंदू'च होय, असा कवीने आपल्या राष्ट्रनायकाचा गौरव केला आहे. शहाजीच्या स्वरूपवर्णनातही कवीने संस्कृत कवींचेच अनुकरण केले आहे.

'भाळी विशाळी कुटिलालकावली
नासा जसे चंपकशाखिची कळी
ते गाल लाल स्फुट पंकजापरी
वक्त्रेंदु शोभे न कलंक ज्यावरी'

वस्तुतः जिजाई व शहाजी यांची प्रथम भेट बालपणी झाली. हे लक्षात घेतल्यास कवीने जिजाईच्या विरहव्यथेचे जे वर्णन केले आहे ते अवास्तव वाटते.

'म्हणे ती सयांनो तुम्हा काय सांगो
अंगे मन्मथा या त्वरे आग लागो'

कवीच्या मनावर सांकेतिक कल्पनांचा जो पगडा बसला होता त्यामुळेच कवीने पुढील उद्गार काढले आहेत.

'स्मरास्त्राणि पुष्पाणि ऐसे पुराणी
असे उक्त मिथ्या न ती शास्त्रवाणी'

वीररसाला शृंगाररसाची जोड द्यावी याच हेतूने की काय कवीने स्त्रियांच्या रूपसौंदर्याची वर्णने केली आहेत. उदाहरणार्थ मिरवणुकीतील स्त्रियांचे हे वर्णन पाहा

'मुळी युवति त्या रूपवत्या वरि वस्त्रालंकृति रम्य
त्यातहि जब्रा नखरा मग त्या न नरा कोणा काम्य!'

राजपथातून जाणाऱ्या श्रीरामचंद्राला पाहण्याकरिता जशी राजधानीतील खिडक्यांतून स्त्रियांची गर्दी झाली, हातातले अर्धवट काम सोडून जशा त्या पुढे सरसावल्या, त्याचप्रमाणे मिरवणुकीतील वधूवरांना पाहण्याकरिता युवती पुढे आल्या, असे वर्णन कवीने खालीलप्रमाणे केले आहे. येथे कालिदासाने केलेल्या रघुवंशातील विशिष्ट प्रसंगाची आठवण होते.

'कोणी नारी पाजिता लेकराला
टाकोनी त्या पाहु आली वराला'
'कोणी स्नान करोनि पातळ नवे ते नेसताना भली
हातांमाजि निऱ्या तशाच धरुनी ती संभ्रमे पातली॥'

वधूने वराच्या गळयात माळ घातली त्या वेळचे वर्णन

‘ ठमकत सुगतीने पातली नोवरी ते
पति गळि कुसुमस्रक् घालुनी या वरी ते ’

जिजाईला जे डोहाळे लागले त्यातून तिला असे वाटले की

‘ मातीची घडली असे क्षिति तिला भोगील माझा सुत
जिंकोनी सकला बलाढ्य धरणी पाडील की निश्चित ’

शिवप्रभू जन्माला आले त्या वेळी

‘ प्रसन्न झाल्या सकला दिशा नभ
प्रभात तैसा तरणीहि सुप्रभ
समीर तो मंद सुगंध वाहती
असी सुचिन्हे जन सर्व पाहती ’

मुलाचे पाय पाळण्यात दिसतात हा न्याय लक्षात घेऊन कवीने शिवाजीच्या प्रथम उष्टावणसमारंभप्रसंगी ‘शिवाजीने रांगत जाऊन खड्गास हात लाविला आणि त्यावरून तो मोठा वीर होणार ’ या गोष्टी सूचित केल्या आहेत. शिवाजीचे शौर्य बालपणीच दिसून आले.

‘ गगनि उडत पक्ष्या गोळि घालोनि मारी ’
‘ अतिकुशलहि अश्वारोहिणी तो नृवीर ’

भीष्मांनी युधिष्ठिराला तशी दादाजी कोंडदेवाने शिवाजीस नृपनीती शिकविली. शिवाजीने तोरणागड घेतला आणि आपल्या पराक्रमाने सर्वांना आश्चर्यचकित केले. कुंटे यांनी शिवाजीच्या पूर्ववयातील या सर्व प्रसंगांची वर्णने केली नाहीत. फार काय अफझुलखानाच्या वधानंतरच्या कथाभागावर आपले लक्ष केंद्रित केले. लेले यांनी शिवाजीच्या चरित्रातील बहुतेक ठळक गोष्टी आपल्या काव्यांत वर्णिलेल्या आहेत. अफझुलखान वधाचे साद्यंत वर्णन करून शिवाजीने ‘ जशास तसे ’ हा न्याय अवलंबिला, हे कवीने दाखविले आहे.

अफझुलखानाच्या वधानंतर शत्रूसैन्याची उडालेली दाणादाण

‘ पडती मेघापासुनि अनिवारपणे निरंतरा गारा
तैसा शिवसेना करि गोळ्यांचा वैरियांवरी मारा ’;

अशा शब्दांत वर्णिली आहे.

शिवाजीने जे पुढे अतुल पराक्रम केले त्यांचेही वर्णन वीररसपरिप्लुत शब्दांत केले आहे. उदाहरणार्थ खालील पद्यपंक्ती पाहा. —

“ ‘ शाठ्य शठीं ’ या न्याये वंचोनी भूप दिल्लिपतिलाही
गेला समजुनिया हे जाली तत्काल शत्रुची लाही. ”

मत्तमतंगजयूथी पंचानन वा अजात वाघ शिरे
तैसा वैरीगणि शिवभूप शिरोनी खुडी तदीय शिरे ॥ '' ६-५६

रामदासांनी परमार्थाचा शिवाजीला उपदेश केला, शिवाजीने आपले राज्य रामदासांच्या चरणी अर्पण केले. रामदासांनी तेच परत करताना राष्ट्रध्वज म्हणून 'भगवा ध्वज' ठेवण्यास व 'रामराम' या शब्दाने एकमेकांचे अभिवादन करण्यास सांगितले.

शिवप्रभू हे अवतारी पुरुष होते ही आपली श्रद्धा कवीने शेवटी प्रगट केली आहे.

कुंटे यांची भाषाशैली जितकी रोखठोक, दररोजच्या व्यवहारातील व साधी सोपी तितकीच लेले यांची भाषा संस्कृतप्रचुर प्रौढ व अलंकारयुक्त आहे. एकाने इंग्रजी महाकाव्याच्या धर्तीवर तर दुसऱ्याने संस्कृत विदग्धमहाकाव्याच्या धर्तीवर आपल्या काव्यांची रचना केली. बहुसंख्य जनतेला त्यांच्याच बोलीभाषेत आपल्या राष्ट्रपुरुषाचा पोवाडा गाऊन दाखवावा हा कुंटे यांचा हेतू होता आणि तो पुष्कळ अंशी सफल झाला आहे. लेले यांनी संस्कृत विदग्ध महाकाव्याच्या धर्तीवर आपले काव्य लिहिले आणि शृंगार व वीर या दोन रसांचा उठाव काव्यात व्हावा अशी दक्षता बाळगिली आहे. दोघांचाही हेतू शिवप्रभूच्या उदात्त चरित्राचे गुणगायन करून देशबांधवांच्या ठिकाणी राष्ट्रप्रेम जागृत करावे असाच होता. आधुनिक मराठी-तील आरंभीची राष्ट्रीय काव्ये याच दृष्टीने त्यांचा विस्ताराने विचार करावा लागला.

शिवप्रभूचा गुणगौरव करणे हे राष्ट्रीय कवितेचे एक वैशिष्ट्य होय. शिवराज-लीला ( के. ल. बारवेकर ) 'शिवाजी महाराजास दादोबा कोंडदेवाचा उपदेश' ( एकनाथ शास्त्री ) पु. बा. जोशी यांनी लिहिलेले. 'शिवाजीच्या समाधीवरील काव्य' ( समाधि–शतावलि ), 'शिवशाहीचा अरुणोदय' (पु. वा. गोवईकर) 'श्रीशिवकाव्य' ( ह. वा. भावे—संस्कृत 'शिवकाव्या'चा अनुवाद ) इत्यादी काव्ये या संदर्भात लक्षात येतात.

दत्त कवींनी मावळ्यांना उद्देशून काढलेल्या ओजस्वी उद्गारांचा उल्लेख याच ठिकाणी करणे आवश्यक आहे.

' पुरे जेवणे, हातचे घास टाका । उठा सज्ज व्हा दुंदुभीनाद ऐका
नका घालवू वेळ होतो उशीर । रणी पाहते शत्रुचे वाट शीर,
चला मावळे वीर हो या घडीला । शिवाजी रणी बोलवीतो तुम्हांला
लढाया चला सोडुनी सर्व काज । रणी दाखवा शत्रुला शौर्य आज '

**'आम्हा डोळे नसति बघण्या पारतंत्र्यामुळे हो.'**

प्रखर राष्ट्राभिमानाची ज्योत आपल्या देशबांधवांत पेटविण्याची महनीय

कामगिरी, न्या. रानडे, वि. कृ. चिपळूणकर, लोकमान्य टिळक इत्यादी पुढाऱ्यांनी केली. इ. स. १८८५ मध्ये स्थापन झालेल्या राष्ट्रीय सभेच्या उभारणीत न्या. रानडे यांचा पुढाकार होताच. सभोवतालच्या या परिस्थितीचा परिणाम तत्कालीन कवींवर झालाच. आपल्या देशाचे पारतंत्र्य केव्हा नाहीसे होईल, आणि स्वातंत्र्याचा द्युमणी केव्हा उदयास येईल असे विचार केशवसुतांच्या ('एका भारतीयाचे उद्‍गार') या कवितेत प्रगट झाले आहेत.

'आम्हा डोळे नसति बघण्या पारतंत्र्यामुळे हो !
ऐकायाला श्रुतिहि नसती पारतंत्र्यामुळे हो !'

देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात ज्यांनी आत्मबलिदान करण्याचे ठरविले असे स्वातंत्र्यवीर सावरकरांसारखे क्रान्तिकारक कवी यानंतर पुढे आले. त्यांच्या राष्ट्रीय कवितेचे वैशिष्ट्य ध्यानात घेण्यापूर्वी केशवसुत समकालीन ज्या काही थोड्या कवींनी पारतंत्र्याचा धिक्कार केला व आपल्या राष्ट्रपुरुषांचे पोवाडे गायिले त्यांच्या राष्ट्रीय कवितेचे गुणग्रहण करणे इष्ट होईल.

केशवसुतांनी 'एका भारतीयाचे उद्गार' 'जयाजीराव शिंदे व तुकोजीराव होळकर' 'दोन बाजी' इत्यादी कवितांतून आपल्या राष्ट्रप्रेमाच्या भावना व्यक्त केल्या. त्यांनी सामाजिक क्रांतीचीच गाणी अधिक गायिली. त्यांचा परामर्श पुढे घेतला आहे. केशवसुतसमकालीन रे. टिळक यांचा राष्ट्राभिमान त्यांच्या 'माझ्या जन्मभूमीचे नाव' 'प्रियकर हिंदिस्थान', 'का मग बोंबाबोंब' 'माझी चिलिम', इत्यादी कवितांतून प्रगट झाला आहे. आपल्या देशातील थोर पुरुषांना वंदन करताना ते लिहितात.

'माते महात्मे तुझे तत्त्ववेत्ते
तुझे शूर योद्धे तुझे सत्कवी
श्रेणी ययांची सदा माझिया गे
मना पूजनी आपुल्या वाकवी
यांची यशे ज्या नव्या सद्‌गुणांना
मला अर्पिती ध्येय ते गे जरी
सामर्थ्य नामी तुझ्या आर्यभूमि
तसे पाहिले मी न कोठे तरी !'

तसेच आपल्या राष्ट्राची नाव अनेक संकटांशी झुंजून टिकून राहिली तेव्हा ती सुरक्षितपणे स्वातंत्र्याचे व वैभवाचे तीर गाठील हा आशावाद त्यांनी खालील शब्दांत प्रकट केला आहे.

'किती युगांची नीज असेना । उघडीले ना अंती नयना ।
मरणावाचुन नच संजीवन । का मग बोंबाबोंब ?

किती वादळे आली गेली
तरी नाव जी नाही फुटली
दूर जरी तट—तरी ही बळकट! का मग बोंबाबोंब ? '

रे. टिळकांच्या धर्मांतरामुळे त्यांच्या उत्कट राष्ट्रीय भावनांचे महत्त्व केव्हाही कमी होत नाही.

अशा प्रकारे मराठी कवींच्या स्वदेशासंबंधीच्या न्यूनत्वाच्या भावनेला पहिला धक्का केशवसुतादी कवींनी दिला. टिळक व आगरकर यांच्या केसरीने व सुधारकाने राष्ट्रप्रेमाचे व समाज सुधारणेचे लोण शहरांतून व खेड्याखेड्यांतून दूरवर पसरविले. रानड्यांच्या वेळच्या 'भारताच्या थंड गोळ्या'ला त्यावेळी नुकतीच ऊब यावयास सुरुवात झाली. दत्त, विनायक, केशवसुत, इत्यादिकांनी संक्रमणकाळातील काव्याची राष्ट्रीय बाजू चांगली सावरून धरली यात शंका नाही.

'भुललो पूर्व विसरलो सारे । अंगी भरले नूतन वारे
मूर्खत्वाचे तुटती तारे ।
स्वरुपा पाहू—शिवराजदर्शना लाहू । "

. . या विनायकाच्या उद्गारातील आत्मनिरीक्षणाची व त्याबरोबर आत्मविश्वासाची भावना स्फूर्तिदायक होती. टिळकांनी सुरू केलेल्या रायगडावरील स्मारकाच्या चळवळीचे तसेच पुण्यात रॅन्डसाहेबाच्या खुनामुळे फाशी गेलेल्या चाफेकर-बंधूंच्या तीव्र स्मृतीचे अप्रत्यक्ष पडसाद विनायकाने लिहिलेल्या 'गणेशपूजना'त खालील तऱ्हेने उमटलेले दिसतात.

' अशा प्रसंगी तिलक लाधणे महत्प्रयासाचे ।
दिसो दिसेल सुने त्यावेगळे भाळ गणेशाचे ।
पुष्प एक वाहून टाकले आहे चाफ्याचे ।
दुसरे मिळवावयास जाऊ करू उद्यमाला ।। '

'हतभागिनी' व 'यापुढे' या कवितांतील भावना करुणाजनक असल्या तरी पूर्वजांविषयीचा ज्वलंत अभिमान व 'पूर्व दिव्य ज्यांचे त्यांना रम्य भाविकाळ' असा आशावाद 'महाराष्ट्रलक्ष्मी'त प्रगट झाला आहे.

## गतेतिहासांतील थोर स्त्रीपुरुषांचा गौरव.

गतेतिहासातील स्त्रीपुरुषांच्या गुणोत्कर्षाची स्फूर्तिपद गाणी गाऊन राष्ट्राला समयोचित संदेश देणे हे राष्ट्रीय कवितेचे एक महत्त्वाचे अंग ठरते. यादृष्टीने विनायकाच्या ऐतिहासिक खंडकाव्यातून राजपुतान्यातील पराक्रमी स्त्रीपुरुषांची जी स्वभावचित्रे प्रगट झाली आहेत, त्यांचा उल्लेख करणे आवश्यक होय. कनोजाधिपती जयचंदाने आपल्या कन्येच्या—संयोगितेच्या—स्वयंवरप्रसंगी पृथ्वीराजाशी वैर करून पर-

कीय शत्रू–महंमद घोरी–याची मदत घेतली. याचे वर्णन 'संयोगिता' या काव्यात आले आहे. देशद्रोही देशावर कशी संकटे आणतात हा इशारा वरील काव्यात कवीने दिला आहे. रणांगणातून माघारी फिरणाऱ्या जसवंताला राजवाड्याचे दरवाजे बंद करून स्वतःच रणवेश धारण करून-शत्रूला आपल्या शौर्याने हटविणाऱ्या आणि आपल्या पतीला पुनः रणात जाण्याचे स्फुरण देणाऱ्या वीरमतीचे वर्णन

'चपला नटली वीरश्री- जावया रणास निघाली–
असुराते निर्दाळाया–निजभक्तजना सुखवाया–आदिशक्ति अंबामाया–
त्यासमयी भूवर जाणो–अवतरून आली दुसरी'

अशा स्फूर्तिदायक शब्दांत केले आहे. 'ध्यास तो भास' यातील नायक केवळ आपला अपमान झाला म्हणून परधर्माचा स्वीकार करतो आणि आपल्या प्रेयसीचे प्रेम गमावून बसतो. प्रियकरणीने केलेला

'स्वजन त्यजून धरिली परकीयांची जये स्वये कास ।
ते परकीय तयाचा धरिती न, धरू नयेचि विश्वास ॥

हा उपदेश त्याला पटतो. पण अहंकाराला बळी पडून तो तिला मुकतो.

स्वधर्मनिष्ठा–स्वदेशप्रेम, याकरिता आत्मबलिदान करणाऱ्या स्त्रियांचा गौरव विनायकांनी अनेक ठिकाणी केला आहे. परकीय यवनांचा आपल्या देहाला स्पर्श होण्यापूर्वी आपल्या हाताने खड्ग उरांत खुपसून घेणारी राणी दुर्गावती, आपल्या रूपसौंदर्यामुळे राजमंडळात उडालेल्या स्पर्धेचे वादळ शमविण्याकरिता पित्याच्या इच्छेला मान देऊन

'धिक् जीवित ! ज्याकरिता पडती बळी असंख्यांचे
मरण यशाचे जर त्यायोगे देशधर्म वाचे ।'

असे उद्गार काढून आनंदाने विषाचा घोट घेणारी कृष्णाकुमारी, आपल्या देहाचा अभिलाष धरणाऱ्या यवनाला त्याच्याच गोटात रणवेशाने जाऊन पराभूत करणारी पद्मिनी आणि

'तलवारीचे पाणी प्यावे राज्य तेधवा हाती'

असा संदेश देणाऱ्या वीरकन्या, विनायकांची आदरस्थाने आहेत. 'हतभागिनी', 'यापुढे', इत्यादी गीतांतून गतेतिहासाच्या उज्वल पार्श्वभूमीवर परवशतेने केलेल्या दुर्दशेची चित्रे विनायकांनी रंगविली आहेत. तथापि भारताचे पूर्ववैभव आणि परिस्थिती यांची तुलना करून समाजाला जागृत करण्याचे कार्य विनायकांच्या राष्ट्रीय कवितेने केले आहे.

'पूर्व दिव्य ज्यांचें त्यांना रम्य भावि काळ'

हा विनायकाचा 'महाराष्ट्रलक्ष्मी'चा स्फूर्तिदायक संदेश आहे. विनायकाने देशाकरिता बलिदान करणाऱ्या समकालीन क्रांतिकारकांचा गौरवही 'गणेशपूजना'त,

केला आहे. याचा उल्लेख आरंभी आलाच आहे. भारतसिंहाची पारतंत्र्याच्या पिंजऱ्यात होणारी कुचंबणा कवीला असह्य होते, आणि या दुर्धर परिस्थितीतून पुढे जाण्याकरिता क्रांतीचा मार्ग आचरणाऱ्याला आत्मबलिदान करावे लागले तरी त्यातच त्याच्या जीवनाची खरी सार्थकता आहे, हा क्रांतिकारक विचार कवीने खालील शब्दांत प्रगट केला आहे.

‘ स्वज्ञाति रक्षिल्याचे, देशा स्वातंत्र्यदान दिधल्याचे
अंती तुझेचि हे यश याविण सार्थक न अन्य जन्माचे ’

## गतवैभवाची सद्यःस्थितीशी तुलना

‘ यशवंतराव महाकाव्या ’तील वर्णने वासुदेव शास्त्री खरे यांच्या राष्ट्रीय भावनेची व विचारसरणीची चांगलीच साक्ष देतात. प्रत्यक्ष देशाच्या अवनतीसंबंधी खऱ्यांचे उद्गार हृदयद्रावक आहेत.

“ पुरी पूर्वी गर्वे निरुपम निजैश्वर्य मिरवी ।
जिला वर्णू जाता थकति सुकृती संस्कृत कवी ॥
तिच्या स्थानी आता पसरत असे निर्जन वन ।
बघोनी हे झाले मम समयि त्या दुःखित मन ॥

खऱ्यांचे समकालीन कवी मोगरे यांनी पूर्ववैभवाची स्मृति मनात ठेऊन आपले अंतरंग ‘ सह्याद्री ’त व्यक्त केले. अण्णा किर्लोस्कर यांना त्यांनी जे काव्यमय पत्र लिहिले त्यात असे उद्गार काढले.

‘ आणा तो रंगभूमीवर यवनवनज्वालमाली शिवाजी ।
येऊ द्या तो हि बाजी निशिदिनि विजयश्री ज्या होय राजी ।

सारांश विनायकाप्रमाणेच पूर्व वैभवाची सद्यःस्थितीशी तुलना करून राष्ट्राला आत्मनिरीक्षण करावयास लावणे हा हेतू अनेक कवींच्या राष्ट्रीय कवनांतून प्रगट झाला आहे.

भारताच्या स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारी राष्ट्रीय सभा इ. स. १८८५ साली स्थापन झाली. तेव्हापासून भारताने परकीयांविरुद्ध जो लढा दिला व आंदोलने केली त्यांचे जिवंत पडसाद मराठी कवितेत उमटू लागले.

## सावरकरांची राष्ट्रीय कविता

स्वातंत्र्यसंग्रामात ज्यांनी प्रत्यक्ष उडी घेऊन आपल्या राष्ट्रप्रेमाच्या भावना ज्वलंत क्रांतिकारक शब्दांत प्रगट केल्या अशा पहिल्या दर्जाच्या राष्ट्रीय कवींत वीर सावरकर, गोविंद शाहीर, साने गुरुजी, सेनापती बापट, यांचा समावेश होतो. वीर सावरकरांच्या राष्ट्रीय कवितेचे वैशिष्ट्य असे की, त्यांची राष्ट्रीय कवने ही खरोखरच

तुरुंगाच्या भिंतीवरच ( आणि काही भिंतीच्या आत ) लिहिली गेली. राष्ट्राचे चैतन्य, नीतिसंपदा, सूर्याचे तेज, उदधीचे गांभीर्य, वेदांतप्रणीत मोक्ष, ब्रह्म, जे जे उदात्त, उन्नत, महन्मधुर आहे त्या सर्वांना आपल्या उदरात साठवणारी कोणी असेल तर ती 'स्वतंत्रता भगवती'च होय. अशी त्यांची श्रद्धा आहे. तिची स्तोत्रे गात असता सावरकर तिला प्रश्न करतात.

'हिमालयाच्या हिमसौधाचा लोभ शंकराला
क्रीडा तेथे करण्याचा का तुला वीट आला ?
स्वतंत्रते या सुवर्णभूमित कमती काय तुला ?
कोहिनूरचे पुष्प रोज घे ताजे वेणीला !'

स्वतंत्रतादेवीच्या वेणीत कोहिनूरचे पुष्प घालण्याचे सामर्थ्य वीर सावरकरांच्या राष्ट्रीय कवितेत दिसून आले. स्वतंत्रतादेवीच्या या भक्ताने शिवप्रभूवर जी स्तुति-सुमने उधळली आहेत त्यांतून त्यांची राष्ट्रपुरुषासंबंधीची अनन्यनिष्ठा आणि पारतंत्र्याविरुद्ध धिक्काराची भावना व्यक्त झाली आहे. 'शिववीर' या कवितेत त्यांनी खालील उद्गार काढले आहेत;

'धर्माला तारियले अरिवर मारियले
स्वातंत्र्या संपादुनि देशा शोभविले
अवतारकृत्याला पूर्णत्वा नेले
छत्रपती शिवनृप मग निजधामी गेले !'

श्रीबाजीप्रभु देशपांडे या वीराला उद्देशून लिहिलेल्या पोवाड्यात
'स्वराज्य नाही स्वदेश नाही धिक् त्या देहाला
चला घालु स्वातंत्र्यसंगरी रिपूवरी घाला'
असे निर्भयतेचे उत्कट भाव त्यांनी प्रकट केले.

'प्रियकर हिंदुस्थान' या राष्ट्रगीतात त्यांनी जी प्रतिज्ञा केली ती त्यांच्याच ओजस्वी शब्दांत देणे इष्ट होईल.

'जननि' तुझ्या सन्मानरक्षणी अर्पु रणी हे प्राण
शत्रुकंठ भंगोनि घालु तुज दारुण रक्तस्नान.'

एकेकाळी परतंत्र असलेला आपला देश स्वतंत्र होणारच हा दुर्दम आशावाद त्यांच्या कवितांतून प्रकट झाला. इतिहासातील रोमन साम्राज्याची काय अवस्था झाली ही उदाहरणे देऊन त्यांनी साम्राज्यवादी राज्यकर्त्यांना उद्देशून प्रश्न टाकला. 'विश्वात आजवरि शाश्वत काय आहे ?'

सावरकरांच्या वाणीत भारताच्या स्वातंत्र्याची स्थापना १९०२ मध्येच झाली होती असे दिसून येते. स्वातंत्र्याकरिता प्राणार्पण करण्याचे व्रत सावरकरांनी

प्रत्यक्ष आचरणात आणिले. केवळ ते काव्यातच प्रगट केले असे नाही. 'माझे मृत्युपत्र' या कवितेत त्यांनी स्पष्टच म्हटले—

'जे दिव्य दाहक म्हणूनि असावयाचे
बुद्ध्याचि वाण धरिले करि हे सतीचे'

वरील व्रताचे परिपालनही त्यानी अनेक वर्षे खडतर तुरुंगवास सोसून केले. फार काय! पण तुरुंगातील सायंघंटेत त्यांना– स्वातंत्र्याकरिता लढणाऱ्या वीरांच्या रणचंडिकेपुढे पडणाऱ्या पूर्णाहुतीनंतर–बलिदानाची नवरात्र संपल्यानंतर–राष्ट्राला जो विजयलाभ होतो आणि त्यावेळी जे महान जयघंटेचे घोष ऐकू येतात–ते जयघोष ऐकावयास मिळत! बंदीशाळेतील क्षणभंगुर निद्रेपेक्षा 'मधुर तरी मरण किती' असे त्यांना वाटे. 'मूर्ति दुजी ती' या कवितेत आपल्या मनाला वज्रशाली बनविण्याकरिता त्यांनी रुंडधरा छिन्नमुंड रौद्रभीषण मूर्तीला केलेले अभिवादन आणि 'हिंदुनृसिंह' या कवितेत बलोन्मत्तास पदतली तुडविणाऱ्या 'शिवशक्ती'स केलेले आवाहन इत्यादी कविता सावरकरांच्या प्रखर राष्ट्रभक्तीची अक्षय ग्वाही देत राहतील यात शंका नाही.

## गोविंद शाहिरांच्या राष्ट्रगीतातील ध्येयदर्शित्व

नासिक येथे मित्रमेळ्याची स्थापना इ. स. १९०० च्या सुमारास झाली. गणपत्युत्सवप्रसंगी ऐतिहासिक वा पौराणिक थोर स्त्रीपुरुषांच्या पराक्रमांवर पोवाडे वा पदे रचून राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या कल्पना जनतेत पसरविण्याचे कार्य मित्रमेळ्याने केले. सिंहगड व बाजीप्रभु यांचेवरील सावरकरांचे स्फूर्तिदायक पोवाडे, आणि गोविंद शाहीर (दरेकर) यांचा 'शिवाजी व मावळे यांच्यामधील संवाद' यांना याच निमित्ताने प्रसिद्धी मिळाली. मित्रमेळ्याचे रूपांतर पुढे 'अभिनव भारता'त झाले आणि वरील मित्रद्वयांची मेळ्यांतील पदे 'स्वातंत्र्यसूक्ते'च ठरली. त्यांतील काही निर्बंधात पडली. सावरकरांच्या राष्ट्रीय कवितेचे गुणग्रहण यापूर्वी केलेच आहे, या ठिकाणी गोविंद शाहीरांच्या राष्ट्रीय कवितेचे वैशिष्टय लक्षात घेऊ.

'जी कविता वीररसाचा स्वीकार करून देशाला तारून 'जनी बलसाजिरा' टरते ती वीरा–कविता' या आपल्या कल्पनेप्रमाणेच गोविंद शाहिरांनी आपल्या कवितेतून वीररस निर्माण केला. 'रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळाले' असा त्यांचा सवाल होता. 'ज्या एका खांबावर महाराष्ट्रद्वारका निर्भयतेने उभी होती' त्या लोकमान्य टिळकांचा गौरव करताना त्यांनी खालीलप्रमाणे उद्गार काढले.

'असंख्य तरवारींचे मुजरे झडावेच तुजपुढे
मुक्या मनाने किति उधळावे शब्दांचे बुडबुडे
तुझे पवाडे गातिल पुढती तोफांचे चौघडे.'

गोविंद कवींच्या राष्ट्रीय विचारसरणीत कसा ध्येयवाद होता याचा आता विचार करू.

गोविंद कवींनी 'शिवाजी', 'शिवाजीचा दरबार', 'राष्ट्रसंतप्रतिज्ञा' इत्यादी ऐतिहासिक कविता लिहिल्या. त्यांनी आपल्या साध्या शब्दात

"परमेशाचा जाहिरनामा टिळकरूप लागला"

असे उद्गार काढले आणि

"विद्वत्तेच्या अंकावरती देशभक्ति खेळते"

असे लो० टिळकांचे आदरयुक्त शब्दांत वर्णन केले. हिंदुस्थानने जपानचे अनुकरण करावे म्हणून त्यांनी 'जपान–स्तवन' लिहिले. तथापि गोविंद कवींची मनोवृत्ती अध्यात्मप्रवण असल्यामुळे त्यांच्या एकंदर राष्ट्रीय कवितेवर वेदांताच्या विचारसरणीची पूर्ण छाप पडल्यासारखी दिसते. पुढे पुढे 'मानवतेवरील एक कलंक' याच दृष्टीने ते हिंदुस्थानातील हीनदीन जनतेकडे पाहू लागले.

'मनुष्य–निर्मित भेद नसावा मानव बंधूबंधूत'

किंवा

'आर्यदेश तो स्वयंशिवोऽहं जीवांचा विश्वास'

या पद्यपंक्तींतील विचार त्यांच्या मनांत खेळू लागले असे दिसून येईल. टिळकांच्या निष्काम कर्मयोगाच्या शिकवणुकीचे सार त्यांनी खालील एका ओळींत आणले आहे. पौरस्त्य तत्त्वज्ञानाविषयी ते म्हणतात

'संत महंता शांत। जरी तरि। असंतास नच शांत।'

यावरून गोविंद कवींच्या स्वातंत्र्यगीतांत 'ध्येयदर्शित्व व व्यापकत्व' होते असे म्हणता येईल.

## देशभक्तीला देवभक्तीने मधुर केले

साने यांच्या 'पत्री'तील दुसऱ्या विभागातील स्वदेशभक्तिपर स्फुट कवनांना 'आधी केले आणि मग सांगितले' हा रामदासांचा दण्डक लागू पडतो आणि म्हणूनच त्यांची राष्ट्रीय कवने वैशिष्ट्यपूर्ण वाटतात.

'जारे पुढे व्हारे पुढे' 'नवयुवक' 'तुफान झाले' इत्यादी त्यांची राष्ट्रीय कविता तुरुंगाच्या कोठडीतच निर्माण झाली. म. गांधीच्या असहकारितेच्या चळवळीत–स्वातंत्र्य लढ्यात–कवीने प्रत्यक्ष भाग घेतला होता. साने यांच्या राष्ट्रभक्तीला व्यापक मानवतेची चौकट लाभली होती.

'मोक्षार्थ जें ज्वलित राष्ट्र उभे असेल.<br>त्याच्यापुढे न जगती कुणिही टिकेल'

अशी त्यांची विचारसरणी होती. 'बलसागर भारत होवो' 'भारतास' व स्वातंत्र्यानंदाचे गाणे' या गीतत्रयीतील आणि इतर राष्ट्रीय कवितांतील उत्कट राष्ट्र-

प्रेम, दुर्दम आशावाद आणि अंत:करणाची तळमळ यांचा प्रत्यय वाचकास येतो. सावरकर, गोविंद शाहीर या राष्ट्रीय कवींच्या परंपरेतच साने गुरुजी यांचा अंतर्भाव करणे, इष्ट होईल. मात्र पाल्हाळिक रचनेमुळे, व अति हळव्या भावनेमुळे साने यांच्या काव्यातील परिणामकारकता कोठे कोठे कमी झाली आहे.

'सेनापती बापट यांच्या देशभक्तीला देवभक्तीने अधिकच मधुर केले आहे' असे उद्गार पां. स. साने यांनी काढिले आहेत; 'आत्मलय होण्याचा मार्ग जगत् सेवा आणि जोपर्यंत देशसेवा घडत नाही तोपर्यंत जगत्सेवा होत नाही' म्हणूनच

'देश भक्तिमार्गी एका मुक्तिलाभ होणार'

असा आपला दृढ विश्वास सेनापतींनी 'चैतन्यगाथे'तील 'देशभक्ति' या गीतात प्रगट केला आहे.

'जन परदेशीय असो किंवा निजदेशीय असो पावो जनदु:ख विलय' हीच संतप्रणीत व्यापक दृष्टि त्यांच्या राष्ट्रीय भावनेच्या पाठीमागे दिसून येते.

## माधव कवींची ऐतिहासिक कविता

मराठ्यांच्या इतिहासातील स्फूर्तिदायक प्रसंग निवडून त्यावर वीररसप्रधान कवने रचण्यात माधव कवींचा ( माधव केशव काटदरे ) हातखंडा आहे.

शिवराजांचे नाव कानावर येताच... 'तनुत होय संवेदना ।
चढे रुधिरबिन्दुंना स्फुरण लाधुनी चेतना ॥'

असे कवींस वाटते. शनिवारवाड्यापुढे उभे राहताच डोळ्यांत अश्रू दाटून येतात आणि महाराष्ट्रदेशाच्या इतिहासातील वीररसांनी थबथबलेली पाने राष्ट्रभक्तास वाचावयास मिळतात. जो दुर्गराज महाराष्ट्राचे केवळ हृदयच आहे अशा शिवकालीन रायगडाच्या मंगलमय गानातून ते व्यापक राष्ट्रीय भाव प्रगट करतात. त्यांची ही भावना आजच्या काळात उद्बोधक ठरणार आहे.

"हे एकाचे नव्हे कुणाचे स्वराज्य सकलांचे ।
सुसंस्कृतांचे, असंस्कृतांचे, श्रेष्ठकनिष्ठांचे ॥
महाराष्ट्र हा तनय पार्वती–परमेश्वर यांचा ।
द्वेष याजला जन्मापासुन जुलमी सत्तेचा ॥"

छत्रपतींनी दिल्लीश्वराला जे पत्र पाठविले त्यातून शिवरायाच्या उदार दृष्टीची कशी ओळख होते हे कवीने दाखविले आहे.

"जो निर्मितो जगति मानव भिन्न वर्ण
निर्माण तोच करि धर्महि भिन्न भिन्न;
एकाभिमान धरुनी छळणे दुज्याला,
होणे नव्हे प्रिय तया परमेश्वराला"

याशिवाय शाहूराजाचे दक्षिणेतले आगमन, सरखेल इन्द्रोजी कदम आणि त्याचे गर्वहरण, तारापूरचा संग्राम, सबळ आंगरे–त्यांचे आरमार– पानिपतचा सूड– जिवबाची स्वामिनिष्ठा, ' जिवलगाकारणे जानहि कुर्बान करणारी मस्तानी', पेशव्यांचा अखेरचा शूर सेनापती गोकलखा, इत्यादी ऐतिहासिक प्रसंगावर व व्यक्तीवर यथोचित पोवाडे रचून माधवकवींनी मराठ्यांच्या स्फूर्तिदायक इतिहासाचे दिग्दर्शन मराठी रसिकांस घडवून, ऐतिहासिक राष्ट्रीय कवितेचे एक विशिष्ट अंग सुशोभित केले आहे.

विनायक, माधव, या कवींप्रमाणेच अज्ञातवासी ( दिनकर गंगाधर केळकर ) यांनाही मराठ्यांच्या गतेतिहासाचा अभिमान वाटत असे. विशेषतः पेशवेकालीन मराठ्यांच्या वैभवाने त्यांच्या भावना उचंबळून येत. एकेकाळी 'पुणे दरबारी' शत्रूच्या खड्या समशेरी वाकत असत, म्हैसुरी वाघाच्या उरात कापरे भरे, एवढा इंग्रजी बावटा धीट पण पेशव्यांच्या रणभेरीपुढे तो थरथरत असे, कवीच्या शब्दांत लिहावयाचे म्हणजे

' केवढी पुण्याची भीति । पहा कापती ।
चळचळा वैरी । तळपती तिखट तलवारी—
पुणे दरबारी '

याच संदर्भात त्यांच्या 'मायभूमि' ' श्री महाराष्ट्रास', 'तानाजी मालुसरे' 'ऊठरे भाई' इत्यादी कविता लक्षात येतात.

गतकालाप्रमाणेच सद्यःकालीन परिस्थितीशी कवीचे मन समरस होत असे. तांबे यांच्या राष्ट्रीय कवितेचा दुसरा भाग १९२७ मध्ये प्रसिद्ध करून कवीने जसे कविप्रेम तसेच राष्ट्रप्रेम व्यक्त केले.

## तिवारींची संग्रामगीते आणि इतर कवींची ऐतिहासिक कविता

दु. वा. तिवारी यांनी संग्रामगीतांतून मराठ्यांच्या इतिहासातील काही निवडक समरप्रसंगावर वीररसप्रधान गीते रचली आहेत. उदा.

' फेकिला तटावर घोडा, ' ' धन्य जननि जनकोजीची ।'
' खाशानिशि मारिला गिलिचा, ' ' वडगांवावरचा वीर । '

इत्यादी अनेक गीते स्फूर्तिदायक आहेत.

देशाकरिता प्राणार्पण करणाऱ्या वीरांच्या वीरवृत्तीची चित्रे तत्कालीन परतंत्र भारतातील तरुण तरुणींना स्फूर्तिदायक व ओजस्वी वाटली. राष्ट्रीय भावनेच्या प्रसाराचे कार्य वरील गीतांनी केले.

'कुंजविहारी' यानी लिहिलेला ' सिंहगडचा पोवाडा ' आणि असहकारितेच्या

चळवळींत सत्याग्रही वीराने केलेल्या आत्मबलिदानावर रचलेले ' भेटेन नऊ महिन्यांनी ' हे गीत यांचा उल्लेख या ठिकाणी करणे उचित होईल.

बाजीप्रभूवरील पोवाड्यात गो. रा. हिंगणेकर यांच्या ' पावनखिंडीचा ' आणि स. गो. विरकूड यांच्या ' महाराष्ट्राची थर्मापिली ' या कवितांचा उल्लेख करणे आवश्यक आहे. अरविंद ( दि. ना. शिंदे ), ए. या. निफाडकर, सरोजसुहृद, ग. त्र्यं. माडखोलकर इत्यादिकांनी ऐतिहासिक विषयावर पोवाडे रचून राष्ट्रीय भावनेच्या जागृतीच्या कार्यात भाग घेतला.

त्याचप्रमाणे ' देहाचा पूल ' ' स्वातंत्र्यलक्ष्मीचा मुजरा ' ' मायभूला कोण पाहिजे ' ' अर्जून ' इत्यादि कवितांमधून महाराष्ट्राच्या पूर्ववैभवाचे यशवंतांनी गुणगान केले.

' मांडवी ', ' समर्थांच्या पायापाशी ' इत्यादी कवितांच्या निर्मितीच्यामागे कवीला रामदासासंबंधी वाटणारा प्रेमादरभाव दिसून येतो.

## राष्ट्रपुरुषांना वाहिलेली आदरांजलि

१९२३ मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'महाराष्ट्रवंदना'त लक्ष्मण शास्त्री लेले यांनी लिंग, जाती, वर्ण, वय व पक्ष इत्यादिकांस अवसर न देता महाराष्ट्रीय विभूतींना वंदन केले आहे.

' स्वधर्म स्वदेश स्वभाषा भजाया
जिही होमिली स्वार्थ सांडूनि काया
स्मरावे प्रभाती तया पुण्यशीला । '

असा हेतू धरून हे प्रदीर्घ काव्य रचण्यात आले आहे. शहाजी, शिवाजी या विभूतींपासून तो विष्णुशास्त्री ह. ना आपटे ना. गोखले लो. टिळक इत्यादी श्रेष्ठ पुरुषांपर्यंत होऊन गेलेल्या राष्ट्रपुरुषांना या काव्यात कवीने आदरांजली अर्पिली आहे. लो, टिळकाबद्दल कवीने लिहिले आहे.

' प्रभूला किती प्रार्थितो प्रेमभावे
पुन्हा बाळगंगाधरा जन्म द्यावे ।
रचे कर्मयोगार्थ गीतारहस्य
गमे निर्विकारा बुधां तें प्रशस्त
महा यत्नवादी त्यजीना स्वकार्य
चिकाटी अशी तो धरी वीर आर्य ! '

## राष्ट्र-गीते

आपल्या जन्मभूमीला आदरभावाने प्रण.म करून तिचा जयजयकार करणे हाही अनेक राष्ट्रीय कवितांचा प्रमुख विषय होणे साहजिकच आहे. अशा राष्ट्रीय

गीतांत ' महाराष्ट्र-दर्शन ', ' हिंदवंदना ' ( चंद्रशेखर ) ' हा हिंद देश माझा ' ( आनंदराव टेकाडे ) ' महाराष्ट्रगीत ' ( गोविंदाग्रज आणि-श्री. कृ. कोल्हटकर ) माझ्या जन्मभूमीचे नाव ( रे. टिळक ) ' हिंददेवते'स (ना. के. वेहेरे), ' जयजय भारतवर्ष' ( श्री. रा. बोबडे ) 'नव लाख दिवे हे तुझ्या घरी' (वि. द. घाटे) ' केवळ माझा सह्यकडा ' ( वसंत बापट ) वगैरे अनेक राष्ट्रीय गीतांचा समावेश करणें आवश्यक आहे. महाराष्ट्राच्या मराठी.मातीचा अभिमान महाराष्ट्रकवींच्या नसानसांतून भिनलेला दिसतो. उदा० ' मराठी माती ' ( कुसुमाग्रज ) ' महाराष्ट्रांचे पुण्यस्मरण ' ( नाथ घाणेकर ) इत्यादी कविता पहा. कुसुमाग्रज, बोरकर, विंदा करंदीकर, बापट इत्यादिकांनी जी अलीकडे राष्ट्रगीतें लिहिली त्यांतून त्यांच्या जिवंत राष्ट्रभक्तीचे दर्शन होते यात शंका नाही.

## ऐतिहासिक कविता व राष्ट्रीय कविता

ऐतिहासिक कविता व राष्ट्रीय कविता यांच्यातील भेद ध्यानात न ठेविल्याने सुद्धा टीकाकारांत मतभेद निर्माण झाले. इतिहासातील एखाद्या समरप्रसंगाचे चित्र रंगवून राष्ट्राला समयोचित बोध करण्याची रीत गडकऱ्यांच्या ' पानिपताचा फटका ' या काव्यात आढळते.

" पुरे पुरे हे राष्ट्रविघातक परस्परातिल वैर अहो ।
पानिपताचा फटका ऐकुनि बोध एवढा तरि घ्या हो, "

असे उद्गार कवींनी वरील कवितेच्या अखेरीस काढले आहेत. असेच बोधपर उद्गार विनायक, माधव, तिवारी इत्यादिकांनी आपल्या ऐतिहासिक विषयावरील काव्यांतून प्रगट केले आहेत. या ठिकाणी ऐतिहासिक काव्य व राष्ट्रीय काव्य यांतील भेद लक्षात घेणे इष्ट होईल.

इतिहासकार आणि कवी या दोघांचा वर्ण्यविषयांकडे पाहण्याचा दृष्टिकोन भिन्न स्वरूपाचा असतो. खरा इतिहास हा शास्त्रामध्येच मोडतो, पण काव्य हे कितीही वास्तवदर्शी असले तरी त्यात सत्याभासाचा भाग येणारच. मानवतेच्या सर्वांगीण विकासाच्या प्रक्रियेतील एक ( अस्पष्ट ) बाजू विशिष्ट राष्ट्राच्या इतिहासात दृग्गोचर होईल, पण राष्ट्रीय कवितेला लौकिक परिस्थितीचा पार्श्वभूमीसारखा उपयोग झाला तरी तीत वाढलेल्या जनसमूहाचे उत्कट मनोभाव प्रातिनिधिक स्वरूपाच्या कवींच्या उद्‌गारात आढळून येतात. राष्ट्रीय कविता हे एक अप्रत्यक्ष इतिहासाचे साधन होऊ शकेल, पण इतिहासात राष्ट्रीय कवितांचा प्रत्यक्षपणे अंतर्भाव होऊ शकणार नाही. विशिष्ट देशकालपरिस्थितीचा कवीच्या मनावर जितका उत्कट परिणाम होईल तितके राष्ट्रीय काव्य अधिक हृदयस्पर्शी व जिवंत ठरेल. पण इतिहासकाराचे मन वरील परिस्थितीने जेवढे अकलंकित राहील तेवढे इतिहासाला सत्याचे चिरकालीन स्वरूप प्राप्त होईल. गतकालातील इतिहासाच्या आधारे काही

निश्चित अनुमाने काढून इतरांना मार्गदर्शक होतील अशी ढोबळ सत्ये उघड करताना जेथे इतिहासकाराचे मन डळमळीत होते, तेथे कवीने केवळ आपल्या भावनेने आत्मसात केलेल्या ढोबळ सत्याच्या आधारे, संपूर्ण व शाश्वत संदेशाचे डोलारे निर्माण करणे अनुचित होईल यात शंका नाही. इतिहासाला कोणी विदग्धवाङ्मयात लोटतात, त्याचे कारण सुद्धा इतिहासकार हा मनुष्य असल्यामुळे आपले व्यक्तिमत्त्व त्यात लपवू शकत नाही हेच होय. मग कवी हा तर अधिक भावनात्मक असल्यामुळे कोणत्याही विषयात त्याचा स्वतःचा पक्षपाती दृष्टिकोन प्रगट होणे अपरिहार्यच नाही काय ?

## महात्मा गांधींच्या असहकारितेच्या चळवळीचा मराठी राष्ट्रीय कवितेवर झालेला परिणाम.

महात्मा गांधीच्या असहकारितेच्या चळवळीचा परिणाम मराठी कवींवर झाला. तांबे यांचे आयुष्य उत्तर हिंदुस्थानातील संस्थानी वातावरणात गेले होते तरी त्यांचे अंतःकरण वरील प्रसंगाने उचंबळून आले. ‘अशांचे कोण करिल तरि काय’, ‘वाटले नाथ हो तुम्ही उतरता खाली’ ‘उखळात दिले शिर काय अता’ किंवा ‘मरणात खरोखर जग जगते’ इत्यादी भावगीतांमधून तांबे यांनी प्रदीप्त राष्ट्रीय भावना आणि सडेतोड विचार प्रगट केले आहेत. म. गांधींच्या पहिल्या असहकारितेच्या चळवळीची लाट महाराष्ट्राने चांगलीच उचलून धरली. यशवंतांच्या ‘अजून’ या राष्ट्रीय कवितेत त्याच सुमारास सुरू झालेल्या शिवस्मारकासंबंधीचा अस्पष्ट पडसाद उमटलेला दिसतो. माधव ज्यूलियन यांनी ‘दोन विभूतीं’त महात्मा गांधी आणि रवींद्रनाथ टागोर यांच्या थोर व्यक्तिमत्त्वाची काव्यमय प्रशंसा केली. आनंदराव टेकाडे, ना. के. बेहरे इ. कवींनी शाहिरी थाटाच्या कविता लिहून अगोदरच प्रक्षुब्ध झालेल्या लोकांच्या विचारसागराला राष्ट्रीय प्रेमाची चांगलीच भरती आणिली. तिवारींच्या ‘संग्राम–गीतां’नी लोक मोहून गेले. पहिल्या महायुद्धानंतर राजकीय हक्कांची जी अपेक्षा सामान्य जनतेने आणि पुढाऱ्यांनी ठेविली होती, तिला ‘रौलेट ॲक्ट’सारख्या जुलमी कायद्याने जे कृतघ्नतेचे प्रत्युत्तर दिले त्यामुळे अखिल भारतवर्ष असंतोषाने धुमसत राहिला. टिळकांच्या होमरूल चळवळीने जेवढे लोकमत घुसळून निघाले नाही, तेवढे प्रक्षुब्ध वातावरण वरील कायद्याच्या कलमाने केले. त्यातच जालियनवाला बागेतील कत्तलीने आगीत तेल ओतल्यासारखे झाले. आणि एक क्षण असा निर्माण झाला की, महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली १८५७ सालच्या सशस्त्र पण अयशस्वी प्रयत्नांची अशस्त्र पण यशस्वी आवृत्ती निघणार की काय ? यासंबंधी प्रत्यक्ष कार्यकर्त्यांच्या मनांत संशयाचे काहूर माजून राहिले. कंसाला कृष्ण जसा जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी दिसू लागला तद्वतच इंग्रजी सत्ताधाऱ्यांना गांधींचा सत्याग्रह कुठे पेट घेईल व कुठे नाही असे वाटू लागले. या धामधुमीत मराठी

कवींनी प्रत्यक्ष भाग घेऊन कोठल्या एखाद्या विशिष्ट प्रांतातील सामान्य जनतेचे पुढारीपण आपणाकडे घेतलेले दिसत नाही. सानेगुरुजी व सेनापती बापट या दोघा राष्ट्रीय पुढाऱ्यांनी आणि कवींनी मात्र आपले जीवितसर्वस्वच कॉंग्रेसच्या कार्यात खर्च केले. सोलापुरात उडालेल्या हल्कल्लोळाने त्यावेळी लोकमतात केवढी प्रक्षुब्धता निर्माण झाली होती, याचा प्रत्यय वेहेरे यांच्या त्यावेळी निर्बंधात पडलेल्या ' सप्तर्षी ' या कवितेवरून येते. पुढे लॉर्ड आयर्विन आणि म. गांधी यांचा समेट घडून येताच वादळापूर्वीच्या शांततेची एक लाट सर्वत्र पसरली.

याच सुमारास Communism ( साम्यवाद ), Socialism ( समाजसत्तावाद ) इ. रशियातील नव राष्ट्रकल्पनेसंबंधीच्या प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष हकीगतींनी तरुणांची मने आपलीशी केली, आणि मजूरवर्ग आणि धनिकवर्ग यांच्यातील घडून येणाऱ्या विरोधामुळे सत्ताधारी राज्यकर्त्यांचे लक्ष वरील गोष्टींच्या मूळ कारणाकडे वळले. सुप्रसिद्ध मीरत खटल्याचे सार्वत्रिक परिणाम जरी कांही दिसून आले नाहीत तरी राष्ट्रीय प्रेमाच्या भावनेने प्रेरित झालेल्या तरुण वर्गात एक प्रकारच्या अस्वस्थतेचे बीज पेरले गेले यात काही शंका नाही. फार काय, पण जगातील धनवंतांचा साम्राज्यवाद आणि गरिबांचा समतावाद यांच्यातील विषमता दाखविणारी पहिली ब्रह्मांडविदारक आरोळी त्या वेळी वयाने वृद्ध असणारे पण मनाने नेहमीच तरुण ठरलेले तांबे यांनी ' रुद्रास आवाहन ' करून दिली. तांब्यांनी यापूर्वी राष्ट्रीय कविता लिहिल्या नाहीत असे नाही. कारण की तांब्यांच्या कवितेचा विकास त्यांच्या जीवनाच्या संसर्गाने झाला असल्याने त्यांची राष्ट्रीय कविता परिस्थितिनिरपेक्ष राहिली नाही. देशात उद्भवलेल्या घनघोर प्रसंगांनी त्यांच्या हृदयात वेळोवेळी जी घरे निर्माण केली त्यांच्या खुणा त्यांच्या काव्यात ठिकठिकाणी आढळतात. उदाहरणार्थ आपण संस्कृतीपाशात सापडल्यामुळे आपणास मातृसेवेच्या उद्धारात प्रत्यक्ष भाग घेता आला नाही याबद्दल त्यांनी ' मातृभूमीप्रत ' या कवितेत हळहळ व्यक्त केली आहे. लोकमान्यांच्या स्मृतीने त्यांचे चित्त हेलावले आणि त्यांनी

' तेची चिरंजीव जगी जहाले, हाले जयांच्या मरणें धरा ही '

असे उद्गार काढले.

" घन तमी शुक्र बघ राज्य करी रे खिन्न मना तू पहा वरी "

हे आशादायक सूर त्यांनी विपदवस्थेतील तरुणांच्या कानी घातले. या सर्व विचारसरणीत कोठे गत–वैभवाबद्दल हळहळ, कोठे मनाला ' घाबरू नको बावरू नको असा इशारा,' तर कोठे राष्ट्रीय पुढाऱ्यांचा गुणगौरव करण्याची रीत दिसून येते. पण व्यापक भूमिकेवर उभे राहून आपल्या देशातील दलित वर्गाची दुःखे चवाठ्यावर आणण्याचे कार्य तांब्यांनी उतार–वयात लिहिलेल्या काव्यांनीच अधिक केले. पुढे पुढे गतवैभवाच्या चिंतनात रमणारा

स्वप्नाळूपणा त्यांच्या गीतांत आढळत नाही. 'भविष्याचिया कारागिरा कोण रोधील ?' हा प्रश्न त्यांनी हिंदुस्थानाच्या तत्कालीन परिस्थितीचे सूक्ष्म निरीक्षण करूनच पुढे मांडिला. उदात्त भावना व प्रबळ आशावाद या दोन्ही गोष्टी या कवितेत आढळतात. साम्राज्यवाद्याची भूक किती प्रखर असते याचे त्यांनी हृदयस्पर्शी चित्र रेखाटिले आणि नव्या पिढीला त्यांनी जो संदेश दिला तो तर वर्तमान काळा-बरोबर धाव घेणाऱ्या त्यांच्या दुर्दम्य आशावादाचा एक भाग वाटतो.

"हातास ये जे, स्वनेत्रापुढे जे, तया वर्तमाना करा साजिरे"

हाच तो संदेश होय; पण एका गोष्टीचा उलगडा करणे आवश्यक होय. तांबे यांनी जो वरिष्ठ व कनिष्ठ वर्गांतील विषमतेवर आपल्या काव्याच्या द्वारे प्रहार केला, याचे कारण, त्यांच्या मनावर काही पश्चिमेकडून वाहत आलेल्या नवविचार-सरणीची दाट छाया पडलेली होती हे नाही. केशवसुतांपासून तो तांब्यांपर्यंत होऊन गेलेल्या बहुतेक सर्वच कवींच्या मनावर पौरस्त्य तत्त्वज्ञानाचीच दाट छाया पडलेली दिसते. 'सृष्टी,' 'राष्ट्र,' 'प्रेम' किंवा इतर कोणताही विषय असो मराठी कवींची ही तत्त्वप्रवणवृत्ति मधून मधून दिसून येते.

म. गांधींच्या असहकारितेच्या चळवळीने ब्रिटिश राजवटीला हादरा दिला, आणि तिचा अस्तकाल समीप आणिला. या प्रसंगी आनंदराव कृष्णाजी टेकाडे यांनी 'सूर्यास्त' ही रूपकात्मक कविता लिहून राष्ट्रीय चळवळीत भाग घेणाऱ्या स्वयंसेविकांचा गौरव केला. तांबे यांच्या प्रमाणेच वेहरे यांनी 'साम्राज्यवाद्या'स ही कविता लिहून ब्रिटिश सत्तेचा अधिक्षेप केला. कुसुमाग्रज यांनी 'क्रान्तीचा जय-जयकार' ही कविता यानंतर लिहिली.

## राष्ट्रीय कवितेतील व्यापक दृष्टिकोन

मराठबाणा, महाराष्ट्रगीत, शिवप्रताप इत्यादी कवितांतून माधवज्यूलियन यांचे महाराष्ट्रप्रेम प्रत्ययास येते. 'कमाल,' 'पश्चिमेच्या मारुताचे उच्छ्वास' यांमधून त्यांचा आंतरराष्ट्रीय दृष्टिकोन प्रगट झाला आहे. ही दोन गीते व 'भ्रांत तुम्हा का पडे' ही जणू मानवी 'स्वातंत्र्याची सूक्ते' आहेत. 'दोन विभूती' मधून त्यांनी 'रवींद्र' व 'महात्माजी' यांची तुलना केली आहे. याचा उल्लेख मागे झालाच आहे. या सर्व कविता वाचल्या म्हणजे कवीचा व्यापक राष्ट्रीय दृष्टिकोन प्रतीत होतो. अनंततनय यांनीही अशाच व्यापक दृष्टिकोनांतून 'प्रेसिडेंट विल्सन-लेनिन, व महात्मा गांधी' यांच्या गुणगौरवार्थ सुनीते लिहिली आहेत.

## स्त्री-पावित्र्य-रक्षण

स्त्रीच्या पावित्र्याचे रक्षण करणे हे राष्ट्राचे सर्वश्रेष्ठ कर्तव्य होय. प्रभाकर मुळे या नावाच्या तरुणाने पुंडांच्या हातून एका अबलेची सुटका करताना स्वतःचे

प्राण गमावले या सत्यकथेवर माधव ज्यूलियन यांनी ‘ पुरुषांची छाती ’ ही कविता लिहिली. ‘ प्रतिष्ठाच जी धर्मांची, ही स्त्री तिचियासाठी, स्फुरावी पुरुषाची छाती’– हा स्फूर्तिदायक संदेश या कवितेत त्यांनी दिला. याच संदर्भात यादव मुकुंद पाठक यांनी लिहिलेले ‘ शशिमोहन ’ हे ओजस्वी खंडकाव्य लक्षात घेणे आवश्यक आहे. एका दुराचारी माणसाने आसामातील एका खेडेगावातील विवाहित स्त्रीवर -पवित्रेवर–बलात्कार करण्याचा दुष्ट बेत रचला. शशिमोहन दे याने त्या समाजकंटकाचा वध करून अबलेचे रक्षण केले, या सत्यपूर्ण कथाभागावर पाठक यांनी वरील खण्डकाव्य–१४३ स्फुटगीतांत रचले आहे. या काव्याच्या अखेरीस कवीने काढलेले उद्गार अत्यंत स्फूर्तिदायक आहेत.

“ प्रलय वरा ! होउ द्या जगाच्या ठिकऱ्या ठिकऱ्या पण–
पतिव्रता–पावित्र्य वेदवत् ठेवा नित राखुन ! ”

## राष्ट्रीय कवितेचा एक विषय–सामाजिक उन्नति

गतेतिहासाच्या आधारे ‘ पूर्व दिव्य ज्यांचे त्यांना रम्य भाविकाळ ’ असा संदेश देणे, देशातील पारतंत्र्याचा निषेध करून स्वातंत्र्यास्तव क्रान्तिदेवीचा जयघोष करणे ही राष्ट्रीय कवितेचीच अंगे होत, असे म्हटल्यास अनुचित होणार नाही. समाजव्यवस्थेतील अन्यायावर व रूढीवर प्रहार करणे आणि व्यापक राष्ट्रीय—दृष्टिकोनातून मानवतावादाचा पुरस्कार करणे हे गुण ज्या कवितांतून दिसून येतात त्यांचाही विचार राष्ट्रीय कवितेबरोबरच करणे इष्ट होईल. सामाजिक प्रगती आणि राष्ट्रीय उन्नती या गोष्टी एकमेकांना पूरकच होतात. किंबहुना त्या परस्परांवर अवलंबून असतात. म्हणूनच सामाजिक क्रान्तीची घोषणा ज्या गीतांतून केली जाते त्यांनाही राष्ट्रीय कवितेचा दर्जा प्राप्त होतो. यापुढे केशवसुतांपासून तो मर्ढेकरांपर्यंत ज्यांनी सामाजिक समतेचा व्यक्तिस्वातंत्र्याचा, आणि मानवतेचा व्यापक राष्ट्रीय दृष्टिकोनातून भावनात्मक विचार केला त्यांच्या कवितांचे वैशिष्ट्य लक्षात घेण्यात येईल.

## सामाजिक क्रांतीचा राष्ट्रोन्नतीशी आलेला संबंध
## ‘ नरेच केला हीन किती नर.’

केशवसुतांनी समाजात दिसून येणाऱ्या मानवामानवामधील विषमतेचा तीव्र निषेध केला आहे. गरीब आणि श्रीमंत यांच्यामधील भेद, अंत्यजांना समाजाकडून मिळणारी निंद्य वागणूक आणि कष्ट करूनही मजुरांची होणारी उपासमार ही समजातील व्यंगे असह्य होऊन ‘ नरेच केला हीन किती नर ’ असे उद्गार त्यांच्या मुखातून बाहेर पडले. पददलित व उपेक्षित मानवांबद्दल वाटणाऱ्या केशवसुतांच्या सहानुभूतीचे क्षेत्र व्यापक होते. स्त्रीवर्गाला उन्नतीच्या पथात नेणाऱ्या समाज-

सुधारकांचा ( ह. ना. आपटे यांचा ) ते जसा गौरव करतात तसाच राष्ट्रासाठी प्राणार्पण करण्यास सजलेल्या राष्ट्रवीरांचा ते सन्मान करतात.

समाजातील राक्षसी रूढीचे, मूर्तींचे, भंजन करताना विध्वंसन हे विधायक कार्याकरिता करावयाचे असते याचा त्यांना विसर पडलेला नाही. केशवसुतांनी 'नवा शिपाई' या कवितेत प्रेषिताची क्रांतीकारक भूमिका घेतलेली आहे. कदाचित इंग्रजी कवींचा समतावाद व स्वतंत्रतावाद यांची छाप त्यांच्या मनावर पडल्यामुळे त्यांनी मानवतेच्या हक्काचा पुरस्कार केला असावा असे कुणास वाटेल, परंतु केशवसुतांच्या 'नव्या शिपाया'तील विचारात जी ओजस्विता व जो आवेश दिसून येतो, तो उसन-वारीचा किंवा कृत्रिम वाटत नाही. 'तुतारी', 'स्फूर्ति' 'निशाणाची प्रशंसा' इत्यादी त्यांच्या कविता सामाजिक समतेचा पुरस्कार करणाऱ्या आहेत.

केशवसुतांची ही सामाजिक व राष्ट्रीय ज्वलज्जहाल विचारसरणी पुढील कवींना स्फूर्तिदायक ठरली. या बाबतीत त्यांनी तुतारीसंप्रदाय निर्माण केला याचे प्रत्यंतर 'दसरा' ( गडकरी ) 'धर्मवीर' ( बालकवि ), 'रणशिंग' ( टिळक ) 'नौबत' ( भालचंद्र ), डंका ( बी ) इत्यादी कवितांवरून येते. मात्र याचा अर्थ वरील कवींनी केवळ तुतारीचे अंधानुकरण करून वरील स्फूर्तिदायक गीते रचली असा होत नाही.

इ. स. १९१४ मध्ये सुरू झालेल्या युरोप खंडातील महायुद्धामुळे मराठी वाङ्मयात सामाजिक क्रांतीचे नवयुग सुरू झाले. बदलत्या काळाचे व बदलत्या ध्येयाचे 'प्रभात-पोवाडे' मराठीतील शाहीर गाऊ लागले. जी मराठी राष्ट्रीय कविता सामाजिक अन्यायाच्या निषेधपर उद्गारात गढली होती तिला व्यापक दृष्टिकोन मिळाला. बी कवींनी 'आशादेवी' या कवितेत भारतवासियांनी नव्या-युगाला शोभेल असाच नवा व्यापक दृष्टिकोन स्वीकारावा तरच प्रभू त्यांचा पाठीराखा होईल असा निर्भीड संदेश दिला. सर्व पश्चिम दिशा रक्तामध्ये माखून लाल लाल झाली आहे, प्रेतांनी नरकातील दऱ्याखोऱ्या भरल्या आहेत, मांसाच्या चिखलात फिरणाऱ्या वरील भेसूर राक्षसिणीची व गुणवती तेजोवती, सत्त्वाढ्य अशा उषासखीची तुलना त्यांनी केली आहे. सर्व जगाची आशादृष्टी हिंदुस्थानावर खिळून राहिली आहे. म्हणून राष्ट्रात्मा पंगू व पोकळ न बनू देण्याविषयी त्यांनी पुढील बाणेदार इशारा दिला आहे.

'देऊ तोंड नवीन काळ जर हा होऊन आम्ही नवे
येते पालटतां अम्हांसहि पुढे आल्या स्थितीच्या सवे'

युरोपातील लढाईमुळे मराठ्यांना आपला पराक्रम दाखवण्याची जी संधी मिळाली ती कित्येकांना अपूर्व पर्वणी वाटली.

'काळ बदलला, ध्येय बदलले, पूर्व पुण्य फळले
अभिनव भारत जनहो आता जन्माला आले!'

'भगव्या झेंड्यात'ही बी कवींनी पुरोगामी विचारसरणी व्यक्त केली आहे. 'डंका' हा काही 'तुतारी'चा पोकळ पडसाद नाही. 'केशवसुतांच्या तुतारीच्या सुराशी 'बी'च्या डंक्याचे निनाद जुळत असल्याने लांबून ऐकणाऱ्यांनी आपल्या कल्पनेने बी कवींना केशवसुतांच्या पलटणीत दाखल केले.' या अत्रे यांच्या टीकेतील विधान दोन कवींच्या कालातील भिन्न परिस्थितीची चित्रे लक्षात घेतली म्हणजे बरोबर ध्यानात येते. केशवसुत १९०५ मध्ये कालवश झाले आणि बी कवींच्या प्रतिभेचा उन्मेष महा-युद्धाच्या धगीमुळे ज्वलित झाला होता, आणि जेत्यांचे हिडीस खेळ 'बी' कवींनी चांगले ध्यानात ठेवले होते, यात काहीच संशय नाही. बी कवींच्या राष्ट्रवादाचे स्वरूप व्यापक होते. जगात कोणताही देश परतंत्र नसावा हा त्यांचा ध्येयवाद अनेक कवितांतून प्रगट झाला आहे.

एका राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्रावर चालविलेल्या गुलामगिरीचा नाश करणे हेच भारतीयाचे आद्य कर्तव्य होय असे त्यांनी 'तीव्र जाणीव' या कवितेत म्हटले आहे.

### मानवतावाद

'व्यक्तिस्वातंत्र्य,' 'सामाजिक समता,' 'मानवतावाद' यांचा पुरस्कार करणे हा केशवसुतांपासून चालत आलेला संप्रदाय पुढे अनेक कवींनी सामाजिक विषयावरील कवितांतून चालू ठेविला आहे.

अनिलांना केवळ आपल्याच समाजातील हीनदीन व्यक्तींविषयी सहानुभूती वाटते असे नव्हे तर अखिल जगात अर्थविषमतेमुळे मानवाची होणारी दुर्दशा ही त्यांच्या सहानुभूतीचा विषय झाली आहे. 'चिनी निर्वासिता'ला उद्देशून जशी त्यांनी आपुलकी दाखविली आहे तशीच 'सुप्त ज्वालामुखी' या कवितेत समाजाच्या अगदी खालच्या थरातील कामकरी आणि शेतकरी यांची दैन्ये त्यांनी उघडकीला आणली आहेत उदा०

'काम करताही पोटापुरते मिळे न मोल
आहे तो समाज मतलब्यांचा
परपुष्टांचा नफेबाजांचा!
रक्तशोषक जळवांचाच!'

समाजाच्या 'भग्नमूर्तींचे' त्यांना पुनः पुनः दर्शन होते; आणि स्वार्थाची, दांभिकतेची आणि पराजयगामी मनोवृत्तीची दृश्ये पाहून त्यांचे अंतःकरण हेलावते. समाजातील विचारदीप मंदावले आहेत, साऱ्याच आघाड्यांवर सामसूम दिसून येते, कशाचा हुरूप राहिला नाही, असे कठोर निरीक्षण केल्यानंतरही एक आशेचा

किरण ( हुरूप ) त्यांच्या मनात चमकतो आणि ते म्हणतात, ' शिणलेला आणि वैतागलेला मी ( मानव ) वाळली पाने गोळा करताना मातीमधे हात मळवीत होतो. '

' आहे का ह्या सुप्त मातीमध्येच असे सामर्थ्य
स्पर्शानेच जागणारे चैतन्य ? '

केशवसुतांप्रमाणेच अनिलांच्या सामाजिक विषयांवरील कवितांत त्यांचा जीवनविषयक दृष्टिकोन प्रगट होतो, आणि जीवनविषयक विचारांतूनही त्यांच्या सामाजिक क्रांतीचे दर्शन घडते, यासंबंधीचे अधिक विवेचन पृष्ठ ६४ वर ' अनिलांचा मानवतावाद ' या शीर्षकाखाली केले आहे.

## विश्वमानव

' मानवाची आत्म–उदात्तता जरी आज पराजिता झाली तरी ती वंदनीय भासते ' हा सूर ना. ग. जोशी यांच्या 'विश्वमानवां'त आढळतो. भौगोलिक मर्यादा, राजकीय भेद आणि भिन्न धर्मकर्मे, ही मानवाच्या विकासाला मदत करतात असे नाही. ' व्यक्तीचे माहात्म्य उत्क्रान्त होऊन अखिल समष्टी विश्वात्म बनेल'. शेवटी 'प्रज्ञाशक्तीचे आत्मज्योतीशी मीलन होईल तेव्हा मूळचे एकत्व दिसेल, पुनः अभिनव, हे विश्वमानव ! ' असे आशादायक विचार ' विश्वमानव ' या कवितेत ना. ग. जोशी यांनी प्रकट केले आहेत.

भ. श्री. पंडित यांच्या ' सुप्त ज्वालामुखीस ' आणि ' युगान्त ' या कवितांतून बहुजन समाजातील दडलेली शक्ती निर्माण होणार व जुन्याची जागा नव्या प्रेरणा घेणार असे विचार आले आहेत ' वणव्यापूर्वी ' ' माळरान ' ' उद्धार ' या कवितांतून रा. अ. काळेले यांनी दलित आणि उपेक्षित वर्गाकडून होऊ घातलेल्या सामाजिक क्रान्तीचे भविष्य वर्तविले आहे. अशोकानी गरिबांवरील अन्याय सहृदयतेने ' पोट उपाशी ' या कवितेतून प्रगट केला आहे. कांतांनी ' अग्निपंख नभि फडफडुदे ' या कवितेत क्रान्तिदेवीला आवाहन केले आहे. संकेतांचे–मूर्तींचे-भंजन ' बुतशिकन ' या कवितेत श्रीकृष्ण पोवळे यांनी केले आहे. समाजातील विषमतेच्या दर्शनाने ' आज कशानेही येईनाशी झाली आहे झोप ' असे उद्गार शरच्चंद्र मुक्तिबोध यांनी काढले. विंदा करंदीकर यांना 'श्रमदेवी'चा साक्षात्कार झाला आहे. ' मृद्गंधाचे ' महत्त्व वर्णिताना ते लिहितात ......' जुन्याकाळची पापे सारी-क्रांती ही खाउन संहारी-करी मशागत जुन्या जगाची-स्वेदबिंदूंनो ! पिकवा नंतर– शेतें सुखकर नव्या युगाची '

स्वातंत्र्यपूर्वकाळात राष्ट्राकरिता ज्यांनी आत्मबलिदान केले त्यांचा जयजयकार कुसुमाग्रजांनी आपल्या अनेक कवितांतून केला. स्वातंत्र्योत्तर काळातील आजच्या आपल्या सामाजिक जीवनातील काही समस्या त्यांच्या मनाला अस्वस्थ करितात. आर्थिक विषमतेमुळे खालच्या वर्गातील लोकांची होणारी दुर्दशा, जातिभेद, स्वार्थ-

लोलुपता इत्यादि अनर्थांची तीव्र जाणीव त्यांना आहे. 'लोकदेवते'स जे 'आवाहन' कुसुमाग्रजांनी केले आहे त्यातील 'डळमळो पृथ्विचा तोल नभीं भीतीने', 'राखेत लोळु दे किरीट सिंहासने' या ओळी तांब्याच्या 'रुद्रास आवाहना'ची आठवण करुन देणाऱ्या आहेत. त्यांच्या 'अजिंक्य निर्धार' 'वेगवती' 'एक स्वप्न' मेघांची सेना' 'वैष्णव' 'वलिदान' 'मातीचा पुत्र' इत्यादी कविता 'विशाखे'त प्रकट झालेल्या मानवतेवरील प्रेमाचा पुरस्कार करणाऱ्या आणि समाजातील विषमतेचा धिक्कार करणाऱ्या कवितांची (उदा० अहिनकुल) आठवण करून देणाऱ्या आहेत.

वसंत बापट यांच्या 'बिजली' 'स्वातंत्र्य कुठे स्वातंत्र्य' 'सोनापूरच्या भिंतीवरती' 'हिरवा मजला,' इ. कविता, शरच्चंद्र, मुक्तिबोध यांच्या 'आम्ही' 'कुणाच्या वेदना' 'हिऱ्यासम लखाखते डोळे' या कविता कान्त यांच्या 'चकमक झडली आहे' 'नागासाकीचे अंध' 'मी वाट आहे,' इत्यादी कविता, आरती प्रभु यांच्या 'मातीची अंबारी' 'नाते' या कविता, 'पिकासोचे कबूतर' (वा. ना. देशपांडे) इत्यादिकांतून सामाजिक क्षेत्रांतून मानवामानवामधून दिसून येणाऱ्या विषमतेचा व अन्यायाचा निषेधच केलेला दिसून येतो.

'अक्षरवेल'कर्ते सदानंद रेगे यांची 'आकाशाची जखम' वैशिष्ट्यपूर्ण आहे. युगानुयुगे चालत आलेला न्यायान्यायातला संघर्ष कवीचे मन व्यथित करीत आहे. यशवंतांनी 'युगन्धरांचे पालुपद' या कवितेत म्हटले आहे "घडी बसाया हवी जगाची–नवीन सुंदर शांत निरामय....फेसहि आला ओठाभंवती! पण–जमेच्च ना, घडेच ना, बनेच ना, पटेच ना!"

समाजातील श्रमजीवी गरीब बांधवांसंबंधी वि. म. कुलकर्णी यांना वाटणाऱ्या जिवंत सहानुभूतीची शब्दचित्रे त्यांनी लिहिलेल्या अनेक भावगीतांतून दृष्टोत्पत्तीस येतात. त्यांच्या सहानुभूतीचे क्षेत्र व्यापक आहे. कुतुबमिनारावरून—उंचीवरून—आपल्याच जातीचा माणूस खुजा दिसतो, हे शल्य त्यांना सहन होत नाही.

'वाटले मनाला नको ऐशी उंची—जेथून भासतो—माणूस खुजा—मजहून दुजा—' समाजांतील ही मानवामानवांतील विषमता त्यांच्या अनेक भावगीतांचा विषय झाली आहे. 'झाडाखाली' पै पैशाचा भाजीपाला विकावयास बसलेला वृद्ध दाढीवाला धोंडीबा, त्याच्या घर्मबिंदूवर 'उभी राहिलेली इमारत'— इत्यादी त्यांच्या 'अश्विनी' मधील कविता त्यांच्या पूर्वीच्या 'लमाणांचा तांडा' या कवितेची आठवण करून देणाऱ्या आहेत.

**'प्राची'**

"कष्टविली काया जरी—घोर तपे आचरूनी
सगरास उद्धराया—आली गंगा न वरुनी"

अशा निर्भीड शब्दांत आजच्या मानवाच्या असहायतेची चित्रे 'प्राची' या काव्य-संग्रहांत गो. म. कुलकर्णी यांनी रेखाटली आहेत. या दृष्टीने 'मरणाच्या भीतीने' 'काळिज हे ठिबकतसे' 'माती' इ. कविता उल्लेखनीय वाटतात. 'पाखरांच्या पंक्ती बंधमुक्त होऊन अंतराळात केव्हा आशेची गाणी गातील' अशी उत्कंठा कवीस लागून राहिली आहे.

## 'नवकवींचा सामाजिक दृष्टिकोन'

विज्ञानयुगाला किंवा आधिभौतिक शास्त्राला दोष देण्याऐवजी मानवाच्या स्वार्थी व भांडवलशाही वृत्तीला दोष देण्याची व आजच्या मानवाने मानवतेची चालवलेली विटंबना चवाठ्यावर आणण्याची प्रवृत्ती नवकवींच्या काव्यांत सर्वत्र दिसून येते. समाजात बौद्धिक व शारीरिक कष्ट करणाऱ्या आजच्या मानवाच्या दुर्दशेची चित्रे नवकवींनी जिव्हाळ्याने रंगविली आहेत. मर्ढेकरांनी दणकट दण्डस्नायू असलेल्या कोळसेवाल्याला नव्या युगातील 'गिरिधर–पुतळा' म्हणून गौरविले आहे. यंत्रालयात सिलेंडरावर कातडी गरगर फिरत आहेत, पिस्टन हिसके घेत आहे, चाके दातादातातून गोविली जात आहेत, अशा पोलादांच्या भव्य पहाऱ्यात ज्याच्या भिवया जरासुद्धा लवत नाहीत अशा कामकऱ्यापुढे मस्तके नम्र होतील, असा दृष्टिकोन मर्ढेकरांनी स्वीकारला आहे. हाच मर्ढेकरांचा दृष्टिकोन अनेक नवकवींना अभिप्रेत आहे. स्वेदाची ही अखंड गंगा 'शेतांतील त्या औतामागून–गिरण्यांच्या यंत्राजवळून–खाणीतून—बेभानपणे वाहत आहे' आणि जुने सांकेतिक शिक्के किंवा नावे ती बुडवीत आहे असे विंदा करंदीकरांना वाटत आहे. जगात कष्ट करणाऱ्यांचे एकच नाते प्रत्ययाला येवो हा आशावाद 'मानवाचे अंती एकच गोत्र' या त्यांच्या अभंगातही प्रगट झाला आहे. 'जोवरी श्रमाविण अन्न मिळे धनिकांना' तोपर्यंत आपला देश स्वतंत्र होऊनही परतंत्रच राहणार असे वसंत बापट यांस वाटते; 'रिते पोट आवळून–ओटी हुंदका धरून शेजी हिंडती घरात–राख झोपे चुलीतून'—अशी शेतावर काम करणाऱ्या शेतकऱ्याची सावकारी पाशामुळे होणारी दुर्दशा 'कान्त' यांनी चित्रित केली आहे. 'त्या वाटेत आज रस्त्याच्या कडेला झोपलेला पाटीवाला दिसत आहे, डोक्याला गोणपाट गुंडाळून एक नंगा वेडा दिसत आहे, परंतु हा अंधार हळूहळू नाहीसा होत आहे, आणि पुढे चैतन्याचा क्षण शोषून घेणाऱ्या उमलणाऱ्या गर्भकळीसारखी दवात न्हालेली पहाट येणार आहे' हा आशावाद नवकवी प्रगट करीत आहेत. 'मराठीचिये नगरी' हा मानवतेचा ध्वज फडकणार आहे असा विश्वास अनेक कवींनी प्रकट केला आहे.

माझ्या मना बन दगड ( विंदा करंदीकर ) रूळ ( म. भ. पदकी ) ( आणि वाटते येताहेत तृणाच्या हलक्या कुजबुजींतून विश्वासाचे, धीराचे गंभीर साद— 'संभवामि'— हे सूर ) 'मजुरांची सांज', ( आनंद ) श्रमदेवीचा साक्षात्कार,

मजूर (विंदा करंदीकर) चकमक झडली आहे. (कान्त) डांबरी रस्ता (गं. ब. ग्रामोपाध्ये) इत्यादी अनेक कविता क्रांतिकारक विचारसरणीच्या आणि मानवतेचा पुरस्कार करणाऱ्या आहेत.

यंत्रयुगांतील शोध माणसांनीच लावले. मानवाचे रक्तशोषणहि मानवानेच यंत्राच्याद्वारे चालविलेले दिसते, हा चमत्कारिक विरोधाभास अनेक नवकवींची अंत:करणे हेलावून टाकण्यास कारणीभूत झाला आहे यांत शंका नाही. 'वजनयंत्र' (वसंत वैद्य) 'अपशकुनी' (वि. म. कुलकर्णी) 'विवस्त्र-पांचाली' (य. दि. भावे) इत्यादी अनेक कवींच्या कवितांतून आजकाल चालू असलेल्या समाज–क्रान्तीची चित्रे दिसून येतात. नवकवींचा हा समाजाकडे पाहण्याचा समतेचा दृष्टिकोन हा आपल्या राष्ट्रैक्यभावनेचाच एक भाग आहे असे समजणे इष्ट होईल. स्वातंत्र्योत्तर काळात राजकीय अन्यायाबरोबरच हा सामाजिक अन्याय नाहीसा करण्याचे एक साधन या दृष्टीनेच काव्याचा अवलंब कवींनी केला आहे असे वाटते.

बहुजन समाजातील दडलेली सुप्त शक्ती, धनिक व श्रमिकवर्ग यांच्यातील विषमतेचा लढा, दलितोद्धार, विश्वबंधुत्त्वाच्या नावाखाली चाललेले पोकळ शांतिपाठ आज मानवी मूल्यांची होणारी हेळसांड, इत्यादी समाजातील महत्त्वाच्या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी नवी कविता कशी मग्न झाली आहे याचा प्रत्यय वरील अनेक कविता वाचून येतो.

## सारांश

आजच्या मराठी राष्ट्रीय कवितेची महत्त्वपूर्ण विविध रूपें दृष्टीस पडतात ती अशी :

( १ ) गतेतिहासातील स्फूर्ती चेतवणाऱ्या घटना अथवा व्यक्ती यांना आपल्या कवितेत स्थान देऊन त्यांचे यशोगान करणे ही प्रथा सावरकर विनायकांपासून तो माधव–तिवारीपर्यंत चालत आलेली दिसते.

( २ ) वर्तमानकाळाला धरुन सामाजिक अन्याय व रूढी यांचा निषेध करणाऱ्या कविता लिहिणे हे राष्ट्रीय कवितेचे दुसरे अंग होय — तुतारी (केशवसुत) दसरा (गडकरी), रणशिंग (टिळक), धर्मवीर (बालकवि), डंका (वी), रुद्रास आवाहन (तांबे) भ्रांत तुम्हां का पडे? (माधवज्यूलियन) इत्यादी कविता या सदरांत येतात.

( ३ ) राष्ट्रीय कवितेचे तिसरे महत्त्वाचे स्वरूप म्हणजे राष्ट्रोन्नतीला पोषक ठरणाऱ्या सामाजिक मूल्यांचा व्यापक दृष्टीने विचार करणे हे होय. व्यक्ति-

स्वातंत्र्याचा व मानवतावादाचा पुरस्कार करणाऱ्या कवितांचा अंतर्भाव या गटात करणे इष्ट होईल. स्वातंत्र्योत्तर काळात अलीकडील कवींनी विश्वबंधुत्वाच्या कल्पनेवर भर दिलेला आहे. 'मानव तेही—मानव आम्ही' या व्यापक दृष्टिकोनाचा पुरस्कार अनेक कवींनी केला आहे. वरील राष्ट्रीय कवितेच्या तीनहि अंगांचा या प्रकरणात साकल्याने विचार केला आहे.

☆ ☆ ☆

# प्रकरण ५ वे

## आधुनिक कवींची प्रेमगीते

### स्त्री–पुरुषांना एकमेकांविषयी वाटणारे आकर्षण

(स्त्री-पुरुषांमधील प्रेमासंबंधीची बहुविध वर्णने आधुनिक कवींच्या काव्यांत दिसून येतात. शृंगाराला सर्व रसांमध्ये प्रमुख स्थान मिळण्याचे कारण स्त्री-पुरुषांमधील नैसर्गिक आकर्षण हेच असावे. आधुनिक मानसशास्त्रज्ञांपैकी फ्राईड याने कामप्रवृत्ती हीच सर्व व्यवहाराच्या मुळाशी वास करते, असे म्हटले आहे.) यासंबंधी अशी एक समजूत आहे की, (आधुनिक कवी इतर कोणत्याही विषयापेक्षा प्रेमगीते अधिक लिहितात. वस्तुतः प्रेमभावनेप्रमाणेच क्रोध, लोभ, मोह, मद आणि इतर भावना व्यक्तीच्या जीवनाला सर्वत्र व्यापून राहिलेल्या असतात.) असे असूनही सर्व व्यवहाराच्या मुळाशी एकच एक भावना प्रभावी असते असे म्हणणे म्हणजे एकाच विकाराला मानसशास्त्रदृष्ट्या अधिक महत्त्व देण्यासारखे होईल. (व्यक्तीच्या तरुण वयात प्रेमभावनेचे प्राबल्य अधिक असते हे खरे; तथापि आधुनिक कवींपैकी केशवसुत, गडकरी, बालकवी इ. अनेक कवी तरुणवयातच कालवश झाले हे लक्षात घेतल्यास आधुनिक मराठी कवींच्या स्वैर कामुक-वृत्तीपेक्षा त्यांच्या संयमशील मनोवृत्तीचेच पडसाद त्यांच्या प्रेमविषयक काव्यातून प्रगट झाले आहेत असे म्हणणे उचित होईल.) आधुनिक कवींनी लिहिलेली बहुसंख्य प्रेमगीते सदभिरुचिसंपन्नच आहेत.

### प्रेमकाव्यातील आत्मपरता

इंग्रजी काव्यातील स्फुट प्रेमगीतांची भाषांतरे वि. मो. महाजनी आणि त्यांचे समकालीन कवी यांनी केली होती, परंतु व्यक्तिनिष्ठ दृष्टिकोनातून अनुभवजन्य प्रेमगीते लिहिण्याची प्रथा केशवसुतांपासून सुरू झाली असे दिसून येते. व्यक्तीच्या जीवनात प्रेमभावनेचे किती महत्त्व असते हे केशवसुतांनी ‘माझा अन्त’ या

कवितेत दाखविले आहे. वृक्षावर वीज पडली असता त्याची जी स्थिती होते तशीच स्थिती स्त्रीच्या सौंदर्याने मोहित झालेल्या पुरुषाची होते.

‘ वृक्षावरी वीज जधी पडावी,
त्याच्या स्थितीतच तिची महती पहावी ’

अशा लौकिक अनुभवावरच वरील कवितेची उभारणी झाली आहे. गडकऱ्यांनी वीज आणि वृक्ष यांना अनुक्रमे स्त्री आणि पुरुष कल्पून त्यांच्या प्रेमाची हृदयद्रावक कथा ‘ प्रेम आणि मरण ’ या कवितेत चित्रित केली. प्रथमदर्शनी प्रेमामुळे प्रेमिकांच्या होणाऱ्या मनःस्थितीची चित्रे रंगविण्यापासून, तो केवळ प्रियेवर निर्लोभ प्रेम करणाऱ्या प्रेमिकांच्या स्वार्थरहित एकनिष्ठ प्रेमापर्यंतचे ( Platonic Love ) विविध प्रेमगीतांचे नमुने आधुनिक कवींच्या प्रेमगीतातून दिसून येतात. स्वच्छंदवादी ( Romantic ) इंग्रजी कवींच्या एतद्विषयक कल्पनांचा परिणाम काही प्रेमगीतांवर झालेला दिसतो. [ भाषांतरित व रूपांतरित कविता हे प्रकरण पाहा. ] तथापि कवींच्या कलात्मक अनुभवजन्य व्यक्तित्वाचे ठसेच अनेक प्रेमगीतांतून दिसून येतात यात शंका नाही.

## प्रेमगीतांतील विरहभावना

केशवसुतांच्या प्रेमगीतातून पतिपत्नीमधील ( नायक नायिकांमधील ) प्रेम-विरहाच्या भावनांचे चित्रण अधिक आले आहे. त्यांच्याच शब्दांत त्याला कारण सांगावयाचे म्हणजे,

‘ सुखाहूनी दुःख स्मरति बहुधा बद्धहृदये, ’

शिवाय स्थलांतराने प्रेमान्तर होत नाही, उलट त्याला उत्कटता येते हेही खरेच. सहवासात असलेली एखादी व्यक्ती दृष्टिआड झाली म्हणजे तिच्यातील विसंगती कालांतराने नष्ट होऊन तिच्यातील आकर्षक भागच मनाला भुरळ पाडतो. कामांधत्वामुळे प्रियकराला प्रियेची व्यंगे दिसूनही येत नाहीत.

“ काले आणिक कष्टदशेने ।
क्षीणत्वाला होते जाणे ।
सगळ्यांचेहि परी प्रीतिचा ।
जोम वाढतो उलटा त्याचा । ”

अशा प्रकारे प्रियेच्या विरहाने प्रियकराचे मन कसे अस्वस्थ होते याचीच यथार्थ वर्णने केशवसुतांनी ठिकठिकाणी केलेली आहेत. उदा. खालील पद्यपंक्ती पाहा—

“ दुर्दैवे तुज सोडुनी जरि दुरी लागे फिरावे मला ।
प्रीति आणिक तू शिवाय न सुचे काही मना माझिया । ”

या मुळेच 'उत्कंटा ज्वलने तुझा विरह हा टाकी मला जाळुनी' असे त्यांनी म्हटले आहे.

विरहभावनेवर उभारलेल्या प्रेमगीतांचे अनेक प्रकार संभवतात. ज्यांचे एकमेकांवर प्रेम आहे पण ज्यांचा विवाह घडून आला नाही अशा प्रेमिकांच्या विरहावस्थेतील उद्गार हा त्यातील एक प्रकार होय, उलट विवाहोत्तर पतीने पत्नीच्या विरहावर जी गीते रचलेली असतात तो दुसरा प्रकार होय. केशवसुतांच्या प्रेमगीतांत दुसऱ्या प्रकारची प्रेमगीते अधिक आहेत. 'जी गीते करुणरसप्रधान असतात तीच अधिक परिणामकारक ठरतात' हे सत्य वरील प्रकारच्या प्रेमगीतांना लागू पडते.

## केशवसुतांचा प्रेमभावनेकडे पाहण्याचा दृष्टिकोन

केशवसुतांनी काही कवितांतून स्त्रीच्या बाह्य सौंदर्याची वर्णने केली आहेत. संस्कृत कवींच्या सौंदर्यविषयक सांकेतिक कल्पनांचा त्यांवर परिणाम झाला आहे. निजगौरत्वे शशिकान्तीला लज्जा आणणाऱ्या आणि विजेहूनही नेत्र दिपविणाऱ्या 'रूपखनीं'चे वर्णन त्यांनी 'मनोहारिणी' या कवितेत केले आहे. तथापि त्यांच्या बहुसंख्य प्रेमगीतांतून प्रियकराला आपल्या प्रियेविषयी वाटणाऱ्या एकनिष्ठ, प्रेम-भावनेचीच चित्रे अधिक आली आहेत. 'प्रत' 'प्रीतीची भाषा' 'प्रियेला सादर केलेली पुष्पमाला' इत्यादी प्रेमगीतांतून प्रियकराच्या उदात्त भावनाच प्रगट झाल्या आहेत. मयूरासनाची स्मृती नाहीशी झाली तरी 'ताजमहाल' हा प्रियजनांना अक्षय प्रेमाची साक्ष देत राहील हा विचार कवीने खालील शब्दांत प्रगट केला आहे.

'काडी एकच गंधयुक्त ननुनी प्रीतीस तूं लाव ती
तीचा वास सदा जगीं पसरुनी देईल तो तुष्टिला !'

'प्रणयकथन' या कवितेतही 'जड हस्ताच्या मर्यादित कृतीमध्ये जडातीत मनोगताची पर्याप्ती होऊ शकत नाही. प्रीतीपुढे सुज्ञपणाची काय थोरवी ?' असा प्रश्न विचारून कवी लिहितात.

'दो हृदयांच्या संगमसमयी कसल्या लौकिक रीति–
घेउन बससी ! सोड लाडके मर्यादेची स्फीति !'

(सामाजिक विषयावरील कवितांतून केशवसुतांनी 'औचित्याच्या फोल विवेकाला' झुगारून देण्याची जी भाषा काढिली आहे तशीच ती प्रेमविषयावरील काही कवितांतून दिसून येते. तथापि केशवसुतांनी विरहावस्थेत आपल्या प्रियेला उद्देशून काढलेल्या उद्गारांवरून असे वाटते की, त्यांची प्रिया ही मर्यादित कार्यक्षेत्रात वावरणारी एक भीरू अबला असावी. तिच्यापुढे केशवसुतच अधिक साहसी वाटतात.)

## इंग्रजी काव्यातील प्रेमगीतांचे अनुकरण

इंग्रजी कवींपैकी बायरन, शेलेप्रभृती कवींचा 'प्रीतीचा पथ वक्र असतो'

असा एक आवडता संकेत होता. केशवसुत—गडकरी या कवींना हा संकेत अमान्य असावा असे दिसते. उदाहरणार्थ—'प्रयाणगीत' या कवितेत केशवसुत लिहितात.

'प्रीतीचा पथ वर्तुळ आहे नर त्याने जाता
मागे असल्या प्रियेचिया तो सहजचि ये हाता।'

'समृद्धी' आणि 'प्रीती' यांत निवड करावयाची झाल्यास कवी प्रीतीलाच मान्यता देतात. प्रियेच्या उत्तेजनाने वनातील काटे सराटे झाडून समृद्धी निर्माण करणे शक्य होईल, परंतु प्रियेशिवाय वैभवाला शोभा नाही.

'तेथे सेविल कोण आश्रमफले ती एकला राहुनी!'

असा कवीचा दृष्टिकोन आहे.

'त्वत्प्रीतीस अपात्र हा जन' 'माझे ठेवुनि चित्त घे' 'प्रीति आणि तू' इत्यादी प्रेमगीतांवर इंग्रजी कवीच्या प्रेमगीतांचा परिणाम झाला आहे.

'आगबोटीच्या काठाशी उभ्या असलेल्या तरुणी'स उद्देशून लिहिलेल्या गीतात केशवसुत पारंपरिक विचाराला धक्का देणाऱ्या ओळी आपल्या प्रेमीनायकाच्या तोंडी घालतात.

"शिराखाली तुझ्या भुज मम गडे स्थापितिल त्या।
तसा माझ्या कंठी कर तव सखे सुंदर अहा—"

प्रियतमेला आळविताना हा प्रेमी—नायक जगापासून दूर जाण्याची इच्छा करतो. त्याची रंभांच्यासंगे सुरनदीमाजी विहरण्याची कल्पना जेवढी दुष्प्राप्य तेवढीच ती साहसाची भासते. अशा प्रकारच्या कवितांतून केशवसुतांनी इंग्रजी कवींचे अनुकरण केलेले दिसते.

## प्रेमगीतांतील ध्येयवाद

रे. टिळकांचा ध्येयवाद त्यांच्या प्रेमगीतांतही प्रगट झाला आहे. प्रेयसीच्या दर्शनाने त्यांच्या अंतःकरणात 'नवसंजीवन' 'मोठे हेतू' 'धैर्य' 'अनुरति' 'दुर्वासनांचा विलय' 'रसज्ञ ध्येय' पूज्यबुद्धी इत्यादी विलोभनीय गुण जागृत होतात. उदा. त्यांची 'माझी भार्या' ही कविता पाहा. आत्यंतिक सद्गुणांचा आरोप टिळक आपल्या प्रियतमेवर करतात, त्यामुळे तिचे स्वभावचित्र उदात्त ठरते. उदा. 'विरह' 'शुद्ध प्रेम' आणि 'वियोग' या कवितांत ज्या प्रिय व्यक्तींचा नायकाला विरह झाला आहे त्या व्यक्तींसंबंधी त्याने आदरयुक्त उद्गार काढले आहेत. (सृष्टीतील तारका, फुले किंवा वाङ्मयातील काव्ये इत्यादी दृश्य किंवा अदृश्य सौंदर्यापासून व्हावयाचा आनंद प्रेमविरहामुळे त्याला लाभत नाही. टिळकांच्या प्रेमगीतांत त्यांचा नेहमीचा ध्येयवाद व सात्त्विकभाव प्रगट होतो. धर्मांतरामुळे ते ज्या मनमोकळ्या वातावरणात वाढले त्याचा गोड परिणाम त्यांच्या स्त्रीविषयक कल्पनेत झालेला दिसतो. स्त्रीस्वातं-

त्याच्या कल्पनांचा पुरस्कार त्यांनी आपल्या प्रेमगीतांतून ठिकठिकाणी केला आहे. ' स्त्रीपुरुष ही संसाररथाची दोन चाके आहेत, किंबहुना पुरुष केवळ स्त्रीचे सारथ्य करतो. प्रेमाच्या क्रीडांगणात दोघांनी निःसंकोचपणे नर्तन करावे, कारण कीं एकनिष्ठ प्रेमात कोठलेही अंतर नसते व उपकारही नसतो, व्यवहाराच्या कृत्रिम कुंपणात प्रीतीची वेल वाढत नाही, प्रेमाचे अद्वैत व्योमधरेच्या चुंबनासारखेच अक्षय टिकते. ही प्रेमसमाधी म्हणजेच खरोखर मुक्ती किंवा जीविताचे सार्थक; आवड आणि प्रेम यांच्यात ऐक्य आहे. ममता हीच सौंदर्याला जन्म देते. प्रीतीचे पोषण अश्रुजलाने होते. पात्र सोन्याचे किंवा मृत्तिकेचे असले तरी प्रेमिकाला पात्रातील अमृताचे वेड लागते. ' ह्या सर्व उच्च कल्पना, प्रेमगीतांतील टिळकांचा आदर्शवाद उघड करतात. केशवसुत प्रियेला उद्देशून—

' बोटे मोडु नको, तसे मजवरी डोळे वटारू नको, '

असे उद्गार काढतात. केशवसुतांची प्रीतीची भाषा लौकिक आहे. टिळक प्रेमाचे शुद्ध आणि वैषयिक असे दोन भाग पाडतात : केशवसुत शारीरिक सौंदर्याची गीते गातात; आणि ते विशुद्ध प्रेमाचेच एक अंग आहे असे मानतात. टिळकांची वृत्ती प्रेमगीते लिहिताना बहुधा बहिर्मुख होते. केशवसुत नेहमी अंतर्मुख होतात. " स्मरण आणि उत्कंठा ' या कवितेच्या शेवटी केशवसुत म्हणतात.

" घेई ध्यास तुझा म्हणून मज दे निद्रा गडे सोडुनी ।
तेणे दुर्लभ गे तुझे अहह ते स्वप्नातहि दर्शन. "

उलट ' शुद्ध प्रेम आणि वियोग ' या कवितेत टिळकांनी म्हटले आहे

" ते तुझे गे चलनवलन प्रेमभंगे शुभांगी ।
पाहोनिया मनिं सहज हो पूज्यबुद्धीच जागी ॥ "

वियोगावस्थेत असताना एका कवीला प्रेयसीच्या चिंतनाने झोप येत नाही आणि त्यामुळे तिच्या स्वप्नांतल्या दर्शनालाही तो आचवतो, तर उलट दुसऱ्याच्या मनात विरहावस्थेतही प्रेयसीचे आंतरसौंदर्यच जागृत होते आणि त्याला समाधान वाटते. दोन्हीही कवींच्या कल्पनेत वास्तवताच दिसते, पण एकाची भूमिका लौकिक स्वरूपाची तर दुसऱ्याची अलौकिक स्वरूपाची वाटते.

' काम निराळे आणि प्रेम निराळे ' अशी टिळकांची विचारसरणी त्यांनी लिहिलेल्या अनेक प्रेमगीतांतून उघड झाली आहे.

' अहा प्रीती प्रीती म्हणुनि धरूनी वृत्ति भलती
करीती नृत्याते विकट नर नारी जगि किती ॥

अशा प्रेमाला त्यांनी ' कामाचे विलसित ' म्हटले आहे.

निःस्वार्थी विशुद्ध दिव्यप्रीतीने जगी शुभमय स्त्रीत्व दिसते, अशा प्रीतीत काहीतरी अगाध असते हा भाव चित्रित करताना टिळकांनी म्हटले आहे.

'कोठे प्रस्तर कुठे कौमुदी अन्योन्यी रति तरी
मीपण तूपण अपुले म्हणजे, प्रिये एकता खरी, समज ही अजरामर सुंदरी.'

प्रीति ही बाह्य रूपयौवनावर अवलंबून नसावी असे सार 'सुशीला' या खण्डकाव्यात त्यांनी काढिले आहे. टिळकांच्या या निःस्वार्थी विशुद्ध दिव्य प्रेमाच्या कल्पनेचा विपर्यासही अनेकांनी केला त्याचे विवेचन पुढे केले आहे.

## बी कवींच्या प्रेमगीतातील रम्याद्भुत वातावरण

दिव्य, विशुद्ध व उत्कट प्रेमाचे सत्यस्वरूप 'चाफा' या गीतात बी कवींनी उघड केले आहे. 'निसर्गसिद्ध शुद्ध प्रेमभावनेचे निघालेले निःशंक आतुर उद्गार 'चाफा' या कवितेत आले आहेत. प्रेमीभूत ध्येयविषयाची गाठ पडली असता आणि प्राप्ती झाली असता सबंध देहस्वभाव पालटून निखळ प्रेम हाच एक सहजस्वभाव बनून जातो.' या कवितेचे वरील यथार्थ स्पष्टीकरण बी. कवींनी केले आहे. घिम्या स्वभावाचा अबोलका गंभीर पुरुष, व अल्लड चतुर व खेळकर प्रणयिनी, यांच्या प्रेममीलनाचे अद्भुतरम्यचित्रण 'चाफा' या कवितेत आले आहे. स्वभावतःच चंचल असलेल्या प्रकृतीने, स्थिर स्वभावाच्या पुरुषाला आपलेसे करून, देहभान विसरून प्रेमाचे नर्तन केले. 'दिठी दीठ' मिळून जाता दोघांचीही गात्रे पांगळून गेली, अंगी भरभरून रोमांच आले—चाफा फुली फुलून आला आणि शेवटी दोघांमधील 'मी'-'तू' हा भाव नष्ट झाला.—वेदान्तातील कल्पनेला अनुसरून पुरुष—प्रकृतीमधील प्रेमाच्या लीलेचे कवीने हे वर्णन केले असावे असेही वाटते.

प्रियकराला अकारण दूर केल्यामुळे प्रणयिनीच्या मनाला झालेल्या विरह-यातनेचे चित्रण 'बकुळ' या कवितेत आले आहे. 'बुलबुल' हा पूर्व जन्मातील तरुण प्रियकर आहे आणि स्मशानात वाढलेली जाईची वेल ही त्याची पूर्वजन्मातील प्रणयिनी आहे. या दोघांच्या एकनिष्ठ प्रेमाच्या अद्भुत भावना कवीने 'बकुळ' या कवितेत चित्रित केल्या आहेत. तीत 'एकनिष्ठ दिव्यप्रेम हे जन्मांतरीही नष्ट होत नाही' हा भाव प्रगट झाला आहे.

शेलेच्या 'When the Lamp is shattered' या कवितेचे बी कवींनी केलेले 'प्रणयप्रयाण' हे भाषांतरित गीतही प्रणयाचे महत्त्व विशद करणारे आहे. सारांश, एक प्रकारचे गूढ रम्याद्भुत वातावरण बी कवींच्या प्रेमगीतांना लाभले आहे.

## गडकरी—प्रेमाचे शाहीर

गडकऱ्यांना प्रेमाचे शाहीर ही पदवी रसिकांनी दिली आहे. प्रेमभावनेची विविध रूपे त्यांनी आपल्या प्रेमगीतांतून रंगविली आहेत. प्रथमदर्शनी मनात

उद्भवणाऱ्या प्रेमभावनेच्या पूर्ततेकरिता आत्मार्पण करणारा प्रेमवीर, ('प्रेम आणि मरण') जीवनदेवीच्या भेटीकरता तळमळणारा प्रणयीजन, रूपाने सुंदर व बुध्दीने तीव्र, परंतु हृदयाने निर्दय, असलेल्या बालेच्या मुग्धतेने मनातल्या मनात झुरणारा आणि —

'जगावाचुनी लाभतीस तरि जग मी केले असते
तुझ्यावाचुनी जग हे आता असून झाले नसते'

असे म्हणणारा काव्यात्मवृत्तीचा प्रेमीजन, इत्यादी प्रेमिकांच्या अंतःकरणातले विविध भाव गडकऱ्यांनी यथार्थतेने रंगविले आहेत. गडकऱ्यांच्या प्रेमविषयक कवितांतून प्रेमिकाला भोगाव्या लागलेल्या विरहभावनांची आणि प्रेमभंगाची चित्रे अधिक आली आहेत. प्रेमामध्ये एकनिष्ठपणा असावा, त्याच्यात व्यवहारातले डावपेच नसावेत असे गडकऱ्यांचे स्पष्ट मत पुढील ओळीत प्रगट झाले आहे.

'व्यवहाराच्या परी संगती प्रीति सुखावह होईना.'

त्यांच्या प्रेमगीतांत वैजयंतीप्रमाणे शोभणाऱ्या 'गोफ' या कवितेत प्रणयीजनांना अनुभवास येणाऱ्या एका चिरंतन सत्याचा आविष्कार झाला आहे. व्यवहाराच्या क्षेत्रात घटनेपेक्षा विघटना सुकर असते, पण प्रेमाच्या क्षेत्रात जोडणे सुकर पण मोडणे कठीण असते. प्रेमाचा गोफ गुंफल्यानंतर त्याचे धागे उलगडणे मोठे कठीण होऊन बसते. फार काय पण उलगडल्यानंतरही त्याचा पीळ मागे राहतो, हे ते सत्य होय.

## करुणरम्य प्रेमकथा.

पूर्ववयामधी जिच्यावर आपण एकनिष्ठ प्रेम केले पण जिची प्राप्ती आपणास झाली नाही, अशा बालेला उद्देशून लिहिलेल्या अनेक प्रेमगीतांतून गडकऱ्यांनी विशिष्ट प्रेमिकाच्या हळुवार, करुणरम्य आर्तभावना चित्रित केल्या आहेत. (ही बाला काल्पनिक असावी की वास्तविक जगातल्या एखाद्या तारेने कवीला वेडे केले होते या निर्णयाच्या अभावी गडकऱ्यांच्या एतद्विषयक कवितांचे स्वारस्य कमी होत नाही.) निर्दोष मनाने गिरविलेला प्रेमाचा पहिला धडा, मनीच्या आशा मनीच खाण्याचा पुढे ओढवलेला दुर्धर प्रसंग, चांदणीच्या मागे लागून पदरी पडलेली हास्यास्पदता, क्षणैक पूर्व प्रेमानुभावाला विसरून जाताना, पण 'जीवाचे जगणे असेच असते सापेक्ष प्रेमावरी' म्हणून आशेवर जगताना, मनाची होणारी द्विधा स्थिती, इत्यादी आंतरिक अनुभव ज्याला आहेत, आणि शेवटी ज्याची प्रेमनिराशा झाली आहे अशा प्रमिकाची शोकपर्यवसायी भावकथा गडकऱ्यांनी हृदयस्पर्शी शब्दांत रंगविली आहे.

जी एकाच वेळी जीवनदेवी आणि सौंदर्याची केवळ प्रतिमाच होऊ शकते तीच प्रणयिनी अशी गोविंदाग्रजाची आदर्श प्रणयिनीची कल्पना आहे. अशा आदर्श-

भूत देवीची त्यांच्या प्रियकराला केवढी तळमळ लागून राहिली होती हे खालील उद्गारांवरून दिसून येते.

‘ जी माझ्यास्तव मी जिचे सकलही आधार जी जीवनीं
देवा भेटवि दाखवी तरि मला ती कोण देवी जनी ? ’

गडकरी जेव्हा प्रेमभावनेचे पृथक्करण करतात तेव्हा मानवी स्वभावाच्या गूढ जाळ्यात ते गुरफटून गेल्यासारखे दिसतात. ‘ इच्छा ’ आणि ‘ उपभोग ’ यांचा अन्योन्यपोषक संगम स्वर्गात तरी असेल काय ? प्रीतीच्या उपनेत्रावाचून नुसत्या उघड्या डोळ्यांना हे जग अंधुक दिसणार काय ? इत्यादी प्रश्नांच्या चिकित्सेत त्यांच्या दृष्टीपुढून प्रियतमेचे बाह्यरूप दूर होते आणि तिच्या स्वभावाची चमत्कृती तेवढी मागे उरते. ‘ पहिल्या चुंबना’तील प्रियकराच्या सहवासात आणि ‘ गुलाबी कोड्या’तील उन्मादक वातावरणात गडकऱ्यांची भूमिका तटस्थपणाचीच असावी, पण मानवी स्वभावाच्या पार्श्वभूमीवर ते जेव्हा प्रणयभावनेचे पृथक्करण करतात तेव्हा ते अंतर्मुख होतात.

केशवसुत, टिळक आणि गडकरी यांच्या प्रेमगीतांतून त्यांचे स्वभावविशेष प्रगट झालेले दिसतात. केशवसुतांच्या प्रेमगीतांत भावनांचा अवखळपणा, तर टिळकांच्या भावनेत गंभीर शांतपणा आढळतो. गडकऱ्यांच्या प्रेमगीतांतून त्यांची सारी वृत्ती भावनेचा एकजीनसी हार मोकळा करीत असावी, त्याप्रमाणे प्रेमभावनेच्या गोफाचे पदर सुटे करीत राहते. मानवी स्वभावाच्या चमत्कृतिजनक तळाशी बुडी मारून तेथील रंगीबेरंगी शिंपले आणि मोती बाहेर आणण्याची गोविंदाग्रजांना हौस आहे, पण तटस्थपणाने उभे राहून व्यक्तीच्या स्वभावाचे आपल्या बुद्धीच्या ‘ क्ष ’ किरणातून मार्मिक परीक्षण केल्याखेरीज गडकरी कधी प्रेमविषयाशी एकरूप होत नाहीत.

## प्रेमभावनेतील दिव्यत्व

‘ प्रेमभावना ही एक उदात्त आणि दिव्य भावना आहे ’ अशी कल्पना केशवसुत व गडकरी यांच्या प्रेमगीतांत प्रगट झाली आहे. ‘नंदनवनामध्ये कल्पलतेला जो बहर आला आणि तिची बीजे जी हृदयी पडली त्यांतून प्रीती अवतरली अशी केशवसुतांनी प्रीतीची व्याख्या केली आहे. मूर्तिमंत पार्थिव सौंदर्याच्या दर्शनाने जर प्रेमाचा उद्भव होत असेल तर केवळ अमूर्त स्वरूपाच्या आंतरसौंदर्याने प्रीती निर्माण होते, या भेदभावात्मक विचारांचा विशेष परिणाम गोविंदाग्रजांच्या मनावर झाला होता. ‘ दिव्य प्रेमाची जाती ’ या कवितेत त्यांनी अशा दिव्य ( Platonic ) प्रेमाची महती गायिली आहे. तीत ते लिहितात.

‘ न मिळे अवसर अभिलाषा । दे वे ची नाही भाषा !
निरभिलाष तन्मयता ती । दिव्य प्रेमाची जाती ।। ’

स्त्रीपुरुषांना एकमेकांविषयी वाटणाऱ्या आकर्षणाला शारीरिक सौंदर्य कारणीभूत होते; केवळ निरभिलाष तन्मयता त्यात नसते. असा आक्षेप प्रेमाच्या दिव्य जातीवर घेतला जातो; काही अंशी तो बरोबर आहे; पण व्यक्तिस्वभावांचे अनेक नमुने लक्षात घेता 'निःस्वार्थी प्रेमभावना' ही दुर्मिळ असली तरी ती अगदी अशक्य कोटीतील आहे, असे म्हणता येत नाही.

## प्रेमभावनेतील अलौकिकत्व

बालकवींनीही अशा अलौकिक दिव्य प्रीतीची गाणी गायिली आहेत. 'हें विश्व प्रेमाने वेष्टिले आहे. प्रेमावाचून स्थिरचर सुने भासेल. विश्वात्म्याच्या मधुहास्यात दिव्य प्रीती वास करते, प्रीती न्यूनतेला पूर्णत्व देते. प्रीतीची प्राप्ती सहज सुलभ नाही, जगदेकवीराच्या गळ्यात ती माळ घालते. 'प्रीती हवी असेल तर जिवंतपणीच मरण घेऊन फिरण्याची तयारी पाहिजे.' असे असामान्य कल्पनांचे सूर त्यांच्या काही प्रेमगीतांत आढळतात.

'प्रेमलेख' ही एक त्यांची निराळ्या प्रकारची कविता आहे.—सांध्यदेवी, तारकासुंदरी, निर्झरिणी, वनस्थली, इत्यादी प्रणयिनींनी लिहिलेल्या विशिष्ट प्रेमलेखांहून प्रियतमेने प्रियकराच्या वक्षावर शिरकमल ठेवून श्वासांच्या कवनात लिहिलेला प्रेमलेख श्रेष्ठ होय ही कल्पना वरील ( सुनीतांत ) आली आहे.

अशी काही प्रेमगीते वगळल्यास बालकवींच्या प्रेमगीतांतून 'प्रीती ही ब्रह्मांडदाहिनी शक्ती आहे!' या सांकेतिक कल्पनेला अवसर मिळाला आहे. बालकवींच्या मनोवृत्तीतील उदास आणि कल्पनारंजित भावनेचा परिणाम त्यांच्या प्रेमगीतांवरही झाला आहे.

## दिव्यप्रेमाच्या जातीचा पुरस्कार

अलौकिक दिव्यप्रेमाच्या जातीचा पुरस्कार सोनाळकर, नागेश, रेंदाळकर, सुमंत इत्यादिकांनी आपल्या 'प्रेमगीतां'तून मोठ्या अभिनिवेशाने केला. निरभिलाष उदात्त प्रेमाचा अर्थ लक्षात न घेता जे कुणी त्याचा उपहास करितात अशा अरसिकांवर सोनाळकरांनी खालील शब्दांत टीका केली आहे.

'धन्य रसिकवर ते जगती । आत्मवंचना जे करिती ।
प्रेमब्रह्म हे एक असे । तत्त्व तया कळणार कसे ?'

'प्रेमरहस्य,' प्रेम की मृत्यु' 'प्रेमजीवन,' 'प्रेमत्याग' इत्यादी अनेक कवितांतून के. म. सोनाळकरांनी निःस्वार्थी प्रेमाचे महत्त्व वर्णिले आहे.

'प्रीतीत एकाकी वृत्ती नाचते ती अवघे धर्मपंथ विसरते' असे विचार नागेशकवींनी प्रगट केले आहेत. त्यांच्या 'झपूर्झा' या कवितेत दयितांना भेटावयास आलेल्या

व जगात प्रेमाचे साम्राज्य स्थापावयास निघालेल्या सख्यांचे गूढगुंजन आले आहे. ' आत्मार्पण दयितांना सर्व ही करा ' असा कवी प्रेमिकांना उपदेश करितात. कल्पनारम्य वातावरणात रंगून जाण्याची कवीची ही वृत्ती वरील प्रेमगीतांतून प्रगट झाली आहे.

## रेंदाळकरांच्या प्रेमविषयक कल्पना

'प्रेममहिमा', 'प्रेमसाम्राज्य', 'माझी प्रीति' इत्यादी प्रेमगीतांतून 'बाह्योपाधीत प्रीती नसते', 'प्रीती ही केवळ प्रीतीकरिताच असते' असे विचार रेंदाळकरांनी प्रगट केले आहेत. प्रियेविषयी प्रियकराला वाटणाऱ्या प्रेमभावनेचे शब्दचित्र 'प्रबोधन' या रसिकप्रिय कवितेत आले आहे.

ज्याला गुलाब प्रिय झाला नाही, परंतु ज्याला कोरांटीच्या फुलाबरोबर जीवित कंठावे लागते, बाभळीचे फूल नावडते झाले, पण गुलाबाचे फूल ज्याच्या हाती आले नाही अशा वृत्तीच्या प्रेमिकांच्या भावना कवीने काही कवितांतून तटस्थपणाने रेखाटिल्या आहेत. त्यांतून कवीच्या आत्मानुभवाचा भाग आला असावा असे गृहीत न धरलेले बरे! रेंदाळकरांनी प्रेमाची कल्पना एवढी व्यापक केली आहे की, प्रेमाला कारणीभूत झालेल्या व्यक्तीत ते भेदभाव मानीत नाहीत. रेंदाळकरांच्या या दृष्टिकोनावर रसिकांनी प्रतिकूल टीका केली आहे.

## प्रेमभावनेतील पृथगात्मता

तांबे यांच्या प्रेमविषयक कवितांतून प्रेमभावनेची बहुविध स्वरूपे दिसून येतात. स्त्रीसौंदर्याकडे पाहण्याचा कवीचा दृष्टिकोन अत्यंत उन्नत व पवित्र आहे. स्त्री ही वीररत्नांची प्रसू आहे. तिच्याकडे ते भयचकित नम्रवृत्तीने पाहतात. 'काळेभोर विशाल केस' या सुनीतात एका लावण्यवती स्त्रीच्या अंतर्बाह्य गुणांचे चित्रण केल्यावर ' जर या सुंदरीस पाहून कोणास पापाची स्मृती राहिली तर त्याला ईश्वराच्या अगाध कारागिरीचे रहस्य कळले नाही ' असे कवीने म्हटले आहे. एकनिष्ठ प्रेमभावनेचा कवीने गौरवच केलेला आहे.

' दे पूर्ण हृदय सुंदरी ' या कवितेत कुभावनेने मन विटाळताच प्रीती पळून जाते आणि जीवन विषमय होते, असे उत्कट भाव प्रियकराने प्रियेपुढे व्यक्त केले आहेत. तांबे यांच्या प्रेमगीतांचे एक वैशिष्ट्य असे की, त्यांनी विवाहोत्तर प्रेमसफलतेची अनुभवसिद्ध गीते रचिली आणि रम्याकृतीच्या अधिदेवतेचा मान त्यांनी आपल्या कांतेस दिला. ' मज्जीवितैकेश्वरी, ' आणि ' मत्‌चित्तखेदनाशिनी ' अशा शब्दांत त्यांनी तिचा गौरव केला आहे. अशा प्रेमान्धत्वाची धन्यताही त्यांनी वर्णिली आहे.

प्रेमिकाविषयी तांबे यांना वाटणाऱ्या सहानुभूतीचे क्षेत्र व्यापक आहे. त्यांच्या प्रेमविषयावरील 'नाट्य गीतां'तून प्रेमविव्हल झालेल्या तरुण-तरुणी, नवपरिणित स्त्रीपुरुष, प्रौढ विवाहित चतुर अंगना, राजकन्या आणि तिच्या दासी, असफल प्रीतीने दिङ्मूढ झालेले प्रणयीजन, प्रेमाचे चेटुक करणारे मुशाफिर, फेरीवाले, धन्वंतरी, मांत्रिक, भोळ्या वंचित स्त्रिया आणि निष्ठुर पुरुष, इत्यादी बहुविध वृत्तींचे प्रेमीजन दिसून येतात. त्यांच्या अंतःकरणातले कोमल वा कठोर, चंचल वा स्थिर, सुखद वा दुःखद असे संमिश्र भाव तांबे यांनी मोठ्या कौशल्याने उघड केले आहेत. याशिवाय तत्कालीन सामाजिक परिस्थितीत असहाय झालेल्या पतिहीन स्त्रीच्या मनातील प्रेमभावनेची कोमल चित्रे कवीने सहृदयतेने काढिली आहेत. स्वप्नातील प्रियपतीच्या दर्शनापासून तो तिच्या मनात नकळत उद्‌भवणाऱ्या पर-पुरुषाविषयीच्या आपुलकीपर्यंतचे तरल नाजुक संमिश्र भाव त्यांनी चित्रित केले आहेत. रूढ सांकेतिक कल्पनांना झुगारून देण्याची क्रान्तिकारक वृत्ती, 'ते कांत यापुढे मीहि तयांची कांता' या कवितेतील विधवेने प्रगट केली आहे. अशा प्रकारे कवीला प्रेमिकांविषयी वाटणाऱ्या सहानुभूतीचे क्षेत्र किती व्यापक होते हे दिसून येईल. ('नववधू प्रिया मी बावरते', 'रतले पर पुरुषाशी' इत्यादी रूपकात्मक प्रेमगीतां-तील वधूवर प्रकृतिपुरुषांची रूपे धारण करतात. त्यांचा विचार जीवनविषयक तत्त्वज्ञान या प्रकरणात केला आहेच.) पौरस्त्य संस्कृतीत वाढलेल्या शालीन वृत्तीच्या स्त्री-पुरुषांच्या प्रेमभावनेची चित्रे तांबे यांच्या प्रेमगीतांतून आढळतात. 'ती रम्या रजनी', 'सखये या स्थानी,' 'सहज तुझी हालचाल' इत्यादी प्रेमगीते वरील विधानाची सत्यता पटवितील.

## विश्वविद्यालयीन मोकळे वातावरण—

स्त्रियांच्या व्यक्तिमत्त्वाच्या विकासाला विश्वविद्यालयीन मोकळे वातावरण कारणीभूत झाले आणि हे उच्च शिक्षण पांढरपेशा वर्गातील स्त्रियांमध्येच प्रकर्षाने दिसून आले. पारशी व आंग्ल समाजात स्त्रीपुरुषांत जे खेळीमेळीचे वातावरण पसरलेले दिसते त्याची थोडीशी कल्पना माधवज्यूलियनांच्या वेळी कॉलेजातून दिसू लागली. त्यांनी कल्पनेने निर्माण केलेल्या नायक-नायिका, अशा वास्तविक खुल्या वातावरणात वावरताना दिसतात. त्या बुद्धीने कुशाग्र, वागणुकीत चुणचुणीत आणि बोलण्यात पटाईत दिसतात. अंतःकरणाचा मोकळेपणा, शिक्षणामुळे प्राप्त होणारी विनयशीलता आणि प्रगल्भ कल्पना, इत्यादी गुण त्यांच्या ठिकाणी वास करतात. उदा० विरहतरंगात प्रभाकर आणि इंदुमती यांच्या मनात उद्‌भवणाऱ्या प्रेमभावनेचे पृथक्करण आजकालच्या विश्वविद्यालयीन वातावरणात वाढलेल्या तरुणतरुणींच्या प्रेमभावाचे दिग्दर्शन करणारे आहे.

'संन्यास ग्रहणीय का न जर हो तेणे सुभद्रा वश'

अशा विचारसरणीचा प्रभाकर हा साहसी 'मंचर' आहे. त्याचप्रमाणे अभ्यासू व नखरेल अशा इंदूच्या निटिलावर बुद्धीचे तेज, निर्व्याजता, आणि आर्यता दिसून येते. काव्यादर्शाला दूर सारून अशा काव्यत्मदेवतेचे पूजन करण्यात प्रभाकराला धन्यता वाटते. ती दोघे रुढीला मोडून सहभोजनास जातात.

'थोराची विदुषी सुधारकसुता वाढावयाला पुढे.'

मग प्रभाकराला बेहद्द जुल्म गोड होऊन गेला यात काय नवल ? नायिकेने पत्रद्वारे बालबोध मोतीवजा अक्षरांत नायकाला आपल्या घरी भेटीला बोलाविल्याचे मराठी काव्यातील पहिले ठळक उदाहरण 'विरहतरंगा'त आढळते. इंग्रजी व संस्कृत वाङ्मयातील इतिहास आणि ललित वाङ्मय यांचे वाचन करणाऱ्या आणि 'संसिद्धी आणि आत्मोन्नती' हे ध्येय बाळगणाऱ्या इंदूच्या बाबतीत वरील गोष्ट अगदी साहजिक होती. शारीरिक सौंदर्याबरोबर बौद्धिक सौंदर्याचा ज्यांच्या ठिकाणी विकास घडून आला आहे अशा दोन व्यक्तींच्या प्रेममीलनात पूर्वपरंपरेला अनुसरून मातापित्यांची आडकाठी येत नाही तर मत स्वातंत्र्याची आडकाठी येते. ती आपण होऊन नायकाच्या प्रेमाला उत्तेजन देत जाते. नायिकेला असे वाटते की विवाहा-शिवायही दोन प्रेमबद्ध व्यक्तींना जवळ राहून आत्मोन्नती मिळविता येणे शक्य आहे. मग या दोघांमधील प्रेमाला तुम्हीं मित्रप्रेम म्हणा किंवा बंधुभगिनी प्रेम म्हणा.

'प्रेमाची परिपूर्णता परिणयी हे व्यस्त कैसे दिसे ?'

या नायकाच्या प्रश्नाला तिने दिलेले वरील उत्तर रूढीला धक्का देणारे होते. शेवटी जवळ जवळ दोन वर्षांच्या विरहानंतर नायिकेलाच नायकाची दया येते व ती आपण होऊन त्याची विवाहाची मागणी मान्य करण्यास तयार होते. पण आता नायकाचाही त्याबद्दल विशेष आग्रह राहात नाही. माधवरावांनी याविषयी म्हटले आहे:

'स्वामित्व गाजवू पाहते, ते प्रेमच नव्हे'

'हे (तत्त्व) प्रभाकराला पटून तो मैत्रीचा स्वीकार करण्यास तयार होतो, तर एकीकडे 'प्रिय मनुष्याच्या सुखासाठी वैवाहिक कर्तव्यभार पतकरण्यास कचरते ते प्रेमच नव्हे,' असे इंदूस पटून ती मनाच्या त्या सिद्धतेने प्रभाकराकडे येते. परंतु हे नवे अंतर आता अनुलंघ्य राहात नाही. तथापि पर्यवसान कोणतेही होण्याचा संभव असल्यामुळे नायकनायिकांचे मीलन झाले असले तरी त्यांच्यावर मंत्राक्षता उधळण्यात आल्या नाहीत.'

विरहतरंगातील नायिकेच्या बाह्यसौंदर्याची काव्यात जी वर्णने आली आहेत ती वास्तवाला धरून आहेत. त्याचप्रमाणे नायक–नायिकांना परस्परांविषयी वाटणाऱ्या मानसिक आकर्षणाची वर्णनेही मोठी भावनोत्कट आहेत.

## ' विरहतरंगा 'तील प्रेमाचे तत्त्वज्ञान

' विरहतरंगा 'तील नायकाचे व्यक्तिमत्त्व अधिक सुसंपन्न असते तर त्याने जीवनाच्या अनेक क्षेत्रांत धडाडीने उडी घेतली असती. त्यामुळे त्याची व्यक्तिरेखा अधिक उदात्त झाली नसती का ? हा प्रश्न विरहतरंगाचा मुख्य हेतू लक्षात घेता अप्रस्तुत वाटतो. मेघदूताची विरहतरंगाशी तुलना करणेही कविवृत्तिभिन्नता आणि कालभिन्नता लक्षात घेता अप्रस्तुत ठरते. यक्षाला एका वर्षाचाच विरह सहन करावा लागला, उलट प्रभाकराने दोन वर्षेपर्यंत विरहभावना सहन केल्या त्यामुळे त्याच्या विरहभावना उत्कट होण्याला अवसर मिळतो, अशी टीका करणे अशास्त्रीय ठरेल. कारण प्रेमभावनेची उत्कटता कालमर्यादेवर अगर ध्येयाच्या अनिश्चिततेवर अवलंबून नसते. एक गोष्ट मात्र खरी की, विरहतरंगात प्रेमभावनेच्या विविध छटा प्रगट झाल्या आहेत. कवीने त्यात प्रेमाचे विशिष्ट तत्त्वज्ञानही विशद केले आहे.

' दैवी सद्‌गुण तोच रमणी प्रेमात जो दे यश । '
' कोठे ज्योति, कुठे पतंग, परि तो ज्योतीवरी घे उडी, '
' जे जात्याच सुरम्य विकृतिहि दे शोभाच त्याला तर ! '
' अन्याला बुडवावया बिलगते ते प्रेम नाही खरे
तत्स्वातंत्र्य हिरावयास बघते ते प्रेम नाही खरे '

इत्यादी वचनांवरून वरील विधानाची सत्यता दिसून येईल.

परिचयाच्या अभावी आणि दूर अंतरामुळे प्रणयीजनांना एकमेकांविषयी जे आकर्षण वाटते त्यात अद्‌भुततेचा आणि अवास्तव पूज्यादरभावनेचा अंश अधिक असतो. अशा प्रेमगीतांतून अतिरंजित कल्पना, हळुवारपणा ( Sentimentality ) आणि स्वप्नाळूपणा यांचा आढळ होतो. माधवरावांनी स्त्रीपुरुषांना समपातळीवर आणण्याचे श्रेय घेतले आणि त्यांच्यातील अवास्तव अंतर नाहीसे केले. एकमेकांना एकमेकांकरिता व्यक्तित्वाचा केलेला त्याग म्हणजे प्रेममीलन नव्हे तर एकमेकांच्या सहवासात–मैत्रीत प्रत्येकाला व्यक्तिविकसनाची मिळालेली संधी—म्हणजेच प्रेममीलन होय ही माधवरावांची प्रेमभावनेकडे पाहण्याची दृष्टी नवीन होती यात शंका नाही.

## प्रेमगीतांतील वास्तवता

प्रेमाच्या रूढ संकेताविरुद्ध बंड पुकारण्याची भाषा माधवज्यूलियन यांनी निर्माण केलेल्या अनेक प्रणयीजनांच्या मुखांतून बाहेर पडते. ' साहस ' हाच त्यांच्या प्रेमाचा स्थायीभाव वाटतो. गोऱ्या सलील सुंदर कुमारिकरिता सर्वस्व गमावणाऱ्या प्रियकराला माधवरावांनी ' जुगारी ' म्हटले आहे. अव्याज आणि राजस कुमारी पान्थाला दुपारची सावलीच हवीशी वाटते, प्रेयसीशिवाय प्रियकराच्या उमेदी पंगू होतात. हृदयराणीला देवी कल्पून तो तिच्या भक्तीची गाणी गातो. श्यामलेची

निःशब्द सेवा करण्यात वन्दी जनाला आनंद वाटतो. मानससुंदरीच्या नुसत्या दर्शनाने व चिंतनाने चित्त शांत होते. मग भवभीति का मानावी? गिरिकंदरी का दडावे? असा प्रियकराचा सवाल आहे! फार काय पण प्रियेला राणी कल्पणारा धाडसी प्रियकर मराठी प्रेमकाव्यात दुर्मिळच आहे. ढोंगी समाजाची पर्वा न करणाऱ्या या प्रेमिकाला कोठेतरी अज्ञात ठिकाणी जाऊन (जेथे लग्नविधी जीवैक्यनिशाणी ठरत नाही तेथे) चिमणे खोपट बांधून प्रणयाच्या उवेत जीवन कंठण्याची आतुरता लागून राहिलेली दिसते. माधवरावांनी निर्माण केलेल्या प्रेमवीरांची व प्रणयिनींची जात अशी निर्भय आणि स्वच्छंदी आहे. त्यांच्या ठिकाणी ढोंगाचा किंवा कृत्रिमतेचा लवलेशही नाही.

## ‘ शिशिरागम ’

माधवज्यूलियन यांच्या विरहतरंगातील नायक–नायिकांचे प्रेममीलन अखेरीस घडून येते. परंतु मर्ढेकर यांच्या ‘शिशिरागमा’तील प्रेमकथेचा शेवट दुःखपर्यवसायी होतो. माळावरल्या बांधावर उभी असलेली ती विलोल–नयना आपल्या गालावरच्या खळीने मुशाफिराची तृषा भागविते. भव्य शिलेवर बसलेल्या त्या वनराणीच्या सौंदर्याने पांथिक मंत्रमुग्ध होतो. तिचा प्रेमलाभ होणे अशक्य झाल्यावर, त्याच्या मुखातून उद्गार येतात—

> ‘ तेथे प्रेमच एकनिष्ठ घडले अक्षम्य दुर्वर्तन ’

प्रेमाची पारध करणाऱ्या या शिकाऱ्याची

> ‘ सावज मागे पुढे शिकारी
> गतिधुंदी ही भरे शरीरी ’

अशी स्थिति होते. एकनिष्ठ प्रेमभावनेचा होणारा हा करुणाजनक शेवट हृदयस्पर्शी वाटतो.

आपल्याच वर्गातील मैत्रिणीच्या प्रेमात सापडलेल्या कॉलेजातील तरुण नायकाच्या मनातील प्रेमभाव शि. गो. भावे यांनी ‘प्रेमगीता’त (चौसष्ट सुनीतात) गुंफिले आहेत. प्रथम परिचयाच्या वेळी दिसून येणाऱ्या कातर स्वभावापासून तो प्रिय व्यक्तीशी होणाऱ्या अखेरच्या मीलनापर्यंतची प्रेमिकांनी अनुभविलेली (नेहमी प्रत्ययास येणारी) भावनांची आंदोलने कवींनी सरळ शब्दांत ग्रथित केली आहेत. आरंभीच कवींनी म्हटले आहे ‘माझ्या अवतारात (प्रेमगीतात) सारेच जुने, वृत्त जुने, कल्पना जुन्या, विषयही जुना. माझा नायक आणि नायिका एकमेकांशी बोलण्यासुद्धा संकोच करणारी...’ तथापि ज्या काळात प्रीतिविवाह सर्रास रूढ नव्हता त्या काळातील ही प्रीतिकथा आहे, हेंच तिचे वैशिष्ट्य. नायक राष्ट्रकार्यांत भाग घेणारा आहे. नायिका स्वास्थ्यात वाढलेली. पण अखेरीस बालशिक्षणसंस्थेत सहकारी म्हणून ती एकत्र येतात, आणि अखेरीस त्यांचा विवाह होतो,...‘सुनीता’त

प्रकट झालेल्या कवीच्या भाववृत्तीला मंदाक्रांता वृत्त रसपरिपोषक ठरते, या आपल्या मताला अनुसरूनच कवीने ही प्रेमगीते लिहिली आहेत ...या काव्यावरील कवीचीच टीका वर उद्धृत केली आहेच.

## ' प्रीत ना अशी वाऱ्यावर वाढायाची '

प्रेमाचे स्वरूप दिव्य निरभिलाष असते. या कल्पनेचा पगडा अनेक कवींच्या मनावर बसला होता. परंतु पुढे क्रियेला प्रतिक्रिया सुरू झाली. प्रेमभावना ही एकतर्फी निर्माण होऊ शकत नाही, तिला दुसऱ्या व्यक्तीची साथ लागते. ' अनंत काणेकरांनी दोन प्रेमी जीवांना जर एकमेकांविषयी ओढ वाटत नसेल तर ' प्रीतीची हूल फुकट होय ' असे म्हटले.

प्रेमभावनेतील कल्पनारंजित खुळचटपणाचा त्यांनी उपहास केला आहे; एकमेकांवर प्रेम नसलेले परंतु विवाहबद्ध झालेले प्रेमीजीव ऐकमेकांची कशी प्रतारणा करतात याचे मार्मिक चित्रण त्यांनी ' जोडपे ' या कवितेत केले आहे. याच्या उलट प्रेयसीच्या गुणाचे पवाडे इतरांनी गायिले असता प्रियकराने ते शांतपणे ऐकावेत यात प्रियकराची हृदयशून्यता दिसून येत नाही, तर प्रेयसीला त्याच्या प्रेमाची खातरी पटलेली असते; जगाला मात्र प्रीतीची ही तऱ्हा उलटी भासते. प्रीतीच्या चक्रव्यूहात सापडलेल्या व्यक्तींना पुन्हा त्यातून बाहेर पडणे किती कठीण जाते हे कवींनी ' प्रीति ' या कवितेत दाखविले आहे. सारांश, 'इष्ट प्राप्तीत जी सुधा वाटते', अशा वास्तव प्रीतीचा गौरव काणेकरांनी केला आहे. प्रीतीची जादू दोन हृदयावाचून चालणे शक्य नाही. कारण

' प्रीत ना अशी वाऱ्यावर वाढायाची '

प्रेमभावनेकडे पाहण्याचा हा वास्तव स्वरूपाचा दृष्टिकोन काणेकरांच्या प्रेमगीतांत प्रगट झाला आहे.

## परिचित प्रेमभावनेतील जिवंतपणा

प्र. के. अत्रे यांची प्रसिद्धी विडंबनकार कवी म्हणून अधिक असली तरी त्यांच्या प्रेमगीतांतूनही त्यांचे स्वतःचे असे आगळे वैशिष्ट्य दिसून येते. गडकऱ्यांच्या ऐन वैभवाच्या काळातच त्यांच्या आरंभीच्या काही प्रेमगीतांना मनोरंजनात प्रसिद्धी मिळाली. कल्पनारंजकतेपेक्षाही वास्तवतेच्या छटा त्यांच्या प्रेमगीतांत अधिक आढळतात. त्यांतून अंतःकरणात प्रीतिभावनांनी बहरलेल्या 'पहिल्या कळ्यां'ची रेखीव वर्णने आली आहेत. ' प्रेमाची कविता ', ' होय म्हणताना ', ' उत्कंठिता ', ' लज्जागीत ' इत्यादी प्रेमगीतांतून कवीच्या व्यक्तिगत भावनेचा प्रांजळ पण कलात्मक आविष्कार झाला आहे. प्रेमिकांना येणाऱ्या प्रणयानुभवाचे खालील भावनात्मक शब्दांत ते वास्तववर्णन करतात.

'ओल्या गुलछबुचा अहा तुटुनिया तो कोसळे ताटवा
आता शब्द नकोत गोड कसला अंगी भरे गारवा ...'

दुसऱ्या व्यक्तीच्या प्रेमाचे पुष्टिपत्र घेऊन नव्हे तर स्वानुभूत प्रणयभावनेच्या आधारेच त्यांनी ही प्रेमगीते लिहिली आहेत. त्यांतील प्रेमभावना परिचित वाटली तरी तींत जिवंतपणा–ताजेपणा–आढळतो.

**अनिलांच्या 'प्रेमभावने'ची विविध रूपे.**

अनिलांनी प्रेमिकांना एकमेकांविषयी वाटणाऱ्या आपुलकीचे चित्रण 'प्रेमाचे ममत्व' या कवितेत केले आहे.

'तिच्या मार्गी तुम्ही कुसुमशत नेवोनि पसरा'
परंतु 'सखी माझे सावे सुमनचि त्वरे घेइल करी'

असा विश्वास तीतील प्रेमिकाला वाटतो. प्रीती हेच सारसर्वस्व मानणाऱ्या प्रेमिकांना जगातल्या सुखदुःखात निराळेपणाची नव्हे तर मिळालेपणाची प्रतीती येते.

प्रथम परिचयाने निर्माण झालेल्या प्रेमाचे ममत्व, सहवासोत्तर प्रेमाचे माधुर्य, आणि प्रियेच्या कायमच्या वियोगामुळे प्रियकराच्या मनाची झालेली करुणावस्था अशी महत्त्वाची त्रिविध रूपे अनिलांनी लिहिलेल्या प्रेमगीतांत दिसून येतात. त्यात वास्तवतेच्या छटा अधिक आढळतात. प्रियेचा हात नुसता हातात असेल तर कसलीही आणीबाणीची परिस्थिती प्रियकर निभावून नेतो, पण प्रियेचा चिरविरह झाल्यास जो 'एकाकीपणा' येतो, त्याची अत्यंत हृदयंगम भावचित्रे अनिलांनी दशपद्यांतून चित्रित केली आहेत, उदाहरणार्थ, 'एकाकी' या कवितेतील प्रियकराचे करुणभाव खालील शब्दांत प्रगट झाले आहेत.

'भिजल्या आहेत पाऊलवाटा आता साऱ्या तुझ्यामाझ्यामधल्या
मिटल्या आहेत जळावरल्या पुसट प्रकाशलाटा शेवटल्या
आधारच तुझ्या पायाखालचा निघून गेला कसा एकाएकी
ज्यावर आहे मी अजून चालत तुझ्यावाचून वाट एकाकी'

याच संदर्भात 'तळ्याकाठी', 'खेळणी', 'पावसाळी सांज' इत्यादी हृदयस्पर्शी भावदशके चिंतनीय ठरतात.

प्रेमभावनेकडे पाहण्याचा वस्तुनिष्ठ दृष्टिकोनही अनिलांच्या काही कवितांतून प्रगट झाला आहे. अशा कवितांत 'प्रेम आणि जीवन' ही कविता महत्त्वाची आहे. प्रेम आणि मरण यांची सांगड आजवरच्या प्रेमगीते लिहिणाऱ्या कवींनी घातली होती. परंतु अनिलांनी त्या कल्पनेला विरोध केला आहे. पेरीना भरूचा आणि चमनलाल धवन ह्या दोघांनी प्रेमपरिपूर्तीकरिता एकत्र आत्महत्या केली. त्या प्रसंगाला उद्देशून कवीने म्हटले आहे.

'प्रेम अमृत चिरंतनाचे
मरणाचा नव्हे मार्ग प्रेमाचा'

प्रेमापायी भोगाव्या लागणाऱ्या संकटात आणि दुःखात इतकी जादू असते की, ती इतर सुखांना तुच्छ करील असे कवीस वाटते...

प्रेमानेच मानवजातीला पूर्णता यावयाची आहे असा कवीचा विश्वास वरील काव्यात प्रगट झाला आहे. प्रणयी जीवांना उद्देशून अखेरीस कवीने उद्गार काढले आहेत

'नाही मी प्रीति–शाहीर
प्रीतीचे रडगाणे गाणारा
शाहीर आहे मी तेजस्वी गाणे
गाणारा प्रीतीच्या आशावादाचा !'

## मनोविश्लेषण

गिरीशांनी लिहिलेल्या प्रेमगीतांतून प्रेमिकांच्या अंतःकरणातील विविध सूक्ष्म भावछटा प्रगट झाल्या आहेत. प्रथमदर्शनाने निर्माण होणारे औत्सुक्य, अनुक्त प्रीतीचे दर्शन, प्रेमिकांनी एकमेकासाठी केलेले आत्मसमर्पण, प्रिय व्यक्तींच्या एकमेकांविषयीच्या ध्यासात आणि भासात दिसून येणारी उत्कटता, विरहावस्थेतील तळमळ, प्रेमकलहातील बहाणे, इत्यादी अनेक नाजुक व कोमल प्रीतिभावनेच्या छटा ऊन–पावसाच्या खेळाप्रमाणे त्यांच्या प्रेमकवितांतून आढळतात. अर्थात् प्रीतिविषयक कवितांत रेखाटलेल्या सर्व अनुभूती केवळ कवीच्या जीवनातील आहेत असे समजण्याचे कारण नाही. त्यांच्या पाठीमागे केलेला आवश्यक असलेला तटस्थपणा दिसून येतो. १९२० नंतर प्रीतिविवाहाची मोहिनी तरुणतरुणींच्या मनावर विशेष पडली होती. अशा काळातील सुविद्य प्रेमिकांच्या अंतःकरणातील विविध प्रणयभाव गिरीशांनी सहानुभूतीने चित्रित केले आहेत. विवाहपूर्व प्रेमभावनेच्या उत्कटतेप्रमाणेच विवाहोत्तर प्राप्त होणाऱ्या प्रेमसफलतेची गाणी गिरीशांनी गायिली आहेत. ( उदा. 'दीपिका' ही कविता पाहा. )

निशिगंधांनी ( रा. श्री. जोग ) विश्वविद्यालयीन खुल्या वातावरणात वावरणाऱ्या प्रेमिकांना एकमेकाविषयी वाटणाऱ्या मुग्धमधुर प्रेमभावनेची सरळ व स्पष्ट चित्रे 'ज्योत्स्नागीत' व 'निशागीत' यांतून रंगविली आहेत. कवींनी हळुवार शब्दांत केलेले प्रेमिकांच्या मनाचे विश्लेषण हेच वरील गीतांचे प्रमुख वैशिष्ट्य होय.

## 'स्त्री–गृहिणी नच देवी'

यशवंतांनी तरुण–तरुणींच्या मनात उद्भवणाऱ्या प्रेमभावनांचे 'स्वप्नसौदामिनी', 'मनीषा', 'शीलवती सुंदरीस' इत्यादी कवितांतून चित्रण केले आहे.

त्यांच्या अनेक प्रेमगीतांतून आशा–अपेक्षांपासून तो विरह–मीलनापर्यंतच्या अनेक प्रेमविषयक कोमल कंपित भावना शब्दांकित केलेल्या आढळतात.

स्त्रीसौंदर्याने मोहित होणाऱ्या प्रेमिकाच्या मनःस्थितीची यथार्थ चित्रणे त्यांतून आली आहेत. त्यात अनुदात्त असे काही नाही. प्रेमभंगाच्या भावनाही 'पत्रिकाहवन', 'दैवचि चित्रकार', 'विस्मृति' इत्यादी त्यांच्या भावगीतांतून प्रगट झाल्या आहेत. त्यातून विषण्णतेचे सूर ऐकू येतात.

समाजातील प्रतिकूल परिस्थितीमुळे ज्या कलंकिता झाल्या आहेत, अशा स्त्रियांकडे यशवंतांनी सहानुभूतीने पाहिले आहे. कलंकितेचा उद्धार करणाऱ्या प्रेमवीराच्या तोंडी कवीने खालील विचार घातले आहेत.

'नसेल जो पापी तयाने अम्हांस शापावे ।
हेच निंदकांना वजावुनि आपण सांगावे ॥'

स्त्रीला देवी कल्पून तिचे देव्हाऱ्यातील देवतेप्रमाणे पूजन करणे या दृष्टिकोनावरही यशवंतांनी 'गृहिणी–मी नच देवी' या कवितेत प्रतिकूल टीका केली आहे. पुरुषाच्या पराक्रमाला साथ देणाऱ्या व त्याला अडचणीतून निभावून नेणाऱ्या गृहिणीची योग्यता 'भाग्यशाली जोड' या कवितेत कवीने स्पष्ट केली आहे. 'नौकाविहार' या कवितेतील प्रेमिकाने निसर्गसौंदर्याच्या आधारे प्रियेच्या केलेल्या आंतरसौंदर्याचे वर्णनही मनोवेधक वाटते.

बिल्हणाची प्रेमकथा पुसटपणे आधारास घेऊन यशवंतांनी लिहिलेल्या 'जयमंगले'तील प्रेमगीते त्यातील उत्कट भावनेमुळे आकर्षक वाटतात. प्रत्येक नाट्यगीत स्वतंत्र असून त्यांच्या एकत्र गुंफणीतच प्रेमकथेची उभारणी झाली आहे. 'तुझियाविना', 'संगमावर', 'वधस्तंभापाशी' इत्यादी नाट्यगीतांतील उत्कट भावनेला गेयमधुरतेची जोड मिळाली आहे.

बहुधा काल्पनिक परिचयात क्वचित आलेल्या–प्रेयसीच्या सौंदर्याचे मानसिक चिंतन करणे आणि स्वप्नसृष्टीत विलीन होणे ही वृत्ती प्रेमगीते लिहिणाऱ्या रविकिरण–मंडळाच्या समकालीन अनेक कवींत दिसून येते.

वसंत चिंधडे यांच्या 'अव्यक्त प्रेम', 'सौंदर्यपूजा', 'चंदाराणी' इत्यादी प्रेमगीतांतून प्रणयीजनांना एकमेकांविषयी वाटणारी आतुरता आणि हुरहूर यांची चित्रे आली आहेत.

याच संदर्भात — 'बाला' 'सुकलेली फुले', ('मधुपर्क' पु. मं. लाड) 'होते भेट, जरी', 'जेव्हा येशिल तू' 'केले भाव खुले' (नजराणा–वा. ज्यो. देशपांडे) 'आताच का हे असे' 'जाऊ दूर रानी' (क्षितिजावर–दत्तप्रसन्न कारखानीस) ' 'भासाचा ध्यास' 'आलीस तू' (रेषा—वा. रा. ढवळे) 'मधुर बाला' 'उत्कंठा' (कुमुदबांधव– स. अ. शुक्ल) 'रातराणी दरवळे' 'एकदा

कधीतरि ' ( दीपराग–पण्डित आवळीकर. ) इत्यादी प्रेमगीते लक्षात घेणे आवश्यक आहे.

## प्रेमगीतातील काल्पनिक प्रणयिनी

प्रेमकवितेतील काल्पनिक प्रणयिनीला आळविण्याची व तिच्या काल्पनिक विरहामुळे मनाच्या होणाऱ्या हुरहुरीची सांकेतिक चित्रे रंगविण्याची प्रथा रविकिरण-मंडळाच्या समकालीन कवींनी स्वीकारलेली दिसते. वास्तव सृष्टीतील प्रत्यक्ष प्रणयिनीला उद्देशून स्वतःचे भाव प्रगट करणे ही गोष्ट तत्कालीन समाजाला मान्य होणार नाही अशी एक भीती कवींना वाटत असावी, म्हणूनच हाडामासाच्या प्रेयसीला उद्देशून लिहिलेली कविता ' काल्पनिक कविता ' आहे असा समज कवी रसिकांमध्ये पसरवीत असत. श्रेष्ठ कवीही याला अपवाद नसत. ' माझी भार्या ' ही कविता रे. टिळकांनी स्वतःच्या प्रेमविषयक अनुभवाला अनुसरूनच लिहिली असावी, पण कवितेच्या आरंभी मात्र त्यांनी म्हटले आहे की,

' केले काव्य परंतु यात मम हो संबंध काही नसे. '

बोरकरांनी आपल्या आरंभीच्या प्रेमविषयक कवितेसंबंधी लिहिले आहे. ' त्यावेळचा आमचा प्रेमकवी राधाकृष्णाचा आडोसा तरी घ्यायचा किंवा प्रेमाच्या शिष्टमान्य कल्पनांचा आपल्या खऱ्या भावनेवर साज चढवून तिचा तोंडावळा कवितेत लपवून टाकायचा. प्रेमकविता वाचीत असता रसिकांच्या तोंडातून उद्गार निघत ' कवितेतील प्रेमविषयक कल्पना फारच वास्तव शब्दांत रंगविल्या आहेत. यात शंका नाही. '

बोरकरांच्या आरंभीच्या प्रेमकविता जरी सांकेतिक स्वरूपाच्या वाटल्या तरी पुढील त्यांच्या अनेक प्रेमकवितांतून ' वास्तवता ' आली आहे. उदाहरणार्थ, त्यांनी लिहिलेली 'अपरिचितेस उद्देशून ', ' ही हीच ती सागर–वेळा ' या कविता पाहा. वास्तवतेला धरून मनातले प्रेमाचे मोकळे भाव प्रकट करण्याची ही ' तऱ्हा ' माधव ज्यूलियन यांनी 'कौमार्यस्मित ' या कवितेपासून पुढे मोठ्या प्रमाणात निर्माण केली. पुढे पुढे अनेक कवींना हीच ' तऱ्हा ' अनुकरणीय वाटली यात शंका नाही. बोरकरांच्या प्रेमकवितांतून त्यांनी प्रणयिनीच्या सहवासात घालविलेल्या ' क्षणाच्या रम्य स्मृति'च अधिक चित्रित झाल्या आहेत.

' योजने लंघून राहे स्वप्न माझे देखणे ।
सुस्मृतींची चालवीतो मी तुझ्या पारायणे '

हा कवीने प्रकट केलेला मनोभाव त्यांच्या अनेक प्रेमगीतांतून प्रगट होतो. बोरकरांनी प्रेमभावनांच्या सफलतेची आकर्षक चित्रेही काही कवितांतून रंगविली आहेत. उदा. ' वृद्ध होऊ तेव्हा ' या सुनीतातील प्रगट झालेल्या विचारांकित भावना हृदयस्पर्शीच आहेत. तसेच ' मंद असावे जरा चांदणे' या कवितेत प्रियकर म्हणतो.

'सांगावे तू दुःख आगळे माझ्यासाठी गिळिले कैसे–
आणि आंधळ्या भलेपणी मी तुला केधवा छळिले कैसे '–

प्रेमबद्ध दांपत्यांना तारुण्यात येणाऱ्या या अनुभवाचे वर्णन वास्तव नाही असे कोण म्हणेल ?

## 'पृथ्वीचे प्रेमगीत'

सूर्याच्या कक्षेत फिरणाऱ्या पृथ्वीला प्रणयिनी कल्पून तिने सूर्यावर केंद्रित केलेल्या एकनिष्ठ प्रेमाची महती 'पृथ्वीचे प्रेमगीत' या कवितेत कुसुमाग्रजांनी गायिली आहे.

"नको क्षुद्र शृंगार तो दुर्बळांचा तुझी दूरता त्याहुनी साहवे"

अशा विचारसरणीच्या आणि आत्मबलिदानानेच प्रेमाची सफलता होऊ शकते असे मानणाऱ्या तेजस्विनी स्त्रीचे क्रान्तिकारक प्रतीक पृथ्वीच्या रूपाने कवीने रसिकांपुढे उभे केले आहे. 'प्रेम आणि मरण' या गोविंदाग्रजांच्या कवितेत प्रीतीची जळती ज्योत (विद्युल्लता) अंगावर घेऊन हटयोगी वृक्ष हसत हसत मरण स्वीकारतो याच्या उलट पृथ्वीच्या प्रेमगीतात स्त्रीच दिव्यपुरुषाकरिता झुरत राहते अशी कल्पना आली आहे. याच संदर्भात 'स्त्री आणि पुरुष' (आशागीत) या सुनीताच्या अखेरीस

'इंदूची' पण बोलतेस 'महती वाढे रवीच्यामुळे
आहे यास्तव मी सदैव अपुल्या कक्षेमधे शोभुन'

हे प्रणयिनीने प्रियकरास उद्देशून काढलेले उद्गार लक्षात येतात.

कुसुमाग्रजांच्या 'स्मृति', 'आस', कुतूहल' 'आश्वासन' इत्यादी प्रेमविषयावरील कवितांतून प्रियकराने प्रणयिनीच्या विरहामुळे मनात उद्भवलेल्या भावनाच अधिक प्रगट केल्या आहेत. 'स्वप्नाची समाप्ती' या कवितेत प्रियकराला आपल्या प्रणयिनीच्या सहवासात वाटणाऱ्या अलौकिक आकर्षणाचे चित्र आले आहे; परंतु क्षितिजाच्या पलीकडे दिवसांच्या दूतांची चाहूल लागताच प्रियकराच्या मुखातून शब्द निघतात—

'काढ सखे गळ्यातील तुझे चांदण्याचे हात'

कारण—'उजेडात आपण वेडे अपराधी ठरू'

अशी भीती प्रियकरास वाटत आहे.

प्रियकर-प्रेयसींच्या अंतःकरणातील कोमल आर्त भावना 'जीवनलहरी'त अत्यंत हळुवार शब्दात प्रगट करण्यात कवीने मोठेच यश मिळविले आहे.

निष्काम प्रेमाची महती गाणे हा कवींचा संकेत एके काळी फार रूढ होता. कुसुमाग्रजांनी 'नव्हते माहीत' या कवितेत वरील कस्पनेला समुचित धक्का दिला आहे.

आपल्या प्रियतमेला आपला स्पर्श आवडत नाही म्हणून प्रियकर तिच्यापासून दूर राहून तिच्यावर प्रेम करण्याचे ठरवितो. परंतु प्रियेच्या मुखातून पुढे उद्गार निघतात—

‘ तुझ्याकडे मी अजून येते विवाद रंगत पुन्हा परंतु—
तूच वाटसी वाट बघे मी होशिल केव्हा पुन्हा पशू तू’

स्त्रीपुरुषांमधील शारीरिक आकर्षणाचा भाग प्रेमभावनेत असतो हे सत्य अलीकडील कवी दृष्टीआड करीत नाहीत. तसेच प्रीतीसाठी प्रीती या घोषणेचे वैयर्थ्य ते दाखवितात.

‘ माझ्या प्रीतित दिव्यता न असली ती मानवी सर्वथा
आहे ती तुझियावरी नि रमते ती वर्तमानामधे ( कुसुमाग्रज )

## राधा–त्रिधा की अनंतधा !

हा सगळा विश्वाचा पसारा प्रकृतीनेच निर्माण केला. ती गुणवती आहे, रूपवती आहे, मोहवती आहे. आत्मतत्त्वाचा विसर पाडावयास लावण्याची अद्‌भुत शक्ती तिच्यात आहे. प्राचीन मराठी संतवाङ्मयात या आदिमायेच्या प्रभावाची चित्रणे दिसून येतात. डॉ. फ्राईड याने–मानवी व्यवहाराच्या मुळाशी स्त्रीच्या ठिकाणी दिसून येणाऱ्या आकर्षणशक्तीचा केवढा प्रभाव असतो हे विशद केले आहे. मानवी मनाच्या सुप्त व प्रगट-चलनवलनादी क्रियेत या कामप्रवृत्तीचे ( Libido ) खेळ सर्वत्र दिसून येतात. कवींच्या स्त्रीसौंदर्याच्या चिंतनात हीच प्रवृत्ती उद्दाम रूप धारण करते ! रेगे यांच्या ‘गंधरेखेत’ या स्त्रीसौंदर्याने अनंत रूपे धारण केली आहेत. जली, स्थली, काष्ठी, पाषाणी हिचेच अस्तित्व कवीला दिसून येते. पण येथे एक गोष्ट लक्षात घेणे आवश्यक आहे. तिचा संचार विश्वात सर्वत्र आहे, ती कुणाची बांधील नाही. कवीच्या शब्दात सांगावयाचे म्हणजे–ती–म्हणते

‘ मी न च इथली–नव्हतेच कधी मी इथली–

ज्या सुरावलीत माझे मन गुंतून पडले, ज्या पानावरती माझे हृदय थरथरत आहे, ती सुरावली, ती पाने, ह्यात मी कधी नव्हतेच आणि नसणारच’ अशी ती–अग्नीत धूर नसला तरी धुरात अग्नी असल्यासारखी आहे. खरे म्हणजे तिचा अनुभव स्वयंवेद्य आहे. शब्दातीत आहे. ही राधा अनंतधा आहे. पण कवीने रसिकांस राधेची तीन रूपे दाखविली आहेत. नव्हे राधेनेच कवीला आपली तीन रूपे दाखविली आहेत. ‘ निळे आकाश तो हरि, अन् चांदणी एक ती राधा, विस्तीर्ण भूमि, तो गोविंद, आणि साळीचे शेत, ती राधा’–वरील युग्मे तुम्हास निराळी दिसली तरी ( विशेष ? ) प्रश्न त्यांच्यातील ही युगानुयुगीची चिरतंद्रा विलग करता येईल काय हा आहे, आणि तसे झाले नाही तर त्यात पाप कसले ? हे जगच मूळ नरनारीनटेश्वर आहे. नराशिवाय नारी व नारीशिवाय नर हा

वदतोव्याघात आहे. पुरुषशक्तीला स्त्रीशक्तीचे आकर्षण वाटणे, हा निसर्गधर्मच आहे, मग यातील पाप कोणते ? पाप हे की 'हवी असताना-नसावीस तू-नकोच तू-नाहीच तू-छे छे पापच तू-यातच ( या ढोंगी उद्गारातच ) पाप...तू हवीस यांत न पाप...'

## मनमोकळ्या प्रीतीची गाणी

ना. घ. देशपांडे यांच्या प्रेमगीतातील तरुण-तरुणी नेहमीपेक्षा निराळ्या आडमार्गाच्या वळणावर रसिकांना भेटतात, तरीपण त्यांच्या प्रीतीचे मार्ग वक्र नाहीत. प्रेम म्हणजे 'चिरवांछित आपुलकी' ह्याची उत्कट जाणीव त्यांना आहे, उत्कंठा अधीरता, बेभानपणा या प्रेमिकांच्या मनातल्या ऊर्मींना 'शीळे'त सर्वत्र वाव मिळाला आहे. प्रेमिकाचा धुंदपणा असाच असतो. त्याची जात वेगळी असते, त्याचा ताल वेगळा असतो. तो आपलेच बोल आपण ऐकतो व अशीच अर्थशून्य 'शीळ' फुंकीत जातो. प्रियेच्या अनावर ओढीत त्याचे मन धुन्द झालेले असते, आणि प्रणयिनीलाही प्रणयात घालवलेल्या रम्य क्षणांची नेहमी आठवण होते. तिच्या लोचनातील धुन्दी कमी होत नाही. तिचे ललित अंतरंग उगाचच हसत राहते, कारण त्यांचे संबंध

'सख्या तू सांब उमा मी गौरी'

असे असतात. 'शीळे'तील बहुतेक प्रेमगीतांची जात ही अशी रोखठोक, निर्भीड, दिलदार मनमोकळ्या प्रीतीची आहे. त्यांचा मार्ग वक्र नाही, याचा अर्थ त्यांच्या मार्गातील काटे सराटे ते आनंदाने तुडवीत जातात असाच आहे. माधव ज्यूलियनांच्या 'तेथे चल राणी' या कवितेतील नायिकाची ढोंगी जीवनावरील सुसंस्कृत टीकेची आठवण तशाच तऱ्हेच्या 'आता दूर जाऊ राणी' या कवितेतील

'कायदा गंभीर न्यारा ये करू वेडाच सौदा
प्रेम दे अन् प्रेम घे अन् यौवनाची ही नव्हाळी'

या ओळी वाचून होते.

## प्रेमाचे निष्कपटी प्रेमळभाव

'एकटी', 'तुझ्याविगर', 'तिच्याविषयीं', 'अनुनय', 'अर्धांगी', 'गरिबीचा संसार', 'रेशमाची गाठ', 'तिचे पत्र' इत्यादी अनेक भावगीतांतून ग. ल. ठोकळ यांनी खेड्यांतील मोकळ्या वातावरणात वाढलेल्या मराठमोळ्या स्त्री-पुरुषांच्या प्रणयभावनांची वास्तव वर्णने केलेली आहेत. प्रणयीजनांचे निष्कपटी, दिलखुलास एकनिष्ठ प्रेमळभाव वरील गीतांतून प्रगट झाले आहेत. त्या मानाने वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून लिहिलेल्या 'सुनीतां'तून प्रेमभावनेची चमत्कृतिच अधिक प्रत्ययास येते. उदा० प्रेयसीच्या केसांचे चक्कर पाहताच प्रियकराच्या शिरी चक्कर फिरू लागते आणि नागीण ( वेणीची ) त्याच्या अंतरात भीती निर्माण करते-अशा स्थितीत तो म्हणतो.

‘ सोक्षमोक्ष लावून कर मजला मोकळा
पण नकोस कापू केसांनी तू गळा ’

जानपदगीतांतून–नाट्यगीतांतून–ठोकळ यांनी जी प्रणयलक्ष्मीची चित्रे रंगविली आहेत, ती जितकी ग्रामीण वातावरणामुळे वास्तवपूर्ण, तितकीच ती त्यातील जिवंत अकृत्रिम भावनेमुळे उठावदार झाली आहेत. उदाहरणार्थ पुढील भावरम्य शब्दचित्र पाहा.

‘ करवलिचा धरुनी हात मारगेसरी
चढलीस घराची माझ्या तू प्रेमान पायरी
......शेतात हळदिचा हात खपू लागला
लागलीच त्याला आली सोन्याची पिवळी कळा
तू आल्यापुन काइबी न पडल कमी
संपल दळिंदर माझ उतरली घरी लक्षुमी ’ ( लक्षुमी )

## ग. दि. माडगूळकरांच्या प्रेमगीतातील पुन:प्रत्यय

गणिकेच्या एकनिष्ठ प्रेमभावनेचे चित्रण माडगूळकरांच्या ‘जोगिया’ या गीतात आले आहे. ‘ जत्रेच्या रात्री ’ या कवितेत नर्तकीचे नृत्यचातुर्य आणि मंत्रमुग्ध झालेला प्रेक्षकजन, यांचे चित्रण माधवरावांच्या ‘ कंचनीची ’ आठवण करून देते. ‘ पूजास्थान ’ या कवितेत मुंबईतील वेश्येच्या करुण जीवनाचे आणि तिने प्रगट केलेल्या एकनिष्ठ प्रेमाचे चित्रण कवीने हृदयस्पर्शी शब्दात केले आहे.

ग. दि. माडगूळकर यांनी स्वतंत्र–रीतीने लिहिलेल्या शाहिरी थाटाच्या कवितांचा वर उल्लेख केला आहेच. याशिवाय बोलपटाकरिता त्यांनी लिहिलेल्या विविध विषयांवरील भावगीतांमध्ये प्रेमविषयावरील नाट्यगीतांचा अंतर्भाव होतो. राधाकृष्णामधील मधुर प्रेमळ शृंगाराच्या छटा ‘ कुणी मला सोडवा ’, ‘ हरि तुझी कळली चतुराई ’, ‘ वाजवि मुरली श्यामसुंदरा ’, ‘ थकले रे नंदलाला ’ इत्यादी गीतांमधून आढळतात. ही गाणी जितकी गेयमधुर तितकीच ती भावमधुर झाली आहेत. ‘ छडीदार नार गुल्जार ’, ‘ पाव्हनं एवढ ऐका ’, ‘ मोटं मोटं डोळं ’ इत्यादी नाट्यगीते शाहिरांच्या शृंगारप्रधान लावण्यांसारखीच आहेत.

‘ आज सुगंधित झाले जीवन ’, ‘ या कातरवेळी ’, ‘ कधीतरी मी आले होते ’ अशा प्रकारच्या प्रेमगीतांत सुविद्य तरुण-तरुणींच्या मनांतील प्रणयभावना चित्रित झाल्या आहेत.

सारांश, इतरांच्या भावनांशी समरस होऊन त्यांचे यथार्थ आलेखन करण्याचे दुर्मिळ कौशल्य माडगूळकरांनी विविध प्रकारच्या प्रेमविषयक नाट्यगीतांतून प्रगट केले आहे यात शंका नाही. अपरिचित व अपूर्व भावनेच्या नवप्रत्ययामुळे नव्हे, तर

सर्वसामान्य परिचित भावनेच्या पुनर्दर्शनामुळे माडगूळकरांची प्रेमविषयक गीते लोकप्रिय झाली आहेत असे वाटते.

शृंगार संगीतः— 'भावावाचुनि लोभहि लटका हृदयाविण लटके प्रेम'
हे विचार श्री. रा. बोडसे यांनी गणिकेवर रचलेल्या 'लावणी'त प्रगट झाले आहेत. त्यांच्या इतर प्रेमविषयक कवितांतून (शृंगार–संगीतातून) शाहिरी काव्यांत आढळणाऱ्या शृंगाररसाची निर्मिती झाली आहे.

'माझिया माहेरी जा' या गीतात राजा बढे यांनी स्त्री वर्गाला जात्याच वाटणाऱ्या माहेराच्या ओढीचे वास्तवदर्शी चित्रण केले आहे. त्यांनी लिहिलेल्या अनेक प्रेमगीतांचे ('करवंदी मागे', 'चित्तचोर' इ.) आकर्षण जितके गेयमधुरतेत तितकेच ते परिचित भावमधुरतेत असते. याच संदर्भात 'हवास मज तू', 'तो म्हणाला' (शांताराम आठवले) 'स्वर्गीय संगीत', 'थांब जराशी' (स. अ. शुक्ल) इत्यादिकांनी लिहिलेल्या प्रेमविषयावरील भावमधुर गीतांचा उल्लेख करणे आवश्यक आहे.

## परिचित प्रेमभावनांचे पुनर्दर्शन

कृ. ब. निकुंब, वसंत बापट, विंदा करंदीकर, वि. म. कुलकर्णी इत्यादी कवींच्या प्रेमविषयक कवितांतून त्यांच्या वैयक्तिक अनुभूतींचे कलात्मक आविष्करण झाले आहे. स्थूल रीतीने पाहिल्यास त्यांतून परिचित प्रेमभावनांचे पुनर्दर्शनच रसिकांना आनंद देते. वरील कवींच्या सामाजिक कवितातून जी क्रान्तिकारकता दिसून येते, तिचा आढळ येथे होत नाही. मात्र त्यांतील 'सूक्ष्म मनोविश्लेषण' हे त्यांचे वैशिष्ट्य ठरते. केशवसुत, तांबे, माधव ज्यूलियन, या कवींनी घालून दिलेल्या प्रेमगीतांचेच वळण थोड्याफार भेदाने अलिकडील अनेक कवींनी चालू ठेवले आहे. त्यांच्या प्रेमगीतांतून अंतःकरणांतील प्रेमभाव अधिक सूक्ष्मतेने आणि सूचकतेने प्रगट झालेले दिसतात. याठिकाणी उदाहरणाकरिता त्यातील काही कवींच्या प्रेमगीतांचे दिग्दर्शन करणे समुचित होईल.

## प्रेमाचा पोरखेळ

प्रेमदेवतेने अकल्पितपणे केलेल्या प्रेमयाचनेमुळे आश्चर्यचकित झालेला, पण तिचा स्वीकार न केल्यामुळे अशान्त राहिलेला, मीनाक्षीच्या अथांग भावुक नजरेने विव्हल झालेला, जनसम्मर्दात तिच्या चाहुलीचा वेध घेऊन एकान्तात तिच्या स्मृतीची पाने उलटीत राहाणारा, प्रीतीचे मनातले गूज आक्रंदून सांगणारा आणि प्रतिकूल टीकेचे घण सहन करणारा, अशा प्रेमिकांच्या अंतःकरणांतल्या बहुविध प्रेमछटा कृ. ब. निकुंब यांनी 'उज्ज्वले'त आणि 'उर्मिले'त प्रगट केल्या आहेत. मनांतला प्रेमाचा भाव अनुक्त राहिला तर त्याची 'सल' मनाला कायमची सलत रहाते, अर्ध्यावर संपलेल्या प्रीतिकथेचे रहस्य मनांत ठेऊन तिचें मूकपणें पूजन करण्यातच प्रेमीजनास समाधान

वाटते. प्रेमिकांना येणारे हे नेहमीचेच, पण हवेहवेसे वाटणारे, अनुभव आहेत. प्रेमभावनेतील स्वप्नाळूपणावर कवीनेच खालील शब्दांत टीका केली आहे. ‘निःश्वास प्रीतिचे ते स्मरता हसून आता। म्हणतो तटस्थतेने तो पोरखेळ होता!’ परंतु हा पोरखेळ रसिकांचे मन वेधून टाकणाराच आहे असे म्हणावेसे वाटते.

## आत्मिक अपघात

पहिल्या भेटीत प्रेमिकांनी एकमेकांना सांगितलेले मुग्ध गूढ भाव, त्यांची ‘स्मृति’ अपुऱ्या प्रेमाची हुरहूर, चंद्रावलोकनात प्रणयी जनांनी एकमेकांची घेतलेली भेट, इत्यादी (विंदा करंदीकरांनी लिहिलेल्या) प्रेमगीतांतील भावना व कल्पना चिरपरिचित असल्या तरी अकृत्रिम वाटतात. ‘मला तुला नच फुलवायाची’, ‘तुझ्या देहाचीच ज्योत’ ‘वाट तुझी पाहतसे’ ‘वेध’ इत्यादी कविता वरील विधानाची सत्यता पटवितील. ‘आत्मिक–अपघात’ या कवितेतील ‘आशय’ नेहमीचाच असला तरी अभिव्यक्ति ‘निराळ्या पद्धतीची वाटते. प्रियकराच्या अंतर्मनात प्रियेच्या स्मृती दाटून येतात. हा भाव प्रकट करितांना कवीने लिहिले आहे.

‘तुझ्या स्मृतींच्या–येतात मोटारी’

विकारांच्या उतारावरून– विजेच्या वेगाने– करितो शिकस्त–सरण्याबाजूला– आत्मरक्षणार्थ, पण हा प्रयत्न दुबळा ठरतो. कवीच्या दृष्टीने तोच ‘आत्मिक अपघात’ होय.

## सेतू–

वसंत बापट यांच्या अनेक भावगीतांतून, शाहिरी काव्यांतून आढळणाऱ्या मोकळ्या शृंगाराच्या छटा आढळतात. उदाहरणार्थ त्यांच्या ‘गौरी’ ‘वय वर्षे सोळा’ ‘रंगाने तर गव्हाळ’ ‘नाजुक रुपडे’ इत्यादी कविता पाहा. त्यांची ‘सेतू’ ही कविता वैशिष्ट्यपूर्ण आहे. हिरवे हिरवे चुडे धारण करणारी, सोनेरी वस्त्र परिधान करणारी, यौवन विभ्रम दाखवणारी सुस्नात अशी

‘ही शरदांतिल...पहाट की....ती तेव्हांची तू,
तुझिया माझ्यामधे पहाटच झाली सेतू।’

असे कवीने म्हटले आहे.

प्रेमिकांच्या अंतःकरणात निर्माण होणारे ‘विस्मृती’चे, ‘बहाण्यांचे’, ‘समजावणी’ चे विविध प्रेमभाव ‘जायचेच ना’, ‘स्मरते तुजला’ इत्यादी कवितांतून चित्रित झाले आहेत.

## फुंकर

सामाजिक आर्थिक प्रतिष्ठा अगर जातीचा उच्चनीचपणा यांची बंधने प्रीतीने बाळगू नयेत, हा ध्वनी माधव ज्यूलियन यांच्या प्रेमगीतांतून आणि त्यांच्या मागाहून

उदयास आलेल्या अलीकडील कवींच्या प्रेमगीतांतून दिसून येतो. काही कवी प्रीतीच्या असफलतेची व्यथा अतिवास्तवतेने आणि निःसंकोचपणे चित्रित करतात. विवाहबद्ध झालेल्या आपल्या मैत्रिणीला भेटावयास आलेल्या तरुणाला तिचे आणि तिच्या पतीचे छायाचित्र सुरेख आहे असे वाटते. पण त्याला आपल्या मैत्रिणीचा राग येतो याचे कारण–या चित्रांत 'ती' अशी दिसते, की 'जसे कधी काही झालेच नाही.' या तरुणाला एवढेच समाधान वाटते की, निरोप घेताना सुपारी लागली हे निमित्त करून तिच्या डोळ्यांत पाणी आल्याचे त्याला दिसले. त्याच्या मनाच्या जखमेवर तिने तेवढीच 'फुंकर' घातली !

## सूचक प्रेमभाव

प्रेयसीच्या दर्शनाने त्याला दिसणारी रम्य 'अबोधाची वाट' बोलल्याविनाही तिच्या निःशब्द भावाने त्याची होणारी पुलकित वृत्ति, 'कमलनयने' च्या सहवासात– 'कळींतून पाकळीत'– उमलणारे त्याचे प्रेमभाव, अशी वि. म. कुलकर्णी यांच्या प्रेमगीतांतून आढळणारी सूचक भावचित्रे रसिकांना हृद्य वाटतील.

## संसाररथाची दोन चाके

रे. टिळकांनी संसाररथाची 'स्त्री–पुरुष' ही दोन चाके होत असे म्हटले. त्याबरोबरच स्त्री ही पुरुषाचे सारथ्य करते, असा त्यांनी क्रांतिकारक विचार प्रकट केला. परंतु स्त्री–वर्गाने लिहिलेल्या प्रेमविषयक कवितांतून नायिकांच्या तोंडून स्त्री–पुरुष–समानतेच्या हक्काची भाषा फारशी ऐकू येत नाही. उलट पतीला दैवत मानण्याची कल्पनाच अनेक कवयित्रींच्या काव्यांतून प्रगट झाली आहे. (आर्यस्त्रियांचा पतीकडे पाहण्याचा वरील दृष्टिकोन पूर्व परंपरेला धरूनच आहे)

## आधुनिक कवयित्रींच्या काव्यांत आढळणारे 'कौटुंबिक जीवनसौंदर्य.'

कौटुंबिक जीवनातल्या जिव्हाळ्याच्या प्रसंगांवर अनेक आधुनिक कवयित्रींनी आपले भावनात्मक विचार प्रगट केले आहेत. त्यांच्या कवितांतून जीवनानुभूतीचा प्रामाणिक आविष्कार झाला आहे. बहुसंख्य कवितांतून स्त्रीपुरुषांमधील–बहुशः पतिपत्नींमधील–नाजुक संबंधांचे धागेदोरे त्यांनी हळुवार शब्दांत रेखाटिलेले दिसतात. म्हणून त्यांचाच या प्रकरणात विचार करावयाचा आहे. तथापि अन्यविषयांवरील काव्यातून त्यांनी काही उदात्त भावना प्रगट केलेल्या आहेत. उदा० लक्ष्मीबाई टिळकांचे कौटुंबिक प्रेम, आणि ईश्वरनिष्ठा, बहिणाबाई चौधरी यांनी सांसारिक जीवनांत रमत असताना माणुसकीला केलेले आवाहन, विमलाबाई देशपांडे यांनी पतीविषयी वाटणाऱ्या उत्कट भक्तीचे 'निर्माल्य–माले'त केलेले विश्लेषण, परोपकाराला वाहून घेतलेल्या ध्येयवादी सारजाबाई बापटांच्या जीवनाचे काव्यात पडलेले प्रतिबिंब, मनोरमाबाई रानडे यांची एकीकडे निष्पाप बालवृत्तीशी होणारी तन्मयता

तर दुसरीकडे जीवनाकडे गंभीर दृष्टीने पाहण्याची प्रवृत्ति, मनोरमाबाई नावलेकरांची 'भावकुसुमांजली'तील प्रेम साम्राज्याची कल्पना, शांतादेवी परदेशी यांनी आर्यभगिनींना उद्देशून प्रकट केलेले भावनात्मक विचार, अशा आशयांच्या कवितातून त्यांच्या व्यक्तित्वाचे ठसे उमटले आहेत.

यापुढे आधुनिक कवयित्रींनी लिहिलेल्या प्रेमगीतांचाच प्रामुख्याने विचार करणे, उचित होईल.

## पतिपत्नीप्रेमांतील ऐक्यभाव

पतिपत्नींमधील 'प्रेमाचे ऐक्य' हाच लक्ष्मीबाई टिळकांच्या कवितांचा प्रमुख विषय आहे. 'कारंज्यामध्ये मोदक कशाला' 'पतिपत्नी' इत्यादी कवितातून त्यांनी 'नरनारीसंगम हीच संस्कृतीबाई' याच सत्याचा पुरस्कार केला आहे. 'कवीच्या कुशल कराचा स्पर्श होताच जड सतारीलाही मधुवाचा फुटते' 'गाणारा मम धनी–मी पडसाद' अशा शब्दांत पत्नीचा पतीविषयीचा आदर भाव प्रकट झाला आहे. हिंदू कन्यकेच्या या पतिनिष्ठत कुणाला खुळेपणा वाटला तर कवियित्रीने त्याला, 'आम्ही जगांत अशाच वेड्या राहू, आणि इतरांना वेड्या करू,' असे उत्तर दिले आहे.

'मी तुझी मावशी तुला न्यावया आले' या नाट्यगीतात लहापणीच जी विवाहबध्द झाली आहे पण प्रौढपणाचे ओझे फेकून देऊन जी माहेरी जाण्यास उत्सुक झाली आहे अशा बालिकेच्या मनाचे विश्लेषण कवयित्रीने मोठ्या भावनात्मक शब्दात केले आहे. लक्ष्मीबाईच्या सुसंपन्न व्यक्तिमत्त्वाचा हृदयंगम ठसा त्यांच्या कवितेवर उमटला आहे.

## पती हाच देव

'माझे प्रेम तुम्हावरी जडतसे हे भाग्य का थोडके' (स्मृति) असे समाधानाचे उद्गार काढणाऱ्या मनोरमाबाई रानडे यांच्या प्रेमगीतातील प्रमुख विषय 'पतिप्रेम' हाच आहे. 'उच्च शिक्षण घेतलेल्या स्त्रीची देखील पती हाच आपला 'देव' आणि 'स्वामी' आहे ही भावना अविचल असल्याचेच त्यांच्या कवितेत दृष्टीस पडते' ही प्रा. मालती किर्लोस्कर यांची टीका या कवयित्रींच्या प्रेमगीतांना चांगली लागू पडते.

## अननुभूत प्रेमभावनांचा आविष्कार

इंदिरा संत ह्यांच्या अनेक प्रेमविषयक कवितांतून पत्नीला व्यथित करणाऱ्या पतीच्या चिरविरहाच्या भावना प्रगट झाल्या आहेत.

'तुजवीण आता–तुझ्या या संसारी–अंगाराच्या सरी–वर्षतात.
आंत बाहेरून–लागलीसे आग–तुझा घेत माग येऊ कोठे ?'

असा प्रश्न विकल मनाच्या अवस्थेतून (वरील कवितेतील) ‘ ती ’ विचारीत आहे. त्याच्या स्मृतीची जखम भरून निघायला नको, एवढेच काय पण जखमेवर कुणी शीतल फुंकरही घालवयास नको असे तिला वाटते. तो आणि आपण यांच्यामध्ये कायमचा मृगजळाचा सागर आहे याची तिला तीव्र जाणीव आहे. तो नसला तरी जणु काही त्याच्या जिवाच्या आकाशावर ही सुरंगा रेलून राहिली आहे. प्रियकराच्या स्मृति-सुमनांचे झेले एका एका अक्षरात साठवीत असता अवचित कोठेतरी त्याच्या लकबींचा तिला भास होतो, आणि तिच्या कोरड्या लोचनांत आग जळत राहते. तो येणार नाही हे माहीत असूनसुद्धा आपलेच जीवन आपल्या ओंजळीत भरून त्याची उत्सुकतेने वाट पाहणारी प्रियतमा—

‘ तुझ्यातील सारे तुझे आहे जरी विलगून–तुला परी चालले मी विसरून ’

असे म्हणते, परंतु तिला त्याचा असा विसर पडणे शक्य नाही. दाही दिशातून एकाकीपण पसरत येऊन तिला घेरते आणि मग घरातल्या आणि घराबाहेरच्या प्रत्येक वस्तुवस्तूंतून तिला त्याच्या संबंधीच्या गतस्मृति भेडसावतात. कुणाचे शब्द ऐकू येऊ नयेत म्हणून ती कानांवर हात ठेवते पण प्रत्येक वस्तु ओरडत सुटते

‘ ऐक जरा ना ऐक जरा ’

या कवयित्रीच्या भावगीतांतील भावना अनेक रसिकांना अननुभूत स्वरूपाच्या वाटतील, आणि त्यांना लाभलेला शाब्दिक आविष्कार अपूर्व वाटेल यांत शंका नाही.

## प्रेमभावनेतील पृथगात्मता

आधुनिक मराठीतील स्त्री–कवयित्रींच्या प्रेमभावनेत पृथगात्मता दिसून येते. संजीवनी मराठे यांच्या प्रेमानुभवात विविधता आहे. कधी त्या प्रीतीच्या स्वप्न-चित्रात रममाण होतात तर कधी प्रीतीच्या दुःखद स्मृति त्यांचे मन व्यथित करतात. चित्तांतील शांतसागरात उठलेल्या वादळाचे जसे त्या चित्रण करतात त्याचप्रमाणे प्रीतीचा त्यांना झालेला मंत्रमुग्ध रोमांचकारी पहिला भावानुभवही त्या उत्कटतेने रंगवितात; ‘ विभ्रम ’, ‘ स्वप्नसृष्टी ’, ‘ संधिकाल ’ ‘ प्रतीक्षा ’ ‘ निरोप ’ इत्यादी अनेक कवितांतून स्त्रीच्या अंतःकरणांतील आशा,–निराशा, मीलन, इत्यादी प्रेम-भावनांची चित्रणे त्यांनी हळुवारपणे केली आहेत. स्त्रीने स्त्रीच्या अंतःकरणांतील प्रेमभावना चित्रित करणे यात जितकी सहजता आहे तितकाच प्रामाणिकपणाही आहे. स्त्री ही पुरुषाकरिताच संसार करते आणि अनंतातली शिवाची हाक कानांवर येई-पर्यंत ती त्याच्याशी एकनिष्ठच राहाते हे हृद्गत स्त्रीच्याशिवाय दुसरे कोण उकलून दाखवू शकेल ?

## ‘ स्त्रीचे श्रेष्ठत्व ’

कुलीनांच्या कन्यांचे वैशिष्ट्य पद्मा गोळे यांनी—

'चाफेकळ्या पाना आड । मुळीं मांडू ना आरास । मुग्धपणे लावू वेड—' अशा शब्दात प्रगट केले आहे. समाजकंटकांना त्या नागिणीच भासतात. स्त्रीचे हें प्रभावी सामर्थ्य 'नव्या युगाची युगंधरा' या गीतांतहि प्रगट झाले आहे. 'अर्धी मानवता मी मजला पाहिन दास्यीं ठेविल कोण' असा त्यांचा सवाल आहे. स्त्री ही पुरुषाची अर्धांगी असली तरी– अदय रामाला भूमिगत सीता बनून ती त्याला एकाकीपणे रडवू शकते–हा यथार्थ अभिमानही तिला आहे ('कधी कधी') 'अभिलाषा' 'मी माणुस' इत्यादी गीतांतून स्त्रीकडे पाहणाऱ्या पुरुषी विलासी वृत्तीचा निषेध त्यांनी सूचित केला आहे. पतिपत्नींमधील संयमित भावनांची चित्रेंही त्यांनी 'माहेरास जावयाचे', 'याच कांहीं क्षणासाठीं' इत्यादी कवितांतून रेखाटली आहेत. त्याच्या येण्याची आतुरतेने वाट पाहणाऱ्या आणि तो येऊन गेल्यावर त्याच्या दर्शनाने बधिर झालेल्या प्रणयिनीचे चित्र मोहक वाटते. (स्वप्नजा–) 'स्वप्न-जेत' प्रेमभावनेची जी चित्रे आली आहेत ती प्रेमीजीवांच्या मुग्धमोहक बधिर आणि धुक्यासारख्या विरल भावनांचे धागेदोरे नाजुक शब्दांत उकलणारी आहेत, यांत शंका नाही. तथापि 'स्वप्नजे'त काही प्रेमकवितांना लाभलेले वातावरण कांहीसे गूढाद्भुत वाटते, आणि सूचकतेत कला असते हे मान्य केले तरी अति सूचकता ही कलेच्या आकर्षकतेस मारक ठरते हे सत्य दृष्टिआड करता येत नाही.

## प्रेमाचे परिचित भाव

हृदयाला विद्ध करणाऱ्या नयनबाणांच्या स्मृतीने अन्तरीची हुरहूर प्रगट करणारी; जगताला कळावयाला नकोत पण निसर्गातील नक्षत्रफुलांनाच जे अवगत होतील अशा प्रीतीच्या मृदुल भावात मग्न होणारी, त्याच्या अनामिक शीळेने उत्कंठीत होऊन गोकुळातल्या राधेचाच पुनरावतार धारण करणारी, अशा विविध प्रणयिनींचे परिचित प्रांजल भाव, शान्ता ज. शेळके यांच्या प्रेमगीतांतून आढळतात.

'प्रीतिगीत' 'तेव्हां आणि आतां' या प्रेमगीतातील भावनेत मनमोकळे-पणा आहे. 'क्षण घेतलेस तू' 'क्षणभर' 'अंधारातील क्षण' या प्रेमगीतांतील मोकळ्या शृंगारांत मादकता दिसून येते. व्यावहारिक लपंडावामुळे नव्हे, तर भाव-सरलतेमुळेच या कवयित्रीची प्रेमगीते रसिकांस सुखावह वाटतात.

## चैत्रपुष्प

सरिता पत्की यांच्या चैत्रपुष्पातील प्रणयिनींची जातकुळी रसिकांच्या परि-चयाची वाटते—

प्रियकराच्या एका सादाने माहेरचा पाश तोडावयास उत्सुक झालेली, पण त्याची हाक कानांवर येताच लाजून परसांतल्या केळीला विळखा घालणारी, ती भीरु-बाला, 'मधु–मुरली' घुमविणाऱ्या 'काळ्याला' उरिची जहरी ओढ थांबविण्यास

सांगणारी ती विकल राधा, कितीक जणींचे माथ्यावरचे घडे ज्याने फोडले तो कन्हैया आपल्याला भेटेल, आणि आपल्याच माथ्यावरचे घडे फोडील म्हणून अधीर झालेली, पण स्वतःच घडा फोडून वर ' पाहा होऽ या काळ्याने माझा सत्य-नाश केला ' म्हणून कांगावा करणारी ती राधा, या सर्व प्रणयिनींच्या (जरी क्वचित् त्यांतील एखादीस रुळलेला मार्ग सोडण्याची इच्छा झाली तरी ) प्रेमभावना रसिकांना अपरिचित नाहीत.

## प्रेमभावनेची कुचंबणा

आजच्या जीवनकलहात नाजुक प्रेमभावनेची कशी कुचंबणा होते, आणि तिला कसे यांत्रिक व कृत्रिम वळण मिळत जाते, याचे दिक्दर्शन मर्ढेकरांनी काही कवितांतून उपहासात्मक पण स्पष्ट शब्दांत केले आहे. उदाहरणार्थ एक प्रियकर आपल्या प्रेयसीला म्हणतो ' तूं ये कारण माझ्या—

' हृदयामधल्या हेतूलागी – हवेत हाडांच्या ह्या तिरड्या '

मर्ढेकरांच्या कांही शब्दप्रतिमा चमत्कृतिजनक वाटतात, पण खोल विचार केल्यास त्यांचा हेतु आपले मनातले भाव स्पष्ट करावे असाच असतो. उदा० ' दवास आलिस भल्या पहाटे ' या गीतात प्रणयिनीला उद्देशून प्रियकराने खालील उद्गार काढले आहेत.

' डोळ्यामधल्या डाळिंबाचा सांग धरावा कैसा पारा '
' जवळुनि गेलिस पेरित अपुल्या मंद पावलामधल्या गंधा '

' पाऱ्याची चंचलता ' आणि ' पावलामधला गंध ' हे शब्दप्रयोग सांकेतिक नाहीत. तथापि त्यांनी सूचित केलेला अर्थ मनावर परिणाम करणारा आहे यांत शंका नाही. रेल्वेच्या स्टेशनांतील ' फलाटदादा ' अनेक ' गाड्या ' जाता येताना पाहतो ' त्यांतली कोणती गाडी तुम्हांस विशेष प्रिय होते ' असा मिष्किल प्रश्न कवीने त्यास विचारला आहे. सारांश मर्ढेकरांच्या प्रेमविषयक कवितांतून वास्तवभावनेची स्पष्ट चित्रे आढळतात. रूढ सांकेतिक कल्पनांचा आणि ढोंगांचा त्यांतून उपहासच केलेला दिसून येतो.

## सारांश

सदभिरुचीला धरून वैयक्तिक अनुभूतीच्या आधारे आत्मनिवेदनपर प्रेमगीते लिहिण्याची ठळक प्रथा केशवसुतांनी सुरू केली. सामाजिक निर्बंधामुळे स्त्रीपुरुषांमध्ये जे अवास्तव अंतर निर्माण झाले होते ते त्यांनी थोडे कमी केले. स्त्रीसौंदर्याकडे पाहण्याची आदराची दृष्टी निर्माण झाली. प्रेमभावनेला मानवी जीवनांत किती महत्त्वाचे स्थान आहे, हे गडकऱ्यांनी चांगले ओळखले होते. त्यांच्या प्रेमगीतांतून आत्मपरतेचा-प्रेमनिराशेचा--भाग अधिक आला असला तरी त्यामुळे काव्य-रसास्वादात

काही उणीव भासत नाही. गडकऱ्यांनी निःस्वार्थी प्रेमाची महतीहि वर्णिली आहे. त्यातून प्रेमविषयक उदात्त कल्पनाच प्रगट झाल्या आहेत. अशा दिव्य अलौकिक प्रेमाचा पुरस्कार पुढे अनेक कवींनी केला. त्यात समतोलपणा राहिला नाही हे खरे, परंतु स्त्रियांकडे पहाण्याच्या एकांगी स्वार्थप्रेरित भोगप्रधान दृष्टिकोनाला त्यामुळे चांगलाच हादरा बसला. रे. टिळकांनी पुरुषाला मार्गदर्शन करणाऱ्या स्त्रीप्रेमाचा गौरवच केला. प्रेमगीतातील त्यांचा ध्येयवाद डोळे दिपवून टाकणारा वाटतो. तांबे यांनी प्रेमभावनेच्या अनेक अंगांची चित्रणे करून काव्यवाङ्मयात प्रेमगीतांना कायमची प्रतिष्ठा मिळवून दिली. माधवज्यूलियनांच्या वेळी स्त्रीशिक्षणाचा प्रसार होऊन स्त्री-पुरुषांना एकमेकांचा जवळून परिचय करून घेण्याची संधी मिळाली. अशा मनमोकळ्या वातावरणात वाढलेल्या सुविद्य संस्कारक्षम तरुणतरुणींच्या मनातील प्रेमविषयक आशाआकांक्षांची आणि कल्पनाध्येयाची कलात्मक वास्तवचित्रे त्यांनी रंगविली; स्त्रीपुरुष समपातळीवर आले...प्रेमगीतातील अवास्तव वातावरण नाहीसे झाले....त्यानंतरच्या काळात निर्माण झालेल्या प्रेमगीतांवर प्रामुख्याने तांबे आणि माधवज्यूलियन यांच्या प्रेमगीतांचा ठसा नकळत उमटत गेला. याच सुमारास कांही कवींनी काल्पनिक भावनेवर आधारित नकली प्रणयगीतेहि लिहिली. अलीकडील कवी प्रेमभावनेत आत्यंतिक वास्तवता यावी हेच धोरण ठेवीत आहेत.

प्रेमगीतातून वास्तवभावनेचे चित्रण व्हावे, हे खरे असले तरी कला म्हणजे निसर्ग नव्हे. जे दिसते तेच चित्रित करण्याच्या अतिरिक्त हौसेमुळे आणि आपल्या मनात दडून राहिलेल्या भावछटांपैकी कोणत्या उजेडात आणाव्यात याचे भान न राहिल्यामुळे जी प्रेमगीते निर्माण होतील, ती वास्तवपूर्ण झाली तरी बेडौल—कलाहीन—ठरतील असे वाटते.

अशाप्रकारे प्रथमदर्शनी प्रेमाचा प्रभाव, प्रीतीचे महत्त्व, विवाहपूर्वप्रेमयाचनेचे प्रकार, पतिपत्नीमधील उत्कट प्रेम, प्रेमिकांचा तात्कालीन वा चिरविरह, निरभिलाष प्रेम, इत्यादी प्रेमभावनेच्या विविध प्रकारांवर केशवसुतांपासून तो अनिल-कुसुमाग्रजांपर्यंत प्रसिध्दीस आलेल्या बहुतेक कवींनी प्रेमगीते लिहिली आहेत. त्यांतील काही कल्पनारंजित तर काही अनुभवजन्य आहेत. तत्कालीन परिस्थितीचा परिणाम त्यांवर झालेला आहे. एक गोष्ट मात्र स्पष्ट आहे की त्यांतून कवींच्या सुसंस्कृत सदभिरुचीचेच दर्शन होते. त्यांतील कांही वैशिष्ट्यपूर्ण प्रेमगीतांचा विचार आतापर्यंत या प्रकरणात केला आहे.

* * *

# प्रकरण ६ वे

## ‘ बालगीते ’

### प्राचीन मराठी वाङ्मयातील बालगीतेः–

बालभावना ज्यात प्रगट झाल्या आहेत, अशी बालभाषेत लिहिलेली अनेक बालगीते जुन्या मराठी वाङ्मयात प्रचलित आहेत. संतकवि आणि पंडितकवि यांनी लिहिलेल्या बालगीतांचा प्रमुख विषय ‘श्रीकृष्ण आणि त्याच्या बाललीला’ हाच असे. वस्तुतः निर्गुण परब्रह्माचे श्रीकृष्ण हे गोजिरे सगुण स्वरूप. परंतु त्याच्याशी तन्मय होताना अनेक कवि जणु काही बालमनोवृत्तीशी तन्मय झालेले दिसतात. श्रीकृष्णाचा गोकुळातील हूडपणा, सवंगड्यांची त्याने केलेली थट्टा, त्याचा वनविहार, जलक्रीडा, काल्याचे आणि खेळांचे प्रकार, अशा खेळकर प्रसंगांवर बहुतेक प्राचीन कवींनी निष्पाप बालमनोवृत्तीशी समरस होऊन बालगीते रचिली आहेत. अशा गीतांतील तात्त्विक अर्थ बाजूला ठेवून ही गीते वाचली तर बालमनाची ओळख होऊन आनंदही होतो. उदाहरणार्थ श्रीकृष्णाच्या बालवृत्तीशी एकरूप होण्याची प्रेमळ कला नामदेवांना लाभली होती. बालकृष्णाने यशोदेजवळ केलेली वतावणी, बालमनाला शोभणारी आहे. ‘ घराकडे चाल मला लवकर जेवुं घाल–गाईच्या झुंडी लांब गेल्या आहेत. मला त्यांची राखण करावयाची आहे–लवकर जेवु घाल ’ ( गौळणी, अभंग २४४, आवटे–संपादित ‘ नामदेवगाथा. ’ )

श्रीकृष्ण आपली भलतीच थट्टा करतो आणि सतावून सोडतो, म्हणून गौळणींनी केलेल्या तक्रारी, आणि यशोदेने श्रीकृष्णाची बाजू घेऊन ‘ तान्हे ग बाळ दिसते गोजिरवाणे, माझा सावळा चिमणा गवळणींत शोभे राजा. तुम्ही लटकाच आळ आणता ’ असे काढलेले उद्गार लक्षांत घेतले, म्हणजे नामदेव मायपुत्रांच्या भावनेशी कसे समरस होत, याचा उलगडा होतो. ( अभंग–२६५ ).

ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ--इत्यादिकांनी बालकृष्णाच्या लीला चित्रित

करताना बहुधा बाल भाषेचाच अवलंब केलेला दिसतो. बालकृष्णाचे अनेक उद्गार त्याच्याच शब्दात प्रगट झाल्यामुळे अशा बालगीतांना एकप्रकारे नाट्यगीतांचेही स्वरूप प्राप्त झाले आहे. ज्ञानदेवांनी लिहिलेली 'कान्हा तुझी घोंगडी चांगली रे' नामदेवाचे 'दोंदील दोंदील टमकत चाले', त्याचप्रमाणे पुढील 'किस्ना थमाल ले थमाल अपुल्या गाई' आणि 'असा कसा देवाचा देव बाई ठकडा' ही बालगीते जितकी त्यांतील बालभाषेमुळे तितकीच ती त्यातील बालसुलभ यथोचित भावनेमुळे उठावदार झाली आहेत.

तुकारामांनी जे बाळक्रीडेचे अभंग लिहिले, त्यांतील भाषेचे स्वरूप गंभीर आहे, मात्र श्रीकृष्णाच्या वृत्तीशी त्यांची होणारी समरसता मात्र सर्वत्र प्रगट झाली आहे.

'बाळपणी हरि । खेळे मथुरेमाझारी ।
पायी घागरिया सरी । कडदोरा वाकी ।
मुख पाहे माता । सुख न समाये चित्ता ।

(अभंग १२५, 'दांडेकर गाथा'), या प्रेमळभावाने भरलेल्या पद्यपंक्ति रसिकांचे चित्त आकर्षून घेतात.

पंडित कवींनीही श्रीकृष्ण परमात्म्याच्या बालस्वरूपाशी समरस होताना बालकृष्णाच्या लीलेची वर्णने केली आहेत. वामनपंडितांच्या 'वेणुसुधे'त असे अनेक श्लोक आले आहेत. मात्र अशा बालगीतांचा विषय बालभावनेचा असला आणि बालस्वभावाचीच यथातथ्य वर्णने त्यात आली असली तरी ती बालगीते नाहीत. बालकृष्णाच्या निष्पाप क्रीडा चित्रित करताना, पंडितकवींनी त्यांतून गंभीर स्वरूपाच्या आत्मक्रीडाच चालू ठेवल्या होत्या, असे दिसते. पंडितकवींपैकी मोरोपंत बालवृत्तीशी अनेक ठिकाणी समरस झाले आहेत. लहान मुलांना झोपाळ्यावर बसून गाता यावे म्हणून त्यांनी 'सीतागीत' रचिले. छंदोरामायणातही बाळाच्या बोबड्या बोलांत ब्रह्मसुख दडून राहिले आहे असे त्यांनी म्हटले.

'बहु लाडका भजक शिशु पाठी लागोनि ओवळा शिवतो'

अशा खोडकर बालकाचेही त्यांनी कौतुक केलेले दिसते; अशी गीते बालांना उद्देशून लिहिलेली आहेत, त्यांना बालगीते म्हणणे योग्य होणार नाही.

मराठीतील लोकगीतांतूनहि बालगीतांना प्रमुख स्थान मिळाले आहे. आईने पाळण्यातील छकुल्यास उद्देशून म्हटलेली 'अंगाईगीते,' भावास उद्देशून बहिणीने गाईलेल्या ओव्या, सर्वत्र प्रचलित आहेत. 'चांदोबा चांदोबा भागलास का ?' 'आपडी थापडी गुळाची पापडी', 'डोल ग बाई डोलाची डोक्यावर पाटी सोन्याची', इत्यादि शिशुगीते, त्याचप्रमाणे लहान मुलींच्या 'फुगड्या', 'झिम्मा', 'उखाणे', 'भोंडला', इत्यादी विषयांवरील अनेक लोकगीते प्रसिद्ध आहेत.

'मराठींतील स्त्री-गीते' ( सरोजनी बाबर ) 'मराठीतील लोकगीते व म्हणी' (मालती-बाई दांडेकर ) 'अपौरुषेय वाङ्मय' (कमलाबाई देशपांडे) इत्यादी अनेक पुस्तकांतून लोकगीतांतर्गत बालगीतांचा समावेश झालेला आहे. ही बालगीते परंपरेने चालत आली आहेत. ती रचणाऱ्यांची नावेही अप्रसिद्धच आहेत. वाङ्मयीनसौंदर्याच्या दृष्टीने ती वाचनीय ठरतात. अभिनयाला ती योग्य असल्यामुळें त्यांतून नाट्य-गुणही आढळतात. अशा दुहेरी गुणांमुळे त्यांचे वाङ्मयातील स्थान आजही अढळच राहिले आहे.

आध्यात्मिक दृष्टिकोनातून पौराणिक देवदेवतांच्या बालस्वरूपाची केलेली वर्णने, आणि केवळ 'बालां'चे कौतुक करावे या हेतूने लिहिली गेलेली आजची बालगीते, यामध्ये मोठेच अंतर आहे. स्थूलमानाने वत्सलरसाची निर्मिति दोन्हीही ठिकाणी दिसून येते हे खरे, तथापि प्राचीन कवींपेक्षा अलीकडील कवींनी मानसशास्त्र-दृष्ट्या बालभावनेची अनेकविध स्वरूपे लक्षात घेऊन बालगीते रचली आहेत. या बालगीतांमधून त्या त्या कवींचे पृथगात्म दृष्टिकोनही प्रगट झाले आहेत.

## 'बालकाचे मन, संमिश्र भावनांचे आगर'

बालकाचे मन जात्याच संवेदनाक्षम असते. सभोवताली दिसून येणाऱ्या आकर्षक वस्तूंविषयीचे त्यांचे कुतुहल अनावर होते. आपल्या परिवारात येणाऱ्या प्रौढ स्त्रीपुरुषांच्या चालण्याबोलण्याचे अनुकरण करण्याची बुद्धी मूलतःच त्यांच्या ठिकाणी दिसून येते. या बालकांच्या मनोवृत्ति लक्षांत घेऊन आधुनिक कवींनी बालगीते रचली आहेत. ही बालगीते अभिनयाला ( नाट्याविर्भावास ) वाव देणारी, आणि गेयप्रधान असतात. ती स्वतंत्ररीतीने गुणगुणून पाहिली तरी त्यांची गोडी कमी होत नाही. पण विशेषेकरून अभिनयासह बाल-कांच्या मुखांतून ती प्रगट होताना ऐकली तर त्यांची गोडी अधिकच दुणावते. अनुकरणबुद्धी, जिज्ञासावृत्ती आणि चांचल्यभाव यांचे एक मनोहर मिश्रण, बाल-काच्या मनोवृत्तीत झालेले असते. दत्त आणि बालकवि यांनी आरंभी लिहिलेल्या अनेक बालगीतांमधून त्याचा प्रत्यय आपणांस येतो. दत्तांचे हे पुढील बालगीत पाहा—एक छोटी बालिका आपल्या अबोल बाहुलीला

'बोलत कां नाही ? वाटले काय तुला बाई'

असा प्रश्न करीत आहे. तिने बाहुलीसाठी नवीन चोळी-परकर केले होते, दाग-दागिने केले होते, पण तरीसुद्धा ती बोलत नव्हती. ती रागावली असावी असे तिने मनाशी ठरविले. आईने खाऊ दिल्यावर आपला राग नाहीसा होतो हे तिला माहीत असते म्हणून ती पुन्हा तिला विचारते 'सांग तुला कां भूक लागली, देउ काय पी लाटुनि पोळी- रुसू नको घे ही बघ झाली' तरी पण बाहुलीचा राग नाहीसा होत नाही. मग आपण अजून बाहुलीचे लग्न केले नाही याची तिला गोड जाणीव

होते. आणि या विचाराने तिच्याबरोबर तिच्या बाहुलीच्या मनाची कळी खुलते. दत्त कवींनी लिहिलेल्या 'शहाणी बाहुली' या कवितेचे दुसरेही चित्र असेच मनोरम आहे.

आपली बाहुली किती शहाणी आहे, हे इतरांना सांगत असता अशीच एक बालिका आपला शहाणपणा उघड करते. ती म्हणते, 'बघा बघा कशी माझी बया बसली आहे ती. ही माझी छबी हळू हळू बोलत आहे. ही गालात गुलुगुलु कशी हासते आहे–पाहा ही हट्ट धरत नाही. विशेष म्हणजे– साडी चोळी नवी ठेवी जशीच्या तशी।' कवीने या गीतांतून बालिकेचे भाव बालिकेच्या शब्दात तर प्रगट केले आहेतच, पण बालिकेच्या आंतरमनाचेहि पडदे त्यांनी किती नाजुक रीतीने उलगडून दाखविले आहेत ते लक्षांत घेण्याजोगे आहे. ज्यास बालिकांच्या मनाशी समरस होण्याची आणि त्यांच्याच भाषेत त्यांच्याच भावना प्रगट करण्याची अशी दुहेरी कला साधते तोच यशस्वी बालगीते लिहू शकेल यात शंका नाही. वरील गीतांप्रमाणेच 'अ–आ–ई' 'ताई गुणाची माझी छकुली' इत्यादी दत्तांच्या बालगीतांचा आरंभीची 'यशस्वी बालगीते' म्हणून उल्लेख करणे आवश्यक आहे.

बालकवींनाहि बालबालिकांच्या मनोवृत्तीशी समरस होण्याची कला साधली होती. लहान बहीण आपल्या तान्ह्या भावाचे कौतुक करताना बोबड्या शब्दात म्हणते,

'पाहत लाहू–गोजिला ग माधा भाऊ'

त्याला कडेवर घेऊन खेळविण्याचा तिला मोह होतो. तो किती खोडकर आहे याचे वर्णन करताना ती म्हणते

'माधे केथ कधे बघ धलितो
लागलीच मग थोलुनि देतो'

बोबड्या बोलीतील निष्कपटी भावनेचे माधुर्य या गीतात आढळते. क्षणात हसणाऱ्या आणि क्षणांत रागावणाऱ्या बालिकेच्या मनाचे चित्र 'रागोबा आला' या कवितेत बालकवींनी खालील शब्दात रंगविले आहे :

'रागोबा आला आला–गडे आमुच्या ताईला
फुगले ग फुगले गाल–फुल माझे झाले लाल'

परंतु क्षणात राग नाहीसा होताच

'हसली ग हसली ताई–हे फूलहि हसले बाई
उनपाऊस ही एक गडे–एक ताइचे हसे रडे'

असे दृश्य दिसते.

'चिमणीचा घरटा चोरीस गेला' हेही असेच वैशिष्ट्यपूर्ण बालगीत आहे. आपला घरटा कोणी नेला म्हणून चिमुताई 'कावळेदादा'ला, 'कपिला मावशी'ला,

'कोंबडीताईला' विचारीत आहे; 'नाही ग बाई' असेच तिला उत्तर मिळत आहे. याच संदर्भात 'चिव चिव चिव ग चिमणूताई', 'घोडा घोडा', 'अंगाई गीतें' इत्यादी गीते लक्षांत येतात. अशा गीतांतून बालमनाला झेपणारा सुरेख आशय तर असतोच, पण याशिवाय शब्दाशब्दांतील नादमधुरता, आणि बालकांच्या विचाराला मोहून टाकणारी गोड कल्पना, यांचा संगम अशा 'बालगीतां'त झालेला दिसून येतो.

## बाहुल्यांची गाणी

दत्तकवींच्या 'बोलत का नाही' या बालगीताप्रमाणेच 'बाहुल्यांचे वैद्यराज' हे रे. टिळक यांनी लिहिलेले बालगीत अप्रतिम आहे. 'तापाने फणफणली तरी बाहुली औषध घेईचना, धाक दाबला तरी भिईचना, वैद्यराजाने गोड औषध दिले तरी ती बरी होईचना.' या उद्गारात बालिकेच्या निरागस मनोवृत्तीचे प्रतिबिंब पडले आहे. 'माझी नवलाची बाहुली', 'बाहुलीची सहल', 'बरी होऊन आली' इत्यादी बाहुल्यांच्या गाण्यांतून बालमनाचे वास्तवपूर्ण विश्लेषण कवीने केले आहे. बालकवि आणि रे. टिळक या दोघांनी एका झोक्याच्या चित्रावर कविता लिहिल्याः—

'ताई गुणांची माझी छकुली
झोका दे दादा म्हणूं लागली
सांभाळ ताई फांदी वाकली
दोन्ही दोरांना गच्च आवळी
जो जो गे जो जो'

अशा बालकवींच्या सुरुवातीच्या ओळी आहेत. रे. टिळकांच्या कवितेतील आरंभीचे चरण असेः–

'प्रभु प्रेमाचा– सुंदर झोपाळा– झोके देतो ये तुजला.
भक्ति शांतीचा– दोर रम्य विणिला– बांधिला तरु विश्वासाला.
दया देवाची–करी आसनाला– बसे वर ताई वेल्हाळा'

बालकवीपेक्षा टिळकांची वृत्ती बालगीते लिहिताना कशी तत्त्वजिज्ञासु असे याची कल्पना वरील उताऱ्यावरुन येईल. टिळकांनी अगदी लहान मुलांकरिता त्यांच्या बोबड्या शब्दांत जी शिशुगीते लिहिली आहेत, त्यांतून सहजरम्य बालभावना प्रगट झाल्या आहेत. लहान मुलांची नादमधुर बडबड, त्यांना आवडणाऱ्या पशुपक्षांशी त्यांची होणारी गोड किलबिल, निरनिराळ्या खेळांतून त्यांची दिसून येणारी धावपळ अशी बडबडीची, किलबिलीची, आणि धावपळीची शब्दचित्रे त्यांच्या शिशुगीतांतून दिसून येतात. उदा. 'हूं हूं हूं' 'चिवु चिवु चिवु' 'पांगुळगाडा' इत्यादि गीते पाहाः–( बालोद्यान )

## बालांना उद्देशून लिहिलेली गीते

बालांना उद्देशून लिहिलेल्या बालगीतांचा दुसरा एक प्रकार आहे. अशा गीतांतून प्रौढांना बालांविषयी जे कौतुक वाटते त्याचेच प्रौढ शब्दांत विवरण आलेले असते. उदाहरणार्थ दत्त कवींच्या 'बाललेखन', 'देवाजीची सर्व फुले', बालकवींचा 'पाळणा', 'निजलेल्या मुलास' इत्यादि कविता दुसऱ्या प्रकारच्या बालगीतांत समाविष्ट होतील असे वाटते.

रे. टिळक यांना तर फुलामुलांचे कवि असेच म्हणतात. तथापि रे. टिळकांनी बालांचे कौतुक करताना स्वतःकडे तत्त्वज्ञाची भूमिका पत्करली आहे असे दिसते. त्यांची 'लेकराची जिज्ञासा' वाचीत असता लेकरांच्या ठिकाणी दिसून येणाऱ्या त्यांच्या मुग्धावस्थेतील सुप्तशक्तीची व निष्पाप वृत्तीची थोरवीच वाचकांना समजावून देण्याचा टिळकांचा हेतु होता असे स्पष्ट दिसून येते. 'माझी ताई' या कवितेतील भाऊ आपल्या बहिणीची थोरवी गाताना म्हणतो;

'तू तर तेजस्वी करशी येइल जवळ तुझ्या त्याशी
नक्षत्रांचा गण चमके गे हा उसन्या तेजे
निराळे वैभव तव ते जे'

अशा प्रकारे लहान मुलांच्या ठिकाणी ईश्वरत्व दिसून येते, या कल्पनेने प्रेरित होऊन टिळकांनी बालांचे अनेक ठिकाणी कौतुक केलेले दिसते. 'सुशीला' या खण्डकाव्यात बालकांच्या मनोवृत्तीचे सौंदर्य प्रगट करताना त्यांनी लिहिले आहे.

'स्नेह त्यांचा बाहुल्या साहुल्याशी
वडील जे जे मांडिती पुढे त्याशी
सृष्टि सारी खेळते तया संगे
कुठे बाळाचे चित्त न हो रंगे ?'

आदर्श बालकाच्या ठिकाणी दिसून येणाऱ्या आदर्श गुणांचा गौरव टिळकांनी आदर्श–दृष्टिकोनातून केलेला दिसतो.

## 'प्रौढत्वी निज शैशवास जपणे–'

'प्रौढत्वी निज शैशवास जपणे बाणा कवींचा असे'

असे उद्गार काढणाऱ्या केशवसुतांनाही बालकाच्या निर्व्याज मनोवृत्तीचे कौतुक करतांना अतिशय आनंद होत असे. 'ताई मला बागेतले फुलपाखरू धरून दे' म्हणून हट्ट धरणाऱ्या बाळयाच्या व 'जाऊ दे ते नको आम्हाला फुलपाखरू ते गरीब बिचारे फुलपाखरू वेलीवरच राहू दे' असे म्हणणाऱ्या ताईच्या मनोवृत्तीशी केशवसुत समरस झालेले दिसतात. या कवितेतील ताई फारच समजुतदार आहे. ती आपल्या भावाला म्हणते 'गडे असा नको रे धरू हट्ट ते फार नाजुक आहे

९५६१ १७०१२

ह्याला खपणार नाही, आपल्या खेळाचा चाळा। त्याचा होईल चोळामोळा।' 'गुलाबाची कळी' या कवितेतहि मुलांचे गुलाबाच्या कळीशी होणारे आरंभीचे भाषण लहान मुलांना आनंद देईल. पण या कवितेच्या अखेरीस 'तो निष्ठुर मुलगा ती वेचणारच आणि ती सुकुमार कळी त्याला बोचणारच', असा जो उपदेशवजा इशारा कवीने दिला आहे तो मुलांना किती आवडेल याविषयी शंका वाटते. प्रौढांनी मात्र त्यापासून योग्य बोध घ्यावा! याच संदर्भात त्यांनी लिहिलेली 'फुलांची पखरण' ही कविता उल्लेखनीय आहे. एक बाला आपल्या मैत्रिणीला म्हणते 'सकाळ संपण्याच्या आंतच वेलीखालची फुले वेचा–ऊन तापेल मग धंदे कराल, पण फुले विसराल सुख कैसे पावाल?' अशा वरील कवितेच्या शेवटी आलेल्या विचारामुळे कवितेतील प्रसन्न वातावरण कांहीसे जड झाले आहे असे वाटते. एरवी 'फुलांची पखरण' ही कविता बालगीतात समाविष्ट झाली असती.

## बी कवींची माझी कन्या:—

बी कवींनी 'माझी कन्या' या कवितेत शाळेतील एका मुलीला भिकारीण म्हटल्यावरून घरी येऊन ती स्फुंदून स्फुंदून रडत आहे, आणि बाप तिची समजूत करीत आहे, असा प्रसंग कल्पिला आहे. मुलीच्या डोळ्यांतून ओघळणाऱ्या अश्रुजलांना गंगायमुनेच्या पाण्याची दिलेली उपमा–आणि तिच्या नाकातून निघणाऱ्या उष्ण श्वासामुळे तिच्या गालावरील कोमेजलेल्या गुलाबांचे केलेले वर्णन, ही वर्णने रेखीव आहेत. वरील कवितेत बालिकेला उद्देशून कवीने आपल्या भावना प्रगट केल्या आहेत. निसर्गाने दिलेल्या सौंदर्यापुढे अलंकारांनी येणारे सौंदर्य काय कामाचे? तरीपण 'नारि मायेचे रूप हे प्रसिध्द, सोस लेण्यांचा त्यास जन्मसिध्द' हा सिध्दांत कवि सूचित करतात. अखेरीस 'देवाच्या गावी जाऊन हा प्रश्न आपण विचारू' असे म्हणताच मुलगी बापाच्या गळयात आपले रेशमी करपाश टाकते आणि 'मीही तुमच्याबरोबर येते' असे म्हणते. बी कवींची वृत्ति किती हळुवार आहे व बाल-मनाशी समरस होण्याचा ती कसा प्रयत्न करते, याचा उलगडा जरी या कवितेवरून झाला तरी श्रींची 'माझी कन्या' ही प्रौढ वाचकांचे मनोरंजन करील, बालबालिकांना तिचे रहस्य समजणार नाही.

## तांबे यांची बालगीते

त्यामानाने तांबे यांची बालगीते वैशिष्टयपूर्ण आहेत. Robert Browning यांच्या Pied Piper चे 'पुंगीवाला' हे रूपांतर प्रौढ विद्यार्थ्यांचेच मनोरंजन करू शकेल. या गीताशिवाय बालबालिकांच्या स्वभावातील अनेक रम्यछटा दर्शविणारी 'बालगीते' त्यांनी रचली आहेत ती महत्त्वाची आहेत. बालपणी बहिणीला भावाची

व भावाला बहिणीची थट्टा करण्यात आणि परस्परांना चिडविण्यात मोटा आनंद वाटतो. ताई भावाला म्हणते

‘ तुझ्या गळा माझ्या गळा गुंफू मोत्यांच्या माळा ’

यावर भाऊ विचारतो ‘ आणखी माळा कोणाला ? ’ त्यावर ताई भावाला ‘चहाटळ’ ठरविते. पुढील प्रत्येक कडव्यात, कोठे अंगठीचा, तर कोठे पगडीचा, किंवा शेल्याचा उल्लेख करून, त्या त्या वेळी भाऊने ताईला चिडविले आहे. ताई जेव्हा भावाला ‘चल निघ येथून नको बसू ’ असे म्हणते. तेव्हा भाऊ उत्तर देतो. ‘घर तर माझे तसू तसू ’. त्यावर शेवटी ताई ‘दादाशी गट्टी फू’ करते आणि भाऊ तिला विचारतो, ‘तर मग गट्टी कोणाशी ? ’ एक विशिष्ट प्रसंग घेऊन त्याला विनोदी संवादाने दिलेला उठाव यामुळे ‘ तर मग गट्टी कोणाशी ? ’ हे नाटयगीत यशस्वी झाले आहे. या गीताची गोडी त्यातल्या त्यात प्रौढ बालकांनाच समजू शकेल. ‘ हे कोण गे आई ’ ‘ चिव चिव चिमणी ’ ही बालगीते मात्र त्यांतील बालकांच्या ठिकाणी दिसून येणाऱ्या जिज्ञासा-वृत्तीचे आविष्करण झाल्यामुळे व बालभाषेत लिहिल्यामुळे, मोठी आकर्षक झाली आहेत.

## माधवांच्या ‘ बालगीता’तील अद्‌भुतरम्यता

माधवांनी लिहिलेल्या बालगीतांपैकी ‘ सोनावळ ’ ‘ कुरडू ’ वगैरे गीतांतून बालकांना आवडणाऱ्या वेलीफुलांची वर्णने आली आहेत. ‘ बालमुकुंद ’ ‘ गमे मजला हे नवल यमूताई ’ या कवितातून बालबालिकांना उद्देशून प्रौढांना वाटणाऱ्या कौतुका-चेच भाव प्रगट झाले आहेत. डॉ. रवींद्रनाथ टागोर यांच्या The Crescent Moon मधील ‘Rainy Day’ या कवितेचे सुरेख रूपांतर ‘ नको जाऊ बाहेर आज बाळ ’ या कवितेत आले आहे. आटपाट नगरातील कहाणीत बुलबुलाला मारणाऱ्या चिमण्याला दिलेले देहान्त शासन, आणि बुलबुलावर गुलाबाच्या फुलांनी बांधलेली समाधि, या अद्‌भुतरम्य गोष्टीचे आकर्षण बालमनाला खात्रीने वाटेल.

निसर्गातील वस्तूंना चिर-सौंदर्य देणाऱ्या बाळाची गोष्ट ‘ कोण बाळ हा फिरे वनी ’ या कवितेत आली आहे. माधवांनी बालबालिकांचे कौतुक स्वतःच्या शब्दात मनोभावे केले. तथापि दत्त किंवा बालकवि यांनी बालगीते जशी बालभाषेत लिहिली आहेत, तशी माधवांनी क्वचितच लिहिली आहेत.

## बोधपर बालगीते

हरि सखाराम गोखले यांनीही बालबालिकांना उद्देशून बालगीते लिहिली आहेत.

‘ उद्याने बहुत भरिली । पुष्पांनी फुलनी गेली ।
बाळाहुनि ती न बहिली । वाटती मला—। ’

या उद्गारांतून बालाविषयी त्यांना किती कौतुक वाटते, याचाच प्रत्यय येतो. 'एक गोड पापा', 'माझी सोनी' वगैरे कविता जरी बालबालिकांना उद्देशून लिहिल्या गेल्या तरी ती गीते रे. टिळकांच्या 'लेकराची जिज्ञासा' या कवितेच्या वर्गातच पडणारी आहेत. बालकांना सोप्या शब्दात सदाचरणाचे धडे देणे, हेच अशा कवींच्या बालगीतांचे वैशिष्टय होय.

## मायदेवांची वैशिष्टयपूर्ण बालगीते

बालबालिकांच्या चमत्कृतिपूर्ण गूढ स्वभावाचा खोल अभ्यास करून बा. गो. मायदेव यांनी बालगीतांचे विविध नमुने रसिकांपुढे ठेविले आहेत. त्यांनी लहान मुलामुलींची ग्रहणशक्ति लक्षात घेऊन, काही शिशुसाठी तर काही प्रौढ बालकांसाठी भिन्नभिन्न प्रकारचे बालगीतसंग्रह–उदा. 'अभिनयगीत' 'शिशुगीत' 'किलबील' 'छंदगीत' 'बालविहार' इ.–प्रसिध्द केले आहेत. बालबालिकांच्या आवडीनिवडी, त्यांचे विविध छंद, खेळ, पशुपक्ष्यांविषयी त्यांना वाटणारे आकर्षण, घराबाहेर दूर कोठेतरी जाण्याची त्यांची हौस, क्वचित प्रौढांनाही न समजणारे पण बालमनातच उद्भूत होणारे आणि तत्त्वज्ञांनाही बुचकळ्यात टाकणारे कूट प्रश्न, त्यांच्या स्वैर कल्पना, हेच प्रमुख विषय त्यांच्या बालगीतांतून आले आहेत. बालभावनांच्या विविध छटाहि त्यातून प्रकट झाल्या आहेत. आईवडिलांसारखे मोठे होऊन त्यांच्या व्यवहारांचे अनुकरण करण्याची बालकांची वृत्ति, निसर्गातील सजीव निर्जीव वस्तूंबरोबर त्यांनी साधिलेली मैत्री, त्यांना लागून राहिलेले निरनिराळे छंद, ह्यांची शब्दचित्रे बालमनाशी समरस होऊन मायदेवांनी बालगीतांतून आत्मीयतेने रंगविली आहेत. त्यांच्या अनेक बालगीतांना नाट्यगीतांचे स्वरूप प्राप्त झाले आहे. त्यांतून अभिनयालाहि भरपूर वाव मिळाला आहे.

'चला सुट्टी झाली आता खूपखूप खेळायचे' 'लक्ष्मण छकडेवाला' 'कधी मोटा होणार' इ० अनेक बालगीतांतून त्यांचे वरील गुणविशेष प्रकट झाले आहेत. त्यांच्या बालगीतांचे अनुकरणही झालेले दिसून येते. ही गोष्ट मायदेवांच्या बालगीतांची लोकप्रियताच उघड करणारी आहे.

## काही वैशिष्टयपूर्ण बालगीते

भ. श्री. पंडित यांनीही 'बीजेची कोर' 'चवथीचा चांद' 'अष्टमीचा चंद्र' इत्यादी शिशुगीतांचे संग्रह प्रसिध्द केले आहेत. लहान बालबालिकांच्या मनःप्रवृत्ती आणि त्यांना विविध विषयांचे वाटणारे आकर्षण, या गोष्टी लक्षात घेऊनच त्यांनी 'चांदोबा' 'हम्मा' 'मनी आणि मोत्या' 'कोकिळा' इत्यादि बालगीते सोप्या भाषेत' लिहिली आहेत. वि. भि. कोलते म्हणतात त्याप्रमाणे 'प्रौढ रसिकांना खेचून

नेण्याचे सामर्थ्य पंडितांच्या लेखणीत आहे' त्याचप्रमाणे त्यांची शिशुगीते लहान बालकांनाही आवडणारी आहेत.

मराठीतील बालवाङ्मयाला प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे समृध्द करणारे गोपीनाथ तळवलकर यांनी लिहिलेल्या बालगीतांपैकी 'विमान' 'रायबा' 'भिल्लाचा पोर' 'भय्याजी' 'रानपाखरा' इत्यादि बालगीते, इतकी प्रसिध्द आहेत की, 'आता त्यांचा अंतर्भाव, लोकगीतात झाल्यासारखा वाटतो.' मात्र एक गोष्ट स्पष्ट आहे की वरीलपैकी काही बालगीते, ही प्रायः बालांना उद्देशून प्रौढांनी व्यक्त केलेल्या भावनेवर आधारलेली आहेत. त्यांच्या 'विमान' या कवितेचे अनेकांनी अनुकरण केलेले दिसते. यांशिवाय बालबालिकांना ज्यांचे विशेष आकर्षण वाटेल, अशी 'एक होता राजा', 'लाडोबा' 'मुकी मैत्रीण' 'उंदीर मामा' इत्यादि त्यांची बालगीते शब्दांच्या नादमधुरतेमुळे, आणि त्यात प्रकट झालेल्या कल्पनानावीन्यामुळे, आकर्षक झाली आहेत. (सारसबाग–पाहा).

गणेश हरी पाटील यांनी जी बालगीते लिहिली आहेत, त्यांतून त्यांची बालभावनेशीं समरस होणारी सहृदय–वृत्ति प्रकट झाली आहे. 'पाखरांच्या शाळे'त लहान मुलगा आपल्या आईला शाळेची फुशारकी निवेदन करतो, आणि पिंपळावर

'चिमण्यांची पोरे भारी गोंगाट करिती–
पारावर जसा यांचा भरतो बाजार–'

असे गाऱ्हाणे सांगतो आणि 'मास्तरच यांना हवे आमुचे रागीट' असे म्हणतो. या कवितेप्रमाणेच 'भूर जाऊ' 'फुलपाखरू' 'आजोळाकडे' इत्यादी त्यांची बालगीते नाट्यगुणांमुळे आकर्षक झाली आहेत. मात्र 'भिकाऱ्याचा पोर,' 'डोंबाऱ्याचा खेळ,' या कवितांची गोडी प्रौढ रसिकांनाच अधिक समजू शकेल असे वाटते.

याच संदर्भात 'आशागीतां'तील—'शिवराज आणि बालवीर' हे नाट्यगीत, आणि 'खेड्यातील आनंद' 'खेड्यातील घराकडे' या कवितांचा निर्देश करणे अनुचित होणार नाही असे वाटते.

## 'बालगीतांतील भयानक वातावरण.

भयानक वातावरणाचे कुतूहल बालमनाला नेहमीच वाटत असते. या दृष्टीने विंदा करंदीकरांची 'बागुलबोवा' ही कविता उल्लेखनीय वाटते. विशेषतः आंब्यावर बसलेल्या बागुलबुवाच्या डोक्यावर पिकलेल्या शेंडीला, तागाच्या तकतकत्या पेंढीची दिलेली उपमा, गरगर फिरणाऱ्या हिरव्या डोळ्यांचे गारेच्या चकमकत्या गोळ्याशी कल्पिलेले साम्य,

'आणिक खाली नाक फदाडे
पडक्या भिंतीतिल कोनाडे

जीभ फिरे दांतातुन पाही
सुसर जशी खडकातुन येई '

हे शब्दचित्र जितके कल्पनाप्रचुर, तितकेच वास्तवदर्शी झाले आहे. 'माझे घड्याळ' 'पंतोजी' 'बेडकांचे गाणे' 'जादूगार' 'पतंग' इत्यादि त्यांनी लिहिलेल्या 'बालगीतां'तील नाट्यप्रसंग अभिनयास वाव देणारे आहेत. शिवाय त्यांतून बालमनाच्या निरागस भावना प्रगट झाल्या आहेत.

## बालगीतांतील नवे प्रयोग

गेल्या दहाबारा वर्षांत बालमनोविकासाकडे शिक्षणतज्ञांचे लक्ष विशेष गेलेले दिसते. बालकांच्या शारीरिक आणि मानसिक विकासाचा हेतु लक्षात घेऊन शिक्षण-क्षेत्रात नवे नवे प्रयोग सुरू झाले आहेत. बालबालिकांच्या जिज्ञासेला भरपूर वाव मिळावा म्हणून क्रीडा, नाट्याभिनय, हस्तव्यवसाय, चित्रलेखन, बांधकाम रचना-कौशल्य, इत्यादि अनेक प्रकार अस्तित्वात आले आहेत. वाङ्मयक्षेत्रांतही बालबालिकांच्या भावनांचा यथायोग्य आदर राखला जात आहे, याचे प्रत्यंतर गेल्या दशकात प्रथितयश व नवोदित अशा कवींचे आणि महाराष्ट्रराज्यबालसाहित्यरचनालयातर्फे जे बालगीतांचे संग्रह प्रसिद्ध झाले, त्यांवरून येत आहे. यापूर्वी काही कवींचा उल्लेख केला आहेच. याशिवाय भा. गो. जोशी, अनिरुद्ध पुनर्वसु, राजा मंगळवेढेकर, ना. गो. शुक्ल, सदानंद रेगे, इत्यादी कवी आणि संजीवनी मराठे, सरलाताई देवधर, तारा वैशंपायन, लीलावती भागवत प्रमिला बेडेकर इत्यादी अनेक कवयित्री ह्यांनी बालवृत्तीशी समरस होऊन बालांना आकलन होईल, अशा बालभाषेत अनेक मधुर बालगीते रचिली आहेत. या गीतांतून बालभावनेच्या निरनिराळ्या छटा त्यानी चित्रित केल्या आहेत.

वरील कवि–कवियित्रींपैकी काहीनी स्वतंत्र बालगीतांचे संग्रहही प्रसिद्ध केले आहेत. त्यातील कांही 'बालगीते' वैशिष्ट्यपूर्ण आहेत. त्यांचा उल्लेख पुढे करीत आहे.

राजा मंगळवेढेकर यांच्या 'बालगीतां'तून बालकांना रंजविणारी कल्पनेची चमत्कृति प्रगट होते.

'म्हणे एका गांवात– आहे पेढ्यांचा डोंगर
मुले चढतात त्याच्यावर– येते जेव्हा लहर '

प्रत्यक्षात नाही, तरी कल्पनेतल्या पेढ्यांच्या डोंगरावर चढताना, बालकांना मोठाच आनंद होत असेल यात शंका नाही. याच संदर्भात त्यांची 'एके दिवशी', 'ढगमामा', 'किती किती मजा', 'प्रश्न' इत्यादी बालगीते त्यांतील यथोचित बालसुलभ भावना आणि कल्पना यांमुळे आकर्षक झाली आहेत.

याच संदर्भात ‘ कोण काय करते ’, ‘ चांदोबा चांदोबा ’ ( सदानंद रेगे ), ‘ मला नाही आवडत ’, ( या गीतातील मुलाला नापास होणे आवडत नाही ! ) ‘ बाबाची मावशी ’ ( अनिरुद्ध पुनर्वसु ), ‘ कुठ जाते ताई ’, ‘ जाऊ दे राणी ’ ( ना. गो शुक्ल ), ‘ रोजचे गाणे ’, ‘ एक म्हणा एक ’ ( अशोक ) इत्यादि गीतांचा उल्लेख करणे इष्ट होईल.

## ‘ किशोरगीते ’

भालचंद्र गोपाळ जोशी यांच्या ‘ किशोरगीते ’ या बालगीतसंग्रहांत ‘ पांखरे ’ ‘ घोडा घोडा ’ ‘ सुटी झाली ’ इ. बालगीते बालकांच्या अभिनयास वाव देणारी आहेत. याशिवाय, ‘ झाली सकाळ ’ ‘ आजोबाची चंची ’ ‘ आकाश-नौका ’ इ० गीतांतून परिचित बालभावना कवीने सोप्या शब्दांत चित्रित केल्या आहेत.

एरव्ही गंभीर विषयावर कविता लिहिणारे वि. म. कुलकर्णी हे बालराज्यांत आनंदाने विहार करिताना दिसतात. त्यांनी लिहिलेली ‘ माझी गाडी मजेदार ’ ‘ मी तर घोडा टांग्याचा ’ ‘ झुक्झुक् झुक गाडी आली ’ ही बालगीते जितकी अभिनयाला सुलभ, तितकीच ती बालभावनेची यथार्थ ओळख करून देणारी आहेत. विशेषतः लहान मुले स्वतःच जेव्हा आगगाडी बनून ‘ झुक् झुक् झुक् ’ असा आवाज काढीत चालतात, तेव्हा प्रेक्षकांनाही आपल्या समोरून आगगाडी गेल्याचा भास होतो.

## ‘ गंमत ’

संजीवनी मराठे यांच्या ‘ गंमत ’ या बालगीतसंग्रहातील ‘ घास ’ ‘ घोडा घोडा ’ ‘ ढग आले ’ ‘ माऊबाई ’ ‘ खोटे खोटे’ ‘झुकु झुकु गाडी ’ ‘ आजीबाई इत्यादि बालगीतांचे बाह्यविषय जरी परिचयाचे असले तरी पण बालमनाचे सूक्ष्म निरीक्षण करून त्यांच्या खऱ्या भावना सोप्या शब्दात रंगविण्याची त्यांची हातोटी वरील गीतांतून प्रकट झाली आहे.

लहान मुलामुलींच्या खेळकर प्रवृत्ती लक्षात घेऊन सरलाताई देवधर यांनी अनेक बालगीते रचली आहेत. ‘ खेळ चला खेळू ’, ‘ चिमणीचे घरटे ’, ‘ छोट्या बहिणीचे कौतुक, ’ “ चला चला ! पळ पळा ! , ” “ हा घोडागाडीवाला ” वगैरे कविता काही लहान बालकांचे तर काही प्रौढ बालकांचे मनोरंजन करतील अशाच आहेत. अभिनयाला त्यातून भरपूर वाव आहे. याच संदर्भात अपर्णा देशपांडे यांच्या ‘ गुळ खोबरे ’ या काव्यसंग्रहातील ‘ माझे नाव सांग ’, ‘ बाबा मजला आणून द्या हो ’ इत्यादि गीते उल्लेखनीय आहेत.

लीलावती भागवत यांनी लिहिलेल्या बालगीतांपैकी ‘ नकलाकार ’, ‘ आला

विदुषक आला ’, ‘ अग अग मुली ’ ही गीते त्यांतील मजेदार विनोदी प्रसंगांमुळे लहान बालकांना चांगली आवडतील यात शंका नाही.

तारा वैशंपायन यांनी ‘ माझी मनी आणि इतर कविता ’ हा बालकांसाठी अभिनव–अभिनय–गीतांचा संग्रह प्रसिध्द केला आहे. त्यांतील, ‘ माझं बाळ, ’ ‘ हाक रे होडी, ’ ‘ माझी मनी, ’ ‘ माझा घोडा ’ इत्यादि गीतांतून बालकांच्या नेहमीच्या आवडीचे विषय, आणि त्यांच्या परिचित भावना आल्या आहेत. त्यामुळे बालमनाला पुनःप्रत्ययाचा आनंद मिळेल.

## बालगीतातील ठराविकपणा

या सर्व बालगीतांचा बारकाईने विचार केल्यास असे दिसून येते की, ज्या काही विषयांचे व सौंदर्याचे बालमनाला आकर्षण वाटते, त्याच विषयसौंदर्याची अनेक गीतांतून पुनरावृत्ति झाली आहे. तसेच वरील गीतांतून त्याच त्या बालभावना व बालकल्पना पुनः पुनः प्रगट झाल्या आहेत. व्यक्तिगत भाषेच्या भिन्नतेमुळेच, त्यांच्यात निराळेपणा दिसून येतो, हे मात्र खरे.

काही ठराविक सांकेतिक विषय आणि त्यावरील कविता यांचा पुढे नामनिर्देश करीत आहे त्यावरून वरील गोष्ट ध्यानात येईल असे वाटते.

(१) लहान मुलामुलींना आपण आईवडिलांसारखे, मोठ्या माणसासारखे व्हावेसे वाटते, व त्यांच्या बोलण्या चालण्याचे वा व्यवसायाचे ती अनुकरण करतात. हा एकच विषय अनेक कवींच्या स्फूर्तीला कारणीभूत झाला आहे. उदा०

‘ आई परि मज गमे करावा चहा शेगडी पेटवुन ’

‘ दूर बैस बघु म्हणुनी घेती आगपेटिहि हिसकून ’ (उगि म्हणजे कसा राहू), ‘ कधि मोटा होणार ’–मायदेव, ‘ हे बघ ताई’ (संजीवनी मराठे) ‘मोटर एक घेईन पों पो करीत मिरवीन–गांवभर साऱ्या हिंडेन लवकर मोठा होईन ’ ( ना. गो. शुक्ल ) ‘ नको कुणाची कटकट ’ ( भा. गो. जोशी ) ‘ मी मास्तर होणार ’ ( अनिरुद्ध पुनर्वसु )

(२) खेळाविषयी आवड हा बालगीतांचा दुसरा एक प्रमुख विषय होय. अशा बालगीतांतून अभिनयाला भरपूर वाव असतो. एंजिनवाला ( ना. के. बेहरे ) ‘ झुक-झुक गाडी ’ ‘ नाचूं गाऊं ’ ( संजीवनी मराठे ) ‘ लग्नाला चला ’ ( ना. गो. शुक्ल ) ‘ नाटकाला या हो या ’ ( अनिरुद्ध पुनर्वसु ) ‘ एके दिवशीं ’ ( राजा मंगळवेढेकर ) ‘ या रे सारे ’ ( संजीवनी मराठे ) ‘पिंगा’ ( पुष्पलता रानडे ) ‘ बंबवाला चालला ’ ( लीलावती भागवत ) इत्यादि गीते अशा वर्गात मोडतात.

(३) या शिवाय, पशुपक्षांचे आकर्षण बालमनाला किती असते हे सांगावयास नकोच. या विषयांवरील अनेक गीते बालराज्यात लोकप्रिय झाली आहेत. पाखरांची शाळा ( पाटील ) ‘ हम्मा ’ ‘काऊचिऊ’ ‘ मनी ’ (भ. श्री. पंडित ) मासा ( राजा मंगळवेढेकर ) ‘वाघाची मावशी’ (अनिरुद्ध पुनर्वसु) ‘माझा कोंबडा’ (ना. गो. शुक्ल)

'उंदीर', 'सरडा', 'कावळा'...(सदानंद रेगे) 'ससू नाना' (संजीवनी मराठे) 'खार' (गोपीनाथ). 'अंगाई गीते' आणि लहानग्यांना 'घास' भरवण्याची गीत अशी अनेक प्रचलित प्रकारावर आधुनिक कवींनी बालगीते लिहिली आहेत.

## 'नमुनेदार बालगीते'

बालगीतांचे तेच ते ठराविक नमुने, आणि सांकेतिक प्रकार वगळल्यास वरील संग्रहातील कित्येक बालगीते ( जीत आत्मपरतेचा भाग अधिक आहे अशी ) बाल-मनाला आनंद देणारी आहेत. उदाहरणार्थ– बालगीतांचे पुढील नमुने पाहा :– 'भूर जाऊ', 'फुलपाखरा' 'आजोळाकडे' ( ग. ह. पाटील ) 'घास', 'अंगाई', 'जागा राजस बाळ' इ. ( संजीवनी मराठे ) 'घोडा चाललाय,' 'खारू खारू वाई,' 'झुक झुक,' 'अग अग मुली, 'भावले भावले' इ ( लीलावती भागवत ) 'हा घोडा गाडीवाला,' 'खेळ चला खेळू इ. (सरलाताई देवधर) 'कुठे निघाला' (शैला राजे) 'माझी मनी', 'चंद्राची कोर', (तारा वैशंपायन) 'ढगमामा' 'एके दिवशी' ( राजा मंगळवेढेकर, ) 'कुई कुई' ( ना. गो. शुक्ल ) 'चांदोबा चांदोबा' ( सदानंद रेगे ) इ.

लहान मुलांना मोठ्या माणसांचे अनुकरण करण्याची बुद्धि होते. मात्र अशा वेळी बालकांच्या हातून विनोदी गोष्टी घडतात, त्यातून थोरांचा उपहास न व्हावा अशी सावधगिरी विनोदगर्भ बालगीते रचणाऱ्या कवींनी बाळगणे इष्ट होईल.

## सुप्रसिध्द कवींची बालगीते.

आधुनिक कवींपैकी बहुतेक सुप्रसिद्ध कवींनी बालगीते लिहिली आहेत. त्यांच्या इतर कार्यांच्या प्रकाशात त्यांची ही कामगिरी दृष्टिआड झालेली दिसते. त्यातील काही कवींच्या बालगीतांचा येथे उल्लेख केल्यास उचित होईल असे वाटते. ही बालगीते बहुधा बालकांना उद्देशून लिहिलेली आहेत. मात्र बालमनाच्या कोणत्या ना कोणत्या तरी छटा त्यात चित्रित केलेल्या आढळतात. बालकांविषयीच्यां कौतुकाचा भागही त्यातून आढळतो. उदाहरणार्थ 'अंगाई' (माधव ज्यूलियन), 'शिपाईदादा' ( अनंततनय ), 'गालबोट' ( वि. भि. कोलते ), 'मोथी होल्यावल', 'कौतुक' ( र. द. सरंजामे ), 'माल नको ग' ( यशवंत ), 'आजीचे घड्याळ' ( प्र. के. अत्रे ), 'चंद्रलेखेचा पाळणा' ( गिरीश ), 'जादुगार,' 'माझे घड्याळ' ( विंदा करंदीकर ) 'हसऱ्या बालकास', ( पद्माविहारी ) 'माझ्या घरट्यात' ( सूर्यकांत खांडेकर ), इ. इ० याशिवायही अनेक कवितांचा उल्लेख करिता येईल पण नमुन्यादाखल कांही कवितांचाच येथे निर्देश केला आहे.

## सारांश

बालगीतांचे आकर्षण जितके त्यांच्या यथोचित बालभावनेत तितकेच ते त्यात

प्रगट झालेल्या निरागस बालमनोवृत्तीतही असते; बालगीतातून शब्दगत नादमधुरतेला महत्व असते हे खरे, तरीपण अर्थाच्या सुबोधतेला बाध न येईल, अशी दक्षता घेणे आवश्यक ठरते. बालमनातील भावना किती संमिश्र स्वरूपाची असते, याचे विवेचन आरंभी केलेच आहे. म्हणूनच तिच्याशी समरस होणे, ही एक अवघड कला आहे. शिवाय अनेक बालगीते ही नाट्यगीतांच्याच स्वरूपाची असतात. त्यांतून आत्मपरता आणि वस्तुपरता यांचा सुंदर संगम झालेला दिसतो. बालमनाला स्वैर कल्पनाशक्तीचेही देणे लाभलेले असते, तिला कशी योग्य चालना देता येईल, हे एकीकडे लक्षात घ्यावयाचे, पण तिला असत्य वा अत्यद्भुत वातावरणात न नेता वास्तवतेच्या मोहक प्रांतात नेऊन सोडावयाचे, असे दुहेरी कौशल्य बालगीतकाराला दाखवावे लागते. आजवर बालाच्या अंतर्मनाची जेवढी ओळख झाली आहे तेवढी थोडीच, परंतु जी व्हावयाची आहे तीच पुष्कळ आहे, हे ध्यानात घेतल्यास मराठीतील बालगीतांना केवढा उज्वल भविष्यकाल आहे याची कल्पना येईल.

☆ ☆ ☆

## प्रकरण ७ वे

# विनोद–उपहास–विडंबन

### प्राचीन मराठी वाङमयातील विनोद

महाराष्ट्रातील माणूस जीवनाकडे गंभीर दृष्टीने पाहतो, आणि त्याच्या सर्व कृत्यांच्या मुळाशी एक व्यावहारिक दृष्टी असते, हा त्याचा स्वभाव त्याच्या वाङ्मयातही दृष्टीस पडतो, अशी एक विचारसरणी प्रचलित आहे. प्राचीन संतकवींच्या पारमार्थिक दृष्टीत गांभीर्य दिसून येणे, हे साहजिकच होते· असे जरी असले तरी विनोदी प्रवृत्तीचा अंतर्भाव साहजिक प्रवृत्तीतच होत असल्याने प्राचीन मराठी वाङ्मयातही हास्य–रसाची निर्मिती झाली होती यात शंका नाही. 'शिशुपालवधा'त नारदाच्या कलहप्रियतेचे भास्करभट्टाने केलेले विनोदी चित्रण, लीलाचरित्रातील माहिमभट्टाने वर्णिलेले काही विनोदी प्रसंग, एकनाथाने भारुडातून तत्कालीन रीतिरिवाजांचा उपहासात्मक केलेला आविष्कार, मुक्तेश्वराने दुर्वासाच्या कोपाचे किंवा भोजनसमारंभात द्रौपदीच्या उडणाऱ्या तारांबळीचे केलेले वर्णन, तुकारामाने पंढरपुराला निघालेल्या स्त्रीच्या संसाराच्या लोभाचे केलेले विनोदपूर्ण चित्रण, शाहिरी वाङ्मयातील काही विनोदपूर्ण 'सवाल जबाब', ही स्थले जितकी नाट्यपूर्ण तितकीच विनोदपूर्ण आहेत. राधाकृष्णाच्या चरित्रातील काही विनोदी प्रसंगही पंडितकवींनी विनोदपूर्ण शब्दात रंगविले आहेत. शृंगाररसाला विनोदी वर्णनाची जोडही त्यांनी दिली आहे. श्रीकृष्णाच्या बालक्रीडा लक्षात घेतल्या तरी त्याच्या विनोदी वृत्तीचे आपणाला दर्शन होतेच. विनोदाला उथळ माथ्याने जरी त्या काळी समाजात वावरता आले नाही, तरी तत्कालीन अनेक लोकगीतांतून, स्त्रीसमाजात प्रचलित असलेल्या ओव्यांमधून गोंधळ्यानी केलेल्या ललितांतून व भारुडांतून, तमासगिरांच्या फडांमधून श्रेष्ठ कनिष्ठ दर्जाचा विनोद, समाजाच्या सर्व थरांतून वाहत असलेला दृष्टोत्पत्तीस येतो यात शंका नाही.

अव्वल इंग्रजी अमलामध्ये मराठी वाङ्मयात नवीन नवीन प्रवाह आले त्यांत विनोदाला बरेच स्थान आहे. विष्णुदास भावे व किर्लोस्कर या नाटककारांनी अनुक्रमे 'दशावतारा'दी प्रकरणांतून व 'सौभद्रा'दी नाटकांतून विशिष्ट दर्जाचे विनोदी वातावरण निर्माण केले. विशेषतः संस्कृत नाटकांतील विदूषकाला नव्या स्वरूपात उभा करून त्यांनी विनोदाची निर्मिती केली. विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी 'निबंधमाले'त 'विनोद व महदाख्यायिका' हे सदर स्वतंत्रणे सुरू केले. निबंधमालेच्या लोकप्रियतेची अनेक कारणे असली तरी चिपळूणकरांच्या उपहासात्मक खुसखुशीत विनोदी लेखणीची धार हे त्यातील एक महत्त्वाचे कारण होय.

## संस्कृतातील 'अन्योक्ति' 'व्याजोक्ति'

'अन्योक्ती' 'व्याजोक्ती', 'उपहास' ज्यात गर्भित आहेत अशा संस्कृत सुभाषितांच्या पद्धतीवर मराठीत आरंभी कृष्णशास्त्री चिपळूणकरांनी काव्यरचना केलेली आढळते. त्यांनी लिहिलेल्या अन्योक्तीमधून बोध दिसतो, त्याला कोठे कोठे विनोदाची चौकट लाभली आहे. 'वृक्षान्योक्ती', 'चंदनान्योक्ती', 'वटान्योक्ती,' 'हंसान्योक्ती', 'भ्रमरान्योक्ती' वगैरे अन्योक्तीतून मानवी स्वभावातील विसंगती मार्मिक शब्दांत प्रगट केलेली आढळते. बहुशः शब्द, प्रसंग अगर स्वभाव यांतील विसंगतीवर विनोदाची उभारणी होते अन्योक्तीतील विनोद बहुधा प्रसंगनिष्ठ असतो. 'सिंहान्योक्ती'तील पुढील वर्णन पाहा.

'कृतीची आयाळे जडवुनि गळा पुष्ट करुनी
बसे श्वा सिंहाच्या पदि बहुत आवेश धरुनी
तरी जो ऐकोनी भिउनि पळती मत्तहि करी
कसा त्या नादाते क्षणभरहि तो पामर करी!'

संस्कृतातील महाकाव्यांतून आणि नाटकांतून हास्यरसाला महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले होते. इंग्रजी अमलाच्या सुरुवातीस मराठीत जी संस्कृतातील काव्यनाटकांची, रूपांतरे व भाषांतरे झाली त्यांतून विनोदाला प्रामुख्याने वाव मिळाला. याच सुमारास इंग्रजी काव्यवाङ्मयाचा अभ्यास मराठीतील आरंभीच्या कवींनी केला. अशा परिस्थितीत ज्यानी विनोदप्रचुर काव्ये रचिली, त्यांत गंगाधर रामचंद्र मोगरे (१८५८-१९२६) यांचा प्रामुख्याने उल्लेख करणे आवश्यक आहे.

## 'पदवीचा पाडवा' आणि इतर उपहासात्मक काव्ये :

समाजातील काही शिष्ट लोकांच्या ढोंगी वागणुकींचा उपहास करण्याच्या हेतूने मोगरे यांनी 'पदवीचा पाडवा' हे विनोदी प्रकरण लिहिले आहे. गुंडोबा पाध्ये, नरसोपंत घमंडे आणि बंडोपंत वकील या त्रिकुटाने भोलानाथ सुखात्मे याला सरकाराकडून प्रतिवर्षी दिल्या जाणाऱ्या पदवीच्या नादाला कसे लाविले, याचे एक

विनोदप्रचुर मनोरंजक वर्णन वरील काव्यात आले आहे. ‘मान’ आणि ‘पदवी’ यां करिता हपापलेल्या व अनायासे लाभलेल्या संपत्तीची धुळधाण करणाऱ्या खुळचट श्रीमंत लोकांचा भोलानाथ सुखात्मे हा एक प्रतिनिधी आहे. आपले नाव काय ते गॅझेटात यावयाचे राहिले आहे, एरव्ही आपल्याला ‘रावबहाद्र’ ही पदवी सरकारने दिलीच आहे, अशी या भोळ्या रावबहादुराची समजूत असते. आपल्या इतमामाला साजेसा समारंभ घडवून आणण्यासाठी त्याची जी धडपड चाललेली असते ती मोठी हास्यकारक असते उदा० सुखात्मे यांनी खुशालशेटाकडून समारंभाकरिता मिळविलेला दिवाणखाना, पालजीला खाना तयार ठेवण्याबद्दल त्यानी दिलेल्या सूचना, गुंडपाठका-कडून छापवून आणलेल्या निमंत्रणपत्रिका, घमंड्याकडून लगेच वर्तमानपत्रात छापवून आणावयाचा रिपोर्ट, घरी करावयाची सत्य–देवाची पूजा, व त्यासाठी बाळशेटाकडून करवून घेतलेला रुपेरी चौरंग, गणपतराव चौघडेवाल्याची वाजंत्री, इत्यादी सर्व प्रसंगांचे कवीने मोठे विनोदपूर्ण शब्दांत वर्णन केले आहे. अशा परिस्थितीतच सरकारने पदवीदानाचा कार्यक्रम रहित केल्याचे ऐनवेळी गुंडभट त्याला सांगतो, आणि होऊ घातलेल्या रावसाहेबांच्या उत्साहावर पाणी पडते. गुंडोबा व घमंडे यानंतर नवीन योजना पुढे आणतात. सुखात्म्यांना गुंडोबा आपल्या गुंडमंडळातर्फे संस्कृत भाषेत लिहिलेली ‘पदवी’ देण्याचे ठरवितो; उलट गुंडोबा हा निंदक आहे असे भोलानाथाला सांगून घमंडे हा आपल्या मंडळाच्या रिकाम्या झालेल्या ‘अध्यक्षा’च्या जागी त्यांना नेऊन बसविण्याचे ठरवितो. वरील दोघांचे हे उपद्व्याप बंडोपंत वकील दुरुन पाहतात आणि संपत्तीच्या जोरावर हव्या तेवढ्या पदव्या मिळवता येतात असे तो आपल्या मित्रास–भोलानाथास–सांगतो. भोलानाथाचे व्याही सहस्रबुध्दे यांच्या पुढील गंभीर प्रवचनाने काव्याचा शेवट होतो.

> ‘रावबहादुर पदवीवर इतुकी भक्ति आपली बसली,
> सांगा परंतु आपण केली आहे ‘बहादुरी’ कसली ?
> केले सरहद्दीवर जाउनि सर कोणते तुम्ही किल्ले ?––
> म्हणुनी सरकाराने द्यावे खुप होउनी तुम्हां बिल्ले !’

यानंतर ते व्याह्यांना उपदेश करतात—

> ‘साधुनि ‘मनुष्य–पदवी’ घ्या ही आधी अशा उपायांनी
> ‘पदव्या’ इतर तुम्हां मग लोटाव्या बाटतील पायांनी
> कळवा गुंडोबांना हेच घमंड्यास आपल्या कळवा
> खटपट भलती सलती सोडुनि आधी मनुष्यपण मिळवा !’

इंग्रजी राजवटीत साहेब लोकांच्या कच्छपी लागणारे अर्धवट सुशिक्षित लोक, सुधारक व सनातनी यांच्यातील शाब्दिक झटापटी, सामाजिक कार्यांच्या नावाखाली ठिकठिकाणी निर्माण होणारी मंडळी व त्यांचे अध्यक्ष, मंडळांचे सकडतारी (सेक्रेटरी)

युनिव्हर्सिटींची कमिशने, वृत्तपत्रांचे एडिटर्स इ. समयोचित उल्लेखांनी तत्कालीन परिस्थितीचा केलेला मार्मिक उपहास हे या काव्याचे प्रमुख आकर्षण आहे.

## मेथाजीची मजलस

'मेथाजीची मजलस' या प्रकारणात इ. स. १९०७ मध्ये सुरतेला भरलेल्या कॉंग्रेसच्या अधिवेशनाच्या वेळी 'जहाल' व 'मवाळ' या दोन पक्षांत झालेल्या विरोधाचे मार्मिक चित्रण आले आहे. वाच्छा, गोखले–प्रभृती प्रागतिक पुढाऱ्यांची आणि टिळक आणि त्यांचे अनुयायी या जहाल पक्षाच्या पुढाऱ्यांची वरील काव्यात आलेली स्वभावचित्रणे नमुनेदार आहेत. जहाल पक्षातील लोकांचा प्रागतिक पक्षावरील टीकेचा हा नमुना पाहा

'झाली असह्य झाली 'मेथाची' फार त्या अरेरावी
जावे जिथे तिथे तो आम्हा खाली पहावया लावी.
सारथ्य त्यात करतो त्याचे 'गोपाल कृष्ण' मायावी
विजयश्री न कशी मग चालुनि त्याच्याकडे स्वये जावी ?

## 'अभिनव धर्मसंस्थापना'

मोगरे यांनी लिहिलेल्या 'अभिनव धर्मसंस्थापना' या काव्यातही पुण्यांतील प्रतिगामी विचारसरणीच्या लोकांवर प्रच्छन्न उपहासात्मक टीका आली आहे.

'धर्मावनार्थ आपण जाती जातीत माजवूनि कळी
अंतःकलहाग्नीला राज्याचाही दिला न काय बळी ?'

अशी पौढी मिरविणाऱ्या व पुण्यपुरी ही ग्रामण्याचे महापीठ करू पाहणाऱ्या पुणेकरांनी तत्कालीन सुधारकांच्या चळवळींना हाणून पाडण्याचा कसा प्रयत्न केला याचे उपहासात्मक वर्णन वरील काव्यात आले आहे. हेही काव्य ( Satire ) उपहासात्मक काव्यात समाविष्ट करणे इष्ट होईल.

समाजांतील शिष्ट व्यक्तींच्या आचरणातील ढोंग उघड करण्याच्या निर्भेळ हेतूने लिहिलेल्या उपहासात्मक कवितेत मोगरे यांनी लिहिलेल्या 'पदवीचा पाडवा' आणि मेथाजीची मजलस' या कवितांना अग्रस्थान द्यावे लागेल. इंग्रजीत ज्याला 'सटायर' म्हणतात त्या वर्गातील ही काव्ये आहेत. त्यातून समाजातील काही शिष्ट लोकांच्या ढोंगावर, दंभावर, पायघोळपणावर केलेली मर्मभेदक व खरमरीत टीका आढळते. ड्रायडन व पोप यांनी अशा प्रकारची काव्यरचना करून मोठीच प्रतिष्ठा मिळवली. हरिभाऊ आपटे म्हणतात, 'सटायर या इंग्रजी शब्दाच्या अर्थाचे तंतोतंत असे ज्यात निदर्शन होईल असा संस्कृतसाहित्यशास्त्रात पारिभाषिक शब्द नाही. मी त्याच्यासाठी स्वतंत्र शब्द योजतो, तो 'उपहासोक्ती' हा

होय. ज्याला उद्देशून या अलंकाराचा उपयोग केलेला असेल, त्याला त्यापासून दुःख न होता—निदान विशेष दुःख न होता—इतरांप्रमाणेच हसूच येईल, अशा तऱ्हेने त्याचा उपयोग केला तर सहृदयहृदयाला आनंदच होईल.' यावरून उपहासोक्तींत वैयक्तिक सामाजिक दोषांवर प्रच्छन्न टीका येते, आणि सटायर निर्माण होते असे म्हणता येईल. लक्ष्मणशास्त्री लेले यांनी अशा कवितांना 'विडंबनपर कविता' म्हणाव्यात अशी सूचना केली. ते म्हणतात, 'उपहासाला संस्कृतात विडंबन हे मोठे सुंदर नाव आहे. याला मराठीत स्थूलमानाने थट्टा, फजिती, टर अशांसारखी नावे देता येतील. वक्रोक्ती, अतिशयोक्ती, व्याजस्तुती, अन्योक्ती, असंगती, छेकापह्नुती, दृष्टान्त, विरोध, विषम, इत्यादी, अलंकारांचा अवलंब करून विडंबनाचा उत्तम परिपोष करता येतो. विडंबित व्यक्तीला आपला उपहास वाचून गुदगुल्या व्हाव्या व आपले दोष पटून ते सुधारण्याची इच्छा व्हावी तसेच वाचकांच्या मनात त्या व्यक्तीविषयी तिरस्कार न वाटता अनुकंपा उत्पन्न व्हावी म्हणजे त्या विडंबनाचा किंवा उपहासाचा परम उत्कर्ष झाला असे खचित म्हणावे.'

उपाहासोक्ति ( सटायर ) हा काव्यप्रकार, विशेषतः इंग्रजी काव्यवाङ्मयाच्या अनुकरणाने मराठी काव्यात आला आहे. समाजसुधारणेच्या मार्गातील ढोंगाचे काटे दूर करण्याकरिताच इंग्रजी वाङ्मयात 'उपहासोक्तीचे ( Salire ) साधन लेखककवींनी वापरले. शासन आणि सुधारणा हेच दोन प्रमुख हेतु त्याच्या मुळाशी असतात. या दृष्टीने मोगरे कवींच्या 'पदवीचा पाडवा' आणि 'मेथाजीची मजलस' यांना उपहासगर्भ टीकात्मक कविताच मानणे इष्ट होईल. त्यांना विडंबनपर कविता न म्हणणेच बरे. वरील काव्ये 'इमेजिनेटिव्ह सटायर्स,' (कल्पनागर्भ उपहासोक्तिपर काव्ये ) आहेत ही हरिभाऊ आपटे यांची टीका यथार्थ वाटते. संस्कृतातील वक्रोक्ति व व्याजोक्ति यांनी सूचित केलेला अर्थ 'सटायर' या शब्दाने तितकासा ध्वनित होत नाही. मोगरे यांच्या काव्यात जी उपहासोक्ति आली आहे तिच्या पाठीमागे सामाजिक सुधारणेचा सद्हेतू असल्यामुळे अशी टीका सर्वांनाच सुसह्य होते.

## उपहासोक्ति ( सटायर ) व विडंबन (पॅरडी) यांतील भेद

'विडंबनात्मक कविता' व 'उपहासात्मक कविता' यांमध्ये पुढे टीकाकारांनी भेद केला, आणि या दोन्ही विनोदी लेखन–प्रकारांची चर्चा अनेक लेखकांनी आपापल्या दृष्टिकोनातून स्वतंत्रपणे केली. इंग्रजीतील Parody या शब्दाला समानार्थक 'विडंबन' व Satire या शब्दाला समानार्थक 'उपहासोक्ती' वा 'उपहासात्मक टीका' असे शब्दप्रयोग केल्यास त्यांतील भेद लक्षात येईल. विनोद हा दोन्ही प्रकारांत गर्भित असतोच.

## विनोद

शुद्ध विनोदाची उभारणी लहानमोठ्या वस्तूंच्या साहचर्यात दिसून येणाऱ्या चमत्कृतिजनक विसंगतीवर घडून येते. शाब्दिक कोट्या, विशिष्ट प्रसंगाच्या सभोवतालचे हास्यकारक वातावरण, स्वतःला दिसून न येणाऱ्या पण इतरांना दिसणाऱ्या अशा व्यक्तींच्या स्वभावातील विसंगत छटा, यांच्यामुळे विनोद निर्माण होतो. शुद्ध स्वरूपाच्या विनोदात इतरांचा उपहास करण्याचा किंवा इतरांना वेडावण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. अशा प्रकारे विनोद, उपहास, आणि विडंबन यांमध्ये फरक करता येईल. ' विनोद ' या स्थूलनामकरणाने आपण वरील सर्व प्रकारांना संबोधितो हे खरे; तथापि त्यांतील सूक्ष्म भेद लक्षात घेतलेले बरे. प्राचीन मराठी काव्यवाङ्मयात पहिल्या प्रकाराची काही विनोदाची उदाहरणे आढळतात. परंतु ' सटायर ' आणि ' विडंबन ' या विनोदी काव्यप्रकारांचा विकास अलीकडच्या काळात– या लोकशाहीच्या युगातच—अधिक झाला आहे. राजकारणाच्या आखाड्यात उतरणारे पक्षोपपक्ष, पुढाऱ्यांच्या मतप्रचाराची भाषणे, बहुजन समाजातील चळवळी यांना अलीकडच्या काळात विशेष अवसर मिळाला आहे. त्यामुळे उपहासोक्ती (Satire) आणि विडंबन (Parody) यांचा कौशल्याने वापर करण्याची संधी, अनेकांना प्राप्त झाली आहे.

## गोविंदाग्रजांची उपहासप्रधान कविता.

समाज–सुधारकांच्या ढोंगी वर्तनाचा उपहास ' एक समस्या ' या कवितेत गडकऱ्यांनी खुसखुशीत शब्दांत केला आहे. ' वृध्दा विधवा ' समोर आल्यास अपशकुन मानणारा, परंतु सुंदर ' तरुण विधवा ' स्त्री दृष्टीस पडताच अश्रू ढाळणारा आणि

' धिक् धर्माला धिक् रूढीला तेहतिस कोटी देवांना '

असे म्हणणारा सुधारक, याच्या वर्तनांतील विसंगती कवीने मर्मभेदक शब्दांत उघड केली आहे. ' अडाणी कुणबी ' किंवा ' डोक्यावर पाटी वाहून नेणारा हरिजन ' यांच्याविषयी कोरडी सहानभूती बाळगणाऱ्या केवळ तत्कालीन बोलक्या सुधारकांवरील ही प्रच्छन्न उपहासात्मक टीका आली आहे.

## मागणी तसा पुरवठा

मागणी तसा पुरवठा करणारा, आणि संपादकाच्या आग्रहावरून केवळ जे पाहिले त्याच्यावर कविता खरडणारा कवी ' हुकमे हुकूम ' या कवितेत उपहासाचा विषय झाला आहे. ' वसंत ऋतु ' ' रम्यवन ' आणि ' पक्षी ' यांशिवाय काव्यनिर्मितीस अधिक काय पाहिजे ? असा खोचक प्रश्न कवीने तीत विचारला आहे. काव्यासंबंधीच्या खुळचट समजुतीवर ही उपहासात्मक टीका आहे. याच संदर्भात

'काही इंग्रजी कविता वाचून' या कवितेत मराठीतील तत्कालीन काही कवींच्या भोळसर गर्वोक्तीची थट्टा कवीने केली आहे. 'कवीच्या कारखान्यात' गडकऱ्यांनी कवींचा केलेला मार्मिक उपहास लक्षात घेतल्यास वरील कवितेत विशेष नावीन्य वाटणार नाही.

## 'विहिणींचा किलकिलाट'

'विहिर्णीचा किलकिलाट' व 'काय करावे' या गडकऱ्यांनी लिहिलेल्या प्रसंगनिष्ठ विनोदीकविता वैशिष्ट्यपूर्ण आहेत. 'विहिणींच्या कलकलाटा'ला ज्या रणवाद्यांच्या दणदणाटाची, हत्याराच्या खणखणाटाची, प्रलयमेघाच्या गडगडाटाची, दारू पिणाऱ्याच्या बरळण्याची, आणि शाळा सुटण्याच्या वेळच्या मुलांच्या ओरडण्याची, उपमा दिली आहे त्यातून केवळ ध्वन्यनुकारी शब्दामुळेच विनोद निर्माण झाला आहे, हे खरें, तथापि लग्नसमारंभात विहिणींच्या गडबड्या स्वभावाचे स्वरूप डोळ्यांसमोर उभे करण्याचे सामर्थ्य या कवितेत दिसून येते.

## 'चिंतातुर जंतु'

'चिन्तातुर जन्तु' या कवितेत जीवनाच्या प्रत्येक अंगाकडे संशयात्मक व प्रश्नात्मक बुद्धीने पाहाणाऱ्या व प्रत्येक गोष्टीची किंमत रुपये, आणे, पै यांमध्ये मोजणाऱ्या फाजील चिकित्सक वृत्तीच्या माणसाचा उपहास केला आहे.

> 'ही जीवांची इतकी गरदी जगांत आहे का रास्त
> भरती मूर्खांचीच होत ना ?....'

या त्याच्या प्रश्नाला कोणीही झाले तरी असेच उत्तर देईल कीं, 'एक तूच होसी जास्त'. या कवितेत स्वभावनिष्ठ–विनोद आला आहे. 'रांगोळी घातलेली पाहून' या केशवसुतांच्या उदात्त आशयाच्या कवितेला गडकऱ्यांनी विनोदी वळण दिले आहे

> 'ज्या आमंत्रण या घरा मुळि नसे ऐशा स्त्रियालागुनी ।
> त्या चिन्हांतुनि हा विशेष निघतो आहे गमे मन्मनी ।
> 'या या आज असे सुरेख हळदीकुंकू, पहा या स्थली ।
> बत्तासे बहु खोबरे हरभरे खैरात ही चालली ।'

## व्यंगे उघड करणारी काव्यरीति

सामाजिक क्षेत्रात दिसून येणाऱ्या 'मानवी ढोंगा'चा मर्मभेदक उपहास गडकऱ्यांनी 'स्मशानातील गाणे' आणि 'घुबडाचे गाणे' या कवितांतून केला आहे. व्यंगे झाकण्यापेक्षा व्यंगे उघड करणारी गडकऱ्यांची ही उपहासात्मक काव्यरीती, पुढे अनेक कवींना अनुकरणीय वाटली; मर्ढेकरप्रभृती नवकवींच्या उपहासात्मक काव्यात तिची परिणती झाली आहे असे वाटते.

गोविंदाग्रजांच्या काही विनोद–प्रधान कवितांतून सामाजिक व्यंगावर उपहासात्मक टीका आली आहे. त्यांनी विडंबनपर कविता लिहिल्या नाहीत, मात्र ज्यावर विडंबनपर कविता लिहिता येतील, अशा वैशिष्ट्यपूर्ण कविता रचल्या, असे म्हणता येईल.

## प्र. के. अत्रे यांची 'झेंडूची फुले'

धार्मिक राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात जेव्हा काही प्रतिभाशाली व्यक्ती नवेनवे प्रयोग करतात, तेव्हा त्या प्रयोगांचे सहजासहजी कोणी स्वागत करीत नाही. सामाजिक क्षेत्रात व्यक्ती आणि संस्था यांच्या हातून होणाऱ्या हास्यास्पद गोष्टी विडंबनाचा विषय होतात. वाङ्मयक्षेत्रातही असे प्रकार घडतात. एकेकाळी 'कवी' हा इंग्रजी व मराठी वाङ्मयात उपहासात्मक टीकेचा विषय झाला होता. बर्नार्ड शॉने 'कँडिडा' ह्या नाटकात कवीचे पात्र निर्माण केल्यापासून अनेकांनी त्याला वेठीस धरले. मराठी वाङ्मयात 'कवी आणि त्याचे कार्य' यासंबंधी अनुकूल व प्रतिकूल टीका झाल्या आहेत. जातिवंत प्रतिभाशाली केशवसुतादी कवींनी केलेल्या काव्यप्रयोगांचे रसिकांनी स्वागतच केले; परंतु ज्यांना केशवसुतांच्या नव्या मार्गावर वाटचाल करणे जमले नाही, अंधानुकरण व उसनवारी, यामुळे जे हास्यास्पद ठरले, अशा कवींची थट्टा करण्यात अत्रे आणि इतर कवींनी पुढाकार घेतला.

केशवसुतानंतर रविकिरणमंडळातील कवींनी काव्याच्या अंतर्बाह्य स्वरूपात जे बदल घडवून आणिले, त्यात काव्यरचनापद्धतीचे प्रयोग विशेष लक्षणीय ठरले. माधव ज्यूलियन यांनी फारशी भाषेतील गज्जलांचा प्रकार मराठीत रूढ केला. विविध जातिरचनांचा अवलंब करून त्यांनी गेयानुकूल भावगीते रचिली. अशा कवितांतून आरंभी त्यांनी फारशी भाषेतील शब्दांचा सढळपणाने वापर केला. या गोष्टींचा परिणाम त्यांच्या प्रभावळीतील आणि इतर कवींच्या काव्यावर झालाच. काव्याच्या बाह्यांगामध्ये घडून येणारे हे बदल, तत्कालीन काही रसिकांना हास्यास्पद वाटले. अर्थात माधवरावांच्या काव्यातील विशिष्ट लक्षणांचे व तऱ्हांचे पुढे एवढे अनुकरण होऊ लागले की, त्यांतील हात्यकारकता पुढे नष्ट झाली. 'उन्हाळे, पावसाळे अन् हिवाळे लोटले भगवन्' 'किति मैल अंतर राहिले अपुल्यात मोहन–मंजरी' 'ही तत्त्वनिष्ठा आम्हांस बक्कर्–अल्हाम्दु लिल्लाह !'.......! ही भावनाविष्काराची पद्धती तत्कालीन रसिकांना हास्यास्पद वाटली.

याशिवाय, काव्याकरिता सामान्य विषयांची निवड करताना, व त्यातून आपल्या स्वैर भावना मोकळ्या करताना, औचित्य न राखणे, आपल्या कलेविषयी आत्यंतिक अभिमान बाळगणे, व गट करून राहणे, इत्यादी प्रकार तत्कालीन रसि-

काच्या उपहासाचे विषय बनले. प्र. के. अत्रे यांच्या ‘झेंडूच्या फुलां’ची निर्मिती, वरील प्रकारच्या वाङ्मयीन वातावरणात घडून आली, यात आश्चर्य नाही.

## विशिष्ट कवींचा उपहास

‘झेंडूच्या फुला’तील अनेक विषयांपैकी, कवींच्या हातून घडणाऱ्या विसंगती हा एक प्रमुख विषय आहे. उदा० घरावर दरोडे घालणाऱ्या चोराला बंदिवास घडतो, परंतु इतरांच्या कल्पनांवर व शब्दमौक्तिकांवर वाचकांना कळू न देता धाड घालणाऱ्या कलावंत कवीला समाजात प्रतिष्ठा प्राप्त होते. वरील घटनेतील हास्यास्पदता ‘कवि आणि चोर’ या काव्यात अत्रे यांनी उघड केली आहे. आपण ईश्वराचे लाडके पुत्र आहोत, आणि आपल्या हातात काही विशेष जादू आहे, ज्याला आपण स्पर्श करू त्याला आपण सुवर्णालंकृत करू, अशा मिडास राजाचा आविर्भाव आणणाऱ्या सामान्य कवींच्या हातून होणाऱ्या खुळचट वागणुकीवरही अत्रे यांनी ‘आम्ही कोण ?’ या कवितेत ज्वलज्जहाल उपहासात्मक टीका केलेली आहे. रस्त्यातील पडलेली फुले घेऊन मार्गात दिसलेल्या बालेचे स्वागत करणारा कवी, ‘–स’ला उद्देशून लिहिलेल्या, पण साभार परत आलेल्या कवितेबद्दल संपादकाचे आभार मानणारा कवी, (आपल्या कवितांना त्याने केराची टोपली दाखविली नाही म्हणून!) तसेच स्वतःचा फोटो छापून यावा म्हणून धडपडणारा, काव्याची भरगच्च पोतडी काखेत घेऊन आपल्या कविता रस्त्यातच गाऊन दाखवणारा, प्रेयसीला, कविता वाचून दाखविणारा, आणि कंटाळा आला म्हणून तिने टाकलेल्या वेणीतल्या गजऱ्याचे भूषण मानणारा, श्रेष्ठ कवीच्या निधनानंतर आपणच त्याचे वारसदार म्हणून प्रौढी मिरविणारा, दोनचार सुनीते लिहून झाल्यावर स्वतःस महाकवी म्हणविणारा अशा, कवींच्या ‘खुळचटपणा’वर अत्रे यांनी ‘झेंडूच्या फुला’त अनेक कवितांतून उपहासात्मक टीका केलेली आहे.

## विडंबनपर कविता

मूळ कवीला आपल्या काव्यावरील विडंबनपर कविता वाचून आनंद होईल अशा प्रकारची जी विडंबनपर गीते अत्रे यांनी लिहिली आहेत त्यांत ‘पाहुणे’, ‘परिटा येशिल कधि परतून’, ‘श्यामलेस’, ‘कादरखाँ’, ही गीते महत्त्वाची आहेत. केशवसुतांच्या ‘दवाचे थेंब’ या कवितेतील मध्यवर्ती कल्पनेला ‘पाहुणे’ या कवितेत चमत्कृतिजनक कलाटणी दिली आहे. ‘सकाळी दिसणारे दवाचे थेंब संध्याकाळी कोठे गेले ?’ असे उत्सुकलेला बाळ आपल्या आईला विचारतो, आणि तिला आपल्या गतबालकांची आठवण होते. या हृदयस्पर्शी प्रसंगाचा उपयोग ‘पाहुणे’ या कवितेत निराळ्याच रीतीने केला आहे. सकाळपासून ज्यांनी आपल्या

घरात ठाण मांडले आहे, ते ‘ पाहुणे ’ केव्हा जातील, या मुलाच्या प्रश्नाला आई उत्तर देते.

‘ जोवरी भीड आम्हांते, जोवरी लाज ना यांते
तोवरी असा बाजार सारखा इथे टिकणार ! ’

रे. टिळकांच्या ‘ पाखरा येशिल का परतून ’ या कवितेच्या रचनेतील विशिष्ट लकबींचा असा काही गोड विपर्यास ‘ परिटा येशिल कधि परतून ’ या कवितेत अत्रे यांनी केला आहे, की मूळ कवितेच्या सौंदर्याला बाध न येता हे विडंबनगीत यशस्वी झाले आहे. ‘ मत्प्रेमाने दिल्या खुणांतुन एक तरी अठवून ! ’ या विचाराला अत्रे यांनी खालील शब्दांत कलाटणी दिली आहे.

‘ कोट रेशमी लग्नामधला मानेवर उसवून ! परिटायेशिल कधि परतून ’

‘ दवाच्या थेंबा ’ पेक्षा वरील कवितेचे विडंबन करणे सुलभ होते. फारशी, संस्कृत व मराठी शब्दांची एकाच ओळीत गल्लत करून चमत्कृतिजनक पद्यपंक्ति रचण्याच्या माधवरावांच्या आरंभीच्या पद्धतीचे, ‘ श्यामले ’स या कवितेत सुरेख विडंबन केले आहे. वरील कवितेतील ‘ तू दोन इंच जरी दुरी–फर्लांग भाससि गे परी ’ ही ओळ वाचताच माधवरावाच्या मूळ कवितेतील

‘ किति मैल अंतर राहिले अपुल्यात मोहनमंजरी ’

या ओळीची आपणास आठवण होते. कवी माधव यांच्या ‘ गोकलखां ’ या कवितेचे कादरखां ’ या कवितेत जे विडंबन आले आहे, त्यात मूळ कवितेची जातिरचना ’, विशेषतः तिचे ‘ ध्रुवपद ’, यांचे जे विडंबनात्मक कवितेत साधर्म्य दिसून येते, त्यामुळे चमत्कृति–जनक आनंद होतो.

‘ हा कोण इथे पडलेला गोकलखा लढनेवाला ’

ह्या ध्रुवपदाचे

‘ हा कोण इथे पडलेला कादरखा काबुलवाला ’

ह्या ध्रुवपदाशी साम्य दिसून येते. रणांगणात वीरोचित शय्येवरती पहुडलेला शूर गोकलखा आणि ज्याचा सहा फूट धिप्पाड देह रस्त्यात आडवा पडला आहे तो कादरखा, ही दोन विरोधी दृश्ये रसिकांपुढे उभी करण्यात, अत्रे यांची विसंगती शोधून काढणारी सूक्ष्म निरीक्षणदृष्टी प्रकट झाली आहे; वरील सर्व मूळ कवितांना विडंबनपर कवितांनी अधिकच लोकप्रिय केले आहे, यात शंका नाही. याच संदर्भात गिरीशांच्या ‘ पाय घसरला तर–’ व गडकऱ्यांच्या ‘ विरामचिन्हे ’ या कवितांची अत्रे यांनी केलेली ‘ विडंबने ’ परिणामकारक झाली आहेत.

## शुद्ध स्वरूपाचे विडंबन

शुद्ध स्वरुपाचे विडंबन हे त्यातल्या त्यात लोकप्रिय कवितेचेच होते, आणि

अशा वेळी विडंबनास विषय झालेल्या कवितेतील मूळ कवीच्या व्यक्तित्वामुळे निर्माण झालेल्या काही शब्दार्थमूलक वा स्वभावजन्य तऱ्हांचा, वा लकबींचा, त्यात असा काही विपर्यास विडंबनकार करतो, की त्यामुळे रसिकांस निर्भेळ व मनापासून हसू येते. मूळ कवीविषयीच्या आदराला त्यामुळे मुळीच धक्का बसत नाही. विडंबन-पर काव्यात कवीची केवळ दोषैकदृष्टी आणि प्रतिपक्षीयाची केवळ टर उडविण्याची रीती, यांनाच प्राधान्य असते असे नाही.

विडंबनपर काव्य हा एक उच्च दर्जाचा काव्यप्रकार आहे. आणि त्यापासून प्राप्त होणाऱ्या आनंदाचे स्वरूप उच्च पातळीवरुन घेतलेल्या एखाद्या काव्याच्या रसास्वादासारखेच उन्नत असते यात शंका नाही. मात्र 'अशा प्रकारांची' श्रेष्ठ दर्जाची विडंबनगीते मराठीत दुर्मिळ आहेत. 'झेंडुची फुले' या काव्यसंग्रहातील 'पाहुणे', 'परिटास', 'कादरखा' यांसारख्या, श्रेष्ठ दर्ज्याच्या, विडंबनपर कवितांचा विचार केलाच आहे. अशा कविता आधुनिक मराठी काव्यवाङ्मयात रसिकप्रिय झाल्या आहेत.

आधुनिक कवींच्या बहुतेक सुप्रसिद्ध कवितांवर विडंबनपर कविता रचिल्या गेल्या आहेत. त्यांतील अनेक कविता अंधानुकरण, उथळपणा आणि ठराविकपणा, या दोषांनी व्यापिलेल्या आहेत. त्यातल्या त्यात पुढील यशस्वी विडंबनपर कवितांचा उल्लेख करीत आहे.

गोविंदाग्रजांच्या 'प्रेम आणि मरण' आणि माधव ज्यूलियन यांच्या 'वेगमेचे विरह गीत' या कवितांना धरून अनंत काणेकर यांनी अनुक्रमे 'प्रेम आणि पतन' आणि 'वेगमेच्या विरहगीताला शिवाजीचे उत्तर' ही विडंबन-गीते लिहिली. 'तेथे चल राणी' आणि 'वृद्ध कवी' या माधव ज्यूलियन यांच्या कवितांवरची अनुक्रमे, 'देणे थकल्यावर' (राजा बढे), आणि 'वृद्ध भटजी' (गिरीश) ही विडंबनगीते प्रसिद्ध आहेत. याशिवाय 'तिने त्याला परि पाहिलेहि नाही' हे अ. ह. जोशी यांनी प्रेमविराच्या हास्यास्पद कृतीवरील काव्याचे केलेले विडंबन आणि 'मातृपदा'वर हे दि. वि. देव यांनी यशवंतांच्या 'मातृपदा'विण या कवितेचे केलेले विडंबन, ही विडंबनगीते लक्षणीय आहेत. अशा प्रकारच्या काही विडंबनपर कविता 'उपहासिनी' व 'गाजराची पुंगी' या पुस्तकांतून संग्रहीत झाल्या आहेत.

## विनोदी कवितेचे भरघोस पीक

"'झेंडूची फुले' प्रसिध्द झाल्यानंतर विडंबन कवितेच्या वेड्या पिकामुळे अस्सल मराठी कविता नेस्तनाबूद होण्याच्या पंथाला लागली' असे प्र. के. अत्रे यांनी म्हटले ते अगदी यथार्थ होते. तथापि केशवकुमारांच्या समकालीन व पुढील

अनेक कवींनी जी लक्षात घेण्याजोगी विनोदप्रधान कविता लिहिली तिची वैशिष्टये थोडक्यात लक्षात घेऊ.

विनोदी कवितेमध्ये उपहास हा क्वचित येतो. आणि उपहासात्मक विनोदी कवितेचेही अनेक प्रकार संभवतात. इंग्रजी टीकाकारांनी त्यातील चार प्रकार महत्त्वाचे मानले आहेत. त्यापैकी Lampoon मध्ये मर्मभेदक टीका Burlesque मध्ये मूळ कृतीचा हास्यास्पद अनुवाद Satire मध्ये व्यंगावरील मनोरंजक टीका, आणि Parody मध्ये मूळकाव्यातील अर्थाचा वा रचनापध्दतीचा चमत्कृतिजनक केलेला विपर्यास आढळतो. किर्लोस्करांच्या सौभद्र नाटकातील ‘ पांडु नृपति जनक जया ’ या पदाचे मंगेशराव तेलंग कृत ‘ खंडु नापित ’, कालिदासाच्या ‘मेघदूत’ या काव्याचे ना. ग. लिमये यांनी केलेले ‘ वल्लवदूत ’, भगवद्‌गीतेचे ज. के. उपाध्ये यांनी केलेले ‘चाल चलाऊ भगवद्‌गीता ’ इत्यादी विडंबनात्मक काव्यांतून मूळ कलाकृतींचा रसिकांना वाटणारा आदर कमी न होईल, हे धोरण विडंबनकर्त्यांनी अवलंबिलेले आहे. मूळच्या काव्यातील अर्थाचा आणि रचनापध्दतीचा एका विशिष्ट पध्दतीने त्यातून विपर्यास केलेला दिसून येतो, अशा कवितांना विडंबनपर कविता म्हणणे इष्ट होईल.

माधवज्यूलियनांच्या ‘ बेगमेच्या विरहगीता ’चे, अनंत काणेकर यांनी केलेले ‘बेगमेच्या विरहगीताला शिवाजीचे उत्तर’, हे विडंबन माधवज्यूलियन यांनी आपल्या काव्यातून जी फारशी भाषेतील शब्दांचा सर्रास उपयोग करण्याची पध्दत चालू ठेवली, तिच्यावर टीका करण्याकरिता लिहिले हे स्पष्ट होय. गडकऱ्यांच्या ‘ प्रेम आणि मरण ’ याचे ‘ प्रेम आणि पतन ’ हे विडंबन, आणि बालकवींच्या ‘ तारकांचे गाणे ’ या गीताचे ‘ लग्नघरातील स्वयंपाकिणीचें गाणे ’ हे विडंबन, हीं व्यक्तींच्या स्वभावदोषावर उभारलेली आहेत.

## ‘ सुधारक ’

‘ कलासृष्टी अगदी अहेतुक असते पण आम्ही तर सुधारक हे काव्य काव्य-सुधारणेच्या दसरामोहिमेसाठीच लिहिले आहे.’ अशी आपली गतिनिष्ठ नवाभिनिवेशी भूमिका कवीने, ‘सुधारक’ या काव्याच्या आरंभीच प्रस्तावनेत प्रगट केली आहे.

कर्मठ यज्ञेश्वरदाणी, सुधारक नेनेबाबू, खाबू गुलाब पै, निर्बुद्ध पीतांबर वाणी, भज्याचा भोक्ता धोण्डू आणि अत्रोलका मधू, यांच्यात सुधारणाविषयी चाललेल्या वादविवादप्रसंगी–दिवाळीतील चैनीच्या वेळी, सर्वांना पसंत पडेल असा एखादा विनोदी पोवाडा म्हणण्याचा आग्रह शाहिराला करण्यात आला. त्याने ‘ अर्धा ख्रिस्ती नाव पाहता । परिहृदयाने हिंदु–मराठा । जन्माने जरि तो चित्पावन । ’ अशा कवीने लिहिलेला ‘ सुधारक ’ हा पोवाडा गाऊन दाखविला. शाहीर पोवाडा गात असताच त्यातील प्रसंगावर विनोदी टीका करण्याचे धोरण बैठकीतल्या मंडळींनी स्वीकारले.

आरंभीच धुतल्या तांदळासारखे शुद्ध असलेले, जुन्या पिढीतील नेमस्तांचे पुढारी ( नेमस्त मद्यपी ! ) रावबहादूर केरो विष्णू ठोसर, यांनी जो 'सुन्दर' विधवेशी पुनर्विवाह केला, त्याविषयी कवीने टोमणा मारला की 'सुन्दर विधवा केली राणी-गाय काढिली पंकातुन वर'-शिवाय पुरुषाला पत्नी ही पाहिजेच, कारण 'पत्नी टाळच जणु अब्रूची.' तत्कालीन सनातन्यांनी विरोध केला, पण निषेधाची बाधा बड्यांना होत नाही! रावबहादूर पुण्याचे रहिवासी आणि पुणे म्हणजे– असावयाचे ऐसेच पुणे–अप्रामाणिक कार्मठ्याचे–अधिष्ठान राष्ट्रिय शाठ्यांचे–दयानन्द हितवादी यांचे–हाल पहा की काही न उणे–' हे शालजोडीतले उद्गार पुणेकरांना किती झोंबले असतील हे लिहिणे नकोच. रावबहादुरीण विमलाबाई या तत्कालीन पतीविषयी अंधभक्ती बाळगणाऱ्या स्त्रियांच्या प्रतिनिधीच वाटतात. 'आज्ञापालन कोडे वाडे-ही पतिनिष्ठा भवसुखदायी.' सवतीसुता सरला आणि स्वतःची मुले–अजित व तरला–यांच्यावर त्यांचे सारखेच प्रेम होते. चाकरनोकरांवरही त्यांचे खरेखुरे प्रेम होते–हे योग्यच. कारण 'अभिजातांचे सारे उदात्तच' असावयाचे. सरला गृहितागमा होती, पण 'छे, शिकल्या तरि पोरी अबला' म्हणूनच पुणे शहरातील विवाहपेठेत सरलेच्या विवाहाचा 'सवदा' ठरला, आणि जुन्या प्रतिष्ठित घराण्यातील रंगराव देशमुखाशी तिचा विवाह झाला. सरलेला रंगरावाची वदफैली वर्तणूक सहन झाली नाही म्हणून तिला कुणी म्हटले–' पुरुष असावयाचेच असे ( शुद्ध जनावरासारखे ) बघ–घ्यावे स्त्रीने परि न मनावर.' अशा प्रकारे सौभाग्याचा कलंक भाळी घेऊन सरला बापाच्या घरी आली. मेजर गोखल्यांशी तिचा पुढे परिचय झाला, पण तिला आपले 'जीवितकोडे' कधी सुटले नाही, आणि अशा दुःखद मनःस्थितीतच तिचा अंत घडून आला. 'सुधारका'तील वासूराजे याच्याशी सरलेची ओळख पुढे वलीबुवाच्या मठात झाली आणि तिनेच त्याला आपली बहीण तरला हिला गणित शिकविण्या-करिता घरी बोलावले होते. वासूची विधवा आई–सुशीला–हिच्या मृत्यूनंतर वासू पुण्यातील फर्ग्युसन कॉलेजात शिकावयास आला होता. रँग्लर परांजपे, प्रा. नाईक, प्रा. वा ब. पटवर्धन इत्यादिकांवर औचित्यपूर्ण आदरभाव व्यक्त करणाऱ्या पद्यपंक्ति वासू राजे यांचे तोंडात कवीने घातल्या आहेत. पण काही प्राध्यापकांवर टीका करिताना खालील शब्दांत त्यांची कुचाळकीहि केली आहे.

'कुणी सफेदी रंगरोगणी– रस्तेबन्दीतच अभिमानी...
तसेच काही (प्राध्यापक)...रस्तोरस्ती । पखाल घेउन असती भीस्ती ।'

वासूराजे व तरला यांच्यातील नाजूक प्रेमभावनेचे चित्रण कवीने केले आहे, परंतु 'बहादुरांनी लिहिला कागद–शान्तपणाची निश्चित भाषा– भंगुन टाकी त्याची आशा—' तरलेवर हा जो जुलूम झाला त्याविषयी लिहिताना कवीने खोचक उद्गार काढले आहेत. 'जुलूम का ! जरि गमे हितावह–( व्यक्तिस्वातंत्र्यावर भक्ति–असुन शिक्षणी युक्तच सक्ती–निजहित जाणे न सदा व्यक्ती,–जुलूम नच हा हा सत्याग्रह ')–

परंतु तरला आणि वासू यांच्यातील या अल्लड प्रीतीला उद्देशून कवीने म्हटले आहे.–' स्वार्थत्यागी हिन्दू युवती । तयार हो परक्यास वराया– हृदयेशाचा त्याग कराया–आलेला हंगाम सराया–अन् तरला हो सौभाग्यवती !'–वासूराजे याचा श्यामा वेंगुर्लेकरशी परिचय होतो. पुढे त्याचे रूपांतर मैत्रीत होते. परंतु मध्येच पतिता ' सगुणे 'शी वासूराजेचा संबंध येतो, आणि आपला सुधारकी बाणा वासूराजे हा तिच्याशी विवाह करून सिद्ध करतो. सगुणेच्या मृत्यूनंतर श्यामा वेंगुर्लेकर हिच्याशी कायमची मैत्री जोडून स्त्री-पुरुषांमधील संबंध समान स्वरूपाचे–मैत्रीचे–असावेत हा ध्येयवाद प्रत्यक्षात उतरविल्याचे समाधान नायकास मिळाले, आणि सुधारक काव्यही येथेच संपूर्ण झाले. या काव्याच्या आरंभापासून अखेरपर्यंत तत्कालीन वाङ्मयीन, सामाजिक, धार्मिक आणि राजकीय परिस्थितीवर जी मार्मिक उपहासात्मक टीका आली आहे, त्यामुळेच या काव्याचा अंतर्भाव श्रेष्ठ प्रतीच्या उपहासात्मक काव्यात करणे इष्ट होईल. कवीच्याच शब्दात लिहावयाचे म्हणजे

' कुठे गुदगुली कुठे कुचाळी । विनोद थिल्लर जिवास बिलगे ।

' या विधानातील ' थिल्लर शब्दा ऐवजी ' मार्मिक ' शब्द घातल्यास या उपहासात्मक काव्याचे वैशिष्टय स्पष्ट होईल यात शंका नाहीं.

## विविध क्षेत्रातील भल्या बुऱ्या गोष्टींचा उपरोधिक परामर्ष.

' सुधारका'त वाङ्मयक्षेत्रातील अनेक भल्याबुऱ्या गोष्टींवर टीका आली आहे. टेकाडे आणि तिवारी यांच्या लोकप्रिय गायनाच्या बैठकी, चाफेकर पटवर्धनांचे गज्जल सुनीतावरील टीकालेख, गडकऱ्यांनी ' स ' ला लिहिलेल्या प्रेमकविता आणि इतर कवींनी त्यांचे चालविलेले अंधानुकरण, ( रेवेस–फुलीला—उद्देशून बहुतेक मुलीला ) प्रेमकाव्याबद्दल छुपी आवड व दिखाऊ तिटकारा दाखविण्याऱ्या रसिकांचा उपहास, झेंडूच्या फुलाचे सुस्वागत,—कवींनी घेतलेली टोपण नावे, कपाटातील पुस्तके आणि खऱ्या अर्थाने त्यांची होणारी शोभा, बिंदुस्रावी व गूढ कविता रचणाऱ्या कवींचा नर्म उपहास, ' त्वचेचे पातिव्रत्य ' या विषयावर झालेले वादविवाद, आजच्या विवाहसंस्थेतील उणीवा, 'शशीमोहन' या सारख्या राष्ट्रीय कवितेचे महत्तम कार्य इ. अनेक तत्कालीन वाङ्मय—सागरावर उसळलेल्या वादळांचा ' सुधारका'तील अनेक पात्रांच्या द्वारे त्यांनी खरमरीत पद्यबद्ध परामर्श घेऊन, सुधारक हे काव्य म्हणजे जीवन—संस्कृतीवरील मार्मिक टीकाच होय, हे सत्य उघड केले आहे.

## ' नकुलालंकार '

' सुधारका ' प्रमाणेच ' नकुलालंकार ' हे माधवराव पटवर्धन यांनी लिहिलेले खंडकाव्य, उपहासप्रधानच आहे; ' लटपट्या मनुष्य समाजात कसा लब्ध–प्रतिष्ठित होतो, आणि तो आपल्या पायाखाली काय जळत आहे हे न पाहता, शिष्टपणाने

दुसऱ्या दुबळ्या लोकांवर कसा आग पाखडतो ' हा या काव्याचा प्रतिपाद्य विषय आहे. या काव्यातील पात्रे काल्पनीक आहेत. या काव्यात एका लटपटया गृहस्थाचे–नकुलाचे–( डॉ. एन्. कुलकर्णी लिट्. डी. ) चरित्र, कवीने उपरोधिक भाषेत रेखाटलेले आहे. इतिहासाचार्य राजवाडे यांच्या लेखाचे केवळ भाषांतर करून या नकुलाने जी उच्च पदवी मिळविली आणि समाजांत प्रतिष्ठा धारण केली याचे चित्र अलंकारिक ( अनेक ठिकाणी क्लिष्ट ) परंतु उपरोधिक शब्दांत या काव्यात आले आहे. रावबहादुरांची एकंदर प्रौढ प्रतिष्ठित वागणूक पाहिली की गंभीर प्रौढ-भाषेचा केलेला उपयोग उचितच होईल असे समर्थन, कवींनी केले आहे.! काव्याच्या शेवटी नकुलाच्या पदवीचा जो उपहास केला आहे, तेवढा उद्धृत करून ' नकुलालंकारा 'चा निरोप घेणे इष्ट होईल.

' डॉ. एन् कुलकर्णी लिट्. डी. ' ही त्वरित लागली पाटी ।
विद्येचा क्षय न हटे वैद्यांची फुकट जाहली दाटी ॥ '

माधव ज्यूलियन यांनी सुधारक हे खण्डकाव्य पादाकुलक जातीत लिहिले. त्याचाच बाह्य पेहराव स्वीकारून चं. ग. दीक्षित यांनी ' कॉलेजचे विश्व ' हे ५०१ कडव्यांचे विनोदी खण्डकाव्य लिहून १९३४ मध्ये प्रसिध्द केले. तीस पसतीस वर्षांपूर्वी कॉलेजात शिक्षण घेणाऱ्या स्त्रियांची संख्या अल्प होती. सहशिक्षणात सहमैत्री लाभावी म्हणून विद्यार्थिवर्ग आतुर असे. या काव्यात अशा तरुण प्रेम-वीरांच्या स्त्रीमैत्रीकरिता होणाऱ्या हास्यास्पद प्रयत्नांचे, आणि अभ्यासाव्यतिरिक्त त्यांच्या हातून घडणाऱ्या इतर चळवळींचे विनोदी प्रसंग चित्रित केले आहेत. वसतिगृहातील वाङ्मयचर्चा, क्लबातील मौजा, निवडणुकीची धामधूम इत्यादी ठळक घटनांकडे पाहण्याचा कवीचा वास्तव पण विनोदी दृष्टिकोन या काव्यात प्रगट झाला आहे. उदाहरणार्थ, तत्कालीन साहित्यिकांवरील वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या टीकेचा हा नमुना पाहा.

' विडंबनाची प्रथा पाडुनी
कधि चिमटे तर कधि कोपरखळी
काढुन कधि घे अस्वलगुदगुलि....
अत्र्यांची अशी विनोदवाणी. '

कॉलेजातील सम्मेलनाचा शेवट सहभोजनात होत असे.
' सम्मेलन म्हटले की गम्मत........

' अध्यापक छात्रात मिसळती । विद्यार्थीनि वाढाया घेती,
बन्धुभगिनिची कारण नाती । उठते ढेकर देऊन पंगत '

ऐतिहासिक दृष्टया विनोदात्मक काव्यवाङ्मयात या खण्डकाव्याचा उल्लेख करणे आवश्यक आहे.

**‘ विलायतेची यात्रा ’**

गंभीर प्रवृत्तीच्या लेखककवींनीही काही उपहासात्मक कविता लिहिल्या आहेत. साहित्यसम्राट न. चिं. केळकर यांनी लिहिलेल्या, ‘ विलायतेच्या यात्रेची तयारी ’ या विनोदी कवितेत परदेशात जावयास निघणाऱ्या सभ्य गृहस्थाने-करावयाच्या सिद्धतेचे विनोदप्रचुर वर्णन आले आहे.ती सुटाची कटकट, ते लोमशत्रुव, केशमंडनविचार, सोनेरी सुंदर ‘ केसां’तील त्या सिगारेट पेट्या, विननंबरी भिंगाचे चष्मे, ती मांसाहाराची लज्जत ( उकडअंडी, कोवळी कुक्कुटबाळे इ. ) त्यावेळी वापरावयाचे काटेचमचे, ‘ थँक्यू ’ शब्दांचा वापर, ते स्त्रीदाक्षिण्य, इत्यादी साधने आत्मसात करण्याच्या कलेचे शिक्षण सभ्यगृहस्थाला, किती आवश्यक आहे याचे चित्रण करताना साहित्यसम्राटांनी एक विशिष्ट विनोदी वातावरण निर्माण केले आहे, यात शंका नाही. विशेषतः

‘ सुंदरगात्री सुंदरवदना । ही कोण असे आपली ललना
गौरवपूर्ण उत्तान प्रश्ना । करणे हीच सभ्य रीती ।।
परिचित स्त्रीस आपला हात । खुशाल द्यावा इतरादेखत
ती ‘ शिव्हलरी ’ ‘ गलांट्री ’ होत । इतर काही नसे ।।
हे शिष्टाचार दिसती विपरीत । परंतु ही त्या देशाची रीत
तियेचे शिक्षण घ्यावे येथ । मग परदेशी पाय घाला ।। ’

या टीकेतील विनोद मर्मभेदक आहे.

‘ माझे काव्यगायन ’ ही निशिगंध ( रा. श्री. जोग ) यांनी लिहिलेली कविता प्रसंगनिष्ठ व स्वभावनिष्ठ विनोदामुळे चांगलीच रसिकप्रिय झाली. रविकिरणमंडळातील कवींनी लोकप्रिय केलेल्या काव्यगायनाच्या मजलिसीतून कधी कधी हास्यास्पद प्रकार घडत असत. ‘ एका कवीचे पहिलेच काव्यगायन कसे अखेरचे ठरले ’ हाच प्रसंग वरील कवितेत विनोदाचा विषय झाला आहे.

**‘ आपट्यांची पाने ’**

गो. ल. आपटे यांच्या ‘ आपट्यांची पाने ’ यातून प्रसंगनिष्ठ विनोदाचे काही प्रकार आले आहेत. उदा. ‘ देवाचिये द्वारी ’ या अभंगात देवाच्या दर्शनाला तो अनवाणी गेला होता पण परतताना पायात वहाणा घालून देवळाबाहेर पडला. हा विनोदी प्रसंग चित्रित केला आहे. ‘ एखाद्याचे नशीब ’ यातही शेवटच्या ओळीत

‘ एखादा धडके नशीब म्हणुनी स्वर्गासही जातसे
एखादा फुटके नशीब म्हणुनी येथे कवी होतसे । ’

असा कवीचा उपहास केलेला आहे. ‘ गुलाबी कोडे ’ या कवितेत झरोक्याला तांबडी काच होती, त्यातून आलेल्या किरणामुळे तिच्या गालाला ‘ गुलाबी रंग ’

चढला होता. गडकऱ्यांच्या 'गुलाबी कोड्याचे' हे विडंवन नसून केवळ 'गुलाबी कोडे' या शब्दावरील ही कोटी आहे. अशाच तऱ्हेच्या कोटिवजा प्रसंगनिष्ठ विनोदी कविता या काव्यसंग्रहात आढळतात उदा. 'पडेल उमेदवार'—

'मना सज्जना काय रे भूल झाली।
म्हणोनी उभा राहिलो ऐनवेळी।'

पण 'मना दुर्जना काय त्वा मोहवीले।
डिपॉझीटही शेवटी ना मिळाले.'

'अशीलास' (वकीलासही लागतात अशील,) 'ताजमहाल आणि उंदीर' (कोठे ताजमहाल आणि कुठला उंदीर तेथे घुसे,) 'वकील' (त्याचा रुबाब पक्षकाराविना फोल ठरतो!) इत्यादी कविता पाहा.

## 'चिंचा आणि बोरे'

'चिंचा आणि बोरे' (शं. गो. साठे) यातील 'स्फोटक द्रव्ये' या कवितेत साहित्यिकांवर टीका केलेली आहे. कवि, नाटककार, लघुकथालेखक इत्यादी साहित्यिकमंडळींनी रिझर्व्ह डब्यामधून एकत्र प्रवास केला. ते एकमेकाला खेटून बसले; लघुकथाकार गोष्टीचे वाड शोधू लागले; कवी आपली काव्ये गाऊ लागले. खरोखर

'रिझर्व्ह-लेबल' डब्या हवे परि चुकुनि लागले 'स्फोटक द्रव्ये'

—हा गौप्यस्फोट कवीने शेवटी केला आहे.

यंत्र, पाच सहा आकड्यांचा भागाकार विनचूक करते, परंतु मानवाच्या हातून चुका होतात, हाच दोहोतील फरक कवीने दाखवला आहे. अशा प्रकारचे विनोदी चुटके 'चिंचा आणि बोरे' या काव्यसंग्रहात आढळतात.

## 'बाण्डगूळ'

'बाण्डगूळ' (चं. ग. दीक्षित) हा एक विनोदी काव्याचा संग्रह आहे. 'रामा मन गेले तुझ्यावर जडून' हे 'शूर्पणखा' या गिरीशांच्या कवितेचे विडंबन 'रामा' या शब्दाच्या श्लेषावरच उभारलेले आहे. पुस्तकातील खुणेचे 'पुस्तकांतील खून' हेही एक विडंबन होय 'सुंदर चेहऱ्याच्या माणसानेच तोंड वेडावले तरच ते सुंदर दिसते.,' हेही काही अंशी खरेच.

## 'गाजराच्या पुंग्या'

'गाजराच्या पुंग्या' हा विनोदी कवितांचा संग्रह राजाराम बाळकृष्ण समुद्र यांनी, १९३५ मध्ये प्रसिद्ध केला. आजच्या कवींनी आपल्या विनोदप्रचुर काव्यांनी 'अरबी-समुद्र' आटविला आहे, अशी संपादकाने आपल्या नावावर कोटी केली आहे. प्रियेची वाट पाहणाऱ्या कवीला मांजराचे दर्शन व्हावे हा विरोधा-

भास 'भासे चंद्रिका' या कवितेत आला आहे. प्रियेच्या प्रेमाकरिता सूर्याची कढई करून त्यात कांद्याची भजी तळावयास कवी निघाला आहे! (देशील माते जरी—ना. गं. लिमये.) प्रियकराची वाट पाहणाऱ्या गृहिणीला दारावरची थाप ऐकू यावी, आणि दार उघडून पाहावे तो दूधवाला भय्या दिसावा, अशी 'दैवाची निर्दयता' दत्तप्रसन्न कारखानीस यांनी उघड केली आहे. 'सुखद संभ्रम' याचे 'गांगेय' कवीने केलेले 'मतिविभ्रम' हे, आणि 'डोळे हे जुल्मी गडे' 'या कवितेचे 'कविता गाऊच नका' हे, आनंद कवीने केलेले विडंबन, यांतून ओढून ताणून निर्माण केलेल्या विनोदाचा भागच अधिक आला आहे.

## 'तो आणि ती'

माधव ज्यूलियन यांच्या 'सुधारक' या खण्डकाव्याच्या रचनापद्धतीची आठवण करून देणारी शं. गो. साठे यांनी लिहिलेली 'तो आणि ती' ही एक प्रदीर्घ संसारकथा आहे. त्यांतील विनोद प्रसंगनिष्ठ आहे. नवपरिणत तरुण दांपत्याची काव्यात्मवृत्ति, आणि प्रत्यक्ष संसारातील कठोर वास्तवता, यातील विरोधावर या कथेतील मार्मिक विनोदाची उभारणी झाली आहे. उदा० पुढील शब्दचित्र पाहा :

पुढे ठेविले ध्येय नि तत्त्व। आता त्याचे काय महत्त्व!
खिळखिळली ही सगळी हाडे। समाजओझे त्या न परवडे!॥

## 'कविते करिन तुला मी ठार'

व्याकरणशुद्धशब्दरचनेवर व अलंकारप्रचुरतेवर कवितेचे सौंदर्य अवलंबून असते, या पारंपारिक रीतीची आजच्या काळात होणारी दुर्दशा लक्षात घेऊन, जयकृष्ण केशव उपाध्ये यांनी 'कविते करिन तुला मी ठार' या कवितेत खालील शब्दांत उपरोधात्मक टीका केली आहे.

'पूर्वकवींनी तुज रस पाजुनि मस्त बनविले फार,
रसबिस आता मम साम्राज्यी काहि न तुज मिळणार!'

याच्या उलट, कवितेतील अंत्ययमक साधताना होणारा अप्रयोजकपणा हा 'चहाटळपणा' या त्यांच्या विनोदी कवितेचा विषय झाला आहे. याशिवाय त्यांनी लिहिलेल्या 'शाहीर', 'ढेची' इत्यादी उपरोधपूर्ण विनोदी कविता विशेष लक्षणीय आहेत.

पृथ्वीच्या अक्षांशांचे व रेखांशांचे आपणच जणु काही मध्यकेंद्र आहोत, असा अहंकार बाळगणाऱ्या साहित्यिकबंधूंच्या वितंडवादामुळेच पृथ्वी गरागरा भ्रमण करू लागली. हा 'सृष्ट चमत्कार' सोपानदेव चौधरी यांनी खालील विनोदी शब्दांत रंगविला आहे.

‘ ह्यांच्या वितंबवादाने भ्रम होई स्थिराचरा,
तेव्हापासूनीया पृथ्वी फिरु लागे गरागरा ! ’

याच ठिकाणी श्री. रा बोबडे यांनी लिहिलेल्या ‘ मच्छरोक्ति ’ ‘ अरे आला कवि ! ’ इ० कवितांचा उल्लेख करणे आवश्यक आहे. वेळ काळ न ओळखणाऱ्या कवीचा ससेमिरा रसिकाला किती सतावून सोडतो, याचे विनोदपूर्ण चित्रण त्यांच्या लोकप्रिय ‘ अरे आला कवि ’ या कवितेत आले आहे. कवि ‘ शार्दूल ’ किंवा ‘ गोगलगाय ’ अशी टोपण नांवे घेणाऱ्या कवीस रसिकाने प्रश्न केला आहे.

परी केले तुझे काय ? गेलो वाटेस का कधी ?
साडेसाती कशी आली ? कोवळ्या यौवनामधीं ?

बाबुलनाथांनी ‘ मुग्यांचे वारुळ, ’ ‘ आकाशगंगा, ’ ‘ धुवाधार ’ इत्यादी विनोदी कवितांचे संग्रह प्रसिद्ध केले आहेत. त्यातील ‘ हे चित्र पाहा, ’ ‘ म्हातारचळ, ’ ‘ फोटोग्राफर तो, ’ ‘ वारी, ’ ‘ एक मागणे ’ इत्यादी कवितांतून सद्यःपरिस्थितीत दिसून येणाऱ्या समाजातील विसंगत गोष्टींवर उपरोधिक टीका आली आहे. मात्र अनेक कवितांतून त्याच त्या विषयांची पुनरुक्ति झाली आहे. त्यामुळे ‘ विनोद ’ ठराविक स्वरूपाचा झाला आहे.

मनमोहन नातू यांनी लिहिलेल्या काही निवडक विनोदी कवितांचा अंतर्भाव ‘ दर्यातील खसखस ’ या पुस्तकात आला आहे. ‘ अनाथांचा नाथ ’ बँडगार्डन ’ ‘ भावगीत ’ इत्यादी स्फुट गीते उपरोधपूर्ण आहेत.

**‘ अर्धचंद्र ’**

तटस्थ, खेळकर, विनोदी, क्वचित उदासीन मनोवृत्तीत रमून जाणे, आणि मानवी जीवनात दिसून येणाऱ्या काही विसंगत गोष्टींवर उपहासगर्भ टीका करणे, हा पण्डित सप्रे यांचा दृष्टिकोन त्यांच्या ‘ अर्धचंद्र ’ या काव्यसंग्रहात प्रगट झाला आहे. उदाहरणार्थ.

‘ दिवा रस्त्यातला जैसा, तसा आहे तुझा प्रेमा,
न दावी मार्ग पांथस्था, न होई साह्य वा त्याला ’

अशा विनोदी शब्दात, एकीकडे स्थानिकस्वराज्यातील कारभारावर प्रकाश टाकून दुसरीकडे, ‘ प्रेमाचे गूढ स्वरूप ’ पण्डित सप्रे यांनी उत्तड केले आहे. याच संदर्भात त्यांच्या ‘ दिव्याखाली अंधार, ’ ‘ उपकार, ’ ‘ समाधान ’ इत्यादी विनोदी कवितांचा निर्देश करणे आवश्यक आहे.

‘ वाङ्मय, ’ ‘ राजकारण ’ आणि ‘ स्थानिक स्वराज्य ’ या क्षेत्रात आजकाल आढळून येणाऱ्या काही विसंगत व्यवहारांवर अनुक्रमे ‘ महाकवीचे आगमन ’, ‘ गुब्बु गुब्बु ये ’ आणि ‘ कमीटीची कामे ’ या विनोदी कवितांतून ( ‘टणटणीची

फुले ’ ) दिनकर देव यांनी उपहासात्मक टीका केली आहे. ती खोचक आणि मर्मभेदक आहे,

### ‘घातक भलत्या प्रतिबंधा’वरील उपहासोक्ति

उपहास आणि विडंबन ह्यांचे हे दुधारी शस्त्र, आजच्या सामाजिक शरिरातील व्यंगे नाहीशी करण्याकरिता, आणि त्याला संजीवन देण्याकरिता, नवकवि मोठ्या प्रमाणात उपयोगात आणीत आहेत, असे दिसून येईल. मानवी–जीवन–विकासाच्या आड येणाऱ्या ‘ घातक भलत्या प्रतिबंधातील ’ विसंगती, मर्ढेकर–प्रभृति नवकवींनी आपल्या काव्यांतून उघड केल्या आहेत. मात्र कित्येकदा या उपहासाचे पर्यवसान विषण्ण कडवटपणात होऊन मानवी जीवनातील केवळ घृणास्पद अमंगल भागावरच कवीची दृष्टि खिळून राहते, आणि मग जीवनासंबंधीचे तुच्छतादर्शक विफल उद्गार त्यांच्या कवितेत प्रकट होतात. उदाहरणार्थ, आजच्या यांत्रिक जीवनावरची ही पुढील उपहासोक्ति पहा.

‘ ह्या नच मुंग्या हीच माणसे
मने अनामिक जरि साऱ्यांची
लक्तरलेल्या मिनिटांचा वर
सदैव बुरखा; लाज स्वतःची. ’

बा. सी. मर्ढेकर.

### हास्यप्रवृत्ति–एक सहज प्रवृत्ति–

हास्यप्रवृत्ति ही मानवाच्या ठिकाणी दिसून येणारी एक मूलभूत सहज प्रवृत्ति आहे. संस्कृत रसिकांनीही ‘ हास्यो हास्यस्थायिभावः ’ असे म्हटले आहे. चार पाच महिन्यांच्या बालकाच्या मुखावर झळकणारे स्मित, हे त्याच्या आंतर मनातील सूक्ष्म खळबळीचे बाह्य चिन्ह होय. या खळबळीच्या मुळाशी अनेक कारणे असू शकतील. त्यात आंतर प्रवृत्तीला सुखविणारे एखादे बाह्य दृश्य असेल, किंवा त्याच्या अंतरंगातील उपजत कुतूहलाला शमविणारी एखादी कल्पना असेल. पण एक गोष्ट स्पष्ट आहे की, हे हास्य काही त्याच्या विकृत मनोवृत्तीचे द्योतक नसते.

बालकाचा बाह्य परिस्थितीशी जो जो अधिकाधिक संबंध येत जातो, आणि ते जसे जसे मोठे होत जाते, तसे तसे त्याच त्याच्या मूळच्या निर्मळ हास्याच्या प्रवृत्तीला अनेक फाटे फुटत जातात. आपण आपल्या मित्राला कसे फसविले, एखाद्याला नकळत आपण कसे तोंडघशी पाहिले, आपल्या शत्रूवर आपण कसा विजय मिळविला, इत्यादी भावना प्रकट करिताना, त्याच्या हास्याचे स्वरूप निर्मळ न राहता ते शबल होत जाईल यात शंका नाही. मानवाच्या आजवरच्या वाटचालीत त्याच्या हास्याच्या मुळाशी जशी काही कौतुकास्पद तशीच काही निंदास्पद कारणे आढळून येतील. पहि-

त्याने आदिमानव हसला. तो शत्रूवर विजय मिळविला, हा भाव दाखविण्याकरिता हसला, की त्याच्या प्राथमिक जिज्ञासेला सुखकर प्रत्युत्तर मिळाले म्हणून तो हसला, हे सांगणे कठीण आहे. 'बालहास्या'वरून अनुमान करावयाचे तर असे म्हणता येईल की आदिमानवाचे पहिले हास्य 'निष्कपटी' असावे ते 'व्याजपूर्ण' नसावे.

## सारांश

विनोदाला कारणीभूत झालेला विषय, आणि व्यक्ती, ह्यांच्यासंबंधीच्या आदराला बाध न येता त्यांच्यातील विसंगतीमुळे निर्माण होणारे हास्य, श्रेष्ठ प्रतीच्या विनोदाच्या मुळाशी आढळते. शाब्दिक कोट्या, वा विपर्यस्त प्रसंग, ह्यावर उभारलेल्या विनोदाहून 'व्यक्तीच्या स्वभावांतील सूक्ष्म विसंगतीवर उभारलेला' विनोद, हा अधिक आनंददायक असतो. सुज्ञ रसिकांना अशाच श्रेष्ठ प्रतीच्या विनोदाचे आकर्षण वाटते. आधुनिक मराठी काव्यात विनोदाचे जे निरनिराळे वरील प्रकार दिसून येतात त्यांचे या प्रकरणात विवेचन केले आहे.

आजच्या विज्ञानयुगात मानवाचे मनोव्यापार अधिकाधिक गुंतागुतीचे होत आहेत. अभूतपूर्व अशा एका स्फोटक परिस्थितीच्या टोकावर आजचा मानव उभा आहे. वर्षानुवर्षे त्याच्या हातून झालेल्या शारिरिक व मानसिक तपश्चर्येला कोणती कडू वा गोड फळे येणार, याविषयी तो साशंक बनत आहे. जरा इकडे किंवा तिकडे त्याचा तोल गेल्यास एकतर तो अक्षय सुखशांतीच्या परिसरात, नाहीतर घोर विनाशेच्या गर्तेत जाऊन पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे; अशा आजच्या भांबावलेल्या मानवाच्या मनःस्थितीचे जो तटस्थपणाने निरीक्षण करील, आणि त्याच्या हातून घडू पाहणाऱ्या वर्तनातील विसंगती हसत हसत दाखवून, त्याला मार्गावर आणील, अशा हसणाऱ्या सिंहाची—विनोदी वृत्तीच्या कवीची—आजच्या समाजाला नितांत आवश्यकता आहे, असे म्हटल्यास ते अनुचित होणार नाही.

☆ ☆ ☆

प्रनुक्रम ३७८२४ दि. ... ...
क्रमांक ...१५६१... ...१७.३.६५

## प्रकरण ८ वे

# भाषांतरे आणि अनुवाद.

**संगमावरून—**

इंग्रजी अमलाच्या सुरुवातीपासूनच अर्वाचीन मराठी कवितेचे अंतर्बाह्य स्वरूप बदलत गेले. केशवसुतांपूर्वी होऊन गेलेल्या महादेव शास्त्री कोल्हटकर, चिंतामणी—पेटकर, म. मो. कुंटे, राजा सर टी माधवराव, ब. रा. प्रधान वि. मो. महाजनी प्रभृति अनेक कवींनी एकोणीसाव्या शतकांत प्रसिद्धीस आलेल्या स्कॉट, टेनिसन वर्डस्वर्थ—प्रभृति इंग्रजी कवींच्या काव्याचे परिशीलन केले होते. इंग्रजी काव्यवाङ्मयांत ज्या प्रवृत्ति व ध्येये दिसून येत होती, त्यांचा तत्कालीन कवींच्या काव्यलेखनावर प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे परिणाम होत गेला. इ. स. १८८५ च्या पूर्वीच्या काळांत वरीलपैकी काही कवींनी इंग्रजीतील स्फुट भावगीतांचे शब्दशः वा स्थूल रीतीने अनुवाद करून, अर्वाचीन मराठी काव्यवाङ्मयांत नवीनच आत्मनिवेदनपर भावगीत-लेखनाची प्रथा सुरू केली. दररोजच्या जीवनातील सामान्य विषय घेऊन, त्यांत आपल्या विशिष्ट आत्मनिष्ठ दृष्टिकोनातून स्वतंत्र आशय शोधून काढण्याचे विशेष कार्य, केशवसुतांपासून सुरू झाले हे खरे, तथापि त्यांच्या पूर्वीही थोड्या प्रमाणात व्यक्तिगत भावनेचा आविष्कार स्फुट स्वरूपात करण्याचे प्रयोग चालू होते, असे दिसून येते. एकीकडून जुन्या प्राचीन मराठीतून आलेल्या संतकवींच्या भक्तिरसप्रधान काव्याचा प्रवाह, जसा काही कवींनी आपल्या काव्यातून चालू ठेवला, त्याचप्रमाणे या इंग्रजी वाङ्मयातून आलेल्या नव्या प्रवाहाचेही कित्येकांना आकर्षण वाटले. त्याचबरोबर संस्कृतातील अभिजात कवींपैकी कालिदास भवभूतिप्रभृति कवींच्या महाकाव्यांची भाषांतरे, करण्याचे महत्कार्यही कोणी केले. सारांश इंग्रजी संस्कृत व प्राचीन मराठीतील काव्यवहिनींच्या 'त्रिवेणी संगमा'वर उभे राहून रसिकांना—तत्कालीन काव्याचा आस्वाद, घेण्याची संधी मिळाली. ' काव्य, ' ' जीवन, ' ' सृष्टि, '

' विनोद ' इत्यादी नव्या विषयाकडे पाहण्याचे जे क्रान्तिकारक दृष्टिकोन पुढे निर्माण झाले, त्यांचा उगम उपरिनिर्दिष्ट काळातील कवींच्या काव्य-निर्मितीत दिसून येतो. प्रथमतः तत्कालीन इंग्रजी स्फुटकाव्यांची जी भाषांतरे व रूपांतरे झाली त्यांचे स्वरूप लक्षात घेऊ.

## ' प्राकृत कवितेचे पुस्तक '

महादेव शास्त्री कोल्हटकर यांनी आपला पहिला काव्यसंग्रह ( प्राकृत कवितेचे पुस्तक भाग १-३ ) शिळा प्रेसवर छापून १८६० मध्ये प्रसिद्ध केला. त्यात स्कॉट कवीने जन्मभूमीला उद्देशून लिहिलेल्या कवितेचे ' स्वदेश-प्रीति ' हे भाषांतरित काव्य आले आहे. त्यातील आरंभीच्या ओळी अशा :—

' नष्टात्मा कोणि असा असेल का हो कुठे जगामाजी ।
वदला न कधी जो की ही आहे जन्मभूमिका माझी ।
भ्रमुनी परतीरावर पाउल गेहाकडेस ही करुन ।
प्रेमोद्दीपन होऊन हृदय कधी जात नाहि का कढुन '

' परतीरावर भ्रमुन घराकडे वळणे ' ' प्रेमोद्दीपन होणें ' या कल्पनावर परकीय वातावरणाचा ठसा उमटला आहे. हीच टीका ' गुलामांचे स्वप्न ' याही भाषांतरित कवितेला लागू पडणारी आहे. ही स्फुट काव्यांची भाषांतरे, कवीने केवळ शब्दास शब्द देऊन केली, असे नाही तर, ' मूळ कवितेतील अर्थ—तात्पर्य न सोडता स्थूल विशेषी न्यूनाधिक्य करून केली आहेत ' असे कवीनेच म्हटले आहे. तथापि वर लिहिल्याप्रमाणे त्यातील स्वाभाविकता वातावरणभिन्नतेमुळे कमी झाली आहे.

या शिवाय कोल्हटकरांनी ' स्कॉटलंड देशातील हिवाळा ' ' इंग्लंड देशातील घरे ' या विषयावर कविता लिहिल्या आहेत. त्यांतील काही नमुने असे आहेत :—

' आता शरद-ऋतूंतिल न रक्तपर्णे चकाकता दिसती ।
या अपुल्या रानांतिल मोठ्या मोठ्याहि टेकड्यावरती ।। '
' या येथिल शैलाचे शृंग पहा बोडके कसे दिसते ।
ऐसेचि या समोरिल दो भगिनींचेहि दृष्टिला पडते ।। '

वरील ओळीतील डोंगरदऱ्यांच्या आणि ऋतुसौंदर्याच्या वर्णनात कृत्रिमता आली आहे. सारांश कोल्हटकरांच्या नाट्यकृति जितक्या सरस आहेत, तितक्या या कविता सरस वाटत नाहीत.

## ' कुसुमाञ्जली '

विष्णु मोरेश्वर महाजनि यांच्या ' कुसुमाञ्जली 'त इंग्रजी भावगीतांची आणि इंग्रजीतील प्रदीर्घ काव्यांतील काही उताऱ्यांची पद्यबद्ध भाषांतरे आढळतात.

'हिमालयावर बसून केलेले ईश्वराचे प्रातःस्तवन' (Lines written in the vale of Chamount–S. T. coleridge.) 'ईश्वराचे प्रातःस्तोत्र' (Adam's Morning Hymn–Milton's Paradise Lost) 'माधवीचे पुष्प' (The Last Rose of Summer–Thomas Moore) 'विश्वमंदीर' (Nature) 'रमणोपलंभन' (When first I met thee–) इत्यादी गीतांतून मूळ कवींच्या मनोवृत्तीशी कवीची समरस होण्याची पात्रता दिसून येते. Montgomery यांच्या Aspirations of Youth या काव्यांतील पुढील पंक्तीवरून कवीच्या सोप्या भाषाशैलीची कल्पना येईल.

'पुढे पुढे हो चला गड्यांनो पंथ न सोडू धर्माचा
नीतीहुन ते अन्य नसे सुख पाया त्या सत्कर्माचा !'

'उपजता क्षणी मृत झालेले बालक' On an Infant Dying as soon as Born–Lamb) 'मृगया' (Hunting Song-Scott) 'आठवण (The Recollection-Shelley) 'भिल्लकन्या' (The Reaper-Wordswotn इत्यादी भावगीतांची भाषांतरे वाचीत असता, सामान्य विषय आणि त्यातील चटकदार आशय, यांकडे त्यांनी कसे लक्ष पुरविले आहे हे ध्यानात येते. साधे विषय घेऊन, त्यातून आपले व्यक्तिगत विचार प्रगट करण्याची जी क्रांतिकारक प्रथा केशवसुतांनी पुढे निर्माण केली, तीच प्रथा आरंभी महाजनि यांनी वरील भाषांतरित स्फुट कविता लिहून प्रकट केली, असे म्हटल्यास वावगे होणार नाही. महाजनि यांची भाषाशैली ओघवती आहे. उदा०

'तद्‌भावार्थ मला जरी न कळला गाणे तिचे ते अहा।
सांगू गोड किती श्रुती परिसता होती न तृप्ता पहा।
स्वोद्योगी रत कापणी करित ती गाई सुखे कन्यका।
ऐकोनी रिझले स्मरोनि रिझती आता न ते कर्ण का?'

'The Solitary Reaper' मधील वरील पद्यपंक्ति किंवा 'समुद्रतीर' यांतील

'शांता ह्या लहरी अहा जलधिच्या साधूपरी वाटती
हो चित्त स्थिर ही जरी अविहित व्यापार ते चालती !'

या ओळी वरील विधानाची साक्ष देतील. 'She was a phantom of delight' 'सुशील भार्या' या वर्डस्वर्थच्या लोकप्रिय गीतांतील खालील ओळी याच दृष्टीने लक्षणीय ठरतात.

'दूरदृष्टी औदार्य विनय अंगी, । काय चातुर्ये शोभते कृशांगी ।
निर्मिली ही संपूर्ण गुणनिधान । बोधवचने करण्यास समाधान ।'

याच संदर्भात 'कालमहिमा' (Futility of Fame – Henry Kirke White) 'वसंत समय' (Ode on the Spring – T. Gray) 'सैनिकाचे स्वप्न'

(The Soldier's Dream-S. Campbell) 'आंधळ्याचा मुलगा (The Blind-Boy–C. Cibber) इत्यादी कविता लक्षांत घेणे इष्ट होईल. वि. मो. महाजनि यांच्या कालात बोधप्रधान कविता निर्माण होत होत्या, आणि नैतिक उपदेश करावा हाच प्रमुख हेतु त्यांनी आपल्या भाषांतरित कवितांची निवड करताना ठेवला होता यात शंका नाही. H. W, Longfellow यांच्या 'A psalm of life' या कवितेतील

'नका गड्यांनो म्हणू तुम्ही ही वाचुनि नाही फल काही ।
उद्योगाला विमुख असे नर जिवंत मेला तो पाही ।
उत्साहाने कर्म करू । यश देणारा प्रभु स्मरू ।'

हीच विचारसरणी कवीला जीविताचे रहस्य प्रगट करण्याला उपयुक्त वाटली, असे स्पष्ट दिसून येते.

## इंग्रजीतील भावगीतांची अन्य भाषांतरे

याच ठिकाणी बी कवींनी The Outlaw (Sir Walter Scott) या कवितेचे 'बंडवाला' या शीर्षकाखाली केलेल्या यशस्वी भाषांतरित कवितेचा उल्लेख करणे आवश्यक आहे. स्कॉट कवीच्या स्वदेशाभिमानपर गीताचे 'स्वदेशप्रीति' हे चंद्रशेखरांनी केलेले भाषांतरही असेच यशस्वी ठरले आहे. चंद्रशेखरांच्या अनुवादात्मक कवितांत 'वनवासाची सुखे' 'धनगर आणि तत्त्ववेता' 'मानिनी' इत्यादी कविता प्रसिद्ध आहेत. 'रंगराव हर्षे' आणि 'चितोपंत उदास' या भाषांतरित कवितांचे परीक्षण इतरत्र केलेच आहे. सुमंत कवींनी अनेक इंग्रजी स्फुट भावगीतांचे पद्यांत अनुवाद केले आहेत. 'धूर्त कोळी,' (The spider and the fly) प्रथम दुःख, (The children's Frst grief) 'प्रीतिसन्निधान' (The stars are) 'करी मनाची गाट ढिली' (Love's Pilosophy) 'बालानंदास,' (Infant joy) 'खुलें गवाक्ष' (The open window) 'प्रियेची निद्रा,' 'मंगळतारा,' 'प्रीतीची वांटणी,' इ. अनेक स्फुट भावगीतात्मक कवितांवर इंग्रजीतील स्फुट कवितांचा प्रत्यक्षाप्रत्यक्ष परिणाम झाला आहे. बा. अ. भिडे यांनी 'The soldier's dream' या कवितेचे 'वीराचें स्वप्न' या नांवाखाली भाषांतर केले. श्री. नी. चापेकर यांनीही शेक्सपीअरच्या 'सुनीतसंग्रहा'तील पहिल्या पाच, व अटराव्या सुनीतांची साकीवृत्तांत भाषांतरे केली आहेत (सुवर्णचंपक ३०–३५). परंतु त्यांची रचना क्लिष्ट झाली आहे. वर्डस्वर्थ, शेले, टेनिसन, लॉंगफेलो, ग्रे, गोल्डस्मिथ इत्यादी अनेक इंग्रजी कवींच्या स्फुट भावगीतांची भाषांतरे इ. स. १८८५ ते १९२० या काळात होऊन गेलेल्या बहुतेक सुप्रसिद्ध कवींनी केलेली दिसतात. त्या सर्वांचा परामर्श घेणे कठीणच आहे. त्यांपैकी काहींचा नामनिर्देश येथे केला आहे.

## केशवसुतांची भाषांतरित कविता

केशवसुतांनीही इंग्रजीतील काही भावगीतांचे स्वैर अनुवाद आपल्या भावगीतातून यशस्वीरीतीने केले आहेत. उदाहरणार्थ 'जगामधे या तुला कशाला परमेशे घाडिले' (Work), 'मुळामुठेच्या तीरावर' (Jock of Hazeldean), 'दवाचे थेंब' (The child and the dew drops), घुबड (Raven) घड्याळ (Grandfather clock) इत्यादी कविता पाहा. याशिवाय 'अहा पक्षी हे चित्रपंख यांचे' आणि 'दोन बाजी' यांही कविता Toru Dutt यांनी केलेल्या इंग्रजी रूपांतरित कवितांच्या आधारे त्यांनी अनुवादित केल्या आहेत.

अशा प्रकारे केशवसुतांनी लिहिलेल्या सोळा–सतरा कविता भाषांतरित वा अनुवादित आहेत. मूळ कवीच्या मनोवृत्तीशी समरस होऊन, आणि भावनेचा जिवंतपणा अबाधित ठेऊन, केशवसुतांनी वरील कविता लिहिल्या. त्यामुळे त्या भाषांतरित वा रूपांतरित आहेत, असा भास रसिकांस होत नाही. शिवाय कवितेतील परकीय वातावरणाला रसहानि होऊ न देता पौरस्त्य वळण देण्यातही त्यांचे कौशल्य दिसून येते. उदाहरणार्थ 'घुबड' या कवितेतील खालील पद्यपंक्ति पाहा:—

'निशीथसमयी या अंधारी–वेताळाची मिरवे स्वारी,
पाजळूनिया टेंवे सारी–भुते नाचती भयानकपणे–
चित्ती उपजविती घोर !
नैराश्ये मज पुरे घेरिले। खिडकीमधुनी घुबड न हाले
घूघू ! घूघू ! चाले त्याचा भीषण घूत्कार'

## 'दैवसेनी'

स्कॉट कवीने लिहिलेल्या 'लेडी ऑफ दी लेक' या प्रदीर्घ काव्याच्या आधारे बजाबा (माधव) रामराव प्रधान यांनी 'दैवसेनी' हे खण्डकाव्य लिहून ते १८६७ मध्ये प्रसिध्द केले. स्कॉटलंड देशांतील पाचवा जेम्स राजा हा, वेषांतर करून आपल्या राज्यात हिंडत असे. त्यावरून वरील काव्य लिहिण्याची कल्पना स्कॉट कवीला सुचली. मूळ काव्यांत जेम्स राजाचा सरदार मालकम, ह्याच्याशी एलनचा विवाह होतो. 'दैवसेनी'त जयसेन राजाचा विवाह ठाकूर देवसेन यांच्या मुलीशी 'दैवसेनी'शी होतो. मूळचे काव्य सहा सर्गांचे असून त्यातून स्कॉटलंड देशांतील पर्वतराजीने वेष्टिलेल्या व सुरम्य सरोवरांनी व वनश्रीनी नटलेल्या भूप्रदेशाचे वास्तव चित्रण आले आहे. मात्र 'दैवसेनी'त राज–पुतान्यांतील विशिष्ट भूप्रदेश आधाराला घेऊन प्रधानांनी स्थूल दृष्टीने निसर्गसौंदर्याच्या पार्श्वभूमीवर जयसेन व दैवसेनी यांच्या प्रथम भेटीपासून तो अखेरच्या त्यांच्या मीलनापर्यंतचा त्रोटक कथाभाग बहुशः दिंडी व साकी वृत्तातील २३५ श्लोकांत वर्णिलेला आहे; मूळ

काव्यातील एलर्नानिमित्त झालेल्या सरदारांच्या आपापसांतील संघर्षाचे चित्रण या काव्यात झालेले नाही. चांदण्यारात्री मृगाची शिकार करावयास निघालेल्या जयसेनाची, दाट डोंगराळ प्रदेशातील एका सरोवराजवळील द्वीपाजवळ, देवसेनीची पहिली भेट घडून येते :

‘ पुरुष जवळ ऐसा पाहता हे कुरंगी।
दचकुनि भय पावे लज्जिता अंतरंगी।
इतरजन नसे ही संकटी काय कीजे।
वदन करुनि खाली मौनिनी ते विराजे॥ ’ ( ५० )

त्यानंतर नौकेतून पैलतीरावरील देवसेनीच्या गृहात राजाचे गमन, देवसेनीने सांगितलेला आपला पूर्ववृत्तान्त, राजाला आपल्या सरदाराची लक्षांत आलेली राजनिष्ठा आणि अखेरीस देवसेनीला ज्याच्याबरोबर आपण विश्वासपूर्वक भाषण केले तो सामान्य शिकारी नसून, जयसेन राजाच आहे, हा झालेला आश्चर्यकारक उलगडा, इत्यादी प्रसंगांची रेखीव वर्णने वाचीत असता, वाचकांची चित्तवृत्ति मूळ विषयाशी समरस होते. जवळ जवळ शंभर वर्षांपूर्वी लिहिलेल्या मराठीतील या पहिल्याच खंडकाव्यात कथानकाची उत्कंठा वाढविण्याकरिता कवीने योजिलेली दृश्यात्मक निवेदन-पद्धती, व्यक्तिदर्शनाची कला, व ओघवती भाषाशैली, यांचा अंतर्भाव झालेला पाहून रसिकांस साभिमान आनंद वाटेल यात शंका नाही. ही वाङ्मयीन कृती अनुवादात्मक व अनुकरणात्मक असली, तरी अव्वल इंग्रजी राज्यांत मराठी कवितेला जे नवीन वळण मिळत गेले, त्याच्या सुरुवातीची कल्पना करून देण्यास ‘ देवसेनी ’ उपयोगी पडेल असे वाटते.

## जाधवांची मंजुळा

‘ जाधवांची मंजुळा ’ हे रेंदाळकरांचे अपूर्ण खण्डकाव्य Lady of the Lake या काव्याच्या मध्यवर्ती कल्पनेवरच आधारलेले आहे. घनगर्द रम्य झाडीतील शिलातलावर बसून निसर्गसौंदर्याचे अवलोकन करणाऱ्या युवकाचे वर्णन कवीने खालील रेखीव शब्दांत केले आहे.

‘ कसुनी दृढ चोळणा कटीला। दिधला झोकुनि ऐटबाज फेटा।
समशेरहि शोभते करात। दिसतो मानधन प्रभु मराठा। ’

‘ त्यावेळीं त्याला जी बाला दिसली ती

‘ न उणे लव रूप संपदेत— गमली ती जणु मूर्त—सह्यदेवी।
मृदुकल्पलता प्रसूनमाला। जड विश्वांतरि संभवेल केवी ? ’

तरुणाने तिला आरंभीच ‘ भगिनी ’ म्हणून विश्वासांत घेतले. तिने आपली कथा त्याला सांगितली. ‘ मोऱ्यांच्या पदरी रणधीर धनाजी हा शौर्यशाली

सेनापति होता. त्या धनाजीला शिरके सरदाराची गिरजा देण्याचे ठरले होते. एकदा गिरिजा एकटीच मृगया करावयास गेली असता ती जावळीश्वराच्या नजरेस पडली. त्याने तिची मनधरणी केली, पण ती त्याला वश होत नाही हे पाहून त्याने धनाजीचा छळ आरंभिला. धनाजीने वनाचा आश्रय घेतला आणि गिरिजा त्याच्याकडे गेली. अशा त्या रणभैरववीरमण्डनाची मी कन्या मंजुळा आहे—' असे तिने त्या युवकास सांगितले. चंद्रराव मोऱ्यांनी तिच्या आईला एकटीच उटजात गांठली आणि तिला पुन:वश करण्याचा प्रयत्न केला. एवढ्यात धनाजी आला, त्याने त्यावेळी चंद्रराव मोऱ्याला क्षमा केली, पण अखेरीस मोरे सैन्य घेऊन आला आणि त्या लढाईत जावळीश्वराचा पराभव झाला. धनाजी धारातीर्थी पतन पावला : मंजुळेच्या आईने शोक केला. मंजुळा तीन वर्षांची असतानाच पतीच्या दुःखाने गिरिजा निश्चेष्टावस्थेतच विलीन झाली. त्या प्रसंगाचे कवीने जे हृदयद्रावक शब्दांत वर्णन केले ते असे.

'पडता पडताच कर्णभागी ।
लय वीणा मधुगीत जेवि पावे ।
असता असताच सान्ध्यशोभा
सहसा की तिमिरोदरात धावे.'

मंजुळेने सांगितलेल्या या करुणावस्थेनेच या काव्याचा अपुरा शेवट होतो. मंजुळेने आपले बालपण कोठे कसे घालविले, तरुणवयात तिची आणि युवकाची ही जी गाठ पडली तिचा शेवट काय झाला, वगैरे प्रश्नांची उत्तरे रसिकांनी मूळ इंग्रजी काव्याच्या आधारेच द्यावीत आणि समाधान मानावे: हे काव्य जर परिपूर्ण झाले असते तर मराठीतील एका सुरस खण्डकाव्यात याची गणना वरच्या श्रेणीची ठरली असती. तथापि आहे या अपुऱ्या अवस्थेतहि या खण्डकाव्याची गोडी अवीट वाटते, यांत शंका नाही.

बजाबा प्रधान यांनी राजपुतान्याची पार्श्वभूमि आपल्या काव्यांत निवडली, तर वाईच्या परिसरांतील निसर्गसौंदर्याने विनटलेला प्रदेश निवडण्यात रेंदाळकरांनी मोठेच औचित्य दाखविले यात शंका नाही. तसेच 'चंद्रराव मोरे' व 'धनाजी जाधव' अशा ऐतिहासिक व्यक्तींची निवड करून त्यांनी एक प्रकारे काव्यांत वास्तवता आणली आहे; मात्र ऐतिहासिक सत्याकडे कवीने दुर्लक्षच केले आहे. कवीने या खण्डकाव्यांत सर्वत्र 'माल्यभारा' वृत्त वापरले आहे, आणि रचनेच्या दृष्टीने हे वृत्त अवघड व ताठर असताहि, रेंदाळकरांनी आपल्या भाषाप्रभुत्वाच्या जोरावर त्याला सहज लीलेने हवे तसे वाकविले आहे.

स्कॉट कवीने डोंगराळ प्रदेशाची रेखीव वर्णने केली आहेत. ती सर्व वास्तवस्वरूपाची आहेत.

रेंदाळकरांनी मूळ काव्यातील भावनांचे संघर्ष सुरस शब्दात रंगविले आहेत.

बजाबा प्रधान यांनी मूळ काव्यातील निसर्गसौंदर्याच्या वर्णनावर भर दिला आहे.

उदाहरणार्थ प्रधानांनी केलेल्या निसर्गसौंदर्याचे हें वर्णन पाहा.

'तया ठायी घनदाट वृक्ष भारी
करिति छाया ते गर्द अंधकारी...
निवाऱ्याचे ते उंच साग जाती
निंब नांदुरखी रुंद पसरताती
ऐन किंजळ जांबूळ खैर बोरी
त्यांत कंटकसह वेल गच्च भारी...
कुठे पाझरते उदक पर्वतांगी
ओघ जाती होऊनि एकसंगी...
दीप्त किंचितशी उंच पर्वतांगे
रक्तवर्णी ते अंबरार्ध रंगे
गमे आदित्या अस्तमान होता
कुंकमाने पूजीत देवकांता....'

**मूळकाव्य** [I–XII] (दैवसेनी–१४-१८)

आधुनिक मराठी काव्यांत आरंभी जे इंग्रजी प्रदीर्घ काव्यांचे अनुवाद झाले त्यांत 'दैवसेनी'ची योग्यता पहिल्या प्रतीची आहे यांत शंका नाही.

## 'इंदिरा'

का. र. कीर्तीकर यांनी टेनिसनच्या 'प्रिन्सेस' या काव्याचे 'इंदिरा' या नावाखाली रूपांतर केले. त्याचे स्वरूप येथे उघड करणे इष्ट होईल.

'उत्तर प्रदेशातील सत्यध्वजाचा पुत्र चंद्रकेतु याचे दक्षिण प्रदेशातील गजेंद्र राजाची कन्या इंदिरा, हिच्यावर लहानपणापासूनच प्रेम होते. तिच्याशी विवाह करून धन्य व्हावे अशी त्याची इच्छा होती. परंतु इंदिरेला पुरुषवर्गाविषयी एक प्रकारची अढी होती. पुरुषाने स्त्रीला गुलामगिरीत ठेवून तिच्या व्यक्तिमत्त्वाचा कोंडमारा केला, अशा पूर्वग्रहाने तिने स्वतंत्र स्त्रीग्राम स्थापून स्त्रियांना पुरुषाप्रमाणे सर्वांगीण शिक्षण देण्याचे ठरविले. आपल्या राज्यात येण्यास तिने पुरुषवर्गास मनाई केली. कमलजा व शशिकला ह्या तिच्या सहचारिणी. चंद्रकेतू आणि त्याचे दोघे बाल-मित्र यांनी अनुक्रमे चंद्रिका, रदनिका व कमलावती अशी नावे धारण करून स्त्रीवेषात त्या ग्रामात प्रवेश केला, आणि नाना युक्तिप्रयुक्तीने त्यांनी राजकन्येला वश करण्याचा प्रयत्न केला, परंतु तो बेत कसा फसला, हा 'इंदिरा' या काव्याचा पूर्वार्ध, चार सर्गांत पुरा झाला आहे. शेवटच्या तीन सर्गांत चंद्रकेतु आणि वीरभद्र (इंदिरेचा बंधु)

यांच्यातील युद्धप्रसंग, आणि चंद्रकेतु आणि त्याचे साथीदार हे लढाईत घायाळ झाल्यावर इंदिरा आणि तिच्या मैत्रिणी, यांनी त्यांची केलेली शुश्रूषा, व अखेरीस पुरुषावाचून स्त्रीचे आणि स्त्रीवाचून पुरुषाचे जीवन कसे अपुरे असते, या सत्याची सर्वांना पटलेली ओळख, आणि इंदिरा-चंद्रकेतु यांच्या व त्यांच्या मित्र-मैत्रिणींच्या गोड मीलनांत काव्याचा झालेला गोड शेवट, हा कथाभाग शेवटी आला आहे.

व्हिक्टोरिया राणीच्या कारकीर्दीत उदार—मतवादी कवि उदयास आले. टेनिसन हा त्यांचेपैकीच एक होय. स्त्रियांचे हक्क आणि त्यांचे स्वातंत्र्य यांचा पुरस्कार करण्याच्या हेतूनेच त्याने 'Princess' हे प्रदीर्घ काव्य रचले. या काव्याचा शेवट मात्र कवीने विशिष्ट हेतू ठेवून केलेला दिसतो. जीवनाच्या सर्व क्षेत्रांत स्त्रीने-पुरुषांची बरोबरी केली, तरी निसर्गाने स्त्रीवर जी अपत्यसंवर्धनाची जबाबदारी टाकली आहे तिला ती टाळू शकत नाही. पुरुषाला ' सूर्य ' कल्पिणे, आणि त्याच्या प्रकाशांत स्त्रीने ( चंद्राने ) प्रकाशणे, हा टेनिसन कवीचा दृष्टिकोन येथे प्रकट झालाच आहे.

' For woman is not undeveloped man, :
But divers : could we make her as the man
Sweet love were slain :
His dearest bond is this,
Not like to like, but like in difference
Yet in the long years, liker must they grow;
The man be more of woman, she of man '

( Princess )

वरील पद्यपंक्तीतील विचारांचा मथितार्थ कीर्तिकरांनी खालील श्लोकांत प्रकट केला आहे.

' परस्पर जयी अगे निज–समागमे स्त्रीनर, । बघोनि गुणदोष तीं करतिल स्वरूपांतर ।
स्त्रिया प्रबल अंशतः नर मनी तसे कोमल, । तयेच समयी जगी सफळ आयु ते होइल. ॥

सर्ग ७: १२६

कीर्तीकरांनी मूळ काव्याचे शब्दशः भाषांतर न करता, साकल्याने मूळचा आशय, ' इंदिरे 'त आणण्याचा प्रयत्न केला आहे असे दिसून येते.

## होमरकृत ' इलियड '

महाकवि होमरकृत 'इलियड'चे कविताबद्ध मराठी भाषांतर गणेश रामकृष्ण हवलदार यांनी दोन भागांत इ. स. १९१३ मध्ये प्रसिद्ध केले. पहिल्या भागांत सात सर्ग व दुसऱ्या भागांत सतरा सर्ग असे एकूण चोवीस सर्ग आहेत. पहिले दोन सर्ग सोडल्यास, बाकीच्या बावीस सर्गांतील सर्व कथा 'आर्या' जातीत ग्रथित केली आहे. मूळ कथेतील नावे अकिलीस ॲन्ड्रोमाकी, आर्सिलोकस, अगमेम्नन, थेटिस, हेलन, हर्क्यूलीस इ. भाषांतरीत काव्यांत जशीच्या तशीच ठेवलेली आहेत, त्यामुळे मराठी

वाचकांना आर्या वाचीत असता खटकल्यासारखे होते; परंतु ग्रंथकाराचा हेतु 'ज्या भाषांतून भाषांतर केलेले असेल, त्या भाषेचे ज्ञान जर कोणास करून घ्यावयाचे असेल तर तसे करून घेण्यात वाचकांस भाषांतरापासून सहाय्य झाले पाहिजे. म्हणजे मुळांतील अर्थ पूर्णपणे भाषांतरात आला पाहिजे; तो तितक्याच शब्दांत नसला तरी चालेल परंतु तो अर्थ मात्र सरळ व साध्या भाषेत आला पाहिजे, जसा संक्षेप इष्ट नाही. तशी वृद्धीहि ग्राह्य नाही.' ग्रंथकर्त्याचा हा हेतु भाषांतरात पुष्कळ अंशी साध्य झाला आहे. मूळ इंग्रजीतील उतारा व त्याचे पुढे दिलेले भाषांतर, ह्यांची पहाणी केल्यास वरील विधानाची सत्यता पटेल. 'इलियड' ह्या महाकाव्यांतील प्रमुख व्यक्ती म्हणजे प्रायम, पारिस, हेक्तर इनियॉक हे ट्रोजन वीर, व मेनिलास, अकिलीस, युलिसीस, हे ग्रीक वीर, ह्यांच्यांतील 'हेलन'करिता झालेल्या संघर्षाचे वीररसपरिप्लुत वर्णन यात आले आहे. ग्रंथकर्त्याची भाषा सुबोध व साधी आहे. लाक्षणिक अर्थापेक्षा तीत वाच्यार्थच अधिक आला आहे.

हेक्तर आणि आजक्ष हे दोघे द्वंद्वयुध्दाकरिता रणांगणात उतरले, त्यावेळी सर्व सैनिकांस आनंद झाला, हा विषय होमरने मूळच्या काव्यात खालील शब्दांत वर्णिला आहे.

'Both breathing slaughter, both resolued in arms,
As when to sailors labouring through the main,
That long have heaved the weary oar in vain,
Jove bids at length the expected gales arise:
The gales blow grateful, and the vessel flies:
So welcome these to Troy's desiring train:
The bands are cheer'd, the war awakes again.
Book VII

वरील उताऱ्याचे भाषांतर करताना मूळचा आशय केवळ साकल्याने नव्हे, तर शब्दशः आणण्याचा प्रयत्न भाषांतरकर्त्याने कसा केला आहे, हे खालील भाषांतरित उताऱ्यावरून दिसून येईल

'हेक्तर निघे सवेग द्वारातुन बन्धु त्या सवे धावे।
दोघे उत्सुक लढण्या वाटे दोघास शत्रुस वधावे ॥ १ ॥
घेउन गुळगुळित वली नाविक उदधीस वलविता दमती ।
अंगे विगलित होता आशा त्या एक वायुची धरती ॥ २ ॥
ईशाज्ञेने सुटुनी वारा अनुकूल हर्ष दे सकला।
दर्शन या दोघांचे अवचित दे हर्ष तेवि समरि दला ॥ ३ ॥'

अर्थात दोन्ही भाषांच्या प्रकृतिभिन्नतेमुळे एका भाषेतील अर्थ दुसऱ्या भाषेत यथातथ्य आणणे, हे किती कठीण आहे, याची साक्ष पटते.

टेनिसन बायरन, गोल्डस्मिथ, ग्रे इत्यादी कवींच्या काही पद्यबद्ध प्रदीर्घ

काव्यांची भाषांतरेही प्रसिद्ध झाली आहेत. टेनिसनच्या ‘ इनॉक आर्डन ’ या काव्याचे गिरीशांनी ‘ अनिकेत ’ या नावाखाली भाषांतर केले आहे.

‘ इनॉक आर्डन ’ या काव्यातील २३ ते ३६ ( A narrow cave ... this is my little wtfe. ) हा उतारा पाहा.

भाषांतर साकी जातीत असून मोजक्या व सोप्या शब्दांत ते केले आहे. येथे मूळच्या काव्यांतील ओळींशी ताडून पाहण्याकरिता समानार्थक ओळी उद्धृत करीत आहे.

‘ अरुंद होती जरा पोकळी तिथेच खडकाखाली
‘ घर ’ ‘ घर ’ खेळुन रमली बाळे त्यांतच सांज सकाळी
इनॉक होई केव्हा मालक फिलीप दुसऱ्या दिवशी
ॲनीला पण व्हावे लागे मालकीण दोघांशी.
कधी कधी पण आठवडाभर इनॉक मालक राही
आणि वदे तो ‘ माझे घर हें मालकीण माझी ही !’ ’

शब्दाला शब्द योजून मूळचा आशय जसाच्या तसाच प्रगट करण्याचा कवीचा हेतु येथे स्पष्ट दिसून येतो: मूळच्या काव्यात नाहीत असे थोडे अधिक शब्द भाषांतरात आले असले ( उद. सांज सकाळी ) तरी मूळच्या अर्थाची हानी झाली नाही.

‘Playing at keeping house’ याचे ‘ घर ’ ‘ घर ’ खेळणें, ‘Host’ याचे मालक, आणि ‘ wife ’ याचे ‘ मालकीण ’, अशी स्वैर रूपातरे कवीने केली आहेत. मात्र एकंदरीत विचार केल्यास, वातावरणभिन्नत्त्वामुळे आणि दोन भाषांतील मूळ प्रकृतिभेदामुळे, ही भाषांतरीत कृति मूळ काव्याची बरोबरी करू शकत नाही.

ग. र. नवलकर यांनी वरील काव्याचे केलेले भाषांतर—‘ सदूकोळी ’—व रेंदाळकर यांनी केलेले भाषांतर–‘ सारजा ’–हीही भाषांतरे प्रसिद्ध झाली आहेत. तीं दुर्मिळ आहेत.

बायरनच्या ‘ प्रिझनर ऑफ् शिलान् ’ या काव्याचे विनायक हरि देशपांडे यांनी दिंडी वृत्तात भाषांतर केले. लेखकाची भाषाशैली साधी, सोपी आणि अर्थवाही आहे. उदा०

‘ प्रीति जडली मम शृंखलेवरीही
सखी जीवाची मला होय तीही
सतत सहवासे शील बने त्याते ।
बंदिवासाहुनि मुक्ति दुःख देते ॥ ’

अशा शब्दांत वृद्ध कैद्याला अति सहवासाने बंदिशालाच कशी प्रिय होते, याचे वर्णन कवीने केले आहे. याच विषयावर दा. रा. बापट यांचे ‘ सुवर्ण-दुर्गातील बंदिवान ’ हेही काव्य प्रसिद्ध झाले आहे. ( १९०४–१९०५ ).

गोल्डस्मिथ कवीच्या 'ट्रॅव्हलर' या काव्याचे 'प्रवासी' हे नारायण महादेव भिडे यांनी केलेले भाषांतरित काव्य प्रसिद्ध आहे.

'गावोत स्तुतिपाठक निजदेशाचे सदैव पाठ सुखे
देशैकप्रिय अथवा व्यक्तहि अपुला करोत भाव सुखे
तरि सर्वत्र तयाते अविकृत चित्ते दिसोनिया येते
की दिधला परमेशे सकला समसौख्य भाग जनतेते'

मूळकवीच्या समतोल दृष्टिकोनाचे वैशिष्ट्य वरील पद्यपंक्तीत प्रगट झाले आहे. ना. वा. टिळक यांनीही वरील काव्याचे भाषातर केले आहे.

गोल्डस्मिथ कवीच्या 'डेझर्टेड व्हिलेज' काव्याचे 'निर्जन ग्राम' हे गणेश रामकृष्ण हवलदार यांनी केलेले आर्यावृत्तांतील भाषांतरही उल्लेखनीय आहे. वरील काव्यातील शाळापंतोजीचे शब्दचित्र भाषांतरकाराने खालील शब्दांत काढिले आहे.

'यांची वादकुशलता मान्य करी गांवचा उपाध्याही
आली हार तरी हा वाद पुढे करित सारखा राही'

भिन्न भिन्न परिस्थितीला तोंड देऊनही 'खेडे' काळावरही मात करील हा भाव कवीने खालील शब्दात व्यक्त केला आहे.

'स्वायत्त सबल राष्ट्रे काळाशी सामना करू शकती ।
बीचीशी झगडूनी जलधित वातोपहत शिला टिकती ॥'

'स्मशान–विलापिका' हे ग्रे कवीच्या विलापिकेचे वरील कवींनी केलेले भाषातरित काव्य होय.

## 'रंगराव हर्षे–चिंतोपंत उदास'

'रंगराव हर्षे हा मनांतील आनंदीवृत्तीचे प्रतीक आहे. जॉन मिल्टन याच्या 'ललेग्रो' या इंग्रजी काव्याच्या आधारे कवीने हे शब्दचित्र रंगविले आहे. त्याचप्रमाणे चिंतोपंत उदास हे काव्य 'इल् पेन्सोरोझो' या इंग्रजी काव्याच्या आधारे रचिले आहे. प्रसंगानुसार प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात आनंदाचे व दुःखाचे प्रसंग निर्माण होतात. अशा 'आशा–निराशे'चे खेळ वरील दोन प्रदीर्घ काव्यांत आले आहेत. चंद्रशेखरांनी केलेल्या ह्या अनुवादांतून त्यांनी पुष्कळसे स्वातंत्र्य घेतले.

रंगराव हर्षे हा रसिकशिरोमणि शाहीर होनाजी, सगनभाऊ, राम जोशी यांची मधुमय कवने वाचून, आपली वृत्ती प्रफुल्लित करीत असे. कवीने भाषातरांत म्हटले आहे. 'नगरामध्ये कोठे कसलाहि सुप्रसंग होवो, रंगराव हा त्यात नेमका असावयाचा !' त्याचा रंगेल स्वभाव वाचकांचे मन वेधून घेणारा आहे.

चिंतोपंत उदास याची वृत्ति अंतर्मुख आहे. संत–कवींची निवृत्तिपर काव्ये वाचून त्याची वृत्ति उदास बनली आहे.

'अभेदे पाहोनी हरिहर असे त्यांस भजणे ।
मला देवद्वारी रुचतिल कथा आणि भजने ।।
निदानी हा सारा समजुनि खटाटोप लटिका ।
मिळो शांतीची या जरठ तनुला पर्णकुटिका ।।'

पौरस्त्य तत्त्वज्ञानात निवृत्तीचे जे महत्त्व आहे, ते चिंतोपंताला पटलेले दिसते.

## 'उमरखय्यामच्या रुबाया'

उमरखय्यामच्या निवडक रुबायांचा इंग्रजी भाषेतील पहिला अनुवाद फिज्जेरेल्डने १८५९ मध्ये प्रसिद्ध केला. त्यानंतर फिज्जेरेल्डच्या इंग्रजी अनुवादाची अनेक विविध भाषेत रुपांतरे झाली. 'उमरखय्याम'च्या मूळच्या रुबायांचा खोल अभ्यास माधवराव पटवर्धन यांनी केला, आणि 'उमरखय्यामकृत रुबाया' हे पुस्तक १९२९ मध्ये प्रसिद्ध केले.

या पुस्तकात एकून ५२४ रुबाया आल्या आहेत. 'जीत बहुधा पहिली, दुसरी व चौथी या पंक्तींच्या अन्ती व क्वचित चाऱ्ही पंक्तींच्या अंती एकच यमक असते, अशा विशिष्ट वृतांतील चतुष्पदीस रुबाई (अ. व. रुबाया) म्हणतात' असे लेखकाने प्रस्तावनेत म्हटले आहे. 'मेघावली जाती'तील या रुबायांचे स्वरूप पुढे दिलेल्या एका रुबाईवरून ध्यानात येईल.

'खळी नभाला मारी जो प्रासाद
यदङ्गणीं नृप टेकित शिर बिनवाद
दिसे पारवा भग्न तत्तटी बसुनी
करीत राही क्क्क सारखा साद'

या अनुवादाची भाषा अनेक ठिकाणी क्लिष्ट झाली आहे.

या शिवाय फिज्जेरेल्डच्या निवडक ७५ रुबायांचे माधवरावांनीं मराठीत भाषांतर करून ते 'द्राक्षकन्या' या नांवाखाली प्रसिद्ध केले. ही 'द्राक्षकन्या' विशेष रसिकमान्य झाली. मूळचा आशय: काटेतोलपणाने भाषांतरात्मक कृतीत आणण्याचा कसा पराकाष्ठेचा प्रयत्न कवींनी केला, याचा प्रत्यय पुढील रुबाईवरुन येईल.

'या इथे तरुतळी एक वही कवितेची.
भाकरी एक अन् सुरई एक सुरेची
आणखी एक तूं जवळ गात या विजनी
अन् हे न रान मग नन्दनवन ते हेची !'

(फेज्जेरेल्डच्या मूळच्या इंग्रजी भाषांतरांतील ओळी अशा—

Here with a loaf of bread beneath the bough
A flask of wine a book of verse and thou

Beside me singing in the wilderness
And Wilderness is Paradise enow.)

ज. के. उपाध्ये यांनीही फिज्जेरेल्डच्या ४८ रुबायांचे मन्दाक्रान्ता वृत्तात भाषांतर केले. पहिल्या, दुसऱ्या व चवथ्या चरणांच्या अंती यमक साधून श्लोकांत मूळच्या चार ओळींतून संपूर्ण आशय सरळ ओघवती भाषेत प्रकट व्हावा अशी दक्षता भाषांतरकर्त्यांनी घेतली आहे. वर उद्धृत केलेल्या श्लोकाशी तुलनेला घेता याव्यात म्हणून खालील ओळी उद्धृत केल्या आहेत.

'आहा ! येथे तरुतळवटी, भाकरी अर्धकोर,
थोडी दारू, सुरसकविताग्रंथ व्हावा समोर,
वामांकी तू नयनसुभगे गोड संगीत गावे
आम्हाला ते विजनचि गडे स्वर्गसर्वस्वसार'

ओघवती प्रासादिक भाषा, आणि रसानुकूल वृत्तयोजना, यांमुळे उपाध्ये यांच्या रुबाया आकर्षक वाटतात. मात्र मूळचा आशय साकल्यानेच 'स्वैर अनुवादांत आणण्याची दृष्टी त्यांनी स्वीकारलेली दिसते.

फिज्जेरेल्डच्या काही निवडक रुबायांचेच स्वैर अनुवाद करण्याचे धोरण गो. गो. अधिकारी यानी ठेविले आहे. 'भाषेच्या सौंदर्यापेक्षा मूळ अर्थ अत्यंत सोप्या भाषेत आणण्याकडेच' त्यांनी अधिक लक्ष दिले आहे, असे पुढील पद्यपंक्ती-वरूनही ध्यानात येईल.

'वृक्ष छायेखालती—तू, वारुणीची बाटली
भाकरीचा चौत एकादा पुरे, गीतावली
आणि शेजारी बसोनी गीत जेव्हा गाशिल
स्वर्गि मी आहे असे माझ्या मनाला येइल.'

याशिवाय, अ. ज. करंदीकर, यांनीही उमरखय्यामच्या काही रुबायांचा केलेला अनुवाद प्रसिद्ध आहे. ग. त्र्यं. बाग यांच्याही काही भाषांतरित रुबाया 'मायबोली' ( १९६३ ) या मासिकात प्रसिद्ध झाल्या आहेत.

इंग्रजी अमलाच्या सुरुवातीस इंग्रजीतील काव्यवाङ्मयाचे जसे अनुवाद झाले, तसेच संस्कृतवाङ्मयांतील अभिजात विदग्ध महाकाव्यांची भाषांतरे व रूपांतरे निर्माण झाली आहेत. 'रघुवंश', 'कुमारसंभव', 'शिशुपाल वध' इत्यादी महाकाव्यांची कित्येकांनी मराठीत पद्यबद्ध भाषांतरे केली. 'कुमारसंभव' ( कृष्णाजी लक्ष्मण दातार—१८७० ) 'शिशुपाल वध' ( त्र्यंबक मोरेश्वर पांडरकर ). वरील महाकाव्यातील कांही स्फुट आख्याने ही कित्येकांना स्फूर्तिप्रद ठरली. येथे त्यातील काही महत्वाच्या भाषांतरित काव्यग्रंथाचा व खंडकाव्यांचा निर्देश करणे उचित होईल.

## गणेश शास्त्री लेले यांनी केलेला 'रघुवंशा'चा अनुवाद

कविकुलगुरु कालिदासकृत 'रघुवंश' ह्या प्रसिद्ध महाकाव्याचे महाराष्ट्रभाषेत पद्यात्मक भाषांतर गणेशशास्त्री लेले, त्र्यंबककर, यांनी केले. आणि ते इ. स. १८८३ मध्ये प्रसिद्ध झाले. या महाकाव्याचे मूळांतल्याप्रमाणेच १९ सर्ग आहेत. वसिष्ठ ऋषींच्या आश्रमात गमन, आणि नंदिनी वरप्रदान, या दोन सर्गात दिलीपराजाच्या पूर्वी होऊन गेलेल्या रघुवंशांतील राजांची गुणवर्णने, आणि दिलीपराजाला नंदिनीच्या वरामुळे झालेली पुत्रप्राप्ति, हा कथाभाग आला आहे. त्यानंतर रघुराज्याभिषेक, रघु-दिग्विजय, अजस्वयंवराभिगमन, इंदुमतीस्वयंवर, अजविलाप, दशरथमृगया, रामावतार, सीताविहार, रावणवध, दंडकाप्रत्यागमन, सीतापरित्याग आणि श्रीरामस्वर्गारोहण, हा कथाभाग तेरा सर्गात आला आहे. शेवटच्या तीन सर्गातून कुशाची कथा, अतिथि-वर्णन, वंशानुक्रम, आणि अखेरीस अग्निवर्णराजाचा शृंगार, हे विषय आले आहेत. आरंभीच्या प्रस्तावनेत या भाषांतरासंबंधी कवींनी जे निवेदन केले आहे त्यात म्हटले आहे 'भाषांतर प्रायः पद्यास पद्य असे केले आहे. जेथे एका श्लोकार्थास एक पद्य पुरले नाही तेथे दोन पद्ये किंवा अधिकही पद्य केली आहेत. श्लोकाचा एकंदर भावार्थ मनात धरुन तो मराठी भाषेच्या पद्धतीने जसा बांधतां आला तसा बांधला आहे. ...भाषांतर फार कठीण किंवा दुर्बोध न होता ते ग्राम्यहि होऊ नये याविषयी ठेववेल तितके धोरण ठेविले आहे.'

गणेशशास्त्री लेले यांचे संस्कृत व मराठी भाषेवर मोठे प्रभुत्व होते. पांडित्य आणि रसिकता यांचा मेळही त्यांच्या वृत्तीत झाला होता. मूळच्या महाकाव्यांतील सर्वश्रुत असे एक दोन प्रसंग घेऊन, त्यांचा अनुवाद कवीने किती सुरस रीतीने केला आहे हे लक्षात घेतल्यास, वरील विधानाची सत्यता पटेल.

उद्यानात अज व इंदुमती सुखात निमग्न असता अकस्मात पुष्पमाळा अंगा-वर पडून इंदुमतीला मृत्यु आला. त्या प्रसंगाचा 'अजविलापा'तील हा श्लोक पहा.

'माळा मारक होय हेहि म्हणणे मिथ्याच वाटे मना,
का की ठेवितसे उरी तरिहि ती कैसी मला मारिना
कोणाला विष तारिते, अमृतही कोणास मारीतसे
तस्मात् मृत्युस हेतु एक मजला ती ईश्वरेच्छा दिसे'

लोकापवादास्तव रामाने सीतेचा त्याग केला, त्यावेळी सीतेने रामास क्ष्मणाच्या हाती पाठविलेल्या निरोपाच्या वर्णनाचा खालील श्लोक पहा.

'किंवा नीतिपथेचि वर्तसि सदा केव्हा न इच्छावशे
त्यागाचा मम पाहता तुजकडे तो दोष काही नसे.
केली दुस्तर पातके विविध जी म्या पूर्वजन्मांतरी
त्यांचा दुःसह पाक वज्रसम हा ही गोष्ट आहे खरी!'

केवळ शलाकान्यायाने या भाषांतरित महाकाव्याचे मूल्यमापन करणे अयोग्य होईल. लेले शास्त्री यांच्या भाषाशैलीची सर्वसाधारण कल्पना रसिकांस यावी म्हणूनच वरील दोन श्लोक उद्धृत केले आहेत. 'रघुवंशा'सारख्या सुप्रसिद्ध महाकाव्याचे संपूर्ण भाषांतर करण्याचा हा प्रयत्न जितका अभिनव, तितकाच तो बिनतोड ठरला, असाच रसिकांचा त्यावरील अभिप्राय आहे. लेले यांनी रघुवंशाच्या नवम सर्गाचे केलेले समश्लोकी सरस भाषांतरही प्रसिद्ध आहे.

## ' मेघदूता 'ची भाषांतरे

प्राचीन मराठी काव्यवाङ्मयात मेघदूताचे अनुवाद फारसे झाले नाहीत. परंतु अर्वाचीन काळात कृष्णशास्त्री चिपळूणकरांपासून तो चिंतामण द्वारकानाथ देशमुखांपर्यंत अनेक रसिक विद्वानांनी त्याचे मराठीत अनुवाद केलेले आढळतात. त्यांतील काही समश्लोकी समवृत्तातील आहेत; काही जातिवृत्तात आणि अक्षरवृत्तांत आहेत. काही सयमक तर काही निर्यमक आहेत.

मूळ आशय ज्या शब्दार्थांत प्रकट झाला आहे, त्याच्याशी प्रामाणिक राहण्याचा काटेतोल प्रयत्न कित्येकांनी केला आहे, तर काहींनी मूळ आशयाचा स्थूल सारांश आपल्या अनुवादात आणिलेला आहे. कालिदासाची रसिकता आणि पांडित्य, यांच्या मधुरमीलनाचा ठसा ' मेघदूता 'वर उमटला आहे. महाकवीच्या वृत्तीशी समरस होऊन, मूळ काव्याचे सौंदर्य अनुवादित काव्यात अबाधित ठेवण्याचे ध्येय अनुवाद करणाऱ्या पंडितांनी बाळगलेले दिसते. परंतु या ध्येयाच्या परिपूर्तीत अनेक अडचणी निर्माण होतात. एका भाषेत विशिष्ट अर्थाकरिता योजिलेल्या शब्दाचे कार्य दुसऱ्या भाषेतील समानार्थक शब्दाने होतेच असे नाही. काव्यात अर्थालंकार व शब्दालंकार यांचे जेवढे महत्त्व आहे त्यापेक्षा रसनिर्मितीला–भावसौंदर्याला अधिक महत्त्व आहे. भाषांतरकर्त्याला त्या मूळच्या भावसौंदर्याची प्रतीति येईल, पण तशीच प्रतीति ती भाषांतराच्या द्वारे इतरांना घडवून देणे, फारच कठीण होऊन बसते.

मेघदूताचे मराठीत अनेक अनुवाद झाले आहेत. त्या त्या अनुवादाची स्थूल कल्पना रसिकांस यावी, या हेतूने मूळ मेघदूतांतील एक विशिष्ट श्लोक, आणि विशिष्ट चरण घेऊन, त्यांचा अनुवाद निरनिराळ्या भाषांतरकर्त्यांनी कशाप्रकारे केला आहे हे पुढे दाखविले आहे. कोणत्याहि अनुवादाचे परीक्षण शलाकान्यायाने करणे अनुचित होईल, कारण मूळच्या कलाकृतीचे सौंदर्य, सामग्र्याने मनावर होणाऱ्या परिणामावरुन लक्षात घ्यावे लागते. केवळ त्याच्या एका अवयवाच्या दर्शनाने ते सौंदर्य प्रतीत होत नाही. मात्र या प्रकरणांत मराठीत मेघदूतांचे जे अनुवाद झाले त्यांचे स्थूलरीतीने दिग्दर्शन करणे आवश्यक आहे. म्हणूनच एक श्लोक व एक चरण यांचीं भाषांतरे अनेक विद्वानांनी कशी केली आहेत यांचे विवेचन पुढे केले आहे.

[मेघदूताची अनेक भाषांतरे प्रसिद्ध झाली आहेत; त्यातील काही दुर्मिळ आहेत. या ठिकाणी, अधिकात अधिक मिळालेल्या भाषांतरित काव्यग्रंथातील एका श्लोकाचे निरीक्षण केले आहे. ]

## कृष्णशास्त्री चिपळूणकर यांचे मेघदूताचे भाषांतर

कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनी १८६५ मध्ये साकी वृत्तात ( २८४ श्लोकांत) मेघदूताचे मराठीत रूपांतर केले. 'प्रस्तुत ग्रंथकर्त्याने संस्कृताचे शब्दशः भाषांतर केले नाही तर मूळ ग्रंथातील मुख्य अर्थ घेऊन तो प्राकृत भाषेच्या सरणीने जितका सुरस रीतीने व्यक्त करता आला तसा व्यक्त केला आहे.' असा उल्लेख प्रस्तावनेतच आला आहे. अर्थवाही ओघवती सुरस भाषाशैलीमुळे, हा अनुवाद पुष्कळच रसिकप्रिय झाला आहे. चिपळूणकरांनी मूळ अर्थ सुरस रीतीने प्रगट व्हावा म्हणून मूळच्या एका श्लोकाकरिता आवश्यक तेवढ्या साक्यांचा अवलंब केला आहे. मात्र कोठे कोठे मूळच्या श्लोकातील अर्थाच्या कांही छटा भाषांतरित साक्यांत आल्या नाहीत. तर कोठे कोठे अर्थाच्या स्पष्टीकरणात मूळांतील सूचकता राहिली नाही. उदाहरणार्थ मेघदूतांतील ५ व्या श्लोकाचा अनुवाद शास्त्रीबुवांनी खालील शब्दांत केला आहे.

'वारी, वायू, वीज, धूम ही एकवटुनि जो झाला,
अचेतने त्या मेघे कैसे न्यावे संदेशाला ?
विचार ऐसा न सुचे अत्युत्कंठित या यक्षाते,
तुल्या भासति सजीव निर्जिव विरहग्रस्त जनाते.'

मूळच्या श्लोकांत ('निदर्शना'–अलंकारात) चैतन्यविरहित मेघ कोठे, आणि इंद्रिये असलेल्या प्राण्यांना पाठवयाचे निरोप कोठे, असे तुलनात्मक आश्चर्यकारक उद्गार आले आहेत. भाषांतरात तो भाव आला नाही. याच्याच पुढील श्लोकांत— 'याञ्चा मोघा वरमधिगुणे नाधमे लब्धकामा' या एका ओळीचे शास्त्रीबुवांनी केलेले भाषांतर सुरस झाले आहे.

'गुणवंताच्या जवळ याचना विफळहि बरवी वाटे
नको नको ती नीचापाशी होतांही फळ मोठे.'

अशाप्रकारे केवळ एक एक श्लोक घेऊन त्याच्या अनुवादात कोणते गुणदोष दिसून येतात हे पाहिल्याने, समग्र अनुवादाचे सौंदर्य लक्षांत येईल, असे मात्र नाही. कारण समग्र अनुवाद वाचून झाल्यावर मनावर होणारा परिणाम लक्षात घेतल्यास शास्त्रीबुवांच्या या 'मेघदूता'चे श्रेष्ठत्व निर्विवादपणे ध्यानात येते. कालिदासाच्या रसिकवृत्तीशी कवीची झालेली समरसता, आणि अर्थवाही प्रासादिक भाषा, यामुळेच हे मेघदूत इतके रसिकप्रिय झाले आहे. 'अवंती देशांतील उज्जनी नगरीचे वर्णन, (७६–९०) 'कैलासगिरीवरील मेघाचे वास्तव्य, (१४४.१५७), 'अलकेची

शोभा ', ' यक्षपत्नीच्या सौंदर्याचे वर्णन ', ' यक्षपत्नीस सांगितलेला निरोप ', इत्यादी सौंदर्यस्थळे लक्षांत घेतल्यास वरील विधानाची सत्यता पटेल.

## समश्लोकी व समवृत्तातील मेघदूताची भाषांतरे

लक्ष्मण गणेशशास्त्री लेले यांनी इ. स. १९०१ मध्ये मेघदूताचे समश्लोकी भाषांतर प्रसिद्ध केले. श्लोकास श्लोक असे हे भाषांतर नाही. मूळच्या काव्यांतील संस्कृतातील सामासिक शब्द मराठी भाषांतरात ठेवणे, मूळचा अर्थ स्पष्ट व्हावा म्हणून एका श्लोकाकरिता दीड दोन श्लोकांची योजना करणे, अंत्य यमक साधणे, इत्यादी वैशिष्ट्ये या अनुवादात दिसून येतात. मूळच्या मेघदूतांतील ५ व्या श्लोकाचे भाषांतर आणि सहाव्या श्लोकांतील भाषांतरित एक चरण, पुढे उद्धृत केला आहे यावरून वरील वैशिष्ट्ये ध्यानांत येतील.

' धूमज्योतीसलिलपवनापासुनी जन्म ज्याचा
न्यावा ऐशा जडजलधरे केवि संदेश साचा
होता उत्कंठित निजमनी तेधवा यक्ष फार
त्या योगाने मुळि न सुचला त्याजला हा विचार
कामार्तांच्या अणुहि न मनी राहतोसे विचार
त्यालागोनी जड अजडही वाटती तुल्य देख '
' ज्ञात्यापाशी विफलहि बरी याचना केलियास
नीचापाशी सफलहि न ती तेवि वाटे मनास '

' तेधवा यक्ष फार ' ' राहतोसे विचार ' – ' त्यालागोनि ' ' केलियास ' इत्यादि शब्दयोजनेतील शिथिलता सहज लक्षात येते. संस्कृतातील सामासिक शब्द भाषांतरात आले आहेत. भाषांतरात मूळच्या अर्थाची हानी होऊ न देण्याची दक्षता शास्त्रीबुवांनी घेतली आहे, हे स्पष्ट दिसून येते.

भालचंद्र शंकर देवस्थळी, यांचे मेघदूताचे समश्लोकी भाषांतर इ. स. १९०३ च्या सुमारास प्रसिद्ध झाले. सामासिक शब्दांची योजना व संस्कृतप्रचुर भाषाशैली यांमुळे हे भाषांतर सामान्य वाचकांस काहीसे दुर्बोधच वाटेल.

उदाहरणार्थ–पुढील पद्य पंक्ति पहा :—

' कोठे धूमानलजलमरुत्संघ ते मेघ कोठे
प्राण्याही जे कुशलकरणी प्रेष्य संदेश कोठे ?
उत्कंठेने गणुनि न वदे प्रार्थुनी वारिदाते
जे कामार्त प्रकृतिजडधी चेतनाचेतनी ते '
......तेणे प्रार्थी...' गुणिजन करो मोघ याञ्चा बरी ती
नीचाहाती सफल जरि हो सुज्ञ ना आदरीती '

**‘ मेघदूतच्छाया ’**

मेघदूतच्छाया हे मेघदूताचे समश्लोकी भाषांतर, बाळकृष्ण लक्ष्मण अंतरकर यांनी १९०५ मध्ये छापून प्रसिद्ध केले. हे भाषांतर करताना भाषांतरकर्त्याला ‘ तीन गोष्टी सांभाळावयाच्या होत्या. पहिली, वृत्त तेच राखावयाचे. दुसरी, मुळांतील अर्थ जाऊ न देता एकाच श्लोकात आणावयाचा व तिसरी, ठेवता येईल तितकी भाषा सोपी व सरळ ठेवायची ’ कवीने ‘ शब्दार्थाकडे लक्ष न देता वाक्यार्थाकडेच लक्ष दिले आहे ’—पुढील भाषांतरित एक श्लोक, व एक चरण उद्धृत केला आहे. त्यावरून कवीचे वरील धोरण स्पष्ट होईल.

‘ कोठें साठा जड जलद हा वायुतोयादिकांचा
कोठे साध्या सु–चतुरजना मात्र संदेशवाचा ।
उत्कंठेने नच गणुनि हे प्रार्थि मेघास तो की
होती मोहे सजिवि अजिवी दीन कामार्त लोकी ’
...‘ श्रेष्ठी युक्ता विफलहि खली याचना पूर्णही न ’

वरील श्लोकांतील दुसऱ्या चरणाचा अर्थ दूरान्वयाने लक्षात येतो. भाषा अर्थवाही आहे, परंतु ती सहजप्रवाही आहे असे नाही.

**‘ मेघाचे अलकेस प्रयाण ’**

गंगाधर गोविंद दामले यांनी ‘ मेघाचे अलकेस प्रयाण ’ या शीर्षकाखाली मेघदूताचा समवृत्त समश्लोकी, मराठींत अनुवाद करून तो १९०३ मध्ये प्रसिद्ध केला. या अनुवादांतही संस्कृत सामासिक शब्दांचा वापर अपरिहार्यपणे केलेला दिसतो. उदाहरणार्थ खालील श्लोक पहा.

‘ धूमज्योतिःसलिलमरुती जाहला मेघ कोठे ?
शक्य प्राण्याकरवि असले प्रेष्य संदेश कोठे ?
औत्सुक्ये हे न कळुनि तये प्रार्थिले अंबुदाते
जो कामी तो सहजि न गणी चेतनाचेतनाते ।

गणेश नीलकंठ कात्रे यांनी समवृत्ताचे समश्लोकाचे आणि यमकाचे बंधन स्वीकारून मेघदूताचे भाषांतर केले. संस्कृतमधील एका श्लोकांतील संपूर्ण आशय मराठीत एका श्लोकात आणणे, भाषांतरकर्त्यांस किती कठीण झाले असेल याची कल्पना पुढील उताऱ्यावरून वाचकांस होईल.

‘ कोठे ज्याचा पवनसलिली धूमतेजांत जन्म
कोठे प्राण्या सुचतुर अशा साध्य ते दूतकर्म ।
नेणोनी हे विनवित वना यक्ष औत्सुक्ययुक्त
कामार्तांना फरक न कळे चेतनाचेतनांत ’
......‘दुष्टात्म्यांची उपकृति नको थोर नाही म्हणोत ’

शेवटच्या चरणांत मूळच्या अर्थाची किती ओढाताण झाली आहे ! देवस्थळींच्या भाषांतरित कृतीशी वरील भाषांतरकृति ताडून पाहण्याजोगी आहे.

दत्तात्रय व्यंकटेश केतकर यांच्या मेघदूतानुवादात बाळशास्त्री हरदास यांनी म्हटल्याप्रमाणे सौंदर्याविष्कारापेक्षा कांटेकोरपणा अधिक आहे. उदाहरणार्थ—

‘ कोठे तोयादिक मिसळुनी सिद्ध तो मेघ भूते
कोठे न्याया पटुमतियुते पात्र संदेश दूते—
उन्मादे हे ज्ञणि विसरुनी यक्ष सांगे तयाते
कामार्तांची मतिकृपणता नेणते चिज्जडाते ’
......‘ कांक्षा श्रेष्ठीं विफलहि बरी नाधमी सत्फलाही ’

## ‘ महाराष्ट्र-मेघदूत ’

एका विस्तृत व प्रमाणबद्ध दालनातील, कुशलतेने रचून ठेवलेले मौल्यवान सामान दुसऱ्या संकुचित व अडचणीच्या जागेत, तितक्याच कुशलतेने रचून ठेवणे जितके अवघड आहे, त्यापेक्ष अनेकपटीने संस्कृत भाषेतील एका अप्रतिम काव्याचे मराठीत यथायोग्य भाषांतर करणे अवघड आहे ’ असे विचार शांताराम आत्माराम सबनीस यांनी ‘ महाराष्ट्रमेघदूत ’ या पुस्तकाच्या प्रस्तावनेत प्रकट केले आहेत. सबनीसांनी हे भाषांतर १९२८ मध्ये प्रसिद्ध केले. पुस्तकाला साहित्याचार्य न. चिं. केळकर यांचा पुरस्कार आहे. समवृत्ताचे व यमकाचे बंधन ग्रंथकर्त्याने स्वीकारून हे भाषांतर केले आहे.

‘ धूम, ज्योती, जल, पवन यांपासुनी मेघ होती
दूती योग्या करणपटुता त्यात कैसी अहो ती।
हे उत्कंठाविधुर विसरे प्रार्थि मेघा विचारा
योग्यायोग्यी स्मरहत न दे लेश थारा विचारा. ’

वरील श्लोकात ‘ कामार्त ’ आणि ‘ स्मरहत ’ ‘ औत्सुक्य ’ व ‘ उत्कंठाविधुर ’ ‘ पटुकरण ’ आणि ‘ करणपटुता ’ इत्यादी समानार्थक शब्दांचे स्वरूप लक्षात घेतल्यास ग्रंथकर्त्यास, संस्कृत सामासिक शब्दांचा कसा सढळ हाताने उपयोग करणे भाग पडले हे दिसून येते.

‘ याच्ञा वन्ध्या गुणिजनि बरी, सत्फला दुर्जनी न ’

या चरणात मूळचा अर्थ—यशस्वी रीतीने प्रगट झाला आहे. यासंबंधी तात्यासाहेब केळकर लिहितात ‘ पूर्वमेघातील सहाव्या श्लोकातील शेवटच्या ओळीतला अर्थांतरन्यास मी एकाच ओळीत बसविण्याचा प्रयत्न केला पण तो मला साधता आला नाही......तुमच्या भाषांतरात तो यशस्वी रीतीने साधलेला आहे ’ अनेक रसिकही या मताशी सहमत होतील असे वाटते.

चिंतामण द्वारकानाथ देशमुख, यांनी मेघदूताचा अनुवाद समश्लोकात व समवृत्तांत केला. तो सयमकहि आहे. (प्रसिद्धीचा सन १९४४) पांडित्य आणि रसिकता यांचा साठा ग्रंथकर्त्यांजवळ विपुल प्रमाणात आहे. त्यांचे हे व्यक्तिमत्त्व त्यांच्या भाषांतरित कृतीत प्रगट झाले आहे. मूळचा आशय यथातथ्य स्वरूपात अनुवादांत आणतांना त्यांनाही संस्कृत शब्दांचा सढळ रीतीने उपयोग करणे भाग पडले, असे दिसून येते. उदाहरणार्थ पुढील श्लोक पहा :

'धूम्राग्नीचा पवनसलिली मेळ तो मेघ कोठे ?
वार्ता नेणे समुचित कुठे सेंद्रिय प्राणियांते !
उत्कंठेने नच गणुनि हे गुह्यके प्रार्थिले त्या
कामार्तांना जड अजड हे भान नाहीच जात्या.'

तसेच—'ना श्रेष्ठांची तरिहि बरवी 'हो' नको दुर्जनाची'. मात्र येथे 'हो' 'ना' ने मूळच्या चरणातील भाषासौष्ठव, अबाधित राहिले नाही असे वाटते.

द. वि. पंडित यांनी मेघदूताचे समश्लोकी, समवृत्तात्मक व सयमक भाषांतर करून ते १९५४ मध्ये प्रसिद्ध केले.

'धूमज्योतीजलपवन हा संघची मेघ कोठे ?
बुद्धिग्राह्य प्रगतिपर ते प्रेमसंदेश कोठे ?
उत्कंठेने विसरूनि परी याचितो यक्ष हन्त
कामांधाला फरक न दिसे चेतनाचेतनांत'

संनिपात-संघ, संदेश-प्रेमसंदेश, कामार्त-कामांध या शब्दार्थांच्या जोड्या लक्षांत घेतल्या म्हणजे भाषांतरकर्त्याला मूळचा आशय भाषांतरांत अबाधित ठेवणे कसे अशक्य झाले हे दिसून येते; शिवाय 'प्रकृतिकृपण' 'पटुकरण' इत्यादी शब्दांचा अनुवाद भाषांतरात आला नाही. 'याञ्चा वाया सुखद सुजनी सत्फला ना खलाची' या अनुवादांतील दूरान्वय रसिकांना जाणवल्याशिवाय राहात नाही.

येथपर्यंत मेघदूताची जी समवृत्तात मराठीत भाषांतरे झाली त्यांचा विचार केला आहे. कृष्णशास्त्री चिपळूणकर यांच्या साकिजातीतील भाषांतराचा आरंभीच उल्लेख केला, याचे कारण कालानुक्रमाने ते भाषांतर जसे पहिले तसेच रसिकप्रियतेच्या दृष्टी-नेही ते महत्त्व पावले आहे. याशिवाय अलीकडील जातीवृत्तातील भाषांतरित मेघ-दूतामध्ये रामचंद्र चिंतामण श्रीखंडे यांच्या भाषांतरित 'मेघदूता'चे वैशिष्ट्य लक्षांत घेणे आवश्यक आहे. 'इंद्रवज्रा' किंवा 'उपजाति' या वृत्तातील हे मराठी भाषांतर लेखकाने विस्तृत प्रस्तावनेसह इ. स. १९५० मध्ये प्रसिद्ध केले. संस्कृत महाकाव्याचे मराठीतील त्यांचे अनुवाद ('सुश्लोकगोविंद', 'सुश्लोकुमार') फार रसिकप्रिय आहेत. प्रासादिक भाषाशैली हा त्यांच्या भाषांतरित कृतीचा गुणविशेष आहे : त्याचा पडताळा त्यांच्या 'सुश्लोकमेघात'ही मिळतो :

'तो धूम्र अग्नीजल वायु यांचा । निर्जीव मेळा जलवाह कोठे ?
जे पाठवावे पटु इंद्रियांच्या । प्राण्यासवे तेहि निरोप कोठे ?
यक्षा न राहे परि हा विवेक । औत्सुक्ययोगे विनवी घनाते
स्मरार्त जात्याच न पाहती की, । सजीवनिर्जीवविभेद चित्ते !

मूळच्या आशयाची कल्पना वरील श्लोकावरून येते. विशेषतः धूम, अग्नि, जल इत्यादिकांचा निर्जीव मेळा आणि पटु इंद्रियांच्या प्राण्यासवे पाठवावयाचा निरोप, यांतील विरोधाची स्पष्ट जाणीव श्लोकाच्या पूर्वार्धावरून रसिकांस होते, यांत शंका नाही

'बरी भल्या मागणि निष्फळाही,
नको खळा ती जरि सिद्धि पावे'

या एका चरणाचा अनुवादही मूळच्या अर्थाला धरूनच आहे. पण संस्कृतातील अर्थगांभीर्य आणि अर्थसौष्ठव प्रयत्न करुनहि मराठी भाषांतरात आणणे कवीस कसे कठीण होऊन बसते, हे अशा वेळी लक्षात येतेच.

रा. प. सबनीस यांनीही मेघदूताचे साकी जातीत मराठीत भाषांतर केले आहे. लेखकाचा मुख्य हेतु मूळच्या श्लोकांतील अर्थ यथातथ्यपणे मराठीतील अनुवादांत उतरविण्याचा आहे असे दिसून येते.

'कुठे अचेतन धूमवायुजलतेजःसमूह मेघ
कुठे कुशल जे नेण्या प्राणी बलशालींद्रिय योग्य.
उतावीळमनि न हे आणिती यक्ष तयाते विनवी
भ्रमिष्ट जात्या कामाकुल जन सजिवनिर्जिवाविषयी'

याअनुवादात लेखकानें यमकाचे बंधन पाळले नाही हे विशेष. तरीही अनिर्बंधपणे मूळचा अर्थ अनुवादात उतरला आहे असे वाटत नाही.

'बरवी थोरा विनंति निष्फळ
नको सफळ ती नीचा....'

या चरणांतील अर्थात स्पष्टपणा आहे. असाच अर्थाचा स्पष्टपणा अनुवादात अनेक स्थळी आला आहे.

कुसुमाग्रज (वा. वि. शिरवाडकर) यांनी 'समुदितमदना' या जातिवृत्तांत 'मेघदूता'चा मराठीत अनुवाद करून तो १९५६ मध्ये प्रसिद्ध केला. मूळचा आशय साकल्याने सोप्या स्पष्ट शब्दात प्रगट तर करावयाचा, परंतु त्याबरोबरच मराठी भाषेच्या मूळप्रकृतीला दुखवावयाचे नाही, असे दुहेरी धोरण लेखकाने या अनुवादात पत्करलेले दिसते. लेखकाचा हा प्रयत्न पुष्कळ अंशी यशस्वी झाला आहे. याची कल्पना नमुन्यादाखल पुढे केलेल्या श्लोकावरून येईल.

'वाहत जीवन परंतु मेघा जीवित नाही मुळी
धूम्र बाष्पमय, नेइल कां संदेश नेमक्या स्थळीं
अंध असे हा प्रणय त्याजला जीवाजीव न दिसे
विवेक सुटुनी कामार्तांची प्रज्ञा हो पांगळी'

जीवाजीवांत कामार्ताला भेद दिसत नाही, या मूळच्या कल्पनेला 'प्रणय अंध असतो' या सर्वमान्य संकेताचा उपयोग केल्याने जरी बाध आला असला, तरी त्यामुळे कालिदासाच्या अभिप्रेत दृष्टिकोनाला तितकासा अन्याय झाला आहे असे वाटत नाही. मूळच्या मेघदूताचे सौंदर्य साकल्याने रसिकास घडवून आणावे व असे करताना तपशिलात थोडे फार फेरफार करावे लागले तरी ते करण्याचे स्वातंत्र्य आपणाकडे ठेवावे, असा प्रकार कुसुमाग्रजांच्या या अनुवादात झालेला दिसतो.

'नको अनुग्रह अधमाचा मज त्याहुन वाटे वरी
गुणवंताच्या घरी निराशा-शल्य तिचे ना मना--'

या भाषांतरित पद्यपंक्तीवरून कवीने मूळच्या वास्तुसौंदर्याला, वस्तुतः नव्हे, तर साकल्याने, रसिकापुढे कसे उभे केले आहे ते दिसून येते.

## 'सुश्लोक गोविंद'

मराठीत 'गीतगोविंदा'ची पद्यात जी भाषांतरे झाली आहेत त्यांत रामचंद्र चिंतामण श्रीखंडे यांचे भाषांतर विशेष रसिकप्रिय आहे. 'सुश्लोक गोविंद' या पुस्तकाच्या प्रस्तावनेत लेखकाने लिहिल्याप्रमाणे "'भक्ति व शृंगार' या दोन भरजरी सूत्रांनी गीतगोविंदाचा काव्यपट जयदेवाच्या अलौकिक प्रतिभेने विणला आहे.' अनुराग, विरह, उत्कंठा इत्यादि नायक-नायिकांच्या ठिकाणी दिसून येणाऱ्या मनाच्या अवस्था जयदेवाने कौशल्याने चित्रित केल्या आहेत. श्रीखंडे यांनी मूळकवीच्या मनोवृत्तीशी समरस होऊन सुबोध व प्रासादिक शब्दांत गीतगोविंदाचा जो अनुवाद केला आहे, त्या अनुवादाची अल्पशी कल्पना यावी म्हणून पुढे भाषांतरातील एक श्लोक उद्धृत केला आहे

तुझे पदाब्ज वंदिलें मुरारिने अनेकदा, ।
वदेहि कांत मंजु मंजु रंजवी तुला सदा; ॥
मुकुंद वल्लरीगृही असे तरंगिणी-तटी ।
तिथेचि जा प्रियाकडे ! मिळो हरीसि गोरटी !

## 'गंगालहरी चे अनुवाद'

पंडित जगन्नाथराय कृत 'गंगालहरी'तील ५१ श्लोकांची मराठीत अनेक भाषांतरे वा रूपांतरे झाली आहेत.

का. बा. पंडित ऊर्फ 'भृंग' या कवींनी गंगालहरीचा अनुवाद सुरस व

सुश्लिष्ट शब्दात केला आहे. जगन्नाथरायांच्या मनोवृत्तीशी कवि किती समरस झाले होते, याचा प्रत्यय त्यांनी लिहिलेल्या अखेरच्या श्लोकावरून येतो.

‘ जगन्नाथे केली रसभरित पीयूषलहरी ।
सुधेच्याहि गर्वा सहज गमते ही मज हरी । ’

रा. भा. भांबुरकर यांनीही ‘गंगालहरी’चा गेयप्रधान विविध जातिवृत्तांत जो अनुवाद केला आहे त्यातून त्यांची दृष्टि मूळ कृतीचा अर्थ रसिकांना सुबोध शब्दांत उलगडून दाखवावा अशीच आहे. उदा० पुढील गीत पाहा.

‘ दुरित लया नेवो ।
असे ते पावन तव जल गंगे । अमुचे ॥ ध्रु ॥
सौभाग्याचे जे या वसुधेचे ।
सर्वस्वच गे जेहि श्रुतीचे ॥
साक्षात् पुण्य सुरांचे ।
श्वेत सुधेरूप तेज जयांचे ॥ ’

विशेष म्हणजे कवीने मूळ श्लोकांचा अर्थ गद्यांत सुबोध शब्दात दिला आहे.

एकनाथ पांडुरंग रेंदाळकर यांनी गंगालहरीचे चवदा श्लोकांतच जे मराठीत भाषांतर केले आहे, ते वाचून झाल्यावर या कवींनी बाकीच्या श्लोकांचे भाषांतर का केले नाही, अशी हुरहुर मनाला लागून राहते. रेंदाळकरांची ही मराठीतील अपुरी राहिलेली ‘ गंगालहरी ’, प्रासादिक रचनेच्या दृष्टीने, ‘ अपूर्वच ’ म्हटली पाहिजे. त्यांच्या प्रासादिक भाषाशैलीचा हा नमुना पहा.

‘ सोडुनिया थोर राज्ये तशी वैभवेही तृणासारखी मानुनी ।
गंगे किती लोक हर्षे तुझ्या तीरदेशावरी राहती येउनी ।
तोये सुधेहून सुस्वादु ही प्राशुनीया तुझी तुष्ट होती अती ।
त्वद्वैभवाकृष्ट सारेहि ते मुक्तिसौख्यासहि जाण आव्हेरिती ॥’

## ‘ गीतासुधा ’ आणि ‘ गीताई ’

भास्कर दामोदर पाळंदे यांचे ‘ गीतासुधा ’ हे भगवद्‌गीतेचे साकी जातीतील समश्लोकी भाषांतर इ. स. १८७३ त प्रसिद्ध झाले.

‘ स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मोभयावहः ’

या चरणाचे भाषांतर—
निजधर्मी वा मरणहि उत्तम । परधर्मी भय फार ॥

अशा सुबोध शब्दांत केले आहे. भा. दा. पाळंदे यांची ही ‘ गीतासुधा ’ आरंभीच्या भाषांतरित ग्रंथात नमुनेदार ठरावी, अशीच आहे.

विनोबा भावे यांची ‘ गीताई ’ विशेषतः अनुष्टुभ छंदात रचिलेली आहे.

तीत मूळ अर्थाचा काटेतोलपणा अनुवादात आला आहे. 'गीताई' तील प्रत्येक शब्द कसोशीने निवडला आहे. प्रत्येक श्लोक जितका अर्थपूर्ण तितकाच तो प्रसादपूर्ण झाला आहे. 'गीताईच्या' मागे भाषांतरकर्त्यांचे थोर पवित्र व्यक्तिमत्त्व उभे आहे, असा एकसारखा भास होतो: आदर्श भाषांतराचा नमुना 'गीताई'ने रसिकांपुढे उभा केला आहे, यात शका नाही.

वामन शंकर आठवले यांनीही श्रीमद्भगवद्गीतेच्या केलेल्या आर्यारूप अनुवादात 'गीतारहस्या'तील अर्थच बहुतेक ठिकाणी अनुसरिला आहे: मूळच्या वेगळ्या छंदा-बद्दल दिंडीवृत्त योजले आहे. हा आर्यावृत्तातील मूळगीताच्या श्लोकाशी समांतर छापलेला असल्यामुळे, संस्कृत जाणणाऱ्या गीताभ्यासकाची मोठी सोय झाली आहे. भाषांतरकर्त्यांची भाषा अर्थवती आहे पण संस्कृत शब्दांचा भरणा अधिक आहे. उदाहरणार्थ पुढील पद्यपंक्ति पाहा.

'द्वेष करी न कुणाचा करुणाकर जो सुमित्र सर्वांचा
निर्मम निरहंकारी सुखदुःखीसम दयार्द्र हृदयाचा'

**'रामायणाच्या केवळ कथासूत्राच्या आधारे लिहिलेली काव्ये'**

बनविहार, रणविहार, गृहविहार:—

रघुवंशाच्या धर्तीवर एखादे मराठीत महाकाव्य रचावे, या हेतूने साधुदास यांनी 'वनविहार' 'रणविहार' आणि 'गृहविहार' अशा तीन खंडांत रामायणाची मूळकथा विविधवृत्तात श्लोकबद्ध स्वरूपात मराठीत आणिली. आपली भूमिका स्पष्ट करताना साधुदास लिहितात 'रामप्रभूच्या लीला, विषयाकरिता मिळाल्या, महाकवि वाल्मीकींनी कथासूत्राचा पुरवठा केला, मात्र, कालिदास ज्ञानेश्वरादिकांनी कल्पना दिल्या.' आपली ही काव्ये भाषांतरित व रूपांतरित नाहीत याचा निर्वाळा कवींनी दिला आहे. 'एका कथासूत्राखेरीज— मी दुसरीकडून कांहीहि घेतले नाही. तो बरा वाईट कसाही असला तरी माझ्या कल्पनेचा विकास आहे.' असे कवि म्हणतात.

कवीच्या रसिकवृत्तीची आणि विद्वत्तेची प्रचीति खालील श्लोकावरून येईल.

लटिका प्रपंच घटिकभरी नवा करुनी तयामधिल कौतुकोत्सवा
जगतास सेव्यतम दाखवावया वरि जानकी सगुण रामराजया ।

गृहविहार १३–४१

जी कोमला श्रांत पथात होउनी राहे उभी म्लानमुखे पदी पदी
तीते दृढालिंगन राम देउनी पाजी स्वनेत्रेंदु–विलोककौमुदी

वनविहार १–५९

बाणावरि सुटति बाण भटद्वयाचे ।
की वीर्य–सिंधु–युग–वारि–तरंग साचे ।
अन्योन्य जीवित–विनाश करावयाला ।
दोघी जणो पसरिल्या शर–पाश–माला ।' रणविहार–११–१००

साधुदासांची ही महाकाव्ये भाषांतरित वा रूपांतरित नाहीत. त्यांची गणना स्वतंत्र काव्यातच करणे इष्ट होईल. अलीकडच्या काळात जुन्या पंडित–कवीप्रमाणे संस्कृतातील महाकाव्यांच्या आधारे ज्यांनी मराठीत काव्यरचना केली, त्यांच्या कार्याचे स्वरूप रसिकांच्या लक्षात यावे, या हेतूनेच केवळ या प्रकरणात वरील महाकाव्यांचा निर्देश केला आहे.

वाल्मीकीच्या रामायणातील कथाभागाचा ज्यांना केवळ अप्रत्यक्ष आधार आहे, अशा स्वतंत्र–काव्यात ग. दि. माडगूळकरांच्या 'गीतरामायणा'चा उल्लेख करणे अत्यावश्यक आहे. 'गीतरामायण' सर्वतोमुखी होण्याचे मुख्य कारण केवळ त्यांत गेयमधुरताच आहे असे नाही, तर त्यातील भावमधुरतेने आणि विचार-सौंदर्याने, रसिकांची मने वेधून घेतली आहेत यात शंका नाही. (उदा० ७, १३, २१, ३१, ४२, इ. गीते पाह.)

रामायणाच्या आधारे रचिलेले मराठे यांचेही ओवीबद्ध रामायण प्रसिद्ध आहे. तसेच सारजाबाई बापट यांनी रामायणाची कथा आपल्या 'काव्यरामायणा'त मोठ्या भक्तिभावाने सरस आणि प्रासादिक भाषेत वर्णिली आहे. काव्यरामायणाच्या प्रस्तावनेत द. वा. पोतदार यांनी म्हटले आहे 'सारजाबाईचे हे काव्यरामायण एखाद्या सुबकशा पुष्करणीसारखे आहे. या पुष्करणीत नक्र नाहीत लाटा नाहीत बुडण्याची तर काडीचीहि भीति नाही.'

वासुदेव शिवराम कोल्हटकर यांनीही महाभारताचा भावार्थ, 'अभंग-भारतांत' आणून मराठीतील एतद्–विषयक काव्यक्षेत्रांत एक अपूर्व कामगिरी केली आहे. 'गीतामृत–शतपदी' (खं. कृ. गर्दे) या पुस्तकात श्रीमद्‌भगवद्‌गीतेच्या तात्पर्याची शंभर सुरस पदे आली आहेत. अशा प्रकारे रामायण महाभारत इ. ग्रंथातील कथासूत्रांच्या आधारे मराठीत अनेक स्वतंत्रच काव्यकृति निर्माण करण्याची परंपरा अबाधित चालू असल्याचे दिसून येते.

रवींद्रनाथ टागोर यांच्या गीताञ्जलीचे मराठीत कांही पद्यबद्ध अनुवाद झाले आहेत. त्यांत 'ऋग्वेदी' यांनी केलेला 'अभंगगीताञ्जलि' हा अनुवाद प्रसिद्ध आहे. या अनुवादाचे वैशिष्ट्य असे, की 'गीताञ्जली'तील प्रत्येक गीताचे अभंगामध्ये भाषांतर करून शिवाय त्या त्या गीताचा गद्यामध्ये स्पष्ट अनुवाद केला आहे. संत तुकारामांच्या अभंगांतील समानार्थक वचनेही प्रत्येक गीताचे शेवटी दिली आहेत. भाषा ओघवती व प्रासादिक आहे. परमेश्वर हा कवीचा कवि आहे हा भाव भाषांतर–कर्त्याने खालील शब्दांत प्रगट केला आहे: (मूळचे गीत ४३)

त्वन्मुख पहाता कवित्वाचा गर्व । वितळेल सर्व क्षणामाजी ।
कवींचा कवि तू तुझ्या पायांपाशी । मज रहायासी स्थान देई ।
माझ्या जीविताची मुरली सरळ । सुंदर मंजुळ बनवीन ॥

वेणूच्या या छिद्री तुझे रम्य स्वर । भरोत सत्वर कविराया ॥
( बं. आमार ए गान छेडे छे तार )

त्याचप्रमाणे दे. ल. महाजन यांच्या 'महाराष्ट्रगीतांजली'चाहि उल्लेख करणे आवश्यक आहे. साकी जातीतील या अनुवादाची भाषा ओघवती व अर्थवाही आहे. याचा प्रत्यय खालील पद्यपंक्तीवरून रसिकास येईल.

'कोपऱ्यांत मी बसुन एकटा होतो भजन करीत
मद्‌भजनाचा पडला तेव्हा सूर तुझ्या कानात
निजसिंहासन सोडुनि तत्क्षणि खाली तू आलास
माझ्या दारी हळुच येउनी प्रभो प्रगट झालास'

माधवानुज ( का. ह. मोडक ) यांनीही गीतांजलीतील कांही गीतांचे पद्यबद्ध अनुवाद केले आहेत. रवींद्रनाथ टागोरांच्या गीतांजलीतील भक्तिभाव मराठी रसिकांस संतकवींच्या काव्यांतील भक्तिभावाची आठवण करून देणारा होता; मात्र रवींद्रांच्या काही गीतांतील गूढ वातावरणाची मोहिनी मराठी रसिकांना अपूर्व वाटली, आणि तीच अनेक अनुवादांना प्रेरक झाली. भा. रा. तांबे यांच्या कांही भावगीतावर रविंद्रांच्या गीतांञ्जलीचा परिणाम झाल्यासारखा वाटतो अशी टीका होते. तथापि तांबे यांची गीते त्यांच्या स्वतंत्र कल्पनावैभवाचीच साक्ष देणारी ठरतात यांत शंका नाही. त्याच प्रमाणे 'ओढणी' या अभंगांची धाटणी व ढब रवींद्रांच्या 'गीतांजली'सारखी वाटते असा अभिप्राय प्रा. माटे यांनी व्यक्त केला होता, तथापि 'ओढणी'ची निर्मिती पूर्णपणे स्वतंत्ररीतीनेच झाली आहे.

## सारांश

या प्रकरणाच्या आरंभी लिहिल्याप्रमाणे संस्कृत, इंग्रजी बंगाली, आणि इतर प्रचलित भारतीय भाषेतील काव्यवाङ्मयाचे मराठीत अनेक पद्यबद्ध अनुवाद झाले आहेत, त्यामुळे आधुनिक मराठी काव्याला प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे लाभच झाले.

केशवसुतांपूर्वी गोडबोले, राजवाडे, लेले प्रभृति कवींनी संस्कृतवाङ्मयातील विशेषत: विदग्धमहाकाव्यांची, मराठीत पद्यबद्ध भाषांतरे वा रूपांतरे केली. त्यावेळी अनुवादात्मक पण्डिती वळणाचे काव्य मोठ्या प्रमाणात निर्माण झाले. कालिदास भवभूति बाण, इत्यादी महाकवींच्या काव्यांचे पण्डित--कवींनी परिशीलन करून संस्कृतातील महाकाव्योदधीतील निवडक काव्यरत्नांचा परिचय मराठी रसिकांना करून दिला. रघुवंशाचे, कुमार संभवाचे, बाणाच्या कादंबरीचे, पद्यबद्ध अनुवाद, याच काळात निर्माण झाले. त्यातल्या त्यात कालिदासाच्या मेघदूताचे भाषांतर करण्याची त्यावेळी जी प्रथा चालू झाली तिला अद्यापि खंड पडला नाही. प्राचीन मराठी कवींनी वरील मेघदूताकडे विशेषसे लक्ष दिले नव्हते, त्याची सव्याज फेड आधुनिक काळातील पण्डित--कवि करीत आहेत असे वाटते.

इ. स. १८८५ नंतर आधुनिक मराठी काव्याला निराळे वळण लागले. इंग्रजी काव्यवाङ्मयाच्या अभ्यासामुळे तत्कालीन केशवसुतादी कवींनी मराठीत जे नवे नवे काव्यप्रयोग केले, त्यातच आत्मनिवेदनपर स्फुट भावगीतलेखनाचा प्रकार विकास पावला. भावगीताप्रमाणेच सुनीत, नाट्यगीत, उद्देशिका, विलापिका इत्यादी काव्यप्रकारही मोठ्या प्रमाणात रूढ झाले. काव्याच्या बाह्यांगावर तसाच अंतरंगावर परिणाम झाला. बहुविध घरगुती साध्या विषयातून व्यक्तिगत नवे नवे आशय शोधण्याची उत्कंठा कविवर्गात निर्माण झाली. केशवसुतपूर्वकालीन कवींनी इंग्रजीतील स्फुट भावगीतांची भाषांतरे वा रूपांतरे केली होती; ती प्रथा केशवसुतानंतर कमी झाली. तथापि इंग्रजी काव्यवाङ्मयात ज्या नव्या प्रवृत्ति व ध्येये निर्माण झाली, त्यांचा मराठी कवींवरही प्रत्यक्षाप्रत्यक्ष परिणाम होत गेलाच. स्वातंत्र्योत्तरकाळातही इंग्रजीतील काव्यवाङ्मयाचा इष्टानिष्ट परिणाम मराठी काव्यावर झाला. पाश्चात्य देशातील इलियट, स्पेंडर ऑडेन इत्यादि कवींनी व्यक्तिवादाला आणि मानवतावादाला धरून युध्दोत्तर काळात जे क्रान्तिकारक दृष्टिकोन प्रकट केले, व त्यातील काही नवे कवी, जे दृष्टिकोन प्रगट करीत आहेत, ते अलीकडील मराठीतील नवकवींनाही उद्बोधक वाटत आहेत. मात्र केशवसुतादी कवींनी ज्याप्रमाणे आपले व्यक्तित्व स्वतंत्रपणे काव्यातून प्रगट केले, त्याप्रमाणे अलीकडील कवींच्या मनावर जरी अन्य वाङ्मयातील विचारांचा परिणाम होत आहे, तरी त्या विचारांना आत्मसात करून नवकवी स्वतःचे व्यक्तित्व आपल्या काव्यातून प्रकट करीत आहेत. नव्यकाव्यात दिसून येणारा हा क्रान्तिकारक विचारप्रवाह ‘ परपुष्ट ’ नाही.

आजच्या नवकवींनी इंग्रजीतील नवकाव्यात दिसून येणाऱ्या प्रवृत्ति–ध्येयाचे अंधानुकरण केले नाही. विज्ञानयुगामुळे जसे स्थलकालाचे अंतर कमी झाले, त्याचप्रमाणे निरनिराळ्या राष्ट्रातील वाङ्मयप्रवाहांना अनिर्बंधपणे संचार करण्याची संधी प्राप्त झाली. मात्र मराठीतील काव्यवाङ्मयाचा जितका इंग्रजीतील काव्यवाङ्मयाशी संबंध आला, तितका तो इतर यूरोपीय भाषेतील वा अन्य भाषेतील वाङ्मयाशी फारसा आला नाही. परंतु एकंदरीत विचार केल्यास, आधुनिक मराठी काव्याच्या अंतःप्रवाहात जरी अनेक भाषांतील काव्यांचे प्रवाह येऊन मिळाले, तरी त्यामुळे मूळच्या प्रवाहाला कोठलाही अडथळा झाला नाही; उलट ते प्रवाह आत्मसात करून पुढे जोमाने जाण्याची प्रवृत्तीच आधुनिक मराठी काव्याच्या अंतःप्रवाहात दिसून येते यात शंका नाही.

* * *

# सूची

अत्रे प्र. के. १५०, १७०, २००, २०९, २१०.
अधिकारी गो. गो. ५३, २३६.
अनंततनय (आपटे द. अ.) ९०, १४७, २००.
अनामिकाचे अभंग ४०.
अनिरुद्ध पुनर्वसु १९७, १९८, १९९,
अनिल (देशपांडे आ. रा.) १७, १८, ६४, ६५, ६९, ११८, १५०, १५१, १७१.
अभंगगीतांजली २४८.
अभंगांजली ३४, ३५.
अमृतराय २४.
'अर्धचंद्र' २२०.
अरविंद (शिंदे भा. ना.) १४३.
"अश्विनी" १५२.
अक्षरवेल १२२, १५२.
अज्ञातवासी (केळकर दि. गं.) १४२.
अंतरकर बा. ल. २४१.
आगरकर गो. ग. ३०.
आगाशे गणेश जनार्दन ५१, ५२.
आठवले वा. शं. २४७.
आठवले शांताराम १७९.
ऑडेन २५०.
आपटे गो. ल. २१७.
आपटे ह. ना. २५, २०५, २०६.
आपट्यांची पाने २१७.
आरती प्रभु १५२.
आशागीत ६२, १७५, १९६.
इंदिरा २३०.
इलियट ६८, २५०.
इलियड २३१.
उपाध्ये ज. के. ५३, २१३, २१९, २३६.
उमरखय्याम ५२, ५७, २३५.
ऋग्वेद ८२.
ऋग्वेदी २४८.
ऋतुसंहार ८९, ९१.
एकनाथ ४१, १८७.
जोशी पु. बा. १३३.
ओढणी ६३, २४९.

कमला ९७.
करंदीकर अ. ज. ५३, २३६.
करंदीकर विंदा १६, ७८, १२१, १४४, १५१, १५३, १५४, १७९, १८०, १९६, २००.
काणेकर अनंत ७८, १०८, ११४, १७०, २१२, २१३.
कांत वा. रा. १६, १२१, १५१, १५२, १५३, १५४.
कात्रे ग. नि २४१,
कानिटकर गो. वा. २१, २२, २४.
काय हो चमत्कार ११५.
कारखानीस दत्तप्रसन्न. १७३, २१९.
कारे दा. अ. ११२, ११४, ११७.
कालचक्र ९२.
कालिदास ७, ८३, ९०, ९१, ९३, ९८, १३१.
कॉलेजचे विश्व २१६.

काव्यरत्नावली ९१.
काव्यरामायण २४८.
काव्यकांतार ६६.
काळेले रा. अ. १२०, १५१.
किप्लिंग रुडिअर्ड २५.
किर्लोस्कर अण्णा १३७.
कीर्तिकर का. र. २१, २४, २३०, २३१.
कुंजविहारी ( सलारकर ह. गु. ) १४२.
कुमुदबांधव ( स. अ. शुक्ल ) १७३.
कुंटे ( म. मो. ) ८८, १२७, १३०, १३३.
कुलकर्णी ग. वि. ६७.
कुलकर्णी गो. मा. १५३.
कुलकर्णी वि. म. १५२, १५४, १७९, १८१, १९८.
कुसुमाग्रज ( वा. वि. शिरवाडकर ) १६, ७८, १२०, १२१, १४४, १४७, १५१, १५२, १७५, १७६, २४४.
केकावली २३.
केतकर द. व्यं. २४२.
केचे मधुकर ७०.
केशवसुत ( कृष्णाजी केशव दामले )
काव्यविचार २–९, १३–१८ २०.
राष्ट्रीय सामाजिक विचारसरणी, १३४, १३५, १४८, १४९, १५०, १५४.
प्रेमगीते १५६, १६०, १५३, १७९.
बालगीते १९२
जीवनविषयकतत्त्वज्ञान २१, २५–३०, ३१, ३८, ३९, ४२, ४९, ५८, ५९, ६८, ७४, ७८.
निसर्ग विषयक–दृष्टिकोन ९२, ९५, १०१, १०२, १०३, १०४, १०५, १०६, १०९, १२४.
इतर २१०, २२७, २५०.
केळकर न. चिं. ५२, २१७, २४२.
कोलते वि. भि. २००.
कोल्हटकर महादेव शास्त्री १२६, २२३, २२४.
कोल्हटकर वा. शि. २४८.
कोल्हटकर श्री. कृ. १४४.

खरे वा. शा. १३७.
खांडेकर नारायण धोंडो २४.
खांडेकर सूर्यकान्त २००.
खापर्डे बळवंत गणेश ६६.
खिस्तायन ३४, ३५.

गडकरी ( गोविंदाग्रज ) रा. ग. ७, ८, ९, १२, १४, १५, १६, ४०, ४१, ४२, ४३, ४४, ४५, ४६, ४७, ५८, १०७, १०८, १०९, १४४, १४९, १५४, १५६, १५७, १६१, १७०, १८५, २०७, २१२.
गर्दे खं. कृ. २४८.
गंगालहरी २४५, २४६.
गंगावर्णन ८४, ८६.
गंगावर्णनआर्या ८६, ८७.
गणेशपूजन १३६.
ग्रामोपाध्ये गं. ब. १५४.
गिरीश ( शं. के. कानेटकर ) १४, १६, ६०, ११४, ११६, ११७, १७२, २००, २१२, २३३.
गीतगोविंद २४५.
गीतांजली ६६.
गृहविहार २४७.

गीताई २४६, २४७.
गीतासुधा २४६.
गोखले ह. स. ६९, १९४.
गोडबोले रावजीशास्त्री ८९.
गोदागौरव १०१.
गोमंतदेवी ११२.
गोवईकर पु. वा. १३३.
गोविंद शाहीर ६, ४२, ५१, १३७, १३९, १४१.

घाटे द. कों. (दत्त) ९५, ९६, ९८, १३३, १३५.
घाटे वि. द. १४४.
घाणेकर नाथ १४४.
चंद्रशेखर (गोऱ्हे चं. शि.) १०, १५, ९८, ९९, १००, ११४, ११५, १२६, १४४, २२६, २३०.
चापेकर श्री. नी. २२६.
चिंतामणीपेठकर ८४, ८६, ८७, ८८, २२३.
चित्रे अनंत विठ्ठल ९१.
चिंधडे वसंत १७३.
चिपळूणकर कृष्णशास्त्री ९३, ९४, २०३, २३९, २४३.
चौधरी बहिणाबाई १८१.
चौधरी सोपानदेव ११४, २१९.

जाग ६७.
जाधवांची मंजुळा २२८.
जिप्सी १२२.
जोशी अ. ह. २१२.
जोशी ना. गं. १५१.
जोशी पु. वा. १३३.
जोशी मा. गो. १९७, १९८, १९९.
झेंडूची फुले २०९, २१०, २१५.
रे. टिळक (नारायण वामन) ५, ६, १४, ३१, ३२, ३३, ३४, ३५, ४५, ५०, ५१, ५२, ६९, १०२, १०३, १०४, १०५, १०६, १३४, १३५, १४४, १४९, १५४, १५९, १६३, १७४, १८६, १९१, १९२, २११, २३४.
टिळक लक्ष्मीबाई १८१, १८२.
टेकाडे आनंदराव ९, ४२, १४४, १४५.
टेनिसन २३, २४.
ठोकळ ग. ल. ११४, ११६, १७७, १७८.

डेव्हिस ६८.

ढवळे वा. रा. १७३.

तळवलकर गोपीनाथ १९६, २००.
तांबे भा. रा. १०, ११, ५३, ५४, ५५, ५८, ११४, १४५, १४६, १४७, १५२, १५४, १६५, १६६, १७९, १८६, १९३, २४९.
तिवारी दु. आ. १४२, १४४, १४५.
तुकाराम १९, ७६, १२५, १८८, २४८.
तुटलेले दुवे १२.
तेलंग मंगेशराव २१३.
तो आणि ती २१९.
दत्त (घाटे द. कों.) १८९, १९०, १९१, १९२.
दप्तरदार विठोबा अण्णा २४.

दातार कृ. ल. २३६.
दामले गं. गो. २४१.
दांडेकर मालतीबाई १८९.
द्राक्षकन्या ५२.
देवस्थळी भा. शं. २४०.
दीक्षित चं. ग. २१६, २१८.
देव दि. वि. २१२, २२१.
देवधर सरलाताई १९८, २००.
देशपांडे अपर्णा १९८.
देशपांडे कमलाबाई ७०, १८९.
देशपांडे गु. ह. ६९.
देशपांडे ना. घ. ११४, १७७.
देशपांडे. वा. ज्यो. १७३.
देशपांडे वा. ना. ६६, १५२.
देशपांडे वि. ह. २३३.
देशपांडे विमलाबाई १८१.
देशमुख चिं. द्वा. २४३.
दैवसेनी ९५, २२७.

नकुलालंकार २१५.
नवलकर ग. र. २३३..
नागेश ( नवरे ना. ग. ) १५, १६४.
नातु मनमोहन. २२०.
नामदेव १८७.
नारखेडे के ११४.
नावलेकर मनोरमाबाई १८२.
निकुम्ब कृ. ब. १६, ११९, १७९.
निफाडकर ए. या. १४३.
निशिगंध (रा. श्री. जोग) १७२, २१७.

पटवर्धन गणपत हरिहर २१, ८६, ८७
पंडित आवळीकर १७४.
पंडित जगन्नाथ राय २४५.
पंडित द. वि. २४३.
पंडित भ. श्री. ६९, १२१, १५१, १९५, १९९.
पत्री ६०, १६०.
पद्माविहारी २००.
पदकी सरिता १८४.
पदकी मंगेश भगवंत १२१, १५३.
परदेशी शांतादेवी १८२.
पाटील ग. ह. ११४, ११७, १९६, १९९, २००.

पाठक यादव मुकुंद १४८.
पाठक वा. भा. ६२, ६३, ६४.
पाडगांवकर मंगेश १२२, १२३.
पांढरकर त्र्यं. मो. २३६.
पारखी पां. गो. ८८, ८९, ९०.
पाळंदे भा. दा. २१, २३, २४, २४६.
प्रधान व. रा. ९४, ९५, २२३.
प्रधान मा. रा. २२७, २२९, २३०.
प्रवासी ६३, २३४.
प्राची १५२.
पुनवेचा थेंब ७०.
प्लेटो ६८.
पोतदार द. वा. २४८.
पोवळे श्रीकृष्ण १५१.

फटकळ अभंग ५८.
डॉ. फ्राईड ६८.
फेज्जेरेल्डच्या रुबाया ५३.

बंदिवान २३३.
बढे राजा १७९, २१२.
बर्वे आनंद ११४, १५३.
बहिणाबाई ११४, ११५.
बाण ८३.

बाबुलनाथ, २२०.
बापट वसंत १४४, १५२, १५३, १७९, १८०.
बापट दा. रा. २३३.
बापट सेनापती १३७, १४१, १४६.
बापट सारजाबाई १८१, २४८.
बाबर सरोजिनी १८९.
बायरन १५८.
बारवेकर के. ल. १३३.
बालकवी ( ठोमरे त्र्यं. बा. ) ६, ७, १४, १५, ४९, ५०, ५८, ६९, १०४, १०५, १०६, १०८, १०९, १४९, १५४, १५६, १६४, १८९, १९०, १९२, १९४.
बी ( नारायण मुरलीधर गुप्ते ) ४, ५, ९, १४, १५, ३१, ३५, ३६, ३७, ३८, ३९, ४२, ५८, १४९, १५४, १५६, १६१, १९३, २२६.
बेडेकर प्रमिला १९७.
बेहरे ना. के. ५१, १४४, १४५, १४६, १४७, १९९.
बोबडे श्री रा. १४४, १७९, २२०.
बोरकर बा. भ. १६, ६५, ११३, ११४, ११९, ११४, १७४.

भगवद्‌गीता २२, ५४.
भक्तिसुधा २४.
भवभूति ८३.
भागवत लीलावती १९७, १९८ १९९, २००.
भांबुरकर रा. भा. २४६.
भालचंद्र १४९.
भावे य. दि. ७९, १५४.
भावे शि. गो. १६९.
भावे ह. वा. १३३.
भिडे बा. अ. २२६.
भिडे ना. म. २३४.
भृंग ( का. वा. पंडित ) २४५.

मॅकडुगल ६८.
मंगळवेढेकर राजा १९७, १९९, २००.
मर्ढेकर बा. सि. १५, १८, १९, २०, ६८, ७१, ७२, ७३, ७५, ७६, ७९, ८०, १२१, १५३, १६९, १८५, २०८, २२१.
मराठे संजीवनी. १८३, १९७, १९८, १९९, २००.
मध्वमुनीश्वर २४.
मधुसंभार ६७.
महाजन दे. ल. २४९.
महाजनि विष्णु मोरेश्वर २१, ९५, १५६, २२३, २२४, २२५, २२६.
" महाराष्ट्र लक्ष्मी " १३५, १३६.
" महाराष्ट्र वंदन " १४३.
माडगूळकर ग. दि. १७८, २४८.
माधव ( काटदरे मा. के. ) १५, ६९, ७०, १४१. १९४, २११,
माधव ज्यूलियन (पटवर्धन मा. त्रिं.) ११, १२, १३, १५, ५२, ५३, ५७, ५८, १०९, ११०, १११, ११३, ११६, १४५, १४७, १४८, १५४, १६६, १६८, १७४, १७७, १७९, १८०, १८६, २००, २०९, २१२, २१३, २१६, २३५

माधवानुज का. ह. १०३, २४९.
मानवता ६४.
माटे श्री. म. १२३, २४९.
मायदेव वा. गो. १९५.
मिल २३.
मुक्तिबोध शरच्चंद्र १६, ७८, १२१, १५१, १५२.
मेघदूत २३८.
मोगरे गं. रा. ५२, १३७, २०३, २०५.
मोडक म. ह. ५१.
मोरोपंत १८८.

यमुनागीत ४७.
यशवंतराव ( महाकाव्य ) ९६, १३७.
यशवंत १३, ६१, ६२, १४५, १५२, १७२, २००.

रंगराव हर्षे—चिंतोपंत उदास २३४.
रघुवंश १३१.
रत्नमाला २३.
रणविहार २४७.
रवींद्रनाथ टागोर ६६, २४८, २४९.
रहाळकर न. शं. ४८.
राजवाडे कृष्णशास्त्री ८९, ९०, ९१.
राजा शिवाजी ८८, १२७, १३०.
रानडे पुष्पलता १९९.
न्या. रानडे महादेव गोविंद ५१, ५२.
रानडे मनोरमाबाई १८१, १८२.
रानडे श्री. बा. ६९, ७०.
राधारमण ( कृष्णाजी पांडुरंग लिमये ) ९१.
रामदास ( ) १९, १२५, १३३, १४०.
रामायण ७.
रुबाया ५२, ५३.
रेगे सदानंद १२२, १२३, १५२, १७६, १९७, १९८, २००.
रेंदाळकर ए. पां. १४, ४७, ४८, १०७, १६५, २२८, २२९, २३३, २४६.

लाड पु. मं. १७३
लेडी ऑफ दी लेक ९४.
लिमये ना. ग. २१३, २१९.
लेंभे वि. म. १५, ५१, ९२, ९३.
लेले ग. स. १२७, १३०, १३३, १३७, २३८.
लेले लक्ष्मणशास्त्री १४३, २४०
लॉंगफेलो एच्. डब्ल्यू. २२६.
लोंढे मो. ग. ९४

वनविहार २४७.
वर्ड्स्वर्थ ३, ७, २४, १०३, २२५.
वाघ ग. त्र्यं. २३६.
वामन पंडित १८८
वॉल्टर डेला मेर ६८.
वाल्मीकी ७, ११, २४८.
विनायक ( वि. ज. करंदीकर ) ९, १५, ४०, १३५, १३६, १३७, १४२, १४४.
विरकूड स. गो. १४३.
विरहतरंग १०९, ११०, १११, १६६, १६७, १६८.
विरागी ( हुपरीकर ग. श्री. ) ६७.
वैद्य वसंत १५४.
वैशंपायन तारा १९७, १९९, २००.

'शशिमोहन' १४८.
शाकुंतल ७.
शारदादूतिका ९.
शिवकाव्य १३३.
शिवराजलीला १३३.
शिवशाहीचा अस्तोदय १३३.
शिवाजी १२५.
शिशिरागम १६९.
शुक्ल ना. गो. १९७, १९८, १९९, २००.
शुतल स. अ. १७३, १७९.
शेले ३, ७, १४, १०३, १५८.
शेळके शांता ज. १८४
शोकावर्त ९३.
षड्ऋतुवर्णन ८८.

सप्रे पंडित २२०.
समाधिशतावली १३३.
समुद्र आर. बी. २१८.
सरंजामे र. द. २००
सरोज सुहृद १४३.
सह्याद्री १३७.
संजीवन ६६.
संत इंदिरा ११९, १८२.
संमोहलहरी २२.
स्कॉट २२९.
सबनीस रा. प. २४४.
सबनीस शा. आ. २४२.
संयोगिता १३६.
साठे शं. गो. २१८, २१९.
साधुदास ( मुजूमदार गो. गो. ) २४७.
साने पां. स. ६०, १४०, १४६.
सावरकर वि. दा. ५८, ९९, १३४, १३७, १४१.
साहित्यदर्पण ५०.
सुधारक २१३.
सुमंत ( मुरतले अ. धुं. ) २५, ४८, ५१, ५२, १६४, २२६.
'सुशीला' १९२.
स्पेंडर २५०.
सोनाळकर के. म. १६४.
स्पेन्सर हर्बर्ट २३.

श्रीखंडे रा. चिं. २४३, २४५.
हवलदार ग. रा. २३१, २३४.
हळवे भिंग ६९.
हिंगणेकर गो. रा. १४३.

ज्ञानेश्वर १९, १८७, १८८.

# शुद्धिपत्र

| अशुद्ध | शुद्ध | पृष्ठ |
|---|---|---|
| Twin shall Combine | Twain shall meet | २५ |
| प्रारंभिही | प्रारंभही | ३७ |
| हरकिले | हटकिले | १११ |
| म्हणून | हणून | १२९ |
| शिंदे. दि. ना. | शिंदे भा. ना. | १४३ |
| स्वयंवेद्य | स्वसंवेद्य | १७६ |
| नायिकाची | नायकाची | १७७ |
| पत्की | पदकी | १८४ |

—×—

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ३७८२ विः निबंध
क्रमांक १२६१ नों दि १७.२.८५

REFBK-0013762

९३७८२